# गुरुप्रसाद

सर्वमंगलमांगल्ये शिवे सर्वार्थसाधिके ।
शरण्ये त्र्यम्बके गौरी नारायणी नमोस्तुते ॥

प्रकाशक :

श्री साई आध्यात्मिक समिती,

पुणे.

॥ श्री साईनाथ ॥

श्री सद्गुरु श्री [illegible] महाराज
[illegible] ह्यांच्या
कृपा आशीर्वादाने हे [illegible]
कार्य करण्याचे भाग्य [illegible]
प.पू. [illegible] मी [illegible]
[illegible] आहे
- [illegible]
म्हणून त्यांच्या [illegible]
गुरु [illegible] चरणी [illegible]
भक्तिभावाने अर्पण करतो.

[illegible]

[illegible]

# पुण्याहवाचन

आज जगात प्रत्येक मानवाला इहजन्मामध्ये सुख-शांती-समाधानाची उणीव आहे. भौतिक शोध लागून जी प्रगती झाली, ही प्रगती शास्त्राची झाली; पण मानवी जीवनाची प्रगती होण्याऐवजी ते गतीमान होऊन, जीवन हे सुखाच्या अभावी दु:खमय झाले आहे. त्यामुळे प्रत्येकजण प्रयत्नशील आहे की, केंव्हा आपल्याला सुखशांती मिळेल. केवळ हा विचार करून चालणार नाही. कारण आम्हा मानवांचे गणित जन्मापासून चुकले आहे. गेल्या शंभर वर्षापासून आपली अपक्रांती चालू आहे व आज अशी वेळ आली आहे की, आम्हा मानवांचे काय होणार? शास्त्रज्ञ चंद्रावर गेले पण स्वत:चा शोध अजून लागला नाही. जेव्हां आपला शोध आपणच घेऊ तेव्हां सुख आहे की नाही हे समजेल. कारण सुखाच्या मागे कोण आहे तर आपले संस्कार! पण आजच्या जगात संस्कार हा विधिपूर्वक न करता, तो केवळ एक फँशनेबल विधी झाला आहे. त्यामळे आम्हा मानवांचा जन्म बाराव्या दिवशी उदीत न होता, पुढे त्याचे बारावे करावे लागते!अशामुळे जरी आपण सुखाची अपेक्षा केली तरी सुख मिळत नाही. मग आपली बुध्दि जागी होते की, ‘सर्वांना सुख प्राप्त झाले आहे पण मला नाही’ व मग आपण शोधाशोध करू लागतो.

अनादिकालापासून आपले पूर्वज देवाला मानीत आले व आपल्या देवात प्रतिमा किंवा मूर्ती पूजनात आहेत. आपण जरी त्याना ‘देव’ असे संबोधतो तरी ह्या प्रतिकामंधील देवत्व लयाला

गेले आहे. कारण आपल्याला मंत्र, तंत्र व यंत्र यांचा उच्चार करता येत नाही. त्यामुळे देवाचे देवत्व अनुभविण्यास दीर्घकाळ लागतो व ही त्रिपुटी जर आपल्याला अवगत झाली तरच देवाचा ‘प्रसाद’ मिळत असतो. ‘देव’ म्हटल्यावर आपल्यापाशी भाव पाहिजे. नुसते पूजापाठ इत्यादि जे आपण करतो, ते कर्म आपल्याकरवी ‘औपचार’ म्हणून होते. त्या कर्माने काहीं इष्ट. फल द्यावे असे नाही. देवाची प्रतिमा व तिची स्थापना आपल्या जीवनात चालतीबोलती व्हावी अशी जर आपली इच्छा असेल तर त्यासाठी तपश्चर्चा करावी लागते. केवळ पैसे देऊन दुकानातून आपण देवाची मूर्ती आणतो, म्हणून ती मूर्ती देवाची नाही. ती केवळ एका धातूची असेल. या व्यतिरिक्त त्यास अन्य अर्थ नाही. असा अनुभव मी स्वत: घेतला आहे. म्हणून प. पू. बाबांना अशी प्रार्थना कार्यारंभी मी केली होती की, येणारे जे भक्त आहेत त्यांच्या घरी एकतरी प्रतिमा असू दे की, ज्यामुळे त्यांचे जीवन सुखमय होईल. पण कार्यारंभी ‘प्रतिमा’ म्हणजे काय हे समजले नाही. आज कार्य करता करता छत्तीस वर्षे झाली व ह्या काळामध्ये जे काहीं गुरु आज्ञेचे पालन केले त्यामुळे आपल्याला तीन प्रतिमा–श्री साई शक-कारण-महाकारण ह्या देऊ शकलो.

दरवर्षी चैत्रापासून फाल्गुनापर्यंत काय कुलधर्म करावा व कोणते कुलाचार करावेत हा प्रश्न सर्वांपुढे आज आहे. हें विधी करण्यासाठी आपल्यापाशी पैसे नाहीत असे आपण म्हणत असलो, तरी चैनीसाठी आपल्याजवळ पैसे आहेत असे पहावयास मिळते. ब्राम्हणसुवासिनी जी जेवावयास पाहिजे, त्याऐवजी इष्टमित्रांसमवेत आपला आहारविहार बिघडला आहे, याची दक्षता आपण ठेवीत नाही. तसेच, आपल्या वाडवडीलांनी ज्या घराण्यात आपल्याला जन्म दिला, त्यांचे ऋण फेडण्यासाठी तीर्थक्षेत्री जाऊन दानधर्म करण्यासाठी आपल्यापाशी पैसे नाहीत ही सबब आपण सांगतो. पण दर महिन्याला नाटक-सिनेमा यासाठी आपला किती खर्च होतो, याचा आपण सूज्ञपणे विचार करीत नाही.

जन्माला येतेवेळी जे संस्कार आहेत, त्या संस्काराना मानणे हा समाजात कमीपणा आहे, म्हणून आपण त्यांची टाळाटाळ करीत असतो व शेवटी आपले जीवन टाळ कुटीत असते. आज आपल्याला देव नको आहे. दु:ख झाल्यावर आपण ‘देवा’ म्हणून हांक मारतो, पण ‘ओ’ ऐकू येत नाही. कारण देव मानणे हा धर्म आपण विसरलो आहोत. म्हणूनच जगतामध्ये आज अशांती आहे. हा सर्व विचार करून, पुढील पिढ्यांचे भवितव्य परमपूज्य साईनाथ महाराजांनी जाणले. मला आज्ञा देऊन मी करीत असलेले कामकाज बंद केले व ‘जगाला सुख देण्यापेक्षा सुखाचा मार्ग सांग’ असे सांगितले. त्यासाठी हा बहुमोल ठेवा **“गुरुप्रसाद”** लिहीला. गेला. कारण आज जगाला त्याची गरज आहे. याशिवाय पुढील पिढ्यांना निश्चित मार्ग समजला पाहिजे. ह्या ग्रंथातील पूर्वार्धामध्ये गतकाातील आपले पूर्वज काय करीत होते या संबंधीचे विवेचन केले असून, उत्तरार्धामध्ये आपल्याला भवितव्यामध्ये काय करणे इष्ट आहे की, जेणे करून आपल्या वंशाचा उध्दार होईल, याबद्दलचे मार्गदर्शन आहे.

वास्तविक, गुरुमार्गी झाल्यावर जे मार्गदर्शन गुरु करीत असतात. त्याप्रमाणे ‘वाकून’ त्याचे आचरण करणे म्हणजे कुलधर्म व कुलाचार आहे. भक्तांचे कल्याण व्हावे अशी इच्छा

श्रीगुरुंची असते. म्हणून, सोप्यात सोपी सेवा ते आपल्याला सांगत असतात. पण काहींतरी निराळेपणाने वागणे म्हणजे गुरुमार्गी असा अर्थ आपण लावून तसे इतरांना ही भासवितो. पण हा अर्थ भविष्यामध्ये आपल्या अनर्थाचा पाया आहे. हे आपण विसरू नये.

'गुरुप्रसाद' ही श्रीगुरूंची भेट आहे. प्रत्येक कुटुंबाने ही श्रीगुरुभेट आधुनिक 'गीता' आहे असे समजून, तिचा स्वीकार केला पाहिजे. पुढील काळात ती जतन करून, भावी पिढ्याना सज्ञान करणे यापेक्षा अधिक पुण्य ते काय?

आपला सेवक,

दादा भागवत.

## श्री मंगला चरण

स जयती सिन्धुरवदनो देवो यत्पादपंकजस्मरणम्
वासरमणिरिव तमसां राशीं नाशयति विघ्नानाम् ॥

या कुन्देदुतुषारहारधवला या शुभ्रवस्त्रावृता
या वीणावरदण्डमण्डितकरा या श्वेतपद्मासना ॥
या ब्रह्माच्युतशंकरप्रभुतिभिर्देवैः सदा वन्दिता
सा मा पातु सरस्वती भगवती नि :शेषजाड्यापहा ॥

मूकं करोति वाचालं पंगुं लंघयते गिरिम्
यत्कृपा तमहं वन्दे परमानन्द माधवम् ॥

नारायणं नमस्कृत्य नरं चैव नरोत्तमम्
देवीं सरस्वतीं चैव ततो जयमुदीरयेत् ॥

वसुदेवसुतं देवं कंसचाणूरमर्दनम्
देवकीपरमानन्दं कृष्णं वन्दे जगद्गुरुम् ॥

गुरुर्ब्रम्हा गुरुर्विष्णु गुरुर्देवो महेश्वरः
गुरुरेव परब्रह्म तस्मै श्रीगुरवे नमः ॥

श्रोता वक्ता श्रीपांडुरंगः समर्थः ॥
पुंडलिकवरदा हरि विठ्ठल ॥
पार्वतीपते हर हर महादेव ॥
सीताकान्तस्मरणं जय जय राम ॥
सच्चिदानन्द सद्गुरु साईनाथ महाराज की जय ॥
श्री गुरुदेव दत्त सदानंदाचा येळकोट ॥
सच्चिदानंद सद्गुरु श्री पंत महाराज की जय ॥

॥ श्री गुरुदेव दत्त ॥

## श्री शक्तिपीठ प्रार्थना

आम्ही गुरुभक्त श्री जगद्गुरु साईनाथ महाराज यांचे चरणी भक्तिभावनेने आज अशी प्रार्थना करीत आहोत की, आपण कृपावंत होऊन, जगत्कल्याणासाठी गुरुशक्तिपीठाची स्थापना करून दिली आहे. त्या शक्तिपीठाची सेवा विनम्र भावनेने, श्रध्दा, भक्ती, निरपेक्ष, निःस्वार्थ बुध्दिने करून, जे कोणी ह्या जगतात दु:खीकष्टी आहेत, त्यांची सेवा काया- वाचा- मनाने करू.

जगतात आम्हा मानवाना प्राप्त झालेल्या जन्मातील कर्तव्याची जाणीव व्हावी व जगतात सर्व मानवाला सुख, शांती, समाधानाचा लाभ होऊन, जगतात मानवी धर्माचा उदय होऊन, मानवी जीवन ईश्वरमय व्हावे, अशी आपल्या चरणी प्रार्थना.

॥ शुभं भवतु ॥

# दैनंदिन प्रार्थना

हे भगवंता नारायणा, आमच्या कुटुंबाच्या उध्दाराकरिता ज्या दिव्य, पुण्य विभूती, स्वतःला अनेक त-हेचा त्रास सोसून देखील, अहर्निश झटत आहेत, त्यांच्या उपदेशाप्रमाणे आणि आज्ञेप्रमाणे आम्हा सर्वांकडून यथोचित वर्तन घडू दे. आमच्या हातून घडलेल्या पातकांची व प्रमादांची या क्षणापासून तरी पुनरावृत्ती न होवो. बिकट आर्थिक व इतर प्रतिकूल परिस्थितीमुळे वैतागून जाऊन आणि क्षुद्र मनोविकारांना किंवा कोत्या समजूतीना बळी पडून, आळसामुळे अथवा अज्ञानामुळे आमच्या मनात त्यांचे विषयी, जे काहीं अनुदार विचार आले असतील अथवा अनुदार उद्‌गार तोंडावाटे निघाले असतील किंवा त्यांच्या उपदेशाविरूध्द कृती घडली असेल, त्या सर्वांबद्दल मी तुझी व त्या सर्वांची अनन्य भावाने क्षमा मागतो.

आमच्या कुटुंबात सदैव सुख, शांती, समाधान व परस्परांविषयी जिव्हाळ्याचे प्रेम आणि भरपूर आनंद ही नित्य वास करोत व तसेच तुझेविषयीची अचल निष्ठा आमचेपैकी प्रत्येकाचे अंतःकरणात सदैव जागृत राहो. आमच्या राहिलेल्या आयुष्यात आमच्या हातून त्यानी योजिलेले महत्कार्य अत्यंत उत्साहाने आणि यशस्वीरित्या पार पडो व इतरही अनेक सत्कृत्ये प्रत्यही घडत राहोत, तेणेकरून त्या दिव्य पुण्य विभूती आम्हावर सदैव संतुष्ठ राहोत व तुझीही आमच्या कुटुंबावर अशीच अखंड कृपादृष्टी राहील असे घडून येवो.

हे प्रभो, आमच्या कुटुंबातील सर्व व्यक्तींना आपापले कर्तव्यकर्म आहोरात्र पाळण्याची सुबुध्दी दे. पूर्वीच्या सत्कर्मानुसार आम्हापैकी काहीं व्यक्ती आज जरी सुख भोगित असू, तथापी "पुढील जन्मांची तरतूद मनुष्याने ह्याच जन्मी अति प्रयत्नाने करावी", अशा त-हेच्या तुझ्या नित्य शुध्द वाचेने, तू जगाला जो धडा घालून दिला आहेस, त्याला अनुसरून आणि उपकाराची फेड अपकाराने न होईल अशीच बुध्दि, हे दयाघना, कुटुंबातील सर्व व्यक्तींना तू दे, एवढीच मागणी तुझ्या चरणी अत्यंत लीन होऊन मी माागत आहे.

# अनुक्रमणिका


कार्य व कार्याची भूमिका १

भक्तभाविकांची कार्यार्थ भूमिका ११

घराण्यातील कुलधर्म ३२

- कुलदेवता
- स्थापनाविधी
- यज्ञोपवित
- हरितालिका व्रत
- विवाहविधी

पूजनादि विधी व त्यांचे महत्व ५९

- आसन
- गंध
- फुले
- अत्तर
- हळदीकुंकू
- फलसमर्पण
- आरती
- पंच उपचार
- प्रार्थना

कुलाचार, कुलोपासना ८८

- अन्नशुध्दि
- वास्तुपूजन
- लक्ष्मी-सरस्वती पूजन
- समृध्दिचे संवर्धन

आहार मीमांसा
घरातील संस्कार
जन्म उत्पत्ती मीमांसा
**उपास्य दैवत व करावयाची उपासना** **१२७**
फलप्राप्तीसाठी उपासना काल
उद्यापन
श्री गणपती पूजन
संचार अवस्था
देवतांचा प्रसाद
**कार्याची निराकरण पध्दती** **१५२**
वंश विमोचन
ऋणानुबंध
कर्मविमोचन
ऋणमोचन
दीक्षा विधी
शक्तिपीठ
कारण,महाकारण,श्री साईशक प्रतिमा
प्रार्थनेचे महत्व
**प्रार्थना साधना व त्यातील वेदवेदांत** **२२८**
प्रार्थना व सिध्दसिध्दांत पध्दती
हिरण्यगर्भ अवस्था
सेवक अवस्था
**ॐ कार साधना** **२४९**
रक्ताभिसरण
साधनेची मीमांसा
साधक अवस्था
पंचप्राण कोश
जीवनाची विकसित अवस्था ( तक्ता )
**गुरुतत्व व त्याचे जीवनातील महत्वाचे कार्य** **३०४**
गुरुमार्गातील दीक्षा
साधक-सिध्द-साध्य अवस्था
सत्पुरूषांचे कार्य
पंचमी, एकादशी, पौर्णिमा, अमावस्या महत्व.
अवधान, ध्यान, चिंतन अवस्था
श्री महाकारण दीक्षा (दिशा)
श्री साई स्वाध्याय मंडळ
श्री गुरुपौर्णिमा महत्व
**उपसंहार** **४०४**

# कार्य व कार्याची भूमिका

आज जगाच्या उत्पत्तीपासून आम्हा भक्तांच्या सुख-शांती-समाधानासाठी परमेश्वराने प्रत्येक युगात भिन्नाभिन्न पातळीवर अवतार घेऊन आम्हा भक्तांच्या कल्याणाची योजना २आखली होती व त्या प्रमाणे प्रत्येक युगात अवतीर्ण झालेल्या अवतारी पुरुषांनी आपले अवतारकार्य नि:स्वार्थ, निरपेक्ष बुध्दीने करून या परमेश्वरकृपेचा बहुमोल असा ठेवा आम्हा मानवांच्या कल्याणार्थ आजपर्यंत अवतारपरंपरेचे व्रत अविरत चालू ठेवून जतन केला आहे. असा हा परंपरेने जतन केलेला परमेश्वराच्या कृपेचा ठेवा गेली ३० वर्षे व अधिक काळ मी तुम्हां भक्तभाविकांच्या सुख-शांती-समाधानासाठी कार्य म्हणून जरी करीत आलो आहे तरी युगयुगांतपरत्वे ही जतन केलेली परमेश्वराची बहुमोल ठेव व तिला प्राप्त होण्यास प्राप्त झालेले तुमच्यासारखे भक्तभाविक याना परमेश्वराच्या सद्हेतूची विशाल भूमिका आम्हा मानवांच्या कल्याणासाठी काय आहे ? याचा बोध झालेला नाही.

आजपर्यंत या कार्याचा लाभ गेल्या ३० वर्षाहून अधिक काळ आपण घेत आलात, पण चुकूनही या कार्याची जी मुलभूत योजना मानवी कल्याणार्थ आहे त्या योजनेची भूमिका काय? व कार्यार्थ आपली भूमिका काय? याचा सुविचार केला नाहीत. या निवेदनात प्रामुख्याने आज तीन भूमिकेसंबंधी जे स्पष्टीकरण करणार आहे ते भवितव्यात तुमच्या व तुमच्या कुटुंबियांच्या कल्याणार्थच आहे.

पहिल्या भूमिकेचे स्पष्टिकरण म्हणजे या कार्याची

स्थापना ही मी काहीं ऐच्छिक किंवा ऐहिक विषय म्हणून केलेली नसून, ईश्वरी आज्ञेने माझ्या माध्यमातून इतरांच्या कल्याणार्थ प्राप्त झालेल्या जन्माचा सदुपयोग व्हावा, प्राप्त झालेला जन्म केवळ ऐहिक विषयाधीन होऊन खाणेपिणे, कपडालत्ता, ऐषआराम यामध्ये व्यतीत होऊ नये या सद्‌भावनेने मी या सेवाकार्याशी आज गेली तीसापेक्षा अधिक वर्षे प्रामाणिक राहून हे व्रत अविरत चालू ठेवले आहे. आज तुमच्याच प्रमाणे मी कुटुंबवत्सल मनुष्य असून जीवनासंबंधी तुमच्या ज्या काहीं अपेक्षा, उणीवा, गरजा असतात तशा स्वाभाविक मलाही असणे हे नित्याचे आहे. तरीसुध्दा आजपर्यंत गेली तीसाहून अधिक वर्षे गुरुकृपेशी एकनिष्ठ राहून आजपर्यंत माझ्या जीवनपरिसरात असणाऱ्या अनेक ऐहिक विषयापासून स्वत:ला दूर ठेवून मी हा गुरुकृपेचा ठेवा तुम्हा मानवांच्या कल्याणासाठी जो जतन केला आहे व ज्याचा लाभ आपण घेत आहात, त्यासंबंधीचे आपले काहीं इष्ठ कर्तव्य या जन्मात त्या घेतलेल्या कृपाशिर्वादासंबंधी आहे असा सुविचार क्षणभरही आपण केला नाहीत. तरीसुध्दा हा तुमच्या अज्ञानाने घडलेला प्रमाद मी विचारात न घेता अजूनही तुमच्या कल्याणार्थ कोणकोणत्या अज्ञात अशा भिन्नाभिन्न गुरुकृपाशिर्वादाच्या साधनांची आवश्यकता आहे याचा विचार करून त्याप्रकारची साधने प्राप्त करण्यासाठी गुरु आज्ञेप्रमाणे गुरुचिंतनात व तीर्थक्षेत्री सेवेत राहून ती मिळविण्याचा प्रयत्न करतो आहे. यामागील सद्‌हेतू म्हणजे केवळ माझ्या कुटुंबाचा योगक्षेम निरंतर स्वरुपामध्ये चालावा व मला प्राप्त झालेल्या जन्मात सद्‌गुरुचरणी निरंतर अशी मुक्ती मिळावी म्हणून केला जात नसून, भवितव्यामध्ये तुम्हाला प्राप्त होणारे अनेक जन्म व



तुमच्या भावी पिढ्या यांच्या सुख-शांती-संपत्ती, संतती-दीर्घायुष्य आदींची तरतूद करण्यासाठी केला जात आहे. आज मी तुम्हां भक्तभाविकांना वैयक्तिक मार्गदर्शनार्थ माझा लाभ देऊ शकत नाही, याचा अर्थ प्रकृतीस्वास्थ्यासाठी किंवा तुम्हा भक्तांच्या सेवेसाठी मी थकलो आहे असे नसून, गेल्या काहीं वर्षात तुमच्या प्रापंचिक जीवनातील अडीअडचणी निवारण करून केवळ ऐहिक विषय हे सुलभपणे तुम्हाला प्राप्त करून देऊन त्याचा उपभोग घेण्यातच जे तुम्ही आपल्या जीवनाचे सार्थक म्हणून मानीत होतात, अशा ह्या चुकीच्या भूमिकेची दुरुस्ती करण्यासाठी गुरुआज्ञेने मला आज दिवसापर्यंत आपल्या सर्वांच्या प्रेमळ सहवासापासून अलिप्त राहून तुम्हा भक्तांना इहजन्मातच पारलौकिक तत्वाचा लाभ कसा करून देता येईल, हा साधनेचा साध्य हेतू मिळविण्यासाठी मला आज दूर रहावे लागले. हे जरी खरे असले तरी ज्या कृपाशिर्वादाचा लाभ तुम्ही घेतलात तो कृपाशिर्वाद मी काहीं तुम्हापासून हिरावून घेतला नाही. तुमच्या असमंजस भूमिकेमुळे तुम्हाला, गेल्या काहीं दिवसापासून वं दादांच्या भेटीचा लाभ होत नाही असा खेद होतो. परंतु गुरुमार्गामध्ये ही जी तुमची भूमिका व्यक्तिपूजनाची आहे ती चुकीची आहे. गुरुकृपाशिर्वाद ही एक महान शक्ति यासर्व जगाला व्यापून कार्य करीत असते. ती कोणाही गुरुभक्तांच्या माध्यामातून स्वयंस्फूर्त कार्यप्रेरणा देत असते. परंतु आपली भूमिका व्यक्तिपूजनाची असल्यामुळे या कार्यात गुरुआज्ञेने नियुक्त केले सेवक हे आपली सेवा करण्यास किंवा आपल्या अडी-अडचणी निवारर्णार्थ मार्गदर्शन करण्यास असमर्थ आहेत अशी भूमिका निर्माण करून, जो अनंत रुपाने सर्वव्यापी नारायण

म्हणून चित्स्वरुपामध्ये सद्‌गुरुच्या ठायी वास करतो आहे व जो मानवी रुपातून प्रकट होतो आहे, अशा गुरुकृपाशिर्वादाला आपण केवळ आपल्या अज्ञानाने मुकत आहात. यापुढील माझ्या जीवनातील काळ हा तुम्हा भक्तांच्या कल्याणार्थ निरंतर अशी सुख-शांती तुम्हा कुटुंबियाना लाभावी व तुमच्या प्राप्त जन्माचे सार्थक कोणत्या साधन-पध्दतीने होईल ती साधने प्राप्त करण्यासाठी खर्च करावयाचा आहे. याचा अर्थ मी तुमच्यापासून दूर आहे असा नसून जो अज्ञानाने तुम्ही हा दुरावा निर्माण करीत आहात त्यापेक्षा मला जे अत्यंत बहुमोल असे गुरुआज्ञेचे इष्ट फल तुमच्या कल्याणार्थ मिळवावयाचे आहे, ते मिळविण्यासाठी तुम्ही माझ्या भूमिकेशी समरस होऊन जे कोणी नियुक्त सेवक प्रत्येक केद्रावर कार्य करीत आहेत त्यांना सहकार्य देऊन, त्याना नियुक्त केलेल्या भूमिकेसंबंधीचे कार्य करण्यास जर वाव दिलात तर अनुभवांती तेही माझ्यासारख्या सिध्दावस्थेला जाऊन 'माध्यम' म्हणून हे कार्य कालकालांतरापर्यंत जगाच्या कल्याणार्थ अविरत करीत राहतील.

कार्यार्थ माझी जी वैयक्तिक भूमिका आहे तिचे स्पष्टिकरण माझ्या यथाज्ञानाने वर केले आहे. जे कार्य गुरुआज्ञेने मी अंगिकारले आहे, त्या कार्याची भूमिका व तिची योग्य ती ओळख तुम्हाला व्हावी म्हणून गुरुआज्ञेने हे कार्य युगयुगांतरापासून चालू असून त्या कार्यात आजपर्यंत मानवी जीवनाची सार्थकता होण्यासाठी जी मार्गदर्शनपध्दत सूचित करण्यात आली ती यासाठी की, आजच्या युगामध्ये सर्वसामान्य माणसाला आचार-विचाराने ईश्वरी कृपा प्राप्त करण्यास दीर्घ असा जीवनातील काळ व्यतीत करणे शक्य नाही. म्हणून सुलभ



अशा निराकरण पध्दतीतून आपल्या प्राप्त जीवनातील इष्ट कर्तव्याची पूर्तता होऊन आपल्या प्राप्त जीवनाचे सार्थक व्हावे असा सद्‌हेतू या कार्याच्या भूमिकेशी आहे.

पूर्वीच्या कार्यपध्दतीतून आम्हा मानवांच्या कल्याणासाठी जी निराकरणपध्दत सूचित करण्यात आली, त्यात ऋषिजनांच्या युगात जप-तप, यज्ञ-याग, आदि सूचित करण्यात आले. पण ही साधने अधिक प्रखर असल्यामुळे सर्वसामान्य मानवाला त्याचा लाभ करून घेता आला नाही. त्यानंतरचा काळ म्हणजे देवदेवतांचा. त्या काळात देवदेवता ही उपास्य दैवते म्हणून अस्तित्वात आली व त्यांच्या कृपाप्राप्तीसाठी कुलधर्म-कुलाचार-कुलोपासना, पंचोपचार, षडोपचार, व्रतवैकल्ये, नवस-सायास आदि मार्ग सूचित करण्यात आले. परंतु ह्या निराकरण पध्दती जरी अधिकारी व सूज्ञ अशा साधकांच्या माध्यमातून सूचित झाल्या होत्या तरी कालपरत्वे मनुष्याला तीही निराकरणे सुलभपणे अंगिकार करून आपल्या प्राप्त जीवनातील इष्ट कर्तव्ये साध्य करण्यास अवघड झाली. अशा या अवघड झालेल्या आचार-विचारांच्या जीवनपध्दतीला वेगळ्या स्वरुपाचे वळण लागून नवीनच अशा शाक्तपंथाचा उदय, त्या काळात होऊन त्या पंथानेही वेगळी निराकरण पध्दती सूचित करण्याचे कार्य केले. त्यांच्या कार्यपध्दतीत जरी देवदेवतांचा समावेश केला जात होता, तरीसुध्दा शक्तिचे कार्य ज्या प्रधान माध्यमातून केले जात होते ती शक्ति म्हणजे देवदेवतांच्या नावाने बळी दिले गेलेले प्राणीमात्र होत. अशा ह्या प्राणीमात्रांच्या बलिदानापासून निर्माण केलेली शक्ति ही मंत्र-तंत्र-यंत्र पध्दतीने धारण करून त्याचा उपयोग इतरांच्या कल्याणासाठी न होता, त्या शक्तिचा वापर

जारण-मारण, पिशाच्च-वशिकरण अशा कार्य पध्दतीसाठी करण्यात येऊन त्या काळात जे काहींएक सर्वसामान्य मानव सुख-शांती-समाधानाने जगत होते त्याना ह्या कार्य पध्दतीमुळे अनेक प्रकारच्या अडचणीना तोंड द्यावे लागले. याचे कारण ज्याना ही मंत्र-तंत्र-यंत्र कार्यपध्दत साधन म्हणून प्राप्त करता आली, त्याना इतराना प्राप्त झालेले सुख पाहण्याचे समाधान न होण्याने त्यानी ह्या साधनांचा वापर समाजात वैरभाव व परस्परात दु:खे निर्माण करण्यासाठी केला. यामुळे परमेश्वराला पुढे या साधनपध्दतीचा जो दुरुपयोग झाला होता, ती साधनपध्दती नष्ट करून, मानवी जीवनाला योग्य अशा कार्यपध्दतीतून नेऊन, इहलोक व परलोक या दोन्ही अवस्थांचा लाभ सुलभपणे व्हावा म्हणून 'नाथपंथा'ची स्थापना करावी लागली.

असा सर्वांना परिचित असणारा हा नाथसंप्रदाय ! यासाठी नवनारायणानी या भूमीवर अवतार घेऊन आपल्या अवतार कार्याला आरंभ केला. या कार्यात प्रथमत: त्यानी देव-युगामध्ये ज्या देवदेवता बलिदान आदि दुष्कृत्यानी शाक्तपंथाने दुषित केल्या होत्या, त्यांचे पुनरुज्जीवन करून शाक्तपंथातील प्रभावी साधने;मंत्र-तंत्र-यंत्र, जारण-मारण आदि जी त्या काळात अस्तित्वात होती त्यांचा वापर पुढील काळात लोकांना सहजासहजी करता येऊ नये म्हणून 'शाबरी विद्ये'ची स्थापना करून शाक्तविद्येचे उच्चाटन केले. अशा या नाथांच्या कार्यपध्दतीचा आविष्कार भारतभूमीवर होऊन सर्वांना समतोल प्रमाणामध्ये सुख-शाती लाभून पारलौकिक तत्वांचा लाभ होण्यासाठी या नाथपंथीयांना श्रीशंकरानी दीक्षा देवून,



श्रीदत्तात्रेयानी अनुग्रहित केले. या दोन देवतांच्या दीक्षा व अनुग्रहपध्दतीमुळे पुन्हा इहलोकात व परलोकात एकरुपत्व होऊन मनुष्याला आपल्या प्राप्त झालेल्या जन्माप्रमाणे 'जन्मजन्मांतर' व 'जन्मकर्म' या दोन्ही ऋणानुबंधांचा लाभ घेण्याचे योग्य ते साधन प्राप्त झाले. प्राप्त जन्म हा केवळ कर्मांग म्हणून आपणास प्राप्त झालेला नसून, त्या प्राप्त जन्मामध्ये 'मातृपितृ' हा एक ऋणानुबंध व दुसरा भाग म्हणजे देवादिक, इतरेजन, जन्मजन्मांतर व जन्मकर्म या ऋणानुबंधांचा हितसंबंध असलेला असा जन्म आहे. केवळ पूर्वजन्मीच्या कर्मपरत्वे जन्म घेतला आहे, अशा संकुचित विचाराने जीवनाकडे पाहून आपण कदापिही सुखी होणार नाही. प्राप्त जन्मात सुख-शांती-संपत्ती-संतती आदिंची अपेक्षा आपण भक्तभाविक करीत असता, त्या आपल्या इष्ट अपेक्षा फलद्रुप न होण्यास मातृपितृ घराण्यातील गेल्या सात पिढीत ज्या दिवंगत व्यक्ती परलोकवासी झाल्या आहेत त्यांच्या इहजगतांशी शिल्लक राहिलेल्या ऐहिक इच्छावासना प्राप्त जन्मात अडथळा निर्माण करीत असतात. असा हा दोष **'वंशविमोचन'** म्हणून निवारण करण्यात येतो. ही वंशविमोचनपध्दत आपल्या कार्यपध्दतीमध्ये आपल्याला जी परिचित आहे, त्या साधनपध्दतीची कार्ययोजना नवनाथांच्या युगापासून झाली असून त्या कार्यपध्दतीचा लाभ गुरुकृपाशिर्वादाने आपल्या कार्यपध्दतीला लाभला आहे व हा लाभ आपण सर्व कुटुंबियांना काहींएक प्रखर साधन न करता जो सुलभपणे मिळतो आहे त्यासारखे सद्भाग्य ह्या जन्मात अन्य कोणतेही नाही !.

आता आपण भक्तांच्या सुख-शांतीच्या प्राप्तीसाठी दुसरे

प्रखर असे साधन म्हणजे **'ऋणमोचन'** होय. ह्या साधनाचा उच्चार करण्यास जरी काहीं वेळ लागत नसला तरी साधक अवस्थेतील माणसाला हे साध्य करण्यास प्राप्त आयुष्यसुध्दा कमी पडेल इतके हे साधन प्रखर आहे. कारण पूर्वीच्या कर्मपरत्वे पुन्हा जेव्हां आपण इहलोकामध्ये जन्म घेतो तेव्हां आत्मा हा देहाधीन होऊन पुन्हा देहाला वर निवेदन केलेले ऋणानुबंध भोगणे भाग पडते अशावेळी वंशदोषातील ऋणानुबंध हे मानवाच्या देहाभोवती वलयरुपाने कार्य करीत असतात. पण देवादिक, मातृपितृ, इतरेजन, जन्मजन्मांतर, जन्मकर्म हे पांच ऋणानुबंध देहात वास करीत असतात. अशा ह्या पांच ऋणानुबंधांच्या अनुकुल-प्रतिकूलतेमुळे आम्हा मानवाना विद्या, संपत्ती, संतती आदि महत्वाच्या विषयांची कर्तव्यता सहज व सुलभपणे पूर्णावस्थेला नेता येत नाही. जन्मप्राप्तीनंतर देहाशी हे हितसंबंधीत झालेले दोष एक केवळ गुरुकृपाशिर्वादाने तरी विमोचित करता येतील किंवा या जन्मांत त्या अनुकुल-प्रतिकूलतेमुळे भोगावे लागणारे दु:ख भोगून पुढील जन्मी योग्य अशा अनुकुल ऋणानुबंधांची प्राप्ती करता येईल. अशा ह्या प्रखर दोषामुळे आज जगतात आपल्या सभोवार अनेक कुटुंबीय अज्ञानाने दु:खाच्या दारात उभे आहेत. परंतु आम्हा मानवांच्या कल्याणार्थ वेळोवेळी परमेश्वराने अवतार घेण्यात कमीपणा न मानता अवतार घेतला आहे. हा अवतार घेण्यामागे परमेश्वराला नांवारुपाला किंवा नांवलौकिकाला पात्र होण्याची इच्छा नसून, तो कमीपणा त्या दयावंत परमेश्वराने आम्हा मानवांच्या कल्याणार्थ व जीवनरक्षणार्थ घेतला आहे. तरीसुद्दा आम्ही मानव आज भौतिक युगाच्या चाकोरीतून स्वत:ला नाशाप्रत नेत आहोत.



पण प्राप्त झालेल्या बहुमोल जीवनाचा गैरवापर अज्ञानाने होत आहे याची जाणीव चुकुनही एक दिवस आपल्याला होत नाही. आज आपली विचारधारणा भौतिक युगपरत्वे अशी झाली आहे की, गुरुमार्गी होणे किंवा गुरुमाध्यमाला पूज्य मानणे म्हणजे आपण अज्ञानी असून प्राप्त जन्मात अशा या मार्गाची ओळख करून घेणे म्हणजे सामाजिकदृष्ट्या कमीपणाचे आहे, अशा विचाराने जीवनाचा निरर्थक असा दुरुपयोग आपण करीत असतो. प्राप्त जन्मांत कर्तव्य म्हणून आपल्या मुलाबाळांची जबाबदारी आपल्यावर आहे. त्यांची भवितव्ये ही केवळ इच्छेने व अपेक्षेने पूर्णावस्थेला नेण्यास तुमच्या इच्छा-अपेक्षा आज समर्थ नाहीत. कारण इच्छा-अपेक्षा असणे हा जरी स्वाभाविक मानवी धर्म आहे तरी आज तुमच्या इच्छा-अपेक्षांचा पाया हा देवनिष्ठेचा नसून ऐहिक विषयाचा आहे. ऐहिक विषय हा केंव्हाही इच्छा-अपेक्षा साकार करण्यास समर्थ असू शकत नाही. कारण या भिन्नाभिन्न विषयांची निर्मीती व त्या विषयांची आसक्ती आम्ही मानवांनी परस्परात केली आहे. ज्या ठिकाणी इच्छा-अपेक्षा आहेत व त्यांच्या पूर्ततेची तरतूद परमेश्वराच्या अधिष्ठानावर स्थापित आहे, अशा इच्छा-अपेक्षा ह्या केवळ या जन्मातच साकार होणार नसून तुमच्या पुढील अनेक जन्मांत व अनेक पिढ्यात साकार होतील. पण आपण आपल्या भवितव्याचा इतका विशाल विचार करून जीवन व्यतीत करीत नाही. ही एक दुर्दैवाची गोष्ट आज आपल्या वाट्याला आली आहे. जो देव आपल्या इच्छा-अपेक्षा ह्या अनेक जन्मकालपर्यंत पूर्ण करण्यास समर्थ आहे. त्या परमेश्वराला प्राप्त करण्यास जितका सहज व सोपा मार्ग या जगतामध्ये आहे यापेक्षासुध्दा अवघड अशा

भौतिक मार्गाचा अवलंब करून आपण 'देव मानीत नाही' असे शाब्दिक भूषण जीवनामध्ये भूषविता. हे भूषण समाजात प्रतिष्ठा निर्माण करण्यास जरी करणीभूत होत असले तरी कर्मपरत्वे प्राप्त झालेला जन्म, ही प्रतिष्ठा वाकविण्यास भाग पाडतो.



# भक्तभाविकांची कार्यार्थ भूमिका

या कार्यपध्दतीचा लाभ घेण्यासाठी जेव्हां आपण भक्त कार्यकेंद्रावर उपस्थित होता, तेव्हां कार्यासंबंधीची माहिती आपल्याला कोणीतरी तेथील भक्त की, ज्याने तेथील निराकरण पध्दतीचा लाभ घेतला आहे. त्याच्याकडून कळते. यापेक्षा अधिक कार्यसंबंधीची ओळख आपणास होत नाही. प्रत्येक मानवाची जीवनाबद्दलची अपेक्षा अशी असते की, प्राप्त जन्मांत सुख-शांती-समाधान, विद्या-संपत्ती-संतती-दीर्घायुष्य आदिचा लाभ व्हावा, अशा या स्वाभाविक अशा जीवनातील गरजा व त्यांची योग्य त-हेने प्राप्ती न होण्याची कारणे शोधून काढणे व त्यांचे निराकरण करणे हा या कार्याचा सद्हेतू आहे. हा सद्हेतू सद्गुरुकृपाशिर्वादाने व नाथपरंपरेच्या सिध्दसिध्दांत पध्दतीने मनुष्याला ऐहिक व पारमार्थिक अशा दोन्ही सुखांचा लाभ करून देण्यास जरी समर्थ आहे तरी त्याचा लाभ तुम्हां भक्तांना होण्यास जेव्हां विलंब लागतो, तेव्हां विलंब लागल्यामुळे ऐच्छिक सुख प्राप्त होण्यास विलंब का लागला? याचा सूज्ञ विचार न करता, अन्यत्र कोणीतरी साधक आपल्याला अपेक्षित सुखाची प्राप्ती लवकर करून देईल म्हणून आपण आपली मार्गदर्शनाची दिशा अज्ञानाने बदलता. अशावेळी आपण आपली महत्वाची जबाबदारी न ओळखता दुसरीकडे मार्गदर्शनार्थ जाता. अशा जाण्याने वावगे असे काहींच तुमच्या दृष्टिने घडत नाही. पण गुरुमार्गाच्या दृष्टिने ही तुमची कृती तुमच्या जीवनाला अपायकारक असते. कारण अडिअडचणि निवारणार्थ केले गेलेले निराकरण ही गुरुकृपाशिर्वादाची ठेव व भेट असते, ती

आपण स्वीकारताच कार्यान्वित होण्यास सुरुवात करते. तो कृपाशिर्वाद कार्यार्थ आपण स्वीकारल्यावर आपल्या जीवनातील प्रतिकूल अशा परिस्थितीची जी तीव्रता तुमच्या जीवनासभोवर वलय रुपाने तुम्हाला दु:ख तथा अशांतता निर्माण करण्यास कारणीभूत होत असते, अशा वलयातील या दोषांची तीव्रता कमी करून ती वलये अनुकुल करून देण्याचे कार्य हा गुरुकृपाशिर्वाद करीत असतो. दु:ख निवारणार्थ निराकरणानंतर कृपाशिर्वादाचे प्रतिक म्हणून, जे श्रीफल आपण भक्तभाविक स्वीकारता ते आपल्याला गुरुकृपाशिर्वादाने देण्यात आल्यावर, ते श्रीफल गुरुकृपाशिर्वादाचे वलयच असते. पण आज आपण कृपाशिर्वादाचे वलय देह माध्यामातून धारण करण्यास असमर्थ आहात म्हणून श्रीफल हे माध्यम कृपाशिर्वादार्थ उपयोगात आणावे लागते. आता अशा कृपाशिर्वादाच्या कार्याला सुरवात झाल्यावर जो लागणारा वेळ आहे तो तुमच्या जीवनातील कमीअधिक प्रमाणामध्ये असणाऱ्या दोषांच्या अनुकुल-प्रतिकूलतेवर अवलंबून आहे. पण हा बोध आपण लक्षात न घेता, गुरुकृपाशिर्वादातच काहीं कमतरता आहे, अशा विचाराप्रत जाऊन अधिक दु:ख वाढविण्यास कारणीभूत होता.

आज आपण भक्तांना इच्छित सुख-शांति प्राप्त करण्यासाठी ज्या कार्याची स्थापना गुरु आज्ञेने करण्यात आली. त्या कार्यार्थ लागणाऱ्या सर्व सिध्दसाधन पध्दती ह्या साधक अवस्थेतील माध्यमाला पूर्णत्वाने प्राप्त झाल्या आहेत की नाहीत याची परिक्षा वेळोवेळी श्रीसद्‌गुरुनी घेतल्यावरच साधक माध्यमास या कार्यार्थ नियुक्त केले आहे. हे आपण जाणत नसल्याने आपणही वेगळ्या प्रकाराने किंवा विचाराने साधकाला



प्राप्त झालेल्या गुरुकृपाशिर्वाद, की जी आशिर्वादाची ठेव मानवी जन्माच्या मूल्यापलीकडे आहे. त्या कृपाशिर्वादाची परिक्षा केवळ ऐहिक विषयाधीन होऊन घेण्याचा प्रयत्न जो करता, तो न करता सुलभ व सोप्या मार्गाचा अवलंब करावा. तो म्हणजे अडिअडचणी निवारणार्थ दिला गेलेला प्रसाद याची प्राप्ती होण्यासाठी आपण आजपर्यंत कधीही विनम्र भक्तिभावनेने परमेश्वराला शरण गेलो नाही याची जाणीव ठेवून दिला गेलेला कृपाशिर्वाद हा भक्तिभावनेने मार्गदर्शनाप्रमाणे पूजनादि विधी करून त्याच्याशी एकरुप व्हावे. याउलट आपली भूमिका व आपले विचारांचे माध्मम आपण अडिअडचणीशी गुंतवून ठेवता, त्यामुळे कृपाशिर्वाद मनाने धारण केल्याशिवाय आपल्या अडिअडचणी निवारण होणार नाहीत. हे न समजल्याने कृपाशिर्वादाचा स्वीकार नाईलाजास्तव करता व अडिअडचणी निवारण का होत नाहीत, याचा विचार न करता आपल्या अपेक्षित इच्छा-अपेक्षा ह्या कार्यात पुऱ्या होणार नाहीत म्हणून दुसरीकडे याच प्रश्नाची विचारणा करण्यासाठी धाव घेता. पर्यायी हे कार्य जरी तुमच्या अनेक जन्मांची, सुख-शांती-समाधानाची तरतूद करण्यास समर्थ असले तरी केवळ तुमच्या अज्ञानी विचारामुळे व वागण्यामुळे या कार्याला कमीपणा आणण्याचे कर्तव्य तुम्ही करता. वास्तविक ज्या तुमच्या ऐहिक गरजा आहेत, त्या तुम्हाला प्राप्त करून देणे हे कार्य गुरुसामर्थ्यापलिकडचे नाही. तरीसुध्दा जोपर्यंत जीवनात 'गुरुकृपाशिर्वाद' हा प्रधान विषय म्हणून आपण स्वीकारीत नाही तोपर्यंत जगातील अनेक साधकांच्या साधक मार्गाचा किंवा निराकरणाचा जरी लाभ घेतलात तरी क्षणिक सुखापलीकडे तुमच्या जीवनाला निरंतर अशी निर्भय

सावली प्राप्त होणार नाही. आपण भक्तभाविक कार्याच्या मार्गदर्शनार्थ आल्यानंतर आपल्या जीवनमाध्यमाचे गुरुकृपाशिर्वादाने निरिक्षण करण्यात येते त्यावेळी प्राप्त झालेल्या जीवनमाध्यमात पूर्णत्व न दिसता ते असंख्य अशा आचारविचाराच्या निरर्थक अशा कारणाने मोडकळीस आले आहे, असे अनुभवास येते. याचे कारण आज प्राप्त झालेल्या जन्माचे यथोचित ज्ञान करून घेऊन यथायोग्यवेळी त्या जीवनावर संस्कारादि गोष्टीची जी आवश्कता होती त्याकडे आपण सर्वजण दुर्लक्ष करीत आलात. असे हे महत्वाचे विधी जीवनारंभी बाल्यावस्थेपासूनच होण्याने देहिक व आत्मिक या दोन्ही माध्यमांच्या विकासाला सारखेपणाने विकसित होण्यास वाव मिळतो. परंतु देवचिंतन, धर्माचरण आदि गोष्टी या वार्धक्यावस्थेत प्राप्त करावयाच्या असतात, अशा अज्ञानी कल्पना मुळाशी धरून जीवनाचा विकास बाल्यावस्थेपासून होण्याने पुढील आयुष्य विकसित होऊन इष्टकर्तव्ये पार पाडण्याचे सामर्थ्य ज्या विधीतून किंवा संस्कारातून मिळत असते, अशा संस्काराना स्वत:च्या व कुटुंबांच्या जीवनापासून अलिप्त ठेवून तुम्ही आज आपली दु:खे निवारण करू इच्छिता. जीवनारंभापासूनच हा महत्वाचा जीवन विकसित करण्याचा जो कार्यकारणभाव आहे, तो अनादिकालाच्या शास्त्रपरंपरेप्रमाणे व साधनपध्दतीप्रमाणे मानवाच्या कल्याणार्थ अजूनही कार्य करतो आहे. याची साक्ष म्हणजे हे कार्य होय. !

आज जीवनातील अपेक्षित सुख, शांति, समाधानाच्या अस्ताव्यस्त कल्पना आपल्या जीवनामध्ये आहेत. त्या घेऊन आपण सद्‌गुरुचरणी धांव घेतो. पण आपल्या मोडकळीस



आलेल्या जीवनाकडे पाहिल्यावर श्रीसद्‌गुरुंना परम दु:ख होते, याची कल्पना आपण भक्तांना कदापिही येणार नाही. आज तुम्हां भक्तांचे जीवन मोडकळीस येण्याचे कारण म्हणजे आज ज्या स्वधर्मामध्ये तुम्ही जन्म घेतलात तो धर्म म्हणजे काय? ज्या धर्मात जन्माला आलो त्या धर्माप्रीत्यर्थ आपले कर्तव्य काय? हे जाणून घेतले नाहीत व ज्या कुळामध्ये जन्म घेतला त्या कुळाच्या कुलदेवता, देवदेवता यांच्याप्रीत्यर्थ कुलधर्म, कुलाचार, कुलोपासना ह्या विधीतून आपल्या जीवनाला पोषक असा कृपाशिर्वाद मिळविण्याचे कर्तव्य तुम्ही आजपर्यंत श्रध्दा भक्तिने कधीही अंगिकारले नाही. ज्या जन्मादात्या मातापित्यानी तुम्हाला इहजन्मामध्ये जन्म प्राप्त करून घेण्यास योग्य ती संधी दिली त्या मातापित्यांच्या ऋणानुबंधाची फेड जीवनात कर्तव्य म्हणून करणे हे आपले कर्तव्य आहे हेही विसरलात. प्राप्त जन्मात तुम्हाला प्राप्त झालेले सुख व तेही गरजेपेक्षा अधिक असतानासुध्दा अधिक प्राप्तीचा हव्यास ठेवून सुखाच्या सावलीकडे धावत गेलात. पण प्राप्त झालेल्या जीवनात इतरानांही काहीं सुख समाधान देऊन आपल्या ऐपतीप्रमाणे दानधर्म, परोपकार आदि करण्याचे कर्तव्य हे या जन्माचे उद्दिष्ट आहे याची जाणीव कधीही करून घेतली नाहीत. त्याशिवाय अत्यंत जी महत्वाची जबाबदारी आपल्याला स्वीकारावयाची होती, ती म्हणजे आज प्राप्त झालेला जन्म हा जो आपण जीवन व्यतीत करण्यासाठी खर्च करीत आहात ती जन्मप्राप्ती, जन्मानंतर, ऋणानुबंध व जन्मकर्म ऋणानुबंधपरत्वे प्राप्त झाली आहे, अशा या दोन ऋणानुबंधास 'देहिक जीवन' असे म्हटले आहे. पण ह्या देहिक माध्यमाला ज्या दोन अवस्थांच्या म्हणजे जन्मजन्मांतर व

जन्मकर्म यांच्या सहकार्याने कार्य करावयाचे आहे, त्या माध्यमाला बाल्यावस्थेतच संस्कारविधी करून पुढील जीवनाच्या कर्तव्याच्या जबाबदाऱ्या सांभाळण्याचे सामर्थ्य आपण भक्तभाविक देऊ शकत नाही. याउलट आज जीवन व्यतीत करीत असताना आपल्या जीवनासभोवार असणारे अनावश्यक असे जे विषय आहेत त्या विषयांची प्राप्ती किती अधिक लवकर होईल? यासाठी जन्मकर्माला म्हणजे देहातील अवस्थेला या तुमच्या सभोवार असणाऱ्या ऐहिक विषयाधीन केले आहे. अशी ही देहाची अधिक विषयाधीन होण्याची क्रिया झाल्यामुळे जन्मजन्मांतर व जन्मकर्म ह्या दोन्ही अवस्था परस्परांशी एकरूप होऊन सहकार्य करण्याऐवजी प्रधान माध्यम म्हणून केवळ देहच जीवन व्यतीत करीत आहे. त्यामुळे जीवन व्यतीत करण्याचा जो मूलभूत पाया शास्त्रीयदृष्ट्या जीवनोत्पत्ती मीमांसेमध्ये सांगितला आहे, त्याउलट तुम्ही जीवन व्यतीत करू लागल्यानंतर इच्छा किंवा अपेक्षा पूर्णत्वाला जाव्यात कशा? आता ज्या अपेक्षेने तुम्ही आलात त्या अपेक्षा इतरांना प्राप्त झालेल्या सुखाचा विषय म्हणून विचारानी मार्गदर्शनार्थ घेऊन आलात. पण ज्या अपेक्षा विचार स्वरूपात तुम्ही देहमाध्यमातून व्यक्त करता ते माध्यम या अपेक्षा पूर्णत्वाला नेण्यास तुमच्या अज्ञानामुळे किती असमर्थ झाले आहे हे विचारात घेत नाही. याचे कारण देहमाध्यमाची व्यक्त क्रिया 'कर्म' म्हणून तुमच्या अनुभवाला येते. पण देहमाध्यमाचे अव्यक्त कार्य म्हणजे तुमची 'इष्ट फलप्राप्ती' हे अव्यक्त असल्याने ते जाणून घेणे हे गुरुमार्गात निष्ठेने गेल्याशिवाय अनुभवास येत नाही.

तुमची देहिक स्थिती व त्यापरत्वे तुमचे जीवन इतके



मोडकळीस येऊन ते अविकसित अवस्थेमध्ये असल्याने, ज्या तुमच्या इच्छाअपेक्षा पूर्णत्वाला जात नाहीत, असे जीवन श्रीसद्‌गुरूचरणी आल्यावर ह्या तुमच्या अज्ञानाबद्दल श्रीसद्‌गुरूनी कोणाही भक्तास अनादर, तिरस्कार केला नाही. याउलट तुमच्या अज्ञानाचे गोड कौतुक करून तुमच्या भवितव्याची तरतूद करण्यासाठी साधक अवस्थेतील माध्यमाला ह्या कायार्थ सिध्द केले. ही गुरूंची विशाल गुरुकृपा ह्या जन्मात आपल्याला काहींएक प्रयत्न न करता जी लाभली आहे, ती आत्मियतेने जतन करून त्या कृपेच्या चिंतनात आपले आयुष्य व्यतीत करणे हे या जन्माचे सार्थक होय. जीवनातील अनेक ऐहिक विषयप्राप्तीसाठी जन्मभर आपण काबाडकष्ट, मानापमान, हांजीहांजी, लांचलुचपत, खोटेनाटे, खरेखोटे इत्यादि प्रकारची वर्तने करून ते मिळविण्याचा प्रयत्न करतो. तरीसुध्दा तो ऐहिक विषय आपल्याकडे पाठ फिरवून उभा राहतो. या उलट तुमच्या ठिकाणी असणारा श्रध्देचा, भक्तीचा, सबुरीचा, परोपकाराचा, दुसऱ्यासंबंधी हितचिंतनाचा, देवाबद्दलचा, धर्माबद्दलचा अभाव असूनसुध्दा श्रीसद्‌गुरू तुमच्याकडे कधीही पाठ न फिरवता तुमच्या आगमनाची आतुरतेने वाट पाहून तुम्हाला आपल्या सानिध्यांत बसविण्याचे महत्भाग्य प्राप्त करून देतात. असे हे निरंतर सुख वाट्याला आल्यावर ऐहिक सुखाच्या इच्छा वासना याबद्दल स्वाभाविकरित्या आपण विन्मुख व्हावयास पाहिजे. तरच या जन्मी गुरूप्राप्ती झाली म्हणजे 'निश्चित' काय झाले ते पदोपदी अनुभवास येईल. ही अवस्था भक्ताने प्राप्त करून घेणे यालाच 'गुरुसाक्षात्कार' असे म्हणतात.

आपण भक्तांचे जीवन मोडकळीस येण्यास किंवा अपेक्षित सुख शांती प्राप्त करण्यास देहिक माध्यम कां असमर्थ झाले आहे यासंबंधी सर्व खुलासा वर केला आहे. आता असे मोडकळीस आलेले किंवा सुखशांती प्राप्त करण्यास असमर्थ झालेले देहिक जीवन वास्तविक निसर्गनियमाप्रमाणे तुमचे तुम्हीच पूर्ववत करून व शक्तिमान करून इच्छित सुख-शांति-समाधानाची पाऊलवाट सुलभपणे प्राप्त करून घ्यावी अशी योजना या जन्मात त्या परमेश्वराने केलेली आहे. पण याचा अनुभव किंवा लाभ हा आपणास केंव्हा प्राप्त होईल? तर श्रध्देने व निष्ठेने तुम्ही आपले जीवन जर परमेश्वरास समर्पण केले असेल तरच होईल. याचा अर्थ जेव्हां या जगतामध्ये परमेश्वकृपेने तुम्ही जन्म घेता तेव्हां पूर्वीच्या जन्मांत केले गेलेले धार्मिक आचरण, पुण्यसंचय, परोपकार, इतरांच्या हितासाठी सद्‌विचार आदिचा समावेश जो पुण्याई म्हणून करण्यात येतो ते सर्व पुण्य तुम्ही जन्माला आल्यावर तुमच्या स्थूल देहाकडे म्हणजे पंचभौतिक देहाकडे एकरूप झालेले नसते. त्या पुण्याईतील काहीं भाग की, ज्याची असे जीवन असमर्थ व दुबळे झाल्यावर पुन्हा एकवार ते उभारण्यास तुम्हाला गरज पडणार आहे, असे जो परमेश्वर जाणतो, त्याने ती पुण्याई सुरक्षित अशा ठिकाणी ठेवून पुढे जेव्हां तुम्हाला त्याची गरज जाणवते त्यावेळीच ती सद्‌उपोगार्थ पाठविण्याचा स्वाभाविक, नैसर्गिक असा धर्म या जगतात निर्माण केलेला आहे. हा स्थूल देह, की ज्या माध्यमाकरवी या जगात आपण जन्माला आल्यावर आपल्या इष्ट कर्तव्याची पूर्तता करण्याचे महान कर्तव्य आपल्याला करावयाचे आहे, त्या स्थूल देहाची नैसर्गिक रचना



निसर्गाने म्हणजे परमेश्वराने काय केली आहे याचा तरी आपण बोध घेतलात काय? आज आरशासमोर उभे राहिलात तर आपल्याला ज्या स्थूल देहाचे प्रतिबिंब दिसते, त्या देहात अधिक दोन देहांचाही समावेश आहे हे आपण जाणत नाही. त्यामुळे जीवन कर्तव्यार्थ कोणकोणती आवश्यक कर्मे व कोणकोणते आवश्यक सुविचार करणे आपल्या हिताचे आहे हे आपणास समजत नाही. आंबा हे फळ आपल्या हातात घेतल्यावर त्याच्या तीन अवस्था दिसतात. त्या म्हणजे फळाचे वरील आवरण, आतील गर व त्या फळाची निर्मिती ज्या तत्वापासून झाली आहे ते त्याचे बीज. या फळाच्या निर्मिती बरोबरच आपली मानवी जीवनाची निर्मिती परमेश्वराने केलेली आहे, ती अशी की, जो आपण पाहता तो 'स्थूल देह' व त्याच्या आंत 'सूक्ष्म देह' व 'कारण देह', अशा ह्या तिन्ही अवस्था एकच असणारे जे माध्यम ते म्हणजे देहिक जीवन व ह्या जीवनाला निरंतर अशा सुख-शांतीचा लाभ व्हावा अशी जी तुमची इच्छा आहे त्यासाठी या तिन्ही देहांचा परिपाक म्हणजे विकास हा योग्य मार्गाने योग्य आचार विचारात व्हावयास पाहिजे. जर आपणास आंबा हे फळ खाण्याची इच्छा झाली तर? आपली आंबा खाण्याची इच्छा पूर्णत्वास केंव्हा जाईल? तर प्रथम अवस्थेमध्ये आंबा हे फळ कैरी या अवस्थमध्ये असते, त्यानंतर दुसऱ्या अवस्थेला आपण पाड लागला असे म्हणतो व तिसऱ्या अवस्थेला आंबा पिकला आहे असे म्हणतो. या तीनही अवस्थांचे पूर्णत्व हा त्या फळाचा पूर्णतः विकास. म्हणजे तुम्हाला फल सेवनाची जी इच्छा झाली आहे त्या इच्छेची पूर्तता करण्यासाठी केवळ आंबा खाण्याची इच्छा झाली म्हणून कैरी सेवनार्थ घेतली तर ती आंबट म्हणूनच

अनुभवास येते. कारण आंबटपणा अनुभविण्यास देणे हा जरी मूळ आंबा या फळाचा गुणधर्म नाही, तरी ज्या फळाचा परिपाक झाला नाही अशा फळाला तुम्ही इच्छा म्हणून सेवन केलेत व जर त्या आंब्याचा जो गुणधर्म नाही तो अनुभवास आला तर आंबा आंबट लागला हा दोष तुमचा की आंब्याचा? त्याप्रमाणे आजचा हा जन्म पूर्वीच्या अनादि जन्माचे परमपवित्र असे फळ देवाने या जन्मांत आपल्या ओटीत घातले आहे. परंतु त्या फळाची संभाव्य कार्यदिशा ही ज्ञानाअभावी आपल्याला न समजल्याने ते परमपवित्र फळ आपण आपल्या ओटीतून काढून ओटीवर ठेवतो आहोत. म्हणजे चव्हाट्यावर ठेवून, 'मी दु:खी आहे' असे आपल्याच बरोबरीच्या व आपल्यासारखे अज्ञानी असे जे जग आपल्यासभोवार आहे त्याला सांगत आहोत. ते तरी आपल्या दु:खात सहभागी होऊ शकतात काय? नाही. कारण त्यानाही आपल्या जीवनाचे जे परमपवित्र फळ असेच चव्हाट्यावर ठेवले आहे. यापेक्षा जे तुमच्या वाट्याला आलेले हे परमपवित्र फळ आहे, त्याचे ज्ञान गुरूजनांच्याकडे जाऊन, भक्तिभावाने विनम्र होऊन, तत्संबंधीचे ज्ञान ग्रहण करून, हे फळ जेव्हां ओळखाल त्यावेळी त्या परमेश्वराच्या अगाध लीलेबद्दल तुम्हाला धन्यता वाटून आज ज्या वाणीने तुम्ही अनेक ऐहिक सुखे मागता आहात त्याच वाणीने तुम्ही त्या अनंतव्यापी, सर्वज्ञ परमेश्वराला असे सांगाल की, ‘माझे मागणे आता एकच आहे, की तुझ्याचरणी मला निरंतर ठाव दे’

आता हे परमपवित्र फळ म्हणजे तुमचे आजचे प्राप्त जीवन, जे महत्प्रयासाने प्राप्त झाले आहे, त्याची ओळख मी माझ्या यथाज्ञानाने, यथाशक्तिने करून देतो. हा प्राप्त देह व



त्यात सामावलेले दोन देह, असे हे तीन देह म्हणजे स्थूल, सूक्ष्म व कारण. या देहिक माध्यमाना पूर्वीच्या अनेक जन्मात अपूर्ण राहिलेले असे कार्य, पुन:श्च प्राप्त जन्मात करावयाचे आहे. यासाठी जन्मप्राप्ती नंतर जे पांच ऋणानुबंध मनुष्याला जीवनात सुख-शांती-समाधान आदिला करणीभूत होतात, त्या ऋणानुबंधांचे कार्य यथोचितपणे त्या त्या माध्यमाकडे देऊन, या देहाची उभारणी परमेश्वराने योग्य अशा कार्याद्वारे केलली आहे ती म्हणजे स्थूल देहाकडे ‘जन्मकर्म’ ऋणानुबंध, सूक्ष्म देहाकडे ‘जन्मजन्मांतर’ ऋणानुबंध व कारण देहाकडे ‘देवादिक’ ऋणानुबंध, असा समावेश करून या तत्वाची जाणीव होण्यासाठी स्थूल देहाल ‘बुध्दि’ हे माध्यम, सूक्ष्म देहाला ‘मन’ हे माध्यम व कारण देहाला ‘चित्त’ हे माध्यम, अशी देहाची रचना करून, राहिलेले दोन ऋणानुबंध म्हणजे ‘मातृपितृ’ व ‘इतरेजन’ हे स्थूल देहाच्या बाहेर वलय रुपाने अस्तित्वात आहेत. आता आपल्याला सुख-शांती व समाधानाने जीवन जगण्यासाठी ज्या अत्यावश्यक माध्यमांची गरज आहे, ती न मागता जर परमेश्वराने आस्थापूर्वक व विचारपूर्वक आपल्याला भेट म्हणून दिलेली आहेत तर त्या परमेश्वराचे भक्त होण्याचा कमीपणा तुम्हा भक्तांना कां वाटावा? हें मी गेल्या अनेक वर्षात समजू शकलो नाही.

असमर्थ झालेले किंवा मोडकळीस आलेले जीवन, याची पुन:श्च उभारणी तुम्हाला सहजगत्या व स्वाभाविक करता यावी म्हणून परमेश्वराने त तुमच्या पूर्वीच्या जन्मापैकी काहीं पुण्याईचा भाग मागे ठेवला आहे, असे जे वर सांगितले आहे, याचा अर्थ तो पुण्याईचा भाग, कारण देह, म्हणजे देवादिकाचे

माध्यम, या ठिकाणी सामावलेला आहे. जेव्हां तुम्ही नव्याने जन्म घेतल्यावर पुन्हा निश्चित अशा परमेश्वराच्या भक्तीला स्वीकारून ती कर्तव्य बुध्दिने पार पाडण्याचा प्रयत्न कराल, तेव्हां ती भक्ती देवादिकाच्या, म्हणजे कारण देहापर्यंत पोहोचून तुमच्या वाट्याला आलेली व परमेश्वराने पुढील आयुष्याची तरतूद करण्यासाठी म्हणून जी ठेव ठेवली आहे, ती ह्या जन्मात विस्कळीत झालेल्या किंवा असमर्थ जीवनाला पुनःश्च चैतन्य प्राप्त करून देण्यास उपयोगात आणता येते.

अशी ही नैसर्गिक व स्वाभाविक कार्यरचना करून दिल्यावरसुध्दा आपण तिचा लाभ न घेता, अनैसर्गिक, निर्जीव अशा मार्गाचा अवलंब करून ह्या पुण्याईला, असमर्थ झालेल्या जीवनाला समर्थ करण्यास वाव देत नाही. कारण ही कार्य रचना नैसर्गिक स्वरूपात प्राप्त होण्यास तुमचे आचार विचार, देवाबद्दलची श्रध्दा, निष्ठा व आपण करीत असलेली भक्ति ही निरपेक्ष व निःस्वार्थ असावयास पाहिजे. तरच ती पुण्याई कार्यान्वित होऊन, तिन्ही देह एकरूप होऊन, जे एक तुमच्या ठिकाणी सामर्थ्य निर्माण होईल, ते ह्या जगाला सामावून घेण्याइतके सामर्थ्यवान असेल. इतके सामर्थ्य निर्माण होण्याची तरतूद ह्या जीवनात परमेश्वराने केली असताना, एखाद्या प्रतिकूल कर्मपरत्वे भोगावी लागत असलेली परिस्थिती ही तुमच्या सामर्थ्या बाहेर असू शकेल काय? पण इतका जीवनाबद्दलचा सखोल विचार करावयास म्हटले तर त्यास स्वाभाविक, वेळ हा लागणारच. ह्या कार्यरचनेच्या कार्यपध्दतीनुसार आपण कार्य केंद्रावर आल्यावर जो कृपाशिर्वाद दिला जातो, हे सहाय्य किवा ही मदत



एव्हढ्यासाठीच आहे की, वरील तिनही अवस्था एकरूप करून प्राप्त जीवन सामर्थ्यवान करणे हे सामान्य माणसाला करता येणार नाही, म्हणून परमेश्वराने गुरूरूपी अवतार घेऊन तुमची तरतूद केली आहे. आपण भक्तांची भावना अशी असते की, आम्ही विचारलेल्या ऐहिक प्रश्नांसंबंधी व दुःख आणि अशांतता निर्माण झाली आहे त्याच्या निवारणार्थ हा प्रसाद आहे, पण ही आमची वरील भूमिका आजपर्यंत आपणास परिचित नाही. एकदा आपण सामर्थ्यवान झालात की जी सुखे आज आपल्याला मागावी लागत आहेत ती ऐहिक सुखे आपल्या पायावर लोटांगण घालतील. अशी ही गुरुकृपाशिर्वादाची महती सांगताना वेदवेदांत किंवा अन्य धर्मशास्त्रेही थकली आहेत.

जीवनाप्रीत्यर्थ परमेश्वराने केलेली कार्यरचना व त्यासंबधीचे ज्ञान न करून घेता आपण अनैसर्गिक व निर्जीव अशा मार्गाकडे धाव घेऊन जीवनाबद्दलचे भूतभविष्य विचारता. जे साधक आज समाजात लोक-कल्याण कार्य म्हणून भास निर्माण करीत आहेत, त्यांच्याकडे जाऊन, भिन्नाभिन्न देवदेवता, उपास्य देवता, जपजाप्य, दीक्षा, अनुग्रह घेऊन, आपल्या जीवनाला जे पोषक नाही ते अनुभविण्यासाठी काहीं काळ खर्च करता व त्यामुळे तुमच्या देहपरिसरात अशुध्द अशा वलयांची निर्मिती करता. हीं वलये तुमचा देह स्वीकारीत नाही. कारण ही वलये अनैसर्गिक अवस्थेतून निर्माण झालेली असतात. जी वलये नैसर्गिक स्वरूपात व सजीव आहेत तीच फक्त तुमचा देह धारण करू शकतो. अशी ही, कारण नसताना आपण जी अवघड समस्या, की जी कृपाशिर्वादाला पोषक नाही, ती निर्माण करून जेव्हां मार्गदर्शनार्थ येता तेव्हां आपणास दिलेल्या कृपाशिर्वाद

ह्या अवस्थेला, जी वलये तुमच्या देहपरिसरामध्ये पोषक नाहीत त्याचे ‘विमोचन’ प्रथमत: करावे लागते. त्यामुळे तुमच्या इच्छा अपेक्षांची जी तीव्रता सुखशांतीसाठी असते त्याला विलंब लागतो. हे सूज्ञपणे जाणून भक्तभाविकानी मार्गदर्शनार्थ आल्यावर दिलेल्या प्रसादाची अवहेलना न करता किंवा दिलेल्या मुदतीपर्यंत काम झाले नाही म्हणून कामासंबंधी विचारणा न करता, दिले गेलेले कृपाशिर्वादरूपी श्रीफल हे नित्य पूजनात ठेवून त्याचे पूजन भक्तिभावनेने केल्यास ह्या कार्याचा सद्हेतू मानवी कल्याणार्थ किती सखोल, तात्विक, अनुभवसिध्द व सिध्दसिध्दांतपध्दतीवर आधारलेला आहे हे अनुभवास येईल. याउलट तुम्ही सुख-शांती, दु:ख तथा अशांतता याचा अन्वयार्थ न समजल्याने देहाच्या विकसित अवस्थेला वाव न देणारे आचार विचार जीवन म्हणून ठरविता. ते म्हणजे मानवी जीवनाच्या मार्गदर्शनार्थ परमेश्वराने निर्माण केलेली जी जी शास्त्रे आपण ऐकतो किंवा त्याचा अनुभव घेण्याचा प्रयत्न करतो त्या मूळ शास्त्रांची भूमिका मानवी जीवनाला कल्याणार्थ काय आहे हे न समजल्यामुळे, त्या सर्व शास्त्रांचा दुरूपयोग मनुष्याने ज्योतिष शास्त्रापासून अणुशास्त्रापर्यंत केला आहे. उदाहरणार्थ ‘ज्योतिषशास्त्र’हे मार्गदर्शनार्थ आहे. पण त्या शास्त्राचा उपयोग भविष्यात काय आहे हे विचारण्यासाठी होतो. वास्तविक प्रत्येक मनुष्याने भविष्य घडवायचे असते. ते घडत नसते. भविष्यकाळात येणाऱ्या अडिअडचणी किंवा संकटे यांची जाणीव करून देण्यासाठी, त्या अडिअडचणी व संकटे यापासून आपला बचाव कसा करता येईल याची पूर्व सूचना मिळण्यासाठी व त्या अडिअडचणींना किंवा संकटाना तोंड देण्यासाठी, आपण आपली



पूर्व तयारी कशी ठेवावी, हे समजावे असा भविष्यशास्त्राचा मुख्य उद्देश आहे. पण आज हे ज्योतिषशास्त्र जाणत आहेत ते गरजू माणसाला चुकीच्या दिशेने जाण्याचे मार्गदर्शन करतात. त्यामुळे जीवनपरत्वे प्राप्त झालेली सुख-संपत्ती नाश होऊन, त्याची पुन:श्च प्राप्ती करण्यासाठी याच शास्त्राचा उपयोग रेस, सट्टा, शेअर बाजार, आकडे, जुगार इत्यादिसाठी करून, कष्टार्जित मिळविलेल्या लक्ष्मीचा गैरवापर करून, त्या लक्ष्मीच्या कृपाशिर्वादाला आपण अपात्र ठरता. वास्तविक कष्टार्जित, जीवन व प्रामाणिकपणे ती लक्ष्मी प्राप्त करण्यासाठी अहर्निश जो मनुष्य कर्तव्यनिष्ठ असेल, त्या माणसाबरोबर संसार करण्यास लक्ष्मी सदैव तयार असते. पण जे आपल्या भाग्यातून आपल्याला लाभलेले आहे, त्यापेक्षा आधिक भाग्यवान होण्याचा मार्ग मनुष्य अंगिकारतो. परंतु हे मनुष्याच्या हाती नसून तुम्हाला भाग्यवान करण्याची उदार भूमिका लक्ष्मीचीच असते. अशा लक्ष्मीचा गैरवापर होण्याने आपण कर्जबाजारी होऊन शारीरिक व मानसिक दु:खे अज्ञानाने निर्माण करतो. शारीरिक दु:खाची भरपाई करण्यासाठी जुगार, सट्टा, आदि मार्गाचा वापर झाल्यावर, मन:शांती प्राप्त करण्याचा जो मार्ग म्हणजे रोज दिवसाकाठी सकाळी व संध्याकाळी निदान पंधरा मिनिटे तरी ईश्वर चिंतनात व्यतीत करावयाची, त्या ऐवजी आपण सायंकाळ होण्याची अतुरतेने वाट पाहत असतो. कारण वरील सर्व प्रकारामुळे स्वत:च्या कुटुंबात स्वत:ला स्वास्थ्य व शांतता पै-पैशाच्या अभावी नसते. पण अशा वेळी कुटुंबासमवेत सुखदु:खाचा विचार न करता सायंकाळी इष्ट मित्राबरोबर क्लबमध्यें जाऊन पत्ते व तेही करमणूक नव्हे तर पैसे लावून

खेळले जातात. त्याप्रमाणे जी मन:शांती ढळली आहे ती मिळविण्यासाठी जो ईश्वर चिंतन करण्याचा सुलभ मार्ग आहे, त्या ऐवजी अशा व्यक्ती मद्यपान, धुम्रपान व इतर गुंगी आणणारे पदार्थ सेवन करून मन:शांती प्राप्त करण्याचा आधुनिक व अद्‌भूत असा मार्ग निर्माण करून, एक नवीनच समस्या गुरुमार्गाकडे मार्गदर्शनार्थ धाव घेणाऱ्या व्यक्तींच्या कुटुबियांना निर्माण करून देऊन, जी संसाराची संपूर्ण जबाबदारी पतीने सांभाळावयाची आहे ती आपल्या स्वैर विचाराना व आचाराना आंवर न घालता आल्यामुळे, आपल्या पत्नीवर सोपवून मोकळ्या होतात. पर्यायी अशा अपयशाला व दु:ख अशांततेला आपणच कारणीभूत आहोत याची जाणीव न ठेवून आपली धर्मपत्नी की जिच्याशी आपण धर्मशास्त्राने विवाह केला, तिच्या पायगुणामुळे आपण भिकेला लागलो, असा सुखसंवाद सकाळी उजाडल्यापासून सांयकाळपर्यंत अशा व्यक्तींच्या संसारात चालू होतो व अशा दु:ख अशांतीचे कारण आस्थेने, सुविचाराने लक्षात न घेता पुन्हा आपली पावले सायंकाळी त्याच अपयशाच्या दारात आपणास नेत असतात. अशावेळी अशा पडत्या काळात मनुष्याने आपल्याला पोषक असा स्नेह-मित्र परिचित करावा की, ज्यामुळे आपले हे दुर्वर्तन सुधारून पुन:श्च आपण मानवी जन्माच्या मूलभूत अशा शुध्द, सात्विक व मौलिक अशा जीवनाकडे वळू.

अशा या ज्ञानअज्ञानाने घडलेल्या दोषांचे दुष्परिणाम आम्हा मानवांना जाणवले, की ह्या दुष्कृत्यापासून आपण दोषमुक्त व्हावे या सद्‌भावनेने, आपल्याला धर्मपरत्वे प्रायच:श्चित्तादि विधी करून घेण्यासाठी आपण गुरुजनाकडे धांव घेऊन प्राय:श्चित्तादि विधी करून घेतो त्या प्राय:श्चित्त विधीमध्ये



होम-हवन, अन्नदान, वस्त्रदान, द्रव्यदान इत्यादिंचा समावेश असतो. पण असा विधी करीत असताना, ज्या आम्हा मानवांच्या हातून दुष्कृत्ये न कळत घडलेली आहेत, तसेच त्याबद्दलचे प्राय:श्चित्तसुध्दा न कळत घेतले पाहिजे. हे प्राय:श्चित्त सांगणारे गुरूजन जो काहीं विधी किंवा पवित्र अशा मंत्राचा उच्चार आपणांस करावयास सांगतात, त्यावेळी आपले मन त्या पवित्र मंत्राशी व इष्टविधीशी एकाग्र व्हावयास पाहिजे. केवळ केल्या गेलेल्या दुष्कृत्याबद्दल मन:स्ताप होतो आहे . म्हणून देहिक विधी करून याचे फल मिळणार नाही. जगातील प्रत्येक धर्मात केल्या गेलेल्या दुष्कृत्यासाठी किंवा पापविमोचनासाठी जे प्राय:श्चित्त देण्यात येते किंवा घेण्यात येत हा विधी शास्त्रशुध्द भूमिकेतून समजावून घेतला पाहिजे. कारण शास्त्राप्रमाणे प्राय:श्चित सांगणे इतकाच अधिकार धर्मपरत्वे गुरूजनांना आहे. पापमुक्त करण्याचा अधिकार त्यांचा नाही. तो देवाचा आहे. प्राय:श्चित्त घेण्याची इष्ट व अनिष्ट कर्तव्ये ज्या व्यक्तीच्या हातून ही कर्मे घडली आहेत, त्याने हा विधी आस्थापूर्वक पुढील भावी जीवनात आचार विचारामध्ये आणण्याचे कर्तव्य केले पाहिजे.

'प्राय:श्चित्त' जीवनात एकदाच घेता येते. पण ज्या स्वधर्मामध्ये आपण जन्माला आलो त्या धर्मात ही जी प्राय:श्चित्ते सांगितली आहेत, त्याचा अर्थ आपण आपल्या सोयीने असा लावतो की, सदैव दुष्कृत्ये व दुष्कर्मे करीत रहावे व वारंवार प्राय:श्चित घेत रहावे. अशाने जरी तुम्ही अनेक प्राय:श्चित्ते घेतलीत तरी केल्या गेलेल्या कोणत्याही दुष्कृत्यापासून तुम्ही दोषमुक्त होणार नाही. ही दुष्कर्मे एक तर पुढील जन्मात तुमच्या वाट्याला येतील किंवा कर्मपरत्वे त्यांचे दु:ख तुमच्या

भावी पिढ्यांना भोगावे लागेल. तेव्हां धर्मशास्त्राने तरतूद करून दिलेल्या प्रायश्चितादि विधीकडे धांव घेण्यापेक्षा, प्रथमतः ज्ञान-अज्ञानाने आपण ज्या दुष्कृत्ये करण्याच्या दुष्ट प्रवृत्तीला बळी पडलो, म्हणजे जी दुष्टप्रवृत्ती काया-वाचा-मनात ओतप्रोत भरून राहिल्याने या दुष्ट कृत्यापासून आपण सद्‌सद्‌विवेकबुध्दिने दूर होऊ शकलो नाही, त्यासंबंधी परमेश्वराजवळ अनन्य भक्तिभावनेने व निष्ठेने बसून, ज्ञान-अज्ञानाने घडलेल्या पातकाबद्दल दुःख व्यक्त करून, काया-वाचा-मन हे शुध्द करून घ्या. कारण जेव्हां गुरुजन आपल्याला प्रायश्चितादि विधी सांगतील तो कृपाशिर्वाद घेण्यास आपली काया, आपले मन व आपली वाचा ही जशी जन्माला आली तेव्हां शुध्द होती. इतकी शुध्दता तीच्या ठिकाणी निर्माण करून जर प्रायःश्चित घेतलेत तर ज्या स्वधर्मात तुम्ही जन्म घेतलात व ज्या धर्माने तुमच्या उध्दारार्थ शास्त्र निर्माण केले, ते शास्त्र किती शक्तिमान आहे हे अनुभवास येईल. याचा लाभ तुम्हाला याच जन्मी अनुभवास येईल असे नसून, पुढील अनेक जन्म व तुमच्या भावी पिढ्या यांच्या उध्दाराचा मार्ग तुम्ही सहज व सोपा असा कराल.

मार्गदर्शनार्थ येणाऱ्या अनेक भक्तभाविकांचा प्रश्न असा असतो की, कष्टार्जित पैसा पुरत नसल्याने सदैव प्रापंचिक ओढाताण होते व त्यामुळे कारण नसताना कौटुंबिक जीवनात अशांतता निर्माण होते. वास्तविक या प्रश्नाचे निराकरण विचारण्यपूर्वी अशी परिस्थिती निर्माण होण्यास कारण कोण व काय कारण आहे? याचा कोणीही सूज्ञ भक्त विचार करीत नाहीत. जगतात जन्माला येणारा प्रत्येक मनुष्य हा जेव्हां परमेश्वरकृपेने इहलाकी येतो, त्याआधीच परमेश्वराने त्याचा



अन्न, वस्त्र, निवारा, देवधर्म, दानधर्म, परोपकार यांची सोय दोन पिढ्यांपर्यंत केलेली असताना, तुम्हा भक्ताना एकाच पिढीत, म्हणण्यापेक्षा अर्ध्या प्रापंचिक कर्तव्याची पूर्तता करताना ही कमतरता कां भासावी? आज तुमच्या सभोवार असणारे जग प्रत्येक क्षणोक्षणी आपले स्वरूप बदलत आहे. परंतु त्या बदलत्या स्वरूपाला अनुरूप अशी तुमच्या जीवनाची भूमिका तुम्ही न ठरविल्यने वारंवार असे ऐकण्यात येते की, 'या वाढत्या महागाईचा बकासूर कधी नष्ट होणार? '. पण आजची ही जी परिस्थिती आपण आपल्या कौटुंबिक जीवनापासून राष्ट्रापर्यंत पाहत आहोत, या परिस्थितीला आपणच कारणीभूत आहोत असे प्रामाणिकपणे कबुल करण्यास कोणीही तयार नाही. आजची सामाजिक परिस्थिती व पूर्वीची सामाजिक परिस्थिती यांचे सिंहावलोकन केले तर असे अनुभवास येते की, पूर्वीच्या काळी संघटित किंवा एकत्र कुटुंबपध्दतीने लोक रहात असूनसुध्दा सुखासमाधानाने आपली इष्टकर्तव्ये करून पुढील भावी पिढ्यांसाठी घरदार, जमीनजुमला, दागदागिने, आदिची तरतूद करू शकत होते. या ठिकाणी सूज्ञ भक्त अशी विचारणा करतील की, 'त्या काळात सर्वत्र सुबत्ता होती व आज वाढती महागाई आहे. यामुळे आम्हाला सद्यपरिस्थितीस तोंड देता येत नाही'. पण याला उत्तर असे की, वाढत्या महागाई बरोबर आपली प्राप्तीही पूर्वीच्या काळातील प्राप्तीच्या मानाने वाढलेली आहे. म्हणजे वाढत्या महागाईचे निमित्त करून आपण जीवनपोषणार्थ जी भूमिका विचारांती ठरवू शकलो नाही, त्याचा दोष आपण वाढत्या महागाईला देतो. आता दुसरा प्रश्न असा की, 'जर परमेश्वराने आम्हाला दोन पिढ्यांची तरतूद करून जन्माला

पाठविले आहे, तर जी आमची प्राप्ती आमच्या पिढीलाही पुरी पडत नाही याला जबाबदार कोण? '. पूर्वीच्या कौटुंबिक पध्दतीप्रमाणे आज एकत्र राहण्याची पध्दत अस्तित्वात नाही. प्रत्येक कुटुंबातील व्यक्ती सज्ञान व प्रौढ झाल्यावर, वेगळेपणाने राहण्यात आनंद मानीत आहे. असे असताना तुमच्या जीवनात कुटुंबातील इतर व्यक्तींच्या जबाबदाऱ्या त्या मानाने कमीच आहेत. त्यामुळे आवश्यक त्या समस्यांची पूर्तता न होण्यास जे कारण आहे, ते म्हणजे जीवन सुख-समाधानाने व्यतीत करणे, त्या भूमिकेचा मूलभूत पाया आज आपल्याजवळ नाही. ज्या परमेश्वराने तुमच्या अन्न, वस्त्र, निवारा, देवधर्म, दानधर्म, व परोपकार यांची तरतूद केलेली आहे, त्यापैकी देवधर्म, दानधर्म, व परोपकार या जीवनातील आद्य कर्तव्यार्थ वर्षाकाठी तुमच्या प्राप्तीतून अल्प अशी रक्कमसुध्दा अतिकष्टाने ही खर्ची पडत नाही. जीवनात अन्न ही मनुष्यची प्रधान गरज आहे हे सर्वांना परिचित आहे. ती गरज प्रत्येक मनुष्य गरजेपरत्वे भागवितो. पण तुमच्या जीवनातील आवश्यक अशी प्राप्ती ही वस्त्र व निवारा यांत गरजेपेक्षा अधिक प्रमाणामध्ये वाढलेली आहे. वस्त्रांचा वापर हा वर्षाकाठी किती असावा? असा प्रश्न तुम्हाला विचारला, तर आज ह्या जगातील बदलत्या फॅशनमुळे ज्या नानाविध प्रकारच्या वस्त्राना खरेदी करून घेण्याचा तुमचा मोह अनावश्यक म्हणून वाढलेला आहे. त्या वस्त्रांना साठविण्यासाठी घरातील कपाटेसुध्दा अपुरी पडू लागली आहेत. असा अनावश्यक खर्च वर्षाकाठी वस्त्र खरिदण्यासाठी होऊन, ती जतन करण्यासाठी लागणारी कपाटे यांचीच संख्या राहत्या जागेत वाढू लागली तर निवाऱ्यासाठी आपण आपल्या ऐपतीप्रमाणे जी जागा घेता, ती



कुटुंबातील व्यक्तींच्या उठण्याबसण्यासाठी उपयोगात न येऊन जी कपाटे आजच्या आधुनिक फॅशनचे प्रदर्शन झाली आहेत, त्यानी व्यापली आहे. गरजेपेक्षा अधिक सामानसुमान व कपाटे, तेही केवळ वर्षाकाठी कधी येणाऱ्या पै-पाहुण्यांना आपण खूप ऐषारामात जीवन व्यतीत करीत आहोत याचे प्रदर्शन करण्यासाठी घरामध्ये दाखल झाली आहेत, अशा अडचणीमुळे पुन्हा इच्छा अशी निर्माण होते की, राहत्या जागेपेक्षा एखादी मोठी जागा घ्यावी. समजा, परमेश्वरकृपेने त्याचा जरी लाभ झाला तरी पुन्हा त्याही जागेत अनावश्यक वस्तूंची वाढ ही होतच राहणार. कारण आपल्या सभोवारचे जग हे बदलत्या दिशेने फॅशन म्हणून नव्या कलाकृती निर्माण करीत आहे, त्या पाहून आपला मोह इतका अनावर होतो की, ज्या जुन्यापुराण्या वस्तु जतन करून वापरणे आपले इष्टकर्तव्य आहे, ते विचारात न घेता, आपण नित्य नव्या उदयाला येणाऱ्या बाजाराचे ग्राहक बनून, जो पै-पैसा कष्टार्जित आहे, त्याचा वापर गरजेपेक्षा अधिक केला गेल्याने, पुढच्या पिढ्यांच्या संगोपनांची, विद्याविद्यार्जनाची आबाळ तुमच्या ह्या वासनारूपी इच्छा, ज्या नव्या जगाकडे धावत आहेत, त्यामुळे होते. यात परमेश्वराचा दोष काहींही नसून, त्याने जी तुमची तरतूद केली आहे ती तुमच्या गरजेपरत्वे केलेली आहे. यासाठी तुम्ही जीवनार्थ आपली भूमिका जर निश्चित कराल, की ज्यामध्ये कोणाचेही अनुकरण, कोणाच्याही जीवनाशी स्पर्धा नाही व आपल्या ऐपतीप्रमाणे जे आपणास प्राप्त झाले आहे त्यात सुख-समाधान मानून जर जीवन व्यतीत कराल तरच परमेश्वराने दोन पिढ्यांची तरतूद केली आहे किंवा नाही हे अनुभवास येईल.

# घराण्यातील कुलधर्म

आपण भक्त आपल्या जीवनातील अडिअडचणी निवारणार्थ ह्या कार्याचा लाभ घेण्यासाठी येता, त्यावेळी प्रथमत: जर कुठला प्रश्न विचारला जात असेल तर तुमच्या घराण्याच्या कुलदेवदेवता व तुम्ही अंगिकारलेले उपास्य दैवत काय किंवा कोणते? त्या देवतांच्या कृपाशिर्वादार्थ आपण कुलाचार, कुलधर्म, कुलोपासना इत्यादि काय करतां? अशावेळी आपण अज्ञानाने करीत असलेली, या देवदेवतांच्या कृपाशिर्वादाप्रित्यर्थची सेवा ही निवेदन करता. हे ऐकल्यानंतर आपल्या ह्या सांगण्याचे कौतुक वाटते की, ज्या कुलदेवदेवता तुमच्या घराण्याच्या आहेत, त्यांची सेवा म्हणजे कुलधर्म, कुलाचार शास्त्रीय पद्धतीनें कसा करावयास हवा हे शास्त्र ऋषीजनांनी जे देवदेवतांच्या युगामध्ये सांगितले; त्या शास्त्रीय पद्धतीनुसार हे होत नसून, केवळ घराण्यांत ह्या देवदेवतांचा हितसंबंध कृपाशिर्वाद मिळविण्यासाठी सांगितला आहे, त्यासाठी सेवा म्हणून रुढीपरंपरेप्रमाणे तुम्ही आजपर्यंत करीत आलेले आहात. वास्तविक देवदेवतांच्या युगात, ऋषीजनांनी सांगितलेली पद्धत, म्हणजे कुलधर्म-कुलाचार हे शास्त्रीय पद्धतीनें केले तर तुमच्या घराण्यातील भावी पिढ्या अनंतकाळपर्यंत सुखी होतील. आज जगातील प्रत्येक कार्ययंत्रणा ही शास्त्रीय पद्धतीनें केल्याशिवाय त्या शास्त्राचें ठिकाणी असणारा मूळ गुणधर्म हा जसा अनुभवास येत नाही, तद्वत् आपल्या इष्ट कुलदेवदेवतां यांचा कुलधर्म, कुलाचार, कुलोपासना आपण शास्त्रीय पद्धतीने करीत नाहीं, त्यामुळे ह्या देवतांचा स्वाभाविक गुण म्हणजे



'शक्ति' व तिची सेवा तुम्ही करीत आहांत म्हणून तुम्हाला 'शक्तिमान' करणे हा जरी आहे; तरी दीर्घकालपर्यंत ह्या कुलदेवदेवता यांची सेवा करूनसुद्धा तुम्हाला ह्या कार्याकडे मार्गदर्शनार्थ यावे लागले.

एका काळात ही सृष्टी रानटी अवस्थेमध्यें जीवन जगत होती. त्यावेळी त्या रानटी अवस्थेमध्यें असलेल्या मानवाला जीवन व्यतीत करण्याचें मूलभूत शास्त्र अवगत झाले नव्हते. किंबहुना त्याचें ज्ञानही नव्हतें. त्या काळांत त्यांना धर्म म्हणजे काय? कर्म म्हणजे काय? देव म्हणजे काय? आदींच्या कर्तव्याची ओळखसुद्धा नव्हती. केवळ देहधर्म व त्या देहधर्मपरत्त्वें देहाला जाणविणारी ज्या ज्या प्रकारची भूक किंवा इच्छा-वासना असेल ती पुरी करून जीवन व्यतीत करणें, इतकाच जीवनाचा अर्थ ते समजत होते. अशामुळे ह्या सृष्टीचे पावित्र्य लयाला जाण्याने, सृष्टीनिर्मितीचा जो परमेश्वराचा सद्हेतु जेव्हां अविकसित असा राहिला, तेव्हां परमेश्वराने स्वर्गलोकातून ऋषीजनांना या भूमीवर पाठवून, वेदवेदांत विद्येप्रमाणें यज्ञ-याग, जप-तप आदि साधनांचा उपयोग करून, या भूमीला योग्य असे पावित्र्य प्राप्त करून दिले. ही भूमि योग्यप्रकारे पवित्र झाल्यानंतर, भिन्नाभिन्न ठिकाणी आपली गुरुकुले स्थापन करून, लोकांना विद्याविद्यार्जन देऊन, त्यांना सज्ञान करण्याचा महान प्रयत्न केला. आज आपणास आपले 'गोत्र' काय म्हणून प्रश्न विचारण्यात येतो, पण दुर्दैवाने आज आपणास आपले गोत्रही उच्चारता येत नाहीं. गोत्र उच्चार एवढ्याचसाठी आहे की, ज्या अनादिकाली आपण एका रानटी अवस्थेत होतो, त्या अवस्थेतून सज्ञान अवस्थेत येण्यासाठी ज्या

गुरुकुलाचा लाभ घेतलात व आज आपण आधुनिक मानव म्हणून जगत आहोत; पण त्याकाळात ऋषीजनांनी आपल्या देहिक अवस्थेत जी प्रथमत: 'श्री' लिहिली त्यामुळें आज आपण चंद्रावर जाण्यापर्यंत शास्त्र उपलब्ध करूं शकलो. अशा काळातील हे त्यांचे उपकार आपल्याला जन्मोजन्मी फेडता येणार नाहीत. त्यासाठी, निदान ज्या गुरुकुलातून आपण ज्ञाते झालो, त्याचे स्मरण म्हणून तरी नित्याने गोत्राचा उच्चार करणें आपले कर्तव्य आहे.

या कार्यपद्धतीचा अवलंब होऊन, जेव्हां ह्या रानटी अवस्थेमध्ये असणाऱ्या आम्हा मानवांना प्राप्त झालेल्या जन्माबद्दल ज्ञान झाले, त्यावेळी जीवन कृतार्थ करण्यासाठी या ऋषीजनांनी ब्रह्मा, विष्णू व महेश या त्रिगुणात्मक शक्तीला 'देवदेवता' व ' उपास्यदेवता' म्हणून इहलोकी अवतार घेण्यास प्रार्थना केली. त्या ऋषीजनांच्या प्रार्थनेला प्रतिसाद देऊन ब्रह्मा, विष्णू, महेश म्हणजे उत्पत्ति, स्थिती व लय या त्रिगुणात्मक अशा महान शक्तीने भूमीवर येऊन, या विश्वरचनेमध्ये तीन अवस्था धारण करून, ऋषीजनांचे इष्टफलकार्य अंगिकारले. इहलोकासाठी 'देवता' स्थापित झाल्या, परलोकासाठी 'देव' अधिष्ठीत झाले व स्वर्गलोकांसाठी 'उपास्य दैवत' वास करते झाले.

अशी ही कार्यकारण रचना होऊन ऋषीजनांच्या प्रार्थनेला प्रतिसाद देऊन जेव्हां ह्या त्रिगुणात्मक शक्तीने या जगताचे कल्याण करण्याचे कार्य अंगिकारले, तेव्हां इहलोकांत मानवाला विद्या, संपत्ती व संतती यांची अत्यंत गरज आहे म्हणून ती त्रिगुणात्मक शक्ति 'श्री महाकाली', 'श्री महालक्ष्मी' व 'श्री



महासरस्वति' या नांवरूपे उदयास आली. प्राप्त झालेली विद्या, संपत्ती, संतती यांचे सुख, समाधान, शांति चिरकाल घराण्यांत व कुटुंबात वास करीत रहावी म्हणून हे कार्य 'देवां'च्याकडे दिले. घराण्याची व कुलाची ऐहिक स्थिती सुधारावी व प्रत्येक मनुष्य जो विद्या, संपत्ती व संतती प्राप्त करण्यासाठी अहर्निश प्रयत्न करीत असतो, त्याला योग्य असा कृपाशिर्वाद देऊन, ते प्राप्त करण्याचे सामर्थ्य त्याला प्राप्त व्हावे; म्हणून ह्या देवतांना 'कुलस्वामिनी' म्हणण्याचा प्रघात पडला. प्राप्त झालेल्या यशाला निरंतर सुख, शांति, समाधान याचा लाभ करून देण्यासही यथोचित सहाय्य अत्यावश्यक आहे, म्हणून हे कार्य 'देव' यांच्याकडे दिले व या देवांना 'कुलस्वामी' असे म्हटले आहे.

जेव्हा आपण अधिव्याधीनें व्याकुळ होतो, त्यावेळेला नकळत आपल्या वाणीतून जो 'आई' म्हणून उच्चार होतो त्याचा कोणी बोध घेतला आहे काय? ही हांक, की जी 'आई' म्हणून आपण उच्चारतो, ती हांक जन्मदात्या आईशी संबंधित नसून ती आपल्या कुलस्वामिनीशी संबंधित असते. कारण आपण जरी त्या देवतेला भक्तिभावनेनें मानीत नसलात, तिची आराधना, सेवा, योग्य प्रकाराने करीत नसलात, तरी ऋषीजनांच्या काळांत ऋषीजनांनी तिला आम्हा मानवांच्या कल्याणार्थ 'कुलस्वामिनी' म्हणून संबोधले आहे. त्या ऋषीजनांच्या केल्या गेलेल्या प्रार्थनेचे पालन आज युगापर्यंत ह्या देवदेवता करीत आलेल्या आहेत. आता अशा कुलदेवदेवता की ज्या आम्हा मानवांना अजूनही देवयुगापासून विसरलेल्या नाहीत, त्यांना मात्र आपण पाश्चिमात्य संस्कृतीचे;आचार-विचारांचे पांघरूण स्वत:भोवती घेऊन जरी विसरलो आहोत, तरी जगाच्या अंतापर्यंत ह्या

देवदेवतांचे कार्य बदलत्या काळाप्रमाणे बदलणारे नाही व कोणाच्याही इच्छेप्रमाणे ते बदलणार नाही, हे सूज्ञ भक्तांनी लक्षांत घ्यावे.

आपल्या जीवनात अद्‌भूत व अनपेक्षित अशी एखादी गोष्ट घडते, तेव्हा नकळत आपण 'देवा' म्हणून हाक मारतो. ही वरीलप्रमाणें आपल्या ठिकाणी वास करीत असलेल्या देवाची साक्ष आहे. याचा अर्थ असा की, प्रसंगपरत्त्वे जर देव आणि देवता ह्या तुमच्या ठिकाणी सामावलेल्या आहेत याची साक्ष देतात, तर 'मी देव मानीत नाही' असे म्हणणे भूषणावह आहे काय? जरी तुम्ही अज्ञानाने त्यांचा अव्हेर केला आहे तरी त्या देवदेवतांनी तुमचा अनादर कदापिही व कधीही केलेला नाही. याउलट वेळोवेळी जेव्हा तुम्ही आधिव्याधीत जर्जर झालेले आहात, संकटग्रस्त झालेले आहेत, तेव्हा त्यांतून तारून नेण्याचे महान कार्य त्यांनी केले आहे; म्हटल्यानंतर त्यांच्याप्रित्यर्थ करावी लागणारी सेवा म्हणजे कुलधर्म-कुलाचार-कुलोपासना, किती आस्थेने आपणास करावयास पाहिजे हा प्रश्न आपण भक्तांनी आपणां स्वत:सच विचारावा. आजपर्यंत समाजात अनेक कुटुंबिय व व्यक्ती आपल्या घराण्यातील कुलदैवतांचे कुलधर्म-कुलाचार पिढ्यान्‌पिढ्या करीत आले असून, अशा व्यक्ती निराकरणार्थ कार्यकेंद्रावर आल्यावर असा प्रश्न विचारत्या होतात की, ज्या आमच्या घराण्याच्या कुलदेवदेवता आहेत त्यांच्याप्रित्यर्थ आम्ही व आमच्या घराण्यांतील पूर्वापार पिढ्यातील लोकांनी ह्या देवतांची सेवा मनोभावनेने केली असताना आमच्या वाट्याला अडिअडचणी कां याव्यात? पण याचे उत्तर शास्त्रीयपरत्त्वे न समजल्याने व अपेक्षित फलप्राप्ती न



होण्याने, ह्या देवदेवता जरी कुटुंबाला पिढ्यान्‌पिढ्या कुलदेवता आहेत तरी त्यांची आराधना योग्य मार्गाने व योग्यप्रकाराने करण्याकडे बहुजन समाजाचे दुर्लक्ष होत गेले आहे. साधारणपणे ज्या घराण्याच्या कुलदेवता म्हणून आहेत त्यांची आराधना, पूजाअर्चा करण्याचें कर्तव्य कुटुंबातील एक प्रमुख व्यक्ती करीत असते. ह्या ज्या देवदेवता पूजनांत असतात, ही त्या देवतांची प्रतिकें जरी आपणास सगुण अवस्थेंत दिसत असली तरी, जेव्हां त्यांची कृपा आपल्यावर होते, ती कृपा निराकार अवस्थेत होत असल्यानें, आपल्याला त्या प्राप्त झालेल्या कृपाशिर्वादाची जाणीव होत नाही. याला कारण आपल्याकडे 'लय' तत्त्व हे कमी असल्याने, जो आशिर्वाद निराकार म्हणून आहे त्याचे अस्तित्त्व समजत नाही. पूजनादि विधी करणाऱ्या व्यक्तीला आपल्यापाशी जे लय तत्त्व कमी आहे ती उणीव देवदेवतांच्या कृपाशिर्वादाने भरून काढायची आहे ही जाणीव होत नसल्याने, जरी ह्या देवदेवतांनी कुटुंबकल्याणार्थ कृपाशिर्वाद दिला तरी पूजनादि विधी करणाऱ्या व्यक्तीचे माध्यम कृपाशिर्वाद धारण करण्यास जोपर्यंत योग्य होत नाही तोपर्यंत प्राप्त झालेला कृपाशिर्वाद कुटुंबकल्याणार्थ व कुटुंबातील व्यक्तींना प्राप्त होण्यास अडथळा निर्माण होत असतो.

अशावेळी आपण भक्तांची विचारणा अशी होण्याची शक्यता आहे की, आमच्यापाशी कुटुंबकल्याणार्थ लय तत्त्व कमी आहे हे आम्ही समजावे कसे? तर हे अनुमान काढण्याची सोपी पद्धत अशी की, तुमच्या इष्ट कुलदेवता यांच्याप्रित्यर्थ तुम्ही एखादे स्तोत्र वाचण्यास किंवा जप म्हणण्यास देवासमोर जर बसलात व ते करण्यास जर अर्धा तास लागत असेल, तर अशा

ह्या अर्ध्या तासाच्या सेवेत जरी काया व वाचा सामावली असली तरी अशावेळी जर मनाची एकाग्रता तो जप म्हणण्यात किंवा स्तोत्र वाचण्यात होत नसेल तर निश्चित आपल्या देहिक माध्यमात लय तत्त्वाची कमतरता आहे असे समजावे.

अशा व्यक्ती मार्गदर्शनार्थ आल्यावर केंद्रावरील नियुक्त सेवक, त्यांना कुलदेवतांप्रित्यर्थ पूजनार्थ श्रीफल देऊन, पाच किंवा अकरा आठवडे पूजनाचे निराकरण करतात. अशावेळी प्रश्नार्थ आलेल्या व्यक्ती सेवकांना असे सूचित करतात की, आमच्या कुलदेवतांप्रित्यर्थ आमच्या घराण्यात यथायोग्य तऱ्हेने कुलधर्म, कुलाचार होत असताना पुन:श्च त्या देवदेवतांचे प्रतिक म्हणून श्रीफलाचे पूजन करण्याचा उद्देश काय? जर याचा उद्देश असा की, जरी तुम्ही आपल्या इष्टदेवतांप्रित्यर्थ कुलधर्म, कुलाचार करून कृपाशिर्वाद प्राप्त करते झालात तरी, इष्टदेवतांनी दिलेला कृपाशिर्वाद ही अवस्था निराकार असल्याने, आपली देहिक माध्यमे तो धारण करण्यास समर्थ नाहीत. आपण भक्तांनी जी कुलदेवतांची आराधना व कुलधर्म, कुलाचार केला आहे, त्या शक्तिवलयाचे अस्तित्त्व आपण रहात असलेल्या वास्तूतच असते. अशावेळी दिलेल्या कृपाशिर्वादाच्या श्रीफलामुळे तुम्ही आजपर्यंत केलेल्या सेवेची फलप्राप्ती होण्यासाठी हे श्रीफल 'मध्यस्थ' म्हणून कार्य करते. ही एक महत्त्वाची ओळख आपणास व्हावयास पाहिजे व या दिलेल्या श्रीफलाचे महत्त्व आपल्या इष्टदेवतांइतकेच मानून मार्गदर्शनाप्रमाणे त्याची पूजा-अर्चा करावयास पाहिजे. तरच आपण जी सेवा आपल्या इष्ट कुलदेवतांप्रित्यर्थ केली आहे तिचा अपव्यय झालेला नसून, तो कृपाशिर्वाद साकार करण्याचे



महत्कार्य ह्या श्रीफलमाध्यमद्वारा होत असते हे आपल्या अनुभवास येईल.

देवदेवतांनी कृपाशिर्वाद देऊनही जी मंडळी आज दु:खी आहेत याला दुसरे महत्त्वाचे कारण असे की, काही व्यक्तींना कीर्तने, पुराणे किंवा काही धार्मिक ग्रंथांचे वाचन करून असे वाटू लागते की, देवदेवतांची सेवा, आराधना करून आपण केलेल्या सेवेतून मोक्ष-मुक्ति प्राप्त व्हावी. हा त्यांचा जो सद्हेतु प्राप्त झालेल्या जन्माबद्दल असतो, हा हेतु इतरांना कळत नसल्याने ही व्यक्ती वर्षानुवर्षे सेवा करीत असूनही या सेवेचे फल कुटुंबात प्राप्त होत नाही. मुक्ति व मोक्षप्राप्तीसाठी जर ह्या व्यक्तीने सेवेचा अंगिकार केला असेल, तर ही सेवा त्या व्यक्तीच्या अज्ञानाने तीने व्यक्तिगत स्वार्थासाठी केली आहे हे सिद्ध होते व वर्षानुवर्षे असा सेवेचा अंगिकार करूनही कुटुंबातील अडिअडचणी निवारण करण्यास ह्या सेवेचा लाभ होत नाही. वास्तविक, शास्त्रशुद्ध पद्धतीप्रमाणे मोक्ष किंवा मुक्ति ही वर्षानुवर्षे देवदेवतांची सेवा, आराधना करण्याने प्राप्त होत नाही. तर अशा व्यक्तींनी आपल्याला प्राप्त झालेल्या जन्मातील इष्टकर्तव्याची पूर्तता केली की प्राप्त झालेला जन्म व पुढे येणारे जन्म हे जे कर्मपरत्त्वे असतात, अशा कर्माचा क्षय कर्तव्यपूर्तता केल्यामुळे जो होतो, त्यामुळे आपोआपच म्हणजे निसर्गत:च मुक्ति किंवा मोक्ष प्राप्त होणे हा सहजधर्म आहे. तेव्हा करीत असलेल्या सेवेबद्दल जर आपण नि:स्वार्थ रहाल, तर ह्या सेवेचा लाभ कुटुंबातील इतर व्यक्तींना होण्यास कोणताही अडथळा निर्माण होणार नाही.

ह्याच विषयाच्या हितसंबंधात तिसरे महत्त्वाचे कारण असे की, ज्या इष्टदेवतांची पूजनार्थ, सगुण साकार अवस्थेत प्राणप्रतिष्ठा केली जाते व जो कृपाशिर्वाद त्या देवदेवता देतात, ती अवस्था निराकार असल्याने, जी व्यक्ती पूजन-अर्चनादि विधी करीत असते, अशा व्यक्तीच्या देहिक माध्यमाच्या परिसरात हे कृपाशिर्वादाचे वलय हितसंबंधित असते. जेव्हा ही व्यक्ती दिवंगत होते तेव्हा हे कृपाशिर्वादाचे वलय जे निराकार अवस्थेत आहे ते निसर्गाधीन होते. त्यामुळे पिढ्यान्‌पिढ्यांचा हा सेवेचा वारसा जरी आपण निराकरणार्थ आल्यावर सांगत असलात, तरी जी अवस्था निराकार झाली आहे, तिला पुनःश्च कुटुंबकल्याणार्थ साकार करण्याचे कार्य हे गुरुमाध्यमाशिवाय कोणालाही करता येत नही. देवदेवता ह्या जरी कृपाशिर्वाद देतात, तरी आपण अज्ञानाने किंवा स्वार्थाने जेव्हां तो गमावून बसतो, त्यास पुनःश्च साकार करण्याचे कार्य ह्या देवदेवता करीत नाहीत; तर हे कार्य गुरुसामर्थ्यानें होत असते. अशा ह्या शास्त्रीय सिद्धांताप्रमाणे आपण भक्त जेव्हां मार्गदर्शनार्थ आलात त्यावेळी प्रथमतः जी ‘उपासना दीक्षा’ दिली गेली, तिचा उद्देश हाच होता की, आपल्या घराण्यातील दिवंगत व्यक्तींनी आजपर्यंत आपल्या घराण्याच्या इष्टदेवतांची जी मनोभावे आराधना केली व जो कृपाशिर्वाद प्राप्त होऊनही तो साकार करता आला नाही, तो पिढ्यानपिढ्यांचा ठेवा आपण भक्तांच्या रक्षणार्थ व कल्याणार्थ यावा म्हणून या दीक्षापरत्त्वे, श्रीगुरु ही केली गेलेली सेवा आपल्या देहिक माध्यमाशी जोडून देतात. आज समाजात खरे व खोटे असे दोन्ही मार्गांचे गुरु अस्तित्त्वात आहेत. पण वर लिहिल्याप्रमाणे कार्य करणारे गुरुमाध्यम हे आपल्यासारखेच



मानवी देहिक माध्यमातून लोककल्याणाचे कार्य करीत असल्याने, त्यांचे कार्य व त्यांचा अधिकार न समजल्याने, ह्या त्यांच्या लोककल्याण कार्यास आपण बुवाबाजी म्हणून समजून, त्यांच्यापासून चार पावले दूर राहण्याचा जो प्रयत्न करतो, हेच अज्ञानाचे विष आपल्याला जन्मोजन्मी भोगावे लागते.

कुटुंबातील इष्ट सुख व शांति व त्या सुखाची प्राप्ती ही घराण्याच्या परंपरेतील कुलदेवदेवता यांचा कुलधर्म-कुलाचार-कुलोपासना यावर अवलंबून आहे म्हटल्यावर साहजिकच आपल्याला तो यथायोग्य तऱ्हेनें करण्याचा मार्ग शास्त्रीयदृष्ट्या माहीत व्हावा, यासाठी पुढील निवेदन आपल्या मार्गदर्शनार्थ गुरुकृपाशिर्वादाने देत आहे.

प्रथमतः तुमच्या घराण्याच्या कुलदेवदेवता कोण आहेत हे जाणत्या साधकाकरवी माहिती करून घ्यावयास हवे. कारण वेगवेगळ्या कुटुंबपरंपरेप्रमाणे ऋषीजनांनी वेगवेगळ्या देवदेवता ह्या कुलधर्म, कुलाचार व कुलोपासनेसाठी निश्चित केल्या आहेत. ज्या घराण्याची कुलस्वामिनी श्रीमहालक्ष्मी आहे, त्या घराण्याचा कुलस्वामी श्रीज्योतिबा किंवा केदारनाथ आहे. श्रीमहालक्ष्मीचे पीठ कोल्हापूर येथें असून, श्रीज्योतिबाचे निवासस्थान हेही कोल्हापूरजवळ आहे. त्याचप्रमाणे ज्या घराण्याची कुलदेवता श्रीमहासरस्वति आहे, तीचे पीठ तुळजापूर येथे असून, कुलस्वामी श्रीखंडोबा याचे स्थान जेजुरी येथे आहे. पूर्वीच्या काळीं ही स्थाने व पीठे दूरवर असल्यानें, भक्तांना वारंवार त्यांच्या दर्शनार्थ जाणे शक्य नव्हते. म्हणून याच देवतांची उपपीठे इतरत्र स्थापन करण्यांत आली. त्या

उपपीठांपैकी दक्षिण महाराष्ट्रात औंध येथे श्रीयमाईचें पीठ असून, पालीस श्रीखंडोबाचे पीठ आहे. अशाच प्रकारे वेगवेगळ्या ठिकाणी भक्तांच्या सोयीनुसार त्यांना दर्शनाचा लाभ घेता यावा म्हणून ही योजना करण्यात आली. त्याप्रमाणे आपण आपल्या देवदेवतांना भिन्नाभिन्न गांवी त्यांची स्थाने आहेत म्हणून मानीत असलात तरी एकदा कां होईना, त्या मूळ पीठांचे व स्थानांचे दर्शन घेणें अत्यावश्यक आहे. आता श्रीमहाकाली हीनें कालपरत्त्वे अनेक रूपें धारण केली असल्याने, वेगवेगळ्या घराण्यांत व जातीत ती जरी वेगवेगळ्या नावानें संबोधली गेली असली तरी मूळपीठ श्रीमहाकाली हे काहीं बदलले गेले नाही. उदाहरणार्थ लोणावळ्याजवळ असलेले एकवीरेचे स्थान, गांवोगांवी असलेली बोलाई, त्याचप्रमाणे सौंदत्ती येथे असलेली यल्लम्मा, (काही ठिकाणी जिला श्रीरेणुका म्हणून संबोधण्यात येते. ) हेही पीठ कालीस्वरूपच आहे. काही भक्त आपली देवी काळूबाई म्हणून सांगतात, हेही पीठ महाकाली पैकीच आहे. ह्या महाकालीपीठाचा कुलस्वामी श्रीकाळभैरव असून, जरी श्रीखंडोबाची आराधना श्रीकाळभैरवाऐवजी कुलस्वामी म्हणून केली तरी चालते. परंतु ह्या कुलस्वामीचे स्थान मंगसुळी येथे असून ते श्रीखंडोबाचे आद्यपीठ आहे. काहीं घराण्यातील कुटुंबांची कुलस्वामिनी सप्तश्रृंगी की जीचे पीठ नाशिकजवळ वणी येथे आहे;ती महासरस्वति असून, त्या पीठाचा कुलस्वामी जेजुरीचा श्रीखंडोबा हा आहे. त्याचप्रमाणे माहूरगडला जे देवीचें स्थान आहे ते श्रीमहासरस्वतीचे असून, तिचें मूळ पीठ तुळजापूर आहे. त्या पीठाचा कुलस्वामी हाही जेजुरीचा खंडोबा होय.

समाजात ब्राह्मणवर्गात कऱ्हाडे, कोकणस्थ व देशस्थ



असे जे जातीचे पोटविभाग करण्यात आले, त्यानुसार वरील देवदेवता कऱ्हाडे व देशस्थ या घराण्यांच्या झाल्या. कोकणस्थांची कुलस्वामिनी श्रीजोगेश्वरी ही महासरस्वतिस्वरूप आहे. तिचे पीठ आंबेजोगाई असून, त्या कुटुंबियांचा कुलस्वामी श्रीशंकर आहे; ज्याला वाडेश्वर किंवा हरिहरेश्वर या नावांनी संबोधतात. अनेकांच्या सांगण्यात येते की, त्यांची कुलदेवी आर्यादुर्गा किंवा दुर्गादेवी आहे. ही स्वरूपेसुद्धा महासरस्वतीचीच होत.

वर निर्देशन केलेली ही महाराष्ट्रातील देवदेवतांची परंपरा आहे. त्या परंपरेप्रमाणें मध्य भारत, उत्तर भारत या ठिकाणीं या देवतांची स्थानें भिन्नाभिन्न नावांनी संबोधण्यात येत असली तरीसुद्धां ही त्या त्रिगुणात्मक शक्तिस्वरूपाचीच प्रतिके आहेत. उदाहरणार्थ गुजरातमध्ये श्रीसंतोषिमाता ही महालक्ष्मी, श्री बहुचराई ही महाकाली व अबु येथे असणारी, माताजी या नावांने संबोधण्यात येणारी कुलस्वामिनी ही महासरस्वति आहे.

आता, गोमंतक किंवा गोवा म्हणून ज्याची आपल्याला ओळख आहे, त्याठिकाणीं बहुसंख्य सारस्वत घराणीं आहेत. त्या घराण्यांच्यासुद्धां देवदेवता याचप्रमाणे आहेत. श्रीशांतादुर्गा ही ज्या घराण्याची कुलस्वामिनी आहे, त्या घराण्याचा कुलस्वामी श्रीमंगेश होय. त्याच घराण्यामध्ये ‘पालवी’ म्हणण्याचा जो प्रघात आहे, त्याचा अर्थ उपास्य दैवत. ज्या घराण्याची कुलस्वामिनी श्रीकामाक्षी आहे, त्यांचा कुलस्वामी श्रीरामनाथ होय. ज्या घराण्याची कुलस्वामिनी श्रीम्हाळसा नारायणी आहे, त्यांचा कुलस्वामी श्रीरवळनाथ आहे. काहीं सारस्वत घराण्यांनी योग्य

मार्गदर्शनाच्या अभावी उपास्यदेवता म्हणजे पालवी म्हणून कुलस्वामिनीचाच समावेश धराण्यात करून, तिच धराण्याची पालवी आहे असे म्हणण्याचा प्रघात सुरूं केला. परंतु कुलस्वामिनी किंवा कुलस्वामी हे उपास्य दैवत होऊं शकत नाहीं हे आजपर्यंत त्या घराण्यातील भक्तभाविकांना न समजल्यामुळें, पालवी म्हणजे एक अधिक कुलस्वामिनीची आराधना त्यांनी आपल्या घराण्यांत रुढीपरंपरेप्रमाणें अज्ञानानें सुरूं केली. वास्तविक शास्त्राप्रमाणे प्रत्येक घराण्याला एकच कुलस्वामिनी म्हणून त्या देवतांची आराधना करणें त्या कुटुंबियांच्या हिताचें आहे.

गोमंतकात सारस्वत ब्राह्मणा व्यतिरिक्त अन्य जातीतील कुटुंबिय ज्या देवदेवतांची नावे सांतेरी, महामाया इत्यादि सांगतात, ही सर्व रुपें महालक्ष्मीचीच आहेत. हा सर्व बोध लक्षांत घेऊन, आपापल्या घराण्यापरत्त्वे प्रत्येकानें आपापल्या कुलदेवदेवता यांची ओळख झाल्यावर, त्यांचा भक्तिभावनेने कुलधर्म-कुलाचार करण्यासाठीं, त्यांची योग्य प्रतिके म्हणजे टाक किंवा मूर्ति ही त्या स्वरूपाबरोबर आहेत की नाहींत हे पडताळून पाहून, त्यांची स्थापना गुरुजनांकरवी करावी.

गुरुजनांना या देवदेवतांच्या स्थापनाविधीसाठी आमंत्रित केल्यावर, ते शास्त्रशुद्ध स्थापनाविधी करतात किंवा नाहींत हे पण आपल्याला अगत्यानें समजले पाहिजे. ज्या प्रतिमा किंवा प्रतिकें कुलस्वामिनीची म्हणून आहेत त्यांना पंचामृत अभिषेक करीत असतांना, गुरुजनांना 'श्री सूक्ताचा' अभिषेक करण्यास सांगावा. अभिषेक होत असतांना, त्या सूक्ताचा उच्चार सोळा



वेळां होणे आवश्यक आहे. अशी स्थापना झाल्यावर शुद्ध वस्त्र नेसून गोड नैवेद्य करावा. नैवेद्य समर्पणानंतर देवीची मनोभावनेनें ओटीं भरावी. ही ओटी प्रथमत: एका ताटांत किंवा ताम्हनात एक श्रीफल, एक खण, (की ज्याला दोन्ही बाजूनें कांठ आहेत) असा घेऊन त्या खणाची घडी करून, तो खण दुसऱ्या ताटांत ठेवून, त्यावर तीन ओंजळी गहू किंवा तांदूळ हे ठेवावेत. ठेवलेल्या खण व गव्हावर हळद, कुंकू व साखर अशा तीन पुड्या ठेवून, उजव्या बाजूस दोन विड्याची देठासकट पानें, सुपारी व रुपया सव्वा ठेवावा. त्यानंतर श्रीफळास हळदकुंकू वाहून ते व एक फळ हातात ओंजळीत धरून, ती देवदेवतांपुढे धरावी व भक्तिभावनेने अशी प्रार्थना करावी की, 'मी माझ्या यथाशक्ति व यथाज्ञानानें तुझी जी सेवा केलेली आहे ती स्वीकारून, मला निरंतर असा कृपाशिर्वाद देऊन, मला जन्मोजन्मीं तुझी सेवा करण्याचे भाग्य दे. ' अशी काढलेली ओटी सायंकाळपूर्वी देवापुढे ठेवावी. त्यानंतर ज्या सुवासिनीनें ही ओटी काढली आहे, तीने ही ओटी देवीच्या देवळांत पोचवून मगच अन्नग्रहण करावे. ओटी भरत असतांना सुवासिनीने शक्यतो कांठपदराचे पातळ परिधान करावे. सायंकाळी सूर्यास्तापूर्वी ही ओटी आपण रहात असलेल्या गावातील स्थानिक देवतेच्या देवळांत नेऊन द्यावी. अशावेळीं ती स्थानिक देवी श्रीमहालक्ष्मी, श्रीमहासरस्वति की श्रीमहाकाली आहे याचा विचार करूं नये. कारण आज समाजांत कोणीही सुवासिनी दिल्या गेलेल्या खणाची चोळी शिवत नाहींत. त्यामुळे त्यांच्याकरवी पुन:श्च त्या खणाची देवाणघेवाण चालू होते.

आतां ज्या कुलस्वामीची स्थापना आपल्याला करावयाची

आहे, त्याचेही प्रतिक किंवा प्रतिमा त्या देवाप्रमाणे आहे किंवा नाही हे समजून घेऊन, ह्या प्रतिमेची किंवा प्रतिकाची स्थापना गुरुजनांकरवी पंचामृत अभिषेकपूजेने करवून घ्यावी. या कुलस्वामीच्या स्थापनेसाठी पुरुषसूक्त किंवा रुद्र या सूक्तांचा उच्चार करण्यांत यावा. ही दोन्ही सूक्ते शक्यतो गुरुजनांकरवी अकरा वेळां म्हणवून घ्यावीत. ते शक्य नसल्यास कुलस्वामिनीचे श्रीसूक्त व कुलस्वामीचे पुरुषसूक्त किंवा रुद्रसुक्त यांचा सकृत पाठ, म्हणजे एक आवर्तन करून घेतले तरी चालेल. अशी ही स्थापना विधीपूर्वक झाल्यावर, वरीलप्रमाणेच देवाला नैवेद्य समर्पण करून ब्राह्मण सुवासिनी जेवावयास वाढावी. पण आज इतका शास्त्रशुद्ध विधी जरी आपण केला तरी त्याचे योग्य ते फल मिळण्यास जो अडथळा आहे तो देवांच्याकडे नाही. आपण ज्या सुवासिनीला देवीच्या ठिकाणी मानून, सुवासिनी म्हणून बोलावतो, त्या सुशिक्षित व कुलीन स्त्रिया मासिक पाळीची बंधने पाळीत नसतात. त्याकाळांत, त्या घरांत स्वयंपाक आदि करून विटाळातील अन्न ग्रहण करीत असतात. हे न पाळणें ही जरी आजच्या समाजाची फॅशन झाली आहे तरी आजच्या बदलत्या आधुनिक काळांत फॅशनेबल होऊन ज्या स्त्रिया विटाळातील अन्नग्रहण करतात, त्यांना आपल्या ठिकाणी सुवासिनी म्हणून सामावण्यास देवदेवता अजून तयार नाहीत. त्यामुळे जरी आपण सुवासिनी जेवावयास घातली असें मानतो, तरी ज्या भक्तिभावनेने हा विधी आपण करतो त्याचे फल आपणांस मिळत नाही.

कुलस्वामीची स्थापना झाल्यावर त्याचे स्मरण म्हणून आपण ब्राह्मण जेवावयास बोलावतो. पण ‘ब्राह्मण’ या शब्दाचा



अर्थ जातिवाचक नसून, ज्या मनुष्याच्या ठिकाणी ह्या जन्मांत तीन देह, म्हणजे स्थूल, सूक्ष्म व कारण हे एकरूप झालेले आहेत व ज्यांचे एकरूपत्त्व उपनयनाचे वेळी गुरुजनांनी गायत्री मंत्राची दीक्षा देऊन, यज्ञोपवीत धारण करावयास लावून केलेले आहे, असा आहे. पण ज्या यज्ञोपवितामुळे हा देह, तिन्ही अवस्थांना एकरूप करून, पुढे विद्या, संपत्ती, संतती आदि सुखांचा लाभ घेण्यासाठी बलवान करण्याचा हेतु जो वेदशास्त्राचा आहे, तो हेतु यज्ञोपविताबरोबरच आपण अंगाबाहेर टाकलेला असतो. अशा व्यक्तींना विद्या, संपत्ती व संतती ही कष्टाने तर प्राप्त करावी लागतेच, पण विवाहोत्तर जीवनानंतर जेव्हा इच्छित संततीची अपेक्षा या व्यक्तींची असते, ती पूर्णत्त्वास जात नाही. कारण संततीच्या उत्पत्तिकाळापर्यंत उपनयनापासून यज्ञोपवीत धारण करून, जे वीर्य म्हणजे पुरुषबीज हे शक्तिमान करावयाचे असते, ते न झाल्याने अशक्त व असमर्थ असें बीज प्रजोत्पत्ति म्हणून जन्मास येते. पुढे अशी समस्या उभी राहते की, ‘माझ्या मुलाचे विद्याभ्यासात लक्ष नाही, ’ किंवा ‘त्याची धारणाशक्ति अपेक्षेप्रमाणे नाही. ’जी चूक आपण करून, आपल्याच अज्ञानानें, आपल्या धर्माने आपल्या हितार्थ केलेली शास्त्रशुद्ध तरतूद आपण निरर्थक आहे असे ठरविले, त्याचे फल पुढे अशा प्रकारे अनुभवास येते. ज्या व्यक्तींना हा उपनयन विधी केल्यानंतर यज्ञोपवित धारण करण्यास कमीपणा वाटतो, त्यांना ब्राह्मण म्हणून जेवावयाचा अधिकार नाही. त्याचप्रमाणें त्यांनी जरी देवदेवतांची भक्ती आपल्या यथाशक्ति व यथाज्ञानाने केली, तरी त्याचे फल पूर्णतः न मिळता ते अंशतःच मिळते. याशिवाय यज्ञोपवित धारण करण्याचे दुसरे महत्त्वाचें कारण असे आहे की,

जेव्हा आपण विवाहित होता त्यावेळी ज्या वधूचा कन्यादान म्हणून स्वीकार करता, ते दान कन्यादान नसून आपल्यासमोर जी वधू आहे तिचे 'जन्मकर्म' आपण स्विकारता. असा हा शास्त्रीय सिद्धांत आहे. आपण जन्माला येतेवेळी स्वत:चें जन्मकर्म हे आणलेलेच आहे. त्या जन्मकर्मपरत्त्वे जी इष्टकर्तव्ये आपल्याला आपल्या कुटुंबाप्रित्यर्थ करावयाची आहेत, त्यामध्यें या कन्यादानाचा स्वीकार होण्यानें आपली जबाबदारी दुप्पट होते. ही दुप्पट जबाबदारी पेलण्यासाठी सामर्थ्यही दुप्पट असावयास पाहिजे. यासाठी जीवनारंभाची प्रथम दीक्षा, म्हणजे 'गायत्री मंत्र, ' हा नित्यानें म्हणून देहिक सामर्थ्य चिरकाल टिकविण्यासाठी यज्ञोपवित हे दर पौर्णिमा व अमावस्या या दिवशी बदलावे. याशिवाय जर कुटुंबात सोयरसुतक आले, परान्न घेतले, अगर श्राद्धपक्षादि विधीत अन्नग्रहण केले, तर दुसरे दिवशी स्नानापूर्वी तुळशीपत्र सेवन करून स्नान करावे. स्नानानंतर यथाशक्ति दान पाण्यात बुडवून देवाजवळ ठेवावे व मग यज्ञोपवित बदलावे. ज्यांना यज्ञोपवित धारण करण्याचा अधिकार आहे, त्यांनी वैवाहिक जीवनापर्यंत तीन, विवाहानंतर पत्नीचे एक अशी चार व गुरुदीक्षा घेतल्यानंतर पांच यज्ञोपविते धारण करावीत. वरील गायत्रीमंत्र व यज्ञोपविताबद्दलची शास्त्रशुद्ध मीमांसा समजल्यावर ज्यांना उपनयन करून घेण्याचा अधिकार आहे त्या व्यक्तींनी आपल्या मुलांची उपनयनें योग्य वेळीच म्हणजे वय वर्षे आठ यावेळी करावीत. कारण या वयापासून मुलांच्या इंद्रिय अवयवांची वाढ होण्यास आरंभ होतो. ती वाढ तीन देहिक अवस्थांना पोषक व्हावयास पाहिजे. पण आपल्या सर्वांची अशी भ्रामक विचारसरणी असते की, मुलांची



मुंज ही थाटामाटात झाली पाहिजे. पै-पाहुणे आले पाहिजे. त्याना यथोचित आहेर द्यावयास पाहिजे पण यासाठी लागणारे पैसे यांची शिल्लक दुर्दैवाने जर होऊं शकली नाहीं तर तो बटू-अवस्थेतील मुलगा प्रौढ अवस्थेपर्यंत, म्हणजे वय वर्षे अठरापर्यंत येऊन पोंचतो. ही त्या अपत्याची अठरा वर्षापर्यंतची अविकसित झालेली स्थिती पुढे विद्याविद्यार्जनानंतर जेव्हां हे अपत्य ह्या जगांत आपले कर्तव्य म्हणून नोकरी-धंदा-व्यवसाय करण्यासाठी प्रयत्न करते, एवढेच नव्हे तर अपेक्षेपलिकडे महत्त्वाकांक्षेची भेट व्हावी अशी इच्छा प्रदर्शित करते, त्यावेळीं वय अठरा वर्षेपर्यंत जो जन्माचा विकास न होता अविकसित राहिला तेवढे जीवन ह्या प्रयत्नांत कमी पडते.

सूज्ञ भक्तांनो, ह्या कर्तव्याची जबाबदारी परमेश्वराची नसून तुमचीच आहे. तुमच्या जीवनाचा योग्य विकास व्हावा याची परमेश्वराने सर्वतोपरी तरतूद करुनसुध्दा तुम्ही अज्ञानाने जर हे जन्माचे परमपवित्र असे फल अनुभविता तर, 'मी दु:खी आहे. पण देव अजून माझ्या हाकेला 'ओ' देत नाही; 'असे म्हणून चालेल काय?

समाजात ज्या व्यक्तींना यज्ञोपवित धारण करण्याचा अधिकार नाही, अशांच्या देहिक अवस्थेचा विकास होण्यासाठी शास्त्राने काहीं तरतूद केली नाही काय? तर तीसुध्दा तरतूद शास्त्रशुध्द अशीच केलेली आहे. ती अशी की, त्या व्यक्तींनी दर शनिवारी सकाळी स्नानापूर्वी तुळशीपत्र ग्रहण करुन स्नान करावे. स्नानानंतर पंधरा किंवा तीस पैसे पाण्यात बुडवून, देवापुढे ठेवून, दुपारी बारापूर्वी ते पैसे मारुतीचे मंदिरात नेऊन

ठेवावेत. ही उपासना वय वर्षे आठपासून अठरापर्यंत करावी, म्हणजे उपनयन व विवाह हे दोन्ही संस्कार त्यामध्ये समावले जाऊन, त्या भक्तांच्या जीवनाचा पूर्णतः विकास होतो. विवाहानंतर त्यांनी दर पौर्णिमेस अशाच प्रकारे सकाळी स्नानापूर्वी तुळशीपत्र ग्रहण करुन, तीस पैसे दान म्हणून स्नानानंतर काढावेत व ते दुपारी बारापूर्वी श्रीमारुतीच्या मंदिरात नेऊन ठेवावेत. याशिवाय अमावास्येस एक बिल्वपत्र देवापुढे ठेऊन, तीस पैसे दान त्या बिल्वपत्रावर ठेवावे व नंतर ते दान व बिल्वपत्र श्रीशंकराचे मंदिरात नेऊन ठेवावे.

आजपर्यंत परमेश्वराने आम्हा मानवांच्या कल्याणार्थ किती सखोल विचार करुन, शास्त्रशुध्द पध्दतीने जीवन साकार करण्याचा महत्‌कार्यभाग अंगिकारला आहे. तो अनंतरुपी परमेश्वर आपणा सर्वास आपली लेकरे म्हणून वागवीत असून, त्याने कोणाही व्यक्तीचा धर्म म्हणून किंवा जातपात म्हणून अव्हेर केलेला नाही. सर्वांना आपली लेकरे समजून त्यांच्या अन्न, वस्त्र, निवाऱ्याची तरतूद तो दयावंत अहर्निश करीत आहे. असे असतांना आज आपण वैज्ञानिक युगात सुशिक्षित आहोत, विचारसंपन्न आहोत म्हणून सांगतो; पण जर आपल्या आचारविचारांकडे बारकाईने पाहिले तर असमाधान, जातिपातिपरत्वे मतभेद, निंदा-नालस्ती, एकमेकांनी एकमेकांना कमीपणा देऊन, ‘मी उच्च, तो नीच’ आदीचे प्रखर असे विष निर्माण करुन ठेवलेले आहे. एका रानटी अवस्थेपासून आपण या सुविद्य अवस्थेपर्यंत आलात तरी मूळ अवस्थेतील गुणधर्म आपल्या ठिकाणी जो टिकून आहे, त्यामुळे जगतात शांतता निर्माण व्हावी म्हणून जे जे प्रयत्न राष्ट्रवादी पुरुष करीत आहेत,



ती शांतता केवळ बोलण्याने होईल काय? प्रत्येक व्यक्ती ही प्रत्येक राष्ट्राचा घटक असून, जोपर्यंत हा घटक अविकसित व अज्ञानी अशा अवस्थेत वावरतो आहे तोपर्यंत ह्या अविकसित व अज्ञानी अशा जीवनाचा कार्यकारणभाव हा अशांतता निर्माण करण्यास कारणीभूत होणारच. यासाठी प्रत्येकाने आपला धर्म कोणता आहे, आपली जात कोणती आहे, आपली पोटजात कोणती आहे; हे विचार की जे आज समाजाला पोषक नाहीत, ते बाजूला ठेवून सूज्ञपणे एकाच विषयाशी दृढ व्हावे की, ‘आम्हा सर्वांना परमेश्वराने मानव म्हणून जन्माला घातले आहे, तेव्हा आमच्या आचार-विचारांत, बोलण्या चालण्यांत, हे द्वैतभाव न येतां आम्ही एक ‘मानवता धर्म’ म्हणून स्वीकारावयास हवा. ’ ही भूमिका जर कुटुंबापासून राष्ट्रापर्यंत सर्वांच्या ठिकाणी सदैव वास करील तर जागतिक शांततेसाठी कोणत्याही राष्ट्राला शांतता परिषद बोलवावी लागणार नाही. तसेच त्या शांतता परिषदेसाठी होणारा अवाढव्य खर्च हा समाजाच्या व राष्ट्राच्या हितार्थ खर्च होईल.

वाचकहो, वरील निवेदनात मुलांची इष्टविकासाची सांगता शास्त्राने निवेदन केली; पण ज्या कुटुंबात मुली आहेत त्यांचीसुध्दा जीवने आयुष्यभर विकसित रहावीत म्हणून जी तरतूद केली आहे ती अशी की, मुलीचे वय बारा वर्षे झाल्यावर तिला ‘हरितालिका’ हे व्रत तिच्या आईने देऊन, तिला उपवास करावयास सांगावा. जे हरितालिकेचे पूजन म्हणून ह्या कुमारिकेने करावयाचे आहे, त्या पूजनार्थ हरितालिकेचे प्रतिक बाजारात मातीचे मिळते. त्या प्रतिकाची रचना अशी आहे की दोन कुमारिका समोरा समोर बसलेल्या असून श्रीशंकराचे लिंग

मध्ये आहे. पण हे प्रतिक व त्याची ओळख आपणास झाली काय? आपण हे प्रतिक पूजनार्थ आपल्यासमोर जेव्हां ठेवतो, तेव्हां आपल्या उजव्या हाताचे जे प्रतिक आहे ते पार्वतीचे बालरुप म्हणजे कुमारिका व डाव्या बाजुची कुमारिका म्हणजे पूजा करणाऱ्या कुमारिकेचे प्रतिक आहे. शास्त्राचा हेतू हा आहे की, कुमारिकेनें पार्वतीसमवेत बसून पुढच्या भावी जीवनाचा भविष्यकाळ साकार करावा. ह्या पूजाविधीत कुमारिकेने ही इच्छा करावयाची आहे की, "विवाहजीवनानंतर मला परगृही जावयाचे असून, त्या ठिकाणी माझ्या जाण्याने कशाचीही उणीव भासू नये. मला त्या घरांत सुखासमाधानाने 'अन्नपूर्णा' म्हणून स्थान दे. माझ्या जाण्याने त्या घरांत अन्नवस्त्राला कमतरता न येता, त्या कुटुंबाची भरभराट होऊं दे. त्याचप्रमाणे माझा स्त्रीजन्म हा उत्तम अशी व घराण्यास, कुटुंबास पोषक अशी संतती निर्माण करण्यासाठी कारणीभूत होऊ दें. या जन्मांत विवाहबंधनाने माझे नाते ज्या पुरुषाशी पति म्हणून मी स्वीकारणार आहे, त्या पतीच्या सुखदु:खांत सहभागी होण्याचे सामर्थ्य मला दे. एवढेच नाहीं तर मला अखंड सौभाग्य प्राप्त होऊं दे." हे व्रत कुमारिकेने वय वर्षे बारापासून एकोणीसपर्यंत करावयाचे असून, यानंतरचा त्या कुमारिकेचा काळ हा विवाहोत्तर जीवनाचा असल्यानें, पुढें तीनें 'मंगलागौरीचें' व्रत विवाहानंतर स्वीकारावयाचें आहे. हे व्रत म्हणजे पार्वतीच्या जीवनातील प्रौढ अवस्था आहे. तेव्हां हे व्रत पांच वर्षे अव्याहत करावे. पांच वर्षानंतर ज्या सुवासिनी या व्रताचे उद्यापन करतात, त्यामध्यें महत्त्वाची जबाबदारी अशी की, हे उद्यापन केवळ पांच वर्षें पूजन केलेल्या मंगळागौरीचे नसून, कुमारिका अवस्थेत जे



हरितालिका पूजनव्रत स्वीकारले ती सात वर्षे व पुढील पांच वर्षे असे हे बारा वर्षांचे व्रत याचे उद्यापन व्हावयास पाहिजे, तरच त्या सुवासिनींना वर सांगितल्याप्रमाणें हे व्रत यशदायक होईल.

प्रचलित समाजात कुमारिकेने आपल्या भवितव्यासाठीं करावयाची ही उपासना ब्राह्मण वर्गातच करण्यांत येते. पण ब्राह्मणा व्यतिरिक्त इतर ज्ञातीतील ज्या कुमारिका आहेत त्यांनाही या व्रताप्रमाणेच आपले जीवन विकसित करता यावे म्हणून जी सेवा सांगितली आहे तोही कार्यकारणभाव आपल्या शास्त्रांचे उच्च हेतु काय आहेत याचे प्रतिक आहे. अन्य ज्ञातीतील कुमारिकेने वय वर्षे बारापासून एकोणीसपर्यंत दरवर्षी श्रावण महिन्यांत चार मंगळवारचे उपोषण करावे. अनेक कुटुंबिय उपोषणाचा अर्थ असा लावतात की, सकाळी जेवून रात्री काहीं खाल्ले नाहीं की उपवास होतो. पण उपवास याचा अर्थ असा नव्हे. तर तो सुर्योदयापासून सुर्यास्तापर्यंत करावा लागतो. त्यांनंतर अन्नग्रहण करावे. विवाहोत्तर जीवनानंतर दरवर्षी आश्विन किंवा पौष महिन्यांतील चार किंवा पांच मंगळवारी सुवासिनीने उपवास करावा. शेवटच्या मंगळवारी डोकीवरून स्नान करून देवीची ओटी भरावी. हे आश्विन किंवा पौषात करावे. असे व्रत ज्या कुटुंबातील जबाबदार व्यक्ती आपल्या मुलींना सूचित करतील त्या मुलींच्या विवाहात येणारे अडथळे विचारण्यासाठीं ज्योतिष, मंत्र-तंत्र, नवस-सायास इत्यादि काहीही गैरप्रकार न करावे लागता, योग्य अशा वेळीच ह्या मुली विवाहित होऊन त्यांचे वैवाहिक जीवन समृद्ध होईल.

या शास्त्रशुद्ध निराकरण पद्धति वाचनांत आल्यावर,

शास्त्रशुद्ध कुलाचार-कुलधर्म करणें, ही खूपच मोठी समस्या निर्माण झाली असे भक्तभाविकांना वाटणें स्वाभाविक आहे. आजच्या बदलत्या कालानुसार प्रत्येक कुटुंबातील व्यक्तींना सोय गैरसोय यामध्ये आपले जीवन व्यतीत करावे लागत आहे. अशावेळी जर योग्य ब्राह्मण-सुवासिनी कुलधर्म-कुलाचारासाठी मिळाले नाहींत तर आपल्या सेवेचे फळ नाहीं म्हणून निराश होण्याचे कारण नाहीं. कारण या कार्यपद्धतीस केवळ नाथपरंपरेचा व दत्तपरंपरेचा कृपाशिर्वाद लाभला आहे असे आपण मानूं नये. ज्या आपल्या घराण्यांच्या कुलदेवदेवता आहेत त्याही कृपावंत होऊन या कार्यात सहभागी आहेत. जेव्हा आपल्याला सुलभ असे निराकरण सूचित केले जाते, तेव्हा त्याचा स्वीकार या कुलदेवदेवता आनंदाने करतात. यासाठी कुलधर्म, कुलाचार व कुलोपासना याप्रित्यर्थ ब्राह्मण-सुवासिनी प्रसाद ग्रहणास बोलावण्यात यावे, असे जे वर सांगितले; त्याऐवजी देवदेवतांना नैवेद्य समर्पण केल्यावर त्याच नैवेद्यापुढे दोन विडे व त्यावर दक्षिणा सव्वापांच रुपये ठेवावी. असा विधी केला असता सहजगत्या तुम्हाला ब्राह्मण व सुवासिनी यांनी प्रसाद ग्रहण केल्याचे पुण्य प्राप्त होईल. त्यांच्या नावे काढलेली दक्षिणा ही कोणत्याही एखाद्या धार्मिक संस्थेस, वैद्यकीय संस्थेस किंवा शिक्षण संस्थेस नेऊन द्यावी. या संस्थांचे उद्देश जरी समाजकल्याणाचे असले तरी त्यांना आपली कार्ये पैशाअभावी यथायोग्य करता येत नाहींत. अशा संस्था आपल्या गांवात आपल्याजवळ कार्य करीत असतात. पण दानधर्म, परोपकाराची कर्तव्ये आपण विसरलो असल्यानें, या संस्थांकडे दुर्लक्ष करून कार्याची अवहेलना करीत असतो. वास्तविक त्या संस्थांकडे



इतके आस्थेने पाहिले पाहिजे की, ज्या गोष्टी समाजात परोपकार म्हणून मला करता येत नाहींत, ती जबाबदारी या संस्थांनी स्वीकारली आहे. मी या समाजात एक सामाजिक घटक म्हणून जन्माला आलो आहे. तेव्हा मला वरील रक्कम देण्यास दु:ख वाटता कामा नये. अशाने दोन्ही हेतू साध्य होऊन, तुम्ही व समाजात कार्य करीत असलेल्या व्यक्ती, ज्या या कार्यार्थ अहर्निश आपले जीवन वेचित आहेत, त्यांना आपले कार्य समाजासाठीं यथोचित करण्यास वाव मिळेल.

आपण भक्तभाविक विवाह, या मंगलकार्यास अनेक वेळां उपस्थित राहिले असूं किंवा आपल्या कुटुंबातील मुलामुलींची लग्ने करते झाले असूं. पण ज्या मुलामुलींची लग्ने करण्याचे इष्टकर्तव्य करता, त्यांच्या भावी वैवाहिक जीवनाची पूर्तता करून देता कां? या प्रश्नास आपणाकडून असे उत्तर मिळेल की, 'वरपक्षाने मागितलेला हुंडा, दागदागिने, अहेरादि करून आम्ही मुलीला योग्य अशा सुशिक्षित वराची निवड करून दिलेली आहे. आमच्या अपेक्षेप्रमाणे वर हा सुशिक्षित, घरंदाज व मिळवता आहे!' या सर्व गोष्टी सांगून आपल्या मुलीच्या लग्नाची इतिकर्तव्यता पूर्ण झाली या समाधानात आपले काहीं दिवस जातात तोंच मुलगी की, जिला आपण वरील सर्व व्यावहारिक बाजू पाहून विवाहित केलीत, तिच्या दु:खाला किंवा मानसिक अशांततेला आरंभ लागलीच कसा होतो? तर आपण ह्या मंगल विधीचें मांगल्य विचारात न घेता, हा विधी कर्तव्य म्हणून करावयाचा आहे, या जाणीवेने तो समारंभ विधीपूर्वक न करता, त्या नवविवाहित वधूवरांच्या वैवाहिक जीवनाला पोषक असे कृपाशिर्वाद आवश्यक असतात त्याकडे दुर्लक्ष करून, विवाहास

आलेले मोठमोठे प्रतिष्ठित यांचा मानसन्मान करण्यात आपण इतके समाधानी असतो की, या मंगल कार्यात जे प्रधान धार्मिक विधी आहेत त्याकडे आपण दुर्लक्ष करतो.

समजा, तुमच्या मुलीचा विवाह करावयाचा आहे. तिला अनुरुप असा वर व तिच्या वैवाहिक जीवनाला साजेसे समारंभ जरी तुम्ही केले तरी महत्त्वाच्या धार्मिक विधीकडे शास्त्रपरत्वे दुर्लक्ष करणे त्यांच्या हिताचे नाही. मुलगी विवाहसमयी जेव्हा गौरीहार पूजनास बसते, त्यावेळी गौरीहारात श्रीअन्नपूर्णेची प्रतिमा व बाळकृष्ण या दोन देवदेवतांचा समावेश असतो. पण अनेक वेळेला एकच देवी किंवा एकच देव गौरीहाराच्या पूजनात मांडण्याचा प्रघात आहे तो चुकीचा आहे. यासाठी गौरीहारपूजानाचे वेळी श्रीअन्नपूर्णा व बाळकृष्ण अशा दोन्ही देवता पूजनात असणे आवश्यक आहे. गौरीहाराचे वेळी नववधू ज्या अन्नपूर्णेचे पूजन करते ती अन्नपूर्णाही पार्वतीचे सौभाग्यवतीस्वरूप आहे. तेव्हा अन्नपूर्णेच्या गळ्यात पाच काळे मणी व मध्ये एक सोन्याचा मणी असणे हे सौभाग्याचे लक्षण असल्याने, ते परिधान केल्याशिवाय अन्नपूर्णा पूजनास ठेवून 'गौरीहार पूजला' असे म्हणता येत नाही.

या गौरीहार पूजनाच्या वेळी अन्नपूर्णा व बाळकृष्ण यांचे पूजन या नववधूने भक्तिभावाने एवढ्याचसाठी करावयाचे असते की, कुमारिका अवस्थेमध्ये मातापित्यांच्या घरी केलेले सात वर्षाचे हरितालिकेचे व्रत हे कन्यादानानंतर मातापित्यांच्या घरी राह नये; तर कन्यादानानंतर हे व्रत तिच्या भावी संसाराची उभारणी करण्यासाठी तिच्या समवेत तिच्या पतिगृही जावे असा



या पूजनाचा सद्हेतू आहे. विवाहानंतर पाच वर्षे जे मंगलागौरीचे व्रत करावयाचे आहे, अशी एकूण बारा वर्षाची सेवा कुमारिका या अवस्थेपासून ते सौभाग्यवती या अवस्थेपर्यंत आहे; तिला जोडून देण्याचा जो विधी आहे त्याला 'गौरीहारपूजन विधी' असे म्हणतात. गौरीहारपूजनाचे वेळी वधूची मानसिक स्थिती अशी असते की, आईवडिलांच्या प्रेमळ सहवासात व्यतीत केलेले आयुष्य पुढे तिला परगृही व अपरिचित पुरुषास अर्पण करावयाचे असते. अशा वेळी भविष्यकाळात, आपण अनुभविलेले मातापित्यांचे प्रेमळ व लाडके जीवन आपणास मिळेल किंवा नाही या दु:खात ती असताना, आपण या मंगल कार्यास उपस्थित असलेले लोक ह्या मानसिक दु:खात असलेल्या वधूच्या आजुबाजूला माकडचेष्टा करीत उभे राहिलेले असतो. तिच्या भवितव्याच्या इच्छा-आकांक्षा डोळ्यासमोर आणून ती अश्रू ढाळीत असते व आपण या दृष्याची निर्भत्सना करून, तिच्या आजुबाजूला बसून, स्वत:ची करमणूक करून घेतो. अशा वेळी तिची मानसिक अवस्था अशी असते की एका बाजूने सुखाच्या दिशेने जाण्याचा मार्ग तिला दिसत असतो; पण जे सुख जन्मापासून आईवडिलांच्या समवेत जोडलेले असते, तो ऋणानुबंध याचवेळी तिला तोडावयाचा असतो. हा सूज्ञविचार सर्वांनी करून, ती ज्या गौरीहाराची पूजा मनोभावनेने करावयास बसली आहे ती तिला यथाज्ञानाने व यथाशक्तीने करण्यास योग्य ती संधी देणे उपस्थित आप्त व नातेवाईकांचे कर्तव्य नाही काय?

अशा गौरीहारपूजन समयी वधूने आपले मन खंबीर करून, वर निवेदन केलेली प्रार्थना करावी. गौरीहाराच्या वेळी

पूजनार्थ बाळकृष्णाची मूर्ति, हिचा उद्देश घराण्यात पुढे होणाऱ्या सत्यनारायणाच्या पूजनासाठी आहे, असा जो समज आपण करतो तो चुकीचा आहे. बाळकृष्णाची प्रतिमा एका पायावर बसलेली अशी असते. याचा अर्थ असा आहे की, जी वधू विवाहित होते, तिच्या पतीने भावी जीवनात अमंगल अशा ठिकाणी आपले पाऊल टाकू नये. या उद्देशाने बाळकृष्णाला दोन्ही पायांवर न बसविता एका पायावर बसविले आहे.



# पूजनादि विधी व त्यांचे महत्व

आपण भक्तांना आवश्यक असा कुलधर्म व आपल्या इष्ट कुलदेवदेवतेसंबंधी खुलासा आपल्या मार्गदर्शनार्थ यथायोग्य झालाच आहे. आता ह्या देवतांच्या पूजनविधीसंबंधी महत्वाचे मार्गदर्शन पुढे क्रमशः येईल. तत्पूर्वी ह्या देवतांप्रीत्यर्थ उपवास, व्रतवैकल्ये करणे आवश्यक आहे काय? असा प्रश्न येतो. तर यथायोग्य त-हेने पूजनादी विधी व वार्षिक कुलोपासना योग्यप्रकारे केल्यास, उपवास व व्रतवैकल्ये आदी करण्याची आवश्यकता नाही. जो पूजन विधी आपणास करावयाचा आहे, त्याचेही यथोचित ज्ञान आपण करून घेतले पाहिजे. केवळ गंध, फूल, अक्षता, व श्रीफल व तेही देवदेवताना ज्ञानाच्या अभावी समर्पण करणे, म्हणजे ही एक यांत्रिक क्रिया देहाच्या संवयीपरत्वे लागून, पूजाविधी करीत असताना जी मनाची एकाग्रता होणे आवश्यक आहे ती होत नसते. आपण जे पूजा साहित्य देवदेवतांच्या पूजनासाठी घेता ते साहित्यसुध्दा शास्त्राने शास्त्रपूर्वक व अनुभवपूर्वक सूचित केलेले आहे. पूजनारंभ विधीस बसण्यापूर्वी आपले तोंड कोणत्या दिशेस करून आपण पूजन करणार आहोत हे प्रथमतःपहावे. पूजाविधी पूर्वाभिमुख किंवा पश्चिमाभिमुख बसल्याने पूजनाचे सद्‌हेतू अधिक लवकर साध्य होतात. पण अनेकांचे घरी देवदेवतांची स्थापना दक्षिण दिशेस किंवा उत्तर दिशेस जागेच्या अभावी केलेली असते. या दोन दिशाना देवदेवतांचे किंवा आपले तोंड असता कामा नये. पूजन विधी करण्यास जे आसन बसावयास हवे ते दर्भासन असावे किंवा धूतवस्त्राची घडी करून घ्यावी. चटईवर बसू नये.

पूजनादि विधी झाल्यावर हे धूतवस्त्र रोजच्या रोज धुण्यात यावे. कारण पूजनादि विधीच्या वेळी जो आपण प्रार्थना विधी करतो, त्यावेळी आपल्या पंचभौतिक देहिक माध्यमातील जन्म कर्माचे दोष या आसन माध्यमात विसर्जीत होत असल्याने, ते आसन रोजच्या रोज धुणे आवश्यक आहे.

पूजनादि विधी आरंभी आसनावर बसून दोन वेळा आचमन करावे. जो आचमनाचा उच्चार, 'ॐ केशवाय नमः', 'ॐ नारायणाय नमः', 'ॐ माधवाय नमः' असा आहे. त्याचा अर्थ तुम्ही पूजनास बसते वेळी तुमच्या देहिक माध्यमातील तीनही देह, स्थूल, सूक्ष्म व कारण हे या विधीस उपस्थित रहावेत असा शास्त्राचा उद्येश आहे. हे आचमन दोन वेळा एवढ्यासाठी करावयाचे आहे की, स्थूल व सूक्ष्म देह म्हणजे जन्मकर्म व जन्मजन्मांतर यानी या शुभ विधीचे वेळी उपस्थित रहावे. तिसरा देह म्हणजे कारण देह, या ठिकाणी देवादिकांचा ऋणानुबंध वास करीत असल्याने, तो देह पूजनादि विधीच्या वेळी स्वाभाविक उपस्थित असतोच. हें आचमन दोनदा झाल्यावर पांच वेळा ५ स्थांनातून ॐ कार करावा. कारण आपल्या देहिक माध्यमात जे पंचप्राण कोश आहेत म्हणजे, अन्नमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय व आनंदमय यांचाही समावेश या पूजनादि विधीत होण्याने त्यांचा जो विकास अत्यावश्यक आहे तोही या विधीमुळे होतो. हें पंचप्राण कोश देहांत अति सूक्ष्म अवस्थेत वास करीत असून, जोपर्यंत आपण धार्मिक विधी व धार्मिक सत्कृत्ये शास्त्रीय पध्दतीने करीत नाही तोपर्यंत या पांच कोशांपैकी अन्न व प्राण एवढेच कोश कार्य करीत असतात. म्हणजे विकसित असतात. वास्तविक जन्म प्राप्त झाल्यावर देहिक अवस्थेप्रमाणे पुढील



तीनही म्हणजे 'मनोमय', 'विज्ञानमय' व 'आनंदमय' कोशांचाही विकास यथोचित होणे आवश्यक आहे. मनोमय कोश हा विकसित झाल्यामुळे तुम्हाला प्राप्त झालेली ऐहिक सुखे यांचे सुख, समाधन व शांती तुम्हाला या कोश माध्यमातून मिळते व जी पारमर्थिक सेवा आपण गुरुंच्या मार्गदर्शनाने करता, त्या सेवेचा पारमार्थिक लाभ म्हणजे नित्यानंद, चिदानंद, व ब्रह्मानंद हे आनंद गुरुज्ञानेने अंगिकारलेली सेवा व तिचे पालन योग्य प्रकारे केले असता, आनंदमय कोश विकसित होऊन, तुम्हां साधकांना क्रमशः प्राप्त होतात. तिसरा आनंद की जो ब्रह्मस्वरुप आहे, हा या ऐहिक जगाच्या पलीकडे वास करीत असलेल्या परमेश्वराच्या अस्तित्वाची जाणीव असून, तो प्राप्त झाल्यावर योगसाधना, कुंडलिनी जागृती, समाधी अवस्था इत्यादि प्राप्त करावयाच्या आहेत, अशा अवघड, बिकट समस्या तुम्ही निर्माण न करता, परमेश्वराच्या सानिध्यातील सुख, म्हणजे आनंदमय कोशापर्यंत आपली झालेली साधना याचे सुख जे, आपणास प्राप्त झाले आहे. त्या सुखापेक्षा अधिक असे सुख योगसाधना, कुंडलिनी जागृती व समाधि या मार्गाने मिळेल असा अविचार करू नये,

ही साधन पध्दत एवढ्यासाठीच सूचित केली की, या जन्मात आपण आपली प्रापंचिक कर्तव्ये पूर्णत्वास नेण्यासाठी जर जन्म घेतला आहे तर त्या कर्तव्याची पूर्तता करण्याची आपली जबाबदारी परमेश्वर कृपेने साकार व्हावयास पाहिजे. वरील शास्त्रे म्हणजे योगसाधना, कुंडलिनी जागृती व समाधि ही जरी श्रेष्ठ आहेत तरी प्रापंचिक माणसाला ती प्राप्त करण्यास बराच काळ लागून त्याची प्राप्ती जेवढी व्हावयास पाहिजे तेवढी

होत नाही. त्यासाठी सूज्ञ भक्तांनी या मोठ्या नांवानी प्रसिध्द असणारी ही शास्त्रे आपल्यापासून दूर ठेवावीत. जी व्यक्ती गुरुकृपाशिर्वादास पात्र होते व गुरुमार्गदर्शनाप्रमाणे आपले जीवन व्यतीत करते, त्या व्यक्तीस गुरूशिर्वादाची प्राप्ती झाल्यावर, ह्या साधनांची जोड प्राप्त जन्म विकसित करण्यासाठी आवश्यक आहे असे मला वाटत नाही.

पूजनादि विधीचे शास्त्रीय दृष्ट्या दोन भाग केलेले आहेत. हें दोन विधी करीत असताना, दोन्ही विधीसाठी, भाव भावना ह्या पूजकाच्या माध्यमामध्ये निर्माण व्हावयास पाहिजेत. पहिला पूजनाचा जो विधी आहे, तो देवदेवतांप्रित्यर्थ असून, त्याला 'पंचऔपचार विधी'असे म्हणतात व दुसरा विधी आहे त्याला 'पंचउपचार विधी' म्हणतात. म्हणजे पहिल्या विधीत इष्ट देवदेवतांबद्दल जो पूज्य भाव तुमच्या ठिकाणी आहे, तो पूजा साहित्यातून देवाला व्यक्त करावयाचा आहे. हा केला गेलेला विधी, त्याची जी प्रतिक्रिया, ती आपण काया-वाचा-मनाने धारण करावयाची आहे. या विधीस पंचउपचार असे म्हणतात. हे दोन्ही पूजनाचे विधी करण्याने देवाबद्दलचा पूज्यभाव दिवसानुदिवस विकसित होऊन, केल्या गेलेल्या पूजनादि विधीचा कृपाशिर्वाद म्हणून त्या देवांबद्दलची आपली आत्मिक भावना कृतार्थ व्हावयास पाहिजे. तरच आपण नित्याने जो पूजन विधी करतो त्याचा लाभ घेऊ शकू.

पंच औपचारिक विधीचे जे पूजनादि साहित्य आहे, त्यामध्ये देवापुढे बसावयाचे आसन, गंध, फूल, अक्षता, अत्तर, हळदकुंकू, साजुक तुपाचे निरांजन, नैवेद्यार्थ आपले एखादे



आवडते फळ, हे सर्व पूजन विधीत असणे आवश्यक आहे. या अत्यावश्यक साहित्याचा बोध हा शास्त्राने खालीलप्रमाणे सांगितला आहे.

**आसन**:-हे सदैव धूत वस्त्र असावे. शक्यतो ते पांढऱ्या शुभ्र रंगाचे घ्यावे. आपल्याला ऐपत आहे म्हणून रंगीबेरंगी रंगात सतरंजीवजा किंवा मऊ गालिच्याप्रमाणे असू नये. कारण पूजनादि विधीस देवासमोर बसून जेव्हां आपल्याला देवदेवतांचे चिंतन करावयाचे आहे, तेव्हां आपल्याभोवती असलेल्या वातावरणातील सप्तरंगाची वलये आपल्या देहाशी एकरूप होता कामा नयेत. यासाठी रंगीबेरंगी आसन हे साधकाने घेऊ नये. कारण अशा विविध रंगाच्या वलयाने आपल्या ठिकाणी पूजनादि विधीच्या वेळी बुध्दि व मन स्थिर करावयाचे असते. तो विधी करण्यात या वातावरणातील अनावश्यक रंगानी व्यत्यय येतो. यासाठी पूर्वीच्या काळापासून दर्भासन हे पवित्र मानण्यात आलेले आहे. काहीं प्रसंगी स्त्रियांनाही कुटुंबातील देवदेवतांची पूजा करणे भाग पडत असते. परंतु दर्भासनावर बसण्याची त्याना शास्त्राज्ञा नाही. म्हणून धूतवस्त्र हेच योग्य आसन सर्वांच्या सोयीचे आहे. आसनावर बसून पूजनादि विधी झाल्यावर हे आसन लागलीच धुवावे. ते कां धुवावे हे वर नमूद केलेलेच. आहे. पूजनारंभी आचमनादि विधी कां करावयाचे हेही निवेदन केलेले आहे.

पूजनादि विधीस आरंभ करण्यापूर्वी दोनदा आचमन करून, पूजनासाठी घेतलेल्या अक्षता यांस हळदकुंकू म्हणजे ऋध्दिसिध्दी हे वाहून, त्या अक्षता मनोभावे हातात घ्याव्यात, दोन

हात जोडून देवाला अशी प्रार्थना करावी की, "मी आपला पूजनविधी माझ्या यथाज्ञानाने व यथाशक्तिने करणार आहे. या विधीचा स्वीकार करण्यासाठी आपण सर्वानी उपस्थित रहावे". हे वाचनात आल्यावर आपल्याला असे आश्चर्य वाटेल की, असा पूजनादि विधी आम्ही कधीच केला नाही. यांस उत्तर असे की ज्यावेळी आपल्या घरी काहीं मंगल कार्ये असतात त्यावेळी आपण आपल्या आप्तांना, नातेवाईकांना त्या मंगल कार्यार्थ बोलवावयास जातो. ते बोलावणे प्रसंगपरत्वे असते व जर त्यालासुध्दा अक्षतांनी आवश्कता असते. तर जो नित्याने व निरंतर असा पूजाविधी आपणास करावयाचा आहे, त्याचे आमंत्रण देवास भक्तिभावनेने द्यावयास नको काय?

या प्रार्थनेनंतर त्या अक्षता देवासमोर पाटावर ठेवून मगच देवाला पूजनासाठी ताम्हनात ठेवावे. इष्ट देवदेवताची प्रतिके ताम्हनात ठेवल्यावर त्याना शुध्दोदकाने सचैल स्नान घालण्यासाठी तीन पळ्या पाणी घालावे. नंतर या देवतांच्या ठिकाणी जी त्रिगुणात्मक शक्ति वास करीत आहे ती शक्ति आपल्या पूजनाच्या वेळी प्रकट व्हावी यासाठी त्या देवतांच्या प्रीत्यर्थ जी धार्मिक सूक्ते आहेत, म्हणजे गणपती-अथर्वशीर्ष, पुरुषसूक्त, श्रीसूक्त, पवमानसूक्त किंवा रूद्र यांचा एक सकृत पाठ म्हणावयास पाहिजे. पण आज आपल्याला ही सूक्ते अवगत नाहीत किंवा गुरुजनांकडून आपण ती शिकलेलो नाही आणि जरी कोणास ती येत असतील तरीसुध्दा जोपर्यंत ही सूक्ते संथा पध्दतीने म्हणजे उदात्त, अनुदात्त व स्वरित या स्वरांनी म्हणता येत नाहीत तोपर्यंत आपण ही सूक्ते स्वतःला पाठ आहेत असे न भासविता, सोप्या अशा पध्दतीने पूजनादि विधी करावा. तो



म्हणजे ज्याना गायत्री मंत्राची दीक्षा उपनयनानंतर दिली आहे, त्यानी संध्याविधी कर्मात जी देवतांची चोविस नांवे सांगितली आहेत त्यांचा उच्चार करण्यानेही ही कार्यसिध्दी सहज व सुलभ अशा मार्गाने होऊ शकते. त्यापेक्षाही सोप्यात सोपे मार्गदर्शन असे की, ज्याना ही चोविस नांवे उच्चारता येत नाहीत त्यानी एकवीस वेळा गुरुनामस्मरण म्हणावे. हे म्हटल्यावर पुन्हा एक पळी पाणी घेऊन त्यामध्ये गंध, फूल, अक्षता ही घालून, ते पळीभर पाणी देवावर घालावे. त्यानंतर पुन्हा तीन पळ्या शुध्दोदक देवाला घालून, पहिल्यांदा घातलेले गंध फूल, अक्षता उचलून आपल्या मस्तकास लावावे व ते नंतर आपल्या उत्तर दिशेस ठेवावे. या विधीस उत्तरपूजा असे म्हणतात त्यानंतर देवांना धूतवस्त्राने पुसून जाग्यावर ठेवावे.

**गंधः-** हे चंदनाचे असावे. देवास रक्तचंदन किंवा गोपीचंदन हे चालत नाही. गंध तयार करण्याची कृती शास्त्राप्रमाणे अशी आहे की, जी सहाण म्हणून आपण गंध उगाळण्यास वापरतो ती गोलाकार असते. ते पृथ्वीतत्व आहे. असा उद्देश या सहाणेत अंतर्भूत केलेला आहे. या सहाणेवर आपण जे चंदनाचे खोड उगाळणार आहोत, ते आपण आहोत ही भावना आहे. चंदनाचा गुण स्वतः झिजत असताना इतरांना सुगंध किंवा आपल्या ठायी असणारा परिमल द्यावा असा परोपकारी भाव आहे. त्याप्रमाणे "माझे जीवन या जन्मात कृतार्थ व्हावे", या पूज्य भावनेने गंध उगाळावे. गंध उगाळत असतां ते सहाणेवर कदापिही उभे उगाळू नये कारण पृथ्वी जशी स्वतःभोवती फिरते आहे, तसे जन्मकर्म हेही तुमच्या देहाभोवती फिरते आहे. ह्या कर्माच्या जन्ममरण बंधनातून आपण मुक्त व्हावे व ती मुक्तता

देह झिजविल्या शिवाय होणार नाही म्हणून, 'देहाचे हे चंदनरूपी खोड माझे प्रतिक आहे', तेही चंदनाप्रमाणे झिजून माझ्या गुणाना जगत्कल्याणाच्या कार्यार्थ योग्य तो वाव मिळावा अशी भावना ठेवून सहाणेवर खोड उगाळावे व उगाळीत असतांना ते सहाणेवर डाव्या हाताकडून उजव्या हाताकडे गोलाकार घासावे. या गंधात, ज्याना शक्य असेल त्यानी थोडेसे केशर किंवा अष्टगंध अगर हळदीकुंकू घालावे. देवाच्या मस्तकावर आपण जे गंध वाहू ते शुभ्र म्हणजे पांढरे असतां कामा नये, कारण देवाची मस्तक हे सौभाग्याचे स्थान आहे. असे गंध देवदेवतांच्या प्रतिकांना वाहत असतांना ते त्यांच्या मस्तकांवर व पायावर लेपन करावे. जर आपण एखाद्या अवतारी पुरूषाचा फोटो पूजनास ठेवला असेल, किंबहूना तो असतोच अशावेळी ते गंधलेपन त्यांच्या मस्तकावर व पायावर केल्यावर, त्यांच्या छातीच्या मध्यभागी लेपन करावे. कारण ईश्वरी आज्ञेने त्यानी या जगात जे अवतारकार्य मानवी जन्मासाठी अंगिकारलेले असते, त्या आपल्या स्वरुपाची आम्हा मानवाना ओळख व्हावी म्हणून जे देहस्वरुप धारण केलेले असते, हा त्यांचा परिचय त्यानी आपल्यासारख्याच देहिक अवस्थेतून केलेला असतो. परंतु त्यांचे ईश्वरी कार्यार्थ घेतलेले आवतारसामर्थ्य हे त्यांच्या अंतर्यामी असते. त्याचा लाभ आपणास घ्यावयाचा असतो. हे आपणास आजूनही न समजल्याने आपण आजपर्यंत गंध हे केवळ मस्तकावर लावण्याचा प्रघात पाडला आहे.

**फुले**:-फुले ही देवाला अर्पण करावयाचा जो विधी आहे, त्याचा हेतू देवाला सुशोभित करण्यासाठी आहे असे नव्हे. तर फूल हे उमलल्यावर कोमल असे हास्य प्रगट करीत असते.



त्याच्या जीवनातही कांटे असतात. उदाहरणार्थ गुलाबाचे झाङ. त्या झाडाचे फूल आपण खुडतो त्याखालीच त्याचे कांटे असतात. पण हे फूल फुलल्यानंतर त्याच्या कोमल हास्यात व सुवासात हे कांटे अनुभवास येत नाहीत. तद्वत् आपण पूजनादि विधीस बसतो त्यावेळी सुखी असूच असे नाही. तरीसुध्दा ज्याप्रमाणे फुलाने आपले कांटे त्यावेळी आपल्या कोमल हास्यात व सुवासात आणले नाहीत तशा प्रकारचे हास्य आपण पूजनादि विधी करीत असतांना आपल्या मुखावर आणले पाहिजे. पूजा करण्याचा विधी हा नाईलाजाने करून ही सेवा फलदायी होत नाही.

या फुलांना देवाला वाहिल्यावर निदान पांच मिनीटे तरी वाहिलेल्या फुलाकडे शुध्द विचाराने पाहून असा बोध घ्यावा की, "ह्या फुलांचे आयुष्य किती अल्पकाळ आहे. तरीसुध्दा त्यानी आपल्याला देवाला समर्पण करून आपल्या जीवनाचे सार्थक केले. " दुसऱ्या दिवशी याच फुलाना आपण निर्माल्य म्हणून पूजनातून काढून बाजूला ठेवतो. तेव्हां आपली भावना नकळत अशी जागृत होते की, ह्या फुलाना आपला पाय लागू नये. म्हणजे त्या फुलांना देवाला वाहिल्यावर त्यांच्या जीवनाचे सार्थक तर झालेच, पण जी मलीनता होती ती जाऊन, ती पुढे निर्मलीन झाली. म्हणून "निर्माल्य फेकून द्या", असे न म्हणता, "ते विसर्जन करा" असा धार्मिक शब्दाचा उच्चार आपण करतो. मग ती फुले पायदळी पडणार नाहीत याची दक्षता घेऊन नदीत विसर्जन करतो. अशावेळी स्वत:स असा प्रश्न विचारावा की, "या जगात मला दीर्घकाळ जगण्याचे आयुष्य व त्यापरत्वे अनेक जन्म हे प्राप्त होत आहेत. तरीसुध्दा या फुलाप्रमाणे मला माझ्या एकही

जन्माचे सार्थक करून घेता आले नाही". अशा भक्तिभावनेने वाहण्यासाठी आणलेल्या सुगंधी फुलांना जरी आपल्या मासिक खर्चातून चार पैसे खर्च करावे लागले, तरी रोजच्या रोज ही फुले आपल्या प्राप्त झालेल्या जीवनातील कर्तव्याची जाणीव नित्याने करून देत असतात. आपल्या जीवनातील जे आद्य कर्तव्य आहे की, ह्या जीवनाचे सार्थक करावे. त्याचा बोध पुराण, पोथी, प्रवचन, हरिकीर्तन आदि मधून जरी श्रवण भक्तिने आपण ग्रहण करीत असलात तरी ह्या कर्तव्याची जाणीव करून घेण्यासाठी रोज काहीं आपणाला पुराणास, कथा कीर्तनास किंवा प्रवचनास जाणे शक्य नसते. पण रोज सकाळी उठल्यावर आपल्या दिवसभराच्या कर्तव्याची जाणीव ही फुले सकाळीच करून देतात. ही मूकभक्ती केंव्हाही श्रवण भक्तिपेक्षा श्रेष्ठ आहे. अशा त-हेने फुलाकडून आपल्या प्राप्त जीवनातील कर्तव्याची जाणीव करून देण्याच्या स्थितीचा बोध परमेश्वराने कसा सूचित केला आहे हे कळल्यावर तरी आपल्या देवदेवतांना वाहण्यासाठी आवश्यक ती फुले कोणाच्या घरून मागून न आणता, किंवा शेजारील मनुष्य सकाळी उठण्यापूर्वी त्याच्या बागेतून चोरून न आणता, ती भक्तिभावनेने बाजारातून, आपल्या कष्टार्जित पै-पैशातून जर आणली तर देव याची निश्चित परतफेड करील.

फुलामधील हा सात्विक गुण जो देवाला कारणिक होतो, त्याशिवाय फुलाच्या ठिकाणी असणारा तामस गुण हा कधीही कोणाच्या अध्ययनात आलेला नाही. साधारणपणे या वातावरणात असंख्य असे मृतात्मे इतस्ततः वावरत असतात. जेव्हां आपल्या कुटुंबातील स्त्रिया व मुली वेळी अवेळी बाहेर जातात तेव्हां त्याना या बाधा नकळत होत असतात. या बाधा व त्यापासून



होणारा जो त्रास आहे त्यापासून संरक्षण होण्यासाठी प्रत्येकाला साधक अवस्था प्राप्त करता येईल असे नाही. यासाठी या पिशाच्च योनीपासून तुम्हाला सुलभ व सोप्या अशा मार्गाने संरक्षण मिळावे असे साधन अनादिकालापासून जे सूचित केले आहे त्या साधनास आज आपण पूर्णतः विसरलेलो आहोत. पूर्वीच्या काळी स्त्रिया सुवासिक फुलांच्या वेण्या डोकीत घालीत असत किंवा एखादे सुवासिक फूल तरी डोक्यात असावयाचेच. याचे कारण असे होतो की, ही फुले जर बाहेर जाताना धारण केली तर पिशाच्च बाधा होत नाही. कारण फुलांची निर्मिती व त्यातील सुवासिक गंध हे देवाच्या अस्तित्वाचे प्रतिक असल्याने ज्या स्त्रिया वा मुली ही फुले धारण करतात, त्या फुलांच्या सुगंधामुळे पिशाच्चे त्यांच्याजवळ येत नाहीत. कारण पिशाच्यांचे व सुगंधाचे वाकडे आहे.

पुरूषांनासुध्दा अशाच प्रकारच्या बाधा होत असतात. पण त्या कळत नसल्याने ते अनुभविण्यास येत नाही हे जरी खरे, तरी त्या बाधांचे अस्तित्व नेहमीच्या बोलण्या-चालण्याच्या संवयी व्यतिरीक्त तो मनुष्य बोलू चालू लागला की, या व्यक्तीला सूक्ष्मात सूक्ष्म अशी बाधा झाली आहे असे समजावे. बाधा अनेक प्रकारच्या असून, बाधेसंबंधी आपले ज्ञान एवढेच आहे की, अंगात ती प्रकट होऊन नाचू लागली म्हणजे 'बाधा'. परंतु ज्या सूक्ष्मात सूक्ष्म बाधा आहेत त्या बोलण्या चालण्याच्या सवयीपासून ते डॉक्टरना न समजण्यापलिकडील आजार निर्माण करीत असतात. म्हणून पूर्वीच्या काळी एक तर सुवासिक तेल डोक्याच्या टाळूवर घालण्याची पध्दत होती किंवा प्रौढ व्यक्ती उजव्या कानात हीना, चंदन, वाळा, गुलाब, किंवा केवडा अशा

अत्तराचा फाया, म्हणजे लहान असा कापसाचा बोळा ठेवीत असत. पण समाजातील व्यक्तीना हा अत्तर वापरण्याचा सखोल असा बोध न होण्याने, ज्या व्यक्ती अत्तरे वापरीत असत त्या व्यक्तीला 'हे ऐषबाज आहेत' असे ठरवू लागले. त्यामुळे हळूहळू ह्या अत्तरापासून आपण दूर जाऊन, विदेशी अत्तरांच्या म्हणजे सेंट्सचा वापर करू लागलो. या सेंट्समुळे आजुबाजुला जरी सुगंधीतपणा येत असला तरी नैसर्गिक अत्तरामुळे बाधा निवारणार्थ जो सोपा मार्ग सुचविला होता त्याला आपण पारखे झालो आहोत. आज गोमंतकांत जर आपण कोणी गेला असाल, तर आपणास असे दिसेल की, सुशिक्षित व अशिक्षित अशा दोन्ही वर्गातील स्त्रिया सुवासिक फुलांचा वापर नित्याने करीत असतात. त्यामागील सद्हेतू वरीलप्रमाणे आहे.

आता फुलांत जो रजोगुण आहे, तो फुले केंव्हा व्यक्त करतात? जेव्हां एखादी व्यक्ती दिवंगत झाल्यावर तिची प्रेतयात्रा आदराने, सन्मानाने काढण्यात येते. त्यावेळी जी फुले वाहण्यात येतात ती रजोगुण हा भाव व्यक्त करीत असल्याने, त्या फुलांना कोणीही 'निर्माल्य' म्हणत नाहीत.

असा हा फुलांचा ज़न्म विकसित झाल्यावर आपल्याप्रमाणे त्यांच्याजवळ सत्वगुण तमोगुण व रजोगुण हे जरी असतात तरी वेगवेगळ्या कार्यकारणपरत्वे ती फुले आपले हे गुण कार्यान्वित करतात. पण आपले देहिक माध्यम ह्या गुणानी अंकित असूनही कार्यकारणपरत्वे त्या त्या गुणांना कार्य करू देण्याची संवय आपण धारण केलेली नाही. उदाहरणार्थ पूजनादि विधीच्या वेळी फुले ही जरी सत्वगुण प्रकट करून



उपस्थित असली तरी पूजक हा रजो, तमो गुणाधीन असतो.

फुलांच्या निसर्गपरत्वे प्राप्त झालेल्या अशा जीवनाकडे पाहिले की, भक्तभाविकांना साहजिकच आपल्या ठिकाणी वास करीत असलेल्या गुणांचे ज्ञान होण्याची स्वाभाविक उत्सुकता निर्माण होईल, आम्हा मानवांच्या ठिकाणी जो 'सत्वगुण' आहे, त्याचे प्रधान कार्य म्हणजे सर्वाभूती आत्मा हा एकच असून, सर्वांच्या हितार्थ ह्या जन्मांत, या जन्माचे कांही कारण आहे, हे जाणून घेणे हे होय. आपल्यापेक्षा जे ज्ञानी आहेत. जे वडील आहेत, त्यांच्याबद्दल पूज्य भाव, जीवनात ज्ञान-अज्ञानाने घडणाऱ्या दुष्कृत्याबद्दल भय व प्राप्त झालेले जीवन स्वत:च्या विचार-अविचाराने, ज्ञान-अज्ञानाने खर्च न करता ते देवाधीन कसे होईल, याची जाणीव ठेवून ते देवाला पूर्णत: अर्पण करणे हे माझे कर्तव्य आहे, अशी जाणीव ज्या व्यक्ती माध्यमाच्या ठिकाणी सदैव वास करते, त्या गुणास 'सत्वगुण' असे म्हणतात.

वारंवार आपल्या सर्वांच्या वाचनात असे आलेले आहे की, मनुष्याच्या देहिक प्रकृतीत रज, तम, सत्व हे गुण सामावलेले आहेत. पण या गुणांची शास्त्रीयदृष्ट्या चर्चा झाली असली तरी जीवन-उत्पत्ती-मीमांसेप्रमाणे मनुष्य जेव्हां जन्म घेतो, तेव्हां हा देह पूर्णत: सत्वगुणीच असतो. जन्म प्राप्तीनंतर जीवन विकसित करण्यास अयोग्य असे काहींही परमेश्वर देणार नाही. आपण जन्माला आल्यानंतर वय वर्षे तीन पर्यंत पूर्णत: शंभर टक्के सत्वगुणी असतो, जे गुण रज, तम म्हणून सांगितले आहेत, त्या गुणांची धारणा वय वर्षे आठपासून व्हावयास सुरवात होते. यापैकी जो तामस गुण आहे त्याला आरंभ वय वर्षे

पांचपासून व्हावयास सुरवात होते. याला कारण ते बालक नसून त्याचे आईवडील त्याला जबाबदार असतात. कारण आईवडीलांच्या प्रौढ अवस्थेमध्ये हे तीन गुण विषम प्रमाणात त्यांच्या ठिकाणी पूर्णत: धारण झाले असल्याने अनुभवास असे येते की, बाल-संगोपन म्हणजे त्यास अन्न व दूध इत्यादि देणे. त्यामुळे ज्या आपल्या अपत्याने शंभर टक्के सत्वगुण आणला आहे तो अधिकाधिक त्याच्या ठिकाणी कसा राहील याचा सूज्ञ विचार न करता, तो अधिकाधिक कमी करण्याचे कार्य त्या अपत्याचे आईवडील करीत असतात. याचे उदाहरण म्हणजे मुलावर उठता बसता रागावणे, त्याला शिक्षा म्हणून मारणे, इत्यादि जे काहीं प्रकार जन्मदाते आईवडील करतात. त्याचा आघात त्या बालमनावर होऊन, आईवडीलांच्या रागावणायचा जो विषय असतो तो मुलाच्या बालमनाला जाणीव करून देण्यास कारणीभूत होतो. असा आरंभ बाल्यावस्थेपासून व्हावयास लागला की ह्या रज, तम गुणांची उत्पत्ती स्वाभाविक होण्यास आरंभ होतो. वास्तविक आपण प्रौढ झालो आहोत व त्या मुलाचे जन्मदाते मातापिता आहोत, ही जाणीव ठेवून त्या मुलाला जी शिकवण देणे आपले इष्ट कर्तव्य आहे, ते कर्तव्य आपल्या ठिकाणी असणाऱ्या सत्वगुणपरत्वे व्हावयास पाहिजे. पण तसे कां घडत नाही? तर जन्माला आल्यावर आपल्या ठिकाणी जो शंभर टक्के सात्विकगुण होता, तो गुण आज आपल्या ठिकाणी केवळ पंचविस टक्केच उरला आहे. याचे कारण आपल्या वयाच्या अठरा वर्षेपर्यंत तामस गुणाचा विकास आपल्या आईवडीलांचा धाक व कारण नसताना रागावण्याने निर्माण झाला. वय वषे अठरा हे वय इंद्रिय अवयवांची पूर्णत:वाढ



झाल्याचे लक्षण असते. अशावेळी वय अठरा या मुलांचा विषय 'जीवन' हा नसून 'जग' हा असतो. त्या विषयाकडे धांव घेण्याची त्याची मन:स्थिती त्याला अनावर होते. व त्या अनावश्यक विषयामुळे त्याला आपले मन ताब्यात ठेवता येत नाही. अशामुळे आपल्या जीवनात तामस हा गुण पंचवीस टक्के व राजस हा गुण पन्नास टक्के इतका निर्माण होतो.

जन्मत:च जो शंभर टक्के गुण मनुष्याला निसर्गत: प्राप्त करून देण्यात आला आहे. तो आपण न अभ्यासल्यामुळे त्याला अनैसर्गिक अशी अवस्था आपण प्राप्त करून देतो. त्यामुळे जीवन विकासास योग्य असा वाव या राजस व तामस अशा गुणांमुळे मिळत नाही. अनेक वेळा उपासक साधक-माध्यमाकडे जाऊन विचारतात की, "आपण देवाचे चिंतन करण्यास मला सांगता, पण माझे मन एकाग्र होत नाही. "याला साधक तरी काय मार्गदर्शन करणार? यासाठी बाल्यावस्थेपासून प्रौढ अवस्थेपर्यंत आपल्या जीवनाचा जो काळ आपण व्यतीत करता, त्या काळात निदान पन्नास टक्के तरी सत्वगुण आपल्या हितार्थ आपल्याला जतन केला पाहिजे, हा विचार करण्यास हवा.

जीवनांत राजस व तामस गुण हे असावयास पाहिजेत. पण या दोषांची प्रमाणे पंचविस–पंचविस टक्के इतकेच जर असतील तर पन्नास टक्के असणारा सत्वगुण ऐहिक व पारमार्थिक अशा जीवनाचा लाभ करून देण्यास किंवा त्यातील सुख-समाधान अनुभविण्यास मदत करील. अशा सत्वगुणाचा पुन्हःश्च लाभ करून घेण्याचे साधन जर आपणास अंगिकारावयाचे असेल, तर प्रथमत: आपण जगतातील बाह्य

विषयाकडे जे मोहित झाला आहात, तो मोह आवरण्यास सुरूवात करा.

तो मोह गरजेपेक्षा अधिक आहे. तो जर कमी केलात तर जो रजोगुण पन्नास टक्के इतका वाढला आहे, तो कमी होऊन सत्वगुण आपोआप वाढू लागेल. त्याचप्रमाणे जो तामस गुण पचंविस टक्के वाढला आहे त्यासाठी कुटुबांत कारण नसताना रागावणे, मन:स्ताप करून घेणे इत्यादि ज्या गोष्टी ज्ञान-अज्ञानाने आपण करता, त्या कारणाइतक्याच आचार विचारात जर आणल्यात, तर हा तमोगुण कमी होऊन सत्वगुण वाढू लागेल. हा पारमार्थिक उन्नतीचा पाया देवाने निर्माण करावयाचा नसून, तो आपणच निर्माण केला पाहिजे, प्रौढ अवस्थेत असा पाया निर्माण झाला की, त्या पायावर अधिष्ठित होण्यास देव आतुरतेने वाट पाहत असतो. याचा बोध सूज्ञ भक्तांना होत नसल्याने साधकांना भेटून, देवदर्शनाची, कृपाशिर्वादाची, साक्षात्काराची, आत्मप्रचितीची, आत्मबोधाची व आत्मज्ञानाची जाणीव केंव्हा होईल, अशा प्रश्नांची प्रश्नमालिका विचारण्यास सुरुवात होते. अशा प्रश्नांची समर्पक उत्तरे गुरूमार्गात आपणास मिळत नाहीत. म्हणून कित्येक सूज्ञ भक्त आपल्या जीवनाची दिशा बदलून गैरदिशेस या जीवनाचा परमपवित्र प्रवाह व्यतीत करतात. हे वाचनात आल्यावर पारमार्थिक जीवनाची प्राप्ती करण्याची जबाबदारी पंचाहत्तर टक्के आपली असून, ती शक्तीमान करण्याची फक्त पंचविस टक्के जबाबदारी परमेश्वराची आहे. तो ती जबाबदारी आनंदाने स्वीकारतो. ज्यानी आजपर्यंत अशा कार्यपध्दतीने जीवन व्यतीत केले आहे, त्यांना त्या दयावंत परमेश्वराने कृपावंत केले आहे हे लक्षात येईल.



वरील मार्गदर्शन देहातील प्रधान गुणाबद्दल म्हणजे सत्वगुणाबद्दल व तो प्राप्त करण्यासाठी काय दक्षता घेणे आवश्यक आहे, हे निवेदन केले आहे. तामस गुणासंबंधी वर जो उल्लेख केला आहे, त्यात त्याचे प्रमाण गरजे इतकेच आवश्यक आहे. म्हणजे साधारण पंधरा टक्के गुणाचा वापर इतकाच आवश्यक आहे की, ज्यावेळी आपल्या जीवनात अडिअडचणी निर्माण होतात किंवा अकस्मात एखादे संकट उभे राहते, तेव्हां ती अडिअडचण किंवा संकट निवारून नेण्याचे कार्य सत्वगुणाच्या ठिकाणी वास करीत असलेला परमेश्वराचा कृपाशिर्वाद करणार आहे. तरीसुध्दा आपण ह्या अडिअडचणींना किंवा संकटांना तोंड देऊ शकणार नाही. अशी जी कमतरता आपल्याला वाटते, ती वाटू नये व निश्चयाने आपण त्याचा प्रतिकार करावा म्हणून हा तमोगुण आपल्या ठिकाणी कार्य करतो.

या शिवाय कुटुंबात आपण जबाबदार व्यक्ती असल्याने, इतरांना मानवेल इतकाच दरारा आपल्याकडून व्यक्त केला गेला पाहिजे. मार्गदर्शन पध्दतीतील जी निराकरणे पांच ते आकरा आठवडेपर्यंत पूजनार्थ आहेत, त्याचे फल आपल्याला त्या मुदतीत कां मिळत नाही, यालाही हे एक कारण अधिक आहे. तुमचे तामस व राजस गुण अधिक वाढीस लागले व सत्वगुण हा प्रसादपूजनार्थ कमी पडला, तर दिला गेलेला कृपाप्रसाद, म्हणजे श्रीफल याचे फल पूर्णत: मिळत नाही,

वरील अनेक मार्गदर्शनात ‘जीवन’ हा तुमच्या जीवनातील मुख्य विषय व्हावयास पाहिजे, असे जे अनेक वेळेला

म्हटले, याचा अर्थ असा स्पष्ट होतो की, आपला राजस गुण कमी व्हावयास पाहिजे, तो दहा टक्के इतकाच जीवनकार्यार्थ आवश्यक आहे. तुमच्या जीवनात, तुम्हाला अधिक जीवन हे कुटुंबातील इष्ट कर्तव्याची पूर्तता करण्यासाठी खर्च करावयाचे आहे. तेव्हां जगातील अनेक विषय हे तुमचे होता कामा नयेत. या प्रमाणांत, म्हणजे पंचाहत्तर टक्के सत्वगुण, पंधरा टक्के तामस गुण व दहा टक्के राजस गुण प्राप्त होण्याने तुमचे जीवन विकसित आहे, हे स्पष्ट होते. अशा जीवनाचा जो लाभ आहे, तो म्हणजे तुम्ही जगातील अनेक विषयांचा विषय बनता.

**अत्तर**:-पूजा साहित्यातील हे सुवासिक तेल देवाला वाहत असताना ते नेहमी अनामिकेने म्हणजे करांगुली जवळील बोटाने देवास लावावयास पाहिजे. हे अत्तरसुध्दा देवाच्या छातीच्याजवळ वहावे. कारण देवाची दैविक शक्ति ही आपल्याप्रमाणेच त्याच्या हृदयात वास करीत असते. हे अत्तर वाहण्याचा जो सद्‌हेतु आहे, तोही आपणास बोधप्रद असा आहे. आपल्या जीवनात आपण किती गुणी आहोत व जीवनाचे सार्थक करण्यासाठी किती गुणी व्हावयास पाहिजे, याचे सिंहावलोकन कोणीही करीत नाही. प्रत्येकाला आपल्यामध्ये वास करीत असलेल्या कमीअधिक गुणाबद्दल असा अहंभाव असतो की, आपण इतरांपेक्षा श्रेष्ठ आहोत. पण ही श्रेष्ठता बोलण्या चालण्यात कधीही अनुभवास येत नाही. अशा सद्‌गुण-दुर्गुण म्हणून वास करीत असलेल्या अवस्था आपल्याजवळ असूनही जेव्हां आपण देवापुढे बसतो, तेव्हां देव आपला अनादर न करता, जरी आपण दुर्गुणी आहोत, इतरांना आपल्यातील दुर्गुणांच्या वासाने जरी कमीपणा देत आहोत, तरी आपण करीत असलेली पूजा तो परमेश्वर आनंदाने



स्वीकरतो. ती याचसाठी की, 'माझा भक्त जरी पूर्वजन्मीच्या कृतकर्माने दुर्गुणी आहे तरी माझ्या कृपाशिर्वादाने आज ना उद्या तो निश्चित गुणी होऊन, त्याचा सुगंध इतरांच्या कल्याणार्थ तो परोपकार म्हणून आचरणात आणील'.

देवाला जे अत्तर वहावयाचे आहे, ते त्याला कोणते प्रिय आहे, याचा आपण कधीही विचार केला नाही. देवाला अत्तर वहावयाचे आहे एवढेच समजून आपण आजच्या काळातील आधुनिक अत्तरे म्हणजे वेगवेगळ्या प्रकारची सेंट्स उपयोगात आणतो. पण यापेक्षाही दुर्दैवाची गोष्ट अशी अनुभवास येते की, घरातील ड्रेसिंग टेबलवर रोज वापरण्यासाठी म्हणून वेगवेगळ्या प्रकारची सेंटस्च्या बाटल्या व त्याही विदेशी, महत्प्रयत्नाने मिळवून ठेवलेल्या असतात. पण देवाजवळ चुकूनही अत्तराची बाटली सापडत नाही. जगासमोर आपणास बाहेर जावयाचे आहे म्हणून परिधान केलेले कपडे सुगंधित करण्याची ही आधुनिक फॅशन बाहेरून जरी आपल्याला सुगंधित करीत असली तरी अंर्तयामी आपण सुगंधित आहोत कां ? याचा विचार प्रत्येकाने स्वत:ला विचारून करावा.

देवास प्रिय अशी जी अत्तरे आहेत ती प्रामुख्याने म्हणजे हीना, चंदन, गुलाब, वाळा. याचे कारण ह्या अत्तराची निर्मिती ज्या वनस्पतीपासून केलेली आहे त्या वनस्पतीची उत्पत्ती व त्यातील सुवास हा काहीं मानवी प्रयोग नसून, हा देवाच्या सामर्थ्याच्या चमत्काराची साक्ष आहे. हे सत्य आपल्यासमोर असताना, साधक अवस्थेतील बाल्य साधक क्षूद्र अष्ठसिध्दिसारखे साधन प्राप्त करून, जे चमत्कार समाजात

करीत आहेत व त्यांच्या ठिकाणी ही अद्‌भूत शक्ति म्हणजे परमेश्वर आहे असे समजून जे लोक अंधश्रध्देने आपल्या देवादिकांकडे पाठ फिरवून त्यांच्याकडे धांव घेत आहेत त्यानी अशा चमत्कार करणाऱ्या व्यक्ती ह्या 'देव' आहेत असे समजून तिकडे धांव न घेता, निसर्गात परमेश्वराने अद्‌भूत असे आपल्या सामर्थ्याचे दिव्य प्रतिक म्हणून तुम्हाला जे अनुभविण्यास दिले आहे, त्या अनुभवाची ओळख करून अशी श्रध्दा निर्माण करा की, परमेश्वराला आपले अस्तित्व जाणवून देण्यासाठी मनुष्यमात्राची गरज नाही. सृष्टीत मनुष्य हा जसे एक निसर्गाचा घटक आहे, तरी त्याचे जीवन निसर्गपरत्वे व्यतीत होत नसून अनैसर्गिक असेच व्यतीत होत आहे. फक्त निसर्ग ही निर्मिती परमेश्वराची साक्ष असल्याने तो आपल्या दिव्य शक्तीची प्रतिके निसर्गातून व्यक्त करीत असतो. त्याला मानवी माध्यमाची कदापिही गरज नाही

**हळद-कुंकू**:-पूजनादी विधीत या दोन द्रव्यांचा जो समावेश शास्त्राप्रमाणे करण्यात आला आहे, त्याचे महत्व असे आहे की, हळद व कुंकू हे देवाला जेव्हां आपण वहावयाचे असते, त्यावेळी ह्या दोन द्रव्यमाध्यमातून देवाकडे अशी याचना करावयाची असते की, "देवा  या जगात तू सर्वशक्तिमान असून, तुझी सत्ता जगातील अणुरेणुपासून ब्रह्मांडापर्यंत कार्य करती झाली आहे व अशा कार्यात ज्या ऋध्दिसिध्दीचा समावेश असतो, त्या ऋध्दिसिध्दी तुझ्या दास असून, त्या माझ्या जीवनातील सुख-शांती-समाधानाच्या आधार आहेत. तेव्हां तुझ्या कृपेने हा आधार मला निरंतर स्वरूपात लाभू दे. " अशी प्रार्थना करून देवाला हळद व कुंकू हे अंगुष्ट व अनामिका अशा चिमटीत धरून वहावे.



हळदकुंकू वाहून झाल्यावर अनामिकेस लावलेले कुंकू आपल्या मस्तकी लावावे. याचा हेतू असा की, ज्या ऋध्दिसिध्दी आपल्या प्रापंचिक जीवनांत आपणास कृपाशिर्वादाचा आधार म्हणून लाभाव्यात अशी जी आपली इच्छा असते, ती साकार होण्यासाठी आपण आपले देहिक माध्यमही मंगलमय करावयास हवे. तरच केली गेलेली प्रार्थना पूर्णत्वास जाते.

अलिकडील काळात घरातील सुवासिनी तयार कुंकू, जे बाटल्यात भरलेले बाजारात मिळते, त्याचा सर्रास वापर करतात. त्यामुळे जरी ह्या सुवासिनींची कुंकू लावण्याची सुलभ अशी सोय होत असली तरी घरातील सुवासिनीने देवास हळदीकुंकू वाहून ज्या ऋध्दिसिध्दीच्या प्राप्तीसाठी प्रार्थना करावयाची आहे, ती या बाटलीतील कुंकू लावण्याने यशदायक होत नाही. यासाठी निदान घरातील प्रत्येक सुवासिनीने, जरी वेणी-फणी करून बाटलीतील कुंकू लावले तरी त्यानंतर देवास हळदकुंकू वाहून, पुन्हा आपल्या मस्तकाला प्रथम हळद व नंतर कुंकू लावून घ्यावे. तरच कुटुंबात अंगिकारलेल्या देवदेवतार्जनाचा इष्ट कृपाशिर्वाद कुटुंबियांना प्राप्त होतो.

**फलसमर्पण**:- हा विधीसुध्दा औपचार व उपचार या विधीने युक्त असा करावयाचा आहे. जे फळ आपण देवाला अर्पण करणार आहोत, ते परिपक्व झाल्यावर म्हणजे पिकल्यावर आपण देवापुढे प्रसाद म्हणून ठेवतो. हे पिकलेले फळ म्हणजे त्याच्या तिन्ही अवस्थांचे पूर्णत्व किंवा परिपाक झालेला आहे त्याचप्रमाणे "मलाही त्या तिन्ही स्थिती असून, माझा काहींच विकास अजून  झाला नाही याबद्दल मला दुःख होत आहे" हे

देवाला निवेदन करण्याचे माध्यम म्हणजे फळ होय. हे त्याला ज्या प्रार्थनेने किंवा विधीने अर्पण करावयाचे आहे, त्या विधीस **‘नैवेद्य’** असे म्हणतात.

फल अर्पणाचा दुसरा हेतू असा की ’मी जी तुझी सेवा आतापर्यंत मनोभावे केली आहे, त्याचे फल मी मागणे हिताचे आहे किंवा नाही हे मला समजत नाही. तेव्हां मी केलेली सेवा मनोभावे स्वीकारून त्याचे योग्य ते फल, तुझी इच्छा असेल त्याप्रमाणे दे. कारण जीवनात अज्ञानाने मी जे जे काहीं मागतो ते माझ्या हिताचेच असेल किंवा नाही याचा बोध मला होत नाही, मी माझ्या इच्छित अपेक्षा फलप्राप्ती म्हणून केल्या व तुला त्यापेक्षा अधिक काहीं द्यावयाचे असेल तर मी फल प्राप्ती मागण्यात माझ्या अपेक्षे इतकेच प्राप्त होईल' अशी सद्‌भावना विचारात घेऊन जे फळ आपण अर्पण कराल त्यासच ‘निरपेक्ष भक्ति’ असे म्हणतात.

हें फल देवाला अर्पण केल्यावर त्या फलाचे रुपांतर आपल्याला जरी दिसत नसले, तरी ते ‘प्रसादात’ होते, असा प्रसाद घरातील सर्वांनी ग्रहण केल्यावर त्याचा प्रतिसाद द्यावयास पाहिजे की, ‘परमेश्वरा, तू दिलेला प्रसाद जो आम्ही ग्रहण केलेला आहे, त्याच्या सामर्थ्यामुळे मला व माझ्या कुटुंबातील कोणाही व्यक्तीला जीवनात आधि-व्याधि, दु:ख-अशांतता, कर्मपरत्वे अनुकुल-प्रतिकूलता, ऋणानुबंधपरत्वे धननाश, विद्यानाश, संततीनाश आदिच्या दुष्ट भवचक्राचा त्रास सहन करावा लागणार नाही, असा माझा पूर्णत: विश्वास आहे. ’



अनेक भक्तभाविक देवाला प्रसाद म्हणून पेढे, बर्फी, लाडू, करंज्या किंवा अन्न मिष्टान्ने यांचा नैवेद्य दाखवितात. वास्तविक ही मिष्टान्ने सेवन करण्यासाठी वासना आपली असते, पण आपण ती देवाच्या निमित्ताने पूर्ण करून घेत असतो. आपण आपल्या वासनेपरत्वे ही मिष्टान्ने देवापुढे प्रसाद म्हणून ठेवीत असलो तरी देव व देवाचे देवत्व हे इच्छास्वरुपी आहे. ते कदापिही वासनारुपी नाही. त्यामुळे या प्रसादाचा स्वीकार देवाने केला आहे असे वाटते, ते प्रत्यक्षात घडत नाही. कारण देवाचा धर्म नैसर्गिक असल्याने, जे नैसर्गिक असेल त्याचेच सेवन करणे व प्रसाद म्हणून तो आपल्याला परत करणे, हा त्याचा धर्म आहे. म्हणून नैवेद्यात श्रेष्ठ म्हणून जर कांही असेल, तर दुधसाखर व इच्छित फळ होय.

**आरती ओवाळणे**:- पूर्वीच्या अनेक निराकरणात प्रामुख्याने असे सूचित करण्यात आले आहे की, देवापुढे जे निरांजन लावता ते साजुक तुपाचे लावावे. निरांजन भरून लावण्याइतके तूप नसले तरी पाच मिनिटे ते निरांजन देवापुढे तेवत राहील एवढे तरी तूप घालावे. वास्तविक वात पेटण्यासाठी, कोणताही स्निग्ध पदार्थ म्हणजे मेण व अलिकडील वनस्पती तूप म्हणून ज्याला आपण म्हणता, हेसुध्दा सर्रास वापरण्यात येत आहे व ते निरांजन देवापुढे लावले याचे समाधानही आपण भक्तभाविकांनां मिळत आहे, असे असतां, कार्यपध्दतीत प्रामुख्याने साजुक तूपाचे निरांजन लावावे असे जेव्हां सांगण्यात येते, त्यामागे काहींतरी महत्वाचे कारण असावयास पाहिजे.

जेव्हां आपण भक्तभाविक आपल्या इष्ट देवतांच्या

पूजनाचा विधी वरील निवेदना प्रमाणे पूर्ण करता, त्यावेळी आपण देवापुढे स्थूल देह घेऊन बसलेलो असतो, याचीच जाणीव फक्त आपल्याला होत असते. पण ज्या स्थूल देहात दोन अधिक देह आहेत, ते म्हणजे सूक्ष्म व कारण, हे आपणास दिसत नाहीत किंवा अनुभवास येत नाहीत. पण त्या दोन देहांचा समावेश ह्या पूजनादि विधीत होणे अत्यावश्यक आहे. यासाठी बोध असा सुचित केला आहे की तांब्याचे किंवा पितळेचे निरांजन म्हणजे तुमचा पंचमहाभूत तत्वानी युक्त असा स्थूल देह याचे प्रतिक, आंत जे तूप आहे तो सूक्ष्म देह म्हणजे पंचतन्मात्र व कारण देह म्हणजे निरांजनात ठेवलेली वात. ही वात आपण पेटविल्यावर जो प्रकाश देव व भक्त यामध्ये पडतो त्याचे प्रतिक असे आहे की, 'परमेश्वरा, हे मी तुझ्यापुढे जे निरांजन माझे प्रतिक म्हणून पेटवितो आहे व ते मी पेटविल्यावर जसा त्याचा प्रकाश तुझ्यामाझ्यात पसरला आहे, तशा माझ्या देहाच्या तिन्ही अवस्था तू तुझ्या कृपाशिर्वादाने एक करून दे. म्हणजे त्या माझ्या जीवनाचा प्रकाश या जगात सर्वत्र पसरून मला प्राप्त झालेल्या जन्माचे कारण, इतरासाठी माझ्या हातून जी सेवा होईल, त्यामुळे मला समजेल. '

या विधीत साजुक तुपाला जे महत्व दिलेले आहे याचे कारण असे, हा देह पंचभौतिक तत्वांची निर्मिती असून, त्याच्या विकासासाठी पंचभौतिक तत्वांचीच आवश्यकता असते. म्हणून अन्न, पाणी, दूध, दही, तूप इत्यादि सेवन करून या पंचभौतिक शरीराची निगा राखत असतो. त्याच प्रमाणे ह्या जन्माला विकसित करून त्याची निगा राखण्याचे साधन हे निरांजनातील तूप होय. तूप हा जो पदार्थ आहे, तो गाय किंवा म्हैस या



प्राण्यांच्या दूधापासून निघालेला त्यांच्या पंचभौतिक तत्वांचा सत्वगुण आहे. त्यामुळे या तत्वांत लावलेली ज्योत आपल्यात विलीन होण्यास अडथळा येत नाही. पण हा गुण आजकालच्या कृत्रिम तुपात नसल्याने, जरी निरांजन लावले आणि नाही लावले तरी त्याचा उपयोग जीवनाला पोषक म्हणून काडिमात्र होत नाही. अशी ही निरांजनातील ज्योत स्वतः जाळून इतरांना प्रकाश देण्याचे महत्कार्य करते, असे आपल्या हातून घडावे, असा बोध सूचित केला आहे. त्या तबकातील निरांजनाने आपल्या पुढील देवास तीन वेळा पायापासून पुन्हा पायापर्यंत गोलाकार अशी ओवाळणी करावयास पाहिजे. ही ओवाळणी तीन वेळा करण्याचा हेतूही तिन्ही देहाच्या हितसंबंधाशी आहे. या शिवाय महत्वाचा उद्देश असा आहे की, आपण देवापुढे बसल्यावर देवाची प्रतिके व तसबिरी यामध्ये जे वातावरण आहे, त्या वातावरणात आपल्या जन्मकर्मातील अशुध्द अशी वलये आपल्या पूजनादि विधीत आपल्याला अडथळा निर्माण करण्यासाठी उपस्थित असतात. त्या वलयांचे निरसन होऊन, देवाने वलयरुपाने पाठविलेला कृपाशिर्वाद आपणास सहज प्राप्त व्हावा, म्हणून हे निरांजन ओवाळावयाचे आहे.

**अक्षता:-** पूजनारंभी ज्या अक्षता तुम्ही देवाला वाहिल्या, त्या अक्षता देवांना पूजनादि विधी स्वीकारण्यास आवाहन म्हणून वाहिल्या. आता ज्या अक्षता वहावयाच्या आहेत त्या 'उपचार' म्हणून, म्हणजे वाहिलेल्या अक्षतांतून स्वत:ला जाणीव करून देण्यासाठी वहावयाच्या आहेत, ही जाणीव अळा प्रकारे करून द्यावयाची आहे की, 'देवा हा सर्व निधी जो मी करीत आहे, हा काहीं माझा मोठेपणा नसून, यापेक्षा अधिक कितीतरी गोष्टी तू

माझ्या हिताच्या, माझ्या आयुष्यात करीत आला आहेस व पुढेही करीत राहशील. त्याचे मोजमाप परतफेड म्हणून मला कोणत्याही जन्मात करता येणे शक्य नाही. तरी ह्या उपकाराची फेड मी माझ्या यथाशक्ति यथाज्ञानाने वाहिलेल्या अक्षतांपैकी एका तांदळा एवढ्या आकार व वजनाची आहे, त्याचा तू स्वीकार कर. '

देवाची पूजाअर्चा ह्या ज्या ज्या काहीं साधनानी करावाची आहे. ते सर्व पूजासाहित्य आपल्याला ऐपतीनुसार आणता येईल असे नाही. तरीसुध्दा जशी आपली ऐपत असेल त्याप्रमाणे साहित्य पूजनात असावे. हे जरी खरे, तरी पूजासाहित्यास आपल्याला ऐपत नाही म्हणून आपण पूजनादि विधीकडे दुर्लक्ष करतो. पण देवदेवतांना पूजासाहित्यापेक्षा भक्तियुक्त भावभावना हीच इतर देखाव्यापेक्षा अधिक प्रिय असतात. तेव्हां देवाबद्दल भक्तीयुक्त भावभावना निर्माण करण्यास ऐपत नाही असे म्हणण्याचे कारण नाही, देवाबद्दलची भक्तीभावना व ती भक्तिभावनेने व्यक्त करावयाची भावना, याची नित्याने जर आपण संवय लावून घेतली तर सकाळी पंधरा मिनीटे केलेली पूजा हिचा आनंद रात्री झोपण्यापर्यंत अनुभविण्यास येतो. दिवसातील इष्ट कर्तव्ये करताना चुकूनही तुमच्या तोंडून असा शब्द निघणार नाही की, 'मला आज करमत नाही, ' कारण सकाळी पंधरा मिनीटे पूजनादि विधीत व्यतीत केलेला वेळ हा देहिक आनंदापेक्षा आत्मिक आनंदाचा असल्याने तो द्विगुणीतच होत असतो. असा आनंद प्राप्त करून घेतल्यानंतर करमणुकीसाठी नाटक, सिनेमा रेडिओ आदिची जी गरज आपल्याला लागते, ती न लागता या गरजेतून आपण पै-पैशाची



खूपच बचत करू शकता. याशिवाय या अक्षता वाहण्याचा दुसरा बोध असा आहे की, 'माझ्या ऐपती प्रमाणे मी तुझी सेवा अक्षतेतील एका तांदळाएवढी केली आहे, त्याचा तू स्वीकार करून कृपाशिर्वाद दे'.

समाजात प्रत्येक व्यक्तीचे जीवन हे भिन्न भिन्न विषयांच्या पातळीपरत्वे व्यतीत होत आहे. कोणास अपेक्षेपेक्षा जास्त अशी धनप्राप्ती, विद्याप्राप्ती, नामप्राप्ती किंवा प्रतिष्ठा प्राप्त झालेली असते. वास्तविक असे विषय प्राप्त झाल्यावर आम्हा मानवानी संतुष्ट मनाने त्या परमेश्वराचे उपकार मानून, जे इतरांना मिळाले आहे त्यापेक्षा जे आपल्याला अधिक मिळाले आहे, त्यातून जर आपण दानधर्म, देवधर्म व परोपकार आणि तोसुध्दा उपकार म्हणून नव्हे, तर कर्तव्य बुध्दीने अंगिकारलात, तर इतरांच्या ज्या गरजा आहेत त्या आपण सहज पूर्ण करून नकळत पुण्य संचय करू. पण याउलट या व्यक्ती समाजात इतरापेक्षा वेगळे आहोत अशी प्रतिष्ठा निर्माण करून, प्राप्त झालेल्या सुखाबद्दल अहंकार निर्माण करुन इतरांना तुच्छ व कमीपणाने लेखतात. अशी ही सर्व प्राप्ती करून देण्याचा जो परोपकार न मागता, न कळत ज्याने दिला आहे, असा परमेश्वर आपल्यापेक्षा कितीतरी पटीने श्रीमंत व श्रेष्ठ आहे. त्याच्यापुढे भक्तिभावनेने बसून आग्रहाने असा कमीपणा आपण घ्यावयास पाहिजे. की, क़'देवा, तू जे सर्वकाहीं मला दिले आहेस, ते तुला वाहिलेल्या अक्षतापैकी एका तांदळाच्या सहस्त्रपटी इततकेच मला मिळाले आहे. तर हा माझा गर्व तू हरण कर व मला जे प्राप्त झाले ते माझेच असून मलाच त्याचा उपभोग घेण्याचा अधिकार आहे, असा स्वार्थी विचार मला न येऊ देत. '

पूजनादि विधीसाठी महत्वाचे साहित्य यासंबंधीचा आवश्यक तो बोध आपण भक्तभाविकांना यथोचित करून दिला आहे. यापैकी देवाजवळील नंदादीप हा प्रत्येकाला जागेच्या अभावी लावता येणे शक्यच असते असे नाही, म्हणून त्यासंबंधी विशेष मार्गदर्शन न करता, तो शक्य असेल त्यानी सकाळी निदान पूजेच्या वेळी व सायंकाळी लावावा. उदबत्ती, धूप हे विधी सकाळ-संध्याकाळ करण्याने घरामध्ये प्रसन्न असे वातावरण निर्माण होते. ते आपापल्या परीने करावे.

**पंचउपचार विधी** :-षोडशोपचारे पूजनादि विधी झाल्यानंतर, करीत असलेल्या पूजन विधीत आपण निरपेक्ष असावयास पाहिजे. पण पूजनादि विधी करणाऱ्या व्यक्तीच्या ठिकाणी सहजासहजी देवाबद्दल किंवा देवाजवळ काहीं मागण्याबद्दल निरपेक्ष भावभावना असतील असे नाही. यासाठी पूजनादि विधी झाल्यानंतर एक तुळशीपत्र किंवा बिल्वपत्र हातात घेऊन व त्याबरोबर थोड्या अक्षता व हळदकुंकू घेऊन ते देवाला वहावे. अशावेळी, जर मंत्रपुष्पांजली येत असेल तर त्याचा उच्चार करावा, नाही तर 'श्रीकृष्णार्पणमस्तु' म्हणून ती मंत्रपुष्पांजली म्हणजे तुळस किंवा बिल्वपत्र, अक्षता, हळदकुंकू आदि देवाला समर्पण करावे. अशाने जरी तुम्ही जीवनातील काहीं अडिअडचणी संबंधी किंवा ऐहिक अपेक्षेने पूजनादि विधीचे वेळी विचार करते झाला असलात, तरी या मंत्रपुष्पांजलीच्या समर्पण विधीने तुम्ही केलेली पूजनादि क्रिया निरपेक्ष झाली, अशी भावना साकार होते.

. त्यानंतर देवासमोर आपणास येत असलेले आपल्या



इष्टदेवतेबद्दलचे एखादे स्तोत्र, कवच किंवा त्या देवतांच्याबद्दलचे मंत्र यांचा उच्चार करावा. यामध्ये प्रामुख्याने एका गोष्टीची जबाबदारी अशी घ्यावी की, ज्या देवतांचे मंत्र बीजाक्षरी आहेत त्यांचा उच्चार करू नये. कारण हे मंत्र साधक अवस्थेतील सिध्दावस्था प्राप्त केलेल्या व्यक्तीने जर सिध्द केलेले असतील व ते दीक्षा विधी म्हणून आपणास दिले असतील, तरच या बीजाक्षरी मंत्राचा लाभ आपल्याला होत असतो. यापेक्षा सुलभ, सोप्या मंत्राचा उच्चार हाच हिताचा लवकर यशप्राप्ती करून देणारा आहे. म्हणून त्याचाच उच्चार करावा किंवा गुरुनामस्मरण करावे.

# कुलाचार, कुलोपासना

**अन्नशुध्दि**:–कुलधर्म करण्याची विस्तृत भूमिका आपणास निवेदन केलेलीच आहे. आता 'कुलाचार' म्हणून ज्या काहीं गोष्टी आहेत, त्यासाठी जे निवेदन आहे, तेही महत्वाचे आहे. जे अन्न रोज आपण सेवन करता ते अन्न ग्रहण केल्यावर, पचनादि क्रिया झाल्यावर, त्याचे रक्तात रुपांतर होऊन त्याचा पुरवठा शरीराकडे विचार-आचारार्थ केला जातो. यासाठी जे अन्न रोज आपण सेवन करुं, ते पवित्र असावयास पाहिजे. घरातील स्त्रिया जो स्वयंपाक करीत असतात, तो कदापिही स्नानापूर्वी करु नये. स्नानानंतर जो स्वयंपाक गॅसच्या चुली, कोळश्याच्या शेगड्या आदीवर आपल्याला करावयाचा आहे, त्या नित्याने सकाळी ओल्या फडक्याने पुसून घ्याव्यात व मगच त्यावर स्वयंपाक करावा. आज घरोघरी कुकर लावण्याची पध्दत असल्याने, प्रधान अन्न कोणते शिजवावे हे सूज्ञ गृहिणींना अजून तरी समजले आहे असे वाटत नाही. कारण पाकशास्त्रामध्ये प्रधान अन्नाला प्रथम शिजवावे असा शास्त्राधार आहे. तो म्हणजे प्रथमतः भात शिजवावा, मग डाळ किंवा भाजी शिजवावी व शेवटी चपात्या किंवा पोळ्या अशा क्रमाने स्वयंपाक करावा. आजकाल कुकर वापरण्याची पध्दत असल्याने, कुकरमध्ये डाळी शिजण्यास वेळ लागतो म्हणून कुकरध्ये डाळी खाली ठेवून, त्यावर भात शिजविण्यास तांदुळ ठेवण्यात येतात. हे जरी खरे, तरी अशा शिजविण्याने 'अन्न हे पूर्णब्रह्म' ही वचनोक्ति सिध्द होत नाही. या साठी शक्यतो भात प्रथम शिजविण्यांत यावा. कारण भाताचा हितसंबंध इहलोकापासून परलोकापर्यंत आहे.



स्वयंपाकघरात अन्न शिजविण्यासाठी ज्या माध्यमांचा आपण उपयोग करतो, या व्यतिरिक्त कोळसे वापरण्याची एखादी लहान शेगडी असावी. ती रोजच्यारोज धुवून त्यावर चार कोळसे का होईनात, पेटवावेत. कारण आपण आधुनिक माध्यमे म्हणजे गॅसची शेगडी, इलेक्ट्रिकची शेगडी किंवा स्टोव्ह हे जे वापरतो, त्यांना 'अग्निदेवता' असे म्हणत नाहीत. कोळशातून जो अग्नी प्रकट होतो, त्यालाच अग्नीदेवता म्हटलेले आहे. याचा हेतु असा आहे की, आपल्या शरीरात अन्नपचनाची क्रिया ज्या जठरमाध्यमातून होते, ते जठरमाध्यम अग्नीस्वरुप आहे म्हणून ज्या ज्या प्रकारचे अन्न आपण सेवन करु, त्या त्या अन्नाचे पचन होत असते. जे अन्न आपण सेवन करणार आहात, ते पवित्र न होऊन आपल्या पोटात जाण्याने, पोटातील वातविकारापासून ते बध्दकोष्ठतेपर्यंतचे रोग होऊन, आपण डॉक्टरकडे जाऊन, औषधासाठी अवाढव्य खर्च करुन, ते निवारण करुन घेतो, त्याऐवजी पवित्र अशा अन्नाच्या सेवनाने या रोगाचे उच्चाटन होते. यासाठी प्रथमतः केलेला जो भात आहे, त्यातील थोडा भात ताटलीत किंवा वाटीत घेऊन त्यावर तुप, दही किंवा दुध घालून जी कोळशाची शेगडी पेटविली आहे, तिला हळदकुंकू वाहून, त्या पेटलेल्या शेगडीत पंचप्राण आहुती, मधली दोन बोटे व अंगठा अशा तीन बोटांनी द्याव्यात. आहुती देतांना 'प्राणाय स्वः अपनाय, स्वः व्यानाय स्वः उदानाय स्वः समानाय, स्वः ब्रह्मण्ये स्वः' असे म्हणतो, ते पंचप्राण म्हणजे आपल्या शरीराचे प्रधान तत्त्व आहे. हे पंचप्राण अन्न व श्वास यांच्या पूरक क्रियेने कार्य करीत असतात. तेव्हां त्यांना पवित्र अशा अन्नाचा लाभ करुन देण्याने, आपण आजार मुक्त होऊन, निरोगी व निरागस असे

दीर्घायुष्य प्राप्त करुन घेतो.

स्वयंपाक झाल्यावर प्रथमतः देवास नैवेद्य दाखववावा. हा नैवेद्य दाखविणे याचा अर्थ आपण जे अन्न सेवन करणार आहोत ते ताटात वाढून देवापुढे ठेवणे असा होत नाही. तर वाढलेले ताट देवापुढे ठेवण्यापूर्वी, जागेच्या शुद्धतेसाठी देवापुढे चौकोनी मंडल करावे. गोल मंडल चुकूनही करूं नये कारण हे मंडल फक्त श्राद्धपक्षादि विधीच्यावेळी दिवंगत व्यक्तींना जो अन्नाचा नैवेद्य दाखविला जातो, त्यासाठीं आहे. या चौकोनी मंडलावर वाढलेले ताट आपण जेवावयास बसल्यावर प्रथमतः वरणभात जसा आपल्यासमोर वाढला जातो तशा पध्दतीने ते देवापुढे ठेवावे. पाटावर बसून, दोनदा आचमन करुन, हातात एक पळी पाणी घेऊन, ते पाणी डाव्या हाताकडून उजव्या हाताकडे ताटाभोवती दोन वेळा फिरवावे. हे करीत असता तोंडाने वरीलप्रमाणे पंचप्राणांचा उच्चार करावा. तिसऱ्यांदा उजव्या हातावर पाण्याचे उदक सोडावे. त्यानंतर दोन चतकोर भाकरी किंवा पोळी घेऊन, त्यावर प्रत्येकी थोडा भात ठेवून, जे काही तोंडी लावणे केले असेल ते वाढावे. एका चतकोरावर वाढलेल्या अन्नावर मधल्या दोन बोटांनी पाणी घालावे व ते जेवण घराबाहेर नेऊन ठेवावे. यास जरी 'वास्तूनैवेद्य' म्हणून संबोधण्यात येते तरी तो वास्तूनैवेद्य नसून, आपण रहात असलेल्या वास्तूचा समावेश हा आपल्या घरातील देवदेवतांसमवेत असल्याने, देवाला जो नैवेद्य दाखविला, त्यामध्ये वास्तूचा समावेश झालेला असतोच. जो नैवेद्य बाहेर ठेवावयाचा असतो तो एवढ्यासाठीच की, आपल्या घराबाहेरील वातावरणात असंख्य असे आत्मे अन्नाच्या वासनेने तिष्ठत



असतात. त्यांना त्यांच्या वासनेतून मुक्त होण्यासाठी आपल्या या अल्पशा सेवेने जे सहाय्य होते, हा नकळत घडणारा परोपकार असतो. बऱ्याच कुटुंबात हे अन्न बाहेर नेऊन ठेवण्याचा संकोच त्यांना एवढ्यासाठी वाटतो की, शेजारी काय म्हणतील? या शेजाऱ्यांच्या शंकाकुशंकांना भिऊन ते अन्न आपण आपल्या खिडकीबाहेर किंवा गॅलरीत ठेवतो. पण आपण जे अन्नदान केले ते वास्तूच्या परिसरात ठेवून होत नाही. ते वास्तूबाहेरच ठेवले गेले पाहिजे.

दुसरा जो अन्नातील वाटा आपण काढला आहे, तो वाटा तसाच ठेवून, जेव्हां एखादा भिकारी भीक मागावयास येतो, त्याला तो द्यावा. पण चुकूनही त्याचा अनादर 'पुढे चालू लाग' असे म्हणून करु नये. त्याच्या कर्मपरत्वे आज त्याला ही जी परिस्थिती अन्न मागण्यासाठी दारोदार हिंडण्यास कारणीभूत झाली आहे ही जरी गोष्ट खरी, तरी आपणही त्याचपैकी एक भिकारी आहोत हे विसरता कामा नये. कारण तो दारोदारी जे कर्मपरत्वे करतो आहे त्याचप्रकारचे कृत्य आपण आपली कर्मे अनुकुल करून घेण्यासाठी देवापुढे बसून भीक मागून करीत असतो पण इतका तात्त्विक विचार आपल्याला कुणी सूचित केला नसल्याने, आपणास अन्नदानाचा जो परोपकार करावयाचा आहे, त्याचे पुण्य किंवा समाधान जोडावयाच्याऐवजी आपल्याच कष्टार्जित अन्नाचा शाप आपण घेण्यास कारणीभूत होतो. तो कशामुळे? तर भिकारी हा शब्द उच्चारल्यावर कधीही आपणास या शब्दाबद्दल आदर वाटत नाही. तेव्हां ह्या परिस्थितीने उभा राहीलेला मनुष्य माझ्याचप्रमाणे आहे हे आपण जाणून घेत नसल्याने, त्या भिकाऱ्यास आपण पानात टाकलेले जे अन्न

असते ते फेकून देता येत नाही, म्हणून त्यास आपण ते वाढतो. हे अन्न उष्टे आहे हे त्याला समजते. पण दुपारी बारा वाजता ज्या अन्नाची गरज आहे, ती भूक अनावर झाल्यानें तो त्या परीस्थितीशी बध्द झालेला आहे. हे अन्न तो बारा वाजताची आपली भूक शमविण्यासाठी खातो पण आपण जे अन्न वाढलेत ते उष्टे असल्याने, स्वाभाविक आपण दोषस पात्र होतो. दारोदारी येणाऱ्या व्यक्तींना 'भिकारी' म्हणण्याचा जो प्रघात आपण पाडला आहे तत्पूर्वी नोकरी, धंदा, व्यवसायासाठी तुम्हीसुध्दा दारोदारी फिरत असता. येथे जर तुमची संभावना 'भिकारी' म्हणून केली तर करीत असलेल्या नोकरीत आपले मन रमेल काय? यासाठी जे अन्न आपण सेवन करतो त्यात इतरांचा जो वाटा आहे, तो त्याला देत असतांना, आपणच तो घेत आहोत अशा स्वच्छ विचाराने तो दिलात तर जीवनात अन्न वस्त्राला कधीही कमतरता पडणार नाही.

**वास्तूपूजनः-** रोजच्या रोज स्नानादी विधी करून, सुवासिक साबण लावून, आपण आपले शरीर स्वच्छ व शुध्द करतो. त्याच प्रमाणे बुध्दी, मन, चित्त हेही शुध्द व्हावे म्हणून देवदेवतांची पूजाअर्चा करतो पण ज्या वास्तूत हे सर्व विधी होऊन, आपणास त्या वास्तूचा कृपाशिर्वाद म्हणजे '॥तथास्तु तथास्तु तथास्तु॥' असा मिळावयास पाहिजे, ती वास्तु आपण स्वच्छ ठेवणे आवश्यक आहे याचा कधी विचार केलात काय? रहात असलेल्या जागेत वर्षा दोन वर्षानी रंगरंगोटी करणे म्हणजे वास्तुशुध्दता नव्हे. रहात असलेल्या जागेत जो चार भिंतींचा निवारा असतो, त्या भिंती उन्हाळा पावसाळा व हिवाळा यापासून संरक्षण देण्यासाठी आहेत. पण वास्तूचे वास्तव्य हे



आपण ज्या घरात चालतो ती आपल्या पायाखालील जमिन व आपल्या डोक्यावर जे घराचे छत असते, तेथे तो वास्तू कृपाशिर्वादाचे छत्र म्हणून वावरत असतो. या छत्राची निगा कुटुंबात जी व्यक्ती पवित्र हेतूने व पूज्य बुध्दीने सांभाळते, त्या व्यक्तीला तो वास्तू या जगतात 'छत्रपती' म्हणून नावारुपास आणतो. यासाठी वास्तूची शुध्दता अशाप्रकारे ठेवावयास पाहिजे की, सकाळी उठल्यावर प्रथमतः सर्व केर काढावा. पूर्वीच्या काळी हा केर घरातील सुवासिनी काढत असत. पण आजकाल आपण आपली कामे पै पैसे देऊन, दुसऱ्याकडून त्याच्या कष्टाचा मोबदला देऊन जरी करीत असलो, तरी जीवन समृध्द व सुखी करण्याची जी गुरुकिल्ली अनादिकाली सूचित केली, त्याचा लाभ आपण घेऊ शकत नाही. घरातील सुवासिनीने घरातील केर काढावा, हे एवढ्याचसाठी सुचित केले आहे की, आपल्या कुटुंबातील व्यक्तींच्या जीवनातील अनावश्यक असे दोष जेव्हां परमेश्वर कृपाशिर्वादरूपी केरसुणीने काढतो तो केर काढण्यास त्याला कधीही कमीपणा वाटला नाही किंवा त्याने आपला कोणीही सेवक त्यासाठी नियुक्त केला नाही. मग आपल्या कुटुंबियांच्या हितार्थ जे सोपे मार्ग असतात, त्यांचा शास्त्रीयदृष्ट्या विचार न करुन, आपण अवघड अशा मार्गाने सुखप्राप्ती करण्याचा मार्ग का अवलंबिता?

घरातील केर सुवासिनीने काढण्याचा दुसरा हेतु असा आहे की, त्यांना दिवसभर घरातील कामामुळे शारिरीक संवर्धनार्थ व्यायाम करणे शक्य नसते व नित्य व्यायामाने शरीर निरोगी राहते, म्हणून सकाळी केर काढल्याने स्वाभाविकच स्त्रियांना व्यायाम होत असतो. पण त्याचाही लाभ सोप्या मार्गाने

न करुन घेता, शरीरात लठ्ठपणा आल्यावर, पोट मोठे झाल्यावर, वजन कमी करण्यासाठी जे मागाहून ‘औषधोपचार’ करण्याची आधुनिक फॅशन आहे, त्यास हे समर्पक उत्तर आहे. निदान सर्व घरातील केर काढणे जरी सुवासिनीला शक्य झाले नाही तरी निदान देवापुढील व स्वयंपाकघरातील केर सुवासिनीने काढावा.

आजकालच्या आधुनिक पध्दतीमुळे व नव्या वास्तूशास्त्रामुळे आपल्या घरातील दारांना उंबरा म्हणजे दाराची चौकट नसते. उंबरा हा चौकटीला असणे हे प्रतिक असे की, आपल्या घरात अनाहुतपणे प्रवेश करणारी जीवनातील जी दुष्कृत्ये व दुष्कर्मे आहेत, त्यांना घरात प्रवेश न होऊ देण्यासाठी ही लक्ष्मणरेषा आहे. यासाठी प्रत्येक सुवासिनीने स्नानानंतर देवापुढील जागा पुसून, त्यावर हळदकुंकवाचे स्वस्तिके काढावे व त्यानंतर आपल्या घरांत येण्याचे जे प्रवेशद्वार असेल ते ओल्या फडक्याने पुसून दाराच्या उजव्या डाव्या बाजूस दोन हळदी-कुंकूवाची स्वस्तिक काढावीत . त्या स्वस्तिकाच्या दोन्ही बाजूस दोन दोन उभ्या रेषा वरुन खाली काढाव्यात. याचा अर्थ ज्या घरात आपण राहतो त्या वास्तूत ऋध्दि-सिध्दी ही सदैव नांदावी म्हणजे विद्यासंपत्ती यांनी सुखाने आपल्याशी संसार करावा असा आहे.

समाजातील अनेक व्यक्तींचा असा समज आहे की, आपल्या ऐपतीप्रमाणे आपल्याला स्थावर म्हणजे राहण्यासाठी घर बांधण्याची ऐपत आल्यावर आपण घर बांधतो. गृह-प्रवेशापूर्वी वास्तू-शांत आदि विधी करुन आपण त्या वास्तूत रहावयास



जातो. पुढे याच वास्तूत दुखः अशांतता निर्माण झाल्यावर जेव्हा आपण मार्गदर्शनार्थ येतो, तेव्हा आपल्या राहत्या जागेची वास्तूशांत झालेली आहे काय? असा जो प्रश्न विचारला जातो तेव्हा आपले उत्तर असे असते की, ती केल्यावरच आम्ही गृहप्रवेश केला. पण एकदा वास्तूशांत केली म्हणजे त्या वास्तूचे मंगलकार्य हयातीपर्यंत अनुभविण्यास येईल असे नाही. कारण त्याची निगा राखण्यासाठी जे मंगल आचारविचार कुटुंबात असावयास पाहिजेत ते नसतात. ते म्हणजे आजकाल कोणीही स्त्रिया मासिक पाळीची बंधने स्वत:ही पाळीत नाहीत व त्यांच्याकडे येणाऱ्या अन्य स्त्रियाही पाळीत नाहीत. त्यामुळे साहजिकच वास्तूचे सामर्थ्य हळूहळू कमी होऊन, विद्या-संपत्ती कमी होऊ लागते. आजच्या परिस्थितीत जागेच्या अभावी घराची शुध्दता ठेवण्यास ही जी अडचण आहे, त्यासाठी सोप्यात सोपा मार्ग असा आहे की, घरात सदैव गोमुत्र ठेवावे. ज्या स्त्रियांना मासिक पाळीची बंधने पाळता आली नसतील, त्यांनी चौथ्या दिवशी डोक्यावरुन स्नान झाल्यावर एका भांड्यात पाणी घालावे व त्यांत हळदकुंकू घालून चार गोमुत्राचे थेंब घालावेत. हातात तुळशीपत्र घेऊन ते शुध्दोदक आपल्या राहत्या जागेत उजव्या हाताने सिंचन करीत सर्व घर सिंचन करून घ्यावे. ही क्रिया जी स्त्री मासिक पाळीच्या बंधनात होती तिनेच केली पाहिजे. कारण तिने मासिक पाळीची बंधने न पाळल्यामुळे घरात जो विटाळ निर्माण केलेला असतो, तो तिलाच दूर करता येतो. इतरांनी करुन तो दोष दूर होत नाही.

पूर्वीच्या काळी वास्तू शुध्दतेची दुसरी एक बाजू होती. पण ती आजच्या आधुनिक काळात शक्य नसल्याने, त्यासंबंधी काही

मार्गदर्शन करावे असे वाटत नाही. त्यांस 'सडासंमार्जन' म्हणत.

याशिवाय दर पौर्णिमेस व दर अमावास्येस घरातील कुटुंबप्रमुख व्यक्तींने आपल्या देवदेवतांची पूजा झाल्यावर, ज्या तबकातून देवाला ओवाळलेले असते, ते तबक घेऊन, त्या तबकात गंध, फूल, अक्षता, निरंजन आदि साहित्याने राहत्या जागेचे चार कोपरे पूजन करावेत. पूजनाचा विधी असा की, प्रत्येक कोपऱ्यात प्रथमत: तीन पळ्या पाणी घालावे. त्यावर अक्षता वाहून गंध, फूल वहावे व नंतर तबकातील निरांजनाने ओवाळावे. असे हे चार कोपरे, म्हणजे पूर्व व दक्षिण दिशेमधील जो कोपरा असेल तेथून आरंभ करून, पुन्हा उत्तर व पूर्व या दिशांमधील कोपऱ्यापर्यंत यावे. असे केले असता, या सोप्यात सोप्या निराकरणाने तुमच्या जीवनात रुढीपरत्वे असलेल्या बंधनातून तर तुमची सुटका श्रीगुरूंनी केलीच आहे, त्याशिवाय तुम्हाला सोप्यात सोप्या अशा मार्गदर्शनपद्धतीने तुमचे जीवन समृद्ध करण्याचा मार्ग सुचविला आहे. याचा लाभ म्हणजे काय हे अनुभवांती अनुभव घेऊनच अनुभवास येईल.

आजकाल शहरात गोमूत्र मिळणे कठीण असते. अशावेळी जरी गोमूत्र मिळाले नाहीं तरी त्याअभावी आपली वास्तू शुद्ध करता येणार नाही, असे समजू नये. वर सांगितल्या प्रमाणे शुद्धोदक म्हणजे फक्त पाणी, हळदकुंकू, गंध, फूल घालून ते तुळशीपत्राने जरी घरात सिंचन केले तरी शुद्धता होते.

वर निवेदन केलेली सोप्यात सोपी अशी वास्तूदेवतेच्या शुद्धतेबद्दलची जी निराकरण पद्धत आहे त्याशिवाय पूर्वीच्या शास्त्राने जी पद्धत सांगितली आहे ती अशी की, आपल्या राहत्या



वास्तूची वास्तूशांत दर बारा वर्षानंतर करावी. जेव्हा आपण नव्याने घर बांधतो तेव्हा जो विधी होतो, तो विधी 'वास्तूप्रतिष्ठा' म्हणून असतो, 'वास्तूशांत' म्हणून नाही. तेव्हा ज्या व्यक्ती गृहप्रवेशारंभी आपल्या इष्टमित्रांना, आप्त नातेवाइकांना 'वास्तूशांतीस या', असे आमंत्रण देतात ते चुकीचे बोलवणे न करता, 'वास्तूस्थापनेस या' किंवा 'वास्तूप्रतिष्ठा विधीस या', असे आमंत्रण द्यावे म्हणजे तुमच्या चुकीच्या आमंत्रणामुळे जो वास्तूस्थापनेस कमीपणा येतो, तो न येऊन 'वास्तूस्थापनेस या' असे म्हटल्याने, न कळत वास्तूदेवतेलाही आवाहन केले जाते.

'वास्तूशांत विधी' म्हणण्याचा जो प्रघात आहे, तो चुकीची आहे. घरात रहावयास आल्यावर पुढे काही कालाने जेव्हां विद्या, संपत्ती आदि सुखात कमतरता निर्माण होते, ते वास्तूचे सामर्थ्य आपल्या अशुद्ध आचारविचाराने जे कमी झालेले असते ते पुन:श्च त्याला प्राप्त करून देण्यासाठी 'वास्तूशांत विधी' आहे. असा विधी दर बारा वर्षांनी नाहीतर कुटुंबातील तिसरी पिढी सज्ञान होण्यापूर्वी करावयास पाहिजे. याचा अर्थ जर कोणास पहिली मुलगी झाली असेल तर तिचे अपत्य ही तिसरी पिढी धरली जात नाही. मुलाचे अपत्य हे तिसरी पिढी म्हणून धरतात. इतका हा खर्चिक वास्तूशांत विधी प्रत्येकाला करता येणे शक्य नाही; व केला तरी व्यतीत झालेल्या बारा वर्षाच्या कालाइतकी अशुद्धता तुम्ही बोलविलेल्या गुरुजनांना घालविण्याचे सामर्थ्य नाही. यासाठी दर पौर्णिमा व अमावस्या या दिवशी सकाळी वर सांगितल्याप्रमाणे घराचे चार कोपरे पूजन करण्याचा विधी करावा; म्हणजे तुमची वास्तू चिरकाल सामर्थ्यवान राहून, ती सदैव तुमच्या कल्याणार्थ "तथास्तु तथास्तु तथास्तु" "ॐ शांति:

शांतिः शांतिः” असे म्हणत राहील.

**लक्ष्मी-सरस्वती पूजन** :- कुटुंबात लक्ष्मी व विद्या चिरकाल टिकावी यासाठी दरवर्षी दिवाळीमध्ये येणाऱ्या धनत्रयोदशीला लक्ष्मीपूजन करावयास हवे. याचा अर्थ आपण असा घेतो की, आपण व्यवहारात ज्या माध्यमातून पै-पैशातून देवाणघेवाण करतो, ते पैसे म्हणजे लक्ष्मी. पण हे व्यावहारिक द्रव्य आहे. खरे द्रव्य म्हणजे लक्ष्मी हे सोने होय व सरस्वति म्हणजे चांदी होय. आपणास माहीत नसल्याने आपला लक्ष्मीपूजनाचा अर्थ व्यवहारातील नाणी व नोटा असा लावतो. यासाठी सवडीत सवड काढून निदान पाच ग्रॅम सोन्याची मुद्रा, ज्यावर एका बाजूस पृथ्वीतत्व व दुसऱ्या बाजूस स्वस्तिक असे सोनाराकडून काढून घ्यावे. दुसरी मुद्रा चांदीची, पाच किंवा दहा ग्रॅम घेऊन, त्यावरही पृथ्वीतत्व व स्वस्तिक काढून घ्यावे. आजपर्यंत तुमच्या अनुभवास असे आले आहे की, ज्या ठिकाणी लक्ष्मी नांदते तेथे सरस्वति म्हणजे विद्या नांदत नाही व जेथे सरस्वति नांदते तेथे लक्ष्मी नांदत नाही. वास्तविक ह्या दोघी सख्ख्या बहिणी असतांना याच्यात वेगळेपणा का असावा? तर त्याला आपणच कारण आहोत. म्हणजे जीवनारंभी गुरुजनांनी ‘श्री’ हा शब्द ज्ञान म्हणून आपणास शिकवला. ज्या ‘श्री’ शब्दाने आपण ह्या जगतात ज्ञानी व जाणते झालो, त्या ‘श्री’ म्हणजे ज्ञानमाध्यमामुळेच आपल्याला ‘श्री’ म्हणजे संपत्ती, या अवस्थेची प्राप्ती करण्याचे भाग्य पुढील काळात जे लाभले, त्या जीवनारंभीच्या ‘श्री’ म्हणजे ज्ञान प्राप्त झालेल्या अवस्थेची उतराई आपण आयुष्यात कदापिही करीत नाही. विद्यार्जन हे जरी प्राप्त करण्यासाठी आपण पै-पैशाची देवाणघेवाण करून



विश्वविद्यालयातून ते प्राप्त करते झालात, तरी ज्या गुरुजनांनी तुम्हास ज्ञानी केले, त्यांचे स्मरण आपण कधीही करत नाही. वास्तविक वर्षातील जो गुरुपौर्णिमेचा दिवस आपल्या ऐकण्यात येतो तो केवळ आध्यात्मिक मार्गातील गुरुंच्या कृपाशिर्वादाची उतराई आहे, असा जो आपला संकुचित विचार आहे तो चुकीचा आहे. ज्या कोणास जीवनात आध्यात्मिक अथवा पारमार्थिक मार्गाने मार्गदर्शन घेण्याचा लाभ झाला नसेल किंवा इच्छा झाली नसेल, त्यांनीही प्राप्त झालेल्या, ज्ञानैबद्दल. पदवीबद्दल, मानसन्मानाबद्दल उतराई होण्यासाठी निदान गुरुपौर्णिमेच्या दिवशी, ज्या गुरुजनांकडून विद्यासंपन्न होण्याचे भाग्य प्राप्त केले, अशा गुरुजनांचे पूज्य स्मरण करुन, आपल्या इष्टदेवतेसमोर यथाशक्ति काही गुरुदक्षिणा ठेवून ती ठेवलेली गुरुदक्षिणा एकतर ज्यांनी आपणास विद्याविद्यार्जन दिले, त्यांना नेऊन द्यावी अथवा समाजात ज्या कार्ही सामाजिक, धार्मिक, वैद्यकिय संस्था असतील त्यांच्याकडे ही गुरुदक्षिणा जमा करावी. अशाप्रकारे तुम्ही केलेल्या ह्या विधीमुळे, तुम्ही प्राप्त केलेल्या विद्येबद्दल उतराई होण्यचे कर्तव्य तुमच्या जीवनामध्ये सहजासहजी होऊन, प्राप्त झालेल्या जीवनात जी कांही ऐहिक समृध्दी आहे, त्यांतील अंशमात्र भाग म्हणून परोपकाराचाही लाभ नकळत तुम्हास प्राप्त होतो. अशा विधीमुळे तुम्ही प्राप्त जीवनात विद्या व संपत्ती म्हणजे ऋध्दिसिध्दी या दोन्हीचे उपासक झाल्याने, तुमच्या घराण्यात किंवा कुटुंबात, भवितव्यात विद्या व संपत्ती यांचा सुलभपणे यथोचित लाभ होतो.

वर सांगितल्याप्रमाणे सोने व चांदीच्या दोन मुद्रा पूजनार्थ धनत्रयोशीला आपण जर केल्या, तर ही प्रतिके भावीत

पिढीत तुमच्या मुलाबाळांच्या विद्या, संपत्तीला पूरक होऊन, तुमची भावी पिढी विद्यावान व धनवान होईल.

अशा प्रतिमा कुटुंबात लक्ष्मी-सरस्वति म्हणून पूजनासाठी कशा कराव्यात, याबद्दलचे तात्विक मार्गदर्शन केले आहे. लक्ष्मी म्हणून सोन्याची जी प्रतिमा आपण करुन घ्याल, त्या प्रतिमेवरील पृथ्वीतत्त्वात 'श्री' असे लिहून घ्यावे; व जी चांदीची प्रतिमा आहे ती जिला सरस्वति म्हणून संबोधले जाते, तिच्यावरील पृथ्वीतत्त्वात 'ॐ' हे अक्षर लिहून घ्यावे. याचा शास्त्रीय व तात्त्विक उद्देश असा आहे की, लक्ष्मीसमवेत सरस्वति व सरस्वतिसमवेत लक्ष्मी अशी ही दोन वेगवेगळी तत्त्वे एकमेकाशी एकरुप व्हावीत. अशा प्रतिमा बाजारातून करुन आणल्यावर त्या प्रथमत: शुध्द करुन घ्याव्यात. त्या अशा की पाण्यात हळदकुंकू, गोमूत्र घालून त्याने त्या धुवून घ्याव्यात. त्या प्रतिमा देवात ठेवण्यापूर्वी त्यावर गुरुजनांकडून श्रीसुक्ताचा अभिषेक करवून घ्यावा. ते शक्य न झाल्यास आपण स्वत: पूजनादि साहित्याने पंचामृताने पूजन करावे. 'पंचामृत' म्हणजे एकां वाटीत गरजेपुरते दूध, दहि, तूप, शुद्ध मध व साखर घ्यावे. त्यापैकी तूप हे नाममात्र घालावे. कारण पंचामृत पूजन झाल्यानंतर तूपाचा ओशटपणा त्या प्रतिमांवर राहतो. त्यानंतर त्या प्रतिमा पूजनार्थ देवापुढे ठेवून, मागे सांगितल्याने पूजनादि विधी करावा. ह्या प्रतिमा नित्याच्या पूजनामध्ये ठेवल्यानंतर, केवळ रूढीपरंपरेचे अनुकरण म्हणून दिवाळीच्यावेळी धनत्रयोदशीस जी पूजा आपण वर्षातून एकदा करतो व वर्षभर धन प्राप्तीची याचना करतो, यापेक्षा रोजच ह्या देवतांची गरज नित्याची असल्याने, त्यांच्या पूजनाचा सुखसोहळा जो वर्षातून आपण एकदा करतो, तो



रोजच्यारोज करण्याने विद्या व संपत्ती संतुष्ट होऊन तुम्हाला कृपाशिर्वाद देत असतात.

आजपर्यंत अनेकवेळेला आपण भक्तांकडून असे विचारण्यात आले की, 'आम्ही आमच्या देवदेवतांप्रित्यर्थ आमच्या यथाशक्ती व यथाज्ञानाने जर कुलधर्म करतो, तर केलेल्या कुलधर्माचा कृपाशिर्वाद आम्हाला मिळून आमचे जीवन समृद्ध का होत नाही?' तर याचे उत्तर असे की, कुलधर्म हा जीवनात पंचवीस टक्केच मनोभावनेने करावयाचा असून, पंचाहत्तर टक्के कुलाचार म्हणून जो आहे, तो केला पाहिजे. आजपर्यंत आपण भक्तांना एवढेच ज्ञान दिले आहे की, कुलधर्म व कुलाचार म्हणजे एकच विधी आहे. परंतु कुलधर्म हा जो विधी आहे तो घराण्याच्या परंपरेतील देवदेवतांसाठी असून, ह्या देवदेवताच्या कृपाशिर्वादाला कुटुंबातील सर्व व्यक्ती पात्र व्हाव्यात ह्यासाठी जो कुलाचार म्हणून सांगितला आहे, तो देवतांसाठी नसून कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीसाठी आहे. हे आपल्या अध्ययनात आजपर्यंत न आल्याने, कुलधर्माचे फल का मिळत नाही? असा प्रश्न आपण गुरुमार्गात विचारणा म्हणून करतो.

आता जीवनात संपत्ती - विद्या - सुख - शांति यांचा अभाव आज आपल्याला सर्वत्र पहावयास मिळतो आहे. याला कारण म्हणजे आपण आज जीवनात अनावश्यक अशा अनेक देवदेवतांचे उपासक झालेले आहोत. हे जीवन सुख, शांति, समाधानात व्यतीत करण्यासाठी इतक्या देवदेवतांची गरज अत्यावश्यक आहे काय? जर तुम्ही आपल्या सभोवार असणाऱ्या प्रत्येक स्त्री- पुरुषास आई- वडिल म्हणून संबोधू लागलात, तर

फक्त जन्मदाते आई व वडील हेच तुमच्या निर्माण झालेल्या दु:खात सहभागी होत असतात. ज्या इतरांना तुम्ही आई-वडील म्हणून संबोधता, ते फक्त तुमच्या सुखात सहभागी होतात. यासाठी आपले इष्ट कर्तव्य असे की, आपल्याला जे मागावयाचे आहे, ते निष्ठापूर्वक आपल्या देवदेवतांकडे मागावे.

कुटुंबात विद्या संपत्ती यांची समृद्धि व्हावी अशी प्रत्येकाची स्वाभाविक इच्छा असते. त्याप्रमाणे आपणास त्याची प्राप्तीसुद्धा होत असते. पण प्राप्त झालेली समृद्धि अधिक समृद्धित करण्याचे कर्तव्य तुमच्या कुलाचारावर अवलंबून आहे. ते असे की, तुमच्या घरात ज्या सुवासिनी, कुमारिका असतात त्यांच्या पूर्वपुण्याईने तुमच्या घरात विद्या, संपत्ती नकळत आलेली असते. ही समृद्धि तुमच्या कुटुंबातून घराबाहेर जाता कामा नये याची काळजी तुम्ही घ्यावयास पाहिजे. घरातील सुवासिनी, काहीं कारणपरत्वे जेव्हां घराबाहेर जात असतात तेव्हा घराबाहेर पडण्याची जबाबदारी आपल्यावर काय आहे याचा आपण कधीच विचार केला नाही. जी समृद्धि तुमच्या पूर्वपुण्याईने आली आहे ती कुटुंबात सदैव जतन करण्यासाठी या सुवासिनींनी कदापिही दुर्लक्ष करून आपल्या पुण्याईने कुटुंबात प्राप्त झालेली समृद्धि घराबाहेर नेऊ नये. याचे उदाहरण म्हणजे बाहेर जाताना आपण आपल्या गरजेइतकेच पैसै बरोबर नेतो व जे अधिक असतील त्यांना कपाटात कुलुप-किल्ली लावून ठेवून देतो. त्याप्रमाणे तुमच्या पुण्याईने कुटुंबात आलेली समृद्धि घराबाहेर जाऊ नये, हे घरातील प्रत्येक सुवासिनीचे कर्तव्य आहे. ते असे की बाहेर जाण्यापूर्वी आपण सुशोभित वस्त्रे धारण करुन बाहेर पडता त्यावेळी समृद्धि ही



घरात जतन होऊन रहावी यासाठी तुम्हाला कोणत्याही निमित्ताने घराबाहेर जावयाचे असेल, त्यांवेळी देवास हळदकुंकू वाहून देवास असे सांगा की, "मी बाहेर जाऊन येते. " अशावेळी देव तुमच्याजवळील समृद्धि स्व:जवळ ठेवून तुम्हाला जाण्यास निरोप देईल. बाहेरुन परत आल्यावर तुम्ही हात पाय धुवून देवाला नमस्कार कराल, तेव्हा तुमच्या देहाशीं एकरूप करेल. अशा करण्यात काहीं पै पैसा किंवा अधिक काहीं वेळ तुम्हाला खर्च करायला लागत नाही. पण अशा करण्याने जीवनातील अमूल्य असा ठेवा, जो वारंवार पूजाअर्चा करुनसुद्धा तुम्हाला प्राप्त होणार नाही, तो निष्ठेने जतन करणे हे तुमचे कर्तव्य आहे.

हा उपाय प्रसंगपरत्वे तुमच्या बाहेर जाण्यायेण्यासाठी शास्त्रानें सूचित केला आहे. पण ज्यावेळी तुम्हाला राहत्या वास्तूपासून किंवा राहत असलेल्या गावाच्या सीमेपासून तीन दिवसापेक्षा अधिक काळ रहावयास जायचे आहे, त्यासाठी उपाय असा की, आपण गावाला जाण्यासाठी निघण्यापूर्वी अक्षता एका वाटीत ठेवाव्यात व त्यावर एक सुपारी ठेवून हळदकुंकू वहावे. देवास एवढीच प्रार्थना करावी की, "मी येते" मगच जाण्यास निरोप घ्यावा. असे केल्यानंतर जरी तुम्ही महिना दोन महिने बाहेर राहिलात तरी तुमच्या जन्माला येण्याबरोबर जी समृद्धि तुमच्या कुटुंबात आली आहे, तिचा सांभाळ देवदेवता करुन, पुन्हा तुम्ही घरी आल्यानंतर ही समृद्धि ह्या देवदेवता तुमच्याशी एकरुप करीत असतात. इतका व्यापक व विशाल अर्थ कुलधर्म व कुलाचाराचा आहे. केवळ शाब्दिक उच्चार म्हणजे कुलधर्म कुलाचार नव्हे.

कुलाचार विधीत प्रामुख्याने कर्तव्याचा जो ठेवा आहे, तो घरातील सुवासिनींच्यावर अवलंबून आहे. पुरुषांनी कुटुंबपोषणार्थ कष्टाने धनप्राप्ती करावयाचे कर्तव्य घराबाहेर केल्यानंतर, घरात आणलेली लक्ष्मी हिचे सुख व समृद्धि ही घरातील सुवासिनीच्या आचारविचारांवर अवलंबून आहे. यासंबंधी वर निवेदनात महत्वाच्या आचरणासंबंधी सुवासिनींना यथोचित मार्गदर्शन केलेच आहे. या शिवाय आणखी एक महत्वाची गोष्ट, जिचा खुलासा आपणास करून द्यावा लागत आहे. घरातील सुवासिनीने रात्री जेवण झाल्यानंतर झोपावयास जाण्यापूर्वी, हातपाय धुवून चूळ भरून टाकावी व देवास हळदकुंकू वाहून, नमस्कार करून, झोपावयास जावे. याचे कारण स्त्रीला चोवीस तासात जीवनातील दोन इष्टकर्तव्यांची पूर्तता करावयाची असते. सकाळी उठल्यापासून रात्री झोपण्यापर्यंत प्रापंचिक कर्तव्यार्थ तिचा वेळ खर्च होत असतो. रात्री तिला वैवाहिक जीवनातील कर्तव्ये अंगीकारायची असतात. अशावेळी पति-पत्नीसमवेत त्या कुटुंबकल्याणार्थ असलेली समृद्धि म्हणजे ऋद्धिसिद्धि, जी ह्या सुवासिनींच्या ठायी वास करीत असते, ती ह्या काळात तिच्याजवळ असणे गैर आहे. यासाठी सोप्यात सोपे मार्गदर्शन असे आहे की, रात्री झोपण्यापूर्वी देवाला हळदकुंकू वाहून तिने झोपावयास जावे, म्हणजे त्या ऋद्धिसिद्धि देवाजवळ वास करीत रहातात. सकाळी उठल्यावर प्रातर्विधीनंतर ती जेव्हा देवाला नमस्कार करते, तेव्हा त्या ऋद्धिसिद्धि पुनः त्या सुवासिनीच्या ठायी एकरुप होऊन, सकाळी उठल्यापासून रात्री झोपण्यापर्यंतचे जे प्रापंचिक कर्तव्य आहे ते समृद्धपणे करण्यास त्या हितकारक होतात.



आतां जी तुमची मुले-मुली सज्ञान होण्याच्या अवस्थेत आहेत, अशांचे शालेय व विश्वविद्यालयीन शिक्षण चालू आहे, त्यांना ह्या शिक्षणाचा लाभ जरी बुद्धि माध्यमातून घ्यावयाचा आहे, तरी ते शालेय व विश्वविद्यालयीन शिक्षण घेण्यास त्यांच्या बुद्धीची धारणा ही क्रियाशील असेलच असे नाही. पण अशा अवस्थेतील मुलामुलींची तरतूद करण्यास, परमेश्वराचा किंवा देवदेवतांचा कदापिही जरी नकार नसतो, तरी आपणच जर देवाचे अस्तित्त्व मानून त्याला शरण जाण्यास कमीपणा मानला आहे, तर मुलांना तरी देवाशिवाय आपले जीवन व्यर्थ आहे हे कसे कळणार? यासाठीं जी मुलेमुली विद्याविद्यार्जनासाठी घराबाहेर जातात, त्यांनी घरातून बाहेर पडण्यापूर्वी आपला देवदेवतांना अभिवंदन करून, त्यांचा निरोप घेऊन, शालेय किंवा विश्वविद्यालयीन शिक्षणास जावे. अशाने मुलामुलींना असा लाभ होतो की, त्यांची बुद्धि व धारणाशक्ति ही जरी विद्याविद्यार्जन करण्यास कमी पडत असली, तरी आपल्या इष्ट देवदेवतांच्या घेतलेल्या निरोपामुळे ती शक्ति त्यांच्या विद्याविद्यार्जनाची धारणाक्रिया करण्यास स्वाभाविक मदत करीत असते. इतके साधे व सोपे उपचार जीवन समृद्ध करण्यासाठी, परमेश्वराने जे शास्त्र म्हणून निर्माण केले आहेत, त्यांची अवहेलना करणे यासारखे दुसरे पाप नसून, ह्या जाणूनबुजून केल्या गेलेल्या पापाला धर्मात किंवा शास्त्रात प्रायश्चित्त नाही.

कुटुंबातील ज्या प्रौढ व्यक्ती नोकरीधंदा करून कष्टार्जित धन-प्राप्तीसाठी घराबाहेर जात असतात, ही धनप्राप्ती केवळ कष्ट करीत आहोत म्हणून आपल्याला प्राप्त होत नाही. त्यासाठी पूर्वी आपण जे विद्याविद्यार्जन केलेले असते, ते

विद्याविद्यार्जन ह्या कष्टार्जित धनप्राप्तीसाठी खर्ची पडत असते. अशी प्राप्त केलेली विद्या ही धनप्राप्तीसाठी जेव्हा आपण नोकरी, व्यवसाय आदि ठिकाणी घेऊन जाता, त्यातील काहीं वाटा पुढील भावी पिढ्यांच्या हितार्थ कुटुंबात जतन करणे हे तुमचे कर्तव्य आहे. तुम्ही नोकरी व्यवसाय आदींसाठी बाहेर पडता, तेव्हां वरीलप्रमाणे देवदेवतांना नमस्कार करून घराबाहेर जावे. पण जे महत्प्रयत्नाने विद्यार्जन केले आहे त्यातील जरूरीइतकाच ठेवा जो नोकरी, व्यवसायाला आवश्यक आहे तेवढाच आपल्याबरोबर तेथे घेऊन जा व बाकीचा ठेवा देवापुढे एवढ्यांचसाठी शिल्लक ठेवा, की तुमच्या मुलामुलींनाही तुमच्याप्रमाणें विद्यावान व्हावयाचे आहे. तेव्हा हा बहुमोल वाटा जसा आपल्याला भाग्य म्हणून लाभला आहे तसा आपल्या मुलामुलीनांही त्याचा लाभ व्हावा यासाठी तो देवाजवळ सतत जतन करून ठेवला पाहिजे. तुम्ही प्राप्त केलेली विद्या ही संपत्तीच आहे. चरितार्थासाठी जो पै-पैसा आपणास मिळवावयाचा आहे, त्यासाठीं प्राप्त केलेले संपूर्ण विद्याविद्यार्जन एवढ्याची आवश्यकता नाही. पण घराबाहेर पडण्यापूर्वी तुम्ही देवाचा निरोप न घेतल्यामुळे, तुमचे पाऊल घराबाहेर पडताच ती विद्यासंपत्ती ही तुमच्याबरोबर येण्याने वातावरणातील दूषित वलये त्या तुमच्या विद्या-संपत्तीला स्वतःच्या ठिकाणी धारण करून, स्वतःचा विकास करण्यासाठी त्यांचा वापर करतात.

स्त्रियांनी परगावी जाताना देवापुढे वाटीमध्ये अक्षता व सुपारी ठेवण्याची पध्दत सांगितली आहे, त्याचप्रमाणे कुटुंबातील पुरूष व्यक्तींनी परगावी जाताना आपल्या घरातील देवापुढे एक श्रीफल ठेवून, त्यास हळदकुंकू लावून, देवास नमस्कार करावा.



अशा विधीस पूर्वी शुभाशुभ दिवसाचा विचार करून 'प्रस्थान ठेवणे' असे म्हणण्याचा प्रघात होता.

वर्षाकांठी आपण आपली हौस म्हणून बराचसा पैसा कपडालत्ता खरीदण्यासाठी खर्च करतो. त्यामध्ये आपल्या घरातील देवदेवतांचाही समावेश करणे अगत्याचे आहे हे निराकरणात सूचित केल्याशिवाय स्वाभाविक तसे करण्याची इच्छा कोणास होत नाही. दरवर्षी घरातील सुवासिनीने आपल्या कुलदेवीच्या निदान पाच ओट्या तरी भरावयास पाहिजेत. त्या ओट्या भरण्याचा क्रम असा की,

**पहिली ओटी** :- चैत्र प्रतिपदेस.

**दुसरी ओटी** :- श्रावणात शुध्द पक्षातील मंगळवारी किंवा शुक्रवारी.

**तिसरी ओटी** :- आश्विनात शुध्द पक्षातील मंगळवारी किंवा शुक्रवारी.

**चौथी ओटी** :- दिवाळी प्रतिपदेस.

**पाचवी ओटी** :- पौषांत शुध्द पक्षातील मंगळवारी किंवा शुक्रवारी.

वरीलप्रमाणे या सर्व ओट्या भरताना सुवासिनीने त्या दिवशी डोकीवरून स्नान करून, आपल्या यथाशक्ति गोड नैवेद्य दाखवून, ओटी भरावी व सायंकाळी ती ओटी स्थानिक देवीच्या देवळात नेवून ठेवावी. ओटी भरण्यासंबंधीचे मार्गदर्शन

कुलधर्मासंबंधीच्या विवेचनात यापूर्वी केलेलेच आहे.

वर्षातून या पाच ओट्या भराव्यात असे जे सूचित करण्यात आले आहे, त्यामागील महत्त्वाचा हेतू असा की, समाजातील काहीं रूढीपरंपरेप्रमाणे काहीं ठिकाणी व काहीं घरी चैत्रात हळदीकुंकू करण्याचा समारंभ करीत असतात. यामागे हेतू असा होता की, त्यानिमित्ताने आपल्याकडे सुवासिनींचे येणे होऊन, आपल्या गांठीभेटी व्हाव्यात. पण आज या समारंभास कोणीही शुध्द आचारविचाराने उपस्थित रहात नसल्याने, तो आटोपशीर करणे, म्हणजे पाडव्याला आपल्या कुलस्वामीनीची ओटी भरून ती स्थानिक देवीच्या देवळात नेऊन देणे, हेच अधिक महत्त्वाचे आहे.

श्रावणात अधिक व्रते व अधिक देवदर्शनाला जाण्याचा जो प्रघात आहे, तो रुढीपरंपरेप्रमाणे असून, हा महिना चातुर्मासातील एक महिना आहे. त्यावेळी गावातील इष्टदेवतास जाण्याचा जरी नियम केला व जरी आपण दर्शनास गेलो, तरी त्याठिकाणी दर्शनार्थ पाच मिनीटे उभे राहण्याइतकी शांतता असत नाही. कारण वर्षातून याच महिन्यात अधिक पुण्यसंचय होतो असा काल्पनिक भाव असल्याने, नेहमीपेक्षा दर्शनार्थ येणाऱ्या व्यक्ती अधिक असतात. त्याचप्रमाणे दर्शनार्थ आपण देवापुढे उभे राहिल्यावर, देवाची हाक ऐकू येण्याऐवजी, मागून अन्य भक्तांची हांक अशी ऐकू येते की, "लवकर आवरा हो!" तेव्हा हे देवदर्शन इतक्या झटपट घेऊन, या श्रावण महिन्याचे माहात्म्य तुम्ही मिळवू शकता काय? यापेक्षा मनोभावे आपल्याच कुलदेवतांची उपासना घरच्या घरी करून, या महिन्याचे



माहात्म्य आपण घरीच मिळवावे.

आश्विन महिन्यांत दहा दिवस नवरात्र करण्याचा जो प्रघात आहे, तो प्रत्येकजण सोय-गैरसोय ही विचारात घेऊन, त्या देवीच्या नवरात्राचे दहा दिवस कसेतरी आटोपून घेत असतो. ज्या घरांत किंवा कुटुंबात नित्याने कुलदेवदेवतांची आराधना, पूजाअर्चा, विधीने होत असेल, त्यांनी वास्तविक नवरात्राचा उत्सव विशेष महत्त्वाचा म्हणून करण्याचे काहींच कारण नाही. पण ज्यांना वर्षभर आपल्या देवदेवतांच्याप्रित्यर्थ काहीच सेवा-आराधना करता येत नाही, त्यांच्यासाठी हा नवरात्रविधी सूचित केला आहे. ज्यांना ज्याप्रमाणे शक्य असेल त्याप्रमाणे त्यांनी नवरात्र करावे; किंवा आश्विनातील मंगळवारी किंवा शुक्रवारी आपल्या घरी देवीसमोर ओटी काढून ती स्थानिक देवीच्या देवळांत नेऊन पोहोंचवावी.

पौष महिन्यातही चैत्राप्रमाणे हळदिकुंकू समारंभास सुवासिनींना बोलवण्याची प्रथा आहे. या प्रथेप्रमाणे या हळदिकुंकू समारंभास महत्त्व असे आहे की, आलेल्या सुवासिनींना सौभाग्यवाण म्हणजे हळद, कुंकू यांच्या दोन पुड्या व एक साखरेची पुडी भेट द्यावयाची असते. त्याऐवजी अनेक प्लास्टिकच्या वस्तू, की ज्या भेट म्हणून दिल्यावर त्याचा काहींही उपयोग होत नाहीं, अशी जी देवाणघेवाण होते, त्याला भेट म्हणता येईल काय? यापेक्षा हा समारंभ न करता, वर सूचित केल्याप्रमाणे कुलदेवीची ओटी भरणे हेच अधिक हिताचे आहे. वास्तविक जीवनाला योग्य वळण व योग्य संस्कार यांची जोड प्राप्त व्हावी, म्हणून पूर्वीच्या काळात सोप्यात सोपे पण हिताचे

असे जे विधी सांगितले, त्याकडे अधिकाधिक दुर्लक्ष करून, अवघड अशा मार्गाचा अवलंब करून, अशी रूढी समाजात आपण रूढ केली आहे. त्यामुळे सर्वांना कर्तव्य म्हणून ज्या गोष्टी करावयाच्या असतात त्याला आज सर्वजण पारखे झाले आहेत.

**आहारमीमांसा** :- यापुढील महत्त्वाचा कुलाचार म्हणजे आपण नित्याने शरीरसंवर्धनार्थ जे अन्न सेवन करतो, की ज्याला आपण आपला 'आहार' म्हणतो, त्याबाबतसुद्धां यथायोग्य दक्षता घेणे आवश्यक आहे. अन्नाच्या पाकसिद्धिंची पवित्रता कशी ठेवावी हे वर सांगितलेच आहे. त्याचप्रमाणे जे अन्न आपण सेवन करतो, त्या अन्नाने केवळ शरीराचे पोषण करून त्याचे संवर्धन करावयाचे आहे असे नाही. अन्न हे सेवनार्थ आहे हे जरी खरे, तरी शुद्ध अन्नाची गरज प्रत्येक मनुष्याच्या देहिक व आत्मिक विकासाला पोषक असावयास पाहिजे. आहार म्हणजे अन्न हे दोन प्रकाराने सेवनामध्ये येत असते. एक म्हणजे शाकाहारी व दुसरे म्हणजे मांसाहारी. शाकाहारी अन्न हे स्वाभाविकच शुद्ध व पवित्र असे आहे. आपला देह हा पंचभौतिक तत्त्वांनी म्हणजे पृथ्वी, आप, तेज, वायु, आकाश इत्यादि घटकांनी निर्माण झाला आहे. दिवसाकांठी आपण जे काबाडकष्ट करतो, ती शक्ति ह्या पंचतत्त्वांच्या एकरूपत्त्वानें निर्माण झालेली असते. काबाडकष्टामुळें जेव्हां ही शक्ति खर्ची पडते, तेव्हां साहजिकच ह्या पंचतत्त्वांत कमीअधिकपणा निर्माण होतो. असा निर्माण झालेला कमीअधिकपणा आपल्याला जरी जाणवत नसला, तरी ती उणीव भरून काढण्याला योग्य असा आहार म्हणजे शाकाहार होय. कारण शाकाहाराची उत्पत्ती नैसर्गिक अवस्थेतून होत



असल्याने, त्या शाकाहाराच्या ठिकाणी पूर्णतः पांचही तत्त्वे असतात. असे शाकाहारी अन्न सेवन करण्याने, तुमच्या देहिक पंचतत्त्वांत जो काहीं कमीअधिकपणा निर्माण झाला असेल, त्याची भरपाई हे शाकाहारी अन्न यथायोग्यपणे करण्यास कारणीभूत होते. पण मांसाहारी आहारात ज्या प्राण्यांचे मांस आपण सेवन करता, तो प्राणी जरी पंचतत्त्वात्मक असला, तरी त्या प्राण्यांचे मांस आपणांस त्याची हत्या केल्याशिवाय खाता येत नाही. हत्या केल्यानंतर जे मांस अन्न म्हणून तुम्ही सेवनार्थ आणता, त्यामध्ये फक्त पृथ्वी व आप एवढेच तत्त्व शिल्लक राहिलेलें असते. कारण हत्येनंतर तेज म्हणजे त्याचा आत्मा व वायु, आकाश तत्त्व म्हणजे हत्येपूर्वी ह्या प्राण्यास चलनवलन करण्यास लागणारी दोन तत्त्वे, ही वातावरणात विलीन ही वातावरणात विलीन होतात. शेवटी मांसाहारी अन्न म्हणून ज्याला म्हणतात ते अन्न फक्त पृथ्वी व आप अशा दोन तत्त्वांनी युक्त असते.

प्रत्येक मानवाचा जन्म हा पंचतत्त्वात्मक असून, प्राप्त जन्माचा विकास व उद्धार याच जन्मात अतिप्रयत्नाने करावयाचे कर्तव्य असल्याने, ही देहधारणेसाठी जी पंचतत्त्वे आहेत ती परमेश्वराने यथायोग्य प्रमाणात देऊन, सुलभ अशा पद्धतीने आपला जीवन उद्धार व्हावा, ही योजना केलेली आहे. असे असतांना, मांसाहाराने जरी आपण देहाने धष्टपुष्ट म्हणजे अधिक प्रमाणामध्ये आपले पृथ्वी व आप वाढविण्याने देहिक सुदृढता प्राप्त करतो, तितक्यांच प्रमाणांत आपली आत्मिक सुदृढता कमी होत असते, हे कोणाही सूज्ञाच्या लक्षांत येत नाही. यासाठी मांसाहार करणाऱ्या व्यक्तींनी तो सोडून द्यावा असा अर्थ

नाही, तर त्याचे सेवन मर्यादित असावे. याचे साहजिक प्रमाण कसे असावे? असा जर प्रश्न विचारलात, तर मांसाहार हा आठवड्य–ातून एकदाच घेणे तुमच्या हिताचे आहे.

अनेकवेळा शाकाहार करणाऱ्या व्यक्ती, 'मांसाहार करण्यानें काय पाप लागते? ' असे विचारतात. वास्तविक दोन्ही अन्ने सेवन केल्यानंतर त्यांचे पचन करणे हा जरी देहाचा धर्म असला, तरी सेवन केलेल्या अन्नाच्या पचनक्रियेनंतर, जो अन्नरस अन्नपरत्त्वे निर्माण झालेला आहे, असा अन्नरस ज्या ज्या माध्यमांना पोषक असेल, त्याच माध्यमांकडे तो पाठविण्याचे कार्य हा देह करीत असतो. याचे स्पष्ट उदाहरण म्हणजे शाकाहार हा पचनानंतर ज्यावेळी अन्नरसात रुपांतर होतो व त्याचे रक्तामध्ये रुपांतर होऊन, त्याचे रक्ताभिसरण होते; त्यावेळी शाकाहारी अन्नातून निर्माण झालेला अन्नरस, बुद्धि व मनाला सारख्याच प्रमाणात पुरवठा करतो. पण मांसाहारी अन्न सेवन केल्यानंतर, पचनक्रियेपरत्त्वे त्याचा अन्नरस निर्माण होत असला, तरी तो रस फक्त बुद्धिमाध्यमाकडे प्रवाहित होतो. अशी स्वाभाविक रचना मनुष्याच्या ठिकाणी निर्माण केली गेलेली आहे. आज शाकाहारी माणसे मांसाहार करतात त्यांच्याबद्दल काहीं गैर असे लिहावयाचे नसून, त्यांना ह्या मार्गदर्शनपद्धतीत असे सूचित करावयाचे आहे की, या निसर्गात मनुष्य-प्राण्याशिवाय कोणीही आपला आहाराचा धर्म बदललेला नाही. उदाहरणार्थ चतुष्पाद प्राण्यात वाघ हा मांसाहारी आहे. त्याने गाय गवत खाते म्हणून कधी गवत खाल्ले नाही. एवढेच नव्हे तर पक्षीसुद्धा आपल्या जन्मपरत्त्वे आपला आहार निश्चित ठेवतात; म्हणून उत्क्रांतवादाप्रमाणे त्यांची उत्क्रांती स्वाभाविक व नैसर्गिक होत



असते. पण मनुष्यजन्म हा 'नराचा नारायण' म्हणून होण्यासाठी आपण घेतला आहे, ही जाणीव होऊनसुद्धां, केवळ अन्नसेवनार्थ ज्या आपल्या देहिक वासना आहेत, त्यांच्या आहारी जाऊन आपण नराचे नारायण होण्याऐवजी 'नरपशू' म्हणून या जन्माचा उपभोग घेत आहेत. पक्षी म्हणून जी एक योनी चौऱ्यांशी लक्ष योनींपैकी आहे, ही सकाळपासून सायंकाळपर्यंत मुक्त स्वातंत्र्याने, स्वच्छंद आनंदाने, आपल्या जीवनाचा कार्यकारणभाव व्यतीत करीत असते. असे पक्षी निसर्गाने नेमून दिलेल्या आहाराव्यतिरिक्त आहार करतात काय? उदाहरणार्थ पोपट हा पिकलेल्या फळांच्याच शोधात असतो व तीच फळे सेवन करतो. चुकूनही मांसाहार सेवन करीत नाही. पण कावळा हा पक्षी 'सर्वभक्षंतु' असल्याने त्याला शाकाहार व मांसाहार याचा विधीनिषेध नाहीं म्हणूनच मनुष्य दिवंगत झाल्यावर, त्याच्या इच्छावासना शिल्लक राहिल्या आहेत किंवा नाहीत हे त्याच्या आप्तांना कळण्यासाठी, पिंडदान झाल्यावर या कावळ्याची आतुरतेने वाट पाहतात.

वरील आहारासंबंधीची शास्त्रीय मीमांसा वाचनात आल्यावर, शाकाहार श्रेष्ठ की मांसाहार श्रेष्ठ? हे प्रत्येकाने आपापल्या परीनें ठरवावे. याचा निर्णय हा साधुसंतांकडे वा धर्मनिर्णय मंडळाकडे जाऊन न विचारता, एवढेच लक्षांत घ्यावे की, आपल्या पोषणार्थ काय योग्य-अयोग्य आहे, की जे अन्न-सेवन केल्यावर आपल्याला प्राप्त होईल.

आहारशास्त्राप्रमाणें शुद्ध आहारासंबंधी वर निवेदन केलेले आहे. पण आपल्या खाण्यापिण्यामध्यें ज्या काहीं खाद्यपदार्थ

सेवनाची कमी अधिक तीव्रता असते याचे कारण तो खाद्यपदार्थ आपल्याला अधिक प्रिय असतो, म्हणून आपण सेवन करतो, एवढाच मर्यादित अर्थ ह्या खाण्यासंबंधी आपण विचारात घेतो. कुटुंबात जर तीन किंवा पांच माणसे असतील, तर प्रत्येकाच्या आवडी-निवडी ह्या भिन्न असतात. ज्याला जो खाद्यपदार्थ अधिक आवडतो तो दुसऱ्याला बिलकुल आवडत नाहीं. असे असण्याची जी कारणे आहारमीमांसेमध्ये सांगितली आहे, त्याचा तात्विक विचार केल्यावर, आपल्या पुढील पिढ्यांना सुलभ व सुखकर असे जीवन आपण प्राप्त करून देण्याचे कर्तव्य करणार आहात. त्यासाठी ही जी दुसरी आहारमीमांसा आहे, तिला 'कुलोपासना' असे म्हटले आहे. कुलोपासना म्हटल्यावर आपण भक्तांची कल्पना अशी होते की, ही उपासना देवाप्रित्यर्थ आहे. पण तसे नाही. 'कुलधर्म' हा देवदेवतांप्रित्यर्थ आहे. 'कुलाचार'हा कुटुंबातील व्यक्तींच्या आचारविचारांची शुद्धता करून, केलेल्या कुलधर्माचा कृपाशिर्वाद प्राप्त करण्याचे माध्यम आहे. पण 'कुलोपासना' म्हणजे ज्या ज्या घराण्यांत किंवा कुटुंबात आपण जन्माला येतो, त्या घराण्यात जन्माला येणाऱ्या पुढील भावी पिढ्या यांच्या जीवनधारणेचा हितसंबंध हा आपल्या रक्ताशीं आहे. आज आपल्याला प्राप्त होणारे सुख, शांति, संपत्ती, संतती, दीर्घायुष्य हे भावी पिढ्यातही अशाच प्रकारे सुखासमाधानाने मिळावे यासाठी ही आहारमीमांसा त्याचा मूलभूत पाया आहे. आपण आपले जीवन व्यतीत करीत असतांना जीवनकार्य ज्या देहमाध्यमातून चालू असते, ते कार्य जन्मजन्मांतर व जन्मकर्म ऋणानुबंधपरत्त्वे होत असते. जन्मकर्मपरत्त्वे होणारे कार्य स्थूल देहाकरवी होते व पूर्वीच्या



अनेक जन्मातील ज्या इच्छावासना गेलेल्या नाही, त्यांचे पूर्णत्व प्राप्त करून घेण्यासाठी हे जन्मजन्मांतर, म्हणजे सूक्ष्म देह, ह्या स्थूल देहाकरवी त्या इच्छावासना पूर्णत्वाला नेत असतो. अशी ही जीवनाची कार्यकारण रचना आहे.

आज जो देह सकाळी उठल्यापासून रात्री झोपण्यापर्यंत बोलता-चालता, कळत-नकळत ज्या काहीं क्रिया करीत असतो, त्याला आपण 'कर्म' म्हणून संबोधतो. उदाहरणार्थ नकळत आपण एखाद्याला शिवी दिली तर आपण त्याला 'पाप' म्हणतो. रस्त्यानें जातांना एखादे देऊळ दिसले की आदराने आपण त्या देवळापुढे उभे राहून नमस्कार करतो. यास आपण 'पुण्य' म्हणतो. दिवसाकाठी अशा ज्या क्रिया आपल्या कळत नकळत हजारो वेळा होतात, त्याला जर आपण कर्म म्हणून संबोधू लागलात तर पुढील जन्मांत जन्मप्राप्तीनंतर आपल्या देहपरिसरात तुम्ही संबोधलेल्या कर्माचे महान पर्वताएवढे प्रचंड वलय निर्माण झालेले दिसेल. तशी कर्मउत्पत्ति होत नसते. पूर्णतः कर्माची उत्पत्ति होण्यास, विषय-क्रिया-कारण-कार्य-कर्म इतक्या अवस्थातून जावे लागते. अशा या चार अवस्थेतून तुमच्या इच्छावासनेचा विषय क्रिया करता होईल, तेव्हा कार्य म्हणून ही क्रिया जेथे पूर्ण होते, त्या पूर्णावस्थेतील क्रियेला 'कर्म' असे म्हणतात. पुनश्च चांगले कर्म करण्याची कर्तव्य म्हणून जी इच्छा आपणाला होते व ती ज्या सद्विचाराने व सुविचाराने आपण करतो, त्याला कारण आपल्या सभोवार असणाऱ्या विषयपरत्त्वे आपण ती करीत नसून, ती प्रेरणा म्हणजे पूर्वजन्मातील इच्छा, कार्यान्वित होत असते. ही इच्छा म्हणजे सूक्ष्म देह अथवा जन्मजन्मांतरात असलेली आपली ठेव आहे. असे असतानासुद्धा

आपण अनेक चांगल्या इच्छा स्थूल देहाने विषयपरत्त्वे निर्माण करू इच्छितो. पण त्या सर्वच इच्छा फलदायक न होण्याचे कारण ह्या जन्मजन्मांतरात पूर्वीच्या जन्मातील अनेक दुष्ट वासना प्रखरतेने इच्छेच्या पुढे वास करीत आहेत. आजच्या पंचभौतिक देहिक माध्यमात इच्छावासना असा विषय काहीही नाही. ते माध्यम कसे आहे? तर गतजन्मातील इच्छावासना ह्या देहाला प्रेरणा देतात व त्या विषयपरत्त्वे तो देह कार्य करतो. यामुळे जरी सुख-शांति-समाधान प्राप्त व्हावे अशी तुमची प्रामाणिक इच्छा असते व त्याची तरतूदही गतजन्मांत तुम्ही केलेली असते, तरी गतजन्मातील वासनाविकारांची वलये या इच्छेला साकार होण्यास वाव देत नाहीत. स्वाभाविकत: मनुष्याच्या जीवनाकडे पाहिले तर असे दिसेल की, आम्हा मानवांच्या ज्या ऐहिक वासना आहेत, त्याचे अधिक प्रमाण अन्नसेवनाचेच आहे. जो काही ऐहिक उपभोग आपण घेतो, तो उपभोग जरुरीपुरताच असतो. पण खाण्यापिण्यासाठी लागणारे अन्न हे तिन्ही त्रिकाल खाऊनसुद्धा त्या खाद्यपदार्थाबद्दल आपले समाधान कदापिही होत नाही. ज्या वासना म्हणून सांगितल्या आहेत, त्या ह्या जन्मजन्मांतरात प्रखर स्वरूपामध्ये वास करीत आहेत. त्यांच्या सोबत विकार पण आहेत. ते विकार जीवनात कार्यपरत्त्वे उपभोग घेऊन विमोचित होत असतात. पण अन्न व खाद्यपदार्थ हे तिन्ही त्रिकाळ खाऊनसुद्धा ज्यांची तृप्तता झाली नाही, अशा वासना अनेकजणांना पूर्वजन्मी परिस्थितीअभावी पूर्ण न करता आल्याने, त्या इहजन्मात अधिकच तीव्र असे स्वरूप धारण करतात. त्यामुळे तुमच्या जीवनातील इच्छा साकार होण्याची तरतूद जीवनामध्यें असूनसुद्धां त्या इच्छा साकार होत



नाहींत. अशा ह्या जन्मजन्मांतरातील वासनाविकारांचे विमोचन स्वत:लाच करावयाचे आहे. यासाठी आपण करीत असलेल्या कुलधर्म-कुलाचाराचा लाभ घेऊन ह्या वासनाविकारांचे विमोचन केले पाहिजे. पण त्यासाठीं ज्या देवदेवतांचा कृपाशिर्वाद तुम्ही घेतला आहे, तो ह्या विमोचनार्थ खर्च होणार नाही ही जबाबदारी प्रत्येकाने लक्षांत घ्यावयास हवी. यासाठी सुलभ असा मार्ग म्हणजे तुम्हांस जे अन्न किंवा खाद्यपदार्थ अतिप्रिय असतात की जे सेवनात आले नाही की तुम्ही बेचैन होता, हे पदार्थ प्रथमत: नित्य सेवनातून वर्ज्य करावयास पाहिजेत. ही सवय एकदम स्वीकारता येणार नाही. यासाठी जेव्हां आपण आपल्या आवडीचे मिष्टान्न किंवा अन्नपदार्थ सेवन करतो, त्यावर यथेच्छ ताव न मारता, देवाला नैवेद्य म्हणून जेवढा पदार्थ आपण देवापुढे ठेवतो, म्हणजे चहाचे तीन चमचे इतकाच आपल्या आवडीचा पदार्थ सेवन करावा. त्याचबरोबर ज्या पदार्थाची आवड स्वाभाविक आपल्याला नाही, तोही पदार्थ हळूहळू त्या प्रमाणामध्ये सेवनार्थ घ्यावा. म्हणजे वासनापरत्त्वे सूक्ष्म देहांत ज्या पूर्वीच्या अनेक जन्मातील अन्नसेवनाच्या वासना आहेत, त्या कमी होत जाऊन, तुमच्या ज्या इच्छा आहेत त्यांना पूर्णपणे तुमच्या जीवनात कार्य करण्यास वाव मिळेल.

आज आपल्याला एखादा आजार झाल्यावर जेव्हा आपण डॉक्टरांकडे जाता, तेव्हां डॉक्टर काहीं रोगांच्याबाबतीत असे सांगतात की, हा रोग तुमच्या घराण्यांत आनुवंशिक आहे. याचा आपल्याला बोध होत नाही. पण असा आनुवंशिक आजार आपल्याचमुळे येत असतो. याचे उदाहरण असे की, ज्या कोणा व्यक्तीला अधिक गोड खाण्याची तीव्रता असते, ही वासना

पूर्वीच्या अनेक जन्मातील असते. अशा एखाद्या जन्मात त्यास मधुमेह झाल्याने गोड खाण्यास वाव मिळाला नाही व खाण्याची वासना तर तीव्र आहे अशावेळी ही गोड खाण्याची वासना, हिच्या मुळाशी हा रोग एकरूप होतो व पुन्हा या जन्मात त्याच वासनेपरत्त्वे जेव्हा गोड खाण्याची अधिक तीव्रता निर्माण होते, तेव्हां ह्या गोड खाण्याच्या वासनेबरोबर हे मधुमेहाचे मूळ तुमच्या अन्नमय कोशात धारण व्हावयास सुरूवात करते वास्तविक आपणास मधुमेह झाला आहे याची जाणीव कधी होऊ लागते? जेव्हा तुमच्या अन्नमय कोशाचे कार्य वयमानपरत्त्वे कमी होऊ लागते, तेव्हां अशाप्रकारचा आपणास उद्‌भवला आहे,ही जाणीव होते. पण हा आजार त्या व्यक्तीच्या जन्माच्यावेळीच त्याच्या ठिकाणी धारण होतो अशी जी आनुवंशिक रोगाची कारणे आज डॉक्टरकडे गेल्यावर आपणास सांगण्यात येतात, त्याचे मूळ आपणच आहोत. कारण यासाठी वरील सोप्यात सोपा उपाय म्हणजे जे अतिप्रिय आहे त्याचे प्रमाण सेवनात हळूहळू जर तुम्ही कमी कराल तर तुमच्या अनेक जन्मातील इच्छा ज्या जन्मजन्मांतरात आहेत, त्या साकार तर होतीलच पण या सूक्ष्म देहात अंतर्भूत झालेली इच्छा कार्यान्वित झाल्यावर ती जागा कारण देह धारण करील. हीच धारणा हळूहळू विकसित झाली की, हा कारण देह स्थूल देहाशी एकरूप होतो. याच जीवनाला 'पारमार्थिक जीवन' म्हटले आहे म्हणजे ऐहिक जीवनाचेच रुपांतर शास्त्रशुद्धपद्धतीने व ज्ञानाने करून घेतल्यावर, तुम्हाला देवाच्या कृपाशिर्वादार्थ एकांतात जावयास नको, हिमालय किंवा अन्य पर्वतावर बसून तपश्चर्या करावयास नको किंवा संन्यास घेतला आहे असा भास निर्माण करावयास नको.



वरील निवेदनाप्रमाणे तिन्ही देहांना कार्यान्वित करून कारण देहातील जे जन्मकारण ह्या जन्मात सार्थक म्हणून करावयाचे आहे, त्याचे एकरूपत्त्व स्थूल देहात करून घेतले की, त्याच अवस्थेला 'संन्यास' असे म्हटले आहे तो धारण करण्यामागे देहातील या तीनही देहांचे रुपांतर, म्हणजे प्राप्त जन्म ज्या कर्तव्यार्थ आहे हे कर्तव्य, आजच अंगिकारून, त्याप्रमाणे आपले जीवन इहजगतामध्ये व्यतीत केले म्हणजे खऱ्या अर्थाने आपण संन्यास घेतला. केवळ भगवी वस्त्रे धारण करणे, दंडकमंडलू हातात घेऊन गावोगाव भिक्षा मागत हिंडणे, हे या पवित्र शब्दाचे विडंबन आहे.

वरील आहार पध्दतीचाच तात्त्विक विचार करून, दत्तपंथात किंवा नाथसांप्रदायामध्ये जी पाच घरी माधुकरी मागण्याची दीक्षा आहे ती एवढ्याचसाठी की, पाच घरी जी माधुकरी मागितली जाते त्यामध्ये अन्न हा विषय आवड किंवा नावड म्हणून नसतो पण दत्तउपासकांना ही परंपरा माहीत नसल्याने दत्तभक्ती ही आपल्या इच्छेनुरूप साकार कां होत नाही? असा विचार ते निर्माण करतात तत्पूर्वी आपल्या आहारात किती शुध्दता आहे व आहाराचा आपण किती अतिरेक करीत आहोत, हा विचार करूनच दत्त किंवा नाथसांप्रदायाची उपासना करण्यास आरंभ करावा.

आज भावी पिढ्यांच्या उध्दारार्थ प्रत्येक कुटुंबातील व्यक्तींनी नुसता पै-पैसा ठेवून, मानवी जीवनाची अपक्रांती योग्य संस्काराअभावी आज होत आहे, तो ऱ्हास कधीही कमी न होता, आम्हा मानवांच्या कल्याणार्थ अनादिकालापासून ज्या

शास्त्रशुध्दपध्दतीने मनुष्याच्या जीवनाचा हा वंशवृक्ष साकार करण्याच्या शास्त्रोक्त कार्यपध्दती सांगितल्या आहेत, त्याचे महत्त्व लक्षात घेऊन, त्याप्रमाणे वेळीच वर निवेदन केलेली निराकरणे जर आस्थापूर्वक आपल्या आचारविचारात आणलीत, तरच ही मानवी जीवनाची अपक्रांती थांबू शकेल. नाहीतर एक काळ भवितव्यामध्ये असा येणार आहे की, आम्हा मानवांचा जन्म अनादिकाळात जसा रानटी अवस्थेप्रत होता,त्या अवस्थेपर्यंत आपण आपल्या अज्ञानाने जाणार आहोत त्या प्राप्त होणाऱ्या रानटी अवस्थेचें पुनर्जीवन होण्यासाठी पुन्हा कोणी ऋषीमुनी, देवदेवता, नाथपंथ उदयास येतील आणि आपल्या रानटी अवस्थेचे रूपांतर पुन्हा मानवी जीवनात करून देतील, हे भविष्य वर्तविणे आजच्या परिस्थितीत तरी कठीण आहे.

मानवी जीवनाच्या उत्पत्तीचे माध्यम हे स्त्री होय म्हणून स्त्रीला ‘आई’ या शब्दात जी आपण हाक मारतो त्या हाकेतील भाव, भावना, प्रेम, वात्सल्य, आदर, पूज्यता हे इतर कोणत्याही उच्चारल्या जाणाऱ्या शब्दात नाही असे हे जन्म प्राप्त होण्यासाठी जे स्त्रीचे माध्यम आहे, ते जरी इतके शुभमंगल आहे, तरी जन्म देण्याचा जो धर्म स्त्रियांचा आहे, त्यांनी ह्या कर्तव्याकडे दुर्लक्ष करू नये. जेव्हा स्त्रीला गर्भधारणा होते व साधारण नऊ महिन्यानंतर ती अपत्यास जन्म देते, या नऊ महिन्याच्या काळात जे अपत्य जन्माला येणार आहे, त्याच्या पन्नास ते पंचाहत्तर वर्षाच्या जीवनाला ती साकार करीत असते असा साकार करण्याचा नैसर्गिक देहधर्म स्त्रीचा आहे. जे अपत्य जन्माला यावयाचे आहे त्या जन्माला येणाऱ्या जीवाची या जन्मपरत्त्वे काय भूमिका आहे, हे ज्ञान होणे कदापिही जरी शक्य नाही, तरी



त्याची लक्षणे याचे अनुमान निसर्गाने करुन देण्यात चूक केलेली नाही. स्त्रीला गर्भधारणे नंतर डोहाळे लागतात त्यावेळी अन्नसेवनापासून ते करमणुकीच्या विषयापर्यंत नानाप्रकारचे डोहाळे असतात त्याचा जर आस्थापूर्वक विचार केला तर जन्माला येणाऱ्या जीवाचे लक्षण कोणते आहे, हे अनुभवास येते याला उदाहरण म्हणून पुराणाकडे बोट दाखविता येईल सुभद्रेस जेव्हा गर्भधारणा झाली तेव्हा भगवान श्रीकृष्णांना तिने त्या काळातील युध्दातील बिकट रचना म्हणजे चक्रव्यूह कसा असतो, याचे ज्ञान सांगावे अशी विनंती केली होती. या लक्षणावरुन हे अनुमान निघते की जन्माला येणारा हा मुलगा हा योध्दाच होणार त्याचप्रमाणे श्रीपादश्रीवल्लभ, श्री नृसिंहसरस्वती किंवा आधुनिक काळातील स्वामी विवेकानंद यांच्या मातांना गर्भधारणेनंतर शिवपूजा व शिवव्रते करण्याची इच्छा झाली. या व्रतांची पूर्तता त्यांनी सूज्ञ विचाराने व शुध्द आचरणाने केल्यामुळे जे जीव जन्माला आले ते आजच्या काळापर्यंत अजरामर झाले आहेत ही कार्ययोजना निसर्गाने स्वाभाविक करुन दिल्यावर, आपल्याला लागलेले डोहाळे यांची पूर्तता न करता, ते डोहाळे आवरण्यासाठी स्त्रिया डॉक्टरांकडे औषधोपचारासाठी जातात त्यामुळे, पुढे जन्माला येणाऱ्या मुलाचे अकल्याण हे आई उदरातच होते.

स्त्रीची दुसरी देहिक अवस्था अशी आहे की, स्त्रीचे विवाहात कन्यादान झाल्यावर, म्हणजे तिच्या पतीने तिचे जन्मकर्म स्वीकारल्यानंतर ती जन्मकर्माची जागा जन्मजन्मांतर धारण करते जी जन्मजन्मांतराची जागा रिकामी होते, त्याठिकाणी जन्माला येणाऱ्या भावी अपत्याचा प्रवेश होतो. आता

जे स्त्रीचे जन्मजन्मांतर आहे, ते वर सांगितल्याप्रमाणे इच्छावासनेचे स्थान आहे. त्या वासनातील अन्नमय वासना व जन्माला येणाऱ्या अपत्याचे शरीरधारणेचे प्रारंभिक तत्त्व म्हणजे पृथ्वी तत्त्व हे अन्न होय. अशावेळी स्त्रीचे देहिक माध्यम निसर्गतः असे अचूक कार्य करीत असते की, अन्नाबद्दलच्या वासना व जीव प्रारंभिक अवस्थेमध्ये अन्नमय कोशात देहधारणा करणार आहे त्यातील दोष, असे दोन्ही दोष ती स्त्री डोहाळे या अवस्थेमध्ये ओकारीद्वारा विमोचन करीत असते. जन्माला येणाऱ्या प्रत्येक जीवाच्या हितार्थ परमेश्वराने केलेली योजना म्हणजे गर्भधारणा अवस्थेपासूनच त्याच्या विकासासाठी, म्हणजे अयोग्य अशा इच्छा, वासना, विकार हे त्या जीवाच्या पूर्वीच्या जन्मजन्मांतरात शिल्लक असतात, त्याची पुनरावृत्ती जन्मास आल्यावर होऊ नये यासाठी, डोहाळे हे लक्षण जन्माला येणाऱ्या अपत्याच्या व त्या स्त्रीच्या विमोचनार्थ आहे. स्त्रीजन्मात हे विमोचन अगदी स्वाभाविक अवस्थेत होत असते. पण इतके शास्त्रशुध्द ज्ञान स्त्रियांना नसल्याने, डोहाळे लागणे हे लक्षण कमीपणाचे वाटून, नऊ महिन्यात ज्या जीवाची धारणा पुढच्या भावी आयुष्याची म्हणजे पन्नास ते पंचाहत्तर वर्षांची करावयाची असते, त्यातील त्या दोषांचे विमोचन न होण्याने, हे दोष नऊ महिन्यातील काळात धारण झालेल्या पंचतत्त्वांच्या देहाशी पूर्णतः एकरुप होतात.

आता दुसरा गर्भधारणेसंबंधीचा महत्त्वाचा खुलासा असा आहे की, आपल्या कुटुंबातील अनेक मुलामुलींचे लग्नकार्य, नोकरीधंदा, व्यवसाय आदि त्यांच्या जीवनात योग्य वेळी होत नाहीत. त्या मागे काय अज्ञात कारणे आहेत हे न समजल्यामुळे,



ग्रहमान अनुकूल नाही किंवा पूर्वजन्मातील काही दोष यांच्या आड येत आहेत, असा विचार करुन त्याचे निरसन करण्यासाठी देवदेवतांपासून नवग्रहशांतीपर्यंत सर्व केले जाते. तरी ज्या कुटुंबातील व्यक्तींना हे अपयश भोगावे लागते, त्याला कारण त्यांच्याच जन्मउत्पत्तीचे होय. या जन्मउत्पत्तीस "अनैच्छिक संतती" असे म्हणतात. यास कारण त्या अपत्याचे जन्मदाते मातापिता असून, ज्यावेळी हे विवाहित पतीपत्नी आपल्या वैवाहिक सुखाचा लाभ घेतात व नकळत जेव्हा गर्भधारणा होते, तेंव्हा ते जागे होऊन विचार करते होतात. अशावेळी दोघांची म्हणजे, पतीची व पत्नीची वैचारिक अवस्था बिकट असते. अशावेळी दोघांनीही धारण झालेल्या गर्भावस्थेस पूर्णत्वाने जन्म प्राप्त करुन देण्याची संधी द्यावयाची किंवा नाही हे वेळीच ठरवावे. अनेक वेळा असे अनुभवास येते की, झालेली गर्भधारणा पतीस हवी असते व पत्नीस नको असते. कधी पतीस नको असते व पत्नीस हवी असते. अशा ह्या परस्परविरोधी मानसिक स्थितीचा आघात जन्माला येणाऱ्या अपत्यावर होत असतो. म्हणजे जे अपत्य दोघांपैकी एकाला हवे व एकाला नको अशी परिस्थिती असते, अशावेळी नाईलाजास्तव धारण झालेल्या गर्भावस्थेतील जीवाला आपल्या पूर्वीच्या अनेक जन्मातील जे ऋणानुबंध जन्मप्राप्तीनंतर या जगात कर्तव्यार्थ व्यतीत करावयाचे असतात, त्या ऋणानुबंधांचे हितसंबंध प्राप्त होणाऱ्या देहाशी त्याला जोडता येत नसल्याने, ह्या मुलामुलीचे भाग्योदय आई-वडिलांच्या पश्चात होत असतात. यासाठी योग्य वेळीच पतीपत्नीने आपली अडचण नीट समजून घेऊन, पुढे जन्माला येणाऱ्या भावी अपत्याचा विचार करून, जर उभयतांची इच्छा या

जन्माला येणाऱ्या अपत्याआड येणार असेल, तर नि:संकोचपणे डॉक्टरकडे जाऊन सल्ला घ्यावा. या ऋणानुबंधातील दोषाव्यतिरिक्त जी अपत्ये आज समाजात आपल्याला अपंग स्थितीमध्ये दिसत आहेत, त्यांच्यातही काही प्रमाणामध्ये असेच दोष मातापित्यांकडून उपस्थित झालेले असतात.

आता ज्या पती-पत्नीना ऐच्छिक अशी संतती झालेली असेल, अशांनी त्या मुलाच्या विकासासाठी केवळ दूध व धष्टपुष्ट होण्यासाठी टॉनिक्स देऊन याचा जरी देहिक विकास केला, तरी जन्माला आल्यापासून वय वर्षे तीनपर्यंत त्याचा आत्मिक विकास त्यांनीच करून दिला पाहिजे. हे अपत्य जे जन्म घेते, त्या अपत्याच्या देहाबाहेर एक कवच उभयतांच्या विकार वासनेचे असते. ते जरी आपल्याला डोळ्यांनी दिसत नसले, तरी मागाहून त्या अपत्यास येणारी किरकोळ दुखणी यावरून त्याचे अनुमान अनुभविण्यास येते. यासाठी या वासनाविकारांचे वलय बाजूला व्हावे म्हणून कुलोपासनेत स्त्री प्रसूत झाल्यानंतर, पाचव्या व सहाव्या दिवशी पाचवी व सहावीची म्हणजे 'सटवाईची' पूजा सांगितली आहे. आजकाल बहुसंख्य स्त्रिया घराबाहेर प्रसुतीसाठी दवाखान्यात जात असल्याने, हा विधी जरी होत नाही, तरी तो घरातील कोणीही सुवासिनीने केला तरी चालतो. हा विधी असा आहे की, पाटावर रक्तचंदनाने पृथ्वीतत्त्व (हे ज्यांना माहीत नसेल त्यांनी स्वस्तिक काढावे) काढून, त्यावर हळदकुंकू वाहून, पाटाभोवती रांगोळी काढावी. त्या चिन्हावर गोड्या तेलाचा दिवा, म्हणजे निरांजनात दोन वाती घालून त्या पेटवाव्यात. पाटावरील चिन्हासमोर दोन विड्याची पाने, सुपारी, सव्वा रुपया ठेवून, उकडलेल्या हरभऱ्याचा नैवेद्य वाटीत



दाखवावा. या हरभऱ्यांना मीठ लावूं नये. ही पूजा झाल्यावर दवाखान्यात जी स्त्री प्रसूत झाली असेल तिला हळद-कुंकू लावावे व प्रसादाचे चार हरभरे खावयास नेऊन द्यावेत.

त्यानंतर मुलाचे बारसे बाराव्या दिवशी व मुलीचे बारसे तेराव्या दिवशी करावे. यासाठी शुभमुहूर्त पाहण्याची जरुरी नसते. बारशाच्यावेळी जो नामकरणविधी व्हावयाचा असतो, तत्पूर्वी अकस्मात् अशा काही घटना, म्हणजे त्या कुटुंबात वर्षादोनवर्षापूर्वी कोणी व्यक्ती दिवंगत झाली असेल, तर तीच व्यक्ती पुन्हां जन्माला आली आहे असे समजून, अनेक कुटुंबात अशा दिवंगत व्यक्तींची नावे मुलामुलींना ठेवतात. पण जे कोणी कुटुंबात दिवंगत होतात, ते इतक्या अल्पकाळात जन्माला येऊ शकत नाहीत. हे जरी खरे असले, तरी ज्या मुलांची नावे दिवंगत व्यक्तींची ठेवली जातात, त्या मुलामुलींना दिवंगत झालेल्या व्यक्तीचे इहजगताशी संबंधित असलेले ऐहिक ऋणानुबंध जीवनारंभीच भोगणे भाग पडते. त्यामुळे जीवनारंभीच शरीरसंवर्धन होणे व विद्या प्राप्त करणे, ही जी मुलामुलीची कर्तव्ये असतात, त्याला ही ठेवली गेलेली नावे मारक होतात. तेव्हा चुकूनही अशी नांवे न ठेवता, योग्य अशी देवदेवतांची किंवा ज्या नावांचा उच्चार केला असता मंगल उच्चार तोंडातून होईल, अशी नावे ठेवावीत.

नामकरण विधीनंतर बाकीचा समारंभ आपण करताच; पण त्या दिवशी, ज्या आपल्या कुलदेवता आहेत त्यांचे स्मरण करण्याचे विसरता. यासाठी नामकरण विधीनंतर प्रथमत: आपल्या देवदेवतांसमोर उदबत्ती, साजूक तुपाचे निरांजन

लावून, हिरव्या खणा-नारळाची ओटी काढून ठेवावी. देवापुढे मांडलेल्या पाटावर या बाळ-बाळंतिणीस बसवून, ज्या आप्तांना तिला बाळंतविडा द्यावयाचा आहे, त्यांनी तो तिला द्यावा. तत्पूर्वी ज्या कुटुंबातील ही स्त्री प्रसूत झाली आहे, त्या कुटुंबातील सुवासिनीने पहिला बाळंतविडा तिला हळद-कुंकू लावून द्यावा. यावेळी प्रसूत झालेल्या सुवासिनीची ओटी भरत नसतात, तर तो बाळंतविडा तिच्या हातात द्यावयाचा असतो. देवापुढे काढलेली ओटी घरातील सुवासिनीने स्थानिक देवतेच्या देवळांत नेऊन द्यावी; बाळ-बाळंतिणीने सव्वा महिन्यानंतर देवदर्शनास जावे.



# उपास्य दैवत व करावयाची उपासना

भक्तभाविक मार्गदर्शनार्थ आल्यावर, त्यांना आपण नित्याची उपासना काय करता? असा प्रश्न विचारल्यावर, ते अनेक देवदेवतांची नावे उच्चारून असा भास निर्माण करतात की, आपले नित्य जीवन हे केवळ उपासना मार्गात व्यतीत होत असून, इथे विचारला जाणारा प्रश्न हा गौण आहे. वास्तविक ज्या देवदेवतांची नावे आपण सांगत असता, त्यापैकी कुलस्वामिनी कोणती? कुलस्वामी कोणता? व उपास्य दैवत कोणते? यातील तत्त्वत: फरक हा माहीत नसल्याने, देवदेवतार्जन करण्यासाठी सगळ्याच देवदेवता आपल्याला अनुकूल आहेत, अशी भावना निर्माण करून, अट्टाहासाने जो उपासनेचा मार्ग व त्याचा अवलंब आपण करता, यामागील शास्त्रीय व तात्विक भूमिका समजल्याशिवाय, जन्मभर जरी तुम्ही देवाप्रीत्यर्थ आपला वेळ खर्च केलात, तरी केल्या गेलेल्या उपासनेचे इष्ट फल तुम्हाला प्राप्त होत नाही. म्हणून तुम्ही देवदेवतांकडे त्याचा दोष सोपविता. देवदेवतार्जन व देवाप्रीत्यर्थ करावी लागणारी उपासना किंवा आराधना ही आपण आपल्या कल्पनेने किंवा इच्छेने अंगिकारून किंवा स्वीकारून त्याची फलप्राप्ती होत नाही. यासाठी योग्य अशा साधकाकडे त्याचा खुलासा करून घेतला पाहिजे. भक्तिमार्गात अनेकांचा विश्वास असा आहे की, कोणत्याही देवाचे भक्तीभावनेने पूजन केले, तर ते भक्तीस्वरुप असते. हे जरी खरे, तरी ज्याप्रमाणे प्रत्येक मानवाचा देहिक धर्म हा आचारविचार पातळीप्रमाणे भिन्नाभिन्न आहे. तद्वत् ह्या सृष्टीला कार्यान्वित करणारी जी महान शक्ती आहे, ती शक्ती

त्रिगुणात्मक तत्त्वात कार्य करीत असते. म्हणजे उत्पत्ती, स्थिती, लय ही निराकार तत्त्वे साकार स्वरूप होण्यासाठी, या तत्त्वाने स्वतः साकार होऊन ब्रह्मा, विष्णू, महेश आदि स्वरुपामध्ये या विश्वाचे कार्य अंगिकारले आहे. या तीन शक्ती सर्वसामान्य साधकाला आपल्या उपासनेतून किंवा साधनेतून प्राप्त करणे अत्यंत अवघड आहे. म्हणून देवता युगामध्ये या शक्तींनी आपल्या ठिकाणी तीन अवस्था निर्माण करून देव, देवता व उपास्य देवता असे वर्गीकरण केले. देव व देवता यांच्यासंबंधीचा खुलासा वर यथायोग्य केलाच आहे. तथापि ज्या उपास्य देवदेवता आहेत, त्या स्वाभाविक कुलस्वामी किंवा कुलस्वामिनी होत नाहीत; पण अनेक जण विठोबा, गणपती, मारुती, शंकर, दत्त, राम, कृष्ण आदि उपास्य देवतांना कुलस्वामी म्हणून सांगतात. प्रत्यक्षात हे चुकीचे आहे. ह्या उपास्य देवतांपैकी एखादी देवता पूर्वीच्या घराण्यात कुणा एका व्यक्तीला प्रसन्न होऊन, त्या व्यक्तीला कृपावंत करण्यास कारणीभूत झाली असेल, म्हणून आता त्या देवतेचा पुढील पिढ्यांनी अनादर कसा करावयाचा? म्हणून या उपास्य दैवतांना कुलधर्म-कुलाचारात सामावून घेतले, हे स्पष्ट होते. ज्या व्यक्ती ह्या उपास्य दैवतांच्या उपासना करतात, त्याना ह्या उपास्य दैवतांची अंगिकारलेली उपासना करण्यापूर्वी मागील निवेदनात जे सत्त्वगुणाबद्दल मार्गदर्शन करण्यात आले आहे, तितक्या सत्त्वगुणांची प्राप्ती झाल्याशिवाय उपास्य दैवतांचे फल पूर्णतः कदापिही मिळणे शक्य नाही. याचे कारण ह्या उपास्य देवतेप्रीत्यर्थ अंगिकारलेली सेवा ही वर्षे दोन वर्षे करून फलप्राप्ती होत नाही. म्हणून ही सेवा मध्येच सोडून देऊन तुम्ही



आपल्या जीवनातील बहुमोल असा वेळ अनाठायी खर्च करण्यास कारणीभूत होता;कारण अंगिकारलेली उपासना पूर्णतः फलप्राप्तीपर्यंत करण्यास, उपासकाला ही उपासना निरंतर स्वरूपामध्ये करावी लागणार आहे, याचा अंदाज सहजासहजी येत नाही किंवा मार्गदर्शनाच्या अभावी या व्यक्ती आपल्या उपासनेच्या अवाढव्य कल्पनेमध्ये वावरत असतात. सर्वसामान्यापणे वर निवेदन केलेल्या, उपास्य दैवतांच्या पूर्ण कृपाप्राप्तीसाठी जो काळ लागतो, तो येणेप्रमाणे:-

श्री दत्तात्रेयांची उपासना ज्यांना सुलभ व सोपी अशी वाटते, त्यांनी प्रथमतः रज, तम, सत्त्व या गुणापैकी पंचाहत्तर टक्के सत्त्वगुण स्वतःच्या ठिकाणी निर्माण करावयास पाहिजे. याशिवाय आहार मीमांसेप्रमाणे खाण्यापिण्यात आवडनिवड न ठेवता जे वेळेला मिळेल ते सेवन करून संतुष्ट राहावयास पाहिजे. वेळी-अवेळी निर्माण होणाऱ्या वासना व त्या केवळ खाण्यापिण्यासाठी, अशी जर देहिक स्थिती असेल तर ती सुधारल्याशिवाय दत्तपंथ अनुकूल होणे हे अत्यंत बिकट आहे; पण याचा सारासार विचार न करता, अविचाराने अनुकरण करणे, ही पध्दत सदैव अनुभवास येते. त्यामुळे जरी एखाद्या श्रेष्ठ देवतेची आराधना तुम्ही केलीत व त्या देवता जरी श्रेष्ठ असल्या तरी तुम्ही कृपावंत होण्यास बहुतांशी कनिष्ठ आहात. दत्त उपासना व तिचा अंगिकार करण्यास ज्या दिवशी तुमची उस्फूर्त भावना कार्यान्वित होते, त्या क्षणाला त्या उपासनेला पोषक असा तुमचा आचारविचार जो अस्तित्वात असतो, तो कृपावंत होण्याच्या दिवसापर्यंत टिकू शकतो काय? याचे कारण श्री. दतात्रेयांची उपासना फलद्रुप होण्यासाठी छत्तीस वर्षांचा

काळ ह्या सेवेत व्यतीत करावा लागतो. 'दत्त' हे तत्त्व त्रिगुणात्मक म्हणजे उत्पत्ती, स्थिती, लय म्हणजे ब्रह्मा, विष्णू, महेश आदि तत्त्वांचे महाकारण आहे. म्हणून त्या तीन तत्त्वांचे दत्तस्वरुपात अवतारकार्य सुरू झाले. ते त्रिगुणात्मक तत्त्व साकार स्वरुपात 'दत्त' म्हणून जरी प्रकट झाले, तरी त्याची कृपाप्राप्ती होण्यासाठी, करावी लागणारी दीर्घ तपःश्चर्या ही छत्तीस वर्षांची आहे. पण हे जरी शास्त्रीयदृष्ट्या खरे असले तरी योग्य गुरुंचा व योग्य मार्गाचा आधार तुम्हाला मार्गदर्शन करता झाला तर ही उपासना तुम्ही बारा वर्षात फलद्रुप करू शकता.

अन्य उपास्य देवता ज्या आहेत, त्यांच्या उपासनेचा काल अनुक्रमे दत्तपरंपरेसारखाच आहे. तो येणेप्रमाणे:-

श्री गणपती २१ वर्षे

श्री शंकर ११ वर्षे

श्री मारुती १८ वर्षे

श्री राम १२ वर्षे

श्री अनंतव्रत १४ वर्षे

पार्वती उपासना १२ वर्षे (हरितालिका ७ वर्षे, मंगलागौरी ५ वर्षे )

अशी ही उपास्य देवतांची दीर्घकालपर्यंत करावी लागणारी उपासना आपण जर विचारात घेतलीत तर



प्रामाणिकपणे असे ठरवावे लागेल की, एवढा काळ आपली त्या देवतेबद्दलची भक्ती, निष्ठा व त्या देवतेला पोषक असे आचारविचार आपण ह्या काळापर्यंत सांभाळू शकू काय? यापेक्षा तात्काळ फल देणाऱ्या देवता, म्हणजे आपल्या घराण्याच्या परंपरेतील कुलदेवदेवता, यांची मनोभावनेने उपासना करून श्रध्दा, भक्तीने जर कुलधर्म, कुलाचार व कुलोपासना यांचा आस्थापूर्वक विचार करून, जे जीवन विस्कळीत झाले आहे, ते जर सुसंबध्द केलेत, तर दीर्घकालपर्यंत उपास्य देवतेच्या मार्गाचा अवलंब करून जी फलप्राप्ती तुम्हाला होणार आहे, तीच फलप्राप्ती तुम्हास तुमच्या इष्ट देवता करून देण्यास समर्थ आहेत. मुद्दाम बिकट अशा मार्गाने जाण्यापेक्षा, ज्या समस्या योग्य कारणाने व योग्यवेळी सोडविण्याची परमेश्वराने तरतूद केली आहे, त्याचा लाभ घेणे, आपल्या हिताचे आहे

आज समाजात अनेक कुटुंबात अशा रुढी परंपरेच्या उपासना, व्रतवैकल्ये, भिन्नाभिन्न पूजाअर्चा, त्या कुटुंबातील व्यक्ती करीत असताना अनुभवास येतात. वास्तविक घराण्यातील परंपरेत ज्या ज्या वेळी ज्या ज्या काही अडीअडचणी निर्माण होत गेल्या किंवा निर्माण झाल्या असतील, अशा काही कारणप्रसंगी ह्या अडिअडचणी निवारणार्थ कोणी मार्गदर्शन केले असेल, अशांनी त्या घराण्याच्या परंपरेतील पूजाअर्चा, व्रतवैकल्ये, उपासतापास, मासिक किंवा वार्षिक देवदेवतार्जन इत्यादि काही करण्याचा प्रघात रूढ केला. त्यामुळे जेव्हा योग्य मार्गदर्शनाची गरज आपल्याला निर्माण होते, तेव्हा ज्या उपासना तुम्हा भक्तांना अनुकूल नसतात व त्या आपण सोडाल काय?

असे विचारण्यात येते, तेव्हा अनेक भक्तमंडळींना त्या संबंधीचा तत्त्वबोध माहीत नसल्याने, एक तर मार्गदर्शन न घेता ही मंडळी ह्या कार्यपध्दतीकडे दुर्लक्ष करतात किंवा मार्गदर्शन घेऊनही ज्या काहीं उपासनांचा अंगिकार केवळ रूढीपरत्त्वे केला आहे, त्या उपासना चालू ठेवतात.

तुम्ही करीत असलेल्या उपासना जर तुम्हाला अनुकूल असतील, किंवा भवितव्यात त्या अनुकूल होणार असतील, तर चुकूनही निराकरणपध्दतीत असे सूचित करण्यात येणार नाही की, तुम्ही ज्या उपासना काही वर्षापासून करीत आहात त्या सोडव्यात. पुन्हा या संबंधी आपण भक्तांची विचारणा अशी असते की, हे सोडण्यासाठी काही उद्यापन आदि करावयास पाहिजे काय? पण आपल्या वाचनात व ऐकण्यात 'उद्यापन' म्हणून जो शब्द आलेला असतो, याचा खरा अर्थ काय आहे, हे आपण जाणत नसल्याने, एखादी उपासना सोडा म्हटले की, 'उद्यापन' हा शब्द आपण स्वीकारलेली उपासना सोडण्यामध्ये अडथळा निर्माण करतो. जी व्रते व ज्या उपासना तुम्ही शास्त्रशुध्द पध्दतीने अंगिकारलेल्या असतात, त्यांना शास्त्रीयपध्दतीने उद्यापन हा विधी आहे. पण केवळ एकमेकांच्या गाठीभेटीत, ऑफिसच्या कँटिनमध्ये किंवा कोणाच्या घरी पाहुणे म्हणून गेल्यावर, अडीअडचणीच्या विषयापरत्वे व त्याच्या निवारणार्थ आपण एकमेकांत जी उपासनेची देवाणघेवाणकरून, उपासनेचा किंवा व्रतांचा स्वीकार करतो, ही व्रते व उपासना केवळ गाठीभेटी स्वीकारलेली असल्याने, त्यांच्या उद्यापनार्थ शास्त्रीय विधीची आवश्यकता आहे, असे नाही.



शास्त्रीयपध्दतीने उपासना व व्रतांचा स्वीकार अशा त-हेने करावयाचा असो की, कुटुंबात ज्या वडील व्यक्ती असतात, त्यांनी त्या उपासना काही काळ केल्यावर, पुढे त्या उपासना आपल्या मुलांना, मुलींना, सुनांना किंवा नातवंडाना द्यावयाच्या असतात. ह्या उपासनाव्रतांचे संबंध ज्या देवदेवतांशी आहेत, अशा देवदेवतांचे पूजन-अर्चन, अभिषेक, नैवेद्य, ओटी भरणे आदि सर्व करून, ज्या व्यक्तीला ते व्रत द्यावयाचे आहे, त्या व्यक्तीला देवासमोर बसवून, आपण त्याच्या डाव्या हातास बसावे. पूजनादि विधीतील सर्व औपचार झाल्यावर, मनोभावनेने अशी प्रार्थना करावी की, 'देवा, तुझ्या कृपाशिर्वादार्थ मी जी काही सेवा म्हणून उपवास, व्रतवैकल्ये आदि आजपर्यंत करीत आलो/आले, ते माझ्या यथाशक्ती यथाज्ञानाने केले. आता वयपरत्वे किंवा प्रकृती अस्वास्थ्यामुळे मला ही तुझी सेवा यथाशक्ती करता येणार नाही. ती सेवा मी माझ्या भक्तीभावनेने माझ्या मुलास/मुलीस/सुनेस देत आहे'. एवढी प्रार्थना झाल्यावर, त्या व्रताचा हितसंबंध ज्या देवतेचा आहे, त्या देवतेला वाहिलेल्या फुलातील एक फूल जे त्या देवतेच्या मस्तकावर वाहिलेले असेल, ते घेऊन कुटुंबातील ज्या व्यक्तीस ते व्रत द्यावयाचे आहे, तिच्या ओंजळीत ठेवावे. तिने ते फूल मनोभावनेने आपल्या मस्तकास लावून मग त्या उपास्य देवतेच्या चरणी ठेवावे. अशा सोप्यातसोप्या विधीने हे व्रत परंपरापध्दतीने तुमच्या कुटुंबात वास करीत राहते. अन्यथा तुम्ही ज्या पूजनादि उपासना, व्रतवैकल्ये, बोलता-चालता एकमेकास सांगता याचा लाभ सहजासहजी तुम्हास होत नाही.

ज्या काही वार्षिक उपासना समाजात वर्गणी गोळा करून

केल्या जातात, त्याचा हेतू जरी सामाजिक हिताचा व धार्मिक असा आहे, तरी तो समारंभ ज्या देवतांच्या प्रीत्यर्थ केला जातो, त्या विधीचे व देवतांचे मांगल्य विचारात घेतले जाते काय? उदाहरणार्थ भाद्रपद महिन्यात गावातील प्रत्येक ठिकाणी, गणपतीची स्थापना दहा दिवस केली जाते. श्रावण महिन्यात अशाच प्रकारे सत्यनारायणाचे पूजनही केले जाते. नवरात्रात श्रीदेवीचे नवरात्रही सार्वजनिक म्हणून केले जाते. पण जे विधी काही शास्त्रपरत्वे प्रत्येक कुटुंबातील व्यक्तीने करावे असे सांगण्यात आले आहे, त्या विधीची कार्यकारणपध्दत ह्या जगाच्या हितार्थ शास्त्राने काय केली आहे, हे न समजल्याने, आज आपण ह्या विधींना सार्वजनिक समारंभाचे स्वरूप देऊन, त्या विधीतील पूज्यता कमी करण्यास कारणीभूत झालो आहोत.

वरील विधी जेव्हा सार्वजनिक म्हणून करण्यात येतात, तेव्हा ह्या विधीच्या विसर्जनापर्यंत सकाळपासून सायंकाळपर्यंत लाऊडस्पिकर वरून, करमणुकीसाठी बीभत्स अशी गाणी लावली जातात. याशिवाय या समारंभाची शोभा वाढावी, म्हणून जी प्रासंगिक दृष्ये उभी केलेली असतात, ती सिनेमातील एखाद्या प्रसंगापासून, राजकारणातील प्रसंगापर्यंत असतात. असे हे आपल्या देवाचे व धर्माचे विडंबन चव्हाट्यावर कोणी करीत असेल, असे वाटत नाही. प्रत्येकाने आपल्या धर्मपरत्वे देवदेवतांच्या विधीचे ज्ञान बहुजन समाजाला व्हावे, म्हणून ते विधी अवश्य करावेत. पण आज हे समारंभ आपण जेव्हां पाहतो, तेव्हां आपणास असे अनुभवास येते की, गावांत प्रत्येक दहा पावलावर असाच सार्वजनिक समारंभ चालू असून, तो साजरा करण्यासाठी एकमेकांची स्पर्धा चालू असते. भाद्रपद महिन्यात



किंवा आश्विनातील नवरात्रात, या देवतांच्या स्थापनेचा जो मूळ शास्त्रीय हेतू आहे, तो न समजल्याने, ह्या समारंभासंबंधीचे पावित्र्य, भक्ती आपल्यात नसते. केवळ वर्गणी जमा करून गणपती किंवा देवीच्या नावाने जो हा सार्वजनिक उत्साह वर्षातून एकदा उफाळून येतो, त्याला आवरण्यास, ज्या देवदेवतांची तुम्ही स्थापना करता, त्यांनाही ते कठीण झालेले आहे.

आता शास्त्रीयदृष्ट्या भाद्रपद महिन्यात शुध्द पक्षातील चतुर्थीला श्री. गणपतीला आवाहन करून, दहा दिवस पूजनार्थ जे बोलवावयाचे आहे, इतका काळवेळ, इतकी पूजा, गणपतीची कोणत्याही विधीप्रसंगी नसते. कुटुंबात आपण जेव्हां वेगवेगळे धार्मिक विधी करता, त्यावेळी प्रथमतः श्रीगणपतीस आवाहन एवढ्यासाठीच करावयाचे असते की, तो देवांचा अधिपती आहे. आपण जो विधी करणार आहात, तो विधी ज्या देवताप्रीत्यर्थ असतो त्या विधीस त्या देवतांनी गणपती समवेत उपस्थित राहून, तो विधी अंगिकारावा, असा कार्यकारणभाव असतो. हा विधी पूर्ण होताच, गणपतीवर अक्षता टाकून त्याला असे सांगण्यात येते की, 'पुनरागमनायच', म्हणजे 'पुन्हा मी जेव्हां काहीं धार्मिक विधी करीन, तेव्हां आपण उपस्थित असावे' असे असता, भाद्रपद शुध्द चतुर्थीपासून अनंतचतुर्दशीपर्यंत जो पूजाविधी दहा दिवस करावयाचा आहे, ह्या दहा दिवसांचे माहात्म्य धार्मिक दृष्ट्या फार मोठे आहे. सूज्ञ भक्तांनो, आजपर्यंत ह्या शास्त्रोक्त विधी पध्दतीची माहिती आपण करून घेतली असतीत व त्याप्रमाणे जर हा विधी आचरणात आणला असतात, तर आपल्या जीवनातील अनेक समस्या, जो देवांचा अधिपती गणपती आहे, त्याने सोडविल्या असत्या. पण सूज्ञपणाने तुम्ही ह्या धार्मिक विधीची

जाणीव न करून घेण्याने, ह्या देवाला बंधनात घातले आहे.

एकंदर वर्षात बारा महिन्याचा जो काळ आहे, त्याचे दोन भाग 'उत्तरायण' व 'दक्षिणायन' म्हणून केले आहेत. उत्तरायणाचा आरंभ मकर संक्रातीला सूर्य मकर राशीत गेल्यावर सुरू होतो. हा काल सहा महिन्याचा असतो. त्यानंतर सूर्याचे संक्रमण कर्क राशीत होते. हा काल दक्षिणायन असा आहे. या कालातच श्रावण महिन्यात वेगवेगळ्या वारी उपवास आदि व्रते करून, देवदेवतांची दर्शने घेऊन काया, वाचा व मन शुध्द करावयाचे असते. त्या नंतरचा येणारा महिना म्हणजे भाद्रपद. या महिन्यातील शुध्द पक्षातील चतुर्थीला जे गणपती पूजनाचे माहात्म्य आहे ते दहा दिवसाचे असून, दहाव्या दिवशी 'अनंताची' म्हणजे विष्णूची पूजा करून या विधीची समाप्ती होते. या दहा दिवासात गणपतीचे व विष्णूचे पूजन सांगितले आहे, ते एवढ्यासाठी कीं, संपूर्ण वर्षात नानाविध धार्मिक विधीसाठी जरी तुम्ही विधी आरंभी गणपतीला आवाहन करीत असलात तरी या दहा दिवसातील पूजनाचे माहात्म्य वेगळे आहे.

भाद्रपदातील शुध्द पक्षानंतर 'पितृपक्ष' सुरू होतो, हे सर्वांना विदीतच आहे. या वद्यपक्षांत जे श्राध्दपक्ष विधी होतात, त्याचा हेतू घराण्यातील दिवंगत झालेल्या व्यक्तींना त्यांच्या मरणोत्तर जीवनानंतर सद्गती प्राप्त व्हावी, हा आहे. असे विधी आजपर्यंत जरी तुम्ही रूढीपरंपरेप्रमाणे करीत आलात, तरी त्यांना सद्गती देण्याचे सामर्थ्य केवळ घराण्यातील दिवंगत झालेल्या व्यक्तीच्या स्मरणार्थ श्राध्दविधी करून प्राप्त होत नाही. त्यासाठी देवादिकांचा कृपाशिर्वाद पाठीशी असावयास पाहिजे.



म्हणून शास्त्राने अशी शास्त्रशुध्द तरतूद केली आहे की, त्या दिवंगत व्यक्तींना सुलभपणे सद्गती मिळावी, यासाठी त्यांच्या आप्तांनी श्रावण महिन्यात देवादिकांचे उपवास, व्रते करून, दानधर्म, परोपकार करून, आपले काया, वाचा, मन शुध्द करावे. शुध्द केल्या गेलेल्या काया, वाचा, मनाने भाद्रपद महिन्यात गणपतीची स्थापना करून अनंत चतुर्दशीला श्री. विष्णूपूजन करून गणपती व विष्णूंचा कृपाशिर्वाद भाद्रपद वद्य पक्षांत जे विधी आपल्या घराण्यातील दिवंगत व्यक्तींच्या प्रीत्यर्थ करावयाचे आहेत, त्यांना उत्तम लोकी सद्गती प्राप्त होण्यासाठी प्राप्त व्हावा, अशासाठी हे गणपती स्थापनेचे दहा दिवसांचे माहात्म्य आहे. अशा प्रकारे संपूर्ण श्रावण महिना व भाद्रपद महिन्यातील पंधरा दिवस, असा दीड महिना, ज्यावेळी तुम्ही धार्मिक विधीत आचरणात आणाल, त्यावेळी वद्य पक्षातील श्राध्दपक्षादि विधी सफल होतील.

पूर्वीच्या शास्त्राप्रमाणे ज्याना प्रयाग, काशी व गया या त्रिस्थळी यात्रा करणे शक्य आहे, त्यानी त्या तिन्ही तीर्थक्षेत्री श्राध्दपक्षादि विधी करून, शेवटचे पिंडदान गयेस विष्णूपदावर करावयाचे असते. हें समर्पण केल्यावर, ह्या दिवंगत व्यक्तींच्या ऋणातून आपण मुक्त होऊन, त्यानाही उत्तम लोकी मुक्ती प्राप्त करून देतो. पूर्वीच्या काळात ही दूरवर असणारी तीर्थश्रेत्रे व त्या ठिकाणी जाऊन ही धार्मिक कृत्ये करणे अवघड होते. कारण त्या काळात वाहनादि साधनांचा लाभ आज जितका आपण घेऊ शकत आहोत तितका होत नसे. त्यामुळे समाजातील प्रत्येक व्यक्तीला ही अवघड समस्या सुलभपणे सोडविता यावी व जे पुण्यकर्म या त्रिस्थळीच्या तीर्थयात्रेने व तेथील श्राध्दपक्षादि विधी

केल्याने प्राप्त होत असे, तेच पुण्य आपणास सुलभपणे आपण रहात असलेल्या गांवी व घरात प्राप्त व्हावे, म्हणून दीड महिना धार्मिक आचरणात व धार्मिक कृत्यात व्यतीत करावा, असे शास्त्राने सांगितले आहे. हे या शास्त्राचे थोर उपकार आपल्या कल्याणार्थ किती बोधप्रद आहेत याचा विचार करा.

असा हा दीड महिना आस्थापूर्वक विचारात घेऊन, तुम्ही आपल्या घराण्यातील दिवंगत व्यक्तीच्या ऋणातून मुक्त होण्यासाठी जर श्राध्दपक्ष केलेत, तरच या श्राध्दपक्ष विधीने त्यांची मुक्तता होते, हे जे शास्त्राने सांगितले आहे, त्याचा तुम्हाला अनुभव येईल. आज अनेक लोक असा प्रश्न विचारतात की, घराबाहेर पडल्यावर आमच्या कुटुंबातील बायकामुलांना बाधा म्हणून जो त्रास होतो, असा प्रकार पूर्वी नव्हता काय? की आजच त्याचे प्रमाण अधिक वाढले आहे? यास समर्पक उत्तर असे की, संपूर्ण वर्षात जो काळ तुमच्या हितार्थ आहे, तो म्हणजे श्रावण शुध्द प्रतिपदे पासून भाद्रपद शुध्द पौर्णिमेपर्यंत, या कालात तुम्हास धार्मिक आचरण धार्मिक कृत्ये, जी करावयास सांगितली आहेत, त्याकडे तर तुम्ही दुर्लक्ष केलेच आहे, पण तुमच्या घराण्यातील दिवंगत व्यक्तीच्या इच्छा वासनेपासून मुक्त करून, त्याना उत्तम लोकी जीवन प्राप्त करून देण्यासाठी देवादिकांनीसुध्दा आपले महात्म बाजूला ठेवून, तुम्हाला यथोचित सहाय्य देण्यासाठी आपली कार्ययोजना आपल्याला परिचित करून दिली, त्या श्री गणपतीचे माहात्म्य आपण न जाणता, त्या थोर दैवताला आज आपण गलिच्छ अशा रस्त्यावरील चौकात नेऊन जर बसविलेत, तर आपल्या घराण्यातील दिवंगत झालेल्या व्यक्तींच्या मुक्तीचा प्रश्न कसा व



कोण सोडविणार? साधारण कुटुंबात जर एखाद्याला बाधा झाली, तर त्यासाठीसुध्दा आपल्याला मंत्र, तंत्र, जादुटोणा करावा लागतो. त्यातून सुटका झाली नाही, तर तीर्थश्रेत्री जावे लागते. व तेथे जाऊनही ही बाधा निवारण होईलच असे नाही. असे जर आहे, तर घराण्यातील त्या व्यक्ती मरणोत्तर जीवनानंतर सद्‌गतीला गेल्यां नाहीत व जरी तुम्ही त्याना सद्‌गती मिळावी म्हणून त्यांच्या प्रीत्यर्थ श्राध्दपक्ष केलेत, तरी जोपर्यंत ह्या दीड महिन्याच्या काळात तुम्ही धार्मिक आचरण, धार्मिक विधी, देवादिकांच्या इष्ट उपासना अंगिकारल्या नाहीत, तोपर्यंत अनेक काळपर्यंत हे दिवंगत मृतात्म्ये इहजगतांशी हितसंबंध जोडून, आपल्या इष्ट व दुष्ट वासना पूर्ण करण्यासाठी, तुमच्या बायका मुलांकडून आपली मुक्तता करून घेण्यासाठी, बाधा म्हणून वावरणारच.

भारतात ह्या देवतेच्या म्हणजे गणपतीच्या बाबतीत पूजनादि विधीचा जो गैरप्रकार झाला आहे, तो फक्त महाराष्ट्र व गोमंतकात झाला आहे. उत्तर भारतात तर ही देवता नाममात्र परिचित आहे पण दक्षिण भारतात या देवतेचे अधिष्ठान तिच्या माहात्म्यपरत्वे सांभाळले गेलेले आहे. आज महाराष्ट्रात जो गणपती स्थापनेचा विधी करण्यात येतो, तत्संबंधीचा सार्वजनिक प्रकार याचा उल्लेख वर केलाच आहे. पण घरात जो गणपती बसविण्यात येतो, त्याही गणपतीबद्दलची पूज्यता सार्वजनिक गणपती एवढीच राहिली आहे. जीवनोध्दारार्थ जरी गणपती हे आदितत्व आहे, तरी त्याची स्थापना दीड महिन्याच्या व्रस्तस्थ काळापासून करावयाची आहे. ती आपण आपल्या सोईपरत्वे दीड दिवसावर आणलेली आहे. यापेक्षा गणपतीची स्थापना दीड

दिवसासाठी जरी केली नाहीत, तरी त्यामुळे गणपती काहीं दु:खी होणार नाही.

गणपती पूजनाच्या ह्या दहा दिवसाच्या काळात, तुमच्या ज्या इष्ट कुलदेवदेवता आहेत, यांचाही कृपाशिर्वाद पुढील विधी करण्यास असणे अत्यावश्यक आहे. म्हणून ह्या दहा दिवसात जे 'गौरीपूजन' सांगितले आहे, ते ह्या कुलस्वमिनीचे पूजन म्हणून करावयाचे आहे. व त्यामुळे घराण्याच्या ज्या कुलदेवता आहेत, त्यांचा कृपाशिर्वाद मिळून, त्याचा लाभ घराण्यातील दिवंगत व्यक्तींना पितृपक्षात होतो. गौरीपूजनाची स्थापना, या संबंधीचे मार्गदर्शन दरवर्षी पंचंगाप्रमाणे विचारात घेऊन गौरीची स्थापना करावी.

सूज्ञ भक्त वरील निवेदन वाचून असा विचार करतील की, दिवंगत व्यक्तींच्या हितार्थ आम्ही धार्मिक आचारविचारांची बंधने पाळून, त्याना मुक्त करणे म्हणजे हा एक प्रकारे अट्टाहास आहे. पण याला मार्गदर्शनामध्ये असे अचूक उत्तर दिले आहे की, दिवंगत व्यक्ती आपल्या पश्चात् जी स्थावर मिळकत, पै-पैसा, दागदागिने तुमच्या नांवे करून गेले आहेत, त्यांना सद्‌गती प्राप्त करण्यासाठी तुम्हाला जर हा दीड महिना व काळ बिकट वाटत असेल, तर त्यांच्या पश्चात् तुमच्या नांवावर आलेली जी स्थावर मिळकत असेल, तर त्यांचा नि:संकोच दानधर्म करावा. यापेक्षा यातील महत्वाची जी तात्विक भूमिका आहे, ती अशी की, स्वत: प्रीत्यर्थ जेव्हां आपणास पुण्य संचय करावयाचा असतो, तेव्हां हा पुण्य संचय होण्यास फार विलंब लागतो. पण जेव्हां एखादी सेवा आपण दुसऱ्याच्या कल्याणासाठी म्हणून करतो, की ज्यामध्ये



आपला वैयक्तिक स्वार्थ नाही, त्यावेळी पुण्यसंचय हा दुप्पट होतो. यामुळे ह्या दीड महिन्यात तुम्हाला करावी लागणारी धार्मिक कृत्ये, देवदेवतार्जन व परोपकार हा तुमच्या हितासाठीच आहेच, पण मरणोत्तर जीवनानंतर मुक्तावस्थेला जाण्यासाठी ज्या दिवंगत व्यक्तींना देवादिकांचा ऋणानुबंध कमी पडतो, अशांना तुम्ही ही जी दुप्पट पुण्याई प्राप्त केलीत, त्यातील एकपट पुण्याई दिल्यावर, त्यांचा देवादिक ऋणानुबंध कमी असल्यामुळे, जो इहजगताशी संबंध जोडावा लागला त्यातून त्या दिवंगत व्यक्ति देवतांच्या कृपेमुळे तर मुक्त होतातच, पण तुम्हाला ह्या जन्मांत जे इति कर्तव्य आहे, की इहलोक व परलोक ह्या दोन्ही अवस्थांची प्राप्ती तुम्हाला ह्या जन्मात अति प्रयत्नाने करावयाची आहे, त्या प्राप्तीचा पाया या दीड महिन्याच्या काळातील सेवेमुळे प्राप्त होतो.

घराण्यातील दिवंगत व्यक्तींच्या ऋणातून, पितृपक्षात तुम्ही आपले कर्तव्य करून ऋणमुक्त झालात की, आश्विन महिना येतो. घराण्यातील कुणी दिवंगत झाल्यावर जे दहा दिवस सूतक पाळण्यात येते, हे दिवस अमंगल मानतात. त्याप्रमाणे वर्षातील सर्व महिन्यामध्ये भाद्रपदातील वद्य म्हणजे पितृपक्ष हा काल अमंगल मानलेला आहे. श्रावणापासून अनंत चतुर्दशीपर्यंतच्या मंगलकालामध्ये प्राप्त केलेले पुण्यकर्म पितृपक्षात व्यतीत केल्यावर जो आश्विन महिना येतो, त्यातील दहा दिवसाचे महत्व वेगळे आहे. ज्या देवदेवतांच्या कृपाशिर्वादाने तुम्ही दीड महिन्याची पुण्याई भाद्रपादातील वद्य म्हणजे पितृपक्षात खर्च केली आहे, त्यातील एकपट तुम्ही त्यांना देऊन, एकपट ही तुमच्याकडे शिल्लक

राहिली आहे. हा जो परोपकार तुम्ही दिवंगत व्यक्तीच्या प्रीत्यर्थ केलेला आहे, असा हा परोपकाराचा ठेवा, तुम्हाला 'व्यक्तिगत पुण्याई' म्हणून मिळावा म्हणून आश्विन शुध्द प्रतिपदेपासून दशमीपर्यंत दहा दिवसांचे 'नवरात्र' 'आहे. या काळात पुन्हा तुम्ही तुमच्या कुलदेवदेवतांचे स्मरण करून वर्षातील इतर महिन्यापेक्षा त्यांची अधिक प्रमाणात संभावना करून, जो पूजाअर्चा विधी करता, त्यामुळे परोपकारार्थ केली गेलेली जी सेवा तुमच्याकडे शिल्लक राहिली आहे, तिचे व्यक्तिगत सेवा म्हणून रुपांतर होते. अशा या सेवेचे परोपकाराप्रीत्यर्थ म्हणून केलेले व्रत, व्यक्तिगत जीवनाशी जे एकरुप होते, अशा या विधीला 'सीमोल्लंधन'म्हटले आहे.

असे हे सीमोल्लंधन झाल्यावर, प्राप्त झालेली पुण्याई हिचे भोक्ते, त्या क्षणी तुम्ही होऊ नये, म्हणून ती तुम्ही आश्विन महिन्याच्या अखेरीस म्हणजे, धनत्रयोदशीच्या दिवसापर्यंत जतन करावयाची आहे. अशी जतन केलेली परोपकार-पुण्याई, हिचे रुपांतर पुन्हा लक्ष्मी-सरस्वतीमध्ये होऊन भविष्य काळ सुख-शांती-समाधानात जावा, म्हणून धनत्रयोदशीस लक्ष्मी-सरस्वतीचे पूजन आहे. त्यास 'दिपावली' म्हटले आहे. म्हणजे आपल्या जीवनात लक्ष्मी व सरस्वती यांचा प्रकाश जीवनोध्दारार्थ कारणीभूत व्हावा, म्हणून ह्या दिवसात दिपोत्सव करावयाचा आहे. इतक्या ह्या शास्त्राशुध्द भूमिकेतून तुम्ही जेव्हां आपल्या आचारविचाराशी एकनिष्ठ राहून, दिपावलीपर्यंतचा तीन महिन्याचा काळ व्यतीत करता, हे तीन महिने तुमच्या पुढील नऊ महिन्यांची तरतूद सुख, शांती, संपत्ती, म्हणून करीत असतात. ह्यासच दिपावली म्हटले आहे.



आता नवरात्र करण्याचा जो महत्वाचा कार्य-कारण-भाव आहे, हा आपण भक्तांना शास्त्रीय पध्दतीने समजल्यावर, आपणच मला असे विचाराल की, ह्या नवरात्र काळांत ज्या कोणी स्त्रीयांचे अंगात देवदेवता येतात असे सांगतात, यात काहीं सत्यता आहे काय? कारण अशा देवदैविक शक्ति सर्व सामान्य मानवाच्या माध्यमामध्ये प्रवेश करण्यासाठी, त्या माध्यमांचा देहिक विकास हा पूर्णतः व्हावयास पाहिजे. म्हणजे वर सांगितलेले देहातील रज, तम, सत्व गुण यासंबंधी जो खुलासा केला आहे, त्याप्रामाणे त्या व्यक्तींच्या ठिकाणी पंच्याहत्तर ते शंभर टक्के सत्वगुण विकसित व्हावयास पाहिजे. बाल्यावस्थेमध्ये म्हणजे जन्माला आल्यावर जो सत्व गुण शंभर टक्के असतो, तो आपल्या प्राप्त जीवनातील ठेवा म्हणून असतो पण पुन्हःश्च जेव्हां देवदैविक उपासना मार्गाने व धर्माचरणाने तुम्ही सत्व गुण प्राप्त करता, हा सत्वगुण तुमच्या ठिकाणी ठेवा म्हणून असत नसून, तो एक नैसर्गिक सामर्थ्य म्हणून असतो. असे हे सामर्थ्य जेव्हां आपण पंचाहत्तर ते शंभर टक्के इतके प्राप्त करता, तेव्हांच ह्या देवदेवतांची शक्ति देहात धारण होते. अन्यथा जी तुमच्या ठिकाणी देहिक शक्ति आहे, ती समोरील प्रसंगपरत्वे अधिक प्रकट होऊन असा अविष्कार करते की, तो देवतेचा संचार आहे. जर ह्या नऊ दिवसात स्त्री किंवा पुरूषांच्या अंगात आलेली तत्वे ही देवदेवता आहेत, तर त्याना विचारलेल्या प्रश्नोत्तराच्या वेळी त्यांच्या ठिकाणच्या परिपूर्ण सत्वगुणांची साक्ष प्रत्ययास कां येत नाही? उलट वारंवार प्रश्न विचारल्यावर जो अपशब्द संचार अवस्थेत असलेल्या व्यक्तींच्या तोंडून निघतो, असा शब्द देव युगापासून आजपर्यंत देवदेवतांनी

उच्चारलेला नाही. तेव्हां ज्या ठिकाणी देवाच्या नावांने असा देखावा तुम्हास अनुभवास येतो हे खरे किंवा खोटे हे तुमचे तुम्हीच पडताळून पहावे.

कुलधर्म कुलाचारपरत्वे नित्याने करावयाची उपासना व महत्वाची वार्षिक उपासना, या पूर्वीच आपणास निवेदन केलेली आहे. या शिवाय प्रामुख्याने घरोघरी भिन्नाभिन्न देवतांच्या पोथ्या, कवच, स्तोत्रे इत्यादिंचा संग्रह वाचनार्थ भरपूर केलेला आढळतो व नित्याने ती पठणही केली जातात. पण आपण ही स्तोत्रे, कवच किंवा पोथ्या कां वाचतो व त्याचा इष्टलाभ काय? याचा कुणीही कधीही विचार करीत नाही. कुणी म्हणतात जीवनात साडेसाती आली की, नवग्रह स्तोत्र, मारूती स्तोत्र किंवा शनि माहात्म्य वाचावे. पण अशा वाचनात येणाऱ्या स्तोत्रापासून ते कवचापर्यंत ज्यांनी ह्या साडेसातीच्या काळात पाठ केले आहेत, त्यांची साडेसाती जाऊन त्यांना निश्चितपणे सुखाचे क्षण प्राप्त झाले आहेत असा अचूक सिध्दांत आजपर्यंत तरी वाचनार्थ घेतलेल्या ह्या स्तोत्र, कवचापासून कुणी आत्मविश्वासाने सांगू शकतो काय? जन्माला आलेल्या प्रत्येक व्यक्तीला जीवनात साडेसाती ही असतेच. पण अशावेळी निश्चितपणे काय केले असतां या साडेसातीची पीडा होणार नाही, असे काहीं अचूक मार्गदर्शन सांगता येण्यासारखे नाही. पण प्रामुख्याने पहिली एक गोष्ट नजरेस येते की, आज आपली जीवनाबद्दलची भावना, श्रध्दा इतकी कमकुवत झालेली आहे की, साडेसातीला सुरूवात होताच जर सर्दी, पडसे झाले, तर साडेसातीला आरंभ झाला म्हणून ह्या माणसाचे हातपाय गळतात. वास्तविक हे रूढीपरत्वे साडेसातीमुळे झाले,



वातावरणातील दुषित हवेमुळे झाले वा आपल्या खाण्यापिण्यातील बदलामुळे झाले, हे लक्षात न घेता, खगोल शास्त्राप्रमाणे आज आपल्याला काहीं ग्रह प्रतिकूल आहेत असे कळले की, लगेच साडेसातीस व जीवनावर होणा-या वाईट परिणामाकडे लक्ष जाऊन, ह्या साडेसात वर्षाच्या काळात ग्रहांची वेगळी पीडा आहे, यापेक्षा जीवनाबद्दलचे जे अविचार आहेत हेच पीडित आहेत, असा कोणीही कधीही विचार करीत नाही. या उलट ह्या काळात जर आपण असे विचार करते व्हाल की, ‘मी परमेश्वराचा भक्त असून, ज्याची माझ्यावर अखंड कृपा आहे त्या माझ्यासारख्या परमेश्वरभक्ताला ही पीडा हानीकारक न होता, कल्याणकारकच होईल’, असा जर अत्मविश्वास निर्माण केला, तर देहातील आत्मिक शक्तिच्या प्रभावाने, म्हणजे आत्मविश्वासाने, ह्या वातावरणातून होणारे ग्रहांचे परिणाम व तुमच्या स्थूल देहातील माध्यमामध्ये विस्कळीतपणा निर्माण होऊन, तुम्हाला भोगावे लागणारे ग्रहांचे त्रास यातून तुमचा बचाव होईल. अशा अनेक प्रसंगामुळे व जे प्रसंग तुमच्या जीवनात कारणपरत्वे अनेक वेळा येणार आहेत, अशा प्रत्येक वेळी तुम्ही जर असा विचार करून, आपल्या जीवनातील काळ दु:खमय होणार आहे, अशी भावना विचारात घेतलीत, तर तुमचे पाऊल कदापिही पुढे पडणार नाही. याला असे म्हणता येईल की, ‘वाजे पाऊल आपुले, म्हणे मागे कोण आले? ’या प्रमाणे जीवनात कोणत्याही कारणपरत्वे, जन्मकर्मपरत्वे किंवा ग्रहपरत्वे येणाऱ्या प्रसंगपरत्वे ज्या ज्या प्रतिकूल गोष्टी आहेत, त्या आपल्यालाच निवारण केल्या पाहिजेत. यासाठी पोथ्यापुराणे, स्तोत्रे, कवचे, भिन्नाभिन्न देवता यांच्या उपासना उपयोगी पडत

नाहीत. उदाहणार्थ ज्या मारुतीचे स्मरण आपण आयुष्यात केलेले नसते, तो मारुती आपल्याला साडेसाती आल्यावर आठवू लागतो.लागलीच आपण त्या देवतेच्या पायाशी जाऊन ठेपतो. आपल्यापूर्वी तेथे आपल्यासारखेच अज्ञानी लोक दर्शनार्थ वाट पाहत असतात. दर्शनादि विधी झाल्यावर, मारुती प्रसन्न होण्यासाठी, त्यानी काहीं अपरिचित असे, म्हणजे मारूतीच्या अंगावर तेल घालणे इत्यादि प्रकार केलेले असतात. हा प्रकार दिसल्यावर आपली अशी भावना होते की, इतर भक्तांनाही साडेसातीने ग्रासले आहे म्हणून आपणही मारुतीच्या अंगावर तेल घालण्यास सुरुवात करतो. वास्तविक आपल्या साडेसातीला भिऊन आपण मारुतीला तेल अर्पण करीत आहोत, याचा काहींतरी संबंध अर्थाअर्थी जीवनात आहे काय? असा कांही विचार न करता, जे वर्षानुवर्षे अनुकरण म्हणून देवतार्जन चालले आहे, ते किती हास्यास्पद आहे हे तुमचे तुम्हीच ठरवा.

अशाच प्रकारचे काहीं अनुकरणाचे दृष्टोत्पत्तीस येणारे प्रयोग म्हणजे बऱ्याच देवतांच्या देवस्थानांजवळ काहीं भक्त पशुपक्ष्यांचे बळी देत असतात. वास्तविक बळी देऊन देवदेवतांना संतुष्ट करण्याचा विधी कोणत्याही शास्त्रपुराणात आधार म्हणून सांगितलेला नाही. पण कोणत्या तरी युगात कुणा एका व्यक्तीने जो हा बळी देण्याचा प्रघात सुरू केला, त्यापासून आजच्या सज्ञान युगापर्यंत, मनुष्य जरी सज्ञान झाला आहे असे आपण म्हणतो, तरी त्याच्या वार्षिक कुलोपासनेच्या आचारविचाराकडे पाहिले की असे वाटते की, ह्याचे हे सुशिक्षीत होण्याचे लक्षण, जे समाजाला सामाजिक कार्य म्हणून व्यक्त होत आहे, तोच त्यांचा सुशिक्षीतपणा देवदेवता व धर्म यांच्यापुढे कसा नमता



होतो? हा बळी देण्याचा प्रघात जो अज्ञानीपणाने आपण स्वीकारलात, त्यामुळे आपल्या कुलदेवतांच्या पवित्र स्थानात काय कमीपणा आला, याचा तरी सूज्ञपणाने विचार करते झालात काय? देवदेवतांच्या युगापासून ऋषीजनानी स्थापित व अधिष्ठित केलेल्या ह्या देवदेवता, यांच्या ठिकाणी जे अलौकिक सामर्थ्य निर्माण केले होते व ज्या सामर्थ्याचा लाभ तुम्हाला त्या तुमच्या कुलदेवदेवतां यांचे चिंतन, त्यांच्या स्थानापासून दूर राहून केल्यानेसुध्दा कृपाशिर्वाद म्हणून प्राप्त होत होता, त्या देवदेवतांच्या ह्या परिसरांमध्ये असा बळी देण्याचा हा प्रघात तुम्ही कैवळ रूढीपरंपरेमुळे व अज्ञानाने केल्यामुळे, स्वाभाविक या देवदेवतांच्या क्षेत्रात दूषीतपणा आला. अशाप्रकारे तुम्ही विचारात घेतलेल्या प्रश्नांचा 'कौल' म्हणजे 'प्रसाद'. हा, जर योग्य झाला नाही, तर याला देवदेवता जबाबदार आहेत कीं तुम्ही जबाबदार आहात, हा ही विचार सूज्ञपणाने करा.

वरील बळी देण्याची प्रथा काहीं अज्ञानी व्यक्तिद्वारा अनुकरणात आली ही गोष्ट जरी खरी, तरी जे ज्ञाते आहेत व ज्यांना शास्त्राधार व शास्त्रे अवगत आहेत, अशांनी तरी ह्या देवदेवतांचा परिसर पवित्र व शुध्द राखला आहे काय? ज्या कुटुंबियांचे उपाध्येपण ज्या गुरुजनांकडे आहे, ते ह्या कुलदेवतांचे सेवेकरी आहेत व ते त्यांची सेवा करीत असतात. ह्या गुरुजनांचे उपाध्येंपण ज्या घराण्यापरत्वे आहे, त्या घराण्यातील दोष म्हणजे विद्या, संपत्ती, संतती आदिंचा नाश होतो म्हणून श्राध्दपक्ष, त्रिपींडी, नागबळी, नारायण नागबळी, पुत्रकामेष्टी इत्यादि विधी गुरुजन दोष निवारणार्थ त्या पवित्र अशा कुलस्वमिनीच्याच परिसरामध्ये करीत असतात. एका

बाजूला बळी देण्याचा प्रघात व दुसऱ्या बाजूला ज्या तुमच्या घराण्यातील दिवंगत व्यक्ती मरणोत्तर जीवनानंतर मुक्त झालेल्या नाहीत, अशांना दोषमुक्त करून सद्‌गती देण्याचे विधीही याच ठिकाणी होत असतात. अशामुळे या देवतांचा परिसर हा आपण सूज्ञ लोक किती अपवित्र करीत आहोत, याचा विचार करून, दोषपरत्वे करावे लागणारे विधी यांचा विधीनिषेद शास्त्रीय व शास्त्रोक्तपध्दतीने जरी सांगितला आहे, तरी त्याचा विचार अज्ञानीही करीत नाहीत व सज्ञानाही करीत नाहीत.

अशाप्रकारे आपल्याला आपल्या देवदेवतांच्या कृपाशिर्वादाची भेट प्राप्त करण्यास जो विलंब लागतो, त्यासाठी घेण्याच्या प्रसादाचे किंवा कौलाचे अनुमान तेथील पुजारी असे सांगतात की, देवीची किंवा देवतांची तुम्हा कुटुंबियांवर अवकृपा आहे. वास्तविक जगाच्या उत्पत्तिपासून आज दिवसापर्यंत कुणीही देवदेवतां यानी कुणावरही अवकृपा केलेली नाही. पण 'अवकृपा' म्हणून होणारा जो प्रसाद किंवा कौल आहे हा देवतेचा नसून, देवतांच्या परिसरामध्ये जी अपवित्रता किंवा अमंगल अशी कृत्ये झाली आहेत त्याची साक्ष ह्या कुलदेवदेवता देत असतात. पण प्रसादातील ह्या देवदेवतांचा व्यक्त भाव जाणण्याची शक्ति तुमच्याकडे किंवा गुरुजनांकडेही नाही म्हणून. ते असे सांगतात की, घरावर किंवा कुटुंबांवर देवदेवतांची अवकृपा आहे. हे ऐकतांच आपण संकटग्रस्त असल्यामुळे, गुरुजी सांगतील तो विधी निमूटपणे करण्यास तयार होतो. यापेक्षा त्या प्रसादावर किंवा कौलावर विसंबून न राहता आपण त्याची शहनिशा करण्यासाठी आपल्या घरी स्थापित केलेल्या देवदेवतांसमोर आपण बसून, प्रार्थनापूर्वक या प्रश्नांची विचारणा करावी. या



प्रार्थनेत आपण काहीं मुदतीचा काळ मागून घ्यावा. तो असा की, 'आई, तू माझ्या घराण्याची रक्षणकर्ती असून, माझ्या यथाज्ञानाने व यथाशक्तिने मी तुझी आराधना करीत आहे. प्रसादावर किंवा कौलावर तू जो अवकृपेचा निर्णय दिला आहेस, हे सत्य मला तू तीन / सात दिवसात जर सांगण्याची कृपा केलीस, तर माझ्या अज्ञानाने घडलेल्या प्रमादाबद्दल मी यथाशक्ति व यथाज्ञानाने प्राय:श्चित घेऊन, तुझी कृपा प्राप्त होण्यासाठी, सदैव तुझ्या सेवेत व चिंतनात राहीन'. या प्रार्थनेचा प्रतिसाद निश्चित तुम्हाला तीन/सात दिवसात मिळाला पाहिजे. असे जर असेल तर तुमची धार्मिक कृत्ये, व्रतवैकल्ये, उपासतापास व देवतांबद्दलचे कुलाचार, हे गुरुजनांवर अवलंबून नसून, ते स्वत:च्या पोषक अशा आचारविचारावर अवलंबून आहेत, याची साक्ष देवदेवतांनी दिल्यावर, निश्चितपणे तुम्हाला तुमच्या हयातीत, संशयाने पछाडलेल्या भूमिकेपरत्वे गुरुंजनांनी सांगितलेल्या ह्या देवदेवतांच्या पूजा व उपासना यावर अवलंबून रहावयाला नको.

आपण भक्तानी नित्याने आवश्यक जी उपासना काय व कोणती करावी, याबद्दल योग्य असे मार्गदर्शन मागे केलेलेच आहे. आता नित्याने काहीं प्रार्थना म्हणण्याची संवयसुध्दा आपणास व्हावयास पाहिजे. यासाठी सोप्यात सोपे मार्गदर्शन असे की, आपण भक्तांना भक्तिमार्गप्रदीप म्हणून पुस्तक बाजारात मिळते हे माहीत असेलच. किंवा काहींच्या संग्रहीसुध्दा ते असेल. ह्या पुस्तकांतसुध्दा जरी अनेक स्तोत्रे, आरत्या, भोपाळ्या, अभंग छापलेले आहेत, तरी नित्याने घरातील सर्व व्यक्तीनी या पुस्ताकांत जे 'मंगलाचरण' छापलेले आहे, ते पाठ करून, सकाळी किंवा सायंकाळी, आपल्या घरातील सर्व

व्यक्तींनी एकत्र बसवून, ते म्हणावयाची शिकवण द्यावी. या मंगलाचरणात सर्व देवदेवतांचा नामनिर्देश झालेला असून, वेगवेगळ्या देवतांप्रीत्यर्थ असणारी स्तोत्रे व पोथ्या यांचा पाठ करण्यापेक्षा, नित्याने हे मंगलाचरण म्हणण्याची संवय सर्वांनी जर लावून घेतली, तर अगदी सोप्यात सोप्या अशा मार्गाने तुमच्या हातून धार्मिक आचरण, देवादिक उपासना, ही वेळच्यावेळी प्रतिदिनी होऊन, तुम्हाला तुमच्या काया, वाचा, मनाची शुध्दता सदैव राखता येईल. अशा प्रथमावस्थेतील उपासनासाधनेने तुमचा जेव्हां पाया तयार असतो व जेव्हां जीवनात दोषपरत्वे आलेल्या पीडा निवारण करण्यासाठी तुम्ही साधकाकडे आपल्या दु:खनिवारणार्थ जाता, तेव्हां जीवनातील दु:खे निर्माण होण्याची जी कारणे आहेत, त्याला योग्य असे निराकरण केल्यावर, त्या निराकरणपरत्वे तुमच्या जीवनातील किंवा कुटुंबातील दु:ख तथा अशांतता निर्माण करण्यास काहीं दोष कारणीभूत होतात, त्यांच्या निवारणार्थ साधकाला जी उपाय योजना करावी लागते, त्यासाठी प्रश्न विचारण्यासाठी जे भक्तभाविक उपस्थित असतात, त्यानी कृपाशिर्वादार्थ आपल्या जीवनाचा पाया जर सुलभ अशा उपासनेतून तयार केलेला असेल, तर हे दोष निवारण होण्यास वेळ न लागता, इच्छित असे प्राप्त सुख आपण सहजासहजी मिळवू शकू.

वरील सर्व निवेदन व कार्यपध्दती ह्या तुमच्या वाचनात आल्यावर तुम्हास असे लक्षात येईल की, या कार्यपध्दतीतील निराकरणे व त्यासंबंधीची शास्त्रीय मीमांसा ही काहीं तर्कशास्त्रावर आधारलेली नाही किंवा जीवनाबद्दल निराधार अशी भूमिका निर्माण व्हावी ह्या हेतूने वरील कोणताही विषय व



निराकरणे सूचित केले गेलेली नाहीत. आज परमेश्वर कृपेने या लोककल्याणाच्या कार्यास आरंभ होऊन बरीच वर्षे झाली. या अनेक वर्षात परमेश्वरकृपेने ज्या व्यक्तीच्या अडिअडचणी निवारण करण्याचे मार्गदर्शन करण्यात आले. त्या मार्गदर्शन पध्दतीप्रमाणे, या मानवी जीवनातील सुखदु:खांचा विचार हा जो अवलोकन केला गेला, त्याचा विचार या कार्यपध्दतीत अभ्यास या दृष्टीनेच केला गेलेला असून, ज्या निराकरणपध्दती आज आपणास सूचित करण्यास येत आहेत, त्या सिध्दसिध्दांतपध्दतीने सिध्द असून, कोणतेही निराकरण जे येथे केले जाते, ते नियुक्त सेवकाच्या वैचारिक व इच्छापरत्वे नसते, हे सूज्ञ भक्तांनी लक्षात घेऊन, या कार्याचा लाभ शास्त्रीय पध्दतीने जर घेतलात, तर आपणच आपल्या सुखाचे वाटेकरी व्हाल.

# कार्याची निराकरण पध्दती

या कार्यपध्दतीकडे पाहण्याची आपली भूमिका एवढीच आहे की, येथील साधक व नियुक्त सेवक हे केवळ परमपूज्य बाबांचे आपल्याच सारखे भक्त असून, आपल्यापेक्षा त्यांच्यावर परमपूज्य साईबाबांची कृपा अधिक झाली आहे; त्यामुळे हे आपल्या अडिअडचणी निवारण करीत आहेत. अशा ह्या संकुचित विचारांनी, ह्या कार्यपध्दतीने अंगिकारलेले जे लोककल्याणाचे कर्तव्य आहे, त्याची मूलभूत भूमिका आपण भक्तांना माहीत होत नाही व तत्संबंधीची माहिती करून घेण्यासाठी आजपर्यंत प्रयत्न केला गेला नाही.

या कार्याची कार्यकेंद्रे आज दिल्ली, मुंबई, पुणे, कराड, पणजी (गोवा), इत्यादी ठिकाणी असून, त्या ठिकाणी या कार्यार्थ स्वतंत्र अशी जागा असून, नित्याने तेथे सकाळ-सायंकाळ पूजा-आरती होत असते. पण नित्याने होणारी पूजाअर्चा यामध्ये आपण भक्त किती सहभागी होता? जेव्हा ‘कामकाज’ व त्याबद्दलचे दिवस व तारखा जाहीर होतात, तेव्हा ह्या सर्व कार्यकेंद्रावर उठण्या-बसण्याससुध्दा जागा पुरत नाही. पण नित्याच्या उपासनेच्या वेळी बोटावर मोजण्याइतकीच भक्तमंडळी उपस्थित असतात. आज ही कार्यकेंद्रे चालविण्यासाठी होणारा खर्च, याची अपेक्षा तुम्हां भक्तांकडून कधीच करण्यात आली नाही. याउलट तुम्ही कुटुंबियमंडळी सुखी व्हावीत हीच अपेक्षा विचारात घेऊन, या कार्यकेंद्राप्रित्यर्थ होणारा मासिक खर्च करावा लागत आहे, याबाबत कदापिही खेद वाटला नाही. कारण एकदा आपण



लोककल्याणाचे कार्य सेवा म्हणून हाती घेतल्यावर, ‘सेवा करणे’ हाच प्रधान विषय असतो. तेव्हा आपण भक्त गरीब आहात वा श्रीमंत आहात, हा विचार करुन निराकरणे होत नाहीत; तसेच आपल्या पै पैशाबद्दल, किंवा प्राप्त झालेल्या सुखाबद्दल अपेक्षाही नाही. या प्रत्येक कार्यकेंद्रावर सकाळी व सायंकाळी पूजाअर्चा विधी करण्याचा जो प्रघात तुम्ही उपस्थित नसलात तरी चालू ठेवला आहे, याचे कारण तुमच्या कल्याणार्थ तर आहेच, परंतु ज्या गुरुस्थानाचा आज आपण कृपाशिर्वाद घेत आहोत, त्याची फेड कर्तव्य म्हणून करावयास हवी, अशी जी शिकवण गुरुकृपाशिर्वादाने मिळाली आहे, तेच व्रत आजपर्यंत चालू ठेवले आहे.

आपण सर्व भक्तभाविक कुटुंबवत्सल जीवन व्यतीत करीत आहात. आजच्या परिस्थितीत तुम्हाला जरी देवाबद्दल, धर्माबद्दल, शुध्द आचारविचाराबद्दल, उपासना साधनेबद्दल, आस्था निर्माण झाली तरी ती करण्यासाठी योग्य जागा, योग्य वेळ, योग्य प्रकारचे वातावरण, योग्य आचारविचार यांचा अभाव असल्यामुळे ती करता येत नाही. अशामुळे साहजिकच नित्याने धर्माचरण व देवतार्जन जे तुमच्या हातून घडणे अत्यावश्यक आहे ते घडत नाही. याबद्दल आस्थापूर्वक विचार करुन, ह्या सर्व कार्यकेंद्रांच्या जागा भाड्याने घेण्यात आल्या असून, तेथे सर्व सोयी, म्हणजे स्नानादि विधीपासून आपणास आरती, जपजाप्य, पारायण, प्रार्थना इत्यादी व ती आपल्या वेळेप्रमाणे करण्याची सोय ठेवूनसुध्दा, तुम्हाला त्याचा लाभ करुन घेणे अवघड वाटते. केवळ कार्यार्थ सेवा करावयाची असा जर उद्देश असता, तर ह्या सर्व दिवशी कोणाही भक्ताच्या घरी वास्तव्य करुन हे कार्य

करता येण्यासारखे आहे. यासाठी एवढा खर्चिक खटाटोप करावयाचे कारण नाही. आपल्या जीवनातील अडिअडचणी निवारण व्हाव्यात, आपल्या जीवनाचा विकास व्हावा, आपल्या मुलाबाळांना योग्य अशा धर्माचरणाची संवय होऊन, त्यांच्या जीवनाचा पाया धार्मिक आचार विचारांच्या भूमिकेवर सुदृढ व्हावा, या सर्व हेतूंनी साकार झालेले हे कार्य जगातील दु:खी लोकांच्या जीवनाचा उध्दार करण्यासाठी आहे. ते केवळ ह्या कार्यातील प्रमुख साधक व नियुक्त सेवक यांच्यासाठीच नसून, ते आपल्या सर्वांसाठी आहे. आपण जरी आपल्या अडिअडचणी निवारण व्हाव्यात ह्या भूमिकेतून या कार्याकडे पाहत असलात, तरी हे कार्य तुम्हा भक्तांना 'संकटग्रस्त' म्हणून संबोधित नाही. कार्यकेंद्रावर आपण उपस्थित झाल्यावर आपल्या सुखदु:खाची विचारणा आदराने व पूज्य भावनेने विचारात घेऊन, तुमच्या ऐहिक व कौटुंबिक अडचणी आपल्याच आहेत, अशा विचाराने श्रीसद्‌गुरुकृपाशिर्वादाने तुमच्या हिताची ही कार्यपध्दती कार्यान्वित करण्यात आली आहे. या कार्याचा पाया उभारण्यास जरी श्रीसद्‌गुरुकृपाशिर्वादाचा लाभ झाला आहे. तरी ह्या कार्याचा विशाल विकास आज गेल्या अनेक वर्षात जो झाला आहे, तो आपण भक्तांची ह्या कार्यार्थ जी श्रध्दा आहे, त्याचे प्रतिक व प्रचीती आहे. हा एकप्रकारचा शुभाशिर्वाद असून, जी निष्ठा आपण ह्या कार्यार्थ व्यक्त केलेली आहे, त्याचे विस्मरण कधीही होणारे नाही. यासाठी आपल्याबद्दल आज जो आपलेपणा व आपल्या सुखदु:खात सहभागी होण्याची भूमिका, ज्या कार्याने अवलंबित केली आहे, अशा कार्यार्थ सर्वस्वाने एकरुप होऊन, आपण सर्व भक्तांनी प्राप्त जीवन हे केवळ ऐहिक जीवन म्हणून



विचारात न घेता, 'मला माझ्या जीवनात पारमार्थिक जीवन प्राप्त करण्याचे आद्य कर्तव्य करावयाचे आहे', हे विसरता कामा नये. आज आपण भक्तांच्या जीवनात आपले आप्त, इष्टमित्र असा सर्व परिवार नित्याने आहे. त्यापैकी कुणालातरी आपल्या जीवनाबद्दल एवढी निरासक्त आसक्ती आहे काय? याचा जर विचार केला, तर आपणास आपले म्हणून म्हणण्याची ही जी कार्याची निरपेक्ष भूमिका सद्‌गुरुकृपाशिर्वादपरत्वे अंगिकारलेली आहे, ती तुमच्या जन्मदात्या आईवडिलांप्रमाणे तुमच्या पालनपोषणार्थ नित्याने तुमच्यासमोर हात जोडून उभी आहे. असे असता समाजात केवळ देवदेवतांचे, धर्माचे भांडवल स्वत:च्या उपजीविकेसाठी निर्माण करुन, जो गुरुमार्गाचा भास आज निर्माण होतो आहे, याची यथायोग्य ओळख करुन घेऊन, तुम्ही योग्य काय व अयोग्य काय हे ठरवूनच या कार्यपध्दतीचा लाभ घ्यावा.

या कार्यपध्दतीत केली जाणारी जी निराकरणे देवदेवतांशी संबंधित आहेत, त्यांचा लाभ आपल्याला आपल्या जीवनात कृपाशिर्वाद म्हणून घ्यावयाचा आहे. असा कृपाशिर्वाद आपण घेतल्यावर, त्याचा यथोचित लाभ आपणास कां होत नाही? याचे कारण आपल्या देहिक माध्यमाच्या बाहेर जी प्रतिकूल वलये आहेत, त्या वलयांची धारणा कुटुंबातील दिवंगत झालेल्या व्यक्तींच्या इच्छावासनापरत्वे असते. अशा या इच्छावासना सात पिढीपर्यंतच्या असून, त्या इच्छावासनांची वलये आपण प्राप्त केलेल्या कृपाशिर्वादावर आघात करुन, जीवनात ज्या ऐहिक इच्छा आपण भक्तांच्या असतात, त्या म्हणजे विद्या, संपत्ती, संतती व दीर्घायुष्य; या प्राप्त करण्यासाठी

एक तर दीर्घ काल लागेल किंवा ही वलये विमोचित करण्याचे साधन जर आपल्याला प्राप्त झाले नाही, तर ह्या अपेक्षा आपल्या हयातीत पूर्ण होत नाहीत. अशी ही जी क्रिया वातावरणातून इच्छा-वासनेच्या रुपाने आपल्या देहाशी एकरुप होत असते, ती वलये तुमच्या जीवनापासून मुक्त करुन, घराण्यातील ज्या व्यक्ती दिवंगत झाल्या आहेत व ज्यांच्या इच्छावासना इहजगताशी वलय रुपाने कार्य करीत आहेत; अशी ही वलये विमोचित करणे व मुक्तावस्थेस किंवा उच्चावस्थेस न गेलेले मृतात्मे यांना सद्‌गती देण्याचे जे साधन या कार्यपध्दतीत आहे त्यास 'वंशविमोचन' असे म्हणतात.

वंशविमोचन, हा शब्द उच्चारल्यावर आपल्याला अर्थ एवढाच लागतो की, आपल्या जीवनातील व घराण्यातील जे दोष आहेत, त्यांचे विमोचन सद्‌गुरुंनी करुन द्यावे. असा अर्थ सूज्ञपणाने आपण लावला तरी हे साधन प्रथमतः प्राप्त करणे हेच साधक अवस्थेतील साधकाला अत्यंत कठीण आहे.

याशिवाय हे साधन जरी प्राप्त करता आले, तरी त्याचा लाभ जगातील सर्वांना देण्यासाठी व जीवनांत जे दोष आहेत त्यांचे निवारण होण्यासाठी साधकाला फार कष्ट आहेत. या कार्यपध्दतीत दरवर्षी हा जो विधी करण्यात येतो त्याचा लाभ आपणास सहजासहजी घेता येत आहे; म्हणून हे साधन सोपे आहे असे समजूं नये. या कार्यपध्दतीत हे साधन व त्याची प्राप्ती जी गुरुकृपाशिर्वादाने झाली आहे, तत्पूर्वी अशा दोषांच्या निवारणार्थ काहीं साधने नव्हती काय? तर आजही अशा दोषांपासून तुमच्या कुटुंबियांना मुक्त करण्यासाठी



धर्मशास्त्राप्रमाणे काहीं विधी सांगितलेले आहेत. ते म्हणजे होमहवन, जपजाप्य, व्रतवैकल्ये, अनुष्ठान, याशिवाय नवचंडी, शतचंडी, सहस्त्रचंडी, बाजपेय यज्ञ, त्रिपिंडी, नागबळी याशिवाय पिंपळाला प्रदक्षिणा, औदुंबराला प्रदक्षिणा किंव काहीं दानधर्म पण ही सर्व धर्मकृत्य विधी म्हणून करण्यात येतात. जीवनातील दोषनिवारणार्थ जेव्हा गुरुकृपाशिर्वादाची प्राप्ती होत असते, त्या साधनांनी व शास्त्रांनी सांगितलेला विधी यामध्ये जमीन अस्मानाएवढा फरक आहे. दोष निवारणार्थ जेव्हां गुरूकृपाशिर्वादाची प्राप्ती होत असते त्या साधनांत गुरुसामर्थ्याचा समावेश असतो म्हणजे हे साधन एखाद्या अस्त्र किंवा शस्त्र याप्रमाणे प्रभावी असते. जेव्हा हे साधन म्हणजेच सद्‌गुरुंची शक्ति दोषनिवारणार्थ कार्य करते, तेव्हा ह्या दोघांची वलये तात्काळ दूर होतात पण जो विधी आपण वैयक्तिकरीत्या करता तो धार्मिक विधी करीत असतांना प्रथमतः या दोषांचा उच्चार संकल्पविधीने करावा लागतो. वास्तविक कोठलाही धार्मिक विधी हा संकल्पयुक्त करावा लागतो असे शास्त्र आहे; हे जरी खरे तरी जे दोष वलयरुपाने आहेत पण जे माध्यमात धारण झालेले नाहीत, अशांचा देहमाध्यमातून वाणीद्वारा जेव्हा उच्चार केला जातो, तेव्हा ही वलये जी देहाबाहेर असतात ती देहाशी एकरुप होतात. अशासाठी दोषनिवारणार्थ जेव्हा आपण एखादा धार्मिक विधी करतो, तेव्हा दोषांचा उच्चार वाणीने करु नये. कारण जेव्हा तुम्ही विधी करावयास बसता, तत्पूर्वी ह्या प्रखर दोषांचे दुष्परिणाम तुम्ही आपल्या जीवनात पूर्वी अनुभवलेले असतात. असे असताना त्याचा जेव्हा वाणीमाध्यमातून उच्चार करता, तेव्हा ह्या दोषापैकी अर्धेअधिक दोष हे तुमच्या देहिक

माध्यमाशी एकरुप होतात. दोषनिवारणार्थ उच्चारलेल्या संकल्पानंतर ह्या दोषनिवारणार्थ ज्या इष्टदेवता आवश्यक आहेत त्यांची स्थापना करण्यांत येऊन पूजनादि विधी झाल्यावर, प्रधान कृत्यास म्हणजे होमहवनास सुरुवात होते. शास्त्रपरत्वे होमहवनादि विधी होऊन, जरी पूर्णाहुतीचा संकल्प पुरा झाला, तरी या विधीपरत्वे तुमच्या जीवनातील दोषांपैकी फक्त पन्नास टक्के दोष जे तुमच्या बाहेर वातावरणात आहेत, त्यांचे विमोचन होते. पण या विधीला आरंभ करण्यापूर्वी तुम्ही तुमच्या वाणीने तुम्हाला होणाऱ्या त्रासाबद्दल जो उच्चार केलात, त्यामुळे ते पन्नास टक्के दोष तुमच्या माध्यमांमध्ये शिल्लक राहून, हे राहिलेले दोष जर तुम्हाला कळले नाहीत, तर केला गेलेला जो विधी आहे, त्याचे फळ फक्त पन्नास टक्के मिळून, राहिलेले पन्नास टक्के दोष तुमच्या घराण्यातील भावी पिढ्यांच्या जीवनात पुनश्च कर्म करण्यासाठी कार्यान्वित होतात. तोपर्यंतच्या काळांत, पुन्हा एका पिढी नंतर कुणी व्यक्ती दिवंगत होऊन पुन्हा वातावरणात पितृत्रयी म्हणजे पिता, पितामह व प्रपितामह व मातृत्रयी ही निर्माण होते. असे हे दोषांचे कार्य कालपरत्त्वे अबाधित राहून, तुमच्या घराण्याचा जो ऱ्हास होतो तो पिढ्यान पिढ्या राहून एक पिढी अशी जन्मास येते की, ना विद्या, ना संपत्ती, ना संतती! अशासाठी या कार्यपद्धतीत हा विधी गुरूद्वारा करण्यात येतो कारण हा विधी करण्याचा अधिकार गुरुंना दिल्यावर, ही वलये गुरुंच्या सामर्थ्यामुळे त्यांच्या वाणीतून जरी असा दोषांचा उच्चार झाला तरी गुरुमाध्यमापासून दूर राहतात. म्हणजे शंभर टक्के वलये तुमच्या माध्यमाबाहेर राहून, कृपाशिर्वादार्थ हा जो विधी केला आहे त्याचा लाभ



आपल्याला आज ना उद्या शंभर टक्के होत असतो.

हा विधी करण्यासंबंधी पूर्वीच्या शास्त्रपरत्त्वे असे सांगण्यात आले आहे की, हे विधी जर राहत्या जागेमध्ये करण्यात आले तर आपण राहात असलेल्या जागेची वास्तू दूषित होते व जर कुणी अज्ञानाने हा विधी आपल्या राहत्या वास्तूत केला तर पुनश्च त्या राहत्या जागेची वास्तुशांत करावयास हवी. ह्यासाठी पूर्वीच्या शास्त्रांनी हे विधी करण्यासाठी जी तीर्थक्षेत्रे सांगितली आहेत ती म्हणजे रामेश्वर, गोकर्ण महाबळेश्वर, नरसोबाची वाडी, त्र्यंबकेश्वर, मध्यप्रदेशात, ॐकारेश्वर, उत्तर भारतात प्रयाग, काशी, गया आदि ठिकाणीच हा विमोचनाचा विधी वैदिक व याज्ञीक अशा गुरुजनांच्याकडून करून घ्यावयास हवा.

हा विधी व्यक्तिगत कुटुंबाला करण्यास बराच खर्च व प्रवास खर्च सोसावा लागतो. तरीसुद्धा हा विधी पूर्णत: हितकारक होईल असे कोणास निश्चित सांगता येत नाही. हा विधी कुटुंबकल्याणाच्या हिताचा असल्याने तो करण्याकडे दुर्लक्षही करून चालत नाही. यासाठी गुरुमार्गात सद्‌गुरुकृपाशिर्वादाने त्याची तरतूद झाली आहे म्हटल्यानंतर प्रत्येक भक्तभाविकाने याचा आस्थापूर्वक विचार करून दरवर्षी करण्यात येणाऱ्या या विधीत सहभागी व्हावे. हे साधन प्राप्त करणे किती असाध्य आहे याबद्दल चार शब्द वर लिहिलेलेच आहेत. या वर्षी परमपूज्य बाबांच्या आज्ञेप्रमाणे श्री. क्षेत्र नरसोबावाडी येथे हे हवनविधी जे यथासांग करण्यात आले होते, त्यावेळी तेथे उपस्थित असणाऱ्या वेद-वैदिकांनासुद्धां या विधीबाबत आश्चर्य वाटले. ह्या विधीची

सांगता झाल्यावर न कळत त्यांच्या वाणीतून असा उच्चार निघाला की, 'लोक कल्याणाच्या हितार्थ इतके प्रखर साधन प्राप्त करून आपल्या भक्तांच्या भवितव्याची तरतूद आज तरी कलियुगात कुणी केली आहे असे आम्हास वाटत नाही, ' हा अभिमान व्यक्तिगत नसून, या कार्याला लाभलेला हा जो गुरुकृपाशिर्वाद आहे त्या कार्याचा हा अभिमान आहे, असे मनमोकळेपणे सांगण्यास अभिमान वाटतो.

हा विधी व तो करण्यामागील सद्हेतू आपण भक्तभाविकांना वर निवेदन केलाच आहे. ह्या विधीत भाग घेतल्यावर कार्यपद्धतितील मार्गदर्शनाप्रमाणे सर्व भक्तभाविकांना असे सांगण्यात येते की, दरवर्षी भाद्रपदात जो पितृपक्ष येतो, त्यावेळी कोणत्याही तिथीला किंवा सर्वपित्री अमावास्येला श्राद्धपक्षादि करू नका पण या मागील सद्हेतू अनेक जणांना अजूनतरी परिचित झाला आहे असे वाटत नाही. तुमच्या घराण्यातील सात पिढीतील दिवंगत व्यक्ति इहजगताशी आपल्या इच्छावासनापरत्त्वे व ऋणानुबंधपरत्त्वे हितसंबंध जोडून आपल्या इच्छावासनांचीच केवळ पूर्तता करीत असतात असे नव्हे, तर त्यांची जी मरणोत्तर जीवनानंतर प्राप्त झालेली अवस्था आहे, त्या अवस्थेपरत्त्वे त्यांच्या इच्छावासनांमधून निर्माण झालेली वलये यांचा समावेश तुमच्या जीवनामध्ये होऊन तुमचेही काया-वाचा-मन हे दुषित होते. म्हणजे केवळ त्यांच्या ज्या इच्छावासना ह्या इहजगताशी आहेत, त्यांचेच विमोचन होते असे नव्हे, तर ज्या वासनायुक्त अवस्थेत ते असतात, त्यांना उत्तम लोक प्राप्त करून देण्यासाठी हा वंशविमोचन विधी होतो. त्यानंतर त्यांच्या स्थिती अवस्थेत स्थित्यंतर होऊन ते उत्तम लोक प्राप्त करते



होतात. अशावेळी पुनश्च आपण या दिवंगत व्यक्तींच्या ऋणानुबंधात आहोत असे मानून श्राद्धपक्षादि विधी केले, तर वंशविमोचनानंतर प्राप्त झालेली उत्तम अवस्था यापासून या दिवंगत व्यक्तींना तुम्ही पुनश्च कनिष्ठ अशा अवस्थेमध्ये आवाहन करता. अशा आवाहनामुळे जरी वंशविमोचनविधीपरत्त्वे त्यांना उत्तमलोक प्राप्त झाला असला तरी वार्षिक श्राद्धपक्ष काळात तुम्ही त्यांना जे आवाहन पिंडदान करून करता, त्यामुळे पुन्हा त्यांना उत्तम अवस्थेत सहजासहजी जाता येत नाही.

वरील प्रकार धार्मिक आहे म्हणून तो 'श्राध्दपक्ष' या नांवाने संबोधला जातो. तसाच प्रकार जो आज समाजात 'प्लँचेट' या नांवाने संबोधला जातो, त्यामध्ये आपल्या अडिअडचणी व त्यासंबंधीची प्रश्नोत्तरे विचारण्यासाठी मृतात्म्याना आवाहन करुन बोलविले जाते. हे प्लँचेट करण्यास जरी आजुबाजुच्या लोकांना गंमत वाटत असली, तरी ज्या व्यक्ती हे करण्यास उपस्थित असतात, त्यामध्ये एखादी व्यक्ती अशी असते की, तिचे देहिक माध्यम ह्या मृतात्म्याना प्रवेश करण्यास खूपच अनुकुल असते. अशा अनुकुल असणाऱ्या माध्यमाच्या ठिकाणी हा मृतात्मा प्रकट झाल्यावर, ज्या व्यक्तीत तो प्रकट होतो त्या व्यक्तीची इच्छित जीवनाची अपेक्षा कार्यान्वित होण्यास याचा अडथळा निर्माण होतो. एवढेच नव्हे तर ज्या कोणी मृतात्म्याला मरण प्राप्त होण्यापूर्वी जी व्याधि, जो रोग, जो आजार झाला असेल, त्याच प्रकारची व्यथा या माध्यमाला प्लँचेटमुळे होते. असा आजार झाल्यावर जरी आपण डॉक्टरी सल्ला घेतला व वैयक्तिक तपासणी केलीत, तरी झालेल्या मूळ रोगाचे परिक्षण डॉक्टरांनाही करता येत नाही.

अशामुळे आपला पैसा अनाठायी खर्च होतो एवढेच नव्हे तर शारिरीक हानी सुध्दा होते.

प्रत्येक मानवाला भूत-भविष्य काळ हा त्याच्या कर्मपरत्वे असतो व तो कर्माधिन असल्यामुळे, त्याचे कार्य हे कर्मपरत्वेच होत असते. अशावेळी कर्मबंधनामुळे एखादी इच्छा अनुकुल करुन घेणे जेव्हा अवघड होईल, तेव्हां ते प्रतिकूल कर्म अनुकुल करून देण्याचे सामर्थ्य पूजनादि विधीत किंवा साधकाच्या मार्गदर्शनावर अवलंबून आहे. याउलट तुम्ही वेगळ्या मार्गाने प्लँचेटवर या मृतात्म्यांना बोलावून जे आपल्या आयुष्याला 'भूत' आहेत अशांना प्रश्न विचारता. परंतु त्यांनाही जन्मप्राप्तीचेवेळी याच भूत-भविष्यकाळातून जावे लागले असल्याने, त्यांनाही कर्मपरत्त्वे दु:ख भोगावे लागत होते. तेव्हा सूज्ञपणे असा विचार करा की, ज्याचे सामर्थ्य किंवा अधिकार भूत भविष्य बदलण्याचा आहे, तोच तुमच्या अडचणींचे निवारण करू शकतो. अन्यथा या मृतात्म्यांना विचारलेल्या प्रश्नांची साक्ष म्हणजे सुख - शांति ही तर प्राप्त होत नाहीच किंबहुना त्यांच्या इहलोकावर येण्याने तुमचे देहिक माध्यम ते त्यांचे वास्तव्यस्थान होऊन, तुम्ही आपल्या बहुमोल अशा आयुष्याचा नाश करण्यास कारणीभूत होता. तरी श्रद्धेने आपण ज्या श्राद्धपक्ष विधीचा समावेश धार्मिक विधी म्हणून आपल्या जीवनात करता, हा विधी म्हणजे प्लँचेटप्रमाणेच एक प्रकार आहे. असा हा विधी एका दोषापासून तुम्हाला मुक्त करून दुसऱ्या दोषाची निर्मिती करतो. अशा दोषाला विधी म्हणून म्हणता येईल काय? यासाठी या कार्यपद्धतीकडे सखोल अभ्यासाने व शास्त्रशुद्धपद्धतीने या दोषपरिहारार्थ जे साधन 'वंशविमोचन' म्हणून प्राप्त झालेले



आहे, असे अमोलिक साधन अन्य ठिकाणी तुम्हाला अनुभविण्यास मिळणार नाही.

या वर्षी दुसरा एक महत्त्वाचा विधी प्रथमत: या कार्यपद्धतीत करण्यात आला त्या विधीस **'ऋणमोचन विधी'** असे म्हणतात. हा विधी वंशविमोचन विधी इतका सोपा व सुलभ असा नाही. यासाठी साधक माध्यमाच्या ठिकाणी हा विधी करण्यासाठी पूर्वतयारी म्हणून आपली दैविक शक्ति ही काही काळ जतन करून ठेवावी लागते. कारण हा जो ऋणमोचन विधी आहे तो प्राप्त जन्मांत ज्या देहिक माध्यमातून आपण जीवन व्यतीत करतो त्या देहात जे पाच ऋणानुबंध म्हणजे जन्मकर्म, जन्मजन्मांतर, इतरेजन, मातृपितृ व देवादिक असे असतात त्यांच्याशी संबंधित आहे. हे ऋणानुबंध अनेकवेळा एकमेकांस अनुकुल–प्रतिकूल असे असतात. त्यामुळे तुम्ही जीवन व्यतीत करीत असताना तुमच्या कुटुंबाबद्दल ज्या काही इच्छा अपेक्षा असतात त्यांची फलप्राप्ती होण्यास हे ऋणानुबंध अडथळा निर्माण करतात. त्यांचे ऋणमोचन करावयाचे म्हणजे त्या ऋणानुबंधांना एकमेकाशी अनुकुल करून देऊन, त्याशिवाय जन्मजन्मांतरपरत्त्वे या ऋणानुबंधामुळे जर काही दोष प्राप्त जीवनात इतरांच्या जीवनाकडे पाहून निर्माण केले असतील, तर ते दोषही विमोचित करावयाचे असतात.

या पुढील महत्त्वाचे निवेदन म्हणजे तुम्ही ज्ञान-अज्ञानाने जे श्राद्धपक्षादि विधी करीत होता त्या बद्दल असून, आपण भक्तांना उपासना दीक्षा, नामस्मरण दीक्षा, अनुग्रह दीक्षा, गुरुदीक्षा व कारणदीक्षा अशांचा लाभ गुरुकृपेने झाल्यावर,

पुढील काळात तुम्ही श्राद्धपक्षादि विधी व त्याच प्रमाणे तीर्थक्षेत्री घराण्याच्या दिवंगत व्यक्तींना सद्‌गती प्राप्त व्हावी म्हणून श्राद्ध, त्रिपिंडी, नारायण-नागबळी आदि विधी करू नयेत, असे सुचीत करण्यामागील कारण योग्यप्रकारे आपण भक्तांनी विचारात घेतले नाही. असे सुचविण्याचे प्रधान कारण म्हणजे ह्या तुमच्या घराण्याच्या दिवंगत व्यक्तींना मरणोत्तर जीवनानंतर सद्‌गती प्राप्त करून देण्याचे सामर्थ्य ह्या श्राद्धपक्षविधींमध्ये नाही. श्राद्ध या शब्दामध्ये मूळ शब्द 'श्रद्धा' असा असून ज्या घराण्यातील व्यक्ती दिवंगत झाल्या आहेत व ज्यांच्या ऋणानुबंधातील हितसंबंधाने आपण जन्माला आलो आहोत, त्या व्यक्तींच्याबद्दल श्रद्धा व्यक्त करण्याचे कर्तव्य आपण भक्तांस करावयाचे असते. अशी त्यांच्याबद्दल उतराई होण्याची श्रद्धा जर आपण भक्त वर्षानुवर्षे श्राद्धपक्षादिविधी करून पिंडदान देण्याने व्यक्त करीत असाल, तर अनेक कालपर्यंत हे विधी करूनही ह्या तुमच्या घराण्याच्या दिवंगत व्यक्ती सद्‌गती प्राप्त करून घेऊ शकत नाहीत. म्हणून आपण भक्त जेव्हा अडिअडचणींच्या कारणपरत्त्वे प्रश्नार्थ ह्या गुरुमार्गाकडे आलात, त्यावेळी प्रथमतःच तुम्हा भक्तांना कारण दीक्षा देण्यात आली नाही. याचे कारण तुम्हा भक्तांना प्राप्त जीवनात प्रापंचिक कर्तव्याची पूर्तता व जीवनाची सार्थकता करावयाची आहे व ज्या कारणदीक्षेपरत्त्वे हे दोन उद्देश आपण भक्त प्राप्त करून घेणार आहात, अशा कर्तव्याआड प्राप्त जीवनातील अन्य कोणतेही कारण येऊ नये, अशासाठी आपण भक्तांच्या कल्याणार्थ व हितार्थ वंशविमोचन, कर्मविमोचन व ऋणमोचन हे विधी कारण दीक्षेपूर्वी करण्यात आले. ते एवढ्याचसाठी की, जन्माचे प्रधान कारण म्हणजे जीवनाची



सार्थकता करणे हे कारण ज्या कारण दीक्षेपरत्त्वे सिद्ध होते, अशा कारण दीक्षेच्या आड तुम्हा भक्तांच्या जीवनातील किंवा कुटुंबातील कोणतेही अन्य कारण येऊ नये, अशी तुम्हा भक्तांच्या कल्याणाची योजना व सार्थकता ज्या उपासनेत आहे त्याच उपासनेला कारण दीक्षा असे म्हटले आहे.

अशा प्रकारची तरतूद आपण भक्तांच्या जीवनात गुरुकृपाशिर्वादाने केली आहे. त्यामुळे आपण असे म्हणाल की, जर आम्हा भक्तांच्या प्राप्त जीवनात निरंतर सुख-शांति-समाधान ह्याची गुरुकृपाशिर्वादाने तरतूद झाली आहे, तर वेळीअवेळी दुःख तथा अशांतता का निर्माण होते? तर याला महत्त्वाचे कारण म्हणजे असे की, जरी श्रीसद्‌गुरुंनी कृपावंत होऊन आम्हा भक्तांच्या कल्याणार्थ कृपाशिर्वाद दिला आहे, तरी त्या कृपाशिर्वादाशी आपण एकनिष्ठ राहून, प्राप्त झालेल्या कृपाशिर्वादपरत्त्वेच आपल्या जीवनाचे सार्थक होणार आहे, अशी श्रद्धा आपण भक्त निर्माण करीत नाही. दुसरे कारण ज्ञान-अज्ञानाने नवससायास करून, काही अधिक सुखाची प्राप्ती लवकर होते काय? याचाही अंदाज तुम्ही करते होता. त्याशिवाय जे श्राद्धपक्षादि विधी करू नका, कारण ह्या विधीऐवजी तुमचे वंशविमोचनादि विधी केले आहेत, असे सुचित करूनही जेव्हा आपण हे विधी करता, अशा वेळी त्या दिवंगत व्यक्तिंचा उच्चार ह्या श्राद्धपक्षादि विधीत पितृत्रयी किंवा मातृत्रयी म्हणून होत असतो, अशाना वंशविमोचनादि विधीपरत्त्वे सद्‌गती प्राप्त झाली आहे, हे जाणण्याचे सामर्थ्य तुम्हा भक्तांमध्ये नाही म्हणून ह्या व्यक्तींना सद्‌गती प्राप्त व्हावी अशी इच्छा ठेवून तुम्ही जेव्हा हे विधी करता, अशा वेळी ते ह्या तुमच्या आवाहनाचा स्वीकार

करू शकत नाहीत. त्यांच्याऐवजी अशा दिवंगत व्यक्ती की ज्यांना सद्‌गती प्राप्त झाली नाही, जे मरणोत्तर जीवनानंतर त्यांच्या इच्छावासनेपरत्त्वे इहजगताशी हितसबंधित आहेत व ज्यांचा तुमच्या कुटुंबाशी काहीही हितसंबंध नाही, असे मृतात्मे सद्‌गती प्राप्त करून घेण्यासाठी ह्या आवाहनाचा स्वीकार करून श्राद्धपक्षास उपस्थित राहतात व हे विधी तुम्हाकरवी झाल्यावर ते अदृश्यरुपाने तुमच्याच जीवनपरिसरात वावरत राहतात. ह्या कारणपरत्त्वे तुम्हास तुमच्या कुटुंबात दुःख तथा अशांतता जाणवत असते. पण आपण चुकीच्या मार्गाचा अवलंब करून जीवनात कारण नसताना काय दुःख किंवा अशांतता निर्माण करते झालो आहेत, याचा बोध करून न घेता, श्रीगुरुंनी जो कृपाशिर्वाद दिला आहे त्यातच काही अडथळा आहे, अशी अश्रद्धा तुम्ही निर्माण करता. गुरुमार्गदर्शनाप्रमाणे आपण भक्तांचे जीवन गुरुरूप व्हावे अशी जर आपली खरोखर तळमळ व इच्छा असेल, तर आपण गुरुमार्गाशी इतके एकनिष्ठ व्हावयास पाहिजे की, जरी प्रतिपरमेश्‍वर आपणापुढे येऊन उभा राहिला व आपणास विचारता झाला की, “काय पाहिजे तो वर मागून घे” तर तुमच्या मुखातून हेच उत्तर यावयास पाहिजे की, “मला काय पाहिजे व काय नको हे जाणण्याचे सामर्थ्य माझ्या गुरुंचे आहे व ते देतील त्यातच माझे निरंतर कल्याण आहे!” इतकी ठाम निश्‍चयी भूमिका जर श्रद्धाभक्तिपरत्त्वे तुम्ही भक्त जीवनात निर्माण कराल, तर प्राप्त जीवनात सुख-शांतिची अपेक्षा करण्याऐवजी, ‘माझ्या प्राप्त जीवनाचे सार्थक कशात व कोणत्या मार्गपरत्त्वे आहे ? ’अशीच विचारणा, सदैव गुरुसन्निध बसून कराल.



अशा अवस्थेत जरी आपल्याला व्यक्तिशः ह्या साधनेतून पारमार्थिक अवस्थेचा लाभ झाला, तरी ज्या प्रापंचिक कर्तव्यार्थ आपण जन्माला आलो त्या कर्तव्याची पूर्तता करण्यास आपण दुर्लक्ष करून चालणार नाही. साधन अवस्थेनंतर प्राप्त झालेल्या साधक अवस्थेमुळे जो काही महत्त्वाचा लाभ ह्या जीवनात होतो तो असा की, पूर्वी आपली प्रापंचिक कर्तव्ये ही करीत असताना ती कर्तव्ये निर्विघ्नपणे आपणास करता येत नव्हती. पण जेव्हा साधक अवस्थे तुम्ही आपले काया-वाचा-मन साधनेशी एकरूप करता, तेव्हा हे देहिक माध्यम तुमच्या नित्य साधनेने ‘साधनामय’ होते. पण त्यामुळे तुमची प्रापंचिक कर्तव्ये ही निर्विघ्नपणे जरी तुम्हाला करता येऊ लागली, तरी ती कर्तव्ये पार पाडण्याचे कर्तव्य हे अंगिकारलेल्या देवादिकांच्या किंवा गुरुकृपाशिर्वादाच्या साधनेला करावयास भाग पाडू नये. कारण अशा त्या प्रापंचिक कर्तव्यार्थ नित्याने केलेली सेवा ही जर खर्ची पडेल, तर पुढील महत्त्वाची अवस्था म्हणजे साध्य अवस्था, ही अनेक जन्मापर्यंत मार्गदर्शन होऊनही साध्य होणार नाही.

वरील तीन अवस्था म्हणजे साधक-सिद्ध-साध्य ह्या प्राप्त करून घेण्याचे उद्दिष्ट विचारात घेऊन अनेक साधक अनेक कालपर्यंत आपल्या इच्छेप्रमाणे देवादिकांच्या भिन्नाभिन्न उपासनांचा किंवा सेवेचा अंगिकार करतात. पण असा अंगिकार करूनही जेव्हा जीवनात अंशमात्रही या मार्गाचा बोध होत नाही, अशा वेळेला निराशेने आपल्या जीवनाबद्दल विपरित अशी अनुमाने काढावयास सुरुवात होते. पण या मार्गारंभी प्रथमतः आपणास जे साधन करावयाचे आहे, त्या बद्दलची शास्त्रीय मीमांसा आपण भक्त मार्गदर्शन म्हणून कोणा अधिकारी

व्यक्तीकडून समजावून घेत नाही. याशिवाय ज्या काया-वाचा-मनाने ही साधना करावयाची, त्या काया-वाचा-मनाचे हितसंबंध अनेक जन्मपरत्त्वे ज्या ऋणानुबंधाशी हित संबंधित असतात, त्या ऋणानुबंधाची मुक्तता म्हणजे विमोचन हे जे अत्यावश्यक आहे, असे विमोचन गुरुकृपाशिर्वादानेच ह्या जीवनामध्ये विमोचनादि विधी करून, जर ह्या तीन साधनांचा अंगिकार केला, तरच प्राप्त जीवनात पारमार्थिक अवस्थेचा लाभ होतो.

आम्हा मानवांना इहजगतामध्ये जो जन्म पूर्वीच्या जन्मकर्म व जन्मजन्मांतरपरत्वे प्राप्त होत असतो, अशा पूर्वीच्या जन्मकर्म व जन्मजन्मांतरात ज्ञानअज्ञानाने घडलेल्या पातकप्रमादातील प्रखरतेपरत्त्वे पुनश्च जन्मप्राप्तीच्यावेळी या दोषांचे पूनर्जीवन होऊन ते यथोचित तऱ्हेने विमोचित होतील असा सारासार सद्विचार जन्मजन्मांतराच्या ठिकाणी जन्मप्राप्तीपूर्वी निर्माण होतो व त्या विचारपरत्वे जन्मप्राप्तीसाठी धर्म, जातपात इत्यादि विचारात न घेऊन, हे जन्मजन्मांतर आपल्याला प्राप्त कर्तव्य व प्राप्त झालेल्या जन्मातील दोष सुलभपणे विमोचित करता येतील अशा ठिकाणी जन्म घेण्यास कारणीभूत होते. ही जन्मजन्मांतरातील जन्मप्राप्तीसंबंधीची भिन्नाभिन्न अवस्था आपल्या वाचनात येत नसल्याने आपण ज्या धर्मात, ज्या जातीत, ज्या कुळात जन्म घेते झालो आहोत त्याचीच पूज्यता, श्रेष्ठता मानणे म्हणजे मोठेपणा प्राप्त झाला असे जे समजतो तसे नसून, प्राप्त झालेल्या जन्मपरत्वे कोणताही धर्म, कोणतीही जात, कोणतेही कुटुंब हे जन्मप्राप्तीसाठी सुलभपणे प्राप्त झाले तरी, प्राप्त जन्मात या जन्माचे सार्थक करण्याचे कर्तव्य करता येणे शक्य आहे. त्यासाठी उच्च धर्म व उच्च जातीत जन्म मिळाला



पाहिजे असे नाही; व जन्म उच्च धर्म किंवा उच्च जातीत आला म्हणून आपण उच्च आहोत हे भासविणे हेही अज्ञानीपणाचे लक्षण आहे.

आता ह्या हितसंबंधात जन्म ज्या प्राप्त झाल्यावर, प्राप्त जन्म धर्म, जात, कुळपरत्वे झाला आहे, त्याचा आस्थापूर्वक विचार करुन, त्या धर्मपरत्वे करावी लागणारी प्राप्त जन्मातील कर्तव्ये ही यथायोग्य तऱ्हेने करुन प्राप्त जन्माचे जे सार्थक केले पाहिजे, हे कर्तव्य सूज्ञ लोक विसरुन, इतर धर्मातील, इतर जातितील, इतर कुटुंबातील व्यक्तींना प्रप्त झालेल्या सुख-शांति आदीचा लाभ आपल्याला झाला नाही म्हणून 'तसा जन्म आपल्याला प्राप्त झाला असता, तर अधिक सुखी झालो असतो' अशी वैचारिक खंत सतत बाळगत असल्याने ऋणानुबंधामध्यें कमतरता निर्माण होऊन, हे ऋणानुबंध अशा विचारपरत्वे विकसित न होऊन, कर्तव्यपूर्ततेच्या आड येण्याने अधिकच दु:खे निर्माण करण्यास कारणीभूत होतात.

**जन्मकर्म ऋणानुबंध:-** आपल्याला जन्मकर्मपरत्वे अन्न, वस्त्र, निवारा व तोही गरजेपेक्षा अधिक प्राप्त होऊनही त्या प्राप्त सुखात कसा आनंद मानता येईल, याचा विचार न करता जेव्हा तुम्ही आपल्यापेक्षा इतरांना जे सुख प्राप्त झालेले आहे त्यामुळे मोहित होऊन, आपल्याला प्राप्त झालेल्या सुख-समाधानाचा अनादर करता, तेव्हा मनाने असंतुष्ट असण्याची जी देहिक स्थिती कारण नसताना तुम्ही निर्माण करता, असे हे सुख प्राप्त होऊनसुध्दां सुखांत आनंद न मानण्यात जो दोष तुम्ही निर्माण करता, हाच दोष पुढे पुनश्च जन्मप्राप्तीच्यावेळी जन्मकर्मांत

सामावला जातो व त्यावेळी हा दोष पुनश्च कार्यान्वित होऊन, जरी तुम्हाला सुख-शांति-समाधान प्राप्त झाले तरी त्या सुखाचा लाभ घेऊ देत नाही.

**जन्मजन्मांतर ऋणानुबंध:-** आज आपणास जो जन्म प्राप्त झाला आहे तो भिन्नाभिन्न ज्ञातीत, धर्मात असा असेल; पण असा जन्म प्राप्त झाल्यावरसुध्दा आपल्याला प्राप्त जन्माचे समाधान नसते, वेळोवेळी जेव्हा आपण जन्माला येतो, तत्पूर्वीच परमेश्वराने आपल्याला जन्मप्राप्तीनंतर कोणता धर्म, कोणती जात आपणास प्राप्त जन्माचे सार्थक होण्यासाठी योग्य आहे, हा विचार करुनच जन्म दिला आहे. तरीसुध्दा या जन्माबद्दल आपल्याला आदर न वाटून, आपण आपल्या सभोवार असणाऱ्या अनेक व्यक्तींच्या जीवनातील सुख, शांति, संपत्ती, संतती पाहून, ‘मला अशांच्या पोटी जन्म आला असता तर मी किती भाग्यवान झालो असतो, ’ असे उद्‌गार काढतो. वास्तविक तसा जन्म जर तुमच्या हितार्थ असता, तर तो जन्म परमेश्वराने नि:संकोच दिला असता. आता प्राप्त जन्माबद्दल अनादर करुन, दुसऱ्याचा जन्म अधिक चांगला आहे या चिंतनात बसून, ज्या चिंता आपण निर्माण करता, या चिंता पुढील जन्मात जन्मजन्मांतरात येऊन, पुनश्च जेव्हा आपण जन्माला येता त्यावेळी जरी सुख, शांति, संपत्ती, संतती आदि प्राप्त झाली, तरी सदैव आपण चिंताक्रांत असता. आनंदाच्या प्रसंगीही आपण चिंतेतच, संकटप्रसंगीही चिंतेतच व चिंताप्रसंगीही चिंतेतच. !

**इतरेजन ऋणानुबंध:-** आज जगतात आपण जन्माला आल्यावर आपणच या जगतात एकटे आहोत असे नाही. जेव्हा



जीवनात प्रौढ अवस्था आपणास प्राप्त होते, त्यानंतर आपला जीवनाचा परिचय आपल्याशिवाय इतर अनेक व्यक्तींशी या जगतात होऊन, आपणही त्यांच्याशी इतरेजन असे होतो. अशा जीवनामध्ये आपल्याशी परिचित झालेले इतरेजन यांच्याशी तुमचे काही काळ प्रेमाचे हितसंबंध येतात व पुढे काही कारणापरत्वे ते दुरावले जातात. दुरावलेले हितसंबंध ज्या प्रसंगपरत्वे दुरावले त्या प्रसंगपरत्वे त्या व्यक्तींना आपण विसरून जाणे आपले कर्तव्य असते. ते दुरावण्यापूर्वी त्यांच्यासमवेत जे आनंदाचे सुखद क्षण आपण वेचलेले असतात, त्यांचे स्मरण आपल्याला चुकूनही होत नाही. पण ते दुरावल्यावर जन्मभर आपण त्यांच्याबद्दल अनादर, अपशब्द व अवहेलना करीत रहात असतो. अशाच दोषांमुळे पुनश्च जेव्हां तुम्ही जन्म प्राप्त करता, तेव्हा हे दोष इतरांकडे न जाता तुमच्या कुटुंबात तुम्हाला असे हानीकारक होतात की, जन्मदात्या आईवडिलांबद्दल, भावाबहिणीबद्दल प्रेम न वाटता, त्याच्या परस्परविरोधी विचार निर्माण होऊन संपूर्ण कुटुंब विस्कळीत होण्यास कारणीभूत होतात. यालाच भाऊबंदकीचे नाटक असे म्हटले आहे.

**मातृपितृ ऋणानुबंध:-** आज समाजात वडील व्यक्ती म्हणजे आपल्यापेक्षा वयाने, ज्ञानाने, अनुभवाने, उपासनेने वडील व साधना मार्गाने किंवा लोककल्याणाच्या सेवेत आपल्या जीवनाचा त्याग करुन लोकांचे हित व्हावे अशा योग्य विचाराने जे कोणी आयुष्य व्यतीत करीत आहेत अशा सर्वाबद्दल आदरभाव, पूज्यता व नम्रता असावयास पाहिजे. याउलट प्रौढ झाल्यावर आपले हात ज्ञानाने, संपत्तीने स्वर्गाला टेकले आहेत असा व्यर्थ गर्व निर्माण करुन, अशा वडील असलेल्या व्यक्तींची

निर्भत्सना, अनादर इत्यादि आपण करीत राहतो. ह्या जीवनात आपल्याला विद्या व पैपैसा इतरांपेक्षा अधिक प्राप्त झाला आहे, हा गर्व होऊन आपण आपल्यापेक्षा ज्यांना कमीअधिक प्रमाणामध्ये ही सर्व सुखे प्राप्त झाली आहेत, अशांकडे तुच्छतेने पाहतो. वास्तविक हा दोष जरी देहामध्ये नसला, तरी जीवन व्यतीत करण्यासाठी जी साधने दिली आहेत, ती साधने म्हणजेच सर्वस्व मानून जो मनुष्य अहंकाराने हे जीवन व्यतीत करतो, त्याला ह्या दोषाचा त्रास पुढील जन्मात भोगावा लागतो. यासाठी आपल्या पेक्षा जे वडील आहेत, ते आपल्या मातापित्याप्रमाणे आहेत; ज्यांनी आपल्याला विद्यादान केलेले आहे, तेही आपले मातापिता होत व इतर जे कोणी कर्तव्यबुध्दीने इहजगतात कार्य करीत आहेत, त्यांनाही आपण मातापित्याप्रमाणेच मानले पाहिजे म्हणून वचनोक्ति अशी आहे की, 'मातृदेवो भव, पितृदेवो भव, आचार्यदेवो भव!' या दोषांचा परिणाम पुढील जन्मात असा होतो की, या व्यक्तीला जन्मदात्या आईवडिलांपासून तर सुख प्राप्त होत नाहीच, पण इतरांनाही आपण जरी विद्यावान, धनवान झालो असलो तरी आदरणीय वाटत नाही. परंतु अशा वेळी त्या व्यक्ती पुनश्च अभिमानाने असे सांगतात की, 'माझे या जगात कोणाशी पटत नाही. '

**देवादिक ऋणानुबंधः-** प्रत्येक मानवाला ज्या ज्या धर्मपरत्वे इहजन्म प्राप्त होतो, त्या धर्मात परमेश्वराने जन्म देण्याची जी तरतूद केली आहे, त्याचा कार्यकारणभाव असा असतो की, पूर्वीच्या अनेक जन्मातून आपण ज्या ऋणानुबंधांशी हितसंबंधीत असतो, त्याचे विमोचन योग्य धर्माचरणाने व्हावयास पाहिजे. अशाच ठिकाणी तो जन्म देण्यास कारणीभूत होतो.



परंतु आज समाजात प्रत्येक धर्माबद्दल प्रत्येक धर्मियांची अशी भावना आहे की, आपण ज्या धर्मात जन्माला आलो आहोत, तेवढाच धर्म उच्च व इतर धर्म हे बाटलेले धर्म आहेत. असा विचार करुन, सुडबुध्दीने या अन्य धर्मातील लोकांकडे पाहण्याची अपप्रवृत्ति आपण निर्माण करतो. प्रथमतः असे पहावयास पाहिजे की, ज्या स्वधर्मात आपण जन्माला आलो आहोत, त्या धर्माप्रमाणे निदान दहा टक्के तरी आपले आचरण त्या धर्माला शोभेल असे आहे काय? व ते जर नाही तर इतर धर्माची निंदानालस्ती करणे हे माझे कर्तव्य नाही. आज समाजातील काही व्यक्ती देवधर्म, दानधर्म तर करीतच नाहीत, पण ज्यांना तो करण्याची आवड आहे, इच्छा आहे, पूर्वजन्मपरत्वे प्रेरणा होत आहे, अशांची निंदानालस्ती, चेष्टामस्करी व त्यांच्याबद्दल अविश्वासाचे भाव प्रकट करतात, असे दिसून येते. वास्तविक देवाने, धर्माने, परोपकाराने किंवा दानधर्माने तुमचे कधीही वाईट केलेले नाही. असे असताना आपणास ज्या गोष्टीत प्रेम वाटत नाही पण ज्यांना त्यासंबंधी प्रेम, आदर, आपुलकी वाटत आहे, त्यांचा अनादर कुत्सित भावनेने न करता, ज्यांना जो मार्ग हिताचा आहे, तो त्यांनी धरावा; एवढाच विचार जरी तुम्ही केलात तरी इतराच्या हिताचे चिंतन तुम्ही केलेत असे म्हणता येईल. कारण इहजन्मात अशा प्रकारच्या आचार विचाराने तुम्ही व्यतीत केलेले जीवन पुढील जन्मात तुमच्या वाट्याला येते; व जीवनात येणाऱ्या अडिअडचणी निवारणार्थ जेव्हा तुम्हांला देवधर्म, धर्माचरण, गुरुभक्ति करण्याची इच्छा होते, तेव्हां हा ऋणानुबंध, ह्या तुमच्या इष्टकर्तव्यांत तुम्हाला एकरुपत्व प्राप्त करुन देण्यास, मनाची स्थिरता करुन देऊन

मन:शांति निर्माण करण्यास अडथळा निर्माण करतो.

याशिवाय एक महत्वाचा विषय असा की, आज तुम्ही ज्या देवदेवतांची पूजा-अर्चा, जप-जाप्य, ध्यान-धारणा करता, त्यांचा कृपाशिर्वाद इहजन्मात व पुढील जन्मात प्राप्त होण्यास जो अडथळा आहे तो असा की, तुम्ही जेव्हा देवदेवताप्रित्यर्थ काया-वाचा-मनाने विचार व आचरण करुन, ज्या विधींची यथासांग सांगता करता, तो विधी देवदेवतांना अर्पण केल्यावर, पुनश्च त्याचा लाभ होण्यासाठी त्या देवतांच्या गुणप्रकृतिप्रमाणे तुमच्या देहिक माध्यमात त्या गुणांचा विकास व्हावयास पाहिजे. हे देवदेवतांचे गुण जर तुमच्या ठिकाणी विकसित झाले नाहीत, तर ती केली गेलेली उपासना तुम्हाला कृपाशिर्वाद म्हणून प्राप्त करण्यास हा जन्मही पुरणार नाही. कदाचित पुढील पिढीत जर कुणी व्यक्ती हे देवतांचे अनुकुल गुण प्राप्त करते झाले नाहीत, तर देवदेवतार्जन करुनसुध्दा तुम्हाला किंवा तुम्हा कुटुंबियांना त्याचा लाभ घेता येत नाही. असा लाभ तुम्हाला घेता यावा व जरी ह्या जन्मात तुम्ही केलेले देवतार्जन देवाला समर्पित केले असले तरी गुणांच्या अभावी तुम्ही केलेली सेवा तुम्हास प्राप्त होण्यास जो काही देहातील गुणांचा अभावी आहे, ते गुण नसतानाही या ऋणमोचनामुळे देवादिकांचा ऋणानुबंध तुम्हाला प्राप्त होतो.

अशा या पांच ऋणानुबंधातील दोषामुळे कुटुंबातील एकाच व्यक्तीला व्यक्तिगत त्रास होईल असे नसून, त्या दोषांचे हितसंबंध कुटुंबात जन्माला येणाऱ्या प्रत्येक व्यक्तिच्या जीवनाशी निगडीत आहेत. हे हितसंबंध जीवनात स्थळ, काळ व वेळपरत्वे



(म्हणजे Space, Time, Limit या प्रमाणें) कार्य करतात. अशा अडिअडचणीनिवारणार्थ आज समाजात कोणीही साधक हे 'आधिभौतिक' निराकरण प्राप्त करता झाला असेल असे वाटत नाही. त्यामुळे काहीं भक्तभाविक की ज्यांच्या जीवनात अशा प्रकारचे दोष आहेत, ते त्यांना स्वत:ला व ज्या बाहेरील साधकाकडे ते गेले त्यांनाही माहीत नसतात. मार्गदर्शनार्थ कार्यकेंद्रावर आल्यावर त्यांना हे आधिभौतिक निराकरण सांगितल्यामुळे संभ्रम निर्माण होतो. कारण त्यामध्ये प्रथमत: असे निक्षून सांगण्यात येते की, 'तुम्ही करीत असलेल्या सर्व देवदेवतांच्या उपासना, उपासतापास आदि बंद करा'.

कारण ह्या दोषांचा हितसंबंध आपणच असल्याने, त्या निवारणार्थ देवदेवतांचे कृपाशिर्वाद यशप्राप्ती करुन देऊं शकत नाहीत. यासाठी ज्या कोणा भक्तांना असे निराकरण सुचविण्यात येते, त्यांनी त्या क्षणी गुरुआज्ञा म्हणून अंगिकरलेली सर्व देवदेवतांप्रित्यर्थची उपासना व परंपरेप्रमाणे करण्यात येणारी उपासना बंद करावी. कारण तुमच्या देहीक माध्यमात जे ऋणानुबंध प्रतिकूल असे आहेत, ते एकमेकात अनुकुल होऊन, तुम्हांला कृपाप्राप्ती व्हावी यासाठी सद्‌गुरुआज्ञेने जे मार्गदर्शन करावयाचे असते. त्यासाठी तुमचे देहिक माध्यम कोणत्याही उपासनांच्या बंधनात असता कामा नये.

हे ऋणानुबंध स्थळ, काळ, वेळ यापरत्वे कार्य करीत असतात. याचा अर्थ असा असतो की, जी कुणी एक व्यक्ति जन्माला आलेली असते, तिचे जन्म गाव ही जरी जन्मभूमि असली तरी त्याची कर्मभूमि म्हणजे सुख, शांति, विद्या, संपत्ती हे

त्या जन्मभूमिमध्ये नसते. अशा वेळी त्याची कर्मभूमि ही त्याच्या गांवापासून शंभर ते पाच हजार मैल इतक्या अंतरापर्यंतही असू शकते. यासाठी त्यांना मार्गदर्शन करताना अचूक निदान करावे लागते. जर एखाद्याची कर्मभूमि म्हणजे भाग्योदय दीडशे मैल उत्तरेस किंवा दक्षिणेस असेल तर त्याप्रमाणे ते सुचित करावे लागते. यासाठी हे जे गणित सांगावयाचे असते ते कागदावर मांडून किंवा आपल्या बुध्दीमाध्यमातून आकडेवारीने ठरविता येत नाही. यासाठी साधकाला दिव्य ज्ञान व दिव्यदृष्टीची प्राप्ती असल्याशिवाय हे गणित समजत नाही व मार्गदर्शन म्हणून सांगता येत नाही. त्याचप्रमाणे ज्या मुलामुलींचे भाग्योदय आईवडिलांच्या प्रेमाच्या सावलीत उदित होत नसतात, आशा मुलामुलींना मार्गदर्शन करीत असतांना त्यांच्या भाग्योदयाचे स्थळ, दिशा आईवडिलांपासूनचे अंतर हे मार्गदर्शन सूचित करावयाचे असते.

काहीवेळा जीवनात अशी काही आकस्मिक संकटे उद्‌भवणारी असतात, अशावेळी आईवडिलांपासून मुले-मुली, पति-पत्नीपासून पति किंवा पत्नी, इष्टमित्रापासून इष्टमित्र, यांच्या एकमेकाशी असलेल्या हितसंबंधातून ही संकटे निवारण करावयाची असतात. पण ह्या भौतिक निराकरणाचा अर्थ सूज्ञ भक्तांना न समजून सद्‌गुरुकृपाशिर्वादाच्या सामर्थ्याने आपल्या इहजन्मात काय प्राप्त होत आहे, ही जाणीव नसल्याने, हा आज प्राप्त झालेला गुरुकृपाशिर्वाद पुढील कोणत्याही जन्मात प्राप्त व्हावयाचा झाला तर अनेक जन्म वाया गेले तरी या कार्यपध्दतीतील ही सिध्दसिध्दांतपध्दती, सद्‌सद्‌विवेकबुध्दि भक्तांमध्ये कधीही निर्माण होत नाही. या निराकारण पध्दतीच्या



बाबतीत अर्थ व तो ही इतका क्षुल्लक असा लावला जातो की, परमपूज्य बाबांच्या आज्ञेने आपल्याला कही काळ विभक्त किंवा वेगळ्या स्थळी किंवा वेगळ्या ठिकाणी रहावयास सांगितले होते. एवढा जरी अर्थ सूज्ञपणाने लावला तरी समाधान होण्या सारखे आहे. परंतु यापलिकडेही विचारांची अधोगती होऊन ज्या मुदतीपर्यंत एकमेकांना मारक असणारे ऋणानुबंध निवारण करण्यासाठी जे मार्गदर्शन केले जाते त्याचा गैरअर्थ भक्तांच्या भक्तीत, श्रध्देत जो विकल्प म्हणून उद्‌भवतो, तेव्हा असा खेद वाटतो की, ज्यांना जन्ममरणाच्या दारातून उध्दरण्यासाठी आलो, ते न करता त्यांना जर ते दुःख प्राप्त करुन दिले असते तर निदान आपल्याबद्दल असणारी श्रध्दाही त्यांच्या सोबत त्यांच्या बरोबर गेली असती. पण एकदा जेव्हा आपण गुरुमार्गी होता व आपण जरी सर्वस्वाने गुरुंना आपले जीवन समर्पण करीत नाही, तरी गुरुंनी आपले सामर्थ्य आपल्या कल्याणार्थ समर्पित केलेले असते, हे सूज्ञ भक्तांनी कधीही विसरु नये. विकल्प येणे हा मनुष्यजन्माचा जरी स्वाभाविक गुणधर्म असला, विकल्पाला प्रसंग व कारण यांचा आधार असावयास पाहिजे. निराधार, निराश्रित असा विकल्प म्हणजे तुमच्या ज्ञानाची ठेव असे जर तुम्ही मानत असलात, तर पुनश्च तुम्ही तुमच्या हितार्थ निवारण केलेल्या संकटात सहभागी होण्याचे भाग्य मानता आहात असे मानावे लागेल.

तुम्ही मार्गदर्शनार्थ आल्यानंतर येथील कार्यपद्धती व मार्गदर्शनाप्रमाणे होणारे तुमच्या कुटुंबाचे हित पाहून तुम्हाला आपले जीवन कृतार्थ व्हावे व आपले आयुष्य ह्या कार्यार्थ व्यतीत करावे, असा जरी मोह वाटत असला, तरी ह्या परोपकार

वृत्तीचा जो मोह तुमच्या ठिकाणी आहे, त्याची आर्तता खरोखरीच प्राप्त झालेल्या सुखपरत्वे आहे की आपल्या अडिअडचणीनिवारणार्थ जो कृपाशिर्वाद मार्गदर्शक झाला आहे अशापरत्वे आहे, हे गुरु तत्काळ जाणतात. तुम्ही बाहेरुन कितीही गुरुभक्तीचा ओलावा आहे असे दाखविण्याचा प्रयत्न केलात, तरी जे साधनामार्गात पूर्णावस्थेला पोहोचलेले साधक आहेत त्यांना तुमच्या ठिकाणी निर्माण झालेला ओलावा हा भास आहे, हे समजण्यास क्षणाचाही विलंब लागत नाही. यासाठी आपण जेव्हा गुरुदीक्षा किंवा अनुग्रह मागता तेव्हां ते अशा कार्यपध्दतीस कदापिही तयार होत नाहीत. कारण हा निरपेक्ष बुध्दीचा व परोपकराचा आलेला ओलावा ज्या परिस्थितीने आला आहे, त्याची जाणीव गुरुंना असल्याने, ही जीवन समर्पित करण्याची जी भूमिका हे भक्तभाविक व्यक्त करतात, त्यांना गुरुसान्निध्यीं राहूनही गुरुंनी आपल्याला कोणत्या भक्तिभावनेने सचैल स्नान घातले आहे याची जाणीव होत नाही. अशावेळी भक्तभाविकांनी स्वत:कडे पाहून, जरी आपल्या आयुष्यात आपण आपल्या स्वार्थासाठी इतरांना फसविले आहे तरी गुरुंना फसविण्याचे महापाप या जन्मात करुं नये. तुमच्या जीवनात ज्ञानअज्ञानाने घडणाऱ्या प्रत्येक पातकप्रमादाला धर्मशास्त्रांत व वेदशास्त्रांत प्रायश्चित्त सांगितलेले आहे. परंतु गुरुभक्ति ही जितकी चाखण्यास अमृतमय आहे, तितकीच ती आचरणात आणण्यास कर्मकठीण आहे. अशा गुरुभक्तीत जेव्हा तुम्ही विचलीत होऊन केवळ आपल्या भक्तिचा आभास निर्माण करता, त्याला कोणत्याही शास्त्रात प्रायश्चित्त नाही!

वरील निराकरणे ही ऋणमोचनाशी हितसंबंधित आहेत.



यासाठी केवळ आपल्याला हा विषय समजावा म्हणून ती निवेदन केली आहेत. पण यापेक्षाही प्रखर असे साधन पुढे प्राप्त करावयाचे असून, त्यासाठी अनिश्चित काळापर्यंत गुरूसेवेमध्ये वेळ व्यतीत करून, ती जी प्राप्त करावयाची आहेत, ती तुमच्या व तुमच्या भावी कुटुंबियांच्या हितार्थ आहेत. अनेक घराण्यांत मुलेमुली जन्माला आल्यावर ती येतांना विद्या, संपत्ती , संतती घेऊन येतात. प्रौढ अवस्थेपर्यंत ज्या घराण्यात किंवा कुटुंबात ती जन्म घेती झाली आहेत, त्या कुटुंबाची भरभराट विद्या, संपत्ती, संतती आर्दींनी होते. पुढे प्रौढ अवस्थेनंतर जेव्हा ही मुलेमुली विवाहित होऊन परगृही जातात किंवा कुटुंबापासून विभक्त होतात, त्यानंतर त्यांच्या जन्मप्राप्तीमुळे कुटुंबात प्राप्त झालेली विद्या, संपत्ती, संतती ही त्या नवीन घराण्यामध्ये जाते; व ज्या घराण्यात ते जन्म घेते झाले आहेत, त्या घराण्यातील अन्य व्यक्तीना ती प्राप्त करण्यासाठी जरी अति कष्ट करावे लागले असले तरीही सुख, संपत्ती पुनश्च त्यांच्या वाट्यला येत नाही. अशावेळी या कुटुंबातील व्यक्तींना विवाह करण्यास मनाई करणे किंवा स्वतंत्र राहण्यास मनाई करणे इत्यादि गोष्टी बंधन म्हणून घालता येत नाहीत. परंतु हा सुखशांतीचा तराजू दोन्ही कुटुंबात सारखाच कार्यान्वित व्हावा यासाठी या कार्यपध्दतीत हे साधन पुढील काळात प्राप्त करण्यासाठी या कार्यातील प्रमुख साधकाकडून गुरुआज्ञेने करावी लागणारी जी प्रखर सेवा असेल ती आनंदाने स्वीकारली जाईल, ती याचकरीता की, तुम्हां भक्तभाविकांच्या जीवनात ह्या दोषामुळे येणारी जी नकळत आपत्ती आहे, ती निवारण होऊन दोन्ही घराण्यात सुख, शांति, संपत्ती, संतती ही चिरकाल टिकून रहावी व पुढील भावी अपत्ये

आणि तुम्ही कुटुंबिय यानी सुख-शांति-समाधानात या जगतात आपले आयुष्य व्यतीत करावे व अशी ही इच्छा सद्‌गुरुचरणी आम्ही व्यक्त करीत आहोत.

प्राप्त जीवनामध्ये आपणास सुख, शांति, संपत्ती, समाधान प्राप्त व्हावे, या अपेक्षेनेच आपण ह्या कार्याचा लाभ आजपर्यंत जरी घेतला असलात, तरी गुरुआज्ञेने या जगतात अशा कार्याची जेव्हा स्थापना होऊन ती कार्यान्वित होत असतात, त्या मागील सद्‌गुरुंचा हेतू असा असतो की, आम्हा मानवांना बहुमोल असे जे जीवन प्राप्त झाले आहे, त्या जीवनात केवळ ऐहिक विषयसेवनार्थ जीवन व्यतीत होऊ नये; तर प्राप्त झालेल्या जन्माचे यथार्थ ज्ञान होऊन, त्या जन्मपरत्वे जन्माला येण्याचे जे कारण असेल, ते कार्यान्वित होऊन, आपला प्राप्त जन्म याचे सार्थक व्हावे. ही योजना जरी कार्याचा प्रधान उद्देश असला, तरी तो प्राप्त करुन घेण्याची तळमळ येणाऱ्या भक्तभाविकात आहे असे अनुभवास न येता, उलट अधिक प्रश्नोत्तरे विचारून आपले आयुष्य अधिकाधिक समृध्द कसे होईल याच विषयाच्या चिंतनात हे भक्तभाविक या कार्याचा लाभ घेत असतात. आज ह्या कार्यपध्दतीतून आपण भक्तांना जे अडिअडचणीनिवारणार्थ मार्गदर्शन करण्यात येत आहे, हा कार्याचा मूळ उद्देश नसून, हे साधन केवळ लोकसंग्रहार्थ उपयोगात आणावे लागते. हे जरी खरे तरी प्रत्येक भक्ताने आपल्या जीवनातील कर्तव्य म्हणून, या कार्याचा जो प्रधान हेतु आहे, त्याचा लाभ जर सहजासहजी, काही एक प्रखर साधना न करता, घर बसल्या प्राप्त होत आहे, त्याचा आस्थापूर्वक जर विचार केला नाही तर भविष्यात या जगाच्या बदलत्या परिस्थितीनुसार आपण कुटुंबियांच्या



जीवनाबद्दल असणाऱ्या आशा-अपेक्षा साकार होतील की नाही याचा विचार सूज्ञपणे आज करणे हाच भविष्योत्तर जीवनाच्या यशाचा पाया आहे.

आजपर्यंत आपण शेकडो भक्तांना गुरुकृपाशिर्वादाने प्राप्त झालेल्या सिध्दसाध्नपध्दतीप्रमाणे निराकरणे करुन मी माझ्या यथाशक्ती व यथाज्ञानाने आपणास सुखी करण्याचा प्रयत्न जरी काया, वाचा, मनाने व तन, मन, धनाने केला तरी त्याचा मोबदला म्हणून मी आपणा सर्वांकडून काहीच अपेक्षा ठेवली नाही. परंतु ज्या सिध्दसाधन पध्दतीतील निराकरणाने आपल्या अडचणी निवारण होतात, त्या सिध्दसाधनपध्दती कार्यारंभी प्राप्त करण्यासाठी मला प्राप्त जीवनात खूपच त्याग करावा लागला, हे आपण भक्तांनी विसरता कामा नये. आपणास मार्गदर्शित केलेली निराकरणे ही मी माझा ऐच्छिक विषय म्हणून केली नसून तशी ऐच्छिक निराकरणे ही मानवी जीवनातील दु:खनिवारणार्थ कार्यान्वितही होत नाहीत. निराकरणे ही ज्या सिध्दसाधनपध्दतीवर आधारलेली असतात, ह्या सिध्दसाधनपध्दती पूर्णत: कृपाशिर्वादास प्राप्त झाल्याशिवाय साध्य होत नाहीत. याचा अर्थ निराकरण म्हणजे प्रश्नाबद्दलचे अचूक निदान किंवा कारण नव्हे तर निराकरण म्हणजे श्री. गुरुकृपाशिर्वादच असतो. पण तत्प्रित्यर्थ आपण भक्तांच्या कल्याणार्थ जो कृपाशिर्वाद निराकरण म्हणून दिला आहे, त्याबद्दलची यथायोग्य आस्था, तत्संबधी आचारविचारांची शुध्दता व तो जतन करण्यासाठी नित्याने मार्गदर्शन केलेली सेवा, ही करण्यासाठी आपण चुकुनही योग्य आचारविचाराने जीवनात तो ठेवा जतन करण्याचा प्रयत्न न करण्याने महत्प्रयत्नाने प्राप्त

झालेल्या ह्या सिध्दसिध्दांतपध्दती व निराकरणे यास आपल्या अयोग्य अशा आचारविचाराने जेव्हा मलीनता येते व त्यांची कार्यक्षमता उच्चारलेल्या शब्दाप्रमाणे होत नाही, तेव्हा आपण भक्त असा संकुचित विचार करता की, आता गुरुमाध्यमाचे सामर्थ्य कमी झाले आहे. वास्तविक साधकमाध्यमाचा महिमा असा आहे की, गुरुकृपाशिर्वादाला प्राप्त होण्यापूर्वी गुरुद्वारा या साधकाची योग्य ती परीक्षा झाल्यावरच तो कृपावंत होतो. गुरुकृपा ही अविनाशी व अक्षय अशी असल्याने, साधकाच्या जीवनांत गुरुकृपेला तो अपात्र होतो किंवा कृपेत अंतर पडते, हे आपण भक्तांचे अज्ञान आहे. सिध्दसिध्दांत पध्दतीत जी मलीनता येत असते ती आपण भक्तांच्या अज्ञानी, अविचारी, असमंजस असा विचार-अविचाराने व गुरुमार्गदर्शनाप्रमाणे आचारविचार हे योग्य प्रकारे न केल्यानेच येत असते. अशा प्रकारची मलीनता जेव्हा श्रीसद्‌गुरुंना ह्या कार्यपध्दतीत भवितव्यात अडथळा निर्माण करणारी आहे असे वाटते, त्याचक्षणी म्हणजे गुरुपौर्णिमा १९७७ या दिवशी, मला आपण भक्तगणांना ह्या मार्गदर्शन करण्यास बंद करुन, पुनश्च ती सिध्दसाधने निराकरणार्थ सिध्द करण्यासाठी आज्ञा झाली. त्या आज्ञेप्रमाणे एक वर्ष सेवेत राहून जे हवनीय विधी करण्यात आले, ते मी माझ्या हितार्थ किंवा माझी पारमार्थीक उन्नती होऊन मला मोक्ष प्राप्त व्हवा या हेतूने केले नाहीत. भविष्योत्तर जीवनात आजपर्यंत घेतलेल्या निराकरणाचा लाभ तुम्हा कुटुंबियांना पिढ्यान्‌पिढ्या व्हावा, यासाठी ही सर्व सिध्दसाधने पुनश्च सिध्द करावी लागतात. आपण सर्व भक्तांची अशी श्रध्दा आहे की, एकदा कृपाशिर्वाद घेतला म्हणजे तो आयुष्यभर आपल्याला तारक होतो. पण हे केव्हा होईल? तर



गुरुआज्ञेप्रमाणे आपण त्यांचे पालन करीत असता, कोणत्याही विषयपरत्वे ह्या आज्ञेशी आपण प्रतारणा केली नाही, तरच हा आशिर्वाद आपण व आपल्या कुटुंबियांच्या भविष्योत्तर जीवनासाठी तारक ठरतो.

आज आपण भक्तास प्राप्त झालेल्या जीवनात जेव्हा सुख, शांति, संपत्ती, दीर्घायुष्य आदींचा अभाव निर्माण होऊन, जीवन उपभोगण्यास ज्या वेळी असमर्थ होते, तेव्हाच या अडिअडचणीमागील कारणपरंपरा किंवा कारणमीमांसा व त्यांचे निराकरण करुन घेण्यासाठी, इकडे तिकडे साधकांच्या किंवा देवभक्तांच्या शोधात जाऊन याची विचारणा आपण करीत असता. पण आज दु:खाने असे म्हणावे लागते की, आपल्या जीवनात निर्माण झालेल्या अडिअडचणी या शास्त्रीय मीमांसेनुसार कुणी साधक जाणते होऊन त्याचे निवारण अल्प मूल्यामध्ये करत असतील असा माझा तरी व्यक्तिगत अनुभव नाही. कारण आपण भक्तांना वेळोवळी अडिअडचणी निवारणार्थ अनेक साधकांकडे जावे लागते. त्यांनी केलेली निराकरणे ही आपण कार्यकेन्द्रावर उपस्थित झाल्यावर जेव्हा सांगता तेव्हा असे अनुमान अनुभवास येते की, आपण ज्या साधकाच्या निराकरणाचा लाभ घेण्यासाठी गेला होतात, त्या साधकाची लोककल्याणाप्रित्यर्थची भूमिका जरी मोठी असली तरी त्याप्रित्यर्थ करावे लागणारे साधन व सिध्दता ही अगदीच बाल्यावस्थेतील आहे पण त्यापेक्षाही काहीएक अवस्थांची प्राप्ती न होताही भूत, भविष्य, वर्तमान आदि तीन काळांना आपण जाणते आहोत असे समजून जे कोणी साधक भूत, भविष्य, वर्तमान आदि विषयाबाबत मार्गदर्शन करीत आहेत, या त्यांच्या

मार्गदर्शनातील अज्ञानाचे कौतुक वाटते कारण प्राप्त झालेला मानवी जन्म ही एक तर पूर्वजन्मातील निश्चित ठेव तरी असूं शकेल किंवा पूर्वजन्मातील ऋणानुबंधातील दोषामुळे त्या जीवनाची अपूर्णता शिल्लक राहिल्याने पुनश्च जन्म प्राप्त करुन ते ऋणानुबंध पूर्ण करण्याचे कर्तव्य करावे लागेल. अशा जन्मजन्मांतर किंवा जन्मकर्मपरत्वे निर्माण झालेले दोष ह्या जीवनात जेव्हा दु:ख तथा अशांतता निर्माण करतात, त्यावेळी मूलत: या दोषांचा हितसंबंध केवळ कर्माच्या प्रतिकूलतेवर अवलंबून आहे असे विचारात न घेता, त्या कर्माच्या हितसंबंधातील दोषांचा हितसंबंध कोणत्या ऋणानुबंधाशी हितसंबंधीत आहे हे जाणण्याची दृष्टी व ज्ञान साधकास असावयास पाहिजे व ते जरी जाणते झाले तरी ह्या दोषांच्या विमोचनार्थ त्यांच्या ठिकाणी सिध्दसाधन हे सिध्दावस्थेत असावयास पाहिजे, तरच या दोषांचे निश्चितपणे विमोचन होऊन भविष्यकाळ हा सुख, शांति, समाधानात व्यतीत होईल. केवळ अडचण निर्माण झाली आहे म्हणून त्याचा प्रतिकार करण्यासाठी मंत्र, तंत्र, यंत्र आदीचा उपयोग करुन जरी त्यापासून आपण आपले रक्षण करते झालात, तरी ह्या सर्व विद्यापरत्वे निवारण होणारी दु:खे ही क्षणिक असतात कारण मंत्र, तंत्र, यंत्र आदि साधने व त्यात सामावलेली शक्ति हिचा क्षय कालपरत्वे होत असतो. त्यामुळे ज्या दु:खनिवारणार्थ आपण या मार्गाचा अवलंब केलात, त्यामुळे जरी क्षणात सुखाचा भास निर्माण झाला तरी निरंतर स्वरुपात त्या सुखाचा लाभ आपणास घ्यावयाचा होता, तो लाभ या क्षणिक सुखांच्या मोहाने आपण मिळविण्यास असमर्थ झालात. श्रीसद्‌गुरुकृपा प्राप्त होण्यास किंवा प्राप्त



करण्यास काया, वाचा, मनाने, नि:स्वार्थ, निरपेक्ष बुध्दीने व इष्ट संकल्पाने ती सेवा करावयास लागते. त्या सेवेचा लाभ केवळ अडिअडचणी निवारण होण्याइतकाच मर्यादित असू शकत नाही, तर त्याचा लाभ हा प्राप्त जन्मात होतोच पण त्याशिवाय कुटुंबातील पिढ्यान्‌पिढ्याना व जन्मोजन्मी आपल्या जीवनोद्धारार्थ ही कृपा उपयोगी पडते एवढेच नव्हे तर त्या कृपाशिर्वादाने प्राप्त जन्माचे यथायोग्य सार्थकही होत असते.

आपले प्राप्त जीवन याचा संबंध पांच ऋणानुबंधाशी हितसंबंधित आहे. ते पांच ऋणानुबंध म्हणजे देवादिक, मातृपितृ, इतरेजन, जन्मजन्मांतर व जन्मकर्म होत. हे ऋणानुबंध पूर्वीच्या अनेक जन्माशी हितसंबंधित असल्याने, प्राप्त जन्मांत आपले इष्ट सुख, शांति ही त्या ऋणानुबंधातील अनुकुल प्रतिकूलतेवर अवलंबून असते. त्याचप्रमाणे त्या ऋणानुबंधात ज्ञान-अज्ञानाने सामावलेल्या पातकप्रमादामुळे किंवा या ऋणानुबंधपरत्वे आपले इष्ट कर्तव्य जन्म प्राप्त झाल्या नंतर न करण्याने किंवा प्राप्त जन्मांत हे ऋणानुबंध जरी पंचभौतिक देहाच्या हितसंबंधात कार्य करीत आहेत तरी ह्या ऋणानुबंधाचा यथोचित विकास जर काया, वाचा, मनाच्या ठिकाणी होऊन ही देहिक माध्यमे विकसित अवस्थेप्रत नेण्याचे साधन प्राप्त झाले नाही, तर ह्या सर्व दोषपरत्वे प्राप्त झालेले जीवन, त्यातील इच्छा-अपेक्षांची पूर्तता ह्या जन्मात न होता, हे जग नाईलाजाने आपल्याला सोडून जावे लागते.

मानवी जन्मपरत्वे जेव्हा आपण भक्तभाविक अशा दोषांच्या हितसंबंधाशी संबंधित असा जन्म प्राप्त करते होऊन,

अडिअडचणीपरत्वे जरी गुरुमार्गाकडे अडिअडचणीनिवारणार्थ आलात, तरी योग्य गुरुंचे सदैव योग्य असेच कार्य ह्या जगताच्या कल्याणार्थ चालू असते. जेव्हां आपण ह्या गुरूमाध्यातून आपल्या अडिअडचणीनिवारणार्थ मार्गदर्शन घेता, त्यावेळी गुरुमाध्यमाचा सद्हेतू हा कदापिही अडिअडचणीशी हितसंबंधीत नसतो. त्यांना तुमच्यासारख्या भक्तांच्या प्राप्त झालेल्या जन्माचे सार्थक करुन, जन्मप्राप्तीचे जे कारण आहे ते या जगाच्या व तुमच्या कुटुंबाच्या कल्याणासाठी सिध्द करावयाचे असते. यासाठी त्यांना तुमच्या कल्याणार्थ आपले जीवन सद्गुरुसान्निध्यात व्यतीत करावे लागते. त्या जीवनांत प्रत्येक क्षण हा गुरुआज्ञेप्रमाणे व्यतीत झाल्याशिवाय कोणतीही सिध्दसाधना सिध्दावस्थेस जात नाही. यासाठी गुरुमाध्यमाला काया-वाचा-मनातील ऐहिक विषय हे स्वतःच्या जीवनापासून दूर ठेवावे लागतात; याचा आपण सूज्ञ भक्तांनी विचार केला आहे काय? ज्या गुरुमाध्यमाद्वारा आपण भक्तांचे जन्मोजन्मीचे ऋण फिटून प्राप्त जन्म विकसित होऊन आपण भक्त सुख, शांति, समाधानाच्या शिखरावर पोहोचणार आहात, ती माध्यमे, स्वतःच्या पूर्वपुण्याईने व गुरुकृपाशिर्वादाने प्राप्त झालेली ठेव जेव्हा आपण भक्तांच्या कल्याणार्थ लोककल्याणाचा ठेवा म्हणून व्यतीत करतात, या त्यांच्या सद्हेतूत कदापिही आपण भक्तांकडून काही प्राप्त व्हावे असा ऐहिक लोभ न असतां ‘पारमार्थिक लोभ तुम्हा भक्तांकडून असावा हे विनंती’ असे उद्गार त्यांच्या आत्मिक प्रेरणेने प्राप्त झालेल्या आचारविचारात सदैव आपणास जरी अनुभवास येत असले, तरी आपले जीवन हे ‘लोभ’ या विषयाशी इतके हितसंबंधीत झाले आहे की, याचे उदाहरण



म्हणजे जीर्ण झालेली वस्त्रेसुध्दा गोरगरीबाना फुकट देऊन त्याचा सदुपयोग आपण करुन न घेता, त्या वस्त्रावर दारावर येणाऱ्या बोहारणीकडून काहीं भांडे-कुंडे मिळेल काय या विचाराने ती जतन करता व अशा विचाराप्रत पोहोचलेली आपली जीवने गुरुमाध्यमाची परीक्षा घेण्यासही तयार असतात. अशावेळी सूज्ञ भक्तांनी एवढाच विचार करावा की, माझ्या कल्याणार्थ जी मला दिवसाकांठी एक तास देवादिकांची किंवा श्रीसद्गुरुंची सेवा सांगितली आहे, ती मी माझ्या जीवनातील चोवीस तासापैकी एक तास तरी ‘त्याग’ या भावनेने करु शकतो काय? असा त्याग आपण जरी करते झाला नाहीत, तरी अनादिकालापासून वेदवेदांतांनी व धर्मशास्त्रांनी श्रीसद्गुरु हे कृपाळु व दयावंत असतात असे गाईले आहे, त्याची अनुभूति ही कालकालांतरपरत्वे अनुभवास येतच असते.

प्राप्त जन्मातील ऋणानुबंधांशी हितसंबंधित असलेल्या दोषांच्या निवारणार्थ ज्या साधनपध्दतीने आज निराकरणे केली जात आहेत, त्या निराकरणपध्दतीत आजपर्यंत आपणास ज्यांचा लाभ करुन देण्यात आला ती निराकरणे म्हणजे ‘कर्मविमोचन, ’ ‘वंशविमोचन, ’ व ‘ऋणविमोचन’ ही होत. ही निराकरणे केवळ सूचित करुन त्यांचे दोषपरिमार्जन कदापिही होत नसल्याने, आपण भक्तांस गुरुकृपाशिर्वादाचा लाभ आपल्या काया-वाचा-मनाला होऊन, हा पंचभौतिक देह, हे ऋणानुबंध विमोचित करण्यास समर्थ व्हावा म्हणून श्रीगुरुंनी आपण भक्तांस ‘उपासना दीक्षा, ’ ‘नामस्मरण दीक्षा, ’ ‘अनुग्रह दीक्षा’ व ‘गुरुदीक्षा’ आदि देऊन जरी कृतार्थ केले, तरी ह्या दीक्षाप्राप्तीनंतर आपण भक्तांनी आपले देहिक माध्यम पवित्र

अशा आचार, विचार व आहार यापरत्वे, प्राप्त झालेल्या दीक्षांना अनुकुल कार्य करण्यास योग्य असे देहाचे शुध्दिकरण करावयाचे कर्तव्य न केल्याने, तो दोष पर्यायाने जेव्हां गुरुमाध्यमाकडे येतो, तेव्हा भक्तांच्या ज्ञानअज्ञानाने घडलेल्या सेवेबद्दल गुरूमाध्यमास प्रायश्चित्त घ्यावे लागते. ह्या दीक्षांतपध्दती नाथपरंपरेत किंवा दत्तपरंपरेत अनादिकालापासून सूचित केलेल्या जरी असल्या, तरी नाथपरंपरेतील किंवा दत्तपरंपरेतील साधक म्हणविणाऱ्या कुणीही साधकाने त्याचा आस्थापुर्वक विचार करुन, स्वतः प्रायचित्त न घेता, आपल्या भक्तगणांनाच प्रायश्चित्ते दिलेली आहेत. आपण भक्त आज ज्या कार्यपध्दतीचा लाभ घेत आहात, त्या कार्यपध्दतीत दत्तपंथ, सुफिपंथ व नाथपंथ हे सामावलेले असल्याने व त्यांची कार्यकारण यंत्रणा एकाच सिध्दसिध्दांतपध्दतीवर आधारलेली असल्याने साधकाला कितीही मोठे श्रेष्ठपद सिध्दावस्थेप्रत जाऊन प्राप्त झाले व त्या अवस्थेप्रमाणे समाजात त्याला नांवलौकिक व मोठेपणा जरी प्राप्त झाला, तरी प्राप्त केलेली साधने ही लोककल्याणार्थ एक तपापेक्षा अधिक मार्गदर्शनार्थ सूचित केल्यावर, पुनश्च ती साधने सिध्द करण्यासाठी प्रायश्चित्त घेऊन, ज्या निराकरणांचे संबंध देवादिकांशी आहेत, त्या त्या देवतांना आवाहनित करुन, त्यांचा हवनीय विधी करावयास लागतो. यासाठी जी हवने श्रीक्षेत्र नरसोबावाडी येथे झाली, त्यांचा संबंध वर निवेदन केलेल्या शास्त्रीय मीमांसेशी आहे. ते करण्यामागे माझी केवळ व्यक्तिगत अशी ऐच्छिक भूमिका नव्हती. पुढील काळांत आपण भक्तगणांना आवश्यक असणारे सहाय्य आपणास सिध्दावस्थेत प्राप्त करुन देण्यासाठी,



गुरुआज्ञेप्रमाणे ही सर्व सेवा करुन, गुरुपौर्णिमेस मी ती साधने गुरुदक्षिणा म्हणून श्रीगुरुंना समर्पित केलेली आहेत हेही आपण भक्तभाविकास सांगण्यास आनंद वाटतो. वास्तविक, जन्मउत्पत्तीमीमांसेप्रमाणे प्राप्त जन्म हा पाच ऋणानुबंधांनी म्हणजे देवादिक, मातृपितृ, इतरेजन, जन्मजन्मांतर व जन्मकर्म यांनी जरी प्राप्त झालेला असतो, तरी हे पांच ऋणानुबंध एकमेकांना हितसबंधित व पोषक असतात असे नाही. याशिवाय प्राप्त जन्मात, आपल्या जीवनातील ज्या काही इच्छाअपेक्षा आपण करतो, त्या साकार होण्यास हे पांचही ऋणानुबंध एकमेकास जर अनुकुल असतील तर विद्या, संपत्ती, संतती, अन्न, वस्त्र, निवारा या ऐहिक गरजांची पूर्तता होऊनहि, त्या प्राप्त झालेल्या जीवनाचाच केवळ लाभ घेणे म्हणजे जीवन, अशा विचारपरत्वे या व्यक्ती जीवन व्यतीत न करता, जीवनात देवादिक ऋणानुबंधपरत्वे या पंचभौतिक देहाच्या ठिकाणी काहीं सात्विक गुणाची अवस्था ही जन्मतःच आपल्या व जगताच्या हितार्थ आपल्या पंचभौतिक देहांत असते, त्याची जाणीव होऊन, तो गुण अधिक विकसित कसा करुन घेता येईल, तत्संबंधीच्या मार्गदर्शनार्थ ह्या व्यक्ती आपले जीवन व्यतीत करतात. पण अशा गुणांची ठेव ही जरी त्या व्यक्तींच्या देहिक माध्यमाच्या ठिकाणी उपजत प्राप्त झाली असली, तरी योग्य मार्गदर्शनाच्या अभावी व योग्य गुरुकृपेच्या अभावी हे गुण जरी स्वतःच्या व जगत्ककल्याणाच्या हिताचे असले, तरी त्यांचा यथोचित विकास होऊन, त्याचा लाभ स्वतःला व इतरांना न देताच आजपर्यंत अशा अनेक व्यक्ती प्राप्त जन्मासाठी व जगतासाठी काहीएक कार्य न करता दिवंगत झाल्या आहेत.

प्रत्येक मानवास पांच ऋणानुबंधपरत्वे जन्म प्राप्त होतो. त्याच ऋणानुबंधापैकी जो एक प्रधान ऋणानुबंध असेल, तो जन्माचे कारण म्हणून जन्माला येतो. अशा अवस्थेचे उदाहरण द्यावयाचे झाले तर पांच ऋणानुबंधापैकी जन्मकर्म, जन्मजन्मांतर, इतरेजन व मातृपितृ हे चार ऋणानुबंध म्हणजे आपण रहात असलेल्या घराच्या चार भिंती असतात, त्याप्रमाणे प्राप्त जीवनाचे आधार आहेत. या चार ऋणानुबंधावर छत म्हणजे निवारा हा देवादिक ऋणानुबंध आहे. असे यथोचित जीवन जेव्हा आपणास प्राप्त होते, त्यावेळी जीवनाबद्दलच्या इष्ट अपेक्षा म्हणजे विद्या संपत्तीपासून ते दीर्घायुष्यापर्यंत, या पूर्णावस्थेला जातात. पण जेव्हा ह्या चार ऋणानुबंधापैकी केवळ एकच ऋणानुबंध अधिक प्रखर म्हणून जन्माला येतो, त्यावेळी खालीलप्रमाणे जीवनात अशांतता, दु:खे अनुभवास येतात. वास्तविक प्रपंच व परमार्थ ही जीवनाची दोन्ही अंगे संसारात स्त्री-पुरुषांनी एक विचाराने व एक आचाराने केली, तरच ती शोभायमान होऊन, त्यातील आनंद अनुभवास येतो. पण जर एखाद्या व्यक्तीचा प्रधान गुण हा ‘जन्मकर्म’ असेल, तर त्या व्यक्तीला खाणेपिणे, ऐषाराम याव्यतिरिक्त जीवनात देवधर्म, परोपकार, धर्माचरण आदि करण्याची चुकुनही इच्छा होत नाही. ज्याचा प्रधान गुण ‘जन्मजन्मांतर’ असेल, ती व्यक्ती प्रपंच व परमार्थ तितक्याच आस्थेने करीत असते. हे करण्यात त्यांना सुखही वाटत नाही व दु:खही वाटत नाही. कारण ते त्यांचे जीवन कर्तव्य व्यतीत म्हणून होत असते. ज्या व्यक्तीचा प्रधान गुण ‘इतरेजन’ हा असेल, त्या व्यक्तीचे जीवन हे अधिक प्रमाणात इष्टमित्र व सामाजिक समस्या यांचा विचार करण्यात जाते. पण चुकूनही



बायकामुलांसाठी आपले काही कर्तव्य आहे, ही आस्था विचारात येत नाही. त्यामुळे ह्या व्यक्ती मित्रपरिवारात किंवा समाजात जरी नांवारुपाला आल्या, तरी कुटुंबातील व्यक्तींकडे दुर्लक्ष झाल्याने, भविष्यात कुटुंबे निराधार होतात. ज्या व्यक्तीचा प्रधान गुण ‘मातृपितृ’ असेल, त्या व्यक्ती आपले हितअहित यांचा स्वत: विचार न करता, आईवडिल सांगतील हेच प्रमाण असे मानतात, किंवा काहीं व्यक्ती यांचे जन्मदाते आईवडिल जरी असले, तरी त्यांचे एकमेकांशी काडीमात्र सख्य नसते. याशिवाय या गुणातील महत्वाचा दोष म्हणजे, ज्या व्यक्तींना जन्मापासून भाग्यकारक दिवस आलेले असतात, ते त्यांचे जीवन मातापित्याच्या हयाती नंतर लयास जाते;किंवा काहींचा भाग्योदय मातापित्यांच्या हयातीनंतर होत असतो.

ज्या व्यक्तींच्या जन्मांत ‘देवादिक’ हा गुण अधिक प्रखर व प्रधान असतो, अशा व्यक्ती सदैव देवदेवतार्जन, पोथीपुराण, नामस्मरण, कीर्तन आदीमध्ये आपला काळ व्यतीत करतात व हे करुनही समाधान झाले नाही, तर कोठल्यातरी तीर्थक्षेत्री जाऊन वास्तव्य करतात. ह्या त्यांच्या वास्तव्यात त्यांची भूमिका अशी असते की, देवाच्या आज्ञेने आपण सेवेस राहिलो आहोत. अशावेळी वर्षानुवर्षे सेवा करुनही त्याचे फळ मिळत नाही. कारण देवादिक हा गुण जरी प्रधान असला, तरी प्राप्त जन्मात कर्तव्यार्थ जे चार ऋणानुबंध बाकी आहेत, तत्संबंधीची कर्तव्ये न केल्याने, ह्या कर्तव्यपरत्वे करावी लागणारी कर्मे ही त्यांच्या तीर्थक्षेत्रातील वास्तव्यात त्यांच्या उपासनेआड येत असल्याने, अशा व्यक्तींना जन्माला येऊन, प्रपंचाचे व परमार्थाचे अशी दोन्ही सुखे यांचा लाभ घेता येत नाही.

जन्माचे प्रधान गुण हे जे व्यक्तिशः असतात, त्याबद्दल वर मार्गदर्शन केले आहे. पण ह्या व्यक्ती विवाहित झाल्यावर ज्या स्त्रीशीं यांचा विवाह होतो, त्या स्त्रीचेही गुण वर सांगितलेल्या गुणपरत्वे भिन्नाभिन्न असतील, तर कुटुंबात सदैव दुःख व अशांतता निर्माण होते. उदाहरणार्थ जर एखादी व्यक्ती जन्मकर्म हा गुण म्हणून जन्माला आली असेल व त्याची धर्मपत्नी ही जन्मजन्मांतर गुणाने प्रधान असेल, तर तिचे स्वाभाविक आचारविचार हे धार्मिक प्रवृत्तीचे व कुटुंबकल्याणार्थ पोषक व्हावे म्हणून देवदेवतार्जनाकडे कार्यान्वित झालेले असतात. पण हा तिचा देवधर्म आपल्या कुटुंबाच्या रक्षणार्थ व पोषणार्थ आहे, असा सूज्ञ विचार तिच्या पतीच्या ठिकाणी निर्माण न झाल्याने, पतीस आपली स्त्री देवधर्माचे अवडंबर माजवीत आहे असे वाटून, त्या स्त्रीचा उपजत असणारा गुण विकसित न होता, तिच्या विकासा आड तिचाच पती, जो जन्मकर्म हा गुण घेऊन जन्म घेता झाला आहे, तो येतो. यातील अधिक महत्वाची ओळख अशी की, अशा कुटुंबातील काही स्त्रियांना त्यांच्या कुलदेवतांचे संचार असतात. पण अशा स्त्रियांना आपल्या पतीला हा मार्ग रुचत नाही म्हणून इतरत्र कुटुंबियांचे घरी जाऊन, ही संचार अवस्था व्यक्त करावी लागते. याउलट दुसरी बाजू अशी अनुभवास येते की, पतीचा प्रधान गुण जन्मजन्मांतर व धर्मपत्नीचा प्रधान गुण जन्मकर्म, अशा वेळी पति हा स्वाभाविक देवधर्म करुन धर्माचरण करीत असतो. कारण त्यास प्रपंचातील कर्तव्याची जबाबदारी कृपाशिर्वादाने पार पाडावयाची असून, प्राप्त झालेल्या गुणांमुळे ह्या जन्माचे काहीतरी सार्थक व्हावे असे वाटत असते पण जर पत्नीचा प्रधान गुण जन्मकर्म असेल, तर पतीने अंगिकारलेल्या



देवादिकांच्या किंवा गुरुभक्तीच्या सेवेत ती सहकार्य न देता, विटाळातही त्याला अन्न सेवन करण्यास भाग पाडून, त्याच्या पारमार्थिक उन्नतीस हानी पोहचविते.

अशाच प्रकारची भिन्नाभिन्न गुणपरत्वे जन्माला आलेली मानवी जीवने ही जेव्हा एकत्र येऊन, ह्या विसंगत गुणांमुळे प्रपंचात व परमार्थात दुःखाला कारणीभूत होतात;अशांना सूज्ञपणाने एवढेच सांगावयाचे आहे की, जरी आपण ह्या जन्मात प्रपंच करते झालात किंवा परमार्थ अंगिकारते झालात, तरी जोपर्यंत एकमेकांचे प्रधान गुण एकमेकांना पोषक होत नाहीत, तो पर्यंत दोन्ही अवस्थेतील कर्तव्ये ह्या जन्मात प्राप्त करुनहि, त्याचा लाभ पुढील जन्मासाठी यत्किंचितही होऊ शकत नाही.

वरील विषयाचा आपणास परिचय करुन दिल्यावर, आपली महत्वाची जबाबदारी अशी की, ज्या गुणपरत्वे आपल्या कुटुंबात पति-पत्नीपासून ते मुला-बाळापर्यंत ही भिन्नता आहे, त्या गुणपरत्वे होणारे कार्य हे जरी एकमेकांना पोषक नाही, तरी त्यासाठी एकमेकांनी एकमेकांच्या गुणातील गुणदोष वेचित न बसता, जीवनाला ज्या महत्वाच्या गुणांचा आधार म्हणजे देवादिकांचा गुण, याच्याशी सर्वानी एकरुप व्हावे. यासाठी तुम्ही भक्तांनी कुलदेवतांची, उपास्य देवतांची किंवा गुरुदेवतांची आराधना करावी. पण चुकूनही एकमेकास ही आराधना करीत असताना, परमेश्वरावर अधिक प्रेम, त्याच्याबद्दलची अधिक भक्ति, त्याच्याबद्दलचा अधिक निःस्वार्थ भाव किंवा परोपकार का करावासा वाटतो, ह्या विचारपरत्वे त्या व्यक्तींच्या गुणांच्या विकासाआड येऊ नये. असे भिन्नाभिन्न गुण हे एका पातळीवर

आणून, त्यांचा हितसंबंध देवादिकांशी जर गुरुकृपाशिर्वादाने जोडला गेला, तर आज जीवनात विचार अविचाराने घडणारे अनेक क्षुल्लक प्रसंग व त्यापासून होणारा मनस्ताप किंवा आत्महत्या करण्याच्या प्रवृत्तिपर्यंत आपल्या विचारांची दिशा, जी या भिन्नाभिन्न गुणपरत्वे होत असते, त्या विचारांना देवादिकांशी संबंधित केल्याने तुम्ही बुध्दीने कितीही अविचार करते झालात, तरी त्या अविचारांना सामावून घेण्यासाठी, मनाचे सामर्थ्य हे अधिक झालेले आहे, हे अनुभवास येईल.

आपण भक्तांच्या अडिअडचणीनिवारणार्थ सुलभ व सोप्या अशा मार्गदर्शनपध्दतीतून, आपण सर्वांना प्राप्त जीवनात सुख, शांति, समाधान याचा योग्य तो लाभ व्हावा, या सद्‌हेतूने या कार्यास आरंभ झाला व या कार्यपध्दतीतील मार्गदर्शन हे आचारविचारात आणण्यास जरी सुलभपध्दतीने मार्गदर्शन करण्यात आले, तरी या साधनपध्दती प्राप्त करणे, हे गुरुमार्गात आपणास वाटते तितके सुलभ असे साधन नाही. कारण जरी एखाद्या व्यक्तीला आपल्या नित्य साधनेने किंवा उपासनेने गुरुकृपाशिर्वादाची प्राप्ती झाली, तरी प्राप्त झालेला गुरुकृपाशिर्वाद नेमका कोणत्या साधन माध्यमातून उपयोगात आणला असता, आपण भक्तांचे कल्याण होईल, हे ठरविणे व प्रत्यक्षात त्याची अनुभूति येणे, हे एक दिव्य साधन गुरुमार्गात साधकाला विचारात घ्यावे लागते.

प्रत्येक मानवाचा जन्म हा अनादि जन्मांच्या कर्मपरंपरेतून उदित होत असल्याने, प्रत्येक जन्मात त्या मानवाच्या हातून कर्मक्षय व कर्मवृध्दि ही होत असतांना, नकळत ऋणानुबंधांचे



हितसंबंध त्याच्या जीवनाशी जोडले जात असतात. पुढे अनेक जन्मानंतर जेव्हा प्राप्त जन्मात प्राप्त कर्मपरत्वे जो जन्म येतो, त्यापेक्षा जर ऋणानुबंधाची प्रखरता अधिक असेल, तर जन्माला आलेल्या व्यक्तींच्या भूतभविष्याचा आराखडा हा जरी राजयोग दर्शवित असला, तरी कर्मपरत्वे प्राप्त होणारी फले प्राप्त न होता, ऋणानुबंधपरत्वे प्राप्त झालेले दोष, हे भोगणे ह्या जन्मात भाग पडते. असे ऋणानुबंधपरत्वे असणारे दोष व त्याचे निवारण व्हावे म्हणून आपल्या घराण्यातील इष्टदेवदेवता याच्या प्रित्यर्थ उपासतापास, नवससायास, व्रतवैकल्ये, होमहवन, जपजाप्य इत्यादि मार्गाचा अवलंब करुन आपण सुखाची अपेक्षा करते झालो, तरी ह्या दोषांची प्रखरता इतकी प्रखर असते की, केले गेलेले देवदेवतार्जन याचे केवळ आपण स्मरण करण्याव्यतिरिक्त त्याचा उपयोग ह्या दोषांच्या निवारणार्थ होऊ शकत नाही.

अशामुळे अनंत काळपर्यंत देवदेवतांचा कृपाशिर्वादार्थ आधार घेऊनसुध्दा, आपण भक्तांची जीवने ही निराधार होत असतात. तेव्हा अशा दोषांचे योग्य कार्यपध्दतीने व मार्गदर्शनाने निवारण करुन घेणे, हा मार्ग जीवनारंभी जरी बिकट वाटत असला, तरी भवितव्यात तो निरंतर अशा सुखाची ठेव असतो. अशा प्रकारची जी साधने आहेत, या साधनांना शास्त्राने विमोचन असे संबोधले असून, त्यापैकी पन्नास टक्के साधन हे गुरुमार्गात साधकाला प्राप्त होत असते व या प्राप्त झालेल्या साधनाप्रमाणे जेव्हा आपण भक्त, आपल्या अडिअडचणीनिवारणार्थ ह्या साधकाच्या मार्गदर्शनाचा लाभ घेता, त्यावेळी विमोचनार्थ जे विधी सुचित करण्यात येतात, उदाहरणार्थ त्रिपिंडी, नारायण नागबळी, हे जरी विधी

भिन्नाभिन्न तीर्थक्षेत्री करण्यासाठी सूचित करण्यात आले, तरी केवळ विधी करण्याने हे दोष निवारण होत नाहीत कारण हा विधी करण्याचा विधी हा केवळ तीर्थक्षेत्री झाला आहे म्हणून त्याला फलप्राप्ती आहे, असे नाही. हा विधी करणारी व्यक्ती, ही सर्वस्वाने गुरुरुप व गुरुअंकित असावयास पाहिजे; व हे दोष निवारण करण्याचे सामर्थ्यही त्या साधक व्यक्तीत असावयास पाहिजे;तरच ह्या दोषांचे विमोचन होऊ शकते. ह्या शास्त्रीय पध्दतीप्रमाणे आपण भक्तांच्या कल्याणार्थ एकवीस वर्षे जे वंशविमोचनादि विधी, ऋणमोचन विधी व गुरुदीक्षेपर्यंत दीक्षांत विधी करण्यात आले, त्यांची पूर्णतः सांगता ज्या विधीने करण्यात आली तो विधी म्हणजे, महारुद्र स्वाहाकार विधी होय.

**कर्मविमोचन**:-प्राप्त जीवनातील अडिअडचणीनिवारणार्थ गुरुमार्गदर्शनार्थ आल्यावर, ज्या निराकरणपध्दतीने अडिअडचणींचे निवारण होऊन, खऱ्या अर्थाने भक्ती करण्याची योग्य ती शिकवण गुरुमार्गदर्शनाप्रमाणे मिळत असते, अशा वेळी ह्याच अडिअडचणी निवारण्याचे प्रयत्न ज्ञानअज्ञानाने, विचारअविचाराने पूर्वीही झालेले असतात. परंतु ह्या प्रयत्नांना यश न येण्याचे कारण म्हणजे, प्रयत्न ‘निराकरण’ नसून, निराकरणार्थ केलेला तो एक प्रयत्न असतो. पण गुरुमार्गात खऱ्या अर्थाने भक्ती करण्याची सतत आवड निर्माण झाल्यानंतर, जो अढळ विश्वासाने गुरुभक्ति करतो, पण चुकूनही उपासतापास, व्रतवैकल्ये, जपजाप्य हे पुनश्च करण्याचा विचार करीत नाही हा जो बदल गुरुकृपाशिर्वादाने प्राप्त होत असतो, त्यालाच 'कर्मविमोचन' म्हणतात. परंतु गुरुमार्गात भक्तभाविक ह्या विमोचनाचा अर्थ अज्ञानाने असा लावतात की, पूर्वीच्या



अनेक जन्मात ज्ञानअज्ञानाने घडलेल्या पातकप्रमादांचे विमोचन म्हणजे कर्मविमोचन. पण कर्मविमोचन हे साधन केवळ जन्मजन्मांतर व जन्मकर्म ह्यांच्याशी हितसंबंधित नसून, प्राप्त जीवनांत ज्या आचारविचारांचा आघात आपल्या नित्य कर्तव्याआड येत असतो, अशा वेळी तत्परतेने तसे न करण्याची जाणीव होण्याची क्रिया ज्या माध्यमातून होते, अशा माध्यमिक अवस्थेला कर्मविमोचन असे म्हणतात. ह्याचा अर्थ कर्मविमोचन ही साधना देवाप्रित्यर्थ होणाऱ्या नित्य साधनेपेक्षाही अधिक जवळची असल्याने, दिवसाकांठी आपण आपले कर्मविमोचन गुरुकृपाशिर्वादाने किती करु शकलो, ह्याचा नित्याने आढावा घेणे, म्हणजे पुण्यसंचय होय.

**ऋणमोचन** :- वरील दोन अवस्थांच्या हितसंबंधात जीवनातील प्रतिकूल अशा कर्मामुळे जो त्रास शारिरीक, मानसिक व आर्थिक अशा स्वरुपात होत असतो, यासाठी विमोचन म्हणून जे करण्यात येते, त्यामुळे कर्माची प्रखर प्रतिकूलता लयास जाऊन अनुकुलतेचा लाभ होत असतो. ऋणमोचन म्हणजे पूर्वीच्या जन्मात आपण एकमेकांचे ज्या काही कर्मकार्यपरत्वे ऋणी असतो, असा हितसंबंध नसून, प्राप्त जन्मात आपण ज्या कुटुंबात जन्म घेते होतो, त्या कुटुंबातील आपली आप्तेष्ट मंडळी यांचे हितसंबंध नात्याने किंवा कर्मपरत्वे पूर्वीच्या जन्मात आलेलेच असतात असे नाही पण या जन्मात एका कुटुंब छायेखाली आपण जन्माला आल्यामुळे, आपले देहिक नात्याचे हितसंबंध बहिणभाऊ, आईवडिल, मुलेमुली, नातवंडे इत्यादि विषयपरत्वे जरी जोडला जात असला, तरी एका कुटुंबाच्या छायेमुळे जो जन्म प्राप्त होत असतो, त्यामुळे हे हितसंबंध

देहिक स्वरुपात जरी आपणास नाते म्हणून जाणवले किंवा आपण विचारात घेतले, तरी पूर्वकर्मपरत्वे जो जन्म प्राप्त होतो, त्या प्राप्त जन्मात ह्या प्रत्येकांशी आपले हिताचे हितसंबंध कर्मपरत्वे असतीलच असे नाही म्हणून अनेक कुटुंबात सख्ख्या बहिण भावंडात नात्याचे हितसंबंध अनुभवास न येता, अधिक विभक्तता अनुभवास येते. याचे कारण प्राप्त जन्मात केवळ देहाने नाते असून, हा स्नेहभाव किंवा आदर निर्माण होत नाही. यासाठी एकमेकांना पोषक अशा कर्माचे हितसंबंध जर जीवनाशी हितसंबंध म्हणून कार्यान्वित होतील, तर परस्परांबद्दलचा जिव्हाळा व आपलेपणा हा अनुभवास येईल. जीवनात असणारी अशी ही विसंगती गुरुकृपाशिर्वादाने निवारण होऊन, कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीस आपले इष्ट कर्तव्य स्वतःच्या कल्याणार्थ व कुटुंबकल्याणार्थ करण्यास जो वाव कृपाशिर्वादामुळे प्राप्त होतो, ह्या क्रियाकर्मास जी अवस्था कृपाशिर्वाद म्हणून कारण होते, त्यास 'ऋणानुबंध' असे म्हटले आहे. ऋणानुबंध याचा अर्थ एकमेकांशी एकमेकांचे देणे घेणे करण्याचा व्यवहार नसून, प्राप्त जन्मात प्रेमाने व कर्तव्याने जीवन व्यतीत करण्याचे कर्तव्य करणे असा आहे.

जीवनउत्पतीचे वरील शास्त्रशुध्द कारण समजल्यावर, आपणास ही गोष्ट स्पष्ट समजावयास पाहिजे की, अनेकवेळा कुटुंबातील मुलामुलींची नांवे ही मागील पिढीतील दिवंगत व्यक्तींच्या नांवाशी हितसंबंध जोडून, त्याच व्यक्ती कुटुंबात पुनश्च जन्माला आल्या आहे असे समजून, त्याच त्याच नावाचे नामकरण विधी मुलामुलींच्या बाबतीत अनेकवेळा केले जातात. वास्तविक कुटुंबात जन्माला येणारा जीव हा आपल्या नात्याच्या



हितसंबंधामुळे जन्माला येतो असे नसून, जीवास जन्मप्राप्तीनंतर आपल्या जीवनाचे पूर्णत्व प्राप्त करण्यास योग्य कुटुंब व काळवेळ, हा विचार करुन जन्माला यावयाचे असते किंवा पूर्वीच्या अनेक जन्मपरत्वे जी कर्मप्रवृत्ति शिल्लक राहिली असेल, त्या प्रवृत्तिप्रमाणे जीवास जन्म प्राप्त करणे भाग पडते. अशा अवस्थेत जन्माला येणारे जीव हे नात्याचे किंवा कुटुंबातील इतर व्यक्तीच्या हितसंबंधाचे आहे हे समजून जे नामकरण विधी होतात, त्या व्यक्तींना भविष्यकाळात ह्या नामकरण विधीमुळे, ज्या दिवंगत व्यक्तींशी त्यांचा हितसंबंध अज्ञानाने जोडून दिलेला असतो, अशांच्या कर्मपरंपरेशी हितसंबंध आल्यामुळे, प्राप्त जन्मात जरी प्रतिकूल कर्माची आधिक प्रखरता नसली, तरी ह्या नामकरणामुळे अनावश्यक कर्माचा हितसंबंध उदित होण्याने, त्या व्यक्तीस आपले जीवन नाममात्र व्यतीत करावे लागते. यासंबंधी तात्त्विक विवेचन आपण भक्तांना व्हावे म्हणून क्रमशः ह्या विमोचनासंबंधी जे निवेदन लिहिले आहे, ते अभ्यासण्यास महत्त्वाचे आहे.

या निराकरणपध्दतीत आपल्या प्राप्त जन्मात अडिअडचणी निर्माण होण्याचे जे दोष वरील कारणपरत्वे असतात, त्याचे ज्ञान सर्वसामान्यपणे अडिअडचणीत असणाऱ्या भक्तभाविकांना होत नसल्याने, आपण अडिअडचणीमध्ये आहोत, म्हणजे कोणीतरी आप्ताने, इष्टमित्राने जादुटोणा, करणी किंवा काही भूतप्रेत आदि प्रकारांनी आपल्याला त्रास देण्याचा प्रयत्न केला आहे, अशी आपण बहुसंख्य भक्तांची विचारधारणा असते. अशा दुबळ्या व संशयग्रस्त विचारांनी बाहेरील साधकांना आपण भक्तांकडून पैसे मिळविण्यास योग्य ती संधी आपणच अज्ञानाने

देत असतो. वास्तविक मंत्रतंत्र, भूतप्रेत आदि विद्या आज नाहीत असे नाही. परंतु त्यांचा वापर करणे हे सहजासहजी कोणासही प्राप्त होण्यासारखे साधन नसल्याने, केवळ आपल्या अडिअडचणींचे कारण समजू शकत नाही, म्हणून या मार्गावर आपण विसंबून राहतो.

आपण भक्तभाविकांना योग्य ती मार्गदर्शनाची दिशा निराकरण म्हणून सूचित केल्यावर, आपल्या व आपल्या कुटुंबियांच्या कल्याणार्थ ज्या दीक्षा गुरुआज्ञेने दिल्या जातात, त्या दीक्षा म्हणजे उपासना दीक्षा, नामस्मरण दीक्षा व अनुग्रह दीक्षा ह्या होत. ह्या तीन दीक्षांचा लाभ घेतलेल्या भक्तभाविकांना 'उपासना' दीक्षेत त्यांच्या इष्ट कुलदेवतेची उपासना सूचित करण्यात येऊन, आजपर्यंत त्यांच्या हातून न झालेला त्या देवदेवतांच्या बद्दलचा कुलधर्म कुलाचार, हा सोप्यापध्दतीने करण्याबद्दल मार्गदर्शन करण्यात येते. 'नामस्मरण' ह्या दीक्षाविधीत काही एका निश्चित संख्येने आपण भक्तांनी नामस्मरण करावे व त्या नामस्मरणाचा उच्चार करण्यापूर्वी, काही एका इष्टसंकल्पाचा उच्चार करावा; ह्या पध्दतीने ही दीक्षा देण्यात येते. तिसरी दीक्षा ही 'अनुग्रह' दीक्षा ही दीक्षा म्हणजे प्रत्यक्ष ज्या गुरुतत्त्वाचे आपण उपासक आहोत किंवा पूजक आहोत, त्या तत्त्वाशी आपण एकरुप झालो आहोत असे नसून, पुढे देण्यात येणाऱ्या गुरुदीक्षेची ही पूर्वतयारी आहे. अशी कार्यपध्दती असतांनासुध्दा, ज्या भक्तभाविकांना या तीन दीक्षा घेण्याचा लाभ झाला आहे, अशांची श्रध्दा, विचारधारणा अशी आहे की, या तीन दीक्षा आपल्या जीवनांत पारमार्थिक उन्नतीसाठी दिलेल्या आहेत;किंवा ज्या देवदेवतांचे आपण



पूर्वापार पूजनादि विधी केले आहेत व ज्या गुरुतत्त्वाला आज आपण गुरुस्थानी मानतो आहोत, अशांच्या दिव्य दर्शनासाठी, साक्षात्कारासाठी किंवा दिव्य ज्ञानासाठी या दीक्षा आहेत. अशी समजूत करुन घेऊन ह्या दीक्षापरत्वे होणारा जो लाभ आहे, तो कोणत्या कारणपरत्वे घ्यावयाचा आहे, हा सद्हेतू विचारात न घेता, केवळ पारमार्थिक जीवनाचा जीवनारंभ झाला आहे असे भासवून अनेक व्यक्ती आपली नित्याची इष्टकर्तव्ये बाजूस ठेवून या उपासनेतून आपण काही विलक्षण प्राप्त करणार आहोत, म्हणून जीवनातील बहुमोल वेळ अधिकाधिक उपासना करण्यात खर्च करतात. वास्तविक मार्गदर्शनपध्दतीप्रमाणे ह्या तीनही दीक्षा, ह्यांचा हितसंबंध पारमार्थिक जीवनाचा लाभ जोडण्यासाठी किंवा देवदेवतांच्या साक्षात्कार, दृष्टांतासाठी नसून, ह्या उपासनेचा हितसंबंध प्राप्त झालेल्या जीवनातील देहिक माध्यमाशी, म्हणजे काया, वाचा, मन ह्यांच्याशी आहे.

आज प्राप्त झालेले काया, वाचा, मन म्हणजे देहिक माध्यम ह्याच माध्यमद्वारा प्राप्त जन्मात आपण भक्तांना ऐहिक जीवन व पारमार्थिक जीवन यांचा यथोचित लाभ करुन घ्यावयाचा आहे पण असे प्राप्त झालेले देहिक माध्यम ह्याचे अस्तित्व जरी आपल्याला जाणवत असले, तरी हे प्राप्त झालेले देहिक माध्यम पूर्वीच्या अनेक जन्मातील ऋणानुबंधांशी हितसंबंधित आहे. अशा संबंधाचे हितसंबंध म्हणजे पूर्वीचे आपले अनेक जन्म, त्या जन्मपरत्वे ज्या ज्या काही कुटुंबात, ज्या ज्या काही धर्मात, ज्या ज्या काही देवदेवतांच्या ऋणानुबंधात आपण जन्म घेते झालो; असे वेळोवेळी घेतले गेलेले जन्म व आज प्राप्त झालेला जन्म, ज्याचा संबंध देहिक माध्यमद्वारा कर्तव्य म्हणून

व्यतीत करावयाचा आहे; अशा ह्या देहिक माध्यमाच्या परिसरांत असणाऱ्या हितसंबंधांच्या वलयांचा हितसंबंध, हा जरी प्राप्त झालेल्या काया, वाचा, मनाशी असला, तरी त्या सर्व ऋणानुबंधाना पोषक असे माध्यम म्हणजे आज प्राप्त झालेले काया, वाचा, मन हे जर असेल, तर प्राप्त जन्मात आपण ज्या काहीं सुख, शांति, समाधानाच्या अपेक्षा कराल, त्या पूर्णत्वास जाण्यास कोणत्याही कारणपरत्वे अडथळा निर्माण होणार नाही पण आज प्राप्त झालेले देहिक माध्यम म्हणजे काया, वाचा, मन हे जर ह्या ऋणानुबंधास धारण करण्यास पोषक नसेल, तर प्राप्त जन्मात ऋणानुबंधपरत्वे सुख, शांति, समाधान यांची तरतूद असूनही प्राप्त जन्म हा केवळ कष्ट करण्याशिवाय काहीही अधिक प्राप्त करु शकत नाही. अशी दोष परंपरा प्राप्त जन्मात ऋणानुबंधांशी व ऋणानुबंध हे प्राप्त जन्माशी असतील अशा वेळी सुख, शांति, समाधान प्राप्त करण्यासाठी आपण भक्त जो प्रयत्न अहर्निश करता, त्यांस योग्य ती फलप्राप्ती होण्यासाठी, कृपाशिर्वाद म्हणून काहीं माध्यामांची आवश्यता असते. अशा माध्यमाचा आपण भक्तांना विनासायास लाभ करुन देणे म्हणजे प्राप्त झालेले जीवनातील देहिक माध्यम हे ऋणानुबंधाशी अनुकूल करुन देणे किंवा ऋणानुबंध हे प्राप्त जीवनातील देहिक माध्यमाशी अनुकूल करून देणे अशा ज्या साधनांचा कार्यभाग आपण भक्तांच्या कल्याणार्थ गुरुआज्ञेने करण्यात येतो त्या साधनपध्दतीस ‘दीक्षाविधी’ असे म्हणतात.

ह्या तीन दीक्षांत विधींचा लाभ आपण भक्तांनी घेतल्यावर, ह्याचा संबंध देवदेवतांशी किंवा पारमार्थिक जीवनाचा लाभ किती झाला व किती होणार याच्याशी विचारात न



घेता, आपण नित्याने, ज्या कुटुंबात ह्या दीक्षांत विधीपूर्वी आचाराने, विचाराने व वाणीने बोलत होतो, चालत होतो त्या कुटुंबातील व्यक्तींना आपण घेतलेल्या ह्या तीन दीक्षांत विधीमुळे आपल्यात काय बदल झाला आहे, याची जाणीव होऊन, ही कुटुंबिय मंडळी आपल्याशी व आपण त्यांच्याशी आनंदाने कुटुंबवात्सल्याचा लाभ घेते झालात, तर परस्परांत जो हा स्नेहभाव निर्माण झाला ह्या अवस्थेलाच **“पारमार्थिक उन्नति”** म्हणता येईल.

ह्या प्राथमिक अवस्थेतील तीन दीक्षांत विधीचा लाभ होण्याने, आपण भक्तांचे काया, वाचा, मन या देहिक अवस्थेस एकरुपत्व येते त्यानंतर आपण भक्तांना ‘गुरुदीक्षा’ हा जो विधी दीक्षा म्हणून देण्यात येतो त्या क्षणापासून आपले जीवन पारमार्थिक होण्यास आरंभ होतो. कारण ह्या तीन दीक्षांत विधीपूर्वी आपणास अनेक वेळेला असे अनुभवास आले असेल की, काया हे माध्यम जरी देवदेवतांचे किंवा उपासनेचे बंधन मानून देवापुढे बसले, तरी ही क्रिया करण्यास मनाची जी एकाग्रता त्या वेळेस असावयास पाहिजे, अशा वेळेस मन हे अप्रत्यक्षपणे अन्य विषयाधीन झालेले आहे असे आढळून येते. अशी ही भक्ती करण्याची खोटी क्रिया, यामध्ये आपण तत्वत: देवाची फसवणूक तर करतोच, पण अधिक आपण आपलीच फसवणूक करुन घेत असल्याने, जो वेळ दिवसाकाठी ईश्वरचिंतनात म्हणून खर्च केलेला असतो हा देवदेवतांसाठी किंवा स्वत:साठी खर्च न होता, तो अनाठाई खर्च होत असतो. पारमार्थिक उन्नतीचा पाया म्हणजे काया, वाचा, मनाची शुध्दता होऊन, त्यांचे परिपक्वत्व होऊन, देवास मारलेली हाक

देवापर्यंत पोहोचणे व देवाची भाक [कृपा] आपणापर्यंत पोहोचणे व ही क्रिया पूर्णत्वास जाणे ह्याचाच अर्थ 'साक्षात्कार' होय.

वरील उल्लेख केलेल्या व आपण भक्तांनी भक्तिभावनेने ज्या दीक्षांत विधीचा अंगिकार करुन, ह्या तीन दीक्षांविधीतून आपल्या काया, वाचा, मनाची ऋणमुक्तता करुन देहिक अवस्थेला विमोचित करुन खऱ्या अर्थाने गुरुकृपाशिर्वादाला प्राप्त करुन जीवनाचे सार्थक केलेत. अशा ह्या दीक्षांत विधीना भवितव्यात सिध्दस्वरुप प्राप्त करुन, ती परंपरा पुढील काळात दु:खी लोकाच्या कल्याणार्थ कार्यान्वित होण्याचा कार्यकारणभाव म्हणजे श्री महारुद्र स्वाहाकार होय.

आजपर्यंत अशा प्रकारचा स्वाहाकार विधी हा अन्यत्र झालाही असेल किंवा यापेक्षाही मोठा विधी यापुढे केला जाईल तरीसुध्दा हा विधी ज्या प्रधान संकल्पमाध्यमातून करावयाचा असतो, असा संकल्प केवळ जगतातील दु:खी लोकांच्या सुख, शांति, समाधानासाठी आहे असे जाहीर करुन, सुख, शांति, समाधानाचे फळ आपल्या वाट्यास येत नाही. कारण हा विधी करण्यापूर्वी, आपण भक्तांच्या अडिअडचणीतील ज्या प्रधान अडिअडचणी आहेत यांची विस्तृत कल्पना ही स्पष्ट व्हावयास पाहिजे. प्राप्त जन्मात सुख, शांति, समाधानाच्या ज्या काही अपेक्षित इच्छा आहेत, त्या प्राप्त न होण्यास जी कारणे दोषपरत्वे आहेत, ते दोष जर जाणता जाणू शकला नाही, तर केला गेलेला संकल्प हा केवळ एक धार्मिक विधी, यापेक्षा महत्वाचा म्हणून आपण भक्तास लाभदायक होणार नाही.

वरील विमोचनावरुन आपण सूज्ञ भक्तास असे अनुभवास



येईल की, जीवनांत ज्या काही अडिअडचणी निर्माण झाल्या, त्यांच्या निवारणार्थ केवळ देवदेवतांवर त्याप्रित्यर्थ धार्मिक विधी व आचरण करण्याने, आपणास किंवा आपल्या कुटुंबियास अपेक्षित ऐहिक सुखे या जन्मात प्राप्त होतील असे शाश्वत कोणीही सांगू शकत नाही. याला कारण आपण भक्तांच्या जीवनातील सुख, शांति यांच्या आड येणारे जे दोष असतात, ते गुरुकृपाशिर्वादाने व निराकरणपध्दतीनें प्रथमत: अनुकूल करुन, त्या दोषपरत्वे असणारी त्या दोषांची जी सहज कर्मप्रवृत्ति असते, ती अनुकूल व्हावयास पाहिजे. अशी अनुकूलता प्राप्त झाल्याने जो भाग दोष म्हणून शिल्लक राहतो, त्याच्याच विमोचनार्थ पुढे गुरुआज्ञेने जे विधी होत असतात, त्यामुळे तुम्हा भक्तांच्या भवितव्याची तरतूद होत असते. पण आज साधक अवस्थेत असणाऱ्या व्यक्तींचे अनुभव असे असतात की, त्रिकालज्ञानप्राप्ती व त्याप्रमाणे भूतभविष्य याबद्दलचे जीवनाबद्दलचे भविष्य सांगणे म्हणजे गुरुमार्ग. पण सूज्ञ भक्तांनो जो खरा गुरुमार्ग आहे व ज्यास तो गुरुकृपाशिर्वादाने प्राप्त झाला आहे, तो भूतभविष्य न सांगता भक्तांच्या नकळत त्यांचे भवितव्य घडवितो. हाच खरा गुरुभक्त होय व अशा गुरुभक्तांचे कार्य भक्तभाविकांसाठी इतके परिपूर्ण असते की, भक्तांच्या प्राप्त जीवनापासून ते भवितव्यात प्राप्त होणाऱ्या अनेक जन्मापर्यंतची तरतूद त्यांच्या जीवनात कृपाशिर्वादाने केली जात असते. पण याचा योग्य तो अनुभव देण्याची जबाबदारी जरी गुरुंची असली तरी तो अनुभव घेण्याची जबाबदारी गुरुभक्तांची असली पाहिजे, हे गुरुभक्ताने विसरता कामा नये.

आपण भक्तांच्या कल्याणार्थ गेली कित्येक वर्षे हे जे कार्य

मी अंगिकारले, ते कार्य केवळ एक जीवनातील ऐहिक विषय म्हणून नव्हे. प्राप्त जन्मात जीवनाचे सार्थक करण्यासाठी प्रत्येक मानवाला जो बहुमोल जन्म प्राप्त होतो, अशा प्राप्त जन्माची उतराई होण्यासाठी, त्या भक्तांस सर्वस्वाने आपल्या गुरुतत्त्वास शरण जावे लागते. एवढेच नव्हे तर सेवाकार्याचा कृतार्थ कार्यभाग पूर्णत्वाने प्राप्त करण्यासाठी जरी मरण पत्करावे लागले, तरी अशी दिव्यता स्वीकारण्याची निष्ठा परिपूर्णपणे भक्तांच्या ठिकाणी जर निर्माण होईल तरच गुरु हा विषय प्राप्त करणे सुलभ आहे. याच मार्गदर्शनपध्दतीप्रमाणे गेल्या अनेक वर्षात गुरुकृपाशिर्वादाने जे आपल्या कल्याणार्थ योग्य असे मार्गदर्शन गुरुद्वारा गुरुआज्ञा म्हणून झाले ती आज्ञा आपण भक्तांच्या जीवनांत कार्यपध्दती म्हणून साकार करण्याचा अल्प असा जो प्रयत्न झाला, त्यासच या समितीचे कार्य असे म्हणता येईल.

केवळ देवदेवतार्जन करणे व तासन् तास देवासमोर बसून, किंवा तीर्थक्षेत्री राहून, 'मी देवाच्या आज्ञेप्रमाणे सेवा करतो आहे' असे सांगण्याने साधक अवस्थेतील श्रीगणेशा प्राप्त होणे अत्यंत बिकट आहे. साधकाच्या जीवनातील साधकाची अवस्था, याचे मोजमाप देवदेवतांसही करणे शक्य झालेले नाही. अशा अवस्थेत जेव्हा आपण भक्त आपल्या जीवनातील इष्ट कर्तव्याची जाणीव विसरुन, जगातील कुणी एक देवभक्त आपणास विनासायास सुख, शांति, संपत्ती प्राप्त करुन देणार आहे, या आशेने इतस्ततः धांव घेत, ह्या जीवनातील बहुमोल असा काळ अनाठाई खर्च करुन, प्राप्त जीवनात सुख, शांति, समाधानाचा जो भास निर्माण करता, त्यामुळे स्वाभाविक



देवाबद्दल, धर्माबद्दल, प्राप्त जन्मातील इष्ट कर्तव्याबद्दल असणारी श्रध्दा, याचा लय होत असतो. अशा अश्रध्देची जाणीव ही स्वतःस प्रथमतः व्हावयास पाहिजे. वास्तविक अशी अश्रध्दा निर्माण करण्यास देवधर्म कारणीभूत नसून, त्याला आपणच कारणीभूत आहोत. कारण आपल्या जीवनपरिसरांत आपल्याशिवाय इतरांना जे सुख, शाति, समाधान प्राप्त झालेले असते, ते अजून आपल्याला का प्राप्त होत नाही ही जाणीव विचारात न घेता, इतरांच्या प्राप्त झालेल्या सुखाचे अनुकरण करण्याकडेच आपली जीवने अधिक धाव घेत असतात.

अशा या बिकट समस्या जरी कर्मपरत्वे प्राप्त झालेल्या नसतात, तरी आपणास प्राप्त जीवनाबद्दलचा योग्य बोध न होण्याने ह्या जीवनाचा जो दीर्घकाळपर्यंत सुखाच्या स्वप्नामुळे अपव्यय होत असतो त्यामुळे या समस्या योग्य गुरुकडे व गुरुमार्गाकडे गेल्यावरहि, आपणांस योग्य तो कृपाशिर्वादाचा लाभ प्राप्त करण्यात अडथळा निर्माण करतात. जीवनांत आपण भक्तांनी प्रामुख्याने दोन गोष्टींची जाणीव ठरवावयास पाहिजे. ती म्हणजे एक तर आपल्या नित्याच्या उपासनेने आपले प्राप्त जीवन याचे ज्ञान करुन घ्यावयास पाहिजे किंवा गुरुमार्गी झाल्यावर गुरुमार्गदर्शनाप्रमाणे आपले जीवन गुरुंना समर्पण करावयास पाहिजे;तरच प्राप्त जन्माचे सार्थक काय हे अनुभवास येईल. पहिला जो मार्ग की, नित्य उपासनेतून आपल्या जीवनाचे ज्ञान करुन घेणे, हा मार्ग सर्वसामान्य माणसाच्या सामर्थ्यापलिकडे असल्याने, ही अवस्था ह्या जन्मात प्राप्त होईलच असे नाही. पण दुसरा मार्ग हा इतका सहज व सोपा असूनहि, त्या मार्गात पूर्णत्वाने एकरुप होण्याचे कर्तव्य बहुसंख्य

भक्त करीत नाहीत. याला जी कारणे आहेत ती गुरुकृपाशिर्वादाच्या सामर्थ्याइतकी नसूनहि, त्याबद्दलचे भय गुरुमार्गी होऊनही जात नाही. ह्याचे स्पष्ट उदाहरण म्हणजे अनेक भक्तभाविकांना ‘आपल्या घराण्यातील रुढी, परंपरा, धर्माबद्दलच्या चालीरिती, कुलधर्म, कुलाचार, श्राध्दपक्षादि धार्मिक विधी, हे करु नका’ असे सांगूनहि, ते करण्याचा मोह केवळ रुढीपरंपरा म्हणून सोडता आलेला नाही. अशा ह्या समस्या अनादिकालापासून आम्हा मानवांच्या जीवनात इतक्या खोलवर रुजल्या आहेत की, जरी गुरुकृपाशिर्वादाच्या सामर्थ्याने घराण्यातील दिवंगत सात पिढ्या व पुढे जन्माला येणाऱ्या सात पिढ्या ह्यांच्या अन्न, वस्त्र, निवारा ह्याची तरतूद करण्यासाठी गुरु साक्ष देत असले, तरी त्यांच्या कृपाशिर्वादाची ही साक्षात भेट स्वीकारण्याची साथ देण्याचे मनोधैर्य भक्तभाविकात नसल्याने, प्रत्येक जन्मात व प्रत्येक पिढीत त्याच त्याच धर्म कृत्यांचा, संस्कारांचा व धार्मिक विधींचा पुनरुच्चार करणे व कर्मपरत्वे प्राप्त झालेले जीवन अधिक बिकट करणे, हेच एक आजचे जीवन आम्हा मानवाच्या वाट्याला आले आहे.

आपण भक्त आज ज्या गुरुकृपाशिर्वादाचा लाभ घेते झालात हा लाभ होण्याचे भाग्य हे केवळ आज निर्माण झालेली जीवनातील अडचण म्हणून झालेला नसून, पूर्वीच्या अनेक जन्मापासून त्याच्याबद्दलचा नितध्यास हा अंशमात्राने निर्माण होत होत, आज पूर्णत्वाने गुरुप्राप्तीच्या दारात आपण सहजासहजी आला आहांत. अशा वेळी विचारअविचारांना, ज्ञानअज्ञानाला बळी पडून, त्या दारातून प्रवेश करावयाचा की नाही, असा संशय निर्माण होणे, याच्याइतके दुसरे मोठे पाप असूच शकणार नाही.



आजपर्यंतच्या माझ्या अनुभवशील व सिध्दसिध्दांत कार्यपध्दतीप्रमाणे तुम्हा भक्तांच्या कल्याणार्थ योग्य व आवश्यक असेच साधन व निराकरण सूचित करण्यात आल्याने, यापुढील काळात जर आपणास निरंतर सुख-शांति-समाधानाची भूक लागली असेल, तर ज्या रुढीपरंपरा ज्ञानअज्ञानाने तुम्ही अंगिकारुन त्याला धर्मकृत्य म्हणून संबोधता, त्या जर बाजूला ठेवल्यात तरच तुम्हां भक्तांना प्राप्त झालेला गुरुकृपाशिर्वाद म्हणजे काय याची जाणीव होऊन, भावी पिढ्यांनाही त्याचा लाभ होईल.

गुरूआज्ञेने जे विधी तुम्हां सर्वांच्या कल्याणार्थ झाले, ही तरतूद केवळ ऐहिक सुखप्राप्तीची म्हणून झालेली नसून, त्यामध्ये प्राप्त जन्मात पारमार्थिक सुखाचाही लाभ यथोचित व्हावा, या सद्हेतूने करण्यात आलेली असल्याने, आपण भक्तांनी यापुढील काळात मार्गदर्शनाप्रमाणेच देवधर्म, दानधर्म करणे हिताचे आहे. प्राप्त जन्मात जन्माचे सार्थक करण्याची इच्छा उतारवयात झाली, म्हणून अधिक काळ देवाला आळवण्याने जन्माचे सार्थक लवकर होईल, अशी अंधश्रद्धा विचारांत घेऊन, उठ बस देवाला हाका मारीत बसून, परमार्थप्राप्ती होणार नाही. गुरुमार्गात मार्गदर्शन हे अत्यंत महत्त्वाचे व प्रभावी साधन असते कारण भक्तांच्या कल्याणार्थ किंवा उद्धारार्थ त्यास कोणते साधन लवकर फलप्राप्ती देईल, तेच साधन सूचित केले जात असल्याने, त्या मार्गदर्शनावर अढळ निष्ठा ठेवून, आपल्या मनाने किंवा इतरांच्या सांगण्याने किंवा इतर संतवाङ्मय, धर्मग्रंथ वाचून ते ठरवू नये. अशाने करीत असलेली साधने ही सिद्ध नसल्याने, त्याचे फल कोणत्याच जन्मी

अनुभवास येत नसते. पण गुरूमार्ग व गुरुमाध्यम हा सिद्ध अवस्थेचा साक्षात्कार असल्याने, त्यांच्या वाणीतून निघालेला शब्द हा वाक्याची जाणीव व प्राप्ती करून देतो;त्यासच सर्वस्व मानून जो त्याचा अंगिकार करील व त्याप्रमाणे आचरण करील, तोच भक्त गुरुपदी लीन होऊ शकेल.

वरील सर्व निवेदन आपण भक्तांच्या मार्गदर्शनार्थ एवढ्याचसाठी सूचित करण्यात आले आहे की, श्रीदत्तक्षेत्र नरसोबाची वाडी, येथे झालेल्या महारूद्र स्वाहाकाराची सांगता व त्याचा स्वीकार, श्री. दत्तप्रभूंनी अत्यंत भक्तिभावनेने स्वीकारला आहे. ह्याची साक्ष देणे म्हणजे मी माझा व्यक्तिगत मोठेपणा आपणास सांगण्यासारखे होईल पण आपण भक्तांस हे सांगण्यास मला अत्यंत आनंद वाटतो;ह्याचे कारण कार्यारंभी अडीच वर्षाचा काळ, मी श्रीदत्तसेवेत, श्री. दत्तक्षेत्र औदुंबर येथे व्यतीत केल्यावर, त्यांच्या आज्ञेने कार्यार्थ जेव्हा त्यांचा निरोप घेऊन निघालो, तेंव्हा त्यांच्या पायाशी एकच मागणे मागितले की 'आपण दिलेल्या कृपाशिर्वादाप्रमाणे हे कार्य माझ्या हातून निरपेक्ष व नि:स्वार्थ बुद्धीने होऊ देत. आपल्या कृपाशिर्वादाने हे कार्य करीत असता इतरांच्याकडून मला मोठेपणा, नावलौकिक, आदि सामाजिक संपत्ती नको. माझे कार्य आपल्या कृपाशिर्वादाने मी यथायोग्य केले आहे व मी या जन्मांत आपल्या सेवेला उतराई झालो आहे, याची साक्ष आपणच द्यावयास पाहिजे' ह्या इच्छेप्रमाणे महारुद्र स्वाहाकार विधीनंतर मला श्री दत्तक्षेत्र नरसोबाचीवाडी येथील देवस्थान कमिटीकडून बोलाविण्यात येऊन, महाराजांच्या अंगावरील महावस्त्र अर्पण करण्यात आले. हा प्रसंग आपण जरी शब्दांत ऐकत असलात तरी माझ्या प्राप्त



जन्मातील गुरुभक्तीच्या सेवेचा हा ठेवा मला जो याच जन्मी मिळाला, ह्यांच्या इतके मोठे भाग्य ह्या त्रिभुवनात नाही, असा माझा संपूर्ण विश्वास श्री गुरुचरणी असल्याने, मी हे निवेदन आपण भक्तांच्या हितार्थ आज गुरूआज्ञेने आपणा सर्वांसमोर केले आहे. गोवा येथे 'साईधाम' वास्तू बांधण्यात येऊन त्या वास्तूत 'गुरुशक्तिपीठाची' स्थापना करण्यात आली आहे, हे आपण सर्व भक्तभाविकांना विदित असून, ह्या शुभारंभास बरीच भक्तभाविक मंडळी उपस्थित होती. गुरुशक्तिपीठाची चिरप्रतिष्ठा गोवा येथील साईधाम वास्तूत करण्यात येऊन, त्या शक्तिपीठाची प्रतिके सर्व कार्यकेंद्रावर देण्यात आली आहेत, हे जरी आपण सर्व भक्तांना माहीत आहे, तरी शक्तिपीठ स्थापनेचां शास्त्रोक्त विधी काय आहे, हे आपण भक्तांना माहिती करून देणे महत्त्वाचे आहे. केवळ मी आपल्या कल्याणार्थ काही विधी गुरुआज्ञेप्रमाणे साधनपरत्त्वे करतो आहे, असा विश्वास ठेवून, प्रत्येक कार्यकेंद्रावर दिलेल्या शक्तिपीठाकडे आदराने जरी आपण पाहत असलात, तरी गुरुमार्गात असे शक्तीपीठ स्थापन करण्याचा विधी किती कठीण आहे, हे आपणास स्पष्ट कळले पाहिजे.

आज आपण ज्या जगात रहात आहोत, ते जग ब्रह्मांडशक्तीचे एक प्रतिक म्हणजे 'पिंड' असून, जी ब्रह्मांडशक्ति त्रिगुणात्मक शक्तीने युक्त आहे, अशा ब्रह्मांडशक्तीतून ह्या पिंडाची म्हणजे पर्यायाने ह्या पृथ्वीची जोपासना, त्रिगुणात्मक शक्तीने म्हणजे उत्पत्ति, स्थिती, लय यांनी होत असते. याच पृथ्वीवर आपण मानव जन्माला येतो, म्हणजे त्या ब्रह्मांडशक्तीचाच एक अंश म्हणजे 'पिंड' आहोत.

आपण जन्माला आल्यावर प्राप्त झालेले जीवन हे व्यतीत करण्यासाठी, आपणासही त्रिगुणात्मक शक्तीची धारणा ह्या काया, वाचा, मनामध्ये करावी लागते. ह्या त्रिगुणात्मक शक्तीपैकी **'उत्पत्ति'** शक्तीच्या धर्मपरत्त्वे आपण जन्माला येतो. ज्या कायेला आपण धारण करून जन्म घेतो, त्या कायेत **'स्थिती'** अवस्थेप्रमाणे स्थित्यंतरे होऊन, आपले देहिक माध्यम हे या जगाला जाणण्यासाठी समर्थ होते. अशा दोन शक्तींनी जरी मानवी देहाची धारणा होऊन, कर्मपरत्त्वे ते देहिक माध्यम कार्यान्वित होत असते, तरी त्या माध्यमातील अविकसितता, म्हणजे ह्या दोन शक्तींचे एकरूपत्त्व न होण्याने **'लय'** अवस्था ही धारण होत नाही. ज्या दोन अवस्थेपरत्त्वे आपण जन्म घेतो व देहिक माध्यमातून जीवन व्यतीत करतो, त्या जीवनाला व देहाला विकसित करण्याचे कार्य हे लय अवस्थेचे आहे. लय अवस्था म्हणजे अंत नसून, प्राप्त झालेल्या देहिक माध्यमाचा पूर्णतः विकास म्हणजे, अनंत (Perfection) असा आहे. पण ही जन्मउत्पत्तिमीमांसा व तिचे कार्यकारण हे बहुजन समाजाला समजत नसल्याने, उत्पत्ति, स्थिति ह्या दोन अवस्थांपरत्त्वेच त्यांचे जीवन व्यतीत होत असते व ज्या प्राप्त झालेल्या जन्माचे सार्थक म्हणजे जीवनाला अनंतरूपी करणे, याऐवजी ह्या जीवनाचा अंत होऊन, पुनश्च जन्माला येण्याचे कारण आपणच ह्या जन्मात निर्माण करतो. अशी जी लय अवस्थेच्या अभावी आम्हा मानवांची जीवने आज जगतात जगत आहेत;अशांच्या जीवनात लय अवस्थेच्या अभावी जी पोकळी निर्माण झालेली असते; त्यामुळे जीवन हे समतोलपणे कार्यान्वित होत नाही. त्यामुळे आपल्या गरजेइतके सुख जरी प्राप्त झाले, तरी ते



अनुभविण्यास आपण असमर्थ असतो.

गुरुमार्गाकडे किंवा देवादिकांच्या कृपाशिर्वादार्थ गेल्यावर, ज्या लय तत्त्वाचा अभाव आपल्या काया, वाचा, मनात आहे ती धारण व्हावी, म्हणून गुरू किंवा देवादिक कृपाशिर्वादपरत्त्वे लय अवस्थेचे म्हणजे शक्तीचे संक्रमण आपल्या देहिक माध्यमात करीत असतात पण ही लय अवस्था भक्ताचे ठायी प्रथम भेटीतच संक्रमण करता येत नाही. कारण देहाभोवती विचारअविचारांची वलये धारण झालेली असतात. अशी आपल्या नकळत धारण झालेली, आपल्या विचार, विकार, आचारपरत्त्वे जी वलये असतात, त्यामुळे कृपाशिर्वादपरत्त्वे जी लय शक्ति देहाच्या ठिकाणी धारण होणार असते, त्या शक्तीला आपले इष्टकार्य करण्यास अडथळा होत असतो. म्हणून वेगवेगळ्या दीक्षा वेळोवेळी देऊन, त्यापरत्त्वे सूचित केलेल्या साधनेतून दीक्षांतविधीपरत्त्वे गुरू भक्ताच्या देहाभोवती कवच निर्माण करतात व ह्या वलयाचा हितसंबंध देहाशी रहावा म्हणून, आवश्यक ती सेवा सुचवितात. अशा दीक्षांतविधीपरत्त्वे गुरुकृपाशिर्वादाचे कवच धारण होऊन, गुरू लय शक्तीचे संक्रमण करीत असताना, प्रतिकूल वलयांचा दुष्परिणाम प्राप्त होत असलेल्या कृपाशिर्वादावर होऊ नये, असा जो विधी किंवा अशी जी सिद्धसिद्धांतपद्धति, तिला **'गुरुदीक्षा'** असे म्हणतात. केवळ एखाद्या व्यक्तीबद्दल पूज्यता वाटते आहे व त्या व्यक्तीबद्दलचा आदर आपण व्यक्त करतो आहोत म्हणजे आपण गुरूमार्गी झालो आहोत व आपला दीक्षांतविधी झाला आहे असे नाही. भक्ताच्या इच्छेनुसार जे कार्य गुरु करीत नाहीत, पण जेव्हा गुरुमार्गदर्शनाप्रमाणे आलेल्या भक्ताच्या आजच्या व पुढील

प्राप्त होणाऱ्या जन्माचे अनुसंधान ज्या विधीपरत्त्वे प्राप्त करून देतात, ते गुरुमार्गात 'अभिवचन' असते. हे त्यांच्या वाणीतून निघालेले शब्द ही ब्रह्मवाणी म्हणून आपण भक्तांनी श्रवण करून, गुरूंच्याबद्दल शंभरटक्के विश्वास, श्रद्धा, भक्ती संपादन केली पाहिजे. केवळ कार्यकेंद्रावर सूचनापत्रे लावली जातात, म्हणून अशा दीक्षांतविधींचा लाभ घेण्यास, आपण भक्तांनी अंधश्रद्धेचे व अज्ञानीपणाचे अनुकरण चुकूनही करू नये.

आज जगतात आपल्या सभोवार अशा काही व्यक्ती आपण पाहतो की, ज्यांना त्यांच्या अपेक्षेपलीकडे सुखसंपन्नता प्राप्त झालेली असते. अशा व्यक्तींना आपण नशिबवान म्हणून ओळखत असतो पण अशी वस्तुस्थिती त्यांच्या जीवनांत असताना, तशा सुखाचा अभाव आपल्या जीवनांत कशामुळे आला आहे, याचा शोध किंवा बोध आपणास होत नाहीं म्हणून ज्या व्यक्ती सुखसंपन्न आहेत त्यांचा इतरांनी हेवा केला, तरी त्यांच्या सुखसंपन्नतेत काहीही कमी होत नाहीं याचे कारण असे की, पूर्वीच्या एका जन्मात त्यांना प्राप्त जन्माचा बोध कोणी ना कोणी तरी करून दिला असल्याने, ज्या लय तत्त्वामुळें प्राप्त झालेल्या जीवनाला पूर्णत्त्व येते, असे लय तत्त्व ह्या व्यक्ती जन्मोजन्मी जोडत्या होतात व जेव्हां पूर्णतः उत्पत्ति स्थिती ह्या अवस्थेपरत्त्वे ते जन्म घेतात, तेव्हा या दोन अवस्था लय तत्त्वांत विलीन झाल्या असल्याने, त्यांचा जन्म पूर्णतः लय अवस्थेचा असतो व त्यांच्या इच्छेप्रमाणें ते ह्या जन्मांत सुखाचे वाटेकरी होत असतात. अशाच अवस्थेपरत्त्वें जे गुरुमाध्यम म्हणून ह्या जन्मांत आपल्याला भेटते, ते आपल्याप्रमाणें जरी मानवी देहाच्या रूपांत असतें, तरी त्यांच्याही पूर्वीच्या अनेक जन्मपरत्त्वे, ते प्राप्त



झालेली उत्पत्ति स्थिती अवस्था ही लय अवस्थेत विलीन करून, ज्या लय अवस्थेपरत्त्वे हे ब्रह्मांड पिंडाची जोपासना करीत असते अशा ब्रह्मांडशक्तीशी ह्या व्यक्ती लय अवस्थेतून एकरूप झालेल्या असतात. अशामुळें इहजगतातील ज्या काही व्यक्ती ह्या लय शक्तीच्या अभावी दु:खीकष्टी असतात, अशांना आपल्या देहिक माध्यमातून लय शक्तीचा लाभ कृपाशिर्वादपरत्त्वे करून देऊन, त्यांची दु:खीकष्टी जीवने ही सुखावह करीत असतात. अशा अवस्थेतून जेव्हा हे कार्य होत असते, अशावेळी ब्रह्मांडशक्ति ही त्या गुरुमाध्यमाच्या ठायी अवतीर्ण होते, म्हणूनच त्यांना परमेश्वराचा **'अवतार'** असे म्हणतात.

ब्रह्मांडशक्तीचे जेव्हां अशा रीतीनें पिंडाशी एकरूपत्त्व होते, तेव्हां ते गुरुमाध्यम जगतातील दु:खीकष्टी लोकांचे जीवन सुखावह करण्याची साधने (निराकरणे) निर्माण करून, ह्या जगताला सुख-शांति-समाधानाची दिशा प्राप्त करून देत असते. असे हे अवतारकार्य ज्या मानवी देहाच्या माध्यमातून झालेले असते, त्या जीवनपरिसरांत ते ब्रह्मांडशक्तीचे वलय हे त्यांच्या अंतापर्यंत कार्य करते पण जेव्हां ती व्यक्ती दिवंगत होते, तेव्हां ज्या देहिक व आत्मिक तत्त्वांच्या एकरूपत्त्वाने ब्रह्मांडशक्तीशी देहिक माध्यम म्हणजे पिंड जोडला गेलेला असतो, ती ब्रह्मांडशक्ति त्यांच्या अंतानंतर पुनश्च आपल्या ठायीं निराकार होत असते. अशी ही पिंडाची व ब्रह्मांडाची देवाणघेवाण अनंतकाळापासून चालत आलेली असून, आजपर्यंत अनेक अवतारी पुरुषांनी पिंडाचें ब्रह्मांडाशी एकरूपत्त्व करून अवतारकार्य केले. पण त्यांच्या अंतापर्यंत केवळ ज्या लय-शक्तिमाध्यमातून त्यांनी ब्रह्मांडशक्ति इहजगताच्या कल्याणार्थ

अवतीर्ण केली, ती ब्रह्मांडशक्ति पुनश्च आपल्या ठायी गमन करती होते. ह्या अवतारी पुरुषाचे लयतत्त्व ही क्रिया करण्यास जे समर्थ होते, ते आज इहजगतात प्रत्येक अवतारी पुरुषाची 'समाधी' म्हणून अस्तित्त्वात आहे. ह्या शक्तिमाध्यमाच्या सान्निध्यात आपण गेल्यावर स्वाभाविकच आपल्यात असणारी लय तत्त्वाची कमतरता जरी भरून निघत असली, तरी तेथून आपण प्राप्त केलेल्या लय शक्तीचा विनियोग, ईश्वराशी हे जीवन जोडण्यासाठी आपण न करता, अधिकाधिक ऐहिक सुखाच्या आसक्तीनें प्राप्त झालेल्या कृपाशिर्वादाचा, म्हणजे लय शक्तीचा गैरवापर करते होत असतो.

जगद्‌गुरू श्री. साईनाथ महाराज यांच्या कृपाशिर्वादानें वरील अवस्थांच्या परंपरेची जाणीव वेळोवेळी झाल्यानें, ज्या लय शक्तीच्या म्हणजे कृपाशिर्वादाच्या माध्यमातून मी आज गेली अनेक वर्षे हे लोककल्याणाचें कार्य आपण भक्तासाठीं केले; ह्या ब्रह्मांडशक्तीची गरज भवितव्यात आम्हां मानवांना ह्या जगांत सुख-शांति-समाधान निर्माण होण्यासाठीं आहे; म्हणून ती शक्ति प्रतिकात्मक करण्यासाठी आपण भक्तांकरवी गेली पांच वर्षे ॐकार साधना करवून घेऊन, त्या ब्रह्मांडशक्तीचे प्रतिक 'गुरुपीठ' म्हणून निर्माण केले. ह्या पीठाच्या स्थापनेपर्यंत श्रीसद्‌गुरूंचा कृपाशिर्वाद व आपण भक्तांचे सहकार्य हे पीठ स्थापन करण्यासाठी जरी कारणीभूत झाले, तरी मी ह्या विधीच्या सांगतेपर्यंत अत्यंत चिंताग्रस्त होतो. याचे कारण असे की, असे हे दिव्य करीत असतांना, ज्यामध्ये दिव्य शक्तीचा समावेश आहे, अशाला आवाहन करून, त्यांची चिरप्रतिष्ठा होईतोपर्यंत ही शक्ति प्रथमतः आवाहन करणाऱ्या साधकाचा अंत



करून, त्याच्या भक्तांची जीवनेही उध्वस्त करीत असते. ही जाणीव यापूर्वी अनेक अवतारी परंपरेतील सत्पुरुषांना झाली होती म्हणून त्यांनी ही सिद्धसाधना आम्हा मानवांच्या कल्याणासाठीं केली नाही. आज हे स्थापन झालेले शक्तिपीठ शंभर टक्के ब्रह्मांडशक्ति म्हणजे लय अवस्था असून, जे कोणी ह्या लय अवस्थेच्या अभावी दु:खीकष्टी आहेत, त्यांच्या जीवनाला पूर्णत्त्व येण्यासाठी ही शक्ति कार्यान्वित होणार आहे. आजपर्यंत आपण पोथीपुराणे वाचली असतील. त्यात जगत्कल्याणासाठी वेळोवेळी देवदेवतांनी व सत्पुरुषांनी अवतार घेऊन ह्या जगाचे पालन केले आहे. ह्या देवदेवतांची स्थापना होऊन, ज्या लय तत्त्वांने मानवी कल्याणार्थ अवतीर्ण होऊन हे कार्य केले, त्यांची पीठे आज देवदेवतांच्या नांवाने अस्तित्त्वात असून, त्यांच देवदेवता कालकालांतराने आपल्या घराण्याच्या **'कुलदेवदेवता'** झालेल्या आहेत. अशी ही शक्तिपीठे जरी लय तत्त्वाचे अस्तित्त्व म्हणून अस्तित्त्वात आहेत, तरी त्या शक्तीचे जे इष्टकार्य आहे ते जतन करण्याची जबाबदारी विचारात न घेता, ह्या शक्तिपीठांच्या परिसरांत निषिद्ध असे धार्मिक विधी करून, ह्या पीठांच्या शक्तिकार्यात आज अडथळा निर्माण झाला आहे. त्यामुळे ज्या कुटुंबिय मंडळींच्या इष्ट देवदेवता आहेत, त्यांच्या दर्शनार्थ ते कुटुंबिय जात आहेत;वार्षिक कुलाचार, कुलधर्म हाही करीत आहेत;तरीसुद्धा जीवनकल्याणार्थ इष्ट कृपाशिर्वादाचा लाभ जो आज होत नाही, याला कारण आपणच आहोत. देवदर्शनार्थ गेल्यावर त्या देवतेकडे काय मागावयाचे याचे ज्ञान नाही, म्हणून ज्या काही आपल्या जीवनात उणीवा आहेत त्या सुखांची याचना आपण करतो. याउलट असे व्हावयास पाहिजे

की, दर्शनार्थ गेल्यावर त्या देवदेवतांची कृपा आपल्यावर व्हावी, अशी प्रार्थना किंवा याचना किंवा काही धार्मिक विधी व्हावयास पाहिजे. ही जाणीव होऊन जर आपण आपल्या घराण्याच्या देवदेवताप्रित्यर्थ विधी केलेत, तर निश्चित् आपल्या जीवनातील समस्या दूर होऊन, आपल्याला इष्ट ते सुखसमाधान व शांति प्राप्त होईल. त्याचबोरबर त्यादेवतेचे कृपाशिर्वाद म्हणून आगमन झाले, म्हणजे लय शक्ति ही आपल्या कुटुंबात आपण प्राप्त करते झालात की आपोआपच आपल्या घराण्यात विद्या, संपत्ति, संतति; सुख, शांति, समाधान यांचा जो अभाव आहे, हा दूर होऊन आपल्या नकळत आपली सत्प्रवृत्तीही जागी होऊन, पारमार्थिक सुखाचा लाभ घेण्यास आपण भक्त समर्थ व्हाल.

जगाच्या उत्पत्तिपासून आम्हा मानवांच्या कल्याणार्थ लय शक्तीने, अवताररूपाने वेळोवेळी अवतीर्ण होऊन, ह्या जगाचा जो सांभाळ देवदेवतांच्या शक्तिपीठमाध्यमातून केला होता, अशी जी शक्तिपीठे दक्षिण भारतापासून उत्तरभारतापर्यंत आम्हा मानवांच्या कल्याणार्थ आहेत, अशा शक्तिपीठांच्या दर्शनार्थ जाऊन, ज्या अनादिकालात ही शक्तिपीठे ज्या उद्देशार्थ स्थापन करण्यात आली होती, त्या उद्देशपरत्त्वे ह्या शक्तिपीठांची कार्यक्षमता आज दिवसपर्यंत कार्यरत आहे किंवा नाही, हे पाहण्यासाठी मी स्वतः ह्या शक्तिपीठांच्या दर्शनार्थ गेलो असता, असे अनुभवास आले की, शक्तिपीठांत जरी अधिकारी व्यक्तींनी, लय तत्त्वाला आवाहन करून त्याची प्राणप्रतिष्ठा केली होती, तरी त्या शक्तिपीठांच्या आसमंतात असमंजसपणे जे काही धार्मिक विधी झाले, त्यामुळे तेथील वातावरणात मलिनता निर्माण झाली आहे. त्यामुळे ह्या शक्तिपीठांचा लाभ जो शंभरटक्के व्हावयास



पाहिजे, तो लाभ भक्तांना होण्यास एक तर विलंब होतो किंवा पुनश्च त्या शक्तिपीठातील शक्तीचा लाभ होण्यासाठी, तेच तेच धार्मिक विधी वर्षानुवर्षे करावे लागत आहेत. अशी ही एका काळातील सुवर्णभूमि की, जिचे रक्षण ह्या शक्तिपीठ माध्यमांतून होऊन, आम्हा मानवांची जीवने सुख, शांति, समाधानाने समृद्ध होत होती;त्याऐवजी आता ही शक्तिपीठे केवळ नावारूपानेच अस्तित्त्वात असून, त्या त्या ठिकाणीं त्या त्या घराण्यातील पिढ्या तेच तेच धार्मिक विधी करण्याचा पुनर्विधी करीत आहेत. असे असूनही जे कोणी केवळ क्षुल्लक असे ऐहिक सुख मागण्यास जातात, अशा ह्या त्यांच्या याचना पूर्णत्त्वास का जात नाहीत, असा विचार कोणीही अधिकारी व्यक्तीने न करता, उलट असे मार्गदर्शन करण्यात येते की, 'त्याच तुमच्या शक्तिपीठाची (कुलदेवदेवता) आराधना तुम्ही व तुमचे कुटुंबिय यांनी करावयास पाहिजे. ' निसर्गनियमाप्रमाणे चांगली अथवा वाईट अशी कोणतीही शक्ति, जिचे अस्तित्त्व जर ह्या भूमीवर असेल, तर तिचे स्पंद (Vibrations) साधक अवस्थेतील साधकास जाणवले पाहिजेत. पण जेव्हां मी दक्षिण भारतापासून उत्तर भारतापर्यंत त्या शक्तिपीठांच्या दर्शनार्थ गेलो, तेव्हां मूळ शक्तीच्या शुद्ध स्वरूपातील स्पंदांची जाणीव न होता, संमिश्र अशा स्पंदांची जाणीव अधिक प्रखरतेने झाल्यामुळे, श्रीसद्‌गुरू साईनाथ महाराज यांना मी अशी प्रार्थना केली की, "गतकालात ज्या अवतारी परंपरेतील अधिकारी पुरुषांनी आपल्या जीवनाची बलिदाने देऊन, ही शक्तिपीठे आम्हा मानवांच्या कल्याणार्थ जी निर्माण केली होती, अशी शक्तिपीठे आज पूर्वीप्रमाणे कार्यरत नाहीत; ती पूर्वीप्रमाणे कार्यरत होण्यासाठी काहीएक उपाय

आपण जर सुचविलात, तर भवितव्यात आम्हा मानवांच्या सुख-शांति-समाधानासाठी ही शक्तिपीठे पुनश्च जागृत होऊन, आम्हा मानवांच्या कल्याणाचे कार्य अव्याहतपणे कार्यान्वित करतील यासाठी सद्‌गुरूंनी असा कृपाशिर्वाद दिला की "तू पुढे चल, तुझ्या इच्छेप्रमाणे मी कार्यसिद्धी करून देतो." त्यांच्या आज्ञेप्रमाणे श्री. क्षेत्र नरसोबावाडी येथे दर पौर्णिमेस मी व आपणसर्व भक्त उपस्थित राहून अकरा पौर्णिमेस रुद्रहवन केले व अकरा पौर्णिमेच्या हवनाची सांगता म्हणून महारुद्र स्वाहाकार करण्यात आला. अशावेळी अनेक भक्तांनी मला अशी विचारणा केली की, दरवर्षी कार्यकेंद्रावर जो हवनादि विधी करीत होतो, तो करावयाचा बंद करून आता नरसोबावाडी येथे हवनादि विधी करण्याचे प्रयोजन काय? तर याचे शास्त्रोक्त निराकरण असे की, दरवर्षी कार्यकेंद्रावर गेली एकवीस वर्षे जे हवनादि विधी होत होते, ते आपण कुटुंबियांत जीवनातील दोषापासून आपली मुक्तता होण्यासाठी विमोचन म्हणून करण्यात आले. पण एक वर्षभर श्रीक्षेत्र नरसोबावाडी येथे जो हवनादि विधी होत होता, अशावेळी रुद्रशक्तीला, म्हणजे लय तत्त्वाला आवाहन करण्यात येत होते. त्याचे कारण आज भारतात जी शक्तिपीठे देवदेवतांच्या नावारूपाने अस्तित्त्वात आहेत, असा शक्तिपीठांचे मूळ स्वरूप हे रुद्रदेवता असून, जी शक्तिपीठे गैर अशा विधीपरत्त्वे कार्यरत नाहीत, अशांना कार्यक्षम करण्याचे कार्य फक्त तीच शक्ति करू शकते, की ज्या शक्तीच्या माध्यमातून ह्या शक्तीचा उदय झाला आहे. यासाठी महारुद्र स्वाहाकार हा विधी आपण भक्तांच्या समवेत एवढ्यासाठी करण्यात आला की, जेव्हा एखादे आवाहन एखाद्या शक्तीला केले जाते, ती शक्ति



धारण करण्याचे सामर्थ्य साधक अवस्थेतील साधकापाशी असावयास पाहिजे. अन्यथा अशी शक्ति जर आवाहन केली गेली व ती शक्ति धारण करण्यास साधकाची कार्यक्षमता नसेल, तर ती शक्ति इहलोकातील सुखशांति प्राप्त करून देण्याऐवजी, प्राप्त झालेल्या सुखशांतीच्या नाशास कारणीभूत होत असते. अशा आवाहनित झालेल्या रुद्राशक्तिमुळेच सर्व भारतातील शक्तिपीठे ही पूर्ववत् जागृत होऊन, त्याची साक्ष म्हणून गोवा येथे झालेल्या दसऱ्यास, म्हणजे परमपूज्य जगद्‌गुरू श्रीसाईनाथ महाराज यांच्या पुण्यतिथीच्या दिवशी, ह्या देवता गुरुशक्तीत विलीन झाल्या.

याचाही अर्थ काही भक्तगणांनी असा लावला की, ज्या अर्थी ह्या देवदेवता गुरुशक्तीत विलीन झाल्या आहेत, त्या अर्थी इत:पर ह्या देवदेवतांची संभावना, आम्हां कुटुंबियांना करण्याचे कारण उरले नाही. तर ह्या देवदेवता गुरुशक्तीत विलीन झाल्या आहेत याचा अर्थ हा नसून प्रत्येक घराण्याच्या ज्या देवदेवता आहेत, त्यांच्याप्रित्यर्थ जो काही कुलाचार, कुलधर्म तुम्ही करता तो यदाकदाचित ज्ञानअज्ञानाने पूर्णत: होत नसेल. त्याऐवजी आपण गुरुभक्त होण्याने आपल्या घराण्याच्या देवदेवतांना तुम्ही विसरले अहात, असे अनुभवास येऊ नये, म्हणून ह्या देवदेवता गुरुशक्तीत एवढ्यासाठी विलीन झाल्या की, जरी तुम्ही दु:खनिवारणार्थ गुरुमार्गाकडे गेलात, तरी तुमची दु:खे निवारण्याचे कार्य हे लय शक्तितूनच, म्हणजे जी शक्ति गुरुकृपाशिर्वादापासून देवदेवतांपर्यंत कार्य करते, त्या शक्तितूनच होत असते. केवळ आपण आपल्या अज्ञानामुळे, गुरु व देवदेवता यांच्याबद्दलचा भेदभाव निर्माण करतो, हे जे अज्ञान

आहे ते प्रथमतः दूर केले पाहिजे.

आज प्रत्येक कार्यकेंद्रावर जे ब्रह्मांडशक्तीचे प्रतिक **'गुरुपीठ'** म्हणून स्थापन झाले आहे, ह्या ब्रह्मांडशक्तीचे आगमन गुरुमाध्यमातून झाले असून, त्या शक्तीला इहजगतात आम्हा मानवांच्या कल्याणार्थ अवतीर्ण होण्यास गुरुमाध्यम पोषक असल्याने, श्रीगुरुंनी ती त्रिगुणात्मक शक्ति हिचे ॐकार साधनेत एकरुपत्व करुन, ती ब्रह्मांडशक्ति चिरप्रतिष्ठा म्हणून स्थापन केली आहे. पण ह्या स्थापन झालेल्या ब्रह्मांडशक्तीचा लाभ आपणास होण्यासाठी, आपण भक्तांची देहिक माध्यमे पोषक असतीलच असे नाही; म्हणून श्रीगुरुंनी ह्या शक्तिपीठाच्या स्थापनेपूर्वीच आपणास कारण, महाकारण व श्री साईशक अशा **'तीन प्रतिमा'** देऊन, ह्या प्रतिमाद्वारे त्या पीठात ज्या त्रिगुणात्मक शक्तीचा समावेश झाला आहे, ती शक्ति आपल्या काया, वाचा, मनाच्या ठिकाणी धारण व्हावी, ही योजना पूर्वीच केलेली आहे व ही धारण झालेली शक्ति आपल्या ठिकाणी चिरकाल राहून आपल्या व कुटुंबियांच्या भवितव्याची पूर्तता केली आहे. ती अशी की, शक्तीपीठाची स्थापना होण्यापूर्वी आपल्या देहिक माध्यामातून ॐकार साधना क्रमशः नाभिस्थानापासून ते ब्रह्मरंध्रापर्यंत पांच स्थानातून करवून घेऊन, ॐकाराव्यतिरिक्त 'ॐनमः शिवाय' म्हणावयास सांगितले, ते लय शक्तीला आवाहन होते. आवाहनित झालेली शक्ति इतरांच्या कल्यणासाठी ब्रह्मरंध्रात धारण होऊन, जसे ब्रह्मांडाचे शक्तीपीठ तयार झाले, तसे पिंडाचेही शक्तिपीठ ब्रह्मरंध्रात तयार करण्यात येऊन, त्यामध्ये ब्रह्मांडाच्या शक्तिपीठांत जिचा समावेश आहे, अशा अवस्थेचा लाभ म्हणजेच



**'पिंडी ते ब्रह्मांडी व ब्रह्मांडी ते पिंडी'** हा होय.

वेदकालापासून आम्हा मानवांच्या कल्याणार्थ लय शक्तीने नानाविधरुपाने इहजगतात अवतार घेऊन, आम्हा मानवांच्या जीवनाचा सांभाळ करण्याचे यथोचित कार्य अव्याहतपणे आजपर्यंत जरी चालविले आहे, तरी ह्या माध्यमाकडून कृपाशिर्वादाची प्राप्ती होण्यासाठी, वेदवेदांत किंवा पुराणात सोप्यातसोप्या अशा साधनमार्गाचा उल्लेख कोठेही न केला गेल्यामुळे, स्वाभाविकच देवादिकांच्या कृपाशिर्वादाला प्राप्त करण्याच्या साधनमार्गाकडे हळूहळू दुर्लक्ष होत गेले. श्री जगद्‌गुरु साईनाथ महाराज यांच्या कृपाशिर्वादाने आपण भक्तांना आपल्या प्राप्त जीवनात सुख, शांति, समाधान आदींची प्राप्ती होऊन, प्राप्त जीवन हे भवितव्यासाठी पारमार्थिक व्हावे, अशी जीवनातील ही दोन कर्तव्ये म्हणजे ऐहिक व पारमार्थिक अशा दोन अवस्थांचा लाभ सुलभ मार्गाने प्राप्त करता येतो. अशी ही अमोलिक भेंट गुरुकृपेने नव्याने उदयाला येणाऱ्या पिढ्यांना लाभली आहे, याचा विचार सूज्ञपणे भक्तभाविकांनी करुन, आज समितीची जी कार्यकेंद्रे नियुक्त सेवकांकरवी कार्य करीत आहेत, अशा सेवकांना इतरांची सेवा करण्याचे सहकार्य आपण भक्तांनी द्यावयास पाहिजे.

आपण भक्तांना जी आज प्राप्त झालेली अवस्था आहे, ती प्राप्त व्हावी अशी अपेक्षा आपण विचारात घेऊन, गुरुमार्गी झाला नाहीत. उलट जीवनांत अनन्य भक्तिभावनेने देवाला शरण जावे, ह्या कर्तव्याची उपेक्षाच आपण करीत आलो. पण ह्या आपल्या अज्ञानाबद्दल श्रीगुरुंनी आपण भक्तांची उपेक्षा न करता, ज्या

अपेक्षांच्या शोधात आलात, त्या अपेक्षेच्यापलिकडचे सौख्य आज आपणांस प्राप्त करुन दिले आहे.

कृपाशिर्वादपरत्वे आपली काय काय स्थित्यंतरे झाली, हा नित्याने आढावा घेणे व त्याप्रमाणे सदैव वागणे हे फार महत्वाचे आहे. आपल्या नित्याच्या जीवनांत आपण जर नवीन कपडे परिधान केले, तर ताबडतोब इतर व्यक्तींना त्याची जाणीव सहज होते. परिधान केलेल्या कपड्यांबद्दल जसे काही सांगावे लागत नाही, त्याप्रमाणे आज आपण भक्तांस गुरुकृपाशिर्वादाचे जे बहुमोल असे वस्त्र जन्मोजन्मीपर्यंत लाभणार आहे, हे काही इतर व्यक्तींना दिसण्यासारखे जरी नसले, तरी आपण कृपावंत आहोत म्हटल्यावर आपल्या आचारविचारातून प्राप्त झालेली कृपा ही इतरांना अनुभवास आली पाहीजे. या उलट कृपाशिर्वादापूर्वी जे आपले जीवन इतरांच्या बाबतीत व स्वतःबद्दल होते, त्याचा अनुभव स्वतःला व इतरांना आला, तर कृपापात्र होऊनही त्या कृपेची अवहेलना आपण आपल्या अज्ञानाने करीत आहोत असे सिध्द होते. असा अनादर नकळत जेव्हां आपण भक्तांच्या काया, वाचा, मनाने होत असतो, अशा वेळी कृपाशिर्वादात वृध्दी होण्याऐवजी कृपाशिर्वादाचा क्षय होत असतो, हे आपण भक्तांनी सूज्ञपणे विचारात घेतले पाहिजे.

आता प्राप्त झालेल्या अवस्थेची जोपासना करण्याबद्दलचा योग्य असा बोध अनुभविण्यास, आपणच समर्थ आहात. हा अनुभव प्रत्येक साधक, सेवक व्यक्तीने घेऊन आपले जीवन गुरुमय करावयाचे आहे. हे सर्व निवेदन व हे कार्य आजपर्यंत त्यांच्याच कृपाशिर्वादाचे फळ म्हणून आपण चाखले आहे. त्या



फळाची अवीट अशी गोडी आपण भक्तांच्या काया, वाचा, मनाने जगतातील दु:खी मानवांच्या जीवनाला कृपाशिर्वादाचा आधार म्हणून लाभण्यासाठी श्रीसद्‌गुरुंनी आपणास सद्‌बुध्दी देऊन, हे श्रीगुरुंचे अवतार कार्य अजरामर करावे, अशी त्यांच्या चरणी प्रार्थना !

शक्तिपीठातील शक्ति व तिचे महत्त्वाचे कार्य आपण भक्तांस समजले पाहिजे. जीवनामध्ये संकटे आल्यानंतर आपण उपाय योजना करतो;परंतु काही कालानंतर जगतात निर्माण होणाऱ्या परिस्थिती पूर्वीच त्यासाठी कृपाशिर्वादरुपी उपाययोजना करणे, याला ‘तरणोपाय’ असे म्हणतात. अशी तरतूद ईश्वरी संदेशातून होत असते, मानवी बुध्दीतून नाही. परमपूज्य बाबांच्या कृपेने स्थापन झालेले ‘शक्तिपीठ’ याचा उल्लेख श्री आद्यशंकराचार्यांनी ‘सौंदर्यलहरी’ ह्या ग्रंथात केलेला आहे. सृष्टीमधील वस्तुपदार्थाला आकार देणाऱ्या शास्त्राला भूमितीशास्त्र असे म्हणतात. जी विश्वशक्ति निर्गुण निराकार आहे, तिलाही मानवी कल्याणासाठी सिध्द करतांना आकार द्यावा लागतो. त्या आकाराचे प्रतिक म्हणजचे ‘पृथ्वीतत्त्व’ होय. त्यामध्ये दोन त्रिकोण असून, त्यापैकी एक त्रिकोण पिंडाचे प्रतिक म्हणजे चेतना व दुसरा त्रिकोण ब्रह्मांडाची प्रतिमा म्हणजे चैतन्य आहे. प्रत्येक त्रिकोण एकशेऐंशी अंश असून, असे दोन त्रिकोण मिळून तीनशेसाठ अंश होतात. ह्यामध्ये विश्वाचा समावेश आहे. जो जीव पिंड म्हणून जन्माला येतो, त्याला ब्रह्मांडात जाण्यासाठी म्हणजे इहलोक, परलोक व स्वर्गलोक यासाठी एक मार्ग असावा व जगात जन्माला आलेले जीव मानवतेच्या भावनेतून एकत्र

येण्यासाठी एक प्रार्थना असावी, अशी परमपूज्य साईनाथमहाराजांची इच्छा होती. त्यासाठी आवश्यक असणारी ॐकार शक्ति श्री. नृसिंहसरस्वतीस्वामींच्या रुपाने भूतलावर अवतीर्ण झालेली होती. ती शक्ति प्राप्त केल्यानंतर, त्या शक्तीमध्ये जगतात त्रिगुणात्मक रुपाने अस्तित्वात असलेल्या देवदेवता ह्या एकरुप झाल्या व मगच शक्तिपीठाची स्थापना करण्यात आली.

आपण इहजगतात जन्माला आल्यानंतर जीवनाचे कार्य म्हणजे गणित समजणे आवश्यक असते. जन्माला येतेवेळी कर्माची बाजू शंभर टक्के असली, तरी त्या कर्मपरत्वे केवळ स्वत:ला सुखाचा लाभ करुन घेणे हे इष्ट नाही. आज जे सुख आपल्याला नव्याण्णव टक्के कर्मपरत्वे मिळते, ते सुख एकाचेच नसून त्यात इतरांचाही समावेश आहे, हे आपण विसरतो. इहजन्मात सुख पंचवीस टक्के, शांति पंचवीस टक्के व मिळालेल्या सुखाबद्दल समाधान व नित्यसाधना मिळून पन्नास टक्के, असे जीवन असले पाहिजे. जीवनात सुखाचा प्राप्ती कितीही झाली तरी समाधानाची प्राप्ती होणे हे महत्वाचे आहे. कारण हेच समाधान पुढील जन्मात आपले ‘सत्कर्म’ होणार आहे. ही अवस्था साधनेमुळे प्राप्त होते. दैनंदिन पूजा, आरती म्हणजे सत्कर्म नव्हे. ती अंगे आहेत. अशा अंगांनी युक्त अशी क्रिया काया, वाचा, मनाने घडते तेव्हा ‘सत्कर्म’ जन्माला येते. म्हणजेच, समाधान ह्या अवस्थेचा आपल्याला लाभ होतो. ह्या समाधानात इतरांचाही समावेश करण्याने ते कर्म द्विगुणित होते.

मानवी देह ही भूमि आहे. ज्या कर्मपरत्वे जन्म व्यतीत



होतो, ते कर्म धारण होण्यासाठी देहिक माध्यमाला आकार द्यावा लागतो. तसा आकार नसेल तर कर्म शरीरात धारण होऊन कार्य करु शकत नाही. अशा परिस्थितीला आपण संकट किंवा दु:ख म्हणतो. दैनंदिन पूजा, पोथीपाठ, जपजाप्य, तीर्थयात्रा हे औपचार असून, त्यांचे वलय देहाबाहेर राहते. ॐकार साधना हा उपचार असून, तो देहात धारण होऊन काया, वाचा, मनाला आकार प्राप्त करुन देतो. म्हणजेच काया, वाचा व मन ह्यांची गति एक होते. अशावेळी ब्रह्मांडी ते पिंडी किंवा पिंडी ते ब्रह्मांडी ही अवस्था अनुभवास येते. ही अवस्था तत्त्वज्ञान म्हणून शाब्दिक माध्यमातून व्यक्त करावयाची नसून, ती अवस्था अनुभवास आली पाहिजे. याचाच अर्थ देह ह्या भूमीला भूमितीने आकार दिल्यानंतर आज मितीला म्हणजे, दैनंदिन जीवनात आपले कर्तव्य काय, याचा विचार केला पाहिजे. ‘कर्माची गति गहन आहे’ असे म्हणतात. पण ‘गहन’ म्हणजे काय व काया, वाचा, मन यांची गति जी वेगवेगळी असते, ती एक करुन त्यातून चौथी अवस्था प्रगट कशी करावी याचे गणित फक्त श्री साईबाबांना अवगत होते व आहे. आज आपण भक्तांच्या जीवनात, ही कार्यसिध्दी झालेली आहे म्हणूनच ऐहिक सुखाचा अधिक लाभ आपल्याला न होऊनसुध्दा, आपण ‘समाधान’ ह्या अवस्थेचा लाभ आपल्या कुटुंबात प्राप्त करते झालेले आहात.

# प्रार्थना साधना व त्यातील वेदवेदांत

आम्हा मानवाच्या जीवनकल्याणार्थ वेदकालापासून आजपर्यंत जे काहीं धार्मिक विधी, आचरण, उपासतपास, व्रतवैकल्ये आदि मार्ग सूचित करण्यात आले आहेत, ह्या मार्गात प्राप्त झालेल्या जीवनाचे सार्थक करण्यासाठी ह्या जन्मांत कोणत्या कर्तव्याचा अंगिकार केला पाहिजे, हे सूचित केले नसून, प्राप्त झालेल्या जीवनात ऐहिक जीवन व्यतीत करण्यासाठी, ज्या ज्या काहीं आम्हा मानवांच्या गरजा व उणीवा आहेत, त्यांची प्राप्ती कोणत्या मार्गाने करून घेता येईल, असा आशय विचारात घेऊन, जे जे काहीं धार्मिक विधी आम्हा मानवाच्या जीवनामध्ये आज रूढ झाले आहेत व त्या रूढीप्रमाणे अजूनही अनेक व्यक्ती ह्या जगात अंधश्रध्देने त्यांचा अवलंब करून प्राप्त झालेल्या जीवनांत जे सुख प्राप्त झालेले आहे ते सुख अनुभविण्यास ह्या मानवी जीवनाच्या माध्यमांत म्हणजे काया-वाचा-मनांत कशा कशाची कमतरता आहे हे विचारात न घेता, अधिक काहीं सुख प्राप्त व्हावे या आशेने आज देवदैवीक मार्गाचा व धर्माचरणाचा वापर करीत आहेत. आज आपल्या नित्याच्या जीवनात अनेक व्यक्ती अनेक तीर्थक्षेत्री जाऊन देवदर्शन, पोथीपाठ, स्तोत्रे आदिंचे पठण करीत आहेत. पण सूज्ञपणे कोणासही अशी जाणीव आजपर्यंत झाली नाही की, मी जे काहीं करतो आहे, ह्या माझ्या नित्याच्या कर्मात निरासक्तता किती आहे? आज नित्याने पठणार्थ येणारी पोथीपुराणे ही जरी आपण वाचत असलो, तरी माझ्या मते ती आपण करीत असलेली कर्मकर्तव्ये 'प्रार्थना' म्हणून देवापर्यंत पोहोचलेली नाहीत, असे



अनुभवांती म्हणावे लागेल. उदाहरणार्थ जर आपण व्यंकटेश स्तोत्र किवा अन्य एखादे स्तोत्र वाचत असाल, तर स्तोत्राच्या शेवटी जी 'अवतरणिका' म्हणून लिहीलेली असते, त्यात अमुक दिवस अमुक वेळेपर्यंत ह्या स्त्रोत्र्यांचे जर पठण केले तर अमुक फल प्राप्ती होईल, असे जेव्हां वाचनात किंवा पठणात येते, तेव्हां देव व आपण यामध्ये काय देवाण-घेवाण चाललेली आहे, याचा स्पष्ट खुलासा होणार आहे. आपणास, काहीं प्राप्त करावययाचे आहे ते आपण अनेक जन्मपर्यंत जरी देवाकडे मागत राहिलो, तरी ती सुख-संपत्ती परमेश्वर तुम्हाला कदापिही देणार नाही. जेव्हां तुम्हाला जगतातील इतर दुःखी माणसाला आपल्या सारखेच सुख प्राप्त व्हावे, अशी तळमळ निर्माण होऊन, तुम्ही इतरांसाठी परमेश्वराला प्रार्थना माध्यमातून आळवाल, तेव्हांच तुमच्या प्राप्त जीवनात ज्या उणीवा आहेत ह्या भरून निघतील. ही इतरांच्या कल्याणाची सखोल अशी मानवी कर्तव्याची भूमिका, आजपर्यंत ज्या काहीं धर्माचा, शास्त्राचा किंवा देवदेवतार्जनाचा आपण विचार केलात, त्यात इतरांसाठी माझ्या प्राप्त जीवनांत मला काहीं कर्तव्य करावयाचे आहे, ही जाणीव किंवा बोध आपणास कोठेही सांपडणार नाही. कोणताही धार्मिक विधी आपणाकरवी जेव्हां केला जातो, तत्पूर्वी काहीं संकल्पाचा (प्रार्थनेचा) उच्चार करून विधीस आरंभ करता, त्यातच आपला वैयक्तिक स्वार्थ किती व काय आहे, हे देव जाणत असल्याने आपण केलेला विधी हे क्रियाकर्म न होता, ती एक शास्त्रपरत्वे देवाला उद्देशून, पण स्वतःच्या स्वार्थासाठी केलेली प्रार्थना आहे.

अशा मार्गाचा शतकानुशतके आम्ही मानवांची अज्ञानाने

अवलंब करून प्राप्त झालेल्या जीवनास ईश्वरकृपेने साकार करण्याचा कर्तव्यास आपण मुकलो आहोत, ह्या जाणीवेची ओळख ह्या समितीच्या कार्यारंभी श्री सद्‌गुरुकृपेने झाल्यावर, गुरु आज्ञेने जेव्हां ह्या समितीच्या कार्यास आरंभ केला, तत्पूवी आपण आपल्या अडिअडचणी निवारणार्थ निराकरण विचारण्यास येणार, अशावेळी आपल्या जीवनाला योग्य मार्गाने योग्य ते वळण दिले जावे म्हणून प्रथमत: गुरुआज्ञेने ‘हे भगवंता नारायणा, . . ’ ही प्रार्थना लिहिण्यात आली. आजपर्यंत आपण भक्त ही प्रार्थना नित्याच्या आरती नंतर प्रत्येक केंद्रावर सकाळ संध्याकाळ ऐकता. कदाचित् ही प्रार्थना आपण घरीसुध्दा म्हणत असाल. पण ह्या प्रार्थनेत जीवनोध्दारार्थ काय वेदवेदांत गुरुकृपेने सामावले आहेत, ह्याची चुकूनही आपणास जाणीव झाली नसेल.

वर लिहिल्याप्रमाणे जेव्हां इतरांसाठी आपण आपल्या काया-वाच-मनाने सदिच्छा प्रगट करतो, तेव्हां ही नित्याची क्रिया काहीं लक्ष जप संख्येपेक्षा अधिक पुण्यकर्म जोडण्यास मदत करते. याचे कारण व्यक्तीगत जीवनातील उणीवा, गरजा यांची पूर्तता होण्यासाठी जेव्हां आपण पूजा-अर्चा देवधर्म किंवा काहीं धार्मिक विधी करतो, तेव्हां आपले मन, हे करीत असलेल्या विधीच्या ठायी एकाग्र झालेले नसते. तर ते मन, ज्या उणीवा आहेत, त्या प्राप्त होण्याचा मार्ग शोधित असते. पण जर आपण एखादी प्रार्थना, म्हणजे आज जी म्हणत आहोत, ती नित्याने म्हटली तर भवितव्यात कुटुंबासाठी व इतरांसाठी गुरुकृपेने सिध्दसिध्दांतपध्दतीचा नकळत उच्चार करून, कुटुंबातील व इतर व्यक्तींच्या जीवनातील उणीवा दूर होण्यास,



गुरुकृपाशिर्वादाने ह्या कार्यपध्दतीत ज्या काहीं सिध्दसिध्दांत पध्दती आहेत, त्यांचा लाभ आपण कृपाशिर्वाद म्हणून घेतला असल्याने, प्रार्थना माध्यमातून ह्या सिध्दसिध्दांत पध्दती इतरांच्या कल्याणार्थ, आपल्या नकळत कार्यान्वित होणार आहेत. पण ही जाणीव आजपर्यंत आपल्याला झालेली नाही.

आज आपण भक्तांना गुरुकृपाशिर्वादाने जी बहुमोल अशी अवस्था इहजन्मांत प्राप्त झाली आहे, अशा अवस्थेची प्राप्ती होण्यास जरी आपण भक्तांनी अनेक जन्म खर्च केले असते, तरी ही अवस्था प्राप्त होणे अत्यंत कठीण आहे, असे अनेक वेळा झालेल्या मुलाखतीत सूचित करण्यात आले आहे. पण आपण भक्तांनी काहीं एक जप, तप, साधन न करता, श्री सद्‌गुंरुनी कृपावंत होऊन, ही जी अवस्था प्राप्त करून दिली आहे, त्या अवस्थेचा आपण आस्थेने विचार केला नाहीत, या बद्दल दु:ख वाटते. ह्यापेक्षा जर इतरांच्या जीवनातील ऐहिक सुखापेक्षा अधिक सुख कृपाशिर्वादाने आपल्याला प्राप्त झाले असते, तर त्या सुखाबद्दल अधिक आस्था, प्रेम निर्माण झाले असते. आज गरजेपेक्षा अधिक काहीं प्राप्त करून देण्यास श्रीसद्‌गुरु असमर्थ नाहीत, पण जे काहीं आपल्याला प्राप्त होईल, ती सर्व सुखसंपत्ती इह जगताचा निरोप घेतेवेळी, इहजगतात सोडून जावी लागेल. आज प्राप्त झालेले पै-पैशाचे सुख ह्याचा पुढील जन्माची तरतूद करण्यासाठी किंवा उत्तम असा जन्म प्राप्त होण्यासाठी, भवितव्यात काहींही उपयोग नाही. या जाणीवेने गरजे इतकेच सुख, आज आम्हा मानवांना देऊन, प्राप्त जन्मांची वारंवार पुनरावृत्ति होऊन नये म्हणून, जरी आज आपण कर्मपरत्वे जन्म घेते झालो आहोत, तरी त्या जन्माचे सार्थक

म्हणून श्रीसद्‌गुरुंनी आजचा जन्म ‘कृपापरत्वे’ करून दिला आहे. ही बहुमोल अशी ठेव, व्यक्तिशः आपल्याचसाठी व आपल्या कुटुंबियांच्या भवितव्यासाठी असल्याने, आपण भक्तांचे भवितव्यासाठी आद्य कर्तव्य असे की, प्राप्त झालेली अवस्था जतन करण्याचे कर्तव्यच आता आपल्यासाठी शिल्लक आहे. आपणास प्राप्त झालेल्या अवस्थेचा इतरांना लाभ देण्याचा परोपकार जरी करता आला नाही, तरी ह्या प्राप्त अवस्थेचा दुरूपयोग विचार-अविचाराने, आपल्या ज्ञान-अज्ञानाने होऊ नये, ही दक्षता आपण भक्तांनी विचारात ध्यावयास पाहिजे.

आज आपणास जी अवस्था प्राप्त झाली आहे, त्या अवस्थेचा लाभ होण्यासाठी, कोणकोणत्या ऋणानुबंधातून आपणास सुलभ व सोप्या मार्गाने ऋणमुक्त केले आहे, याची. जाणीव आपणास प्रथमतः व्हावयास पाहिजे. आम्ही मानव जन्माला आल्यावर, प्राप्त जीवन हे पाच ऋणानुबंधात (मातृपितृ, इतरेजन, देवादिक, जन्मकर्म, जन्मजन्मांतर) ह्तिसंबंधित असते. जोपर्यंत ह्या पांच ऋणानुबंधातील कर्तव्याची पूर्तता आपल्या हातून होत नाही, तोपर्यंत प्राप्त झालेल्या जीवनांचे सार्थक होत नाही. यदाकदाचित् एखाद्याला ह्या ऋणानुबंधांची जाणीव होऊन, त्यातून मुक्त होण्याचे कर्तव्य देवादिकादी मार्गाने त्याने करावयाचे ठरविले, तर त्यासाठी प्राप्त जीवन तर अपुरे आहेच, पण याशिवाय ज्या विधी मार्गपरत्वे आचार, विचार, आहाराची व पै-पैशाची आवश्यकता असते, तेवढा खर्च करूनही आपण ऋणमुक्त होणे अशक्यच आहे. काहीं एका विधीपरत्वे देवधर्म, दानधर्म, परोपकार, तीर्थयात्रा आदि धर्मकृत्ये आपल्या हातून घडली, तर यापैकी एक किंवा दोन ऋणानुबंधातून आपण



इहजन्मात मुक्त होऊ शकाल. पण पुनश्च जन्म प्राप्तीच्या वेळी कृपाशिर्वादाच्या अभावी प्राप्त झालेला जन्म, हा पुनश्च पाच ऋणानुबंधाशी हितसंबंधीत हा असणारच. ही जी व्यथा आधिव्याधि म्हणून आम्हा मानवांच्या प्रत्येक जन्मांत आम्हाला भोगावी लागते, त्यामुळे प्रत्येक **जन्मांचे कारण** म्हणून जो काहीं विषय घेऊन आत्मा नरजन्म घेतो. त्या नराचा नारायण होण्यास, अनेक जन्म प्राप्त होऊनही, जे जन्माला येण्याचा कारण, स्वतःसाठी व इतरांसाठी असते, त्याचे सार्थक होत नाही.

आपल्या नित्याचा जीवनांत अनेक धर्मग्रंथ वाचनात येतात, पोथीपुराणे यांचेही श्रवण मनन होते. ही सर्व शास्त्रे आम्हास “प्राप्त झालेल्या जन्माचा सार्थक करून घ्यावे”, असे सांगतात व आपण नित्याने हे जरी ऐकतो, तरी आजपर्यंत कोणीही निश्चित् असा मार्ग, आम्हा मानवांना जीवनाच्या सार्थकतेसाठी सूचित केला नाही. त्यामुळे एकमेकांनी एकमेकाला, ‘जन्माला आला आहेस, जन्माचे सार्थक करून घे, ” एवढे सांगण्या व्यतिरीक्त काहींही केलेले नाही. ज्यांच्या करवी हा बोध आपण श्रवण करतो, त्यांचे तरी जीवन सार्थकी लागले आहे कां, असा प्रश्न कोणीही विचारात घेत नाही. हीच अंधश्रध्देने अनुकरण करण्याची व्यथा समाजात रूढ झाली असल्याने त्याच मार्गाचा अवलंब शकतानुशतके होत असून, आजपर्यंत कुणीही साधकाने सुलभ व सोप्या अशा मार्गाने, आम्हा मानवांची जीवने साकार करण्याचे शास्त्रशुध्द शास्त्र उपयोगात आणलेले नाही. आज मला असे म्हणावे लागेल की, आपण भक्त काहीं एक अडिअडचणी निमित्ताने व त्या निवारण व्हाव्यात, असा हेतू विचारात घेऊन, ह्या समितीच्या कार्यपध्दतीचा लाभ घेण्यासाठी

आलात. पण समितीच्या कार्याचा लाभ अडिअडचणी निवारणार्थ घेत असताना, आपल्या प्राप्त जीवनाचे सार्थक होईल, अशा सिध्दसिध्दांत पध्दतीचाही समावेश जो ह्या कार्यात आहे, त्याचाही लाभ आज आपण घेते झाला आहात. एके काळी आपण भक्त सुखप्राप्तीच्या शोधात आलात व आज आपल्या नकळत आपण इतरांनाही सुख देण्यास समर्थ झालात. ही अवस्था ह्या जन्मांत, ज्या सद्‌गुरु कृपाशिर्वादाने आपणास प्राप्त झाली आहे, त्या गुरुमाऊलीच्या कृपाशिर्वादाची धन्यता वर्णन करण्यास शब्दही आज त्रिभूवनात अपूरे आहेत!

हा विस्तृत असा कार्यपध्दतीचा वृतांत, अनेक भक्तांच्या अनुभवास आला असून, ज्या सिध्दसिध्दांत पध्दतीने आपण भक्तांना आजच्या अवस्थेपर्यंत येण्याचे भाग्य प्राप्त झाले, त्याच सिध्दसिध्दांत पध्दती भवितव्यात जगाच्या कल्याणासाठी व सुख-शांती-समाधानासाठी उपयोगात आणावयाच्या आहेत. पण नव्याने येणाऱ्या परिचित अपरिचित अशा भक्तांना दीर्घ काळपर्यंत त्यांच्या इच्छा अपेक्षेप्रमाणे प्राप्त जीवनात जे काहीं ऐहिक व पारमार्थीक सुख प्राप्त व्हावे अशी इच्छा आहे, त्याना प्राप्त जीवनाबद्दल आपले कर्तव्य काय याची जाणीव नाही. आज ज्याना आपण सुशिक्षीत किंवा वैज्ञानिक म्हणून म्हणतो, अशानी जीवन जगण्याचे जरी ज्ञान प्राप्त करून घेतले असले, तरी ‘जीवनाबद्दलचे ज्ञान’ त्याना नसल्याने, त्यांच्या अज्ञानाने त्याना प्राप्त झालेल्यापैकी पंचाहत्तर टक्के जीवनाचा, ऐहिक सुखसंपत्ती प्राप्त करण्यातच अपव्यय होत आहे. प्राप्त झालेले जीवन किती बहुमोल आहे याची जाणीव न होण्याने, अधिक सुखप्राप्ती म्हणजे जीवनाचे सार्थक, अशा हेतूने अशा व्यक्तीची बहुमोल जीवने



अनाठायी खर्च होत आहेत. अशांना जर प्राप्त जीवनाची ओळख झाली, तर भवितव्यात विश्वशांतीचे कृपाछत्र धारण करण्यास ह्या व्यक्तींचा हातभार हा अधिक मोलाचा आहे. यासाठी आपणास प्राप्त झालेले जीवन सार्थकी लागावे म्हणून आजपर्यंत ज्या काहीं सुलभ व सोप्या सिध्दसिध्दांतपध्दतीचा (विमोचन, दीक्षा, साधन, सेवा) अवलंब केला गेला त्याहीपेक्षा गुरुकृपाशिर्वादाने, सुलभ अशापध्दतीने, जगतातील दु:खीकष्टी लोकांना सुखाची दिशा प्राप्त करून देऊन, प्राप्त जन्मांचे ज्ञान व कर्तव्य करण्यास त्याना परमेश्वराने बुध्दी द्यावी, अशी साधना आता आपण गुरुबंधु-भगिनींना करावयाची आहे. ही जाणीव श्रीसद्‌गुरुंना तीस वर्षापूर्वीच कार्यारंभी होती, म्हणून त्यानी ‘हे भगवंता नारायणा .... ’ही प्रार्थना की ज्या प्रार्थनेत आजपर्यंत ज्या काहीं सिध्दसिध्दांतपध्दतीने आपण भक्तांना आजची अवस्था प्राप्त झाली आहे, त्या अवस्थेचा लाभ न कळत जगतातील इतर दु:खीकष्टी, अज्ञानी लोकांना व्हावा म्हणून सर्व सिध्दसिध्दांतपध्दतीचा समावेश ह्या प्रार्थनेत केला आहे

आपण भक्तांची जीवने ही गुरुमार्गी होण्यापूर्वी, जीवन म्हणून जरी आपण व्यतीत करीत होता, तरी ‘जीवन’ ह्या शब्दाचा सखोल अर्थ आपल्याला समजला नव्हता. जीवन ह्या शब्दाचा अर्थ असा की, व्यतीत होणार काळ. आम्हा मानवांना जे जीवन प्राप्त होते, तत्पूर्वी त्या जीवनाचे स्थळ, काळ, वेळ हे विधीलिखीत असल्याने, आपण जरी जीवन व्यतीत करीत असलो, तरी व्यतीत होणारे जीवन हे निसर्गाच्या गतीच्या आधीन असल्याने, जन्माला आलेल्या वेळेपासून ते अंतापर्यतचा काळ त्या निसर्ग गतीप्रमाणे व्यतीत होत असतो. जेव्हां आम्हा मानवाना

जीवन ही अवस्था प्राप्त होते, अशा अवस्थेत देह व जीव (आत्मा), म्हणजे देहिक व आत्मिक अशी अवस्था असते. प्रत्येक जन्मांत आत्म्याला कर्मपरत्वे नव्याने देह जरी धारण करावा लागतो, तरी आत्मा किंवा आत्मिक अवस्था ही बदलत नाही. प्रत्येकाच्या जीवनात देहिक अवस्था ही पंचविस टक्के असून, आत्मिक अवस्था पंचाहत्तर टक्के असते. जोपर्यंत देहिक अवस्था ही आत्मिक अवस्थेशी एकरुप होत नाही, तोपर्यंत प्राप्त झालेले जीवन कोणतेही सुखसमाधान याबद्दल त्या व्यक्तीचे मन शांत नसते. देहिक अवस्थेची जाणीव देहाने होत असल्याने, देहाच्या ठायी जी माध्यमे जाणीव किंवा ज्ञान करून देण्याची आहेत, ती माध्यमे आपल्या आसमंतातील इतर व्यक्तीच्या जीवनाचे अनुकरण करण्याकडेच स्वाभाविक प्रवृत्त होतात. त्यामुळे आपल्याला जरी परमेश्वकृपेने काही सुख समाधान प्राप्त झाले असले, तरी इतरांच्या जीवनाकडे पाहून, आपल्या जीवनात बरीच काहीं ऐहिक सुखाची उणीव आहे असा भास निर्माण होतो. पण अशा जीवनांत परमेश्वराच्या कृपेची उणीव आहे, ही जाणीव होत नसल्याने, देहिक व आत्मिक ह्या अवस्थांचे एकरुप न होता ह्या दोन अवस्था भिन्नाभिन्न विषयपरत्वे भिन्नाभिन्न आचरविचार निर्माण करत्या होतात; व जरी आपल्या अपेक्षेपलीकडे काहींही प्राप्त झाले, तरी आत्मिक म्हणजे मनाची शांतता आपल्याला अनुभविण्यास येत नाही. ह्या दोन्ही अवस्थांचे ऐक्यत्व किंवा एकरुपत्व हे केवळ सांगण्याने किंवा बोलण्याने होणारे नसून ते ऐक्यत्व साधण्यास निश्चित असे साधन व गुरुकृपाशिर्वाद ह्यांची अत्यंत आवश्यकता आहे. अशी अवस्था गुरुकृपाशिर्वादाने आपण भक्तांना ॐकार साधनेच्या



माध्यमातून करून दिल्यावर, जेव्हां आपल्या देहिक व आत्मिक अवस्थांचे एकरुपत्व झाले व ह्या दोन्ही अवस्था ज्या पंचप्राण कोशापरत्वे (अन्नमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय, आनंदमय)कार्यान्वित होतात. अशा कोशांची शुध्दता करून, अन्नमय कोशापासून आनंदमय कोशापर्यत सूचित केलेल्या साधनेपरत्वे हे कोश आज एकमेकाना जोडून दिले असल्याने, आजच्या अवस्थेत ज्या ॐकार साधनेचा आपण लाभ घेते झाला आहात, ती अवस्था म्हणजे **'हिरण्यगर्भ अवस्था'** किंवा पिंडी ते ब्रह्मांडी ही अवस्था होय व ह्या अवस्थेमुळे आज आपले काया, वाचा, मन म्हणजे देहिक व आत्मिक हे जे गुरुरुप झाले आहे, ती **'सेवक अवस्था'** होय!

आठव्या संमेलनात आपण भक्तांना सेवक अवस्थेचा लाभ करून दिला आहे, असे जेव्हां सांगण्यात आले, तेव्हां आपण भक्त जागे होऊन समाजात काहींतरी कार्य करावे, असे आपणास वाटू लागले. परंतु वस्तुस्थिती अशी आहे की, आज समितीची कार्यकेंद्रे, गोवा, बेळगाव, कराड, पुणे, मुंबई, जळगाव, रत्नागिरी, विजापूर, दिल्ली अशी असून, तेथील कार्यार्थ सेवक नियुक्त आहेत. मग संमेलनास उपस्थित झालेल्या चारशे सेवकांना कार्यार्थ कार्यकेंद्रे नसल्यामुळे, आपणास प्राप्त झालेल्या सेवक अवस्थेतून कार्य करावे, असे जे सूचित करण्यात येत आहे, याचा अर्थ आपण सेवकांना न समजल्याने, आपणास कार्य करण्यास केंव्हा संधी किंवा आज्ञा मिळते आहे, याची अनेक सेवक बंधु आज वाट पाहत आहेत. पण ईश्वरी कायार्थ आणखी कार्यकेंद्रे निर्माण करणे म्हणजे कार्य नसून, तो एक भवितव्यात कार्याचा प्रचार न होता पसारा

होईल, ह्या जाणीवेने श्रीगुरुंनी प्रत्येक सेवकाचे कुटुंब व ते रहात असलेली जागा हे आपले 'कार्यकेंद्र' केले आहे. याचे स्पष्टिकरण म्हणजे आता भवितव्यात इतरांच्या कल्याणासाठी 'हे भगवंता नारायणा...'. एवढीच प्रार्थना की, ज्या प्रार्थनेत आम्हा मानवांच्या कल्याणार्थ सिध्द-सिध्दांतपध्दती आहेत, त्या प्रार्थनेचा उच्चार आपण सेवकांनी नित्याने आपल्या कुटुंबियासमवेत बसून करावाचा आहे. कोणतेही एखादे दिव्य साधन करून किंवा इतराना ते करावयास लावून, ह्या समितीच्या कार्याचा प्रचार करावयाचा नाही.

**प्रार्थना**:- हे साधन सर्वात श्रेष्ठ असून, जगतात सर्व धर्मात प्रार्थनेला जेवढे महत्व आहे, तेवढे प्रार्थनापरत्वे विधीस नाही, हे आपण सेवकांनी लक्षात ठेवावे. पूर्वीच्या अवस्थेत आपल्या देहिक अवस्थेच्या आसमंतात अनेक दूषित वलये होती, शिवाय देहिक व आत्मिक ह्या अवस्थांचे एकरुपत्व आनंदमय कोशाशी झालेले नव्हते. त्यामुळे जरी आपणास पूर्वी साधनसेवा किंवा कृपाशिर्वाद हे प्राप्त होते, तरी त्याची जाणीव आपल्या काया, वाचा, मनाला होत नसे. आज आपली देहिक व आत्मिक अवस्था निकोप होऊन ती सद्गुरुरूप झाली आहे म्हटल्यावर, आपले काया, वाचा, मन हे आता पूर्वीच्या जन्मपरत्वे कोणत्याही ऋणानुबंधात नसून, ते श्रीसद्गुरुकृपाशिर्वादाचे प्रतिक म्हणून उदयास आले आहे, हे आपण भक्तांनी लक्षांत घ्यावे. .

आज जगतात प्रत्येक धर्मात धर्मगुरु आहेत. ते सांगत असलेल्या प्रार्थना आपण ऐकतो व भक्तिभावनेने त्यावर श्रध्दा ठेवून, त्यांच्या मुखातून निघालेले शब्द म्हणजे परमेश्वराचा



कृपाशीर्वाद प्राप्त कराण्याचे एक माध्यम आहे, अशी श्रध्दा ठेवून काहीं विधी करीत असतो. उदाहरणार्थ, अकरा वैदिकांनी जर अकरावेळा रूद्र आवर्तन म्हटले, तर देवाला लघुरूद्राभिषेक होतो, अशी आपली श्रध्दा असून, त्या श्रध्दापरत्वे आज सर्वत्र असे विधी होत असतात. पण आपण चुकून ही असा विचार करीत नाही की, आपल्यासाठी जी व्यक्ती प्रार्थनामाध्यमातून देवाला आळवित आहे, तिचा देहिक व आत्मिक विकास किती झाला आहे? अशा ह्या व्यक्ती देहिक व आत्मिक अवस्थेने विकसित झालेल्या नसतात. त्यांची आपणासाठी प्रार्थना करण्याची आस्था, हे एक उदरनिर्वाहाचे साधन असल्याने, आज वर्षानुवर्षे जरी आपण ह्या प्रार्थना करून विधी करीत आहोत, तरी इष्ट फलप्राप्ती होत नाही.

गुरुकृपाशिर्वादाने जेव्हां देहिक व आत्मिक अवस्थांचा विकास होऊन, प्राप्त जीवन गुरुमय होते, तेव्हां ह्या त्रिभुवनांत वास करीत असलेला परमेश्वर, हा आपल्या हाकेला साकार करण्यासाठी सदैव तत्पर असतो. अशा सिध्दसाधनपध्दतीचा विचार करून, श्रीगुरुंनी आपण भक्तांना नित्याने म्हणण्यास जी प्रार्थना दिली आहे, ती प्रार्थना आपण भक्तांच्या कुटुंबात प्रत्येक व्यक्तीच्या वाणी माध्यमातून जेव्हां उच्चारली जाईल, तेव्हां त्या उच्चारांचे स्पंद किंवा ध्वनी हे आसमंतातील वातावरण शुध्द करण्याचे कार्य करतील. आज जगतात जी कांही दु:ख, अशांतता पसरली आहे, तिच्या मुळाशी प्रत्येकाचे जीवनाबद्दलचे अज्ञान आहे. ह्या अज्ञानाने प्रत्येक व्यक्ती केवळ ऐहिक विषयपरत्वे जगण्यात जीवनाचा विचार करीत आहे. असे विचार जे त्यांच्या ठायी निर्माण होतात, ते विचार त्यांच्या माध्यमातून

ह्या वातावरणात पसरून नैसर्गिक वातावरणातील शुध्दतेची जी गरज आम्हा मानवांना सुख, शांतीसाठी लागते, ते वातावरणात आज दूषित झाले असून, आपण कोणत्याही देवदेवतांच्या मार्गाचा जरी अवलंब केलात, तरी सुख, शांती, समाधान प्राप्त होणे शक्य नाही.

सर्वात श्रेष्ठ साधना किंवा इष्ट जीवनाचा विकास करण्याचे माध्यम, की ज्या माध्यमातून काया, वाचा, मनाने एकरुपत्व व्हावयास पाहिजे, ते साधन म्हणजे प्रार्थना होय. प्रार्थना हे साधन जरी विचारांती लहान असले तरी त्याचे कार्य महान आहे, हे लक्षात घेणे आवश्यक आहे. आज आपण भक्तांची देहिक व आत्मिक शक्ति गुरूकृपेने एक झाली असून, जी प्रार्थना आपणास करावयाची आहे, त्या प्रार्थनेत गुरुकृपाशिर्वादाने जी काहीं साध्यसिध्दता आम्हा मानवांच्या कल्याणासाठी आहे, तिचा समावेश आपणास नित्याने म्हणावयास सूचित केलेल्या ह्या प्रार्थनेत असल्याने, ह्या प्रार्थनामाध्यमातून बहुजन समाजाचे कल्याण अधिक लवकर होणार आहे.

पूर्वापार रूढीपरंपरेप्रमाणे आजपर्यंत समाजात जे काहीं धार्मिक विधी इष्टकायार्थ किंवा इष्ट फलप्राप्तीसाठी केले जातात, त्यात वेदांत मंत्रांचा आधार घेतला जातो, ते मंत्रसुध्दा प्रार्थनाच होत. पण तुमच्या प्रार्थनेने इष्टफलप्राप्ती होईल किंवा नाही यावर आपला विश्वास नसल्याने, त्या मंत्रांच्या जोडीला काहीं विधी हे करण्याचे वेदकालापासून सूचित करण्यात आले. म्हणजे जरी आपण एखादा वेदमंत्र हा श्रवण करीत असलो, तरी त्या मंत्रोच्चाराप्रमाणे कायेने काहीं क्रिया केल्याशिवाय त्या



मंत्रावर आपली श्रध्दा दृढ होत नाही. त्यामुळे प्रत्येक वेदवेदांत मंत्राला विधीचा आधार देऊन, विधी करण्याचा धार्मिक विधी हा प्रचलित समाजात रूढ झाला. आज घरोघरी व देशभर कौटुंबिक शांततेपासून ते विश्वशांतीपर्यंत अशा विधींचा प्रसार होत आहे. पण वेदमंत्र अपौरूषेय आहेत व ज्या व्यक्ती माध्यमाच्या पठणातून त्यांचा उच्चार केला जात आहे, ते मंत्र त्या व्यक्तींनी सिध्द केले आहेत किंवा नाहीत याचा विचार न होण्याने, केवळ पठण केले आहे. म्हणजे त्या उच्चारलेल्या मंत्रातून काहीं साध्य होईल असे नाही. अशी ही आजची समाजातील रूढ झालेली परंपरा, या मागे प्रत्येकाचा सद्हेतु असा आहे की, आपल्या न कळत परमेश्वरकृपेने जे काहीं प्राप्त झाले आहे, त्यात सुखसमाधान न मानता, जगतात इतरांना आपल्यापेक्षा जे काहीं अधिक सुख प्राप्त झाले आहे, अशा सुखाची प्राप्ती आपल्याला व्हावी, म्हणून वेदकालापासून सूचित केलेली सुक्ते (प्रार्थना) यांचा वापर धार्मिक विधी म्हणून केला जात आहे.

असे विधी शतकानुशतके होत असूनसुध्दा, आज आम्हा मानवाना जीवनात जे सुख, शाती, समाधान नाही, त्याच्या मुळाशी कारण म्हणजे, प्राप्त झालेले जीवन ज्या देहिक माध्यमाद्वारा व्यतीत करावयाचे, त्या देहिक माध्यमाचा यथोचित विकास हा न होण्यामुळे, आपण करीत असलेले देवदेवतार्जन व धार्मिक विधी यांचे फल आपण प्राप्त करू शकत नाही. यासाठी जेव्हां आपण गुरुमार्गाकडे जातो, तेव्हां आपण आपले दु:ख गुरुमाध्यमाला कथन करून, त्यांच्या कृपाशिर्वादाने ते निवारण व्हावे अशी अपेक्षा ठेवतो. पण गुरुमार्गात ज्याला दिव्यदृष्टी प्राप्त

झालेली असते, अशांना भेटावयास आलेल्या व्यक्तीच्या जीवनातील उणीवापेक्षा, ज्या देहिक माध्यमातून हे जीवन व्यतीत करावयाचे आहे, त्या देहिक माध्यमात काय काय उणीवा आहेत त्या दिसतात. अशावेळी गुरु जो कृपाशिर्वाद देतात व जो आपण घेतो, त्या ठिकाणी गुरु व भक्त यांच्या विचारांची दिशा परस्परात विरोधात्मक असते. गुरुंनी दिलेला आशिर्वाद हा देहिक माध्यमातील उणीवा (अविकसितता) भरून निघाव्यात व देहिक विकास व्हावा या विचाराने श्रीगुरुनी कृपावंत होऊन दिलेला असतो, पण कृपाशिर्वादार्थ आलेल्या भक्ताचे विचार हे ऐहिक सुखाकडे धाव घेणारे असल्याने, ह्या भक्ताच्या कल्याणार्थ श्रीगुरुंनी आपल्या सामर्थ्याचा कृपाशिर्वाद म्हणून काय वापर केला आहे, याची जाणीव भक्तास होत नसल्याने, अनेक वर्षे गुरुमार्गात राहूनही गुरुंच्या कार्याची किंवा सामर्थ्याची ओळख आम्हा भक्तांना होत नाही.

काहीं व्यक्ती गुरुमार्गी न होता, आपल्या घराण्यातील इष्टदेवदेवता यांच्या प्रीत्यर्थ काहीं धार्मिक विधी करून, ह्या उणीवा भरून काढण्याचा प्रयत्न करीत असतात. अशावेळी ज्या देहिक माध्यमाद्वारे कृपाशिर्वाद धारण करावयाचा आहे, ते किती अविकसित आहे याची जाणीव होत नाही. ज्या व्यक्तिमाध्यमाकडून हे विधी देवतांच्या प्रीत्यर्थ केले जातात, त्यांनाही देहिक माध्यमातील अविकसितता म्हणजे उणीव याची जाणीव होत नाही. पण गुरुमाध्यम हे ईश्वरी आज्ञेने मानवी रुप धारण करून, ईश्वराचे कार्य करण्यासाठी इहलोकी जन्म घेते, असा हा जन्म मानवी रुपांत असल्याने व भेटावयास आलेली व्यक्ती ही मानवच असल्याने, श्रीगुरुंना त्या व्यक्तीत सुख, शांती,



समाधान प्राप्त करण्यासाठी कशाची कमतरता आहे, हे प्रथमत: जाणवते. ते जेव्हां कृपावंत होऊन काहीं सेवा किंवा कृपाप्रसाद देत असतात, तो प्रसाद आलेल्या भक्ताच्या जीवनातील उणीवांची भरपाई करुन दिलेला नसतो, तर सुखप्राप्तीसाठी देहिक माध्यमात ज्या काही उणीवा आहेत त्या उणीवांची भरपाई दिलेल्या कृपाशिर्वादाने व सूचित केलेल्या सेवेने होत असते. पण अशा कृपाशिर्वादार्थ आलेल्या व्यक्तीचा प्रधान विषय ऐहिक सुख प्राप्त करण्याचा असल्याने, श्रीगुरुंनी दिलेल्या कृपाशिर्वादाची प्राप्ती करून घेण्याचे कर्तव्य त्या व्यक्तीकडून न होता, उलट जो कृपाशिर्वाद दिला आहे, त्याची अवहेलनाच होत असते.

गुरुकृपेने आज आपण **'सेवक'** अवस्थेचे माध्यम बनलो आहोत. म्हणजे आपल्यालाही नियुक्त सेवकाप्रमाणे कार्य करण्याचा हक्क आहे, असा दुजाभाव जर आपल्या ठिकाणी निर्माण केलात, तर वरील ज्या अवस्थेचे स्पष्टिकरण आपल्याला करून दिले आहे, त्या अवस्थेचा लाभ आपल्याला या अवस्था प्राप्त होऊनही होणार नाही. कार्यार्थ आपला समावेश ह्या कार्यात झाला आहे, म्हणजे केंद्रप्रमुखाप्रमाणेच आपल्या हातून कामकाज व्हावे किंवा कोणालाही निराकरण सुचविण्यास आपण पात्र झालो आहोत असे नाही, आज आपणास प्राप्त झालेली अवस्था ही गुरुकृपाशिर्वादाची भेट असून, तो ह्या मार्गातील बहुमोल असा अलंकार आहे. ह्या अलंकाराचे जतन करावयाची जबाबदारी म्हणजे प्रथमत: स्वत:बद्दलचा अहंभाव कमी करून, त्या ठिकाणी ममता, माया व इतरांबद्दल प्रेम व आस्था ही निर्माण व्हावयास पाहिजे. नियुक्त सेवक हा उच्च आहे व ही अवस्था

प्राप्त झालेला सेवक कमी प्रतिचा आहे, असा दुजाभाव आपण कदापिही निर्माण करता कामा नये.

आज जी अवस्था गुरुकृपेने प्राप्त झाली आहे, ती अवस्था बाल्य असून, ती सुदृढ व विश्वव्यापी करण्याचे कर्तव्य याकडे अधिक लक्ष देऊन आपल्या नांवाला मोठेपणा कसा प्राप्त होईल, हे विष जसे मी आजपर्यंत गेली अनेक वर्षे बाजूला ठेवले, त्याच कर्तव्याचे अनुकरण तुम्हा भक्तांकडून व्हावयास पाहिजे. गुरुआज्ञेने ज्या सेवकांची कार्यार्थ नियुक्ति झालेली असते, अशांच्या रक्षणार्थ श्रीगुरु हे पाठीशी असतात. जी अवस्था नियुक्त सेवकाला प्राप्त झाली आहे, तीच अवस्था आपल्याला प्राप्त झाली आहे असे म्हणून जर आपण गुरुआज्ञेचा आस्थेने विचार न करता, 'कामकाज' म्हणजे अडिअडचणींनी त्रस्त झालेल्या माणसाच्या जीवनातील कर्मात हात घातलात, तर जी अवस्था गुरुकृपा म्हणून प्राप्त झाली आहे, ती अवस्था बाल्य असून जोपर्यंत सुदृढ होत नाही, तोपर्यंत कर्मपरत्वे अडिअडचणीत असलेल्या व्यक्तीच्या कर्मात हात घालण्याने, तुम्हास प्राप्त झालेल्या अवस्थेस मुकावे लागेल. ही जाणीव व दक्षता प्रत्येकाने विचारात घेतली पाहिजे. गेल्या कित्येक वर्षात आपण भक्त जेव्हां प्रथमतः अडिअडचणी निवारणार्थ आलात, तेव्हां मलाही आपण भक्तांच्या जीवनातील प्रतिकूल कर्मे अनुकुल करून देऊन, विमोचनादि विधी करावे लागले. अशी आपल्या कर्मातील प्रतिकूलता ही अनुकुल करून देऊन व धारण झालेल्या दोषांचे विमोचन करण्यासाठी ज्या काहीं शारीरिक पीडा व यातना भोगाव्या लागल्या, त्याचे वर्णन मी करू इच्छित नाही. ईश्वराच्या कार्यार्थ माझा जन्म झाला असून, माझे काया,



वाचा, मन हे जरी सर्वस्वाने गुरुरूप झाले होते, तरीसुध्दा प्राप्त झालेली गुरुकृपाशिर्वादाची ठेव ही भक्तांच्या जीवनातील प्रतिकूल कर्माच्या किंवा दोषांच्या निवारणार्थ किती खर्ची पडेल, याचा अंदाज लागत नाही. आपण भक्तांचे जन्म हे काहीं ईश्वरी अवतार कार्यार्थ झालेले नाहीत. असा जन्म भवितव्यात येईल. पण आज प्राप्त झालेल्या जन्माचे सार्थक करून, प्राप्त झालेली कृपा ही पुढील जन्मासाठी ठेव म्हणून शिल्लक ठेवावयाची आहे

अशावेळी समाजात नावांरुपाला यावे अशा लोभामुळे किंवा आसक्तीमुळे जर आपण प्राप्त झालेल्या अवस्थेतून इतरांच्या जीवनात ढवळाढवळ केली, तर हे लोककल्याण न होता, गुरुंनी अति परिश्रमाने ज्या कृपेचा लाभ आपणांस किंवा आपल्या कुटुंबियांस करून दिला आहे, त्या बहुमोल अशा आशिर्वादास आपण मुकाल. ही जाणीव आज आपण सेवकास एवढ्यासाठी करून दिली आहे की, मी जेव्हां पूर्वी कामकाज व निराकरण करीत होतो, अशावेळी अनेक व्यक्ती मला अशा भेटल्या की, ज्या व्यक्तींना त्यांच्या कुलदेवदेवतांचे संचार होते, कृपा होती. वाणीतून निघालेला प्रत्येक शब्द कार्यान्वित होत होता. अशा नांवलोकिकामुळे अनेक व्यक्ती व कुटुंबिय मंडळी जी त्यांच्या घराण्यातील दोषामुळे किंवा बाधेमुळे त्रस्त झाली होती, ती निराकरणार्थ येती झाली. पण ह्या साधक अवस्थेतील व्यक्तींना आपल्या समोरील दु:खी व्यक्तींच्या जीवनातील दोष किती प्रखर आहेत ही जाणीव न झाल्याने, त्या साधक अवस्थेतील व्यक्तींच्या जीवनातील प्राप्त झालेली कृपा, त्यांच्या न कळत हे दोष धारणकर्ते होऊन, पुढे ह्या व्यक्तीच्या वाणीतून उच्चारलेला शब्द, हा इतरांचे कल्याण करण्यास असमर्थ तर

झालाच, पण त्याच बरोबर त्यांच्या कौटुंबिक जीवनातील सुख, शांती, समाधान यासही त्या कुटुंबियाना मुकावे लागले. ही अनुभवसिध्दता आज आपण भक्तांना मुद्दाम निवेदन करण्याचे कारण असे की, जी अवस्था आज आपण भक्तांस प्राप्त झाली आहे, ती जर आपण आपल्या ज्ञानअज्ञानाने गमावून बसलात, तर ह्या अवस्थेची पुन:श्च प्राप्ती पुढील कोणत्या जन्मात केंव्हा होईल व त्यासाठी योग्य असे गुरु माध्यम मिळेल किंवा नाही, हे कोणीही सांगू शकणार नाही. यासाठी आपण भक्तांचे ह्या कायार्थ आद्य कर्तव्य असे की, जी काहीं गुरु आज्ञा असेल तेवढेच कार्य किंवा कर्तव्य आपण भक्तांनी करावे. इतरांच्या कल्याणार्थ आपल्या जीवनाचा सदुपयोग व्हावा अशी जी आपली इच्छा आहे, त्यासाठी आपण व आपल्या कुटुंबियांनी नित्याने सकाळी किंवा संध्याकाळी ‘हे भगवंता, नारायणा...’ ही जी प्रार्थना की, ज्या प्रार्थनेत गेल्या तीस वर्षात गुरुकृपेने मला प्राप्त झालेल्या सर्व सिध्दसिध्दांतपध्दतीचा समावेश आहे, ही नित्यनियमाने म्हणावी. ह्या प्रार्थनेतून निर्माण होणारे स्पंद (Vibrations) ह्या वातावरणात उमटले जाऊन, लोककल्याणार्थ ह्या शब्दलहरी विश्वभर प्रवाहित होतील. या उलट नियुक्त सेवकाप्रमाणे जर निराकरण करणे म्हणजेच कार्य, असे आपण समजत असाल, तर निराकरणाच्या वेळी आपल्यासमोर ज्या काहीं व्यक्ती उपस्थित आहेत, तेवढ्याच व्यक्तीना आपल्या प्राप्त झालेल्या कृपेचा लाभ होणार आहे. पण त्याऐवजी जेव्हां आपण वर सांगितल्याप्रमाणे प्रार्थना म्हणाल, तेव्हां ती प्रार्थना एका व्यक्तीसाठी नसून, विश्वातील सर्व मानवांच्या कल्याणार्थ आपल्या वाणी माध्यमातून आपल्याला प्राप्त झालेला कृपाशिर्वाद



आपण प्रवाहित कराल.

यदाकदाचित् कुणाला ह्या प्रार्थनेतील उद्देश अनुभवायचा असेल, तर आपल्या जीवनात आपले इष्ट-मित्र, नातेवाईक, जे कुटुंबवत्सल आहेत त्याना प्राप्त जीवनात अडिअडचणी, दु:ख, तथा अशांतता ही भोगावी लागत आहे, अशांना काहीं एक निराकरण सूचित न करता, त्या कुटुंबियांच्या नांवाचा उच्चार करून, त्याना परमेश्वराने सुख, शांती, समाधान द्यावे म्हणून, ‘हे भगवंता नारायणा ...’ही प्रार्थना एक आठवडा किंवा पांच आठवडे म्हणावी व त्याचा लाभ अशा परिचित व्यक्तींना काय झाला याचे अनुमान हे अनुभव म्हणून अनुभवावे, म्हणजे मग आपण भक्तांना, कार्यारंभी जगद्‌गुरुं श्रीसाईनाथ महाराज यांनी सुचविलेली प्रार्थना किती विश्वव्यापक आहे, याची प्रचीति येईल. ह्या प्रार्थनेत कोणत्याही देवदेवतांचा, धर्माचा, ज्ञाती बांधवांचा उल्लेख नसल्याने, विश्वातील विश्वबंधुत्वभावाचा हा ठेवा, ज्याना गुरुकृपाशिर्वादाचा लाभ झाला आहे, अशांच्या सिध्द वाणीतून जर घरोघरी उच्चारला गेला, तर त्याचे पडसाद त्रिभुवनात उमटून, जगातील अखिल मानवाला त्याचा लाभ होणार, हे निश्चित आहे. ही प्रार्थना म्हणण्यासाठी पूजनअर्चनादि, व्रतवैकल्यादि नवससायासादि विधींची गरज नसून जगतातील दु:खी मानवी जीवनाबद्दल आदर व पूज्यता ही मनाच्या ठायी निर्माण करून, ही जी प्रार्थना गुरुकृपाशिर्वाद म्हणून आहे, अशा प्रार्थनेत जर आपण आपल्या मनाचा समावेश केलात, तर मनाच्या सामर्थ्याने ह्या त्रिभुवनातील दु:ख कसे निवारण होते, हे अनुभवास आल्याशिवाय रहाणार नाही.

आज आपण जे काहीं देवदेवतार्जन व धर्मपरत्वे काहीं धार्मिक विधी करीत असतां, यात एक व्यक्तिगत स्वार्थ यापेक्षा अधिक काहीं इतरांच्या कल्याणाचे कर्तव्य आपण करीत आहात असा अनुभव येत नाही. यापेक्षा प्रार्थनेमध्ये आपला, कुटुंबियांचा व जगतातील इतर दु:खी लोकांचाही समावेश आपण करण्याने, जेव्हां प्रार्थनाद्वारे आपण प्राप्त कृपाशिर्वाद इतरासाठी खर्च करतो, तेव्हां त्याबद्दल सद्‌गुरुंना धन्यता वाटून, ते आपल्यावर कृपाशिर्वादाचा अधिकच वर्षाव करतात. हीं आपल्या न कळत आपणास प्राप्त होणारी कृपाशिर्वादाची ठेव आहे. या उलट आपण अनेक काळपर्यंत जपतप साधनादि मार्गाचा अवलंब करूनही कृपावंत होत नाही, तेव्हां त्या मार्गाचा अवलंब करू नये, अशी आपणास विनम्र विनंती आहे. आपण भक्तांच्या कल्याणार्थ व भवितव्यासाठी यापुढे काहीं नवीन साधने किंवा सिध्दसाधना आपल्याला आता सूचित करण्याची गरज उरली नाही. मानवी जन्माचे सार्थक होण्यासाठी जी आवश्यक साधने अस्तित्वात आणावयास पाहिजे होती, ती सर्व साधने श्रीसद्‌गुरुंनी सिध्द करून आपल्या हाती दिली आहेत. त्यांचा योग्य विचारांने व योग्य कारणास्तव आपण उपयोग करावा, एवढेच कर्तव्य भवितव्यात आपल्यासाठी शिल्लक राहिले आहे. ही कर्तव्यपूर्तता आपण भक्तांनी मनोभावनेने करण्यानेच, **'श्रीसद्‌गुरु साईनाथ महाराज की जय'**, असे जे म्हणता, हे म्हणण्याचा खरा अर्थ म्हणजे, ह्या अलौकिक अवतारी पुरुषांचे जे कार्य, त्या कार्याचा लाभ ज्या भक्तांना झाला, त्यांच्या वाणीतून ह्या अवतार कार्याचा जयजयकार जगाच्या अंतापर्यंत होत रहावा, अशी श्री जगद्‌गुरु साईनाथ महाराज यांचे चरणी



प्रार्थना.

# ॐ कार साधना

जगतात बऱ्याच व्यक्ती देवदैविक उपासना किंवा गुरुपरंपरेच्या मार्गाचा अवलंब वर्षानुवर्षे करीत असतात. पण अशा ह्या मार्गात आपणास जे काहीं निश्चितपणे प्राप्त करून घ्यावयाचे आहे, तत्संबंधीची जाणीवपूर्वक ओळख ही साधकाला मार्गदर्शनाच्या अभावी न झाल्याने, ह्या मार्गात वर्षानुवर्षे जीवनातील बहुमोल काळ व्यतीत करूनसुध्दा आपणास काय अवस्था प्राप्त झाली, याची जाणीव व्यक्तिश: होत नाही व त्याचा लाभ इतरांना व्हावा असा सूज्ञ विचार जरी आला, तरी ह्या केल्या गेलेल्या साधनांची अनुभूती ही शब्दांनी सांगता येत नाही किंवा प्रत्यक्ष कृतीने दाखविता येत नाही. याचे कारण साधकाला साधनमाध्यमातून जे काहीं प्राप्त करावयाचे असते, ती प्राप्त अवस्था ज्या काया-वाचा-मन माध्यमाद्वारा करावयाची असते, अशा या माध्यमांचा प्राथमिक अवस्थेत यथोचित विकास होणे अत्यावश्यक आहे. ही काया-वाचा-मनाची विकसित अवस्था जेव्हां साधक आपल्या नित्य साधनेने प्राप्त करून घेतो, तेव्हां त्या साधकाला क्रमश: साधक-सिध्द-साध्य अशा अवस्था प्राप्त करून घेण्याचे कर्तव्य करावयाचे असते.

प्राप्त झालेल्या जीवनात कर्मकारणपरत्वे निर्माण झालेल्या अडिअडचणी निवारणार्थ आपण भक्त काहीं ना काहीं प्रकारे

देवदेवतार्जन करून किंवा गुरुमार्गदर्शनचा अवलंब करून, प्राप्त जीवनातील अडिअडचणांचे निवारण करण्याचा प्रयत्न करीत असताना, काहीं साधनसेवेचा अवलंब करतो. अशा या साधनसेवा जरी अडिअडचणी निवारणार्थ आपण करीत असलो. तरी ह्या साधनमार्गाने अडिअडचणीचे निवारण करण्यापूर्वी आपले हे काया-वाचा-मन ज्या दोषांच्या हितसंबंधात व ऋणानुबंधात हितसंबंधित झाले आहे, अशा दोषांचे विमोचन झाल्याशिवाय अंगिकरालेल्या साधनसेवेत काया-वाचा-मनाने आपणास एकरूप होता येत नाही. त्यामुळे अंगिकारलेले साधन व त्याची अनुभूती आपणास येत नाही. पण गुरुकृपेने जेव्हां ह्या दोषांचे व ऋणानुबंधांचे काया-वाचा-मनाशी असणारे हितसंबंध विमोचित म्हणजे अनुकूल होतात, त्यावेळी नित्याच्या सेवेत स्वाभाविकच काया-वाचा-मनाचे एकरूपत्व होण्याच्या क्रियेला आरंभ होतो. म्हणजेच काया-वाचा-मन हे करीत असलेल्या साधनेला धारण करते होते. ही अवस्था ज्या गुरुकृपाशिर्वादाच्या माध्यमाने प्राप्त होते. त्या अवस्थेस पारमार्थिक अवस्थेतील **साधक** अवस्था असे म्हणतात. केवळ मार्गदर्शनाप्रमाणे जपाची संख्या वाढविणे व साधनेच्या निमित्ताने देवापुढे दोन तास बसणे, म्हणजे साधन प्राप्त झाले असे नव्हे.

अशा साधक अवस्थेचा प्रारंभ होण्याची क्रिया प्राप्त होण्यापूर्वी, गुरुमार्गदर्शनाप्रमाणे जे दीक्षांत विधी व विमोचनादि विधी होणे अत्यावश्यक असते याबद्दलची जाणीव जरी गुरुमार्गदर्शनाप्रमाणे अडिअडचणीत असलेल्या भक्तभाविकास झाली तरी मानवी रुपामध्ये परमेश्वराचे अस्तित्व मानण्याबद्दलची श्रध्दा ही विकसित न होण्याने, जीवनारंभी जे विधी अत्यावश्यक



असतात, अशांकडे दुर्लक्ष करून आपण भक्त अज्ञानाने रूढीपरंपरेच्या देवदेवतार्जनाच्या मार्गाचा अवलंब करून, प्राप्त झालेल्या बहुमोल जीवनाचा अपव्यय करतो. यामुळे जरी श्रीसद्‌गुरुंनी कृपावंत होऊन जीवनाबद्दलचे अभयदान दिलेले असते, तरी त्या कृपाशिर्वादाला धारण करण्याचे योग्य असे साधन ह्या काया-वाचा-मनाला प्राप्त होत नाही. यासाठी आपण अडिअडचणींचा अधिक विचार व विस्तार करण्यापेक्षा, प्राप्त जीवनात ज्या दोषपरत्वे अडिअडचणी निर्माण झाल्या आहेत, त्या दोषांचे गुरुकृपाशिर्वादाने विमोचन करण्यासाठी सूचित केलेले जे साधन आहे, त्या साधनांशी काया-वाचा-मनाने अधिकाधिक कसे एकरूप होता येईल, याबद्दलची अहर्निश ओढ आपल्याला लागली पाहिजे.

गुरुमार्गदर्शनाप्रमाणे विमोचनादि विधी झाल्यावर आपण भक्तांस साधक अवस्था प्राप्त होते. अशा ह्या साधक अवस्थेची प्राप्ती होण्यासाठी, ज्या काया-वाचा-मनाचे हितसंबंध दोषापासून व ऋणानुबंधापासून विमोचित झाले आहेत, असे हे काया-वाचा-मन, जेव्हां गुरुमार्गदर्शनाच्या साधनेशी एकरूप होते व त्यासाठी जे नित्याचे साधन सूचित केलेले असते, असे साधन दीर्घकाळपर्यंत जरी साधक अवस्थेत करावे लागले, तरी पुढची अवस्था म्हणजे सिध्द अवस्था ही प्राप्त होण्यासाठी अन्य काहीं साधना करण्याचा प्रयत्न आपण स्वत:च्या विचाराने आचरणात आणू नये. कारण गुरुकृपेने साधक अवस्थेचा लाभ आपण भक्तांस नकळत झाला आहे, ही गोष्ट जरी खरी तरी प्राप्त झालेली साधक अवस्था याबद्दलची जाणीव तुम्हा भक्तांना काया-वाचा-मनाने झाली आहे म्हटल्यावर, त्याच अवस्थेत परिपूर्णत:

विकसित होण्याचे जे कर्तव्य आपण भक्तांवर आहे, त्याकडे दुर्लक्ष करून जर आपण भक्तांनी दुसऱ्या अन्य प्रकारच्या साधनसेवेचा अवलंब व्यक्तिशः काहीं विषयपरत्वे करण्याचे अंगिकारलेत, तर साधक अवस्थेनंतरची सिध्द अवस्था प्राप्त होण्यास कदाचित् हा जन्महीं पुरा पडणार नाही.

साधनेतून जेव्हां आपणास साधक अवस्थेचा लाभ करून घ्यावयाचा असतो, अशावेळी साधकाने प्रथमतः महत्वाची जबाबदारी अशी विचारात घ्यावयास पाहिजे की, जे साधन आपण अंगिकारले, त्या साधनात अपले काया-वाचा-मन परिपूर्णत्वाने सामावण्यास जो विलंब लागेल, त्याचा आस्थापूर्वक विचार करून, जे साधन अंगिकारले आहे त्या साधनेतून ऐहिक जीवनार्थ आपणास काय काय प्राप्त करावयाचे आहे, याबद्दलचे विषयपरत्वे विचार हे बाजूस ठेवले पाहिजेत. त्याचप्रमाणे करीत असलेल्या साधनेतून अजून काहीं अनुभूती म्हणजे मनःशांती मिळत नाही, म्हणून काहीं काळपर्यंत केलेले साधन सोडून देऊन, नव्या साधनाचा अंगिकार करू नये. कारण साधनेतून जे साध्य करावयाचे आहे, ती मनःशांती तुम्हा भक्तांचे काया-वाचा-मन हे जोपर्यंत विषयरूप आहे, तोपर्यंत अनुभवास येणार नाही. यासाठी साधक अवस्थेची प्राप्ती ही देवदैविक किंवा गुरुमार्गात फार महत्वाची व जबाबदारीची आहे. अशा अवस्थेत अन्य विषयपरत्वे जरी हे जीवन भिन्नाभिन्न इच्छाअपेक्षा साकार होण्याच्या मार्गाचा विचार करीत असले, तरी अंगिकारलेल्या साधनेला काया-वाचा-मनाने एकरूप करून, जर आपण योग्य आकार दिला, तर अंगिकारलेल्या साधनेतून मनःशांती प्राप्त करण्याचे उद्दिष्ट साकार होईल.



याचा अधिक स्पष्ट अर्थ असा की, आपण भक्तांच्या प्राप्त जीवनात इतरांना ज्या प्रकारचे सुखसमाधान प्राप्त झाले आहे, तशा प्रकारच्या सुखाबद्दल इच्छाअपेक्षा असू नयेत असा अर्थ नाही, पण ज्या इच्छाअपेक्षा आपण भक्तांना जीवनात साकार व्हाव्यात अशी इच्छा आहे, त्या इच्छाबद्दलची अपेक्षा आज आपण अज्ञानाने साधनमार्गामध्ये करीत असतो. कारण इतरांना प्राप्त झालेले सुख आपल्या पाहण्यात किंवा अनुभवास येत असल्याने, तशा प्रकारच्या सुखाची अपेक्षा आपल्या अनुभवास आलेल्या इतरांच्या सुखाकडे पाहून आपण करतो. पण अशा अवस्थेत आपण गुरुभक्त सूचित केलेल्या साधनसेवेशी जर एकनिष्ठ राहू तर अशावेळी आपल्या न कळत आपणास जो लाभ होतो, त्याचा आस्थेने विचार करावयास पाहिजे.

आपण दैनंदिन जीवन व्यतीत करीत असतांना, आपल्या ह्या काया-वाचा-मनाने जो आचारविचार विषयपरत्वे, कारणपरत्वे व कार्यपरत्वे करतो, ही क्रिया आपल्या न कळत ह्या देहिक माध्यमातून होत असते व अशावेळी ह्या क्रिया होण्यास आपल्या जीवनातील बहुमोल असे कर्म खर्ची पडत असते. विमोचनादि विधी झाल्यावर आपल्या ज्या कर्मपरत्वे आपणास जीवन व्यतीत करावयाचे आहे, ते कर्म अनाठायी खर्च होता कामा नये. याचे प्रधान कारण म्हणजे साधक अवस्थेत साधनेपरत्वे तुमचे काया-वाचा-मन जे कर्मातील व ऋणानुबंधातील दोषांमुळे दोषास्पद होते, ते दोषांपासून मुक्त झाल्याने आज आपणास साधक अवस्था प्राप्त झाली. त्याचप्रमाणे जे प्राप्त जीवनातील कर्म तेही अनुकूल झाले. आता अनुकूल झालेले कर्म हे पुढील सिध्द व साध्य अवस्थेसाठी अत्यावश्यक

असल्याने, हे जे कर्म व काया-वाचा-मन साधक अवस्थेत गुरुकृपाशिर्वादाने प्राप्त जीवनाची सार्थकता करण्यासाठी पोषक झाले आहे, त्या काया-वाचा-मनाला व कर्माला पुढील अवस्थेचा लाभ करून देण्याचे कर्तव्य करावयचे आहे म्हटल्यावर, आपण भक्तांच्या जीवन परिसरात असणाऱ्या सुखाबद्दलच्या अपेक्षा ह्यांची पूर्तता होण्यासाठी, जर आपण भक्त करीत असलेली साधना व जीवनाला पोषक असणारे कर्म, हे सुख प्राप्तीसाठी खर्च कराल, तर साधक अवस्थेनंतरच्या सिध्द व साध्य या अवस्था प्राप्त होण्यासाठी सिध्दता, प्राप्त झालेली कारणदीक्षा व आपले देहिक माध्यम या दोन्हीत असूनही आपण भक्त ते प्राप्त करू शकणार नाही.

आपण भक्त जीवनातील अडिअडचणीपरत्वे सुखशांतीच्या शोधात ह्या गुरुमार्गाचा अवलंब करते झालात. तत्पूर्वी आपल्या प्राप्त जीवनातील कर्मपरत्वे असणारे दोष, जीवनात दु:ख तथा अशांतता निर्माण करीत होते. असे दोष निवारण होऊन, प्राप्त जीवनातील प्राप्त कर्तव्यार्थ असणारे कर्म जरी दोषरहित झाले, तरी पूर्वीच्या अनेक जन्मपरत्वे आपल्या प्रत्येक जीवनात जे भिन्नाभिन्न विषय, आचारविचारात आले व गेले, अशा विचारआचारपरत्वे असणारे विषय आज अंशरूपाने प्राप्त जीवनातील कर्मात अस्तित्वात असतात. अशा विषयपरत्वे आपल्या न कळत जर आपण साधक अवस्था प्राप्त झाल्यावर इतरांच्या सुखाबद्दल याचक असू व करीत असलेल्या नित्याच्या साधनेचा हितसंबंध, ह्या अंशमात्र विचारांशी जर आला, तर हे अंशमात्र विचार साधनेपरत्वे प्रखर होण्याची जी शक्यता आहे, ती टाळणे साधक अवस्थेतील भक्तांचे आद्य कर्तव्य आहे.



अशासाठी सुलभ, सोपा व हितकारक असा मार्ग, म्हणजे इतरांच्या सुखा-शांती-समाधानाबद्दल इच्छाअपेक्षा विचारात न घेता, मी करीत असलेल्या साधनेची उतराई झाली की, मला गुरुकृपेने न कळत अपेक्षित सुख प्राप्त होईल, हा आत्मविश्वास आपल्या ठिकाणी असावयास पाहिजे.

असा गुरुमार्गदर्शनाबद्दलचा अढळ विश्वास आपल्या ठिकाणी निर्माण करण्याचे प्रधान कर्तव्य एव्हढ्यासाठी विचारात घ्यावयाचे की, जी सिध्द अवस्था म्हणून आपण म्हणतो, अशा अवस्थेत आपण भक्तांनी आपल्या जीवनातील कर्म अन्य विषायाधीन न करता, जीवनात ज्या अपेक्षित सुख-शांती-समाधानाचा अभाव आहे, अशांची पूर्तता करण्यासाठी करीत असलेली साधना व गुरुकृपेने अनुकूल झालेले कर्म हे खर्ची पडता कामा नये. कारण जे कर्म आपणास आज अनुकूल झालेले आहे ते कर्म अंतापर्यंत व पुढील जन्मांची तरतूद करण्यासाठी विचारात घ्यावयाचे असे म्हटल्यवर, ह्या प्राप्त जीवनातील कर्माला जर आपण भक्त ‘गुरुकृपा’ हा प्रधान विषय निर्माण करून देते झालात, तर प्राप्त जीवनात प्राप्त झालेली सुखसंपत्ती याचा लाभही सुख-शांता-समाधानाने घ्याल. एव्हढेच नव्हे, तर जीवनात अकस्मात आलेल्या संकटातून जेव्हां संकटमुक्त होण्याची वेळ येईल, अशावेळी अशा गुरुरूप केलेल्या कर्माचा लाभ होऊन, आपण भक्त ते संकट निभावून नेऊ शकू. त्याचप्रमाणे जे कर्म आपल्या प्राप्त जीवनात गुरुरूप होईल, ते कर्म पुढील जन्मांत जीवनारंभापासूनच गुरुमार्गात सहभागी होण्याची क्रिया भवितव्यात प्राप्त होणाऱ्या काया-वाचा-मनाला सहजलीलया प्राप्त करून देईल. अशा त-हेने प्राप्त होणारी ही

गुरुकृपा जरी प्राप्त झालेल्या जन्माला सार्थक करण्याचे कारण प्राप्त करून देती झाली, तरी जे कर्म गुरुकृपाविषयरूप झाले आहे, असे कर्म, सिध्द अवस्थेत आपण इतरांच्या कल्याणार्थ गुरुकृपाशिर्वाद म्हणून उपयोगात आणण्याचा परोपकार ह्याच जन्मात ‘साधनसेवा काहींच नसता’ करू शकता.

पूर्वी तुमच्या घराण्याच्या अनादि रूढीपरंपरा अनुकरणपध्दतीने करून, त्या विधीस तुम्ही ज्ञान अज्ञानाने कुलधर्म-कुलाचार म्हणून म्हणत होतात. त्याशिवाय तुमच्या ज्ञान अज्ञानाने उपासतपास, जपजाप्य, व्रतवैकल्ये आदि मार्गाचाही अवलंब करीत होतात, पण तुम्हा भक्तांना कारणदीक्षेचा लाभ करून दिल्यानंतर, त्या दीक्षापरत्वे तुम्हा भक्तांना नित्याची साधनसेवा म्हणून जी सेवा सूचित केली आहे, अशा सेवेचा लाभ तुम्ही घ्यावयास पाहिजे, असे आग्रहाने सूचित करण्यामागील महत्वाचे कारणही भक्तांनी सूज्ञपणाने विचारात घ्यावयास पाहिजे. ह्या साधक अवस्थेची निश्चितता ज्यावेळी आपल्याला अनुभवास येईल, त्याक्षणी तुम्ही अंगिकारलेले साधन हे सिध्द होण्याच्या अवस्थेला आरंभ करील.

आपण भक्तांस प्राप्त जीवनात ज्या देवादिकांचा व गुरुकृपाशिर्वादाचा लाभ होण्याने सुख-शांती-समाधान प्राप्त करावयाचे आहे, अशी अवस्था कृपाशिर्वादपरत्वे प्राप्त होण्यास तुम्ही भक्तभाविक असमर्थ होतात. याचे कारण तुम्हा भक्तांच्या हितार्थ गुरुकृपाशिर्वादाचा लाभ जो दीक्षांतविधीपरत्वे होत असतो, त्या दीक्षा घेण्याचे कर्तव्य विचारात योग्य प्रकारे न घेतल्याने, प्राप्त जीवनात ज्या कृपाशिर्वादाची अत्यावश्यकता



आहे. अशा कृपाशिर्वादाची प्राप्ती करण्यासाठी तुम्हा भक्तांना नानाविध प्रकारच्या विधीमार्गाचा अवलंब करावा लागत असे. असे देवदेवताप्रीत्यर्थ करावे लागणारे विधी याबद्दलची शास्त्रशुध्द ओळख तुम्हा भक्तांना नसल्याने हे विधी त्या इष्ट देवदेवतांच्या भक्ताकरवी किंवा पूजकाकरवी करून घ्यावे लागत होते, असे विधी करण्याबद्दल तुमच्या ठायी जरी त्या इष्टदेवतेबद्दल नितांत आदर आहे व होता, तरी जे धर्मकृत्य तुम्हां भक्तांना ज्या माध्यमाकरवी करावे लागत होते, त्या मध्यस्थांच्या ठिकाणी तुमच्या विधीची शास्त्रशुध्द सांगता करण्याची पूज्यता व आदर नसल्याने, तुम्ही करीत असलेला विधी जो कुटुंबकल्याणार्थ करीत होतात, अशा विधीचा योग्य तो प्रतिसाद तुम्हाला न मिळाल्याने, तीच तीच धर्मकृत्य तुम्ही भक्त वर्षानुवर्षे केवळ एक अनुकरण म्हणून करण्याची प्रथा कुटुंबात निर्माण करते झालात.

तुम्हा भक्तांच्या भवितव्याचा जर विचार केला तर हे अंगिकारलेले अनुकरणपध्दतीचे विधी, तुम्हा कुटुंबियांच्या कल्याणार्थ तुमच्या भावी पिढ्यांच्या ज्ञानअज्ञानाने त्यांच्या हातून योग्य प्रकारे घडतील, याबद्दलची शक्यता फारच थोडी आहे. त्यामुळे श्रीसद्‌गुरुनांच तुमच्या भावी पिढ्यांच्या कल्याणाची जबाबदारी जाणविल्याने, ह्या विधीकृत्यातून तुम्हा कुटुंबियांना मुक्त करून, तुम्हा कुटुंबियांच्या कल्याणार्थ ज्या कृपाशिर्वादाची नितांत गरज आहे, तो कृपाशिर्वाद प्राप्त करण्याचे सामर्थ्य व साधन म्हणजे कारणदीक्षा, हिचा तुम्हाला लाभ करून देऊन, आज तुम्हास जी साधक, सिध्द व साध्य ही अवस्था गुरुकृपाशिर्वादाने प्राप्त करावाची आहे, त्या साधक-सिध्द

अवस्थेपरत्वे तुम्हा भक्तभावकांना अन्य कोणत्याही प्रकारच्या धार्मिक विधीमाध्यमातून कृपाशिर्वादाची प्राप्ती करून घेण्याचे प्रयोजन या पुढील जीवनात शिल्लक राहिले नसून, आपण भक्तभाविकांना जी नित्याची साधना सूचित केली आहे, त्या साधनेत तुमच्या घराण्याच्या इष्टदेवदेवता व त्यांच्याप्रीत्यर्थ करावे लागणारे विधीपूर्वक औपचार यांचा यथायोग्य समावेश केला आहे.

अनेक भक्तभाविकांना वाचनादि मार्गाचा अवलंब करून किंवा अधिकारी व्यक्तीच्या सत्संगतीमध्ये जाऊन असे ऐकावयास मिळते की, प्राप्त जीवनाची सार्थकता करणे म्हणजे पारमार्थिक होणे किंबहुना परमार्थप्राप्ती करणे. या विषयपरत्वे अशा व्यक्ती प्राप्त जीवनातील प्रापंचिक कर्तव्ये करणे ह्या अवस्थेस क्षुल्लक मानून, आपण काहीं तरी वेगळ्या प्रकारच्या जीवनाचा लाभ करून घेतो आहोत अशा गूढ विचाराने, इतरांच्या आचार विचारांशी एकरूप न होता, आपल्याच आचार विचाराने ठरविलेल्या मार्गाचा अवलंब करून, ह्या मार्गपरत्वे इतरांच्या ठिकाणी व स्वतःच्या ठिकाणी अशांतता निर्माण करतात. वास्तविक जीवनाची सार्थकता करणे ही अवस्था स्पष्टपणे समजून न घेतल्याने, अंगिकारलेल्या साधनेत त्यांना जे साध्य व्हावयाचे असते ते साध्य होत नाही. प्राप्त जीवन हे प्रापंचिक कर्तव्याची पूर्तता व प्राप्त जीवनाची सार्थकता करण्यासाठी परमेश्वराने आपल्याला दिले आहे. पण ज्या प्रापंचिक कर्तव्याची जबाबदारी आपल्यावर आहे, ती कर्तव्ये यथासांग न होण्याचे कारण प्राप्त जीवनाची अविकसितता व अनेक दोषपरत्वे जीवनाशी हितसंबंध झालेले ऋणानुबंध होत.



पण जेव्हां गुरुकृपेने जीवनाची सार्थकता करावयाची आहे असे समजते, अशा वेळी आपण काहींतरी आगंतुक विषयाचा विचार करू लागतो. वास्तविक शास्त्रशुध्दपध्दतीप्रमाणे जीवनाची सार्थकता याचा अर्थ असा की, अंगिकारलेल्या साधनेने हे काया-वाचा-मन ईश्वरमय विचारांशी एकरूप करणे! अश्या अवस्थेत जे आपण भक्त साधनेपूर्वी 'कर्माधीन' असता, ती अवस्था बदलून आपण 'कर्म अधीन' या अवस्थेत येता. त्याशिवाय प्रापंचिक कर्तव्ये व पारमार्थिक अवस्थेचा लाभ होण्यास ज्या ऋणानुबंधातील दोषपरत्वे अडथळा होतो, ते दोष गुरुकृपेने विमोचित होतात. ह्या काया-वाचा-मनाच्या ठिकाणी भिन्नाभिन्न विषयपरत्वे कार्यान्वित होण्याची क्रिया ज्या शक्तिद्वारे होत असते, त्या म्हणजे देहिक शक्ति व आत्मिक शक्ति होत. पण अशा दोन भिन्नाभिन्न शक्तिंचे कार्यही जीवनात पोषक अशा विचारांशी एकरूपत्व प्राप्त करून देत नाही. अशा वेळी दीक्षांत विधी माध्यमातून तुमच्या काया-वाचा-मनाचे व देहिक-आत्मिक शक्तिंचे एकरूपत्व व्हावे म्हणून, जो दीक्षांत विधी करण्यात येतो तो म्हणजे प्रत्यक्ष गुरुशक्तिचा देहाशी एकरूप होण्याचा संबंध होय. अशा विषयाचा लाभ झाल्यावर, काया-वाचा-मन व देहिक-आत्मिक व गुरुशक्ति यांचे एकरूपत्व होऊन प्रापंचिक कर्तव्यार्थ जे जीवन प्राप्त झाले आहे, ती कर्तव्ये निर्विघ्नपणे पार पाडण्याचे सामर्थ्य देहिक माध्यमास गुरुकृपेने प्राप्त होते.

अशा अवस्थांचा लाभ करून देणे व प्राप्त झालेली अवस्था निरंतर स्वरूपामध्ये टिकविणे, ही अवस्था म्हणजे प्राप्त जीवनाची सार्थकता होय. पण अनेक भक्त हा विषय केवळ वरच्यावर व अनुमानपध्दतीने अभ्यासित असल्याने, प्रापंचिक

जीवनाकडे दुर्लक्ष करून जीवनाचे सार्थक करावयाचे आहे, असे समजतात. त्यामुळे सद्‌गुरुंनी आपणास जी अवस्था प्राप्त करून दिली आहे, तिचा दुरुपयोग होऊन, इतरांपेक्षा काहीं वेगळ्या प्रकारची कार्य योजना विचारात घेऊन, अशा व्यक्ती स्वत:च्या विचाराने ठरविलेले कार्य आपल्या हातून होत नाही, म्हणून दु:खी असतात किंवा तळमळतात. पण प्राप्त जीवन ज्या सद्‌गुरुकृपाशिर्वादाने विकसित झाले आहे, त्या अवस्थेप्रमाणे आपली प्रापंचिक कर्तव्ये नि:स्वार्थ, निरपेक्ष बुध्दिने करून ज्या जीवनाची सार्थकता गुरुकृपाशिर्वादाने झाली आहे, असे जीवन पुढच्या जन्मासाठी आपल्या बरोबर घेऊन जाणे, ह्या अवस्थेचा लाभ होणे म्हणजेच जीवनाची सार्थकता होय!

अशा अवस्थेचा लाभ ह्या जन्मात गुरुकृपाशिर्वादाने साधकाला घ्यावयाचा असतो. असा लाभ ज्या देहिक माध्यमाने साधकाला अनुभवावयाचा आहे, त्याने साधन हे जरी गुरुकृपाशिर्वादाने सिध्द आहे, तरी ते साध्य करण्यासाठी प्राप्त जीवनातील काया-वाचा-मनाचा प्रथमत: विचार करणे अत्यावश्यक आहे. यासाठी साधनारंभी साधनेला पोषक अशा साधनांचा जो सुविचार मार्गदर्शन म्हणून सांगितला आहे, त्याचा आस्थेने विचार करावयास पाहिजे.

जीवनाच्या सार्थकतेबद्दल इतके स्पष्ट विवेचन जरी आपण भक्तांना करण्यात आले आहे, तरी प्रापंचिक कर्तव्ये नि:स्वार्थ व निरपेक्ष बुध्दिने करावीत असे जे सुचविले आहे, याचा अर्थ बहुतांशी भक्तांना न समजल्याने, प्रापंचिक कर्तव्ये याचा अर्थ असा लावण्यात येतो की, आपण ज्या कुटुंबात जन्माला आलो



आहोत व त्या कुटुंबाशी आपली जी नाती हितसंबंधपरत्वे आहेत, त्यांच्यासाठी जे काहीं कर्तव्य करावयाचे असते त्यास आपण ‘प्रापंचिक कर्तव्ये’ असे संबोधितो. पण ही इतरांसाठी आपल्या हातून होत असलेली कर्तव्ये व्यवहारपरत्वे असल्याने, त्या कर्तव्यास ‘व्यावहारिक कर्तव्य’ असे म्हणावे लागेल प्राप्त जीवनात जी नित्याची व्यावहारिक कर्तव्ये ह्या काया-वाचा-मनाच्या माध्यमाद्वारा आपण करतो, अशी ही काया-वाचा-मनाची जी देहिक अवस्था आहे, या देहिक अवस्थेचे कार्य ज्या देहपरत्वे ज्ञानेंद्रिये, कर्मेंद्रिये, बुध्दी, मन अशा यंत्रणेने होते, ही जी यंत्रणा आपल्या न कळत कार्य करीत असते, त्या यंत्रणेस ‘प्रापंचिक अवस्था’ असे म्हटले आहे. अशी ही अवस्था गुरुकृपाशिर्वादाने विकसित झाली आहे म्हटल्यावर, ती विकसित अवस्था कालकालांतरापर्यंत जतन करण्याच्या कर्तव्याची जबाबदारी आपल्यावर असल्याने ह्या माध्यमाचा वापर जेव्हां आपणास व्यावहारिक जीवनपरत्वे करावयाचा आहे, तेव्हां प्राप्त झालेली विकसित अवस्था जतन करण्यासाठी, आपण भक्तांनी जास्तीतजास्त नि:स्वार्थ, निरपेक्ष विचार आपल्या ठिकाणी निर्माण करण्याचा प्रयत्न करावयास पाहिजे. तरच विकसित झालेली अवस्था ही स्वार्थाच्या पोटी अन्य विषयाधीन न होता, कर्तव्यपूर्ततेच्याच विषयाइतकी कार्यक्षमता ह्या देह माध्यमातून होत राहील.

ज्या देहिक अवस्थेतून साधना करावयाची असते, त्या देहिक अवस्थेत अंगिकारलेले साधन सिध्द होण्यास क्रमश: पाच स्थानातून जावे लागते. ती पाच स्थाने म्हणजे नाभी, हृदय, कंठ, ललाट व ब्रह्म अशी होत. प्राप्त जीवनात ही स्थाने पूर्वीच्या

अनेक जन्मपरत्वे अनेक विषयांशी हितसंबंधीत आहेत व प्राप्त जीवनात जे अनेक विषय आपल्या इच्छाअपेक्षा म्हणून आपल्या जीवन परिसरात वास करीत आहेत, असे विषय त्या पांच स्थानातून कार्यान्वित होत असतात. असे हे विषय कार्यार्थ जरी पाच स्थानांचा अवलंब करून कार्य करीत असले, तरी त्या विषयास योग्य प्रकारे कार्यान्वित करण्याचे सामर्थ्य देहिक अवस्थेत प्राप्त होत नसते. यासाठी जेव्हां आपण गुरुकृपाशिर्वादाची अपेक्षा करतो किंवा तो प्राप्त करण्याचे साधन अंगिकारतो, अशावेळी ज्या पं ाच स्थानात हे विषय धारण झाले आहेत, त्या विषयांना कार्यन्वित होण्याची क्रिया सुलभपणे ह्या साधनशक्तिने प्राप्त होते. म्हणूनच आपण प्रापंचिक कर्तव्ये जेव्हां निर्विघ्नपणे पार पाडतो, तेव्हां "मला कृपाशिर्वाद लाभला आहे, म्हणून हे कार्य झाले", असे म्हणतो. पण अशावेळी जो गुरुकृपाशिर्वाद आपण आपल्या जीवनाच्या सार्थकतेसाठी प्राप्त करतो, तो गुरुकृपाशिर्वाद विषयांची पूर्तता होण्याची क्रिया प्राप्त होण्यास जर खर्ची घातला तर प्राप्त जीवनाचे सार्थक म्हणजे पूर्णतः विकसित होणे, ही क्रिया होत नाही व आपल्या इच्छेप्रमाणे जरी सुख, समाधान प्राप्त झाले तरी त्या प्राप्त सुखात आपल्याला सुख-शांती मिळविता येत नाही. कारण अशा वेळी जरी देहपरिसरातील विषयांची पूर्तता झालेली असते, तरी देहिक अवस्थेची अविकसितता राहिल्याने सुखसंपन्न होऊनही आपण सुख-शांती-समाधानात नसतो.

कारणदीक्षेच्या हितसंबंधात, दीक्षेला पोषक असे मार्गदर्शन आपण भक्तांच्या वाचनात आलेच आहे. आता ह्या दीक्षेला जतन करण्यासाठी व पोषक असे कार्य प्राप्त



होण्यासाठी, कोणत्याही अन्य साधनासेवेचा विचार, आचारविचारात न घेता, आपण भक्तांना गुरु आज्ञेप्रमाणे नित्याने ॐकार साधना व श्रीसद्‌गुरुनामस्मरण तेही संथापध्दतीने नियमित करावयाचे आहे. ही आपणास सूचित केलेली ॐकार साधना आपल्या देहिक माध्यमातून आपण करीत असताना या साधनेचा लाभ आपण घेण्यापूर्वी या ॐकार साधनेची ओळख व त्या देहिक माध्यमाची ॐकार साधनपरत्वे होणारी कार्यक्रिया ही शास्त्रशुध्दपध्दतीने आपण भक्तांना समजणे आवश्यक आहे. आपल्या नित्याच्या वाणीद्वारा आपण जेव्हां एखादा शब्द, नामस्मरण किंवा एखादे गाणे याचा उच्चार करतो, तेव्हां त्या वाणीतून ध्वनीत झालेला शब्द हा उदात्त, अनुदात्त व स्वरित अशा अवस्थेतून ध्वनित होत असतो. ही अवस्था सूर, ताल व लय आदिनी जेव्हां सुसंबध्द असते, त्या अवस्थेलाच संथा असे म्हणतात. ही ॐकाराची संथा देहाच्या पांच माध्यमाद्वारा ध्वनीरूपाने व्यक्त करावयाची आहे. अशा वेळी स्वाभाविक स्थितीमध्ये आपली जी श्वसनक्रिया देहद्वारा होत असते, त्या श्वसनक्रियेला ॐकारपरत्वे प्राणायाम करण्याची स्वाभाविक संथा प्राप्त करून दिली असता, म्हणजेच या श्वासउच्छ्‌वास क्रिया माध्यमातून ॐकार साधना केली असता, देहिक अवस्था ही ॐकारमय कशी होते, याबद्दलचे वैद्यकीय दृष्ट्या शास्त्रीय विवेचन खाली दिले आहे. त्याचा अभ्यास साधकाने साधनेपूर्वी लक्षात घ्यावयास पाहिजे.

ॐकार साधना ही एक श्रेष्ठ प्रकारची साधना असून, ती साधना करीत असताना रक्ताभिसरण व श्वसन क्रिया ह्या शरीराच्या दोन्ही घडामोडी समजणे अत्यावश्यक आहे. कारण

गुरूकृपाशिर्वादाची धारणा आपल्या शरीरात कशा प्रकारे होत असते, याचे ज्ञान वरील दोन क्रिया अभ्यासल्या असता आपणास सहजगत्या होते. नाथपंथाच्या परंपरेप्रमाणे आपण करीत असलेली साधनसेवा ही जीवनात संचित करावयाची नसून, ती आपल्या नित्याच्या आचरणाने पुढील जन्मांची व पुढील पिढ्यांची तरतूद करण्यासाठी 'सेवन' करावयाची आहे. अशा साधनसेवेच्या क्रियेचे कार्य रक्ताभिसरण व श्वसन क्रिया या माध्यमातून प्राप्त करावयाचे असते.

नाथपरंपरेप्रमाणे, गुरुकृपाशिर्वाद हा रक्तात धारण होतो व हा गुरुकृपाशिर्वाद निरंतर टिकविण्यासाठी नाममात्र साधन हे गुरुकडून सूचित केले जाते. ॐकार साधना व संथापध्दतीने गुरुनामस्मरण हे कारणदीक्षेनंतर दिलेल्या साधनापैकी होय. हे साधन संथापध्दतीने म्हणत असताना ज्या ज्या क्षणी तेजाची धारणा रक्तामध्ये होत असते, त्या त्या क्षणी रक्तातील दोष बाहेर फेकले जाऊन, रक्तपेशींना शुध्दत्व प्राप्त होत असते. ज्याप्रमाणे रक्तातील दोषांचे वीर्यात किंवा स्त्रीबीजात रूपांतर होऊन ते दोष संततीमध्ये प्रवाहित होत असतात, त्याच प्रमाणे ॐकार साधनेने रक्तात धारण झालेला गुरुकृपाशिर्वादसुध्दा वीर्यामधून किंवा स्त्रीबीजातून संततीकडे प्रवाहित होतो. अशाप्रकारे प्राप्त झालेल्या कृपाशिर्वादाची टक्केवारी आपल्याकडे जरी पंचविस टक्के असली तरी आपल्या संततीकडे पन्नास टक्के व त्या पुढील पिढ्यात शंभर टक्के धारण होईल. तत्पूर्वी याबद्दलची शास्त्रीय माहिती असणे उपयुक्त होईल.

रक्ताभिसरणाचे मुख्य कार्य म्हणजे सबंध शरीराला रक्त



पुरवठा करणे व शरीरातील इंद्रियामध्ये तयार होणारी दूषित द्रव्ये व वायु (कर्ब वायु किंवा Carbondioxide) याचे, उत्सर्जन करणे हे होय. या कार्यार्थ जी इंद्रिये काम करतात ती म्हणजे हृदय व रक्तवाहिन्या होत.

रक्त हे लाल रंगाचे जाडसर द्रव असून ते शरीरात चार ते पांच लिटर असते. रक्ताचें दोन मुख्य घटक आहेत –

१) द्रवरूपी पातळ पदार्थ, ज्याला रक्तद्रव (plasma) म्हणतात व

२) घनपदार्थ, ज्यात तांबड्या रक्तपेशी, पांढऱ्या रक्तपेशी व प्लेटीलेट्स यांचा समावेश होतो.

तांबड्या पेशीमध्ये हिमोग्लोबिन नावाचा एक पदार्थ असतो. या पदार्थाची विशेषता म्हणजे जो प्राणवायु किंवा ऑक्सिजनशी लगेच संयुक्त होतो व जेथे प्राणवायु कमी असेल तेथे त्याचा पुरवठा करतो. पांढऱ्या पेशींचा गुणधर्म म्हणजे शरीराची प्रतिकारशक्ति होय. प्लेटीलेट्स या रक्तातील अतियश सूक्ष्म पेशी असून, त्यांची रक्त गोठविण्याच्या क्रियेला (Clotting time) मदत होते.

**हृदय** ही आपल्या इच्छेच्या आधीन नसलेल्या स्नायुंची पिशवी आहे. हे रक्ताने भरलेले असून, याच्या आकुंचनामुळे रक्त साऱ्या शरीरभर पसरविले जाते. त्यामुळे अभिसरण संस्थेतील हृदय हा एक मोठा पंप आहे. हृदय हे छातीच्या पोकळीत मधोमध असून, त्याच्या दोन्ही बाजुंना उजवे व डावे फुफ्फुस असते. हृदयाची पोकळी एका उभ्या पडद्यामुळे उजव्या

व डाव्या अशा दोन भागात विभाजित होते. त्यापैकी उजव्या भागात अशुध्द रक्त व डाव्या भागात शुध्द रक्त असते. हृदयाच्या पोकळीत उभ्या पडद्याप्रमाणे आडवाही पडदा असतो. त्यामुळे हृदयाच्या पोकळीचे चार कप्पे होतात. त्यापैकी वरील कप्प्यांना कर्णिका (Atrium) व खालील कप्प्यांना जवनिका (Ventricle) असे म्हणतात. याप्रमाणे हृदयाच्या पोकळीत वरच्या बाजूला उजवी व डावी कर्णिका व खालच्या बाजूला उजवी व डावी जवनिका मिळून एकंदर चार कप्पे असतात. उजवी कर्णिका व उजवी जवनिका त्याचप्रमाणे डावी कर्णिका व डावी जवनिका यामध्ये प्रत्येकी एक छिद्र व झडप असते. त्यामुळे उजव्या कर्णिकेतील रक्त उजव्या जवनिकेत व डाव्या कर्णिकेतील रक्त डाव्या जवनिकेतून कर्णिकेत जाऊ शकते. पण ते जवनिकेतून कर्णिकेत जाऊ शकत नाही.

**श्वसनसंस्था**:- नाक, घसा. श्वासनलिका, (Trachea) श्वासवाहिन्या (Bronchi) आणि फुफ्फुसे (Lungs) हे श्वसन संस्थेतील निरनिराळे अवयव होत. आपण श्वास आंत घेतो त्यावेळी प्राणवायुयुक्त हवा नाकावाटे श्वासनलिकेत जाते. या श्वासनलिकेचे दोन भाग होऊन यानांच श्वासवाहिन्या म्हणतात. यापैकी प्रत्येकी एक श्वासवाहिनी उजव्या व डाव्या फुफ्फुसात प्रवेश करते. प्रत्येक फुफ्फुसामध्ये श्वासवाहिन्याचे अनेक भाग होऊन, त्यांचे आणखी लहान लहान भाग होतात. अशा रितीने फांद्या फुटत फुटत शेवटी अतिसूक्ष्म फांद्यांच्या भोवती पातळ आवरणाचे वायुकोश (Alveoli) असतात. या वायुकोशाभोवती अतिसूक्ष्म अशा रक्तवाहिन्यांचे जाळे असून, त्यातून सतत रक्तप्रवाह चालू असतो.



**रक्ताभिसरण**:-प्रथमतः शरीरातील सर्व अशुध्द रक्त दोन महानीलांद्वारे (Veins) उजव्या कर्णिकेत (Right Atrium ) येते. ते उजव्या जवनिकेत (Right Ventricle) जाते. उजव्या जवनिकेतून ते एका रोहिणीद्वारे (Pulmonary Artery) फुफ्फुसात जाते. फुफ्फुसात ते वायुकोशाभोवतीच्या अतिसूक्ष्म रक्तवाहिन्यातून प्रवाहित होते. याच वेळी वायुकोशातील प्राणवायु वायुकोशाभोवतीच्या रक्तवाहिन्यातील रक्तात शोषला जातो व रक्तातील कर्बवायु (Carbon dioxide) वायुकोशात ओढला जाऊन, तो उच्छ्वासावाटे वातावरणात फेकला जातो. प्राणवायुनेयुक्त असे रक्त एका नीलेतून(Pulmonary vein)हृदयाच्या डाव्या कर्णिकेत (Left Atrium)येते. तेथून ते डाव्या जवनिकेत (Left Ventricle) जाते व तेथून महारोहिणीद्वारा(Aorta)सबंध शरीराला पुरविले जाते. रक्ताभिसरण होत असताना रक्तातील कोणतीही पेशी आपल्या स्थानावरून अभिसरण होऊन पूर्ववत् आपल्या स्थानी परत यावयास सर्वसाधारण तीन मिनिटे लागतात.

**संथा पध्दतीने नामस्मरण व गुरुशक्तीचा रक्तात आविष्कार :-**

ज्यावेळी संथापध्दतीने नामस्मरणाचा उच्चार होतो. त्यावेळी नैसर्गिक प्राणयाम होत असतो. नेहमी श्वासोच्छास हा मिनिटाला १८ त २० वेळा होत असतो. परंतु प्राणायामाने हे प्रमाण बरेच कमी होते. प्राणायामाच्या वेळी जेव्हां अतिशय मंदगतीने श्वास आत घेऊन तेव्हढ्याच मंदगतीने तो बाहेर सोडला जातो. त्यावेळी नाडीचे ठोके मंद गतीने पडतात. कारण

हृदयाचे स्पंदन मंदगतीने होते. ज्यावेळी नाडी मंद गतीने चालते, त्यावेळी रक्ताभिसरणाचा वेग (Velocity of Blood) मंदावतो '. ॐ श्रीसाईनाथाय नम:'हे नामस्मरण संथापध्दतीने होत असताना, निर्माण होणारा ध्वनि हा मध्यमापर्यंत नेऊन मंदस्वरात व मंदलयीत त्याचा लय केला व अशा सुसंबध्द पध्दतीने जर हे गुरुनामस्मरण म्हटले, तर एका नामस्मरणात तीन वेळा नैसर्गिक प्राणायाम होतो व ह्या ध्वनितून निर्माण झालेल्या लहरी आपल्या आसमंतात राहून पुनश्च आपण जेव्हां वरीलप्रमाणे प्राणायाम करतो, तेव्हां ह्या लहरी शरीरात धारण होऊन, त्याचा संबंध श्वासउच्छ्वास क्रियेशी येतो, तेव्हां ह्या लहरी प्रकाशमान होऊन शरीरधारणेचा मुख्य घटक, म्हणजे रक्त, याच्या रक्तपेशीशी एकरूप होतात व प्रथमावस्थेत जी देहिक अशुध्दता काया-वाचा-मनात पूर्वकर्मातील व ऋणानुबंधातील दोषपरत्वे धारण झालेली आहे, त्याची शुध्दता होऊन काया-वाचा-मन हे ॐकारमय होते. आपण जर हे नामस्मरण तीन मिनिटात पाच वेळा केले, म्हणजे जर प्रत्येक नामस्मरण छत्तीस सेकंदापर्यंत म्हटले, तर रक्तातील प्रत्येक पेशी प्रकाशमान होण्यासाठी, त्याचप्रमाणे पेशीतल्या अशुध्दतेचे उत्सर्जन होण्यासाठी जास्तीत जास्त वेळ दिला जातो व आपल्या देहिक व आत्मिक शक्तीला गुरुशक्तीचा कमाल पुरवठा होतो.

रक्तातील तांबड्या पेशीना कार्य करण्यासाठी जी शक्ति लागते ती सर्वसाधारणपणे अन्नरसातून पुरविली जाते. पण गुरुदीक्षेनंतर ॐकार साधनेतून जी गुरुशक्ति रक्तात धारण होते, त्या गुरुशक्तिच्या माध्यमातून तांबड्या पेशीना कार्य करण्यासाठी शक्तीचा (Energy) पुरवठा केला जातो. यामुळे



तांबड्या पेशींच्या कार्यासाठी साधकाची देहिक व आत्मिक शक्ति खर्ची पडत नाही. म्हणून ज्यावेळी सबंध शरीराला शक्ति पुरविण्याचे कार्य गुरुशक्ति करीत असते, त्यावेळी साधकाला शरीरधारणेसाठी अन्नाची जरूरी कमी प्रमाणात भासते. ॐकार साधनेत जसजशी प्रगति होत जाते, तस तसा साधकाचा आहार कमी होत जातो. अशा वेळी साधकाने अट्टाहासाने, सवयीने किंवा आग्रहास्तव प्रमाणाबाहेर खाऊ नये. असे केल्याने अमूल्य अशा गुरुशक्तिचा, साधकाकडून विनाकारण अपव्यय होतो.

पूर्वीच्या काळी आपल्या देवदेवताप्रीत्यर्थ उपवास करण्याची पध्दत विचारात घेतली होती. त्याचे कारण ज्या शास्त्रीयपध्दतीतून सांगितले आहे, याचा आपण कधीच आस्थेने विचार न करता, उपवास म्हणजे काही वेगळ्या पदार्थाचे सेवन आपल्या इच्छेनुरूप करणे, अशा प्रथा आपण विचारात घेतली. शास्त्रीयपध्दतीप्रमाणे सर्वसाधारणपणे आपण जो नित्याचा आहार घेऊन, त्या अन्नपाणी सेवनामुळे जी देहिक शक्ति नित्याने निर्माण करतो, त्यातील पन्नास टक्के शक्ति पुनश्च दुसऱ्या दिवशी जेव्हां अन्नसेवन करतो, अशावेळी खर्च होत असते. अशा ह्या नियमित अन्नसेवनाच्या कार्यात काहीं प्रसंगपरत्वे आपणास मिष्टान्न, जडान्न इत्यादी सेवन करावे लागले, तर ते सेवन केलेले अन्न पचन होण्यास केंव्हा केंव्हा पंच्याहत्तर टक्के इतकीही शक्ति खर्च होत असते. याशिवाय नित्याने आपणास नोकरीधंदा व्यवसाय आदी करावयाचा असतो, अशा वेळी राहिलेली पन्नास टक्के शक्तीही खर्च होते. म्हणजे अन्न पचनार्थ पन्नास टक्के शक्ति व नोकरी-व्यवसाय आदि करण्यासाठी राहिलेली पन्नास टक्के खर्ची पडल्यावर, प्राप्त

जीवनात तुम्हा भक्तांना ज्या कृपाशिर्वादाची गरज आहे, असा कृपाशिर्वाद प्राप्त होण्यासाठी जरी देवदेवता तुमच्यापुढे उभ्या असतात, तरी देहिक शक्तीचा अपव्यय झाल्याने, देवतांनी दिलेला कृपाशिर्वाद धारण करण्यासाठी देहिक शक्तीचे अस्तित्व देहात जाणवत नाही. म्हणून करीत असलेल्या साधनसेवेत काया-वाचा-मनाने एकरूप होता येत नाही. यासाठी पूर्वीच्या काळापासून उपवास करण्याचे जे शास्त्रीय कारण होते, ते असे की, निदान आठवड्यातून एकदा तरी उपवास एवढ्यासाठी करावयाचा की, निदान त्या दिवशी तरी अन्न पचनासाठी खर्च होणाऱ्या देहिक शक्तीचा संचय व्हावा. पण उपवास म्हटला की, नेमके आपण त्या दिवशी आपल्या आवडीचे व जे रोजच्या आहारात नाहीत असे पदार्थ सेवन करून, देहिक शक्तीचा अधिकच ऱ्हास करतो. अशी ही 'देवासाठी' म्हणून अज्ञानाने होणारी सेवा कारणी लागत नाही. म्हणून तुम्हा भक्तांना उपवास बंद करा, असे मार्गदर्शनाच्यावेळी सूचित करण्यात येते. पण योग्य तो बोध भक्तभाविकाना होत नसल्याने, उपवास बंद करणे, म्हणजे फार मोठ्या पापाचे धनी होणे, अशा भावनेच्या आहारी जाऊन, खऱ्या गुरुकृपाशिर्वाच्या प्राप्तीला आपण मुकतो.

आपण गुरुभक्त मार्गदर्शनाप्रमाणे जी साधना करीत असता, त्याचा अनुभव व अनुभूती येत नाही, अशा त्रस्त शंकेने दुसऱ्या काहीं विचारपध्दतीने सेवा करण्याचा प्रयत्न आपण जो करता, त्यापेक्षा ज्या मार्गपध्दतीने आपण करीत असलेल्या साधनेचा अनुभव व अनुभूती यावी अशी आपली इच्छा आहे, त्यासाठी जास्तीत जास्त आपले आचारविचार केलेल्या मार्गदर्शनाप्रमाणे ठेवण्याचे कर्तव्य आपण विचारात घ्यावे.



गुरुमार्गात गुरुशक्तिचे रूपांतर हे साधनेद्वारा रक्तात केले जाते. या उलट हठयोगी ही शक्ति कायेशी एकरूप करतात. म्हणून जरी अनेक प्रकारचे चमत्कार हठयोगी करीत असले तरी त्यांना दु:खनिवारणार्थ पीडितांना आशिर्वाद देता येत नाही. जेव्हां गुरुशक्ति ही रक्तात धारण होऊन प्रवाहित होऊ लागते, त्यावेळी रक्तामधून तयार झालेली गुरुशक्तिची वलये (Vibration) साधकाच्या शरीरमाध्यमातून बाहेरील वातावरणात प्रवाहित होत असतात. यावेळी पीडित व्यक्तीला साधकाची दृष्टी, वाणी, हस्तस्पर्श, पादस्पर्श या माध्यमातून गुरुशक्तीचा लाभ होत असतो. तसा लाभ झाला म्हणजेच कृपाशिर्वादास किंवा दीक्षेस तो पात्र झाला असे म्हणता येईल. अनेकवेळा काहीं भक्तभाविक मार्गदर्शनार्थ आल्यावर, त्यांच्या अपेक्षीत वेळेपर्यंत त्याना आपल्या अपेक्षेप्रमाणे सुख-शांती-समाधान आदिंचा लाभ झाला नाही, म्हणून त्या व्यक्ती अन्यत्र मार्गदर्शनार्थ जाऊन, सुखाच्या शोधात काहीं भिन्नाभिन्न उपासनांचा अंगिकार करतात. अशा वेळी प्राप्त झालेल्या सुख-शांतीचे कारण, त्या करीत असलेल्या उपासनेशी जोडण्याचे त्यांचे अज्ञान हे अनुभवण्यास येते. कारण ज्यावेळी आपण भक्त प्रथमतः गुरुमार्गी होता, त्याचवेळी आपल्या हयातीत आपल्याला ज्या सुख-शांती-समाधानाचा लाभ पाहिजे आहे, अशा कृपाशिर्वादाचा लाभ श्रीगुरुंनी करून दिलेला असतो, पण त्या कृपाशिर्वादाचा लाभ जीवनातील दोषपरत्वे अनुभवास न येण्याने, जरी उपासनेचा मार्ग आपण भक्त बदलते झालात, तरी बदलेल्या मार्गाच्या दिशेतून आपल्याला सुख प्राप्ती झाले आहे असे म्हणता येणार नाही. कारण प्राथमिक अवस्थेत आपण निराधार होतात, अशावेळी ज्या सद्गुरुंनी आपल्या

जीवनाला आधार दिलेला असतो, हा जरी आपण भक्तांना जाणवत नाही, तरी गुरुसामर्थ्याचा महिमा म्हणून असे म्हणता येईल की, तो शब्दरूपाने, दृष्टीरूपाने, स्पर्शरूपाने दिलेला आधार हा आपल्या जीवनात अक्षय स्वरूपात राहतो. त्या कृपाशिर्वादपरत्वे जेव्हां जीवनातील दोषांचे निर्मूलन होऊन, आपल्याला आपल्या जीवनात अपेक्षेप्रमाणे सुख-शांती-समाधान लाभणे, ही अवस्था प्राप्त होण्यास जरी विलंब झालेला असतो, तरी ते कृपाशिर्वादाचे साधन हे पूर्वी आपण प्राप्त करते झालेले असतो. पण इतकी शास्त्रशुध्द जाणीव होत नसल्याने, नव्याने अंगिकारलेल्या सेवेचे हे फल आहे, अशा अज्ञानात प्राप्त झालेल्या कृपाशिर्वादास उपकृत होण्याचे कर्तव्यही आपण विसरतो. वास्तविक आपण भक्तांना प्राप्त झालेल्या सुखात वाटेकरी म्हणून गुरुंचा कदापिही समावेश होत नाही. पण प्राप्त झालेले सुख ज्यांच्या कृपाशिर्वादाने प्राप्त झाले आहे, अशांच्याबद्दल पूज्य आदरांने त्यांच्या कृपेचे स्मरण करण्याचे कर्तव्यही आपण भक्त विचारात घेत नाही. म्हणून प्राप्त झालेले सुख हे जरी अपेक्षा पूर्ततेपलिकडे असते, तरी त्या सुखात स्वत:ला समाधानी मानण्याचे कर्तव्य आपल्याला पार पाडता येत नाही

रक्तात धारण होणाऱ्या गुरुशक्तिमुळे प्रकृतीस्वास्थ्यावरही चांगला परिणाम होत असतो. उदाहणार्थ, रक्तदाब किंवा हृदयविकार हे जे विकार होतात, त्या व्यक्तीच्या रक्तात कोलेस्टरोल (Cholestrol) नावाच्या पदार्थाचे प्रमाण वाढते व ते रक्तवाहिन्याच्या आतील बाजूस साचू लागते. यालाच अँथिरोस्वलेरोसिस (Atherosclerosis) असे म्हणतात. वरील



प्रकारामुळे रक्तवाहिन्यातून वाहणाऱ्या रक्ताच्या प्रवाहाला अडथळा होऊन, रक्ताचा वाहण्याचा वेग कमी होतो व त्यामुळे रक्त अनावश्यकरीत्या गोठू लागते, त्यामुळे हृदय विकाराचा झटका येण्याची शक्यता असते व रक्तवाहिन्यांच्या आकुंचन पावण्यामुळे रक्तदाबासारखे विकार उद्‌भवतात. रक्तात धारण झालेली गुरुशक्ति जेव्हां प्रवाहित होऊ लागते, त्यावेळी साचलेल्या कोलेस्टरोलवर तिचा आघात होऊन, रक्तवाहिन्यातून साचलेले कोलेस्टरोलचे थर दूर केले जातात व त्यायोगे रक्तवाहिन्या मोकळ्या होऊन, त्यातून पूर्ववत् रक्तप्रवाह चालू होतो. अशा प्रकारे रक्तात धारण झालेल्या गुरुशक्तिमुळे हृदयविकार व रक्तदाब आदि विकारापासून साधक दूर रहातो.

आपल्या शरीरात अनेक प्रकारचे स्त्राव (Hormones) प्रत्यही तयार होत असतात. शरीराचे तपमान समतोल राखण्यापासून ते रक्तातील साखरेचे प्रमाण नियंत्रित करण्यापर्यंत अनेक प्रकारची कार्ये हे स्त्राव करीत असतात. या स्त्रांवांचे प्रमाण कमी किंवा जास्त झाल्यास शरीराचा समतोल कार्यपध्दतीत बिघाड होतो. ॐकार साधनेत शरीरातील सुप्तावस्थेत असलेल्या स्त्रांवांना चालना दिली जाते व जे स्त्राव कमी अधिक प्रमाणात प्रवाहित होत असतात त्याना प्रमाणबध्द केले जाते. अशा रीतिने शरीरातील हे असंख्य स्त्राव समप्रमाणात कार्यबध्द झाले की, शरीरसुध्दा प्रमाणबध्दतेने कार्य करू लागते.

अशा ह्या स्त्रावांना (Hormones) जर समतोल प्रमाणात कार्य करण्यास वाव मिळाला नाही, तर आपल्या नित्याच्या

आचार-विचारात समतोलपणा, हा आपल्याला राखता येत नाही. अशा वेळी आपल्या ज्ञान-अज्ञानाने आपल्या देहिक अवस्थेचा समतोलपणा बिघडल्याने कित्येकवेळा आपण अगतिक आचारविचारांच्या बळी पडतो व तदनंतर ज्ञानअज्ञानाने घडलेल्या कृतकर्माबद्दल पश्चाताप व्यक्त करतो. यासाठी जीवनातील महत्वाचे कार्य म्हणजे 'विचारपरत्वे आचार व आचारपरत्वे विचार' ही समतोल अवस्था प्राप्त होण्यासाठी ज्या कार्याची आवश्यकता आहे, असे कार्य देहातील स्त्राव माध्यमातून होत असते व हे स्त्राव जीवनाला पोषक असे कार्य करतील, अशी धारणा साधनेद्वारा त्या स्त्रावानां करून द्यावी लागते. अशावेळी तुम्हा भक्तभाविकात फार मोठा गैरसमज निर्माण होण्याची जी कारणे अनुभवास येतात. ती अशी की, ज्यावेळी तुमची देहिक धारणा संमतोल नसते, अशावेळी निराकरणात 'अमुक एक गोष्ट तू करू नकोस''असे सांगण्यात येते, तेव्हां आपण भक्तांना अशा त-हेचे वागणे हे अवघड होते. यावेळी आपल्या ठिकाणी असे विचार निर्माण होतात की, आपण गुरुमार्गाचा 'आहारी' गेलो आहोत. वस्तुतःगुरुमार्ग हा आहारी जाण्याचा किंवा होण्याचा मार्ग नसून, मार्गदर्शनाप्रमाणे देहिक अवस्थेचा इष्ट विकास करण्याचा मार्ग आहे. पण अशी देहिक अवस्था स्वाभाविक स्थितीत कार्यान्वित होत नसल्याने अशा त-हेचे बंधन आपणास घालावे लागते. कारण आपली स्वाभाविक अवस्था ही आपणास प्राप्त करून घ्यावयाची असते. याचा बोध सूज्ञपणाने होत नसल्याने निराकरण म्हणून सांगितलेले बंधन आपण भक्त विचारात घेत नाही. अशामुळे ज्या स्वाभाविक अवस्थेचा समतोवपणा कृपाशिर्वादप्राप्तीला पोषक आहे, अशाचा



लाभ घेण्याच्या कर्तव्यास आपण दुरावतो.

ॐकार साधनेत स्थळ, काळ व वेळ याला महत्व आहे. ही साधना करण्याची उत्तम वेळ म्हणजे सकाळची, कारण यावेळेस मलमूत्र विसर्जन झालेले असते व त्यामुळे कफ, पित्त व वात हे शरीरात समप्रमाणात असतात. त्याचप्रमाणे रात्रीच्या विश्रांतीमुळे देहिक शक्तित ताजेपणा आलेला असतो. यामुळे देहिक व आत्मिक शक्ति समतोलपणे कार्य करीत असतात. सकाळच्या वेळेप्रमाणे संध्याकाळची वेळही साधनेला पोषक असते. पण ती पन्नास टक्केच पोषक असते. कारण अन्न सेवनानंतर ॐकार साधना केल्यास त्यात एकाग्रता होऊ शकत नाही. अन्न सेवनानंतर पचनक्रियेला ताबडतोब सुरवात होत असते. म्हणजे अन्न खात असतानाच तोंडामध्ये जी लाळ तयार होते, त्या लाळेमुळे अन्नाची प्राथमिक अवस्थेतील पचनक्रिया चालू होते. पचन क्रियेमध्ये देहिक शक्ति प्रवाहित होते व साधनेसाठी आत्मिक शक्ति प्रवाहित करावी लागते. म्हणूनच देहिक व आत्मिक शक्तिचा समतोवपणा असेल तरच साधनेत एकग्रता होते. याशिवाय एकाग्रता होण्यासाठी रक्तप्रवाह हा मेंदूकडे प्रवाहित व्हावा लागतो, पण अन्न सेवन केलेले असेल तर या अन्नाच्या पचनासाठी शरीरातील रक्तपुरवठा पचनेंद्रियाकडे केंद्रित होऊन, साधनेत मन एकाग्र होत नाही.

ॐकार साधना करण्यासाठी सकाळी ५ ते ८ व सायंकाळी ६ ते ७-३० ही वेळ हिताची आहे. याचे कारण हे साधन करीत असता या साधनमाध्यमाद्वारा आपणास आकाशतत्वाची अधिक धारणा करावयाची असते. सायंकाळी

सूर्यास्त झाल्यावर जेव्हां तेजतत्वाचा अस्त होतो. अशावेळी निसर्गतः आकाशतत्व हे अधिक प्रमाणात पृथ्वीतत्वाकडे धारण होऊ लागलेले असते. याचे प्रत्यंतर म्हणून जर आपण आपल्या आसमंतातील झाडांचे निरीक्षण केले तर झाडांची पाने या आगमन झालेल्या आकाशतत्वाच्या दाबामुळे खाली लवलेली असतात. असे हे पृथ्वीतत्वाकडे धारण झालेले आकाशतत्व सूर्योदयाच्यावेळी तेजतत्वाच्या आगमनामूळे कमी होऊ लागलेले असते. अशा सकाळी व सायंकाळी साधना करण्याच्या वेळा एवढ्यासाठी लक्षात घ्यावयाच्या आहेत की, निसर्गतः आकाशतत्वाचा पुरवठा अधिक आहे, अशाच वेळी ॐकार साधनेद्वारे आकाशतत्व धारण करण्याची क्रिया आपणास सुलभपणे प्राप्त करता येते. अशा वेळेला 'ब्रह्ममुहूर्त' असे म्हणतात. त्यामुळे वेळीअवेळी ब्रह्मकर्म करण्यास बसणे व त्यावेळेस ब्रह्ममुहूर्त असे म्हणतात. त्यामुळे वेळीअवेळी ब्रह्मकर्म करण्यास बसणे व त्या वेळेस ब्रह्ममुहूर्त म्हणणे हे अज्ञानीपणाचे आहे.

ॐकार साधना करण्यासाठी ज्याप्रमाणे वेळेचे महत्व लक्षात घ्यावयाचे आहे, त्याच प्रमाणे ही साधना करताना बसण्यास दर्भासन, लोकरीचे आसन किंवा धूतवस्त्र घेणे अधिक हिताचे आहे. बऱ्याच वेळा आपण साधना करण्यासाठी चटई, पाट किंवा रंगीबेरंगी गालिचेवजा आसन घेतो, ते घेणे हिताचे नाही. साधनेस बसताना धूतवस्त्र म्हणजे धोतर किंवा सफेद लेंगा घेण्यास हरकत नाही. आज अत्याधुनिक शास्त्राप्रमाणे जी कृत्रिम धाग्यांची वस्त्रे आपण परिधान करतो, त्यामुळे ॐकार साधनेत निर्माण झालेल्या लहरी ह्या कृत्रिम धाग्यापरत्वे, शरीरात धारण होण्याच्या क्रियेत अडथळा होतो. म्हणून ती वस्त्रे साधनेच्या वेळी न वापरणे अधिक हिताचे होय.



आपण भक्तांनी अनेक प्रकारच्या साधनांचा अवलंब गुरुमार्गदर्शनाप्रमाणे व ऐच्छिक म्हणून आजपर्यंत केलात, पण ह्या साधनामाध्यमातून आपण भक्तांना कदापिही काया-वाचा-मनाचे एकरूपत्व अंगिकारलेल्या साधनेशी झाले आहे, याची अनुभूती अनुभविण्यास मिळाली नाही. याचे कारण आपण ज्या साधनांचा विचार पारमार्थिक अवस्थेची प्राप्ती होण्यासाठी करीत होतात, तत्पूर्वी प्राप्त झालेले देहिक माध्यम व त्याची निसर्गपरत्वे कार्यपध्दती काय आहे, हे वैद्यकिय शास्त्राप्रमाणे विचारात घेतले नाहीत. प्राप्त झालेल्या देहिक माध्यमाच्या इष्टकार्यार्थ आपण काया-वाचा-मन हे विचारात घेतो. ही ह्या प्राप्त झालेल्या देहिक माध्यमाची स्थूल अवस्था होय. पण ह्या स्थूल माध्यमाची अंतर्गत कार्यरचना जाणणे महत्वाचे आहे, असा विषय आपल्या अभ्यासात किंवा अनुभवात न आल्याने अंगिकारलेली साधनसेवा काया-वाचा-मनाने करणे म्हणजेच आपली साधक अवस्था, अशा विचाराने साधना प्राप्तीतून सिध्दता करणे एवढेच कर्तव्य आपण विचारात घेतलेत. देहिक माध्यमाची स्थूल अवस्था म्हणजे काया-वाचा-मन, हे नित्याने उच्चारले जाणारे शब्द असल्याने, अंगिकारलेले साधन काया-वाचा-मनाशी एकरूप करणे, एवढीच साधना मार्गातील प्राप्ती अशा अनुभवाने जे आजपर्यंत आपण केलेत, त्यामुळे आपल्या जीवनातील सुख-शांती-समाधान प्राप्त करण्याचे साधन जरी आपण विचारात घेतलेत, तरी त्या अंगिकारलेल्या साधनांचा वर्षानुवर्षे अंगिकार करूनही, देहिक अवस्थेचा विकास योग्य प्रकाराने आपण करू शकला नाहीत.

प्राप्त झालेल्या देहिक अवस्थेचे जे सूक्ष्म कार्य आहे ते देहाबाहेर नसून, देहाच्या अंतर्गत रचनेत सामावले असल्याने, त्याचा हितसंबंध आपल्या नित्याच्या साधनेशी अधिक आहे, असा सूज्ञ विचार कोणीही आपणास न करून दिल्याने, बाह्य देहाच्या स्थूल अवस्थेतील कार्यरचनेवरच आपण भक्तांनी नियंत्रण करण्याचा प्रयत्न केला. याचा स्पष्ट खुलासा म्हणजे ज्या देवदेवतांच्या कृपाशिर्वादास पात्र होण्याची पात्रता आपणास प्राप्त करावयाची होती. ती प्राप्ती होण्यासाठी व्रतवैकल्ये, उपासतपास, जपजाप्य इत्यादी बंधने ह्या स्थूल देहावर लादून, अंगिकारलेल्या साधनेला सिध्द करण्याचा प्रयत्न आपण केलात. पण जेव्हां क्रमशः गुरुकृपाशिर्वादाने आपणास हे दीक्षांत विधी देण्यात आले, त्यापैकी उपासना दीक्षा, नामस्मरण दीक्षा व अनुग्रह दीक्षा ह्या दीक्षा देण्याचे प्रयोजन म्हणजे ज्या काया-वाचा-मनाने आपण नानाविध साधनांचा अंगिकार केलात, त्या साधना आपण करीत असताना, साधना ह्या जरी गुरुकृपाशिर्वादाने सिध्द होत्या, तरी ज्या देहिक माध्यमातून म्हणजे काया-वाचा-मनाने त्या धारण करावयाच्या होत्या, ते देहिक माध्यम अविकसित असल्याने, ह्या दीक्षापरत्वे प्राप्त होणारा परमानंद आपण भक्त अनुभवू शकला नाहीत. यासाठी आपण भक्तांना पुढील अवस्थेच्या दीक्षा म्हणजे गुरुदीक्षा व कारणदीक्षा ह्या देण्यात आल्या. ह्यापैकी गुरुदीक्षा ही जी आपण भक्तांना देण्यात आली, तत्पूर्वी आपल्या काया-वाचा-मनाची शुध्दता अन्य दीक्षापरत्वे झाल्यावरच, ह्या शुध्दता प्राप्त झालेल्या काया-वाचा-मनास गुरुदीक्षेशी एकरूप करून, तुम्हा भक्तांची पारमार्थिक अवस्थेतील साधक अवस्था सिध्द करण्यात



आली.

यापुढील महत्वाची अवस्था म्हणजे सिध्द अवस्था. ही प्राप्त होण्यास जी कारणदीक्षा कारणीभूत झाली, याचे प्रधान कारण देहिक अवस्थेच्या काया-वाचा-मनाशी नसून, देहाच्या सूक्ष्म अवस्थेशी हितसंबंधीत आहे. ती सूक्ष्म अवस्था आपल्या नकळत देहाच्या अंतर्गत रचनेत कार्यान्वित होत असते. त्याच्या हितसंबंधात आपण जरी ज्ञाअज्ञानाने जाणते नसतो, तरी त्याचे अस्तित्व आपल्या नित्याच्या आचारविचारातून अनुभवास येण्याने, आपली प्राप्त जीवनातील देहिक अवस्था किती अविकसित आहे हे अनुभवास येते. असे अनुभवास येणारे आचारविचार हे स्वभाव धर्माप्रमाणे इतरांच्या हितार्थ किती आहेत व संवयीप्रमाणे आपण त्यांचा नित्याने वापर किती करतो आहोत, हे आपण कधीच जाणते होत नाही. यासाठी प्राप्त झालेल्या साधक अवस्थेत साधकाचे प्रधान कर्तव्य म्हणजे जी अवस्था गुरुकृपाशिर्वादपरत्वे प्राप्त होऊन, काया-वाचा-मनाचा जो विकास झाला आहे, त्या अवस्थेचा अनुभव हा अनुभवणे व पूर्वीच्या संवयीपरत्वे लागलेली संवय इतरांच्या अनुभवास न येईल याची दक्षता बाळगणे, हे होय. म्हणजेच पर्यायाने साधक अवस्था प्राप्त झाली असे म्हणता येईल.

आता सिध्द अवस्थेची सिध्दता होण्यासाठी श्रीगुरुंनी कृपावंत होऊन जेव्हां आपण भक्तांना कारणदीक्षा दिली आहे, ह्या दीक्षेची ओळख अजूनही आपण भक्तांना पूर्णतः न होण्याने आपल्या आचारविचारात इतरांना सुखसमाधान देण्याचे जे कर्तव्य या कारणदीक्षेपरत्वे करावयाचे आहे, अशावेळी आपल्या

नित्याच्या आचारविचार संवयीप्रमाणे जे आचारविचार इतरांच्या जीवनात दु:ख तथा अशांतता निर्माण करीत आहेत, अशा आचारविचारांचा हितसंबंध कारणदीक्षा प्राप्त करते होऊनही आपण पूर्वकर्माशी लावतो किंवा ‘जन्मजन्मांतरातील इतर काहीं दोषपरत्वे माझ्या ज्ञानअज्ञानाने हे घडते आहे, ’ असे स्पष्टपणे सांगतो. अशावेळी सूज्ञ भक्तास अशी जाणीव व्हावयास पाहिजे की, वरील निवेदनात लिहील्याप्रमाणे पूर्वजन्मपरत्वे असणाऱ्या दोषपरत्वे असणारे कारण, जेव्हां अस्तित्वात नाही, अशी अवस्था प्राप्त होते. तेव्हांच कारणदीक्षा प्राप्त होते, म्हटल्यावर नित्याच्या संवयीपरत्वे जी आचारविचारांची देवाणघेवाण आपल्या अज्ञानाने होते, त्याचा हितसंबंध पूर्वजन्माशी जोडणे हे चूकीचे आहे. यापेक्षा आपल्या ज्ञानअज्ञानाने आपल्या हातून घडत असलेले आचारविचार हे पूर्वीच्या संवयीपरत्वे आहेत, याचा विचार करून जर आपण भक्त इतरांना सुखसमाधान होईल अशा आचारविचारांशी एकरूप झालात, तरच प्राप्त जन्मात प्राप्त झालेली कारणदीक्षा आपण भक्तांनी गुरूकृपाशिर्वादाने ‘जतन’ केली आहे असे म्हणता येईल.

हीं देहिक अवस्थेची आचारविचारपरत्वे होणारी क्रिया जतन करण्याचे कर्तव्य कारणदीक्षापरत्वे आपण भक्तांनी विचारात घेतलेत, म्हणजेच आपणास प्राप्त झालेली साधक अवस्था ही पुढील अवस्थेची प्राप्ती होण्यासाठी सिध्द झाली असे म्हणता येईल. यापुढील सिध्द अवस्था गुरुमार्गदर्शनाप्रमाणे ज्या ॐकार साधनेच्या मार्गातून धारण करावयाची आहे, ती धारणाक्रिया जरी ॐकार साधनेतून धारण होणार आहे, तरी ज्या देहिक माध्यमातून ही साधना सिध्द होणार, ती सिध्दता होण्याचे



कार्य देहिक माध्यमाच्या सूक्ष्म अवस्थेचे अंतर्गत कार्य म्हणजे पचनक्रिया, श्वसनक्रिया व रक्ताभिसरणक्रिया ह्या तीन अवस्थेपरत्वे जे हे देहिक माध्यम कार्यरत होत असते, त्याचा विचार करणे, हे महत्वाचे आहे. ह्या तीनही अवस्थापैकी पचन क्रिया हिचीच जाणीव फक्त आपणास होत असते. ही जाणीव म्हणजे देहिक शक्तिपरत्वे जे कार्य आचारविचाराने आपण करीत असतो, अशा देहिक शक्तिची कमतरता निर्माण झाली की, आपणास भूक जाणवते. अशा वेळी आवश्यक त्या अन्नसेवनानंतर ही कमतरता जाणवत नाही. ही अन्न सेवनाची क्रिया केल्यावर, पचनक्रियेच्या कार्यातून सेवन केलेल्या अन्नाचे अन्नरसात रूपांतर होऊन, त्याचे रक्तात रूपांतर होते व रक्ताभिसरणाचे कार्य सुरु होते. असे रक्ताभिसरण देहात होत असताना, रक्तात धारण झालेले अशुध्द वायु शुध्दिकराणासाठी श्वसनसंस्थेकडे पाठविले जाऊन, आपण नव्याने जो श्वासोच्छांवास करतो, अशावेळी शुध्द हवेच्या श्वसनाने रक्तातील दोष बाहेर काढून, उच्छ्वास क्रियेने ते शरीराबाहेर फेकतो. अशी ही रक्ताभिसरणाची आपल्या न कळत होणारी जी क्रिया आहे. त्या नैसर्गिक क्रियेचे पुढील अतिमहत्वाचे कार्य म्हणजे, आपल्या ह्या देहिक माध्यमाची उभारणी ज्या अन्नमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय व आनंदमय अशा कोशांद्वारे झालेली आहे, त्या कोशातील दोष विसर्जन करणे हे होय. असे कोश आज आपण भक्तांस जरी प्राप्त झाले आहेत, तरी पूर्वीच्या अनेक जन्मपरत्वे असणारे आपल्या जीवनातील विषय हे प्रत्येक जन्मात काहीं ना काहीं कारणपरत्वे आपण आपल्याबरोबर घेऊन येतो व त्या विषयपरत्वे ह्या कोशांचे ठिकाणी त्या

विषयांची आसक्ति असते. अशी कोशातील विषयपरत्वे असणारी आसक्ति, ही दोष म्हणून जीवनात आचारविचारपरत्वे प्रकट होऊन, इतरांच्या सुख-शांती-समाधानास अपायकारक होते. म्हणून आपण भक्तांच्या हितार्थ वंशविमोचन, कर्मविमोचन, ऋणमोचन आदि विधी करण्यात आले. कारण हे दोष प्राप्त जन्मात ह्या शरीरातील पाच स्थानाशी निगडीत असल्यानेच, प्राप्त जन्मात जरी आपण काहीं ना काहीं प्रकारे साधनसेवा करीत होतात, तरी केली गेलेली साधनसेवा ह्या पांच कोशात धारण होत नव्हती. ती जर धारण होत असती, तर आपण भक्तांना सुख-शांती-समाधानाच्या शोधात या गुरुमार्गाकडे यावे लागले नसते.

प्राप्त जन्मात विमोचनादि विधीपरत्वे ह्या पाच स्थानाशी हितसंबंधीत असलेले दोष जरी गुरुकृपाशिर्वादाने निवारण झाले आहेत व वर सांगितल्याप्रमाणे. आपण आता ह्या दोषातून मुक्त झाला आहात, तरी अंशमात्र दोष हे आचारविचार संवयीपरत्वे अस्तित्वात आहेत, याबद्दलची दक्षता घेणे हे अति महत्वाचे कर्तव्य ह्या प्राप्त जीवनामध्ये आपणास करावयाचे आहे. कारण ह्या कोशाशी हितसंबंधित असलेल्या दोषांचे जरी विमोचन झाले आहे, तरी सूक्ष्म रूपाने असलेले ह्या दोषांचे वास्तव्य आपण भक्तांना आपल्या नित्याच्या साधनेतून शुध्द करावयाचे आहे, हे आचारविचारपरत्वे जर आपण लक्षात घेतले नाही, तर करीत असलेल्या नित्य साधनेपरत्वे हे अंशमात्र असणारे दोष इतके प्रखर होतील की, एक दिवस ‘गुरुमार्ग हा धादांत खोटा आहे’, असे विचार मार्गामध्ये पंचवीस वर्षे राहूनही तुम्ही इतरांसमोर प्रकट कराल.



कारणदीक्षेपरत्वे सूचित केलेली ॐकार साधना ही सर्वात श्रेष्ठ अशी साधना आहे. या साधनेचा संबंध ध्वनि-लहरी-ध्वनि-लहरी-प्रकाश अशा क्रियेतून साधकाला धारण करावयाचा आहे. यासाठी ॐकार व गुरुनामस्मरण हे संथा पध्दतीने, म्हणजेच उदात्त, अनुदात्त व स्वरित आणि सूर, ताल व लय आदीनी सुसंबध्द असावयास पाहिजे. ॐकार साधनेमध्ये ॐ काराचा उच्चार करते वेळी पूर्णत: श्वास घेऊन मुखाने तो श्वास ‘ॐ‘ या शब्दाद्वारे ध्वनित करावयाचा आहे. अशावेळी जो ॐ कार आपल्या मुखाद्वारे ध्वनिरूप होईल, तो ॐकार तोंडाने म्हणजे दोन ओठानी न करता, जीभ व टाळा या माध्यमातून करावयास पाहिजे. अशा ॐकाराचा प्रारंभ मुखातून होत असता, घेतलेला श्वास हा जास्तीत जास्त मंद गतीने सोडून, ॐ हा शब्द मध्य अवस्थेत नेऊन, हळू हळू त्याचा लय करावयास पाहिजे. अशा पध्दतीने ॐकार साधना करीत असता, तुमच्या आसमंतात ह्या ॐ कार ध्वनितून लहरी निर्माण होतात व पुनश्च तुम्ही जेव्हां ॐ कार करण्यास श्वास घेता, अशावेळी प्रथमत: ध्वनित केलेला ॐकार व त्यापासून निर्माण झालेल्या लहरी ह्या शुध्द हवेतून तुमच्या श्वसन क्रियेद्वारा शरीरात धारण होऊन, फुफ्फुसाकडे जातात. फुफ्फुसात अशा असंख्य पेशी आहेत की, ज्यांची शुध्द हवा धारण करणे व शरीरातील अशुध्द हवा बाहेर फेकणे, ही क्रिया अव्याहत चालू असते. आपण जेव्हां ॐ कार करता त्यावेळी निर्माण केलेल्या ॐ कार लहरी ह्या शक्तिस्वरूपाने श्वासद्वारे फुफ्फुसात जाऊन, तेथे असलेल्या शुध्द हवेला धारण करणाऱ्या पेशीद्वारा रक्ताशी एकरूप होतात व रक्तात धारण झालेल्या कर्मपरत्वे असणाऱ्या दोषांचे निर्मूलन करतात.

रक्ताभिसरणाद्वारा ते रक्त जेव्हां देहातील पाच कोशांच्या ठिकाणी म्हणजे नाभीस्थान, हृदयस्थान, कंठस्थान, ललाटस्थान व ब्रह्मरंध्र या ठिकाणी जाते, तेव्हां केला गेलेला ॐ कार हा या कोशांमध्ये शक्तिस्वरूपाने धारण होतो. अशी ही साधना माध्यमिक अवस्थेतून नित्याने करीत असता, जो ॐ कार आपण वाणीने ध्वनित केलात, त्याच्या लहरीनी ह्या पाच स्थानांची शुध्दता करण्याचे कार्य पूर्णत्वाने केल्यावर, त्याच लहरी अनाहत त-हेने शरीरातील ह्या पाच स्थानात ध्वनीरूपाने पुनश्च ॐ कार हा ध्वनी करतात. पण अशावेळी या धारण झालेल्या ॐ कारातील लहरी जेव्हां पाच स्थानातून प्रकट होतात, तेव्हां या लहरींचा ध्वनी न होता, त्या लहरींचे रूपांतर प्रकाशात होते. ही अवस्था प्राप्त होणे हे अंतिम साध्य ॐकार साधनेत सामावलेले आहे. अशा नित्याने केलेल्या ॐ काराचे रूपांतर जेव्हां साधकाच्या साधक-सिध्द-साध्य अवस्थेत प्रकाशमान होते, तेव्हां साधकाचे काया-वाचा-मन हे पूर्णतः शक्तिमान होऊन, त्याला प्राप्त झालेले जीवन हे सहजलीलया तो इष्टकर्तव्यार्थ कार्यान्वित करून इतरांच्या कल्याणासाठी काहीं कर्तव्य करण्याचे उद्दिष्ट जीवनाची सार्थकता म्हणून उपयोगात आणतो.

अशा या नित्याच्या ॐकार साधनेत, आपण भक्तांना न्यास करण्यास सूचित केले आहे. आपल्या देहिक माध्यमात ज्या काहीं आधिव्याधि असतात, त्यासाठी आपल्याला काहीं ना काहीं प्रकारे औषधोपचार करून त्या दूर कराव्या लागतात. अशा आधिव्याधिपासून आपले काया-वाचा-मन निरोगी रहावे, म्हणून हे न्यास करावयाचे आहेत. अस्थि, मांस, मज्जा व त्वचा अशी जी शारीरिक धारणा होऊन हे शरीर आपणास प्राप्त होते, त्या प्राप्त



शरीरातील हे घटक ॐकार शक्तिने शक्तिमान व्हावेत व त्यात सामावलेले दोष किंवा आधिव्याधिपरत्वे होणारी व्याधि दूर व्हावी, यासाठी हे न्यास ॐकार साधनेत नित्याने करावयास पाहिजे. ते करीत असता, दोन्ही हातातून ॐकार शक्ति ही अस्थि, मांस, मज्जा, व त्वचा या शरीरातील घटकात धारण होते.

न्यास पध्दतीने ॐ कार करीत असता आपण आपल्या दोन्ही हातानी जेव्हां त्वचेवर स्पर्श करतो, अशावेळी आपल्या हातातून, देहामध्ये धारण झालेली ॐ कार शक्ति ही त्वचेद्वारा पुनश्च शरीरामध्ये पाठविण्याचे कार्य करावयाचे असते. आपणास अनुभवास येणारी त्वचा ही अनंत छिद्रांनी युक्त असून, त्या त्वचेचे एकंदर सात स्थर आहेत, त्यापैकी पहिल्या चार थरांतील छिद्रांद्वारा शरीरातील अपायकारक द्रव्य म्हणजे घाम याचे विसर्जन होत असते. या चार व पुढील तीन थरामध्ये चरबीचा समावेश असतो. अशी चरबी कमी करण्यासाठी जरी आपण व्यायाम किंवा औषधोपचार करतो, तरी त्या अनावश्यक चरबीची स्निग्धता देहातून समूळ नष्ट होत नाही. पण ॐकार साधनेपरत्वे जेव्हां आपण न्यास करतो, अशावेळी ह्या स्पर्शाद्वारा शरीरात धारण होणारी शक्ति ही चवथ्या थरापलीकडे जाऊन, अनावश्यक चरबीचे निमूर्लन होते. अशावेळी तेथे धारण होणारी शक्ति प्रकाशमान होऊन, या काया-वाचा-मनाला आतून व बाहेरून पूर्णतः प्रकाशमान करण्याचे कार्य ॐकार साधनेद्वारा होत असते.

अशी सहजासहजी प्राप्त न होणारी सिध्द-साध्य अवस्था ॐकार साधनेतून प्राप्त होण्याचे कार्य गुरुभक्तांना केवळ

गुरुकृपाशिर्वादाने प्राप्त होते. पण तत्पूर्वी पारमार्थिक विषयाबद्दल वाचनात व ऐकण्यात आलेल्या काहीं शब्दांचे अवडंबर, ही ॐकार साधना करीत असताना विचारात न घेणे हे बरे. ॐकार साधना करण्याची पध्दती सूचित करीत असताना, ॐ कार हा क्रमशः नाभी, हृदय, कंठ, ललाट, ब्रह्म अशा पाच स्थानातून स्वरबध्द पध्दतीने करावा. म्हणजे संगीत शास्त्राप्रमाणे सा रे ग म प ह्या स्वरांनी तो युक्त असावयास पाहिजे. अशावेळी आपण भक्तांच्या वाचनात आलेल्या वाणी प्रकारांचा आपणास शोध घ्यावासा वाटतो. तथापी परा, पश्यंती, मध्यमा व वैखरी अशापैकी कोणत्या वाणीची मला प्राप्ती झाली आहे, याचा शोध भक्तभाविकांनी घेण्याचा प्रयत्न न करता, गुरुकृपाशिर्वादाने मला गुरुवाणी प्राप्त झाली आहे व प्राप्त झालेल्या वाणीद्वारा मला जगताच्या हितसंबंधाचे काहीं कार्य करण्याचे कर्तव्य करावयाचे आहे, ह्या विचाराशी एकनिष्ठ रहावे. गुरूवाणीचा लाभ झाला आहे म्हटल्यावर, ह्या वाणीद्वाराच आपण भक्तांना इतरांच्या सुखदु:खाबद्दलचा विचार करून, जी गुरुवाणी शब्दरूपाने आपल्याला प्राप्त झाली आहे, त्या शब्दशास्त्राने पीडितांना अभयदान देऊन, त्याच शब्दांच्या अस्त्रातून इतरांच्या जीवनातील दोषपरत्वे निर्माण झालेले दु:ख दूर करावयाचे आहे. अशी ही गुरुशक्तीने प्रभावित झालेली वाणी जेव्हां आपणास प्राप्त झालेली आहे, तेव्हां नित्याच्या जीवनात कोणत्याही कारणपरत्वे एखादा शब्द-अपशब्द उच्चारीत असताना, तो कुणाही व्यक्तीला शाप म्हणून दिला जाऊ नये. तरच तो शब्द हा वरदान होईल, अशाच रीतिने त्याचा उच्चार करावा. ॐकार साधनेपरत्वे व कारणदीक्षापरत्वे पूर्णत्वास गेलेल्या काया-वाचा-



मनाच्या कार्याला जो गुरुवाणीचा लाभ आहे, ती वाणी 'आकाशवाणी' प्रमाणे जर मानवी जीवनात मानवतावादाच्या कल्याणार्थ आपण भक्त उपयोगात आणाल, तर भवितव्यात पीडितांना आपल्या वाणीद्वारा दिलेले अभयदान हे आपणास प्राप्त झालेल्या गुरुकृपेचा 'प्रसाद' आहे असे अनुभवास येईल.

वाणीसंबंधी पोषक व महत्वाचा असा स्पष्ट खुलासा आपण भक्तास केला आहे. त्याचप्रमाणे करीत असलेल्या नित्याच्या साधनेतून काय प्राप्त व्हावे ? तर प्रथमत: मुक्तिसंबंधीचे तत्वज्ञान आपल्यासमोर येऊन, शास्त्रात सांगितल्याप्रमाणे आपणास कोणत्या मुक्तीच्या लाभ होणार आहे, ह्या विचारांचा खेळ आपल्या साधनामार्गात सुरु होतो. मुक्ती प्राप्त करणे याचा खरा अर्थ प्राप्त जीवनातून सुलभपणे मुक्त होणे असा आहे. पण आपण अंतापर्यंत मुक्त होण्याचा विचार कधीच करीत नाही. यासंबंधी एक उदाहरण द्यायचे झाले तर दुपारी आपण जेवताना आकंठ श्रीखंड खाल्ले असेल व संध्याकाळी जेवताना पुन्हा 'शिल्लक आहे कां ? 'म्हणून जर विचारणा केली, तर ती मुक्तावस्था नव्हे. मुक्तावस्था प्राप्त करणे म्हणजे प्राप्त झालेल्या ऐहिक सुखशांतीबद्दल समाधान वाटून, स्वेच्छेने निरिच्छ होण्याची धारणा काया-वाचा-मनाचे ठिकाणी निर्माण होणे. ही क्रिया अट्टाहासाने न करून घेता, ती जर सहजलीलया प्राप्त झाली, तरच आपण मुक्ति या शब्दाच्या अलिकडे पलिकडे जावे.

माझ्या मते प्राप्त जन्मात गुरुकृपाशिर्वादाला पात्र होऊन ज्या ज्या काहीं ऋणानुबंधपरत्वे व दोषपरत्वे हा जन्म आपल्याला प्राप्त झाला आहे व त्या ऋणानुबंध व दोषापरत्वे प्राप्त जन्मात

ज्या सुखदु:खांचा 'कर्म' म्हणून हितसंबंध शिल्लक राहिला आहे, त्या कर्माधीन अवस्थेचे जीवन गुरुकृपाशिर्वादाधीन होणे व प्राप्त जन्माच्या कर्तव्यार्थ व सार्थकतेसाठी आपल्या नकळत आपल्याला गुरुकृशिर्वादाचा लाभ होणे, ह्या इतकी श्रेष्ठ मुक्ति आणखी कुठली असेल असे मला वाटत नाही.

आपण भक्तांना यापूर्वी ॐकार साधना ही पाच स्थानातून म्हणजे नाभी, हृदय, कंठ, ललाट, व ब्रह्म यातून पाच प्रकारानी करण्यास सूचित केली व त्याप्रमाणे ती करून, ध्वनि-लहरी-ध्वनि या क्रियापरत्वे ॐ कार लहरी आपल्या आसमंतात आपण निर्माण करते झालात, तरी ध्वनित झालेल्या ॐ कार लहरीशी आपणास काया-वाचा-मनाने एकाग्र होता आले नाही. पण नित्याच्या साधनेत ह्या ॐ कार लहरींना धारण करण्याचे कार्य जेव्हां आपल्या देहिक माध्यमाला सुलभपणे प्राप्त करता आले, त्यानंतर दुसऱ्या अवस्थेत ॐ कार करीत असता, जो ॐ कार ध्वनि तुमच्या आसमंतात लहरी रूपाने निर्माण झाला, त्या ध्वनित झालेल्या ॐ काराशी काया-वाच-मनाने एकरूप होण्याची क्रिया जेव्हां प्राप्त झाली, तेव्हां नित्याच्या ॐकार साधनेत व नित्याच्या आरतीत तुम्ही सहज एकाग्रता निर्माण करते झालात व त्यामुळे ॐ कारातील ध्वनि-लहरी-ध्वनि या अवस्थेचा लाभ घेते झालात. पण पुढे कारणदीक्षापरत्वे हेच साधन करताना जरी पूर्वीप्रमाणेच तुम्ही ॐ कार करीत असलात, तरी ह्या ॐ कार साधनेत पुढील प्रगती म्हणजे 'ध्वनि-लहरी-ध्वनि-लहरी-प्रकाश' या अवस्थेत सामावले गेलात. याठिकाणी प्रकाश या शब्दाचा अर्थ Light असा नसून 'Energy' असा आहे. पूर्वी नित्य जीवनात सकाळपासून संध्याकाळपर्यंत आपण आपली इष्ट कर्तव्ये करीत



असताना, ती कर्तव्ये उत्साहाने होत नसत. त्याशिवाय जरी गुरुआज्ञेने नित्याची साधना सूचित केली होती, तरी त्या साधनेकडे अधिक आस्थेने आपण पाहते झाला नाहीत. पण आता कारणदीक्षापरत्वे तिसऱ्या अवस्थेची ॐ कार साधना आपण करीत असल्याने, ज्या ॐकार साधनेतून हे कार्य काया-वाचा-मन म्हणजे देहिक माध्यम ॐ काररूप वाहवयास पाहिजे. त्या अवस्थेचा लाभ आता आपण भक्त अनुभवते झाल्याने, साधनेबद्दलची अनुभूती म्हणजे काय, हे समजण्यासाठी अन्य कोणत्याही मार्गदर्शनाचा किंवा पुस्तकाचा आधार घेण्याचे प्रयोजन उरलेले नाही.

ॐकार साधनेतील पुढील दोन महत्वाचे प्रकार हे शब्दरूपाने आपल्या निवेदनार्थ लिहीता येणार नाहीत. कारण या पुढील दोन अवस्था गुरुमार्गदर्शनाप्रमाणेच प्राप्त कराव्या लागतील व यासंबंधीचे मार्गदर्शन जिज्ञासू भक्तभाविकाना वेळोवेळी होईल. याचा लाभ जर आपण भक्तभाविकांनी 'जीवनाची सार्थकता' ह्या बहुमोल अशा विचाराने घेतलात, तर त्याचा इष्ट लाभ आपण भक्तांना होऊन, इतरांच्याही कल्याणार्थ काहीं सेवा करण्याचे कर्तव्य गुरुआज्ञेने आपणास झाले, तर त्या कर्तव्यार्थ तुमची गुरुमार्गातील साधक-सिध्द-साध्य ही अवस्था तुम्हा भक्तांना गुरुकृपाशिर्वादाने प्राप्त झाली आहे, याची अनुभूति अनुभवण्याचे साधन प्रत्यक्षात तुम्हा भक्तांना अनुभवण्यास येईल.

ॐकार साधना ही पाच प्रकारानी करावयाची आहे. हे वर सूचित केले असून, त्या साधनेस पोषक असे आचारविचार

एवढ्यासाठी विचारात घ्यावयाचे की, पांच ॐ कार प्रकारापैकी पुढील तीन प्रकार ज्या साधनपध्दतीने करावयाचे आहेत, त्यांचा हितसंबंध वातावरणातील नैसर्गिक प्रकाशाशी आहे. आपल्या आसमंतात सकाळी सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यँत जो शुभ्र प्रकाश दिसतो, ह्या प्रकाशात सप्तरंग अंतर्भूत असून, त्या सात रंगापैकी तीन रंग म्हणजे पिवळा, निळा व तांबडा यांचे एकरूपत्व होऊन हा शुभ्र प्रकाश झालेला असतो. आपले देहिक माध्यम म्हणजे काया-वाचा-मन हेही तीन रंगानी युक्त असून जेव्हां ह्या तीन रंगाचे प्रमाण एकमेकाशी कमीअधिक होते, अशा वेळी आपल्या आचारविचार पध्दतीत विषमता निर्माण होते किंवा जेव्हां भिन्नाभिन्न विषयपरत्वे आपले आचारविचार त्या त्या विषयाधीन होतात. तेव्हां ही आचारविचारांच्या समतोलपणाचे कार्य ज्या तीन रंगाच्या माध्यमातून होते, त्या तीन रंगातील समतोलपणा हा विषम होतो व त्यामुळे नित्याचे जीवन हे कंटाळवाणे व त्रासिक बनते. अनेक वेळेला आपल्या अडिअडचणींचे हितसंबंध कशाशी व कोणत्या कारणपरत्वे आहेत हे न समजल्याने, आपण ज्योतिषशास्त्राच्या आधाराने जेव्हां अडिअडचणींचे निराकरण करून घेण्याचा विचार करतो, अशावेळी बहुसंख्य ज्योतिषाकडून नवग्रहाच्या आंगठ्या किंवा लॉकेट्स वापरण्याचा सल्ला देण्यात येतो. त्याप्रमाणे अनेक लोक अज्ञानाने हे नवग्रह परिधान करीत असतात. पण ग्रहांना धारण केल्याने आपल्या अडिअडचणी निवारण होतात किंवा अनुकूल होतात, इतके आपले ग्रहमान अनुकूल करून घेण्याचे साधन सहज व सोपे नाही.

ज्योतिषशास्त्राप्रमाणे ज्या ग्रहांची धारण आपल्याला




करावयाची असते, याचे मुख्य कारण म्हणजे वर सांगितलेल्या तीन रंगापैकी जो रंग आपल्यामध्ये कमीअधिक असेल, त्याचा समतोलपणा राखण्याचे कार्य या परिधान केलेल्या ग्रहपरत्वे होते, हे होय. आता आपल्या ठिकाणी ज्या या तीन रंगाची धारणक्रिया देह माध्यमातून होऊन, आपले आचारविचार समतोलपणे कार्यान्वित होतात, असे हे रंग आपल्या ठिकाणी कमी आहेत किंवा जास्त आहेत, किंवा हे तीनही रंग एकमेकाला पोषक नाहीत, हे अनुभवास येण्याचे साधन अगदी सोपे आहे. एखाद्या व्यक्तीस किंवा एखाद्या स्त्रीस अमूक एका रंगाचे वस्त्र परिधान करण्यात अत्यंत प्रेम वाटते. पण तोच रंग इतरांना आवडत नाही. एखाद्या स्त्रीस तांबड्या रंगाचे पातळ परिधान करण्यात खूप समाधान वाटते. अशावेळी ह्या स्त्रीच्या ठिकाणी ज्या रंगाचा जो समतोलपणा नसतो, तो हे वस्त्र परिधान करण्याने समतोल होतो. म्हणूनच नेसलेल्या वस्त्राबद्दल प्रेम वाटून ती व्यक्ती आनंदी असते. या उलट ज्यांच्या ठिकाणी या रंगाचा समतोलपणाा आहे, अशांना भडक, गडद किंवा एका वस्त्रात अनेक रंगाचा समावेश झाला आहे असे वस्त्र आवडत नाही. अशी ही निसर्गपरत्वे देहाची विकसितता किंवा अविकसितता त्या त्या रंगावर अवलंबून आहे. अशा रंगाचा समतोलपणा निर्माण करण्याचे कार्य ॐकार साधनेतून होत असते. ते म्हणजे ध्वनि-लहरी-ध्वनि-लहरी-प्रकाश होय म्हणजे ही साधना नित्याने केल्यावर तुम्हा भक्तांच्या देहिक माध्यमाचे कार्य निसर्गतः ज्या तीन रंगावर अवलंबून आहे, अशा रंगाना समतोलपणाने कार्य करू देण्याचे कार्य ॐकार साधनेतून होत असल्याने, कुणीही भक्तभाविकांनी वेगवेगळ्या ग्रहपरत्वे

आंगठ्या किंवा लॉकेट्स वापरण्याचा मोह ठेवू नये.

भक्ताला गुरुकृपाशिर्वाद प्राप्त झाल्यानंतर त्याच्या प्रापंचिक व पारमार्थिक जीवनात स्थित्यंतर घडून येतात व त्याला विकसित अवस्थेची प्राप्ती होते. ही स्थित्यंतरे भक्ताच्या जीवनात कशी घडून येतात ही एक अभ्यासण्याजोगी बाब आहे व त्याचाच तक्ता पुढील पानावर दिला आहे.

## गुरुकृपाशिर्वादद्वारे प्राप्त झालेली जीवनातील विकसित अवस्था



आपल्याला सूर्योदयाचे वेळी किंवा सूर्यास्ताचे वेळी क्षितीजावर फिकट पिवळा असा रंग आकाशात प्रथमतः दिसतो, नंतर तो अधिक वाढून लालसर होतो व माध्यान्हाच्या वेळी तो शुध्द निळा असतो अस्ताच्या वेळी पुन्हा अशीच क्रिया दृष्टोत्पत्तीस येते. हा जो बदल आकाशातील रंगात दिसतो, त्याचप्रमाणे ॐकार साधनेतील प्राथमिक अवस्थेतील विकसित अवस्था म्हणजे फिकट पिवळा रंग. पुढे त्याचे रूपांतर केशरी रंगात होऊन, पूर्णावस्थेच्या वेळी गर्द लाल असा प्रखर रंग आपल्या देहिक माध्यमातून प्रकाशित होऊ लागतो. आंबा हे फळ प्रथमतः हिरवे असते व परिपाक झाल्यावर त्यावर गर्द केशरी किंवा गर्द लाल रंग दिसू लागतो. तेव्हां त्या फळाचा परिपाक झाला आहे, हे अनुमान अनुभविण्यास येते. त्याचप्रमाणे साधनेत आम्हा मानवांना निसर्गतः विकसित करण्याचे कार्य हे निसर्गाधीन असल्याने, आपले कर्तव्य म्हणजे गुरुआज्ञेने सूचित केलेल्या साधनेशी एकरूप होऊन ती साधना नित्याने करणे हे होय.

आपण भक्तांना 'ॐकार साधना' ही दीक्षा दिली आहे. तेव्हां आता गुरुनामस्मरण व्यतिरीक्त अन्य कोणतेही मंत्र आपण न म्हणावेत हे इष्ट. कारण प्रत्येक मंत्राचा प्रारंभ ॐकाराने होत असतो व तोच ॐकार तुम्हा साधकांच्या जीवनात सिध्द झाला आहे म्हटल्यावर अन्य कोणत्याही मंत्राचा ॐकाराने प्रारंभ करून तो म्हणण्याचे कारण आता उरलेले नाही. फक्त नित्याने आपण भक्तभाविकांना ॐकार साधना व सद्‌गुरु नामस्मरण एवढेच साधन करावयास सूचित केले आहे. हे साधन आपण भक्तभाविकांना आपल्या जीवनाची सार्थकता म्हणजे पारमार्थिक



जीवन ही अवस्था पूर्णतः प्राप्त करून देण्यास समर्थ आहे. हे सूचित केलेले इष्टकर्तव्य आपण आस्थेने व सुविचाराने अंगिकारल्यावर परमेश्वराच्या अस्तित्वाचा शोध घेण्याचे अन्य कारण कुठेही नसून, त्याचा निश्चित वास सदैव आपल्या ठिकाणी आहे, ह्या जाणीवेस आपण भक्त पूर्णतः जाणते व्हाल.

आपण भक्तांस ज्या दीक्षांचा लाभ करून देण्यात आला आहे, त्या दीक्षापरत्वे जी 'साध्य' अवस्था आपणास प्राप्त करावयाची आहे, त्यासाठी ॐकार साधना संथापध्दतीने करणे व ह्या संथापध्दतीसंबंधीचे मार्गदर्शन घेणे महत्वाचे आहे. जगात इतरत्र ॐकार साधनेबद्दल अनेक पुस्तके व मार्गदर्शने आपल्या ऐकण्यात व वाचण्यात जरी येत असली, तरी ॐकार साधना गुरुमुखातून प्राप्त झाल्याशिवाय ती शब्दरूपच राहणार आहे. यासाठी कार्यकेंद्रावर तत्संबंधीच्या मार्गदर्शनार्थ जे सेवक नियुक्त केले आहेत, त्याना नियमित व योग्यवेळी भेटून, आपली साधना बरोबर आहे किंवा नाही याची खात्री करून घ्यावी.

शास्त्रामध्ये ॐकार म्हणजे 'हिरण्यगर्भ' असे संबोघतात ती एक शक्ति आहे. तो शब्द नसून 'ध्वनि' आहे. ॐकार साधनेची माध्यमे काया-वाचा व मन ही आहेत. नुसता ॐकाराचा उच्चार अनेक वेळा करून त्याचा लाभ होत नाही व इतरांनाही तो करून देता येत नाही. ॐकाराची मूलभूत अंगे:–

१) उच्चार, मध्य, लय

२) स्वर, ताल, लय

३) उच्चार, आचार, विचार

४) स्वर, सूर, नाद

अशी आहेत. ह्या अंगानी ॐकार केला असता, 'सूर-नाद-निनाद' ह्या अवस्थेचा अनुभव साधकाला येतो. ॐकार साधनेमध्ये प्राथमिक अवस्थेत ध्वनि-लहरी-ध्वनि ही अवस्था प्राप्त होते व द्वितीय अवस्थेत ध्वनि-लहरी-प्रकाश (शक्ति, Energy) अशा अवस्थेचा अनुभव येतो. ॐकार साधना नियमित केली असता, खालीलप्रमाणे अवस्था साधकाला क्रमशः प्राप्त करून घ्यावयाच्या असतात

साधक सिध्द साध्य }
काया – विकारवश होण्याची क्रिया हळू हळू बंद होते.
वाचा – सिध्द होते
मन – नामीतत्वाशी एकरूप होणे ही क्रिया प्राप्त होते

ॐकार साधनेत 'न्यास' केले असता, ज्याला आपण स्पर्श-संवेदना (Self-healing) म्हणतो, म्हणजे स्वतःला आरोग्य प्राप्त होण्यासाठी स्वतःस्पर्श संवेदना घेणे. याचा लाभ सहज करून घेता येतो. ॐकार साधनेतील पांच न्यासद्वारा अनियमित देहिक क्रियेवर नियंत्रण करता येते. म्हणजे पचनक्रिया, श्वसनक्रिया व रक्ताभिसरण ह्या देहिक क्रियामधील कमीअधिकपणा दूर होतो व त्यायोगे आरोग्याचा लाभ होतो.

ॐकार साधना ही संजीवनीप्रमाणे आहे. किंबहुना त्याहीपेक्षा श्रेष्ठ साधन आहे, हा माझा विश्वास आहे व काहीं कालापूर्वी ह्या साधनेची अनुभूती प्रत्यक्षात मी अनुभविली.



वेदामध्ये ज्याचे वर्णन 'नेति, नेति' असे केले आहे, त्या अवस्थेचा अनुभव मी घेतला. आजपर्यंत साधक अवस्थेत कुणी हा अनुभव घेतला असेल नसेल, पण 'जीवंतपणी मरण अवस्था' अनुभवणे हा अनुभव केवळ ॐकार साधनेने साध्य झाला असे म्हणता येईल. गेल्या काहीं वर्षापासून सद्‌गुरु आज्ञेने जगत्कल्याणासाठी काहीं साधना मी करीत होतो, हे सर्व भक्तांना विदित असून, ह्या साधनेची सांगता 'शक्तिपीठ' म्हणून गोवा येथे करण्यात आली. हे शक्तिपीठ म्हणजेच प्रत्यक्षात त्रिगुणात्मक शक्ति असून, ती भवितव्यात कार्यान्वित व्हावी असे साधन विचारात घेऊन, सर्व केंद्रांवरील भक्तांच्या समवेत ॐकार साधना ही सेवा चालू केली असता, जे शक्तिचे आगमन माझ्या देहिक माध्यमाद्वारा झाले, त्याचा परिणाम म्हणून देहिक अवस्था ही निर्जीव झाली. त्यामुळे देहिक व्यवहार म्हणजे आचार, विचार व उच्चार ह्या तिन्ही माध्यामाचे कार्य होत नव्हते. वैद्यकीय शास्त्रात ह्या अवस्थेचे निदान 'Cerebral Stroke' म्हणून सांगितले गेले असले तरी प्रत्यक्षात अनुभव असा आला की, जरी देहिक शक्तिचे कार्य होत नव्हते, तरी आत्मिक शक्ति हिचे अस्तित्व प्रमाणापेक्षा अधिक जतन केले असल्यामुळे, तिच्या प्रभावाखाली जी शून्य अवस्था प्राप्त झाली होती, त्यातूनच पुनश्च ॐकार साधना ही अ, ऊ, म म्हणून उच्चार करती झाली. त्यामुळे ह्याच जन्मी मी पुनश्च आचार, विचार, उच्चार करीत असून, पूर्वीप्रमाणे आपणा सर्वांना प्रेमाने भेटतो आहे. प्रत्यक्षात ही साधना प्राप्त होण्यापूर्वी, गेली पांच वर्षे मी भक्तभाविकांना भेटणे किंवा कामकाज करणे हे गुरु आज्ञेने बंद ठेवण्याचा हेतू असा होता की, पुढे जी साधना माझ्या माध्यमातून श्रीगुरुंनी

करवून घेऊन जगाच्या कल्याणार्थ जे कार्य आम्हा सेवकांना भवितव्यात करावयाचे आहे, त्याची ही पूर्व तयारी होती. कारण जी शक्ति ह्या साधनेद्वारे प्राप्त करावयाची होती ती प्रचंड असून, अखंड विश्वाला व्यापून जी शिल्लक राहिली आहे, अशी ती शक्ति ही शक्तिपीठांत धारण करण्यात आली. ह्या विश्व शक्तिचे वर्णन पुरूषसूक्तामध्ये केलेले आहे की, 'समूमिंविश्वतोवृत्वाऽत्यतिष्ठदृशांगुलम्', म्हणजे विश्वाला व्यापून ही शक्ति शिल्लक राहली आहे.

आता भवितव्यात आपण भक्तांनी काहीं प्राप्त करावयाचे आहे, असे शिल्लक नसून, प्राप्त केलेली गुरुशक्ति म्हणजेच शक्तिपीठ होय! त्याही पेक्षा असे यथार्थ म्हणता येईल की, आपण भक्तांना ज्या प्रतिमा घेण्यास भाग पाडले व आपण त्या घेते झालात, त्याचा लाभ आपले कुटुंब व इतरांना होईल. नित्य नियमाने व आचार विचाराने सूचित केलेली ॐकार साधना आपण करण्यामुळे ही सर्वश्रेष्ठ अशी संजीवनी भवितव्यात जगाचे भविष्य घडविणार असून, ती जबाबदारी आपण सर्व गुरुभक्तांवर आहे. गेल्या वर्षभरात मला कोणकोणत्या प्रकारे आजारपण, क्लेश निर्माण झाले याचा विचार न करता गुरुकृपेने जी महान दीक्षा म्हणजे, 'महाकारण' किंवा 'ॐकार साधना' ही नित्याने करावयाची असून, तिचा संबंध विश्व-उत्पत्तीशी आहे. केवळ मानवी उत्पत्तीचा विचार यात केला नसून, ह्या ॐकार साधनेत सर्व विश्वात जे जीव जन्माला येतात त्यांचा समावेश केलेला आहे. इतके विशाल व श्रेष्ठ असे तत्वज्ञान आपल्या नित्य साधनेत असल्यावर, धर्माचा किंवा जातीभेदाचा विचार करणे हे इतके हस्यास्पद आहे की, आपण ह्या विसाव्या शतकात सज्ञानी



आहोत की अज्ञानी आहोत, हा प्रश्न आपण स्वत:लाच विचारावा.

एखादी साधना आपण मार्गादर्शनार्थ म्हणून दीक्षांत विधीने घेतल्यावर ती नित्यनियमाने व प्रामाणिकपणे होत आहे किंवा नाही हा विचार करून त्याप्रमाणे जर साधना केली, तर त्याचे फल आपण अपेक्षा करतो त्यापेक्षा शेकडो पटीने अधिक आहे. ॐकार साधना यामध्ये ॐकार नुसता वाचावयाचा किंवा म्हणावयाचा नसून, मार्गदर्शनाप्रमाणे संथा पध्दतीने (उदात्त, अनुदात्त व स्वरित) साधना केली तरच तिची फलप्राप्ती इष्ट असून, भवितव्यात इतरांनाही तिचा लाभ आपण देऊ शकू. ॐकार साधना ही वाणीद्वारा उदात्त, अनुदात्त व स्वरित. अशी उच्चारली असता बाहेरील वातावरणात कंप तयार होतात. वाणीतून जेव्हां हा उच्चार होत असतो, तेव्हां ध्वनि-लहरी-ध्वनि येथपर्यंत पहिली अवस्था असून, पुढच्या अवस्थेत ध्वनि-लहरी-प्रकाश याचा लाभ जोडावयाचा आहे. अशी साधना झाली तरच अनुष्ठान किंवा साधना झाली असे म्हणता येईल. केवळ पहिल्या अवस्थेतील ॐकार जर केला गेला तर ती साधना नसून, वेळेचा अपव्यय किंवा इतरांचे अनुकरण असा अर्थ होईल. तेव्हां निदान आठवड्यातून एकदा तरी आपण करीत असलेला ॐ कार बरोबर होतो किंवा नाही यासाठी केंद्रावर उपस्थित राहून, होणाऱ्या साधनेत ते पडताळून पहावे. नित्य नियमाने होणारे अनुष्ठान यामध्ये आपण उपस्थित झाल्यावर पांच मिनिटे स्थब्ध राहून ॐकाराची प्रार्थना करावी, म्हणजे मन एकाग्र होते आहे किंवा नाही हे पहावे. जो सेवक संथा सांगण्यासाठी उपस्थित असेल, त्याने सर्व उपस्थित भक्तांची साधना ही आपण करीत असलेल्या उच्चाराबरोबर होते की नाही हे पहावे व इतर

करणारे सेवक यानी स्वत:च्या इच्छेनुसार साधना न करता, आपण करीत असलेला उच्चार नियुक्त सेवकाप्रमाणे होतो किंवा नाही हे पहावे. अशी साधना जेव्हा आपण कराल तेव्हां वर सांगितलेली ॐकाराची दुसरी अवस्था ही अनुभविण्यास येईल व तिचा लाभ स्वत:ला व इतरांना होईल. केवळ साधना किंवा अनुष्ठानास उपस्थित राहून लाभ होणार नसून, वर्षानुवर्षे आपण ॐकार करतो आहोत असे व्यर्थ सांगण्याने आपण स्वत:चे नुकसान करणार आहोत.

आज मानवी जीवनात काया-वाचा-मन हे समप्रमाणात कार्यान्वित होत नसून, केवळ मनाची गती व मनाचा खेळ जीवनात चालला आहे. यापेक्षा ज्या सोप्या अशा मार्गाचा अवलंब केला असता, ही तीन्ही माध्यमे एकाच पातळीवर येऊन, समप्रमाणात जर एक झाली तर जीवनातील सुख, शांती, समाधान ह्या अवस्था बाहेर नसून, आपल्यातच आहेत हे अनुभवास येईल व आपण विश्वशांती निर्माण करू शकू, हा विश्वास आपल्यात निर्माण होईल. खऱ्या अर्थाने ज्या सुखाची अपेक्षा आपण करतो, ते आपल्याजवळच असून, त्याचा शोध त्याप्रमाणे आपण बाहेर घेतो, त्याचप्रमाणे मूळ विश्वउत्पत्तीचा उच्चार, विचार व आचार हा ॐकारात असून, तोही आपल्या ठिकाणी आहे. तेव्हां ईश्वराचा शोध अन्यत्र घेण्यापेक्षा त्याची ओढ लागणे हे अत्यंत महत्वाचे व भवितव्यात प्रत्येक मानवाचे कर्तव्य असून, ह्या विश्वाचा जनक व पालक. ॐकार असून, ॐकार साधनेची प्राप्ती परमपूज्य साईनाथ महाराजांनी करून दिली आहे. त्या साधनेचा लाभ भवितव्यात प्रत्येक व्यक्तीने घ्यावा अशी तळमळीची इच्छा आहे. हीच गुरुकृपा होय!

# गुरुतत्व व त्याचे जीवनातील महत्वाचे कार्य

आपण सूज्ञ भक्तांच्या अभ्यासात मागील सर्व विषय आल्यावर 'स्वाभाविक गुरुभक्ति' हा विषय काय आहे व ती कशी करावी, हे आपल्याला जाणून घेण्याची इच्छा होईल. पण 'गुरुभक्त' किंवा 'गुरुसाधक' याचा अर्थ आपण व्यावहारीक दृष्ट्या एवढाच लावतो की ज्या साधकाने नोकरी धंदा व्यवसाय आदि परावलंबी जीवन न स्वीकारता गुरुभक्तींचे किंवा परमेश्वर उपासनेचे जीवन स्वीकारले आहे, तो गुरुभक्त किंवा गुरुसाधक होय. अशा व्यक्तीस तुम्ही जे गुरु म्हणता त्यांच्या ह्या देहिक अवस्थेतील भाव व स्वभाव यांची तुम्हाला ओळख झाली. पण हे तत्व म्हणजे गुरुतत्व नव्हे. ज्याप्रमाणे कावीळ झालेल्या माणसाला हे सर्व जग कावीळ झाल्यामाणे पिवळे दिसते त्याचपमाणे तुम्ही तुमच्या देहिक अवस्थेतील वासनाविकार, इच्छाअपेक्षा, जीवनातील भवितव्याबद्दलच्या अवाढव्य कल्पना, ऐहिक सुखाबद्दलची सुखद आशी स्वप्ने, हा तुम्ही देहाभोवती धारण केलेला चष्मा असल्याने, त्याच चष्म्यातून तुम्ही तुमच्या गुरुमाध्यामाची ओळख करुन घेता. हे तुमच्या देहिक अवस्थेतील तुमच्या हितार्थ नसलेले देहिक हितसंबध निवारण करण्याचे कार्य ज्या गुरुंना करावयाचे आहे, तोच चष्मा तुम्ही तुमच्या डोळयावर परिधान करता. वास्तविक गुरुकृपाशिर्वादाने हया तुमच्या चर्मचक्षूंना दिव्य दृष्टि प्राप्त करुन देण्यासाठी गुरुमाध्यामाचा जन्म अनादि कालापासून त्रिगुणात्मक अशा तत्वातून झालेला आहे. असे असताना या त्रिगुणात्मक तत्वाने ज्या दिव्य साक्षात्कारातून आपली ही चर्मचक्षूंची दृष्टि या



जगाला कशी व्यापून राहिल यासंबंधीचे जे कार्य अंगिकारले आहे याचा सखोल विचार जो आपण केला पाहिजे तो न करता देहात अनंत जन्मापासून वास करीत असलेल्या दूषित कर्मपरत्वे जे वासनाविकारांचे हितसंबंध या देहाशी आहे ते हितसंबंध त्या दृष्टीत आणून गुरुमाध्यमाला ओळखण्यास तुम्ही जेव्हां जाता तेव्हा तुमच्याप्रमाणे तुमचे गुरु आहेत असे तुम्हाला वाटते. हाच गुरुभक्तितील प्राथमारंभीचा पाया तुमच्या अध:पतनाला कारणीभूत होतो.

गुरुमार्गात किंवा साधनामार्गात साधकाच्या अवस्था दोन प्रकारच्या असतात. प्रथमावस्थेत असलेले साधक म्हणजे ज्यांनी स्थूल व सूक्ष्म या देहांचे एकरुपत्व करुन प्रखर आशा साधनांनी ह्या दोन देहातून खर्च होणारी देहिक शक्ति ही खर्च होऊ न देता किंवा त्याचा अपव्यय विचारअविचारने, विकारवासनेने होऊ न देता, संग्रहित केलेली असते. ही स्थूल व सूक्ष्म देहातील देहिक शक्ति इष्ट देवतांच्या कृपाशिर्वादाने सिध्द करुन ध्यानधारणा योगासाधना इत्यादिसाठी त्या शक्तिचा वापर करुन त्या शक्तिला स्वत:च्या ठिकाणी संधटित केलेली असते. अशी ही देहिक शक्ति इतरांच्या देहिक शक्तिपेक्षा अधिक सबळ असल्याने देहिक अवस्थेतील जे भक्तभाविक आहेत त्यांच्या कल्याणार्थ या देहिक शक्तिचा वापर होऊन त्याच्या अडिअडचणी निवारण्याचे कार्य या साधकाकडून जरी होत असेल तरी केवळ ऐहिक विषय व ते सुलभतेने प्राप्त करून देऊन ऐहिक विषयात जीवन व्यतीत करुन देण्याचे कार्य या देहिक शक्तिने होत असते. ही शक्ति त्या साधकाचे माध्यम म्हणून असते. त्या शक्तिस जरी आपण 'ईश्वरीशक्ती' असे

संबोधलेत तरी तुम्हा मानवाच्या जीवनात ज्या अडिअडचणी जन्मजन्मांतरपरत्वे आल्या आहेत, तेव्हढ़याच ही देहिक शक्ति निवारण करु शकते. परंतु एखाद्या व्यक्तीची अडचण देवादिक ऋणानुबंधाशी जर हितसंबंधित असेल तर त्या व्यक्तीच्या अडिअडचणी निवारणार्थ जरी हया देहिक अवस्थेतील साधकाने काही प्रयत्न केला तरी त्या अडिअडचणांचे निवारण होऊ शकत नाही. कारण ही साधकाची देहिक शक्ति यामध्ये देवदेवतांच्या कृपाशिर्वादाचा अंतर्भाव नसल्याने देवादिकांच्या हितसंबंधात असलेल्या अडचणी निवारणार्थ जरी त्यांनी निराकरणपध्दतीचा अवलंब केला तरी दुख:निवारण होत नाही. याचे कारण केवळ ध्यानधारणा, योगसाधना इत्यादि करुन, स्थूल व सूक्ष्म देहांना एकत्र करुन त्यांच्या शक्तिचा अपव्यय होऊ न देता हीच शक्ति जरी संघटीत केली तरी त्यामधील शक्तिस देवदेवता अनुकूल नसल्याने देवदेवतांच्या हितसंबंधात असलेल्या अडचणी निवारण होऊं शकत नाहीत. याशिवाय ज्या व्यक्तीना या गुरुंच्या किंवा साधकांच्या सान्निध्यात गेल्यावर गुरुदीक्षा, अनुग्रह घ्यावयाचा लोभ होतो त्यांनी जरी गुरुमार्गातील हे आवश्यक कार्य अंगिकारले तरी त्यांच्या माध्यमातून दिल्या जाण्याऱ्या अनुग्रह व गुरूदीक्षा या दीक्षा म्हणून जरी दिल्या गेल्या तरी कालकालांतराने भक्तभाविकांना त्या शिक्षा म्हणून भोगणे भाग पडते.

**गुरुमार्गातील दीक्षा:**

गुरुनामस्मरणदीक्षा, अनुग्रहदीक्षा, गुरुदीक्षा आदि ज्या दीक्षा क्रमश: आपल्या भक्तगणांना द्यावयाच्या आहेत, तत्पूर्वी त्या



भक्ताला प्राप्त जन्मात प्रतिकूल अशा ऋणानुबंधपरत्वे जीवनात जे अनुकूल-प्रतिकूल असे जीवन व्यतीत करावे लागते, यासाठी प्रथमत: त्याचे कर्मविमोचन करावे लागते, हे कर्म विमोचन करण्यास त्या भक्ताला आपल्या देहिक अवस्थेतील शक्तीचा वापर करुन, जन्मकर्म व त्यांतील अनुकूल-प्रतिकूल दोष अनुकूल करुन घ्यावयाचे असतात. हे कार्य त्यांच्या सामर्थ्याच्यापलीकडे असल्याने प्रथम त्याला गुरुनामस्मरण दीक्षा द्यावयाची असते. या गुरुनामस्मरण दीक्षेत काहीं काळ व्यतीत केल्यानंतर त्या भक्ताला वंशविमोचन विधि याची ओळख करुन देऊन तो ज्या घराण्यात किंवा कुटुंबात जन्माला आला आहे त्या कुटुंबातील सात पिढ़ीतील दिवंगत व्यक्तींचा हितसंबंध या गुरुभक्तांशी आहे की काय व त्याचा दुष्परिणाम त्याला गुरुदीक्षा दिल्यानंतर सोसावा लागेल की काय याचा विचार दीक्षा देणाऱ्या गुरुनी करावयाचा असतो. असे वंशविमोचन न करता जर प्रथम गुरुदिक्षेचा लाभ त्याला करुन दिला व त्या गुरुदिक्षेप्रमाणे जे नामस्मरण किंवा सूचित केलेली उपासना आपल्या जीवन उध्दारार्थ तो करेल तर केल्या गेलेल्या उपासनेचा अधिक वाटा हे मृतात्मे की, ज्यांना मरणोत्तर जीवनानंतर सद्‌गती मिळाली नाही ते आपल्या नकळत घेऊन जातात. याचे कारण त्यांना प्राप्त झालेली जी दुर्गति असते त्यांतून उत्तम लोकी जाण्यासाठी त्यांना काही ना काही प्रकारे केलेल्या पुण्याची आवश्यकता असते.

आपण करीत असलेले देवदेवतार्जन, धर्माचरण किंवा नित्य उपासना यातील अर्धाअधिक वाटा जर या मृत योनीने आपल्या मुक्तावस्थेसाठी आपल्यापासून हिरावून नेला तर

आपल्याला किती काळापर्यत व किती जन्मापर्यंत उपासना करणे भाग पड़ेल हे कोणालाही सांगता येत नाही. यासाठी देण्यात येणाऱ्या दीक्षांत विधीपूर्वी या भक्तगणांचे प्रथमतः कर्मविमोचन व नंतर वंशविमोचन करणे हे महत्वाचे कार्य गुरुंना करावयास पाहिजे.

दुसरी दीक्षा, ही अनुग्रह दीक्षा होय. या दीक्षाचा अर्थ असा की, गुरुनीं भक्तांची सिध्दता व तिचे पूर्णत्व प्राप्त करण्यासाठी ज्या त्रिगुणात्माक शक्तीचा कार्यकारणभाव म्हणजे साधकाच्या ठिकाणी आपल्या शक्तीचे कारण देहात संक्रमण करुन, आपल्या मूळ अवस्थेपासून तेथे साकार रुप धारण करुन ती शक्ति साधकाच्या तिन्ही देहिक माध्यमांशी एकरुप होणे. अशा देहातील तिन्ही अवस्थांचे एकरुपत्व साधकाच्या ठिकाणी झाल्यानंतर ती जी शक्ति त्याच्या ठिकाणी वास करीत असते, ती सिध्द स्वरुपात असते. ही शक्ति प्राप्त करण्यासाठी प्रथमावस्थेत साधकाला देवदेवता यांच्या कृपाशिर्वादापासून ते दत्तपरंपरेपर्यत किंवा नाथपरंपरेपर्यत आपल्या साधक मार्गाचा अवलंब करुन साधना करावी लागते. ही साधनार्मागात झालेली जी प्रगति असते तिचा प्रधान विषय जो गुरु म्हणून असतो, तो गुरुविषयी गुरुभक्तांच्या सूक्ष्म देहाच्या ठिकाणी परिचित करुन द्यावा लागतो. या विधीस अनुग्रह दीक्षा विधी असे म्हणतात.

जन्मजन्मांतर या ऋणानुबंधपरत्वे आपण जेव्हां जेव्हां अनेक जन्म घेतलेले आहेत, त्या जन्मपरत्वे प्रत्येक जन्मांत आपले एकच आधिदैवत किंवा गुरुदैवत होते असे नाही व जे होते त्यांची प्रत्येक जन्मात देहिक प्राप्ती झाल्यानंतर जाणीव



राहिलेली नसते. अशा भिन्नाभिन्न उपास्यदेवता, आधिदेवता व गुरुतत्वे जन्मजन्मांतराच्या ठिकाणी अस्तित्वांत असल्याने निश्चित अशा गुरुभक्तीचा मार्ग भक्तांना अवलंब करण्यास कठीण होते. यासाठी ज्या जन्मजन्मांतरात भिन्नाभिन्न उपास्यदेवता, आधिदेवता, गुरुदेवता पूर्वीच्या अनेक जंन्मात सामावलेल्या असतात. त्यांचे विमोचन करुन प्राप्त जन्मातील प्रधान विषय म्हणजे ज्या गुरुंना ते भक्तिभावनेने ईश्वररुप मानीत आहेत त्यांचा एकमेव परिचय या गुरुदीक्षेत करुन देण्यात आल्यावर गुरु हा एकच विषय व तोही जीवन उध्दारार्थ असा संकल्प त्यांच्या जीवनात प्राप्त होतो. त्यामुळे प्राप्त जीवनात इहजन्माचा हितसंबंध असूनही इष्ट अशी पारमार्थिक उन्नति करण्यास त्यांना योग्य असा वाव व संधि मिळते.

पहिल्या गुरुनामस्मरण दीक्षेत वैचारिक कर्माचे विमोचन करावयाचे असते. अनुग्रह दीक्षा विधीपूर्वी वंशविमोचन विधी करुन या पंचभौतिक देहाचा हितसंबंध देहाबाहेरील प्रतिकूल ऋणानुबंधांशी असतो त्याचे विमोचन होण्याने, जे गुरुभक्त नामस्मरण दीक्षा घेतल्यानंतर उपासना अवस्थेत असतात, त्यांचे कर्मविमोचन व वंशविमोचन होण्याने त्यांना साधक अवस्था प्राप्त होते. या प्राप्त झालेल्या साधक अवस्थेपर्यत तुम्ही तुमच्या जीवनातील इच्छित अपेक्षा या अधिक प्रमाणात ऐहिक विषयांचा लाभ करुन घेण्यासाठी जरी विचारात घेतल्या, तरी या साघक अवस्थेपर्यत तुमची पारमार्थिक उन्नति ही पंचवीस टक्के झालेली आहे असे समजावयास हरकत नाही. हे वाचनात आल्यावर आपल्याला काही विशेष प्राप्त झालेले आहे असे विचारात न घेता, या प्राप्त झालेल्या पंचवीस टक्के पारमार्थिक

उन्नतितून आपल्याला अजून इष्ठदेवतांच्या दर्शनाचा लाभ कां होत नाही किंवा दिव्य ज्ञान, दिव्यदृष्टी, त्रिकाल जाणण्याची अवस्था कां निर्माण होत नाही अशी इच्छा आपण प्रकट करुं. पण ही पंचवीस टक्के झालेली तुमची प्रगति जी साधक अवस्थेपर्यतची आहे, ती देवदेवतांच्या दर्शनाचा लाभ करुन घेण्यासाठी किंवा दैविक मार्गात इतर ज्या काहीं गोष्टी वर सांगितलेल्या आहेत त्यांची प्राप्ती करुन घेण्यासाठी नाही. साधक अवस्थेपर्यत पोहोचण्यासाठी आपल्याला जो काहीं कृपाशिर्वादाचा लाभ झाला आहे तो वरील विचारांच्या भावना निर्माण करुन कुणीही भक्तांनी तो कृपाशिर्वाद अनाठायी खर्च करु नये. कारण साधक अवस्थे नंतर सिध्द अवस्थेपर्यतचा काळ अत्यंत कठीण व बिकट आहे. जगतात नानाविध देवदेवतांची उपासना करणारे व अनेक गुरुमार्गी भक्तभाविक हे साधक अवस्थेच्यापलीकडे क्वचितच जातात याचे कारण उपासना या विषयातील वर सांगितलेली जी लक्षणे आहेत ती शेवटच्या म्हणजे साध्य अवस्थेत अनुभवण्याची आहेत. ती अनुभवण्याचा लोभ त्यांना साधक अवस्थेत होण्याने प्राप्त झालेल्या कृपाशिर्वाचा अपव्यय होतो. यासाठी ज्या कृपाशिर्वादाने तुम्ही साधक अवस्थेपर्यत पोहचला आहात त्या अवस्थेची पुढ़िल कठीण अवस्था म्हणजे सिध्द अवस्था प्राप्त करण्यासाठी साधकाला जरी ऐहिक जन्म व ऐहिक विषय व त्या विषयापरत्वे जीवन प्राप्त झाले आहे आणि त्या प्राप्त जीवनात जरी तुम्हाला सुख, शांती, संपत्ती आदि सुखांचा लाभ झाला आहे तरी केवळ ती सुखे अनुभविणे एवढ़ाच जीवनाचा संकुचित अर्थ लावून त्या जीवनाचा यथेच्छा उपभोग घेणे म्हणजे सुखी जीवन असे



व्हावयास नको. उलट या प्राप्त झालेल्या जीवनात सुख, शांती, संपत्ती, संतती हे विषय स्वाभाविक तुमच्या ऐहिक जीवनाचा काहीं एक भाग म्हणून जे अस्तित्वात आहेत ते तुम्हाला भक्ती या विषयाकडून स्वतःकडे ओढ़ण्याचा प्रयत्न सदैव करीत असतात. अशा प्रयत्नाने भक्तिमार्गाबद्दल आपले जे विचार पोषक झालेले असतात त्या विचारांना सद्सदविवेकबुद्धीने आपल्या इच्छाधीन ठेवणे हे सहजासहजी कोणाही साधकाला सहज प्राप्त करुन घेता येत नाही. म्हणून ही पंचविस टक्के झालेली पारमार्थिक उन्नति किंवा पारमार्थिक विकास हे एक साधन तुम्हाला कृपाशिर्वादाने जे दिले आहे ते एवढयाचसाठी की, ऐहिक विषय तुम्हाला तुमच्या ध्येयवादापासून परावृत्त करुन पुन्हा तेच उपभोग घेण्यास ते भाग पाड़तात व अशा ऐहिक विषयात राहून जी पारमार्थिक उन्नति आपणास करावयाची आहे यासाठी हा पंचवीस टक्के कृपाशिर्वाद तुम्ही सुविचारात घेऊन जे तुमचे मन, बुद्धी या विषयातूर होते त्या माध्यमांना आपल्या कर्तव्याची जाणीव करुन देण्यासाठी हा कृपाशिर्वाद उपयोगात आणला पाहिजे. हाच तुमच्या प्रगतीचा पाया आहे.

याचा अर्थ आपण ज्या कुटुंबात जन्माला आलो आहोत व ज्या कुटुंबाच्या कल्याणार्थ आपली इष्टकर्तव्ये आहेत त्याकड़े पाठ फिरवून आपले उद्दिष्ट साध्य करण्यासाठी ह्या कर्तव्याच्या ज्या प्रापंचिक जबाबदाऱ्या आहेत त्याकड़े दुर्लक्ष होता कामा नये. कारण शास्त्राप्रमाणे प्रापंचिक विषय हासुद्धा पारमार्थिक आहे व पारमार्थिक विषय हासुद्धा ऐहिक आहे. याचा अर्थ काय तर ऐहिकामध्ये पारमार्थिक म्हणजे आपल्या जीवनातील गरजेपरत्वे जी जी कांही सुखे प्राप्त झालेली आहेत त्याबद्दल समाधान व्यक्त

करुन समाधानी राहणे हा विचार पारमार्थिक अवस्थेचा पाया आहे. पारमार्थिक अवस्थेत चोविस तास ईश्वराचे चिंतन करणे म्हणजे परमार्थ नव्हे. त्या चिंतनात आपल्या कर्तव्याची जाणीव ठेवून, 'ती यथायोग्य करण्याचे कर्तव्य मलाच करावयाचे आहे', हे विचारात घेऊन जीवन व्यतीत करणे म्हणजे ऐहिक विषयातून पारमार्थिक विषय व पारमार्थिक विषयातून ऐहिक विषय असे दोन विषय जेव्हां तुम्ही विचारात घ्याल त्यावेळी जो जन्म इष्ठ कर्तव्यपूर्ततेसाठी प्राप्त केला आहे त्याचे सार्थक होईल व ह्या जन्मात जे इष्ठकर्तव्य करावयाचे आहे ते प्राप्त करण्याचेही सार्थक आपण प्राप्त करते व्हाल. हा जो विचारांचा समतोलपणा तुम्हाला सहजासहजी प्राप्त करुन घेता येत नाही व ज्यांची प्राप्ती कृपाशिर्वादाशिवाय होऊं शकत नाही असा कृपाशिर्वाद तुम्हीं जीवनात पंचवीस टक्के उपासना अवस्थेपासून साधक अवस्थेपर्यत मिळविलेला आहात.

आता अनुग्रह दीक्षेपासून गुरुदीक्षेपर्यतचा जो काहीं काळ भक्तभाविकांना गुरुमार्गदर्शनाप्रमाणे आचरणात आणावयाचा आहे, ही जबाबदारी गुरुभक्तांनी सोपी आहे असे समजू नये. कारण ज्या गुरुतत्वाशी तुम्हीं एकरुप झाला आहात व ज्या तत्वाच्या ठिकाणी तुम्हाला परमेश्वरच्या सगुण साकार स्वरुपाचा अनुभव झालेला आहे, तो अनुभव येण्यास गुरुमाध्यमानेही यथोचित कर्तव्य केले आहे. अशावेळी मार्गदर्शनात तुम्हाला जी नित्य उपासना सूचित करण्यात येते त्या उपासनेशी तुम्ही भक्तभावनेने एकनिष्ठ रहावयास पाहिजे. ती उपासना किती लहान आहे हे विचारात न घेता, तो गुरुप्रसाद आहे म्हणजे ती लहान नसून महान आहे, अशा भावनेचा आविष्कार तुमच्या



विचारातून ओतप्रोत भरला गेला पाहिजे. कारण अशा अवस्थेतून आपला जो पुढ़ील विकास व्हावयाचा असतो, ही जबाबदारी भक्तभाविकांपेक्षा गुरुंची अधिक असल्याने ते सोप्यात सोपी व लहान अशी उपासना एवढ्याचसाठी सूचित करतात की तुमच्या नित्य उपासनेने तुमच्या देहात व देहाबाहेर त्या उपासनेतून आवश्यक इतकीच व तुमच्या पुढील अवस्थेला पोषक आहेत अशीच वलये निर्माण व्हावयास पाहिजेत. समजा गुरुंनी तुम्हाला 'राम' एवढयाच नामाचा उच्चार कर असे म्हटले तर 'हे नांव मी पूर्वी घेतच होतो. या नावाने माझा काय उद्धार होणार ? ' असा विचार निर्माण होता कामा नये. गुरुवाणीतून निघालेला शब्द हा कुणा देवाला उद्देशून नसतो, तर गुरुचे ठायी वास करीत असलेल्या शक्तीचे सक्रमण शब्द स्वरुपाने त्यांना भक्तामध्ये करावयाचे असते. तो सूचित शब्द ध्वनित झाल्यावर त्या शब्दातून निर्माण झालेले स्पंद ध्वनित होऊन जेव्हा तुम्ही ते श्रवण करता त्यावेळी गुरुचे ठायी वास करीत असलेली शक्ति शब्दस्वरुपामध्ये म्हणजे शब्दब्रह्माने तुमच्याशीं हितसंबधित होते. एवढा त्याचा अर्थ विचारात घेऊन गुरुवाणीतून निघालेला शब्द हेच ब्रह्म हा विश्वास ठेवावा. त्याऐवजी 'राम' शब्द उच्चारला आहे म्हणून आपण 'श्रीराम जयराम जयजय राम' इतका अधिक 'राम' शब्दचा उच्चार करुन काहीं अधिक कृपाशिर्वाद प्राप्त करुं अशी जी तुमची पारमार्थिक मार्गाबद्दलची भावना आहे ती कोणत्याही जन्मी तुम्हाला साकार करता येणार नाही.

ही अवस्था प्राप्त झाल्यानंतर साधक अवस्थेपासून सिद्ध अवस्थेपर्यत जाण्याची महत्वाची जबाबदारी साधकाला किंवा

गुरुभक्ताला आपल्या जीवनामध्ये प्राप्त करुन घ्यावयाची आहे. त्यापूर्वी गुरुमाध्यमाद्वारा होणाऱ्या लोककल्याणाची भूमिका माहिती असावयास पाहिजे. जे गुरुमाध्यम साध्य अवस्थेपर्यत सिद्ध आहे अशांचे पंचभौतिक शरीर म्हणजे देह आपल्याला सारखाच वाटला तरी त्यांच्या ठिकाणी दोन शक्तींचा आविष्कार झालेला असतो. या दोन शक्तींना समतोल प्रमाणामध्ये कार्य करण्यास प्रेरणा देणारी तिसरी शक्ति असते ती म्हणजे त्यांच्यावर झालेली गुरुकृपा किंवा देवदेवतांची कृपा. प्रथम ज्या दोन शक्ति आपल्या कल्याणार्थ कार्य करीत असतात त्यांपैकी देहिक शक्ति ही तुमच्या अडिअडचणी निवारणार्थ गुरुमाध्यमातून कार्य करीत असते. ह्या शक्तीद्वारा तुमच्या कल्याणार्थ जे उद्‌गार गुरुवाणीतून उच्चारले जातात ते सत्य अनुभविण्यासाठी त्यांची आत्मिक शक्ति कार्य करते व वाणीतून उच्चारला गेलेला शब्द भक्तांच्या जीवनात कार्य करण्यासाठी जी तिसरी शक्ति कार्य करते ती गुरुकृपा किंवा देवदिकांची कृपा असते.

अशा ह्या तीन प्रकारच्या शक्ति साधक अवस्थेतील माध्यमास एकतर पूर्वपुण्याईने प्राप्त झालेल्या असतात किंवा ह्या जन्मामध्ये गुरुआज्ञेप्रमाणे सेवासाधन करुन त्या मिळविलेल्या असतात. असा हा गुरुकार्याच्या शक्तीचा विस्तार आजपर्यत आपल्याला माहीत नसल्यामुळे आपण अनेक ठिकाणच्या मार्गदर्शनास बळी पडता. भूतभविष्याबद्दल ज्या काही गोष्टी अवास्तव सांगून आपल्याला आपल्या जीवनातील भविष्यकाळाबद्दल फोल अशा आशेला जे साधक लावतात, अशा साधकांचे कार्य हे फक्त देहिक शक्तीतून कार्य करीत असते.



पण जे साधक तीनही शक्तीतून कार्य करीत असतात, ते मार्गदर्शन करीत असतांना 'तुम्ही देवाच्या कृपेने सुखी व्हाल', इतकेच वाणीद्वारा उच्चारुन भक्ताला आपल्या कर्तव्याची जाणीव करुन देतात. पण चुकूनही भविष्यकाळाबद्दल आशेची दिशा दाखवून अधिक भक्तगण जोडण्याचा ते प्रयत्न करीत नाहीत.

पहिल्या देहिक अवस्थेतील साधकांच्याबाबतीत गुरुमार्गाला लांछनास्पद असणारी त्यांची कार्यपद्धति अशी अनुभवाला येते की, जरी काही साधनामार्गाने त्यांनी देहिक शक्ति इतरांपेक्षा अधिक प्राप्त केलेली असली तरी त्यांच्या देहाशी हितसंबंधित असलेले विकार व षड्‌रिपू हे काहीं त्यांना जिंकता आलेले नसतात. त्यामुळें त्यांच्या मार्गदर्शनार्थ आलेल्या भक्तांमध्ये जे सुखवस्तु असतात, श्रीमंत असतात किंवा ज्यांना सट्टा जुगार आदींचे व्यसन असते, अशांच्या लोभाला हे साधक बळी पडतात. साधक अवस्थेतील पूर्णत्व हे तीन शक्तींचे एकरुपत्व आहे. ते ज्या साधकाच्या ठिकाणी साकार झालेले असते, तो समाजातील ह्या ऐहिक सुखांपासून सदैव विन्मुख असतो. त्याला समाजातील धनिक लोकांचा आधार किंवा आश्रय घेण्याचे कदापिही कारण पडत नाही. कारण तो गुरुआश्रित असतो.

पहिल्या अवस्थेतील साधकांपेक्षा थोडीबहुत उच्च अवस्था म्हणजे ज्यांची आत्मिक शक्ति ही देहिक शक्तिबरोबर कार्य करते आहे अशा साधकांना समाजातील ऐहिक सुखे अनुभविणाऱ्या व्यक्तींबाबत थोडासा आदर वाटून त्यात आपण सहभागी व्हावे असे वाटते. पण देहिक अवस्थेतील साधकांइतके

ते या विषयाकडे आकर्षित होत नाहींत. कारण त्यांनी अंगिकारलेल्या कार्याची जाणीव त्यांचे आत्मिक तत्व वारंवार करुन देत असते. पण ह्या साधक अवस्थेतील जे कोणी साधक आहेत ते जरी पहिल्या अवस्थेपेक्षा उच्च आहेत तरी त्यांच्या कार्यपद्धति ह्या समाजाला अधिकच मोहित व आकर्षित करणाऱ्या असतात. कारण या अवस्थेत साधकांना क्षुद्र सिद्धि प्राप्त झालेल्या असतात. याचे कारण दोन शक्तींची अवस्था पूर्ण होऊन तिसऱ्या शक्तीचा आरंभ झालेला असतो. अशावेळी त्यांना ह्या ज्या क्षुद्र सिध्दी प्राप्त होतात त्या माध्यमातून ते नानाविध प्रकारचे चमत्कार समाजापुढे दाखवून हे चमत्कार म्हणजे देवाचे अस्तित्व आहे असा भास निर्माण करतात. त्या व्यतिरिक्त ह्या साधकांच्या जीवनात अनेक शास्त्रीय पुस्तके, धर्मग्रंथ, वेदवेदांत इत्यादि वाचनात आल्याने त्यांचे त्या विषयातील भाषाप्रभूत्व ते इतरांपेक्षा अधिक असते. त्यामुळे ऐकणारा मोहवश होऊन हे आपण ब्रह्मज्ञान ऐकत आहोत अशा गुंगीत तो त्या गुरुमाध्यमाचा लाभ घेत असतो.

तिसरी महत्वाची गोष्ट म्हणजे हे साधक तिसऱ्या अवस्थेचे पूर्णत्व प्राप्त करते झाले नसल्याने त्यांचा इहजगतात जन्माला येण्याचा जो काहीं कार्यकारणभाव आहे त्या कारणपरत्वे त्यांनी या जगतात अचूक व नेमके कोणते कार्य करावे याची मार्गदर्शनदिशा गुरुकृपाशिर्वादाने त्यांना मिळत नसल्याने आजकाल असा अनुभव आपल्या वाचनात व ऐकण्यात येतो की अमुक एक हे परदेशी गेले आहेत व सध्या कांही कालपर्यत पाश्चिमात्यांना आध्यात्मिक ज्ञानाची प्राप्ती करुन देण्यासाठी ते अमुक एक कालपर्यत तेथे राहणार आहेत. वास्तविक यातील



सत्य फक्त परमेश्वरालाच माहीत आहे. ज्यांना आपल्या कार्यार्थ वर्तमानपत्राचा आधार लागतो त्या साधकाजवळ निराधार अशा भक्तांच्या आयुष्याला आधार देण्याचे सामर्थ्य आहे किंवा नाही हे सूज्ञ भक्तांनी समजून घ्यावे. वास्तविक आज परदेशात जाऊन वास्तव करण्याचा मोह हा विद्यावान विद्यार्थाला व्हावयास पाहिजे. कारण आपल्या भारतापेक्षा वैज्ञानिक युगाची प्रगति पाश्चिमात्य देशात अधिक झाली असल्याने त्या शास्त्रांचे अध्ययन करुन त्या शास्त्रात संशोधन करुन, ती शास्त्रे आपण भारतीयांच्या कल्याणार्थ कशी उपयोगात आणता येतील अशी या विद्यावान व्यक्तींची इच्छा असणे स्वाभाविक आहे. पण त्याउलट या साधक व्यक्तींची पाश्चिमात्य देशात जाण्याची स्पर्धा चालू असून, नित्याने वाचनात व ऐकण्यात हेच येते की ह्या साधक व्यक्ती परदेशात कार्यार्थ गेल्या आहेत, वास्तविक जे साधक भारतीय आहेत त्याना आपल्या समाजातील जे दु:खी लोक अज्ञानाने आपले जीवन व्यतीत करीत आहेत व ज्यांना जीवन कल्याणाचा मार्ग त्यांच्या ज्ञानाअभावी विचारात घेता येत नाही अशाना सज्ञान करावयाचे असते. असे असताना हे उठताबसता पाश्चिमात्य देशात वास्तव करतात. तेथे हे साधक काय कार्य करतात हे आपण पांच किंवा दहा हजार मैलावरुन पाहू किंवा बघू शकत नाही. म्हणून केवळ परदेशागमनाचा जरी पोशाख त्यांनी आंगिकारला आहे तरी त्यांच्या अंतर्मनाचे ठिकाणी देवाचे वास्तव्य किती आहे हे आपणास सहज कळेल. जर तो साधक पूर्णात्वानें तिसऱ्या अवस्थेची म्हणजे गुरुकृपा किंवा देवादिकांची प्राप्ती करता होईल तर त्याला आपले जीवन ज्या कार्यार्थ व्यतीत करावयाचे आहे ते कार्य नि:संकोचपणे, निरपेक्षपणे,

नि:स्वार्थपणे, समाजाला कसे देता येईल या जाणीवेने तो आपल्या कार्याशी एकरुप होऊन श्रीसद्‌गुरुआज्ञेने त्यांनी नेमून दिलेले कार्यक्षेत्र व त्यांची किमान मर्यादा यांचे चुकू नही उल्लंघन करणार नाही.

आज आपल्या देशाची भौतीक प्रगति नाही म्हणून नाईलाजास्तव आपल्या विद्यावंत विद्यार्थ्यांना जशी पाश्चिमात्यांची मनधरणी करण्यासाठी जावे लागते तसेच ज्या देशात तेथील देशबंधवांचा आध्यात्मिक विकास झालेला नाही किंवा ज्यांना इहजन्माचे कर्तव्य काय आहे हे कळलेले नाही अशांना आपल्या प्राप्त जन्माची जाणीव करुन घेण्याची जर भूक लागली असेल तर त्यांनी भारतामध्ये येऊन या ज्ञानाचे लाभ मुक्तहस्ते व मुक्तकंठाने अवश्य घ्यावा. पण आम्ही साधक गुरुआश्रित असून गुरुपदाचे दास असून त्यांचे सेवक असूनसुद्धा आज केवळ पाश्चिमात्यांना त्या शास्त्राची 'तहान' लागली आहे तीसुद्धां क्षणिक पण अजून 'भूक' नव्हे असे असतानाही अनादि कालापासून जतन केलेली शास्त्रे तेथील देशांत नेऊन ज्यांना आपल्या आचाराने, विचाराचे, संस्कृतीचे, नीतीमत्तेचे, देवादिकांचे भय-अभय नाही अशांना ती देण्याचे कार्य म्हणून जे अंगिकारले आहे अशा या भूमिकेस 'कार्य' म्हणता येईल काय? उदाहरणार्थ आपल्या घरातील मुलेबाळे अन्न, वस्त्र, निवारा यांच्या अभावी दु:खी असताना इतरांसाठी अन्नछत्र व निवारा जो चालवितो, त्याला सूज्ञ पिता म्हणता येणार नाही. तीच अवस्था आज परदेशात जाणाऱ्या साधकांनी निर्माण करुन ठेवलेली आहे. परदेशगमनाचे व तेथील अगणित भक्तांच्या संख्यांचे शेपूट ही उपाधी मागे लावल्याने ह्या मार्गात आपण श्रेष्ठ आहोत व केवळ



बाहेरुन अंगिकारलेल्या अशा ह्या मार्गापासून आपण कार्य करीत आहोत असे भासविणे, हे सत्य पटणारे नाही. याउलट कोणतीही परदेशी उपाधि तुम्ही आपल्या व्यक्तिगत जीवनात न अंगिकारुन, जर नि:स्वार्थ, निरपेक्ष बुद्धीनें आपले जीवन देशबांधवासाठी व्यतीत केलेत व त्याची जाणीव होऊन जर पाश्चिमात्य देशातील बंधुबांधवांना खऱ्या अर्थाने जीवन उद्धाराची भूक लागली, तर साधकहो, तुम्ही ही त्यांची भूक नि:स्वार्थ, निरपेक्ष बुद्धीनें शमन करण्याचे कर्तव्य प्रथम करा. पण तत्पूर्वी जी विद्या अनादिकालापासून शास्त्रपरंपरेपासून देवादिकांपासून जतन केली गेलेली एकच अशी संपत्ती आहे की अनेक आक्रमणे वेगवेगळया देशपरत्वे होऊनसुद्धा ही आपली संपत्ती कोणालाही हिरावून घेता आलेली नाही, ती संपत्ती केवळ स्वत:चा व्यक्तीगत नांवलौकिक व्हावा म्हणून जर तुम्ही या देशाबाहेर नेणार असाल तर ते कदापिही तुम्हाला यशदायक होणार नाही. कारण या भूमीची अनादी कालापासूनची परंपरा अशी आहे की जी शास्त्रे आपल्या हितार्थ व कल्याणार्थ ती ऋषीजनांनी व देवादिकांनीं निर्माण केली, त्या शास्त्रांचा पाया हा देवदेवतांधिष्ठित आहे. तुम्ही व्यक्तिगत माहात्म्य व प्रतिष्ठा वाढावी म्हणून जरी परदेशगमन केलेत व तेथे कार्य म्हणून काहीं संस्था स्थापण केल्यात आणि शास्त्राच्या नावाखाली जरी स्वत:ला उजेडात आणलेत तरी ज्या शास्त्राचे अधिष्ठान 'देवदेवता' आहेत ती शास्त्रे परदेशापर्यत पोहचली तरी देवदेवता परदेशगमन करणार नाहीत हे निश्चित् लक्षात ठेवून पुढील काळात आपण अंगिकारलेले कार्य केवळ भारतात करावे की परदेशात करणे उचित आहे हे तुम्हीच ठरवावे. मात्र शास्त्रपरत्वे तुम्ही वेषांतर,

देशांतर, धर्मातर करता आहात. हे जरी तुमच्या व्यक्तिगत देहाधीन आहे तरी देवतांचे देशांतर करण्यासाठी तुम्ही अनेक जन्म जरी घेतलेत तरी ते कोणत्याही जन्मात तुम्हाला शक्य होणे अशक्य आहे.

आपण भक्तास साधकावस्थेमध्ये लोककल्याण कार्य करीत असणाऱ्या दोन भिन्न साघक माध्यमांच्या लोककल्याण कार्याची कार्यपद्धती ही निवेदन करण्यात आली. आता ज्या साधकाचे ठिकाणी देहिक व आत्मिक शक्ति यांचा विकास झाला आहे व या दोन्ही शक्ति गुरुकृपाशिर्वादाने कार्य करतात अशा या तिसऱ्या आवस्थेतील साधकाचे कार्य इतरांप्रमाणे जरी या पंचभौतिक माध्यमातून होत असते तरी जो देह या पंचभौतिक तत्वातून निर्माण झालेला असतो त्या पंचभौतिक देहाचे सर्व देहिक धर्म व अंतर्गत भावभावना त्यांच्या देहाधिन असत नाहीत व जरी असल्या तरी साधकाच्या इच्छाअपक्षेप्रमाणे त्या कार्यान्वित होत नाहीत. कारण या दोन शक्ति गुरुतत्वाशी किंवा गुरुशक्तीशी जेव्हा एकरुप होतात तेव्हा त्या साधकांचे ऐहिक अस्तित्व हे जरी आपल्या अनुभवास आले किंवा आपण त्याचा परिचय करुन घेतला तरी ज्या तिसऱ्या तत्वाचा आविष्कार त्यांच्या पंचभौतिक तत्वांत गुरुकृपाशिर्वाद म्हणून झाला आहे अशा साधकाच्या कार्याची योजना. ही साघकाच्या इच्छाअपेक्षेवर अवलंबून नसून ती गुरुशक्ति आधीन असते व त्या शक्तीपरत्वे होणारी प्रेरणा ही जेव्हा तुम्हा भक्तभाविकांच्या जीवनाशी एकरुप होते त्या क्रियेलाच 'कृपाशिर्वाद' असे म्हणतात.

आता हाच कृपाशिर्वादाचा प्रकार प्रथमावस्थेतील साधक



म्हणजे देहिक शक्तीतून कार्य करणाऱ्या व आत्मिक शक्तीतून कार्य करणाऱ्या व्यक्ती हाच कार्यकारणभाव व्यतीत करीत असतात. पण अशा शक्तीचा जो लाभ आपणास होत आसतो त्याला कृपाशिर्वाद असे न म्हणता केवळ आशिर्वाद असे म्हणावे लागते. हे दोन शब्द एकमेकांजवळ अधिक हितसंबंघात जरी बोलण्यात येतात तरी ह्या शब्दातून व्यक्त होणारी क्रिया किंवा क ार्य हे समजण्याइतके सोपे व सुलभ नाही. जेव्हा आपण आशिर्वाद घेतो तेव्हा याचे कार्य आपल्या जीवनात मर्यादित कालपर्यंतच राहून पुनश्च आपल्या जीवनाला विस्कळीतपणा येतो. पण कृपाशिर्वादाचा लाभ ज्यांना होतो त्यांना ह्या जन्मात तो निरंतर स्वरुपामध्ये तर मिळतोच, पण पुढेही तो कृपाशिर्वाद जन्मोजन्मी आपले इष्टकर्तव्य करीत असतो. आम्हा मानवांचा जन्म हा पाच ऋणानुबंधपरत्वे झाला आहे हे वर आपल्याला निवेदन केलेलेच आहे. त्यापैकी केवळ एक ऋणानुबंधपरत्वे म्हणजे जन्मकर्म व त्यापरत्वे आलेल्या अडिअडचणी निवारणार्थ जो पहिल्या दोन साधकवस्थेतील साधकांचा आपण लाभ करुन घेता व तो त्यांना सुलभपणे जरी करुन देता येत असला तरी जे तुमचे जीवन पांच ऋणानुबंधाशी हितसंबंधीत आहे. त्या ऋणानुबंधापैकी एकच ऋणानुबंध जर तुम्ही अनुकूल करुन घेतलात व त्यापरत्वे जरी सुख, शांती, समाधानाची प्राप्ती झाली तरी राहिलेले चार ऋणानुबंध आपल्याला अनुकूल आहेत किंवा प्रतिकूल आहेत हे आपणास तर समजत नाहीच, पण साधकांना या ऋणानुबंधाची ओळख होत नसल्याने प्राप्त झालेले सुख हे आपण कांही काळापर्यत अनुभविल्यानंतर इतर चार ऋणानुबंधांमुळे पुनश्च पहिल्याप्रमाणे आपल्या जीवनात बिकट

समस्या निर्माण होतात.

ज्या साधकाच्या ठिकाणी या तिन्ही शक्तींचे एकरुपत्व होऊन कृपाशिर्वादाचा साक्षातकार झालेला आसतो, त्या व्यक्तींच्या मार्गदर्शनार्थ आपण गेल्यावर जो मार्गदर्शनाचा लाभ आपल्याला होतो, हा लाभ घेत असताना आपण भक्तांना केवळ क्षणिक सुखाचीच जाणीव असल्याने, आपल्याला प्राप्त झालेला कृपाशिर्वाद व त्याचे सामर्थ्य हे आपण जाणते होत नाही. कारण ह्या साधकांच्या कार्यपद्धीचा पाया ऐहिक किंवा क्षणिक सुखाचा लाभ करून देण्याचा ऐहिक जीवनातील अडिअडचणी निवारणार्थ मार्गदर्शन करणे हे त्यांचे प्रधान कार्य नसते. हे कार्य त्यांना एवढयासाठी करावयाचे असते की बहुजन समाजातील बहुजन लोकांना आपल्या प्राप्त झालेल्या जीवनाबद्दल, देवादिकबद्दल, धर्माबद्दल, कर्तव्याबद्दल व प्राप्त जन्माचे सार्थक कशात आहे याची जाणीव व्हावी. पण हे जे त्यांचे कार्य, लोकसंग्रह करुन त्यांना मार्गी लावण्याचे आहे या त्यांच्या प्रधान कार्याचा बोध आपण भक्त न घेता केवळ अडिअडचणी निवारण्यासाठीच या साधकांनी ह्या जगतामध्ये हे कार्य अंगिकारले आहे असे समजून तुम्हाला सुलभपणाने व सोप्या मार्गाने जाण्याचा गुरुमार्ग जरी परमेश्वराने निर्माण करुन दिला आहे तरी आपल्या समोरील साधकमाध्यम हे कोणत्या कार्यार्थ या जगतामध्ये आपल्या हितार्थ आपले आयुष्य वेचित आहे याची जाणीव न होण्याने जरी या जन्माचे सार्थक करण्याइतके सामर्थ्य या गुरुमाध्यमाचे ठिकाणी आहे तरी आपल्या अज्ञानामुळे ह्या बहुमोल अशा कृपाशिर्वादाचा लाभ आपण घेऊ शकत नाहीं. या साधकांच्या कार्यपद्धतीत जो प्रधान विषय तुम्हा मानवांच्या



कल्याणार्थ असतो, त्या विषयात तुम्हा भक्तांचे आचारविचार तुमच्या जीवनाला पोषक करुन देणे व ज्या देवदेवता तुमच्या घराण्याच्या किंवा कुटुंबियांच्या आहेत, त्यांच्या कृपाशिर्वादास आज तुम्ही आपल्या आचारविचाराने आशिर्वाद घेण्यास पात्र नसता, ती पात्रता आपल्या मार्गदर्शनाने तुम्हाला प्राप्त करुन देणे हा हेतु असतो. याशिवाय जो तुम्हा मानवांचा जन्म पांच ऋणानुबंधपरत्वे झाला आहे, या ऋणानुबंधातील अनुकूल-प्रतिकूल अशा क्रियेमुळे तुमच्या घराण्यात विद्यानाश, धननाश, संततीनाश होत आहे त्यांचेही ते ऋणमोचन करतात. ही मार्गदर्शने ऐहिक जगतासाठी असतात. पण प्राप्त जन्मात आपला हितसंबंध हा पारलौकिक तत्वाशीही आहे. त्याचेसुद्धा जे हितसंबंध मातृपितृ ऋणामुळे, इतरजनांच्या ऋणामुळे आज आपणास भोगावे लागतात, त्या परलोकावरही त्यांची एवढ़ीच सत्ता असते. त्यामुळे जे हे दोष पिढ़यान्‌पिढ़यातील कीड म्हणून आज समाजात अनुभवास येत आहेत त्यांचेही विमोचन ते आपल्या सामर्थाने सहज लीलया करीत असतात. ही दोन निराकरणे म्हणजे अधिदैविक व आध्यात्मिक असून ती सहजासहजी ऐकीवात आहेत व अनुभवातील आहेत. पण जी आधिभौतिक निराकरणे आहेत की, ज्यांचा संबंध तुम्हां भक्तांच्या जीवनामध्ये स्थळ, काळ, वेळ (Space, Time, Limit ) यापरत्वे येत असतो, यालाच आपण अकस्मात संकट असे म्हणतो. या संकटाची पूर्वसूचना कधीही व कुणासही येत नाही. पण आपण ह्या जन्मात जेव्हा सर्वस्वाने सद्‌गुरुरुप होतो, तेव्हाच याचा लाभ आपण भक्तांस मिळतो. कारण ज्या अकस्मात संकटाने अकस्मात अशी हानी आपल्या जीवनात होणार आहे,

यासाठी आपापल्या घरी बसून व सद्‌गुरु आपल्या निवास्थानी बसून हे कार्य त्यांना करता येत नाही. यासाठी वेळोवेळी गुरुदर्शनास जाऊन त्याचा लाभ घेतला पाहिजे. आज आपली भूमिका अशी असते की, जेव्हा अडिअडचणी निर्माण होतात तेव्हाच आपण प्रश्नांची विचारणा करण्यासाठी गुरुस्थानी जावयाचे. पण मध्यांतरीच्या काळात तुमच्यावर काय संकटे येणार आहेत ही जाणीव संकटे कदापिही तुम्हाला देत नसल्यामुळे त्या संकंटाचा आघात किरकोळ स्वरुपापासून ते व्यक्तीचे आस्तित्व नष्ट होणे इथपर्यत तीव्र असतो. यासाठी सोपा उपाय जो पूर्वी गुरुमार्गत सूचित केला आहे त्यासच ‘सत्संग’ असे म्हटले आहे.

साधक अवस्थेतील या तिन्ही अवस्था वाचनात आल्यावर आपण एवढाच विचार करुं शकाल की, गुरुमार्ग हा इथपर्यत आहे. पण या गुरुमार्गातील तीन अवस्था व त्या अवस्थेपर्यतचे जे गुरुकृपाशिर्वादाचे कार्य असते त्याचसंबंधी फक्त विवेचन झाले आहे. या तिन्ही अवस्था प्राप्त होऊन साधकांच्या ठिकाणी आविष्कार झालेली शक्ति साधकाच्या माध्यमातून लोककल्याणार्थ कार्य म्हणून सेवा स्वरुपात केली जाते. ही सेवा नि:स्वार्थ, निरपेक्ष बुद्धीने दोन तपांपर्यत झाल्यावर साधक हा गुरुकृपाशिर्वादाने ‘कारण’ व ‘महाकारण’ अशा महान दीक्षा प्राप्त करण्यास पात्र होतो. याचा अर्थ असा असतो की, दोन तपांपर्यत लोककल्याणार्थ अंगिकारलेली सेवा ज्या शक्तीच्या कृपाशिर्वादातून साधकाच्या देहिक माध्यमातून केली जाते त्या शक्तीच्या मूळ स्वरुपाशी हा साधक एकरुप होऊन ‘कारण दीक्षा’ व ‘महाकारण दीक्षा’ या अवस्थेप्रत जाण्यास पात्र होतो.



उदाहरणार्थ या तिसऱ्या अवस्थेतील साधक हा देवदेवता उपासक असेल किंवा दत्त उपासक असेल अगर नाथपरंपरेचा उपासक असेल तरी कारण दीक्षेत तो साधक ज्या शक्तीमाध्यमामुळे कार्य करतो त्या मूळ शक्तीच्या स्वरुपाशी एकरुप होऊन तो पूर्णत्वानें मूळ शक्ति स्वरुप होतो. या अवस्थेला प्राप्त झाल्यावर साधकाला नाईलाजास्तव आपण अंगिकारलेल्या लोककल्याणाच्या कार्यातून बाजूला व्हावे लागत असले तरी, हा प्राप्त झालेला बहुमान याबद्दलचा मोठेपणा त्यांना न वाटता, या साधक अवस्थेपूर्वीपर्यतची प्राप्त झालेली साधना ते आपल्या प्रेमळ अशा भक्तांत शक्तिस्वरुपाने संक्रमण करुन त्यांना आपल्या कार्यात सामावून घेऊन आपण अंगिकारलेले कार्य ‘नियुक्त सेवक’ म्हणून त्यांना सुपूर्द करतात. याचा अर्थ गुरुंनी मार्गदर्शन करण्याचे बंद केले आहे असे मानून आपण नियुक्त सेवकाकडून मार्गदर्शन न घेण्यात चूक करतो. वास्तविक अशा प्रकारचे कार्य करणारी परंपरा अनादिकालापासून नाथसांप्रदायात असल्यामुळे उत्तरोत्तर होणारी जी प्रगति ती जर हा साधक 'हा प्राप्त झालेला गुरुसामर्थ्याचा ठेवा माझ्यासाठीच आहे' असे म्हणून या दोन तपानंतर ती शक्ति स्व:तचेच ठिकाणी ठेवता झाला तर परंपरेने पुढिल काळात जे कार्य लोककल्याणार्थ म्हणून चालावे ही परंपरा न चालता त्या साधकाच्या अंतकाळानंतर त्याने या काळापर्यत केलेली सेवा व त्या सेवाकार्यार्थ प्राप्त केलेली सिद्धसाधना ही त्याच्याबरोबर लयास जाते.

गुरुमार्गातील वरील दीक्षा विधींची परंपरा ही काही काल्पनिक स्वरुपाची नसून हिचा उगम श्रीनवनाथपरंपरेपासून

चालत आलेला आहे. या दीक्षा ज्या क्रमशः देण्यात येतात व जे गुरुभक्त त्यांचा अंगिकार करतात. ही एकमेकातील कृपाशिर्वादाची देवाणघेवाण, हिचा दोघांनीही आस्थापूर्वक विचार करुन ती कार्यान्वित करावयास हवी. पण जे गुरुमाध्यम साध्य अवस्थेच्या पूर्णावस्थेला पोहोचलेले असते त्यांचे इहजगतातील लोककल्याणाचे कार्य व त्या कार्यार्थ अंगिकारलेला मानवी जीवनाचा विषय आणि विषयपरत्वे मानवी जीवनात निर्माण होणारी दुःखे जी कर्मपरत्वे, ऋणानुबंधपरत्वे व देवादिकपरत्वे असतात, अशा ह्या दुःखांचे प्रथमतः कर्मपरत्वे निराकरण, ऋणानुबंधपरत्वे निराकरण व देवादिकपरत्वे आचरण, अशा कार्यपद्धतीतून त्या मार्गदर्शनाचा लाभ जर भक्तभाविकांना गुरुमाध्यमाकडून मिळेल तरच त्यांच्या उद्धारार्थ किंवा कल्याणार्थ त्यांना दिल्या जाणाऱ्या दीक्षा म्हणजे उपासना दीक्षा, गुरुनामस्मरण दीक्षा, अनुग्रह दीक्षा व गुरु दीक्षा ह्या ज्या क्रमशः घ्यावयाच्या आहेत त्या दीक्षांपरत्वे त्या भक्तभाविकांचा यथोचित देहिक, आत्मिक व कारणिक विकास होण्यास काहीही अडथळा निर्माण होत नाही. ह्या ज्या दीक्षा क्रमशः सांगितल्या आहेत त्या केवळ आपण या समाजात गुरुस्थानाला पात्र झालो आहोत किंवा आपण भक्तगणामध्ये आदरणीय आहोत म्हणून देण्याचा हव्यास साधकाने न करता आपणास जो दीक्षा देण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे तो ज्या भक्तभाविकांना द्यावयाचा आहे तो देण्यापूर्वी साधकाने आपली जबाबदारी अशी विचारात घ्यावयास हवी की, 'माझ्या भक्तांच्या ऐहिक कल्याणार्थ व जीवन उद्धारार्थ मी ज्या दीक्षा माझ्या भक्तगणांना देणार आहे त्या दीक्षांची अनुभूती मला पूर्णतः आलेली आहे किंवा नाही?



',असा प्रश्न अप्रत्यक्ष समाजातील साधकांच्या बाल्यावस्थेतील कार्य म्हणून करणाऱ्या व्यक्तींना कां विचारण्यात येत आहे? याचे कारण असे की ज्या ज्या व्यक्तींनी समाजातील अनेक भक्तभाविकांना अशा दीक्षाविधीत समावेश करुन त्या दिल्या आहेत त्यांचे बरेवाईट अनुभव गेल्या पंचवीस वर्षात या कार्यपद्धतीत मार्गदर्शन करताना आलेले आहेत.

अनेक व्यक्ती सुखसमाधानाने संसार करीत असताना व आपल्या जीवनातील कर्तव्यांची जाणीव अंगिकारुन सुखसमाधानाचे आयुष्य व्यतीत करीत असताना अशा प्रकारच्या गैरदीक्षा घेण्याने अनेक व्यक्तींनी आपल्या कुटुंबाकडे व आपल्या कर्तव्याकडे पाठ फिरवून परमार्थाचे राज्यपद आपल्याला या गुरुदीक्षेमुळे प्राप्त होणार आहे या आशेने बहुमोल अशा आयुष्याचा अनाठायी अपव्यय केला आहे. असे अनेक प्रकार या दीक्षावीधी नंतर दीक्षा घेतलेल्या व्यक्तींमध्ये अनुभवास येतात. दीक्षाविधीपूर्वी 'देव' हा शब्दसुद्धा उच्चारलेला नसतो व 'परमार्थ' हा विषय खाण्यापिण्यासाठी आहे की आचरणासाठी आहे हेही विचारात घेतलेले नसते. पण या दीक्षाविधीनंतर चोवीस तास बोलता चालता 'गुरुदेव दत्त', 'हरि ॐ' अशा देवांच्या नावाने हाक मारणे चालू असते. जणू काही देव यांच्या हाकेला आपली कर्तव्य सोडून 'ओ' देण्यास आपल्या दारात उभा आहे. याशिवाय कोणी स्नेही, इष्टमित्र, नातेवाईक भेटीस आल्यानंतर एकमेकांच्या कुटुंबातील कुशल विचारण्याऐवजी भक्तीमार्ग व परमार्थ या दोन विषयावर बोलण्याचा अधिकार आपल्याला प्राप्त झाला आहे असे भासवून आलेल्या परिचीत व्यक्तीसमोर ह्या व्यक्तीचे वक्तव्य चालू होते.

त्यावेळी या सगळया प्रकारात दीक्षा मोठी, साधक मोठा, देव मोठा की, बडबडणारा मोठा? असा संभ्रम ऐकणाऱ्याच्या मनात होतो. अशासाठी अशा दीक्षाविधीपासून प्रत्येकाने दक्षता ही घ्यावी की, निदान ह्या जन्मात देव न भेटल्यामुळे आपले काही नुकसान होणार नाही. पण ज्या कर्तव्यासाठी तुम्ही जन्माला आलात ते कर्तव्य न करता ती व्यक्ती देवाचा आणि परमार्थाचा शोध लावण्यासाठी आयुष्य खर्च करील, तर पुढच्या पिढ्याना अशा भक्तांनी या प्रकारे देवांचा शोध लावण्यासाठी जे आयुष्य खर्च केले त्याचा दुष्परिणाम भोगावा लागतो.

दीक्षाविधी संबंधीचा सविस्तर खुलासा आपल्याला योग्य प्रकाराने विचारात घेता यावा म्हणून अनुभवसिद्धपद्धतीने निवेदन करण्यात आले आहे. याशिवाय ज्या उपासनेचा उल्लेख वर करण्यात आला आहे, त्याची पुनश्च येथे ओळख करुन देण्याने त्याचे कारण अधिक स्पष्ट व्हावे म्हणून पुन्हा त्याच दीक्षा विधीसंबंधी मार्गदर्शन केले जात आहे.

प्रथमत: उपासना दीक्षा हिचा हितसंबंध तुमच्या घराण्याच्या परंपरेतील कुलदेवता यांच्याशीं संबंधित आहे. जेव्हा आपण आपल्या घरात काही धार्मिक विधि करावयाचे ठरवितो त्या विधि आरंभी प्रथम आपण आपल्या इष्ट कुलदेवदेवता यांच्यासमोर नारळ, विडा, सुपारी व दक्षिणा हे ठेवूनच घरात होणाऱ्या विधिसाठी कृपाशिर्वाद मागतो. त्याप्रमाणे भवितव्यात ज्या दीक्षांचा क्रमश: स्वीकार करणार आहोत त्या गुरुदीक्षांचा स्वीकार जरी गुरुमाध्यामाकडून व्हावयास आहे तरी तत्पूर्वी आपल्याला आपल्या घराण्यातील कुलदेवतांचा कृपाशिर्वाद



असणे अत्यावश्यक आहे. या उपास्य देवदेवतांच्या दीक्षाविधीचा संस्कार आपली 'काया' हिच्यावर होणे महत्वाचे असते.

त्यानंतरची दीक्षा म्हणजे गुरुनामस्मरण दीक्षा. हिचा हितसंबंध जरी गुरुतत्वाशी असला तरी ही दीक्षा गुरुतत्वाशी संबंधित नसून आपल्या वाणीशी संबंधित आहे. कारण वाणीचा धर्म हा शब्दस्वरुपाने उच्चार करुन आपला विचार व्यक्त करण्याचा भाव इतरांना समजावा असा जरी असला, तरी ह्या वाणी माध्यमाच्या होणाऱ्या विषयपरत्वे ज्या क्रिया आहेत त्या क्रियांचा हितसंबंध परा, पश्यंति, मध्यमा, वैखरी आदीनी होत असतो. या स्वाभाविक क्रिया व त्यांची अनुभूति ही क्रमश: पुढ़ील दीक्षांत विधीमध्ये अनुभवास येते. पण तत्पूर्वी या वाणीला त्या क्रियाची ओळख करुन देण्यासाठी ही नामस्मरण म्हणून दीक्षा देण्यात येते. तिचा हितसबंध गुरुंशी न लावता तो आपल्या वाणीशी आहे असा विचार निश्चित करुन गुरुदीक्षेच्यावेळी जे नामस्मरण अमुक इतक्या संख्येने करावे असे सांगितले जाते. पण ज्याकडे आपण जाणून दुर्लक्ष करता ते न करता वाणीला स्वाभाविक क्रिया प्राप्त करुन देण्यासाठी म्हणजे वाणी सिद्ध करण्यासाठी ही दीक्षा आहे हा त्याचा अर्थ लक्षात घेऊन ही दीक्षा म्हणजे गुरुकृपाशिर्वादप्राप्ती असा विषय कोणीही समजू नये.

अनुग्रहदीक्षा ही वाचनात व ऐकण्यात आल्यावर आपण असा अर्थ लावतो की, जे आपले गुरुमाध्यम आहे ते माध्यम ज्या गुरुपरंपरेचे आहे त्या परंपरेतील दीक्षा व तिचा स्वीकार करते झालो आहोत. उदाहरणार्थ आपले गुरुमाध्यम नाथपरंपरेपैकी किंवा दत्तपरंपरेपैकी आहे म्हणून अनुग्रह दीक्षाविधि आपण

स्वीकारला म्हणजे आपण दत्तपंथी किंवा नाथपंथी असे नसून ही जी दीक्षा आहे तिचा संस्कार मनावर करण्यात येतो. कारण मनाचा कार्यकारणभाव व ह्या जन्मात देहपरत्वे त्याचे कार्य हे जन्मकर्म व जन्मजन्मांतराशी संबंधित आहे. त्यामुळे अनेकवेळा असे अनुभवास येते की, एखादी गोष्ट अधिक तीव्रतेने जेव्हा करावीशी वाटते, तेव्हा थोड्या बहुत अंशाने ती न करावी असाही संकेत होतो. पहिल्या अवस्थेतील संकेत हा जन्मपरत्वे असतो व त्यात आपण यशस्वी होणार नाही, ही जाणीव जन्मजन्मांतराला असल्यानें त्याकडून पहिल्या अवस्थेला प्रतिसाद न मिळता जाणीव स्वरुपात हा संकेत देहमाध्यमांकडे पाठविला जात असतो, अशा दोन्ही अंदाजांशी हितसंबंधित असणारे मन हे साधक अवस्थेमध्ये एका विषयाशीच एकाग्र होणे अत्यावश्यक असते म्हणून हा अनुग्रहदीक्षाविधी मनावर करण्यांत येतो.

असा हा साधक अवस्थेतील महत्वाचा दीक्षाविधि व ज्यांचा संस्कार मनावर होणे अत्यावश्यक आहे ती साधनपरंपरा वाचनात किंवा ऐकण्यात जरी येत असली तरी प्रत्यक्षात ती कार्यन्वित करणे हे साधन अत्यंत कठीण आहे. कारण मन म्हणून ज्या काहीं माध्यमाचा विचार देहाच्या हितसंबंधाशी जोडला जातो अशा मनाच्या स्वाभाविक अवस्था तरी किती आहेत याची ओळख आजपर्यत कोणी साधकाने करुन दिली असेल असे वाटत नाही. मन हे व्यक्त व अव्यक्त अशा क्रियेद्वारे कार्य करीत असते. मनाची व्यक्त अवस्था ही स्थूल देहाकडे असून जन्मकर्मपरत्वे हा देह जो सर्वदा विषयाधीन होण्याचा प्रयत्न करीत असतो, त्याला जरुरीप्रमाणेच विषयाधीन होण्याचा धर्म प्राप्त व्हावा यासाठी स्थूल मन हे त्या पंचभौतिक शरीराला



विचार स्वरुपामध्ये विषयापासून परावृत्त करण्याची जाणीव करुन देत असते. त्यामुळे देहिक धर्म हा जरी विषयाधीन होण्याचा असला तरी जरुरीपेक्षा अधिक जर देह हा विषयाधीन होईल तर देहद्वारा करावयाची प्राप्त कर्तव्ये यशस्वी होणार नाहीत.

मनाची अव्यक्त अवस्था म्हणजे सूक्ष्म मन. याचा संबंध जन्मजन्मांतराशी असून त्याचे अव्यक्त कार्य कारणदेहाशी असते. आपण जो पूजनादि विधी करतो ही क्रिया देहधर्मपरत्वे होते. परंतु आपण करीत असलेली पूजा ही जी क्रिया आहे त्यास पुण्य म्हणता येणार नाही. ज्या भाव-भावनेपरत्वे ही क्रिया देहमाध्यमद्वारा केली जाते. तत्पूर्वी त्या क्रियेबद्दलच्या भावभावना आपल्या ठिकाणी निर्माण झालेल्या असतात. तुमच्या ठिकाणी असलेल्या सूक्ष्म मनद्वारा किंवा ज्याला अंतर्मन असे म्हणतात त्या माध्यमाद्वारे या भाव व भावना यांची निर्मिती होते. अशा भावनात्मक क्रियेतील पूज्यतेमुळे हा पूजनादि विधि केल्यावर तो भाव अव्यक्त स्वरुपामध्ये सूक्ष्म मनाचे ठिकाणी सामावला जाऊन तो पुढे कारण देहाशी सामावला जातो. अशा देहाद्वारा होणाऱ्या क्रियेस ‘पुण्यसंचय’ म्हणतात. अशाप्रकारे तुम्ही अंगिकारलेली अनुग्रहदीक्षा ही काहीं काळापर्यत योग्य तऱ्हेने आचारविचारात घेऊन जेव्हा गुरुमार्गदर्शनाप्रमाणे तुम्ही सेवा करते होता. त्यानंतर काही काळापूर्वी तुम्ही आपल्या जीवनातील जो काहीं काळ सेवासाधनेत व्यतीत करुन कारण देहाच्या ठिकाणी पुण्यसंचय केलेला असतो तो पुण्यसंचय हा जरी स्वतःच्या पुढील जन्माची तरतूद म्हणून करावयाचा असला तरी त्या पुण्याचा लाभ आपण इतरांच्या कल्याणासाठी विचारात घेतला

तर प्राप्त केलेल्या पुण्याईपेक्षा अधिक पुण्याई सेवाव्रतातून प्राप्त होत असते. अशी साधनामार्गातून संचय केलेली पुण्याई ही आपण जरी ऐच्छिक विषय म्हणून प्राप्त करुन घेत असलात तरी त्याचा लाभ स्वत:ला किंवा कुटुंबातील इतर व्यक्तींना या जन्मात जर तुम्हाला द्यावयाचा असेल तर त्यासाठी प्राप्त केलेले पुण्य योग्य साधकाकडून सिद्ध करावे लागते. यदाकदाचित् या जन्मात सेवापरत्वे संचय केलेली पुण्याई ही जर सिद्ध करुन आपणास कार्यान्वित करता आली नाही तर ती पुण्याई पुढिल जन्मात तुमच्या वाट्याला येते. अशी वाट्याला आलेली पुण्याई ही सिद्ध होऊन, तिचा योग्य तो लाभ होण्यासाठी म्हणून जी प्रथम दीक्षा, उपासनादीक्षा म्हणून सांगितलेली आहे ती तुमच्या इष्ट देवदेवतांशी संबंधित असल्यामुळे जीवनातील प्रथमारंभी तुम्हाला जीवनामध्ये सुख शांती, समाधान हे प्राप्त करुन देण्यात येते. प्रथम अवस्थेत याचा जर लाभ झाला नाही तर दीक्षा ज्या जीवनोद्धारार्थ आहेत त्यासाठी आवश्यक पुण्याचा संचय करण्यासही कौटुंबिक परिस्थिती समाधानकारक नसल्यामुळे तुम्हाला योग्य वाव मिळत नाही. गुरुमार्गदर्शनाप्रमाणे तुम्ही आपली प्रगती करुन घेण्यासाठी गुरुमार्गत दैवदैविक उपासनादीक्षेपासून ते अनुग्रह दीक्षाविधिपर्यतचा काळ परमेश्वराच्या सेवेत व चिंतनात व्यतीत करता त्या काळात जो पुण्यसंचय तुमच्या सेवामार्गातून तुम्हाला प्राप्त झालेला असतो ते पुण्य सिद्ध करुन कार्यान्वित करण्यासाठी जी दीक्षा देण्यात येते ती ‘गुरुदीक्षा’ होय.

गुरुमार्गातील दीक्षाविधींचा लाभ ज्या भक्तभाविकांना करुन देण्यात येतो किंवा जे लाभ घेतात, त्यांना त्यांच्या देहिक



अवस्थेमध्ये काय स्थित्यंतरे झाली आहेत याची जाणीव होणे महत्वाचे आहे. आपल्या स्थूल मनाचा व बुद्धीचा देहाशी जो हितसंबंध आहे व जो हितसंबंध कर्मपरत्वे जीवनात व्यतीत होत असतो तो योग्य कारणपरत्वे व्यतीत व्हावा यासाठी स्थूल मन व बुद्धि या दोन माध्यमांमध्ये समतोलपणा निर्माण व्हावा यासाठी हे पहिले दोन दीक्षाविधि आहेत. अनुग्रह दीक्षाविधीत सूक्ष्म मन व सूक्ष्म बुद्धि (लहान मेंदू) यांचे योग्य असे कार्य जीवनात होणे आवश्यक आहे ते घडविले जाते. या माध्यमांचा साधक अवस्थेत फार महत्वाचा कार्यकारणभाव आहे हे न जाणल्यामुळे याकडे आपले दुर्लक्ष होते. त्यामुळे दीर्घकाळ जरी भिन्नाभिन्न देवदेवतांची, उपास्य देवतांची, गुरुंची सेवा मनोभावे केली तरी त्याची आत्मिक अनुभूति ही अनुभवास येत नाही. जो गुरुदीक्षा विधि भक्तांच्या कल्याणार्थ दिला जातो या दीक्षाविधीचे परिपूर्णत्व याचा अनुभव ‘समाधि अवस्था’ म्हणून अनुभवास येतो. अशा समाधि अवस्थेचा कार्यान्वित होण्याचा कार्यभाग म्हणजे, कारण देहाच्या ठिकाणी जो ईश्वर हा विषय धारण झालेला आहे त्याच्याशी जेव्हां सूक्ष्म मन व सूक्ष्म बुद्धि तदाकार होतात तेव्हां देहिक अस्तित्व विलयास जाऊन कारण अवस्थेत कारणदेहात जो ईश्वर हा विषय आहे तो साक्षात्कार स्वरुपात देहमाध्यमात साकार होतो. त्यावेळी देहिक स्थितीची जाणीव जाऊन ईश्वर या विषयात देह पूर्णत: एकरुप होतो. अशा अवस्थेलाच समाधी अवस्था असे म्हणतात. प्राप्त झालेली गुरुदीक्षा व त्या दीक्षेची आत्म प्रचीति ह्या योगे समाधि अवस्थेपर्यत नेण्याचे साधन जरी त्या गुरुदीक्षा विधीत आहे ह्या दीक्षाविधीचा स्वीकार केल्यानंतर मार्गदर्शनाप्रमाणे आपण आपले

आचारविचार या दीक्षा विधीस पोषक असे ठेवून जर सूचित केलेले साधन योग्यवेळी व योग्य प्रकाराने केले तरच आपल्याला जो दीक्षाविधि ज्या संाप्रदायपरंपरेने देण्यात आला त्या संप्रदायमध्ये आपण त्या संप्रदायाचे गुरुभक्त झालो असे सिद्ध होते. उदाहरणार्थ दत्तसांप्रदाय किंवा नाथसांप्रदाय. या दीक्षांचे परिपूर्णत्व प्राप्त झालेल्या साधकांची प्रगति ही समाधि अवस्थेपर्यंत होते असे वाचनात आल्यानंतर स्वाभाविक तुम्हा भक्तांना हे साधन इतके सोपे व सुलभ आहे तर जे साधक या अवस्थेपर्यत व पुढेही पोहचले असतील त्यांची समाधि लागते किंवा नाहीं व लागली तर ती किती काळापर्यत लागू शकते असा प्रश्न आपल्या ठिकाणी निर्माण होणारच. समाधि अवस्थेत गेल्यानंतर स्वतःचे व जगातील अन्य विषयांचे विस्मरण आपल्याला होणे असा अर्थ नसून दीक्षाविधीनंतर कारणदेहाचे ठिकाणी जो पुण्यसंचय तुम्ही करते झालेले आहात, त्या पुण्य संचयाला ‘सिद्धावस्था’ प्राप्त झाल्यावर त्या सिद्धावस्थेला कार्यार्थ प्रधान विषय म्हणून ‘गुरुआज्ञा’ व्हावी लागते. ऐहिक जीवनात आपल्या बोलण्या चालण्यात अमुक एकाने अमुक करावे असे जे बोलतो त्यालाही आज्ञा असे म्हणतो. पण आज्ञा हा जो शब्द आहे हा ध्वनिरुपात तुम्हास ऐकावयास मिळत नसून सूक्ष्म बुद्धि व सूक्ष्म मन हे कारण देहाशी जेव्हा एकरुप होते व तेथील पुण्याई ह्या दीक्षाविधीनंतर जेव्हा सिद्ध होते त्यावेळी ईश्वराचे अस्तित्व हे जरी साकार स्वरुपात दिसत नसले तरी त्याच्या इच्छेचे स्पंद या माध्यमामध्ये साकार होतात व मग ते त्या साधकाला याचे ज्ञान विचार स्वरुपात देतात. यालाच प्रेरणा म्हणतात. या प्रेरणेप्रमाणे जो साधक गुरुअंकित होऊन



गुरुआज्ञेप्रमाणे जीवनातील अन्य विषय गौण मानून ‘गुरु’हा विषय प्रधान ठरवेल त्या साधकाच्या क्रियेला ‘आज्ञा’ असे म्हणतात. अशी आज्ञा व प्रेरणा यांचे प्रधान विषयाशी एकरुपत्व करुन जेव्हा साधक ‘माध्यम’ बनून कार्य करतो तेव्हा केले गेलेले कार्य याची चुकूनही जाणीव देहिक अवस्थेला जाणवत नाही. अशी जेव्हां स्थिती होते त्यावेळी तो साधक प्रधान विषयपरत्वे जी सेवा अंगिकारतो त्या सेवेचे समाधान कोणत्याही ऐहिक विषयामधून मिळत नाही अशा सात्विक व शुद्ध समाधानात तो मनुष्य स्थितप्रज्ञ असतो. ही अवस्था प्राप्त करणे म्हणजे समाधि अवस्था होय.

वर सांगितलेल्या चार दीक्षा विधीनंतर तो साधक सिद्धावस्थेप्रत जातो. हा सिद्धावस्थेपर्यतचा काळ स्वतःच्या देहिक, आत्मिक व कारणिक या अवस्थांचा विकास होण्यासाठी व योग्य विषयापरत्वे कार्यान्वित होण्यासाठी त्याचा लाभ झाल्यावर, सिद्धावस्थेतील साधकाने स्वतःच्या जीवनाबद्दल अहंभाव न ठेवता ज्या परमेश्वराच्या कृपाशिर्वादाने ह्या पदापर्यंत पोहोचलो त्याची जाणीव ठेवून ऐहिक जगामध्ये आपल्या परिसरामध्ये येणाऱ्या नानाविध विषयांपासून अलिप्त राहून प्राप्त झालेल्या कृपाशिर्वादाचा लाभ निरपेक्ष व निःस्वार्थ बुद्धीने देऊन बहुसंख्य भक्तांच्या जीवनात देवाबद्दल, धर्माबद्दल, स्वतःच्या इष्ट कर्तव्याबद्दल, प्राप्त झालेल्या जन्माच्या उद्धाराबद्दल जे अज्ञान आहे त्याचे निरसन करुन घेतले पाहिजे. ही सेवा करीत असताना आपल्याला परमेश्वराने जो कृपाशिर्वाद दिला त्यावेळी आपल्यातील कमीअधिक दोषांकडे लक्ष न देता आपल्याला ‘आपला एक भक्त आहे व त्याचा उद्धार मला करावयाचा आहे’

ह्या जाणीवेने त्या परमेश्वराने आपल्याला कृतार्थ केले आहे, तेव्हा आपण अंगिकारलेली सेवा ही कृतार्थ भाव व भावनेतून जगताला परिचित होणे अत्यावश्यक आहे अशी भावना ठेवावी.

या चार दीक्षाविधी नंतर साधकाला जी सिद्धावस्था प्राप्त होते त्यामुळे मनुष्यमात्राच्या जन्माचे जे हितसंबंध ऋणानुबंधपरत्वे इहजगताशी असतात त्यातून तो मुक्त होऊन गुरुऋणाशी हितसंबंधित होतो. अशावेळी पुढील अवस्थांचा म्हणजे 'कारण दीक्षा' व 'महाकारण दीक्षा' यांचा लाभ करुन घेण्यासाठी त्याचे देहिक माध्यम विकसित होते. आज आम्हा मानवांचा प्राप्त जन्म हा कर्माधीन असल्याने परिपूर्ण जीवन हे कर्मपरत्वेच व्यतीत करावे लागते. पण कारणदीक्षेपासून महाकारण दीक्षेपर्यत जो काळ साधकाच्या जीवनामध्ये पुढिल जन्माचा कार्यकारण भाव प्राप्त करुन घेण्यासाठी आहे, अशावेळी कारण अवस्थेतील दीक्षा प्राप्त करून ती सिध्द करण्यापर्यंत जर साधक या साधनेबद्दल कृतार्थ राहिल तर पुढिल जन्म कर्मपरत्वे न येता तो इच्छापरत्वे प्राप्त होईल. असा जन्म जेव्हा एखादी व्यक्ती प्राप्त करते तेव्हा त्याच्या बाल्यावस्थेपासूनच त्याच्या ठिकाणी सामावलेल्या ईश्वरी तत्वाचा अनुभव यावयास लागतो. पूर्वजन्मपरत्वे अशी अवस्था प्राप्त करुन असा साधक पुनश्च इच्छाजन्मी होता झाल्यावर पूर्वजन्मातील कारण दीक्षेप्रमाणे त्या त्या इष्ट प्रेरणा होऊन पुनश्च तो त्याच गुरुसेवेच्या व्रताचा अंगिकार करीत असतो. अशा अवस्थेत आत्मिक व कारणिक या अवस्था जरी पूर्णत्वाने विकसित असल्या तरी जगताला आपला जन्म घेण्याचा परिचय व्हावा म्हणून त्यांना पंतभौतिक देहमाध्यमाची गरज पडते. अशा अवस्थेत जरी त्यांनी



पंचभौतिक देह हा कार्यार्थ माध्यमाची गरज पडते, अशा अवस्थेत जरी त्यांनी पंचभौतिक देह हा कार्यार्थ माध्यम म्हणून अंगिकारला असला तरी गुरुप्रेरणेप्रमाणे त्या देहालाही ते आपल्या सेवेने सिद्धवस्थेत नेऊन पोहोचवितात. अशामुळें पुनश्च त्यांनी धारण केलेली देहिक अवस्था ही जन्मतःच त्यांना सिद्धावस्था म्हणून कार्यान्वित करता येते. अशा अवस्थेला 'ईश्वरस्वरुप अवतार'असे म्हणतात.

ही त्यांची देहिक स्थिती इहजगतात सर्वसामान्य माणसाप्रमाणेच क्रियाकर्म करीत आहे असे जाणवत असल्याने त्यांच्या ठिकाणी ज्या प्रखर अशा शक्तीचा वास आहे त्याची जाणीव त्यांच्या परिचित भक्तांना न होण्याने असे हे सिद्धपुरुष आपल्या कल्याणार्थ इहजगतात मानवी रुपात येऊनसुद्धा आपल्या मानवी दृष्टीला त्यांच्या जन्मातील ही गूढता देहात अंतर्भूत असलेल्या शक्तीची भव्यता व सर्व जगातील दुःखी लोकांना आपल्या ठिकाणी सामावून घेऊन जे दुःखी आहेत त्यांचे दुःख आपलेच आहे अशा भक्तियुक्त सहिष्णूतेने ते जगाच्या कल्याणार्थ जे आयुष्य वेचित असतात याचे ज्ञान होत नाही. असा हा त्यांचा निःस्वार्थ, निरपेक्ष सद्हेतू हा प्रेरणेनुसार जरी परमेश्वरस्वरूप असतो व त्यांचे बोलणे चालणे हे सामान्य माणसाप्रमाणेच आपल्या अनुभवाला येत असते, तरी त्यांचे भक्तांबद्दल आचारविचार हे ब्रह्मस्वरूप असतात. आपण कर्मबंधनाने देहात असल्याने आपल्या ठिकाणी विचारआचारांचे, इच्छावासनांचे रागलोभांचे द्वैत अहर्निश चालू असते. अशामुळे जरी नकळत काहीं एक कष्ट न करता पूर्वजन्मातील काहीं पुण्याईची उतराई म्हणून अशा ईश्वरीस्वरूप अवतारी पुरूषांचा

लाभ झाला तरी आपण आपल्याच अज्ञानाने ईश्वराने आपल्या कल्याणासाठी अंगिकारलेली ही अपूर्व योजना असूनसुध्दा त्याचा यथोचित लाभ घेऊ शकत नाही. ही 'कारणदीक्षा अवस्था' जशी इच्छाजन्मी असते तशीच ती इच्छामरणी असते. अशा संत पुरुषांना आपले इष्टकार्य या जगताशी काय आहे व किती काळ आहे हे कळल्यानंतर ते त्या काळपर्यंत आपले जीवन व्यतीत करून अल्पकाळातही या जगताचा निरोप घेतात. अनेक वेळा असे बोलण्यात येते की अशा अधिकारी व्यक्ती ह्या अल्पायुषी कशा होतात? पण ते त्यांचे अल्पायुष्य व त्यांचे सामर्थ्य आपण जन्म घेत असलेल्या जन्मकर्म बंधनाच्यापलीकडचे असल्याने आपणास घ्यावे लागणारे दीर्घकाळ असे सात जन्म व त्यांचा एक जन्म इतका तात्विक फरक यात आहे. यामुळे इष्ट कार्याची फलश्रुति झाली की पुढील अवस्था प्राप्त करून घेण्यासाठी व पुढील कार्याची योजना ईश्वरी प्रेरणेने अंगिकारण्यासाठी ते अल्प काळात निघून जातात. यातच त्याच्या जन्माची सार्थकता आहे. आपणास दीर्घकाळ जगण्यात व दीर्घायुषी होण्यात जो काहीं मोह वाटतो, याचे कारण आपल्यासमोर जन्माला येण्याचे कर्तव्यकारण काय आहे याचा उगम कोणत्याही जन्मात झाला नसल्यामुळे कर्मपरत्वे सुखे निर्माण करणे व ती भोगून पुढील जन्मासाठी नवीन अशा दु:खांची निर्मिती करणे एवढेच आपल्या जन्माचे कार्य आहे. त्यामुळे आपण जरी दीर्घायुष्य प्राप्त केले तरी जोपर्यंत प्राप्त झालेल्या जीवनाची सफलता होत नाही तोपर्यंत ह्या दीर्घकाल प्राप्त झालेल्या आयुष्याची यत्किंचितही शोभा नाही.

सिध्दावस्थेचे पूर्णत्व होईतोपर्यंत प्राप्त होणाऱ्या दीक्षा ह्या



मानवी स्वरूपात वास करीत असलेल्या परमेश्वराच्या आशिर्वादाचा लाभ आहे, पण कारणदीक्षेपासून ते महाकारणदीक्षेपर्यंत जो काळ साधकाच्या जीवानत व्यतीत होतो त्या काळात ह्या दोन महान दीक्षा, ह्या त्या साधकाचे जे गुरुतत्व असेल तेच गुरुतत्व त्या साधकाला ही दीक्षा देत असते.

आपण भक्तांच्या जीवनात वर निवेदन केलेल्या सिध्दपुरूषांच्या कार्याचा लाभ घेण्याचा सुयोग आलाही असेल किंवा पुढेमागे येईलही. पण जे सिध्दस्वरूप सत्पुरूष आहेत त्यांच्याकडे आपण गेल्यावर सूज्ञपणाने काय इच्छा व्यक्त करावयाची याचे सारासार ज्ञान नसल्याने व आपण आपले जीवन केवळ एक ऐहिक सुखाचा संसार म्हणून जो खेळ मांडला आहे. त्या विस्कळीत झालेल्या जीवनाच्या खेळाला सुव्यवस्थितपणा येऊन अधिक ऐहिक सुख कसे प्राप्त करून घेता येईल ही इच्छा विचारात घेऊन आपण ह्या सिध्दपुरूषांच्या दर्शनार्थ किंवा कृपाशिर्वादार्थ जात असतो. हा आम्हा मानवांचा जन्म ज्या कर्मपरत्वे झाला आहे त्यात ऐहिक सुखे कमीअधिक प्रमाणात प्राप्त होणे स्वाभाविक आहे. पण जो परमार्थ प्राप्त करण्यासाठी अनेक जन्मापर्यंत मनुष्य जन्म घेऊनही तो प्राप्त करता येत नाही. तो "मला कसा प्राप्त करून घेता येईल व आपण आपल्या कृपाशिर्वादाने कृतार्थ करून त्याचा लाभ मला करून द्याल काय"? अशी नम्र भावनेची इच्छा चुकूनही कुणा भक्ताच्या वाणीतून उद्‌गारली जात नाही. याला कारण सिधद्दपुरूषांचे सामर्थ्य किती आहे हे जाणण्यास व ओळखण्यासाठी आज आपण असमर्थ आहोत. त्यांच्या सामर्थ्याची जर ओळख करून द्यावयाची झाली तर तुमच्या

जीवनातील ऐहिक अपेक्षापूर्ति करण्यापासून ते जन्ममरण्याच्या बंधनातून मुक्त करण्यापर्यंतचे सामर्थ्य त्यांच्या ठिकाणी असते. अशा सामर्थ्याचा लाभ होऊनही आपण आपले आयुष्य सद्‌गुरुंना वाहण्यास तयार होत नाही. अनेकवार आपल्या वाचनात असे येते की कुणी अवतारी पुरूषाने आपल्या भक्तांचे अल्पायुष्य टाळले. अशी जी असामान्य लीला हे सहजलीलया करतात. हे त्यांचे सामर्थ्य नियतिच्या सामर्थ्यावरही मात करते. जेव्हां तुम्हा भक्तांच्या जीवनात अकस्मात मृत्युयोग, अपघात किंवा जन्मकर्मपरत्वे येणारी अन्य संकटे असतात त्यावेळी तुमची देहिक स्थिती अशी असते की तुमचे जन्मकर्म व जन्मजन्मानंतर ही एकमेकापासून विभक्त होण्याच्या मार्गावर तरी असतील किंवा पूर्णत: विभक्त झाली असतील. अशा वेळी या दोन अवस्थांमध्ये जी पोकळी मिर्माण झालेली असते ती पोकळी म्हणजे या दोन ऋणानुबंधांचे संबंध एकमेकांशी नसणे. अशा वेळी त्या व्यक्तीचे अपघाती निधन, अपमृत्यु इत्यादि संकटे त्याच्या कुटुंबियाना भोगावी लागतात. अशी ही पोकळी आपल्याला जरी जाणवत नसली तरी ती सिध्दपुरूषांना जाणवताच ते स्वत:च्या कृपाशिर्वादाच्या सामर्थ्याने ही पोकळी व्यापून दोन्ही ऋणानुबंधांना कृपाशिर्वादाशी एकरूप करतात. अशा रीतीने जेव्हां आपण संकटमुक्त होतो तो आपल्या जीवनातील क्षण हा पुनर्जन्माचाच होय हा सुविचार करून पुढील आयुष्य ऐहिक विषयांच्या सेवेसाठी त्या ऐहिक विषयाच्या पायाशी ऐहिक सुखप्राप्ती होण्यासाठी त्याची मनधरणी करण्यासाठी वाहावयाचे की ज्या कृपाशिर्वादाने तुम्हाला पुनर्जन्म प्राप्त झाला आहे त्या गुरुचरणाशी हे आयुष्य वाहावयाचे हे ज्या सूज्ञ



भक्तभाविकाला समजेल व त्याचे जे जीवन सद्‌गुरुकृपाशिर्वादाने पुनर्जिवीत झाले आहे त्यापुढील आयुष्यांत तो भक्तभाविक जर ऐहिक विषयांकडे विन्मुख होऊन गुरुपदाशी एकरूप होईल तर प्राप्त जन्माचे जे उद्दिष्ट कृतार्थ होण्याचे आहे त्यासाठी पुढे प्राप्त करावे लागणारे साधारण तीन जन्म व कर्मपरत्वे भोगाव्या लागणाऱ्या यातना यातून तो मनुष्य मुक्त होऊन गुरूकृपाशिर्वादाने प्राप्त झालेल्या जीवनात तो ह्या कृतार्थाची प्राप्ती करता होतो.

या नंतरची महान दीक्षा ही महाकारणदीक्षा होय. वर निवेदन केलेली कारणदीक्षा व महाकारणदीक्षा या दीक्षा विधींचा लाभ साधकाला प्रत्यक्ष परमेश्वराकडून होत असल्याने पहिल्या अवस्थेत, म्हणजे कारणदीक्षेत तो परमेश्वरस्वरूप म्हणून जगत्कल्याणाचे कार्य अंगिकारतो. ह्या कार्याचे पूर्णत्व म्हणजेच दीक्षेची पूर्तता. अशानंतर जेव्हां या साधकाला महाकारण दीक्षा प्राप्त होते त्यावेळी तो इच्छाजन्मी व इच्छामरणी म्हणून या जगतात येत नसून त्याचा जगतात येण्याचा हेतू त्याच्या आधीन नसून तो परमेश्वराधीन असतो. अनेक वेळा या सिध्दपुरूषांच्या जन्माच्या उत्पत्तीची मीमांसा जोडण्याचा किंवा शोधण्याचा आपण प्रयत्न करतो. त्याचप्रमाणे त्यांचे इष्टकर्तव्य पूर्ण झाल्यावर जेव्हां ते निजधामाला जातात त्यावेळी त्याचाही शोध घेण्याचा प्रयत्न आम्ही कर्माधीन मानव करण्यास सोडत नाही. पण या परमेश्वरी तत्वाला आदि नाही व अंत नाही. अशा तत्वाचा शोध घेण्यात वेळ खर्च करण्यापेक्षा त्यांचा जो लाभ इह जगताला झाला आहे त्याचे समाधान मानून त्यांच्या सदैव चिंतनात निरंतर असे राहता येईल याचा विचार करावा. त्यांची जी देहिक अवस्था वरीलप्रमाणे जरी

मानवी स्वरूपामध्ये चर्मचक्षूना अनुभवास येत असली तरी ह्या देहिक स्थितीच्यापलीकडे ब्रह्मांडाला व्यापून राहिलेली जी शक्ति आहे ती कार्यार्थ त्यांच्या पाठीशी उभी असते. अशा सिध्दपुरूषांना 'परमेश्वराचा अवतार'असे म्हणतात. यांच्या देहिक स्थितीचे कार्य अगदी बाल्यावस्थेत म्हणजे साधारण वयाच्या आठव्या वर्षापासून सुरू होते. जेव्हां आपल्या मुलांना खाण्यापिण्याचेही ज्ञान नसते. त्यावेळी ती सिध्द अवस्थेतील बालके आनंदने ब्रह्मलीला दाखवित असतात. असे अवतार कार्य परमेश्वराने आम्हा मानवांच्या कल्याणार्थ किती सिध्दसाधन, शास्त्रीय व अनुभवसिध्दपध्दतीने योजले आहे याचा जरी आपण विचार करू लागलो तरी या ठिकाणी आपली बुध्दि विचार करण्यास असमर्थ ठरते.

आज जगतात अनेक व्यक्तींना प्राप्त जीवनात पारमार्थिक सुखाचा ठेवा प्राप्त व्हावा अशी तळमळ व इच्छा असते. अशा व्यक्ती समाजातील साधक अवस्थेतील व्यक्तीकडे मार्गदर्शनार्थ गेल्यावर हे साधक ज्यानी अधिकार नसताना समाजात 'गुरु'म्हणून मान्यता प्राप्त केली आहे ते आलेल्या व्यक्तीस काहीं अवघड अशा साधनांचा अवलंब सेवा या स्वरूपात वर्षानुवर्षे करावयास सूचित करीत असतात. पण खऱ्या गुरुमार्गात जेव्हां एखादी व्यक्ती पारमार्थिक सुखाचा लाभ घ्यावा अशा इच्छेने येते तेव्हां त्या व्यक्तीच्या जीवन परिसरात जी काहीं दोषास्पद वलये असतात त्याचे प्रथमतः विमोचन केले जाते. ही दोषास्पद वलये वर वर्णिलेल्या गुरुपरंपरेतील लोक जाणण्यास समर्थ नसल्याने जरी काहीं जप, तप, साधन करावयास सांगितले तरी त्या व्यक्तीस काहीं लक्ष जप करूनही **'साधक-सिध्द-साध्य'** ह्या



अवस्थेपैकी पहिली म्हणजे साधक अवस्थाही प्राप्त होऊ शकत नाही. याचे कारण पूर्वजन्मपरत्वे किंवा ज्या घराण्यात आपण जन्म घेतो त्या घराण्यातील दोष आम्हा मानवांच्या वाट्याला जन्म प्राप्तीनंतर येत असतात व ही दोषास्पद वलये जरी अदृष्य रूपाने असली तरी कमी अधिक प्रमाणात प्रखर असतात. जरी आपण पारमार्थिक सुखाचा लाभ व्हावा म्हणून मार्गदर्शनाप्रमाणे साधनेला आरंभ केला तरी साधक अवस्थेतील ही बाल्यावस्था असल्याने जे दोष अनेक जन्म व अनेक पिढ्यापरत्वे धारण झालेले आहेत ते करीत असलेल्या साधनेची फलप्राप्ती करून देत नाहीत. अशासाठी गुरुंच्या मार्गदर्शनाचा लाभ घेण्यास जे जातात त्याना साधनसेवा सूचित करण्यापूर्वी मार्गदर्शन घेणाऱ्या व्यक्तीच्या देहिक अवस्थेच्या आसमंतात प्रतिकूल अशी जी वलये असतात त्यांचे प्रथमतः विमोचन करण्याची जबाबदारी गुरुंची असते. त्याचबरोबर देहिक माध्यमातून करीत असलेली साधना साकार व्हावी अशी जी इच्छा मार्गदर्शन घेणाऱ्या व्यक्तीची असते त्यांच्या देहिक माध्यमाचा इष्ट विकास कोणत्या साधनपध्दतीने म्हणजे दीक्षांत विधीपरत्वे होईल, हेही साधन ह्या गुरुमार्गातील व्यक्तींना प्राप्त व्हावयास पाहिजे. यासाठी ज्या दीक्षामाध्यमातून भक्तगणांचा देहिक विकास करावयाचा असतो अशा दीक्षा प्रथमतः गुरुमार्गातील व्यक्तींनी संकल्पाने सिध्द करावयाच्या असतात. अशा संकल्पाने जेव्हां ह्या दीक्षा सिध्द होतात व भक्त गणांना दिल्या जातात, तेव्हां ह्या दीक्षाविधीतील संकल्प भक्तांच्या देहिक माध्यमात नकळत कार्यरत होऊन, त्यांच्या देहिक माध्यमाचा विकास ह्या दीक्षापरत्वे होत असतो. नुसती दीक्षा देणे ही जबाबदारी गुरु व शिष्य यामध्ये जेव्हां देवाण-

घेवाण करते तेव्हां ‘अमुक गुरुकडून मी दीक्षा घेतली आहे’ एवढेच त्या गुरुंच्या नांवाचे भांडवल सांगण्यापलीकडे कोणतीही अवस्था प्राप्त होत नाही.

आज भारतात गतकालातील अनेक अवतारी पुरूषांची समाधी मंदिरे ‘तीर्थक्षेत्र’ म्हणून अस्तित्वात आहेत. अनेक भक्तभाविक अशा तीर्थक्षेत्री वर्षानुवर्षे जात राहून त्या समाधी मंदिराची सेवा मनोभावनेने करीत असतात. पण ह्या अवतारी पुरूषांनी ईश्वरी आज्ञेने हे जे अवतारकार्य इहजगतात ‘ईश्वरी कार्य’म्हणून केलेले असते अशांच्या ठिकाणी ब्रह्मांडशक्तीतील काहीं एक विशिष्ठ गुण तन्मात्र रूपाने (म्हणजे शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध) धारण झालेला असतो. अशा ह्या गुणापैकी कोणता निश्चित गुण आपल्याला प्राप्त होण्यास आपले देहिक व आत्मिक तत्व पोषक आहे ह्या गोष्टीचा साधनमार्गाचा अवलंब करण्यापूर्वी अनुभव घेतला पाहिजे. केवळ देहाने वर्षानुवर्षे या तीर्थक्षेत्राचा लाभ आपण घेत आहोत म्हणजे आपली पारमार्थिक उन्नती होईल असे नाही. याचे स्पष्ट व अनुभवास आलेले असे उदाहरण म्हणजे आज आपल्या सर्व कार्यकेंद्रावर श्रीसद्‌गुरु पंतमहाराज यांनी जी पदांची शब्दरचना केली आहे, ती पदे ऐकत असताना आपल्या शरीरात ऐकलेल्या प्रत्येक शब्दातील स्पंद हे देहिक अवस्थेत आपल्या न कळत उमटतात. याचा अनुभव प्रत्येकाने घेतला आहे. याचे कारण दत्तपरंपरेतील ह्या अवतारी पुरुषाजवळ ‘शब्दब्रह्माचा’ अविष्कार झालेला होता. त्यामुळे त्यानी जी शब्दरचना श्रीदत्तगुरुंना समर्पण केली आहे, तो प्रत्येक शब्द हा साक्षात् परब्रह्म असून, आपल्या वाणीतून तो जेव्हां गाईला जातो, तेव्हां न कळत आसमंतात शब्दब्रह्माचे



स्पंद उमटतात व त्या स्पंदवलयामध्ये आपली वृत्ती तल्लीन होते. आशा गोष्टीचा यथायोग्य विचार आपण भक्तांनी न करता केवळ अवतारी पुरूषांची समाधि मंदिरे अस्तित्वात आहेत म्हणून तेथे जाणे योग्य नाही.

प्रत्येक अवतारी परंपरेतील सत्पुरूषांचा धर्म हा जरी कृपाशिर्वाद देण्याचा असला तरी अवतार कार्यात त्यांचा जो काहीं प्रधान गुणधर्म ब्रह्मस्वरूप म्हणून त्यांच्या ठायी होता तो आम्हा मानवांच्या कल्याणार्थ ते इहजगतात ठेवून गेले आहेत. ब्रह्मांडाची उत्पत्ती ही जशी पंचतन्मात्रानी युक्त असल्याने जेव्हां आपण अशा अवतारी परंपरेतील सत्पुरूषांच्या दर्शनाचा लाभ जोडतो तेव्हां त्यांच्या ठायी ब्रह्मरूपाने जो तन्मात्रगुण होता तो गुण आपल्या देहिक अवस्थेतील तन्मात्राच्या ठाई जर धारण झाला तर जे देहिक अवस्थेतील तन्मात्र आहे ते ब्रह्मरूप होते. देहिक अवस्थेतील एक तन्मात्र हे जेव्हां ब्रह्मरूप होते तेव्हां ते देहिक अवस्थेतील बाकीच्या चार तन्मात्रांनादि ब्रह्मरूप करीत असते व काहीं एक दीर्घ जपतप साधन न करता आपणास साधक-सिध्द-साध्य ह्या अवस्था सुलभपणे प्राप्त होतात. अशी ही अवस्था ज्या गुरुंना प्राप्त झाली आहे, अशांच्याच गुरुभेटीचा लाभ पूर्वपुण्याईने जर इहजन्मात झाला तर प्राप्त झालेले इहलोकीचे जीवन याचे सार्थक होत असते व ज्या जीवनाचे सार्थक इतक्या शास्त्रशुध्दपध्दतीने झाले असेल तोच साधक इहजगतात लोककल्याण करू शकतो. अन्यथा लोककल्याण होण्याऐवजी लोकसंग्रह करणे म्हणजेच लोककल्याण असा प्रचार समाजात रूढ होतो

आपण भक्तांच्याठायी असलेली तन्मात्रे ही देहिक-आत्मिक अवस्थेत होती. माझ्या माध्यमातही तीच तन्मात्रे आहेत. पण गेली चार तपे श्री सद्‌गुरुंच्या कृपाशिर्वादास पात्र झाल्याने ती पांचही तन्मात्रे ब्रह्मरूप झाली. असा लाभ आपण भक्तास माझ्याप्रमाणे व्हावा म्हणून शिरोडा-गोवा येथे आठ साधना संमेलने घेण्यात आली. पहित्या दोन संमेलनात मी आपणाकरवी सामुदायीक साधना करवून घेत होतो व मुलाखतीचा लाभ करून देत होतो. अशावेळी माझ्या वाणी माध्यमातून जे ब्रह्म आपण श्रवण करते झालात, त्या श्रवण केलेल्या शब्दमाध्यमातून आपल्या नकळत आपले शब्दतन्मात्र हे देहिक-आत्मिक अवस्थेत न राहता ब्रह्मस्वरूप झाले व पुढे जी संमेलने होत गेली त्या संमेलनांचा सोहळा हा ब्रह्मानंदात आपण भक्त अनुभवते तर झालातच पण त्याचबरोबर राहिलेली चार तन्मात्रेही ब्रह्मस्वरूप झाली. प्राप्त झालेला देह हा पंचतत्वांनी (पृथ्वी, आप, तेज, वायु, आकाश) धारण झाला असून तन्मात्रे ही अति सूक्ष्म अवस्था आहे. जेव्हां लोककल्याणार्थ गुरुंना एखादे साधन सिध्द करावयाचे असते अशावेळी भक्तांच्या माध्यामांचा सदुपयोग करावा लागतो. अशा वेळी आवाहनित झालेली शक्ति ही सूक्ष्मात सूक्ष्म असल्याने भक्तगणांच्या देहिक माध्यमातील तन्मात्रे ही जागृतावस्थेत असावी लागतात, तरच ती शक्ती साधनेच्या सिध्दतेसाठी धारण होत असते. आपण भक्तांची अशी माध्यमे जेव्हां तयार झाली तेव्हांच लय शक्तीस आवाहन करून आपण भक्तांच्या माध्यमात त्या शक्तीची धारणा करण्यात आली. आठव्या संमेलनास आपण भक्त लय शक्ति म्हणजे ब्रह्मशक्ति ही धारण करून जेव्हां उपस्थित राहिलात तेव्हां शिरोडा येथे आपण सर्व भक्तांच्या



माध्यमातील शक्ति ही एकरूप करून त्या शक्तीचे **‘शक्तीपीठ’** आवाहन केले व आपल्या माध्यमातील धारण झालेली शक्ति ही या शक्तिपीठात अंतर्भूत केली. आता भविष्यात लोककल्याणाचे हे कार्य सोप्या व सुलभपध्दतीने होण्यासाठी सोप्यात सोपे असे शक्तिपीठाचे कार्य हे यापूर्वी निवेदन केल्याप्रमाणे केवळ प्रार्थना माध्यमातून म्हणजे आपल्या ठायी जे **‘शब्दतन्मात्र’** आहे त्या शब्दतन्मात्रातून होणार आहे

गेल्या काहीं वर्षापासून आपण भक्तांना कार्यकेंद्रावर उपस्थित राहून पंचमी, एकदशी, पौर्णिमा व अमावस्या ह्या दिवशी **‘अनुष्ठान’** करण्याची आज्ञा झाली होती व त्याप्रमाणे आपण जरी करीत होतात तरी हे अनुष्ठान याच दिवशी करण्याचे महत्व काय आहे; व ते देवाप्रीत्यर्थ आहे की, स्वत:प्रीत्यर्थ आहे हे काहीं आपण भक्तांच्या लक्षात आले असावे असे मला वाटत नाही. साधारपणे पंचमी, एकादशी, पौर्णिमा व अमावस्या म्हटले की आपले लक्ष तिथीवाराकडे जाते. वास्तविक ही साधना देवाप्रीत्यर्थ नसून आपण भक्तांना प्राप्त झालेल्या अवस्थेत आपण काया, वाचा, मनाने किती एकरूप झालेले आहात याचे अनुमान अनुभविण्यासाठी हे दिवस श्रीगुरुंनी ठरविले आहेत. **पंचमी** म्हणजे शुध्द किंवा वद्य पक्षातील पांचवा दिवस असा अर्थ नाही. पंचमी म्हणजे, आपले देहिक माध्यम ज्याची धारणा पंचतत्वानी (पृथ्वी, आप, तेज, वायु, आकाश) झाली आहे त्यांच्याशी ह्या दिवशीचे अनुष्ठान हितसंबंधीत आहे. अशा पाच तत्वानी जरी आपण ह्या देहाची धारणा करून घेतो तरी ही पांच तत्वे निसर्गाच्या प्रमाणात नसतात. त्यामुळे आपण आपले जीवन व्यतीत करीत असताना ते समतोलपणे व्यतीत

होत नाही म्हणून प्रथमत: साधनामार्गारंभी ही पांच तत्वे जी विषम प्रमाणात असतात, अशांना कृपाशिर्वादाने निसर्गाप्रमाणे समतोलपणा प्राप्त करून दिला जातो. त्यामुळे देहिक माध्यमातून जी काहीं क्रियाकर्मे घडतात याबद्दल आपण निराश न होता आनंदी असतो. अशी जी अवस्था श्रीगुरूंनी साधनारंभी प्राप्त करून दिली आहे त्या प्राप्त अवस्थेत काहीं विषमता निर्माण झाली आहे काय याचा शोध पंचमीच्या दिवशी करण्यात येत असलेल्या अनुष्ठानातून अनुभवायचा आहे. साधनामार्गात प्रथमत: प्राधान्य हे पंचभौतिक देहिक माध्ममाला असते. जर यदाकदाचित ह्या पंचतत्वात विषमता असेल तर जरी कोणतेही साधन आपण करते झालात तरी त्या साधनेत आपण एकरूपत्व प्राप्त करते होत नाही. म्हणून पंचमीच्या अनुष्ठानात आपल्या ह्या पंचभौतिक देहातील तत्वात अगतिक विचार, विकारपरत्वे विषमता निर्माण झाली आहे काय याचा आढावा अनुष्ठानापूर्वीच्या व्यतीत झालेल्या दिवसातून काढावा.

**एकादशीस** जे अनुष्ठान आपण करता त्या दिवशी पंचभौतिक देहातील पंचकर्मेंद्रिये, पंचज्ञानेंद्रिये व बुध्दि यांचा जो इष्ट विकास गुरुकृपाशिर्वादाने झाला आहे त्या माध्यमात काहीं कमीअधिकता झाली आहे काय हे अनुभवायचे आहे. त्याची अनुभवसिध्दपध्दती अशी की अनुष्ठानास उपस्थित राहिल्यावर किंवा तत्पूर्वीच्या काळात सुविचाराबद्दल विचारांची किती प्रगती झाली आहे व अविचारांची किती वाढ झाली आहे हे अनुभवित असताना जर सुविचारांचे प्रमाण अधिक असेल तर विकसित अवस्थेत आपण वृध्दी करीत आहोत म्हणजे गुरुकृपाशिर्वादात आपण अधिक काळ जीवन व्यतीत करीत आहोत असे अनुभवास



येचे.

**पौर्णिमा** किंवा **अमावस्या** ह्या दिवशी देहातील अतिसूक्ष्म तत्वे म्हणजे पंचतन्मात्रे, पंचप्राणकोश, बुध्दि, मन, चित्त, अहंकार व आत्मा आदीचा समावेश ह्या साधनेत असतो. आज प्राप्त झालेल्या अवस्थेपरत्वे श्रीगुरुंनी कृपावंत होऊन देहिक-आत्मिक अवस्थांचे एकरूपत्व आनंदमय कोशाशी करून दिले असल्याने त्या आनंदमय तत्वाच्या ठिकाणी श्रीगुरुंचा सदैव वास असतो. ह्या दिवशी अनुष्ठान करीत असता पंचमी किंवा एकदशीपेक्षा अधिक एकाग्रता व्हावयास पाहिजे. ती जर झाली नाही तर त्याला कारण वरील दोन दिवशी जी देहिक माध्यमे अनुष्ठाना व्यतिरीक्त इतरवेळी आपण गैरवापरात आणतो असा ह्या माध्ममांचा जर गैरवापर झाला असेल तर पौर्णिमा किंवा अमावस्या ह्या दिवशी आपण इतर दिवसापेक्षा जे अधिक एकाग्र व्हावयास पाहिजे ते होत नाही. यासाठी पंचमीपासून पौर्णिमा किंवा अमावस्येपर्यंत आपल्या ज्ञानअज्ञानाने प्राप्त जीवनाचा गैरवापर विचार, आचार, विकारपरत्वे काय केला आहे याचा आढावा घेऊन अनुमानपध्दतीने आपल्या न कळत होणाऱ्या ह्या चुका आपण आता सुधारल्या पाहिजेत. यापूर्वीच्या जीवनात आपण भक्तगणांच्या कुटुंबपरंपरेने किंवा जन्मकर्मपरत्वे जे दोष देहाबाहेर होते ते आपल्याला आपल्या सामर्थ्याने निवारण करता येणे शक्य नव्हते म्हणून श्रीगुरुंनी कृपावंत होऊन ते दोष निवारण केले. पण जे दोष देहात आहेत म्हणजे ‘पडिले वळण इंद्रिया सकळा’ असे दोष निवारण करण्याचे कार्य हे गुरुंचे नसून ते आपण भक्तांचे आहे. अशा दोषांची जाणीव आपणास इतरांनी करून दिली, तरी आपण त्याकडे दुर्लक्ष करतो. म्हणून

गुरुआज्ञेने पंचमी, एकादशी, पौर्णिमा किंवा अमावस्या ह्या दिवशी आपल्याला प्राप्त झालेल्या अवस्थेप्रित्यर्थ आपणास काय दक्षता घ्यावयची आहे ही जाणीव होण्यासाठी आपणास ह्या दिवशी अनुष्ठान करावयाची आज्ञा दिली होती.

श्रीगुरु व जो भक्त अडिअडचणीमुळे गुरुंना भेटावयास येतो ही जी भेट ह्या जन्मात अडचणीपरत्वे घडविली जाते हा भेटीचा योग पूर्वीच्या अनेक जन्मपरत्वे आलेला असतो. जर आपण अडचणीत आलो नाही तर त्या अडचणी निवारणार्थ आपण गुरुमार्गी होणार नाही किंवा देवदेवतांची पूजा, आराधना करणार नाही. तर सूज्ञ भक्तानी प्रथमतः गुरुभेट झाल्यावर अडिअडचणीबद्दल विचार न करता जी गुरुभेट ह्या जन्मात झाली आहे त्या भेटीचा लाभ प्राप्त जन्मात जास्तीत जास्त इहजन्मासाठी व पुढील अनेक जन्मासाठी कसा करून घेता येईल याचा जर विचार करून गुरूंनी सूचित केलेल्या सेवेचा आपण लाभ घेतला तर ज्या सुखाच्या याचनेने आपण गुरुभेटीस आलो ती सुखे आपल्यासमोर हात जोडून उभी आहेत याची प्रचिती आल्याशिवाय रहाणार नाही. हे सूचित करण्याचे महत्वाचे कारण म्हणजे आजच्या अवस्थेत आपण भक्तांची जीवनमाध्यमे म्हणजे देहिक व आत्मिक याचे एकरूपत्व करून देऊन श्रीगुरुंनी ह्या जोडल्या गेलेल्या देहिक-आत्मिक अवस्थेच्या ठिकाणी आपले अस्तित्व अनंतकाळासाठी निर्माण करून दिले असल्याने जीवन व्यतीत करीत असताना जरी अडिअडचणीचा भास निर्माण झाला तरी त्याबद्दल दु:खी, कष्टी व असमाधानी न राहता त्या अडचणींचे निवारण करण्याचे सामर्थ्य श्रीगुरुंनी द्यावे एवढ्याच प्रार्थनेची आता भविष्यात गरज आहे. याचे महत्वाचे



कारण असे की हे समितीचे कार्य जरी प्रारंभिक अवस्थेत एका व्यक्ती माध्यमातून साकार झाले आहे तरी जगताला त्याचा लाभ होण्यासाठी अनेक व्यक्तिमाध्यमे की जी कृपावंत झाली आहेत अशांची भवितव्यात गरज आहे.

आजच्या अवस्थेची प्राप्ती ही आपण भक्तांना सहज व सुलभ अशी झाली असून ह्या अवस्थेच्या प्राप्तीसाठी कोणतेही प्रखर असे साधन किंवा काहीं बंधनांचा अंगिकार करावा लागला नाही. म्हणजे प्राप्त झालेली अवस्था ही क्षुल्लक आहे असे समजू नये, ह्या अवस्थेच्या प्राप्तीसाठी जरी आपण भक्तांनी लाखो रूपये खर्च केले असते तरी आजची अवस्था प्राप्त झाली नसती. आज मी गेली चार तपे गुरुमार्गाच्या सेवेत असून गुरु व गुरुमार्गी अशा अनेक व्यक्तींची कार्ये व जीवने बारकाईने अभ्यासलेली आहेत. ह्या अभ्यासात माझ्या अनुभवास असे आले आहे की गुरुमाध्यमाला ज्या ज्या अवस्था प्राप्त झालेल्या असतात त्या त्या अवस्थांचा लाभ त्याना आपल्या भक्तगणांना करून देता येत नाही. फक्त प्राप्त झालेल्या अवस्थेपरत्वे ते कृपाशिर्वाद देण्याचे कार्य करू शकतात. त्यामुळे जरी त्यांचा भक्तगण संख्येने अधिक असला तरी व्यक्तिगत जीवनाव्यतिरीक्त इतरांना सुख-शांती-समाधान देण्याचे कार्य कृपावंत असूनही त्यांना करता येत नाही. यासाठी मी जे 'कामकाज' व 'निराकरण', आपण भक्तांच्या अडिअडचणीसाठी करीत होतो, ते कार्य मी गेली काहीं वर्षे स्थगित करून गुरुंनी कृपावंत होऊन मला ज्या अवस्थांचा लाभ करून दिला त्या अवस्था आपण भक्तांच्या जीवनांत साकार करण्यासाठी वेळोवेळी गुरुमार्गदर्शनाप्रमाणे साधनामार्गाचा अवलंब करून तीच साधना आपण भक्तांच्याही

देहिक माध्यमाद्वारा करून घेतली. अशा अवस्थांची (म्हणजे मला प्राप्त झालेल्या अवस्था) देवाण-घेवाण गुरु व भक्त यामध्ये होण्यासाठी गुरुंचे काया-वाचा-मन जे त्रिगुणात्मक झालेले असते अशी त्रिगुणात्मक अवस्था ही भक्ताना सूचित केलेल्या साधनेतून करून घ्यावी लागते. अशी त्रिगुणात्मक अवस्था गुरुप्रमाणे शिष्याची व्हावी म्हणून जी गुरु व शिष्य यामध्ये देवाण-घेवाण होते त्यासाठी जे साधन उपयोगात आणावयाचे असते असे साधनही त्रिगुणात्मक असावे लागते. म्हणजे ह्या साधनेमुळे गुरुंना प्राप्त झालेली अवस्था शिष्याच्यां ठायी साधनेच्या स्पंदानी (Vibrtions) धारण होते. असे साधन म्हणजे गेली पाच वर्षे आपणाकरवी करविली गेलेली ॐ कार साधना होय.

अशा ह्या ॐकार साधनेची दीक्षा मला माझ्या जन्मगावी श्रीभैरवनाथ यांनी प्रथमतः दिली. त्या दीक्षेप्रमाणे मी गेली तीन तपे जरी ही साधना नित्याने करीत होतो तरी इतरांच्या कल्याणासाठी ह्या ॐकार साधनेच्या सिध्दतेची आवश्यकता हिची जाणीव झाल्याने हे ॐ कार तत्व सिध्द करण्यासाठी एक वर्षपर्यंत श्री क्षेत्र नरसोबा-वाडी येथे दर पौर्णिमेस उपस्थित राहून अकरा पौर्णिमेस हवनादी विधी केले. ह्या अकरा पौर्णिमेच्या हवनादी विधींची सांगता म्हणून महारूद्र स्वाहाकार करण्यात आल्यावर हे जे ॐ कार तत्व सिध्द झाले त्या तत्वाची दीक्षा आपण भक्तांना **'कारण दीक्षा!'**म्हणून दिली. ह्या कारण दीक्षेची सिध्दता होऊन ती कारणदीक्षा ही **'महाकारण अवस्था'** म्हणून आपण भक्तांना त्याचा लाभ व्हावा यासाठी श्रीगणेश देवता की ज्या देवतेचे मूळ आत्मस्वरूप ॐकारमय आहे म्हणजे अ-उ-म किंवा उत्पत्ती-स्थिती-लय असे आहे त्या देवतेस प्रसन्न



करून घेऊन आपण भक्तांस **महाकारण दीक्षेचा** लाभ करून दिला. ह्या दीक्षेपर्यंत आपण भक्तांनी वेळोवेळी ज्या दीक्षा (उपासना दीक्षा, नामस्मरण दीक्षा, अनुग्रह दीक्षा, गुरुदीक्षा, कारण दीक्षा महाकारण दीक्षा) घेतल्या होत्या त्या दीक्षांचे एकरूपत्व त्रिगुणात्म शक्तित करून ती ॐ कारमय अवस्था बत्तिस शिराळ्यास श्रीगोरक्षनाथ यांचे चरणी समर्पण करून त्यांच्या आज्ञेप्रमाणे आपण भक्तांना नाथपंथाचा अनुग्रह प्राप्त करून दिला. ज्या ज्या अवस्था गुरुंना प्राप्त झालेल्या असतात त्या अवस्थेचे प्रतिक शिष्याच्या ठायी धारण होणे म्हणजेच अनुग्रह होय. केवळ एखादा मंत्र देऊन त्याचे तंत्र उपलब्ध करून देणे म्हणजे अनुग्रह नव्हे. आजच्या अवस्थेपर्यंतचा हा गुरुमार्गातील आपला प्रवास म्हणजे आपले जे आत्मिक तत्व त्या आत्मिक तत्वाचा वास गुरुचरणी लीन झाला असून ते साकार होऊन आता निराकार झाले आहे. अशा अवस्थेचे कार्य भवितव्यात जगत्कल्याणासाठी भक्तगणांकडून व्हावे म्हणून गुरुंना प्राप्त झालेल्या अवस्था भक्तांत साकार करण्याच्यासाठी साधनपध्दतीने भक्तांच्या ठायी गुरुंच्या अवस्थेंचा जो अविष्कार व्हावयास पाहिजे यासाठी भक्तमाध्यमाला एकाच साधनमाध्यमातून साधना करावयास सूचित करावे लागते. अशावेळी ही साधना अन्नमय कोशापासून म्हणजे नाभीस्थानातून सुरुवात करून आनंदमय कोशापर्यंत म्हणजे ब्रह्मरंध्रांपर्यंत नेऊन त्या सूचित केलेल्या साधनेचे पूर्णत्व भक्तांच्या ब्रह्मरंध्रांत करावे लागते. क्रमशः या अवस्थेपरत्वे जेव्हां तुम्हा भक्तगणांच्या देहिक माध्यमातून ही साधना ब्रह्मरंध्रांत लय अवस्था म्हणजे पूर्णत्व प्राप्त करती होते त्या अवस्थेस **'सहस्त्रदलकमलाचा**

**उदय'** झाला असे म्हणतात. पण दत्त, नाथ व सुफि पंथाप्रमाणे ह्या अवस्थेची प्राप्ती म्हणजे देहिक व आत्मिक अशा दोन शक्तिचे एकरूपत्व गुरुशक्तिच्या ठिकाणी होऊन ह्या त्रिगुणात्मक शक्तीला प्रतिक म्हणून ब्रह्मरंध्राच्या ठायी धारण करून द्यावे लागते. अशा अवस्थेची प्राप्ती जी आज आपणास झाली आहे ती कृपाशिर्वादाचे शक्तिपीठ म्हणून आज आपल्या काया-वाचा-मनाच्या माध्यमातून इतरांच्या कल्याणासाठी कार्य करणार आहे. अशावेळी ज्या काया-वाचा-मनाचे एकरूपत्व शक्तीपीठाच्या ठायी झाले आहे तो गुरुकृपाशिर्वाद होय. ह्या शक्तीचे स्पंद (लहरी) आपण भक्तांच्या वाचेतून यापुढे बाहेर पडणार आहेत. यासाठी जी प्रार्थना आपण यापुढे नित्याने म्हणणार आहात ती प्रार्थना ही एक केवळ शाब्दिक म्हणून आपल्या वाणीद्वारा उच्चारली जाणार नसून जेव्हां आपण मनोभावनेने ही प्रार्थना म्हणाल तेंव्हा वाणीतून उच्चार केला गेलेला शब्द हा इतरांच्या कल्याणासाठी शास्त्र, शस्त्र व अस्त्र म्हणून आसमंतातील वातावरणात कार्यान्वित होऊन आज जे वातावरण गैर अशा विचारपरत्वे दूषित झाले आहे ते शुध्द होऊन प्रत्येकास परमेश्वराने बुध्दीची अमोल ठेव दिली असूनही व्यक्ती तितक्या प्रकृती याप्रमाणे निर्माण होणारा हा बुध्दीमाध्यमातील अविचारांचा दोष आपण नित्याने म्हटल्या जाणाऱ्या प्रार्थनेतून निवारण होणार आहे. भवितव्यातील हे महान कार्य श्रीगुरुंनी किती सोपे व सुलभ करून दिले आहे याचा भक्तानी सूज्ञपणे विचार करावा.

आपण भक्तांवर ही प्रार्थना इतरांच्या कल्याणार्थ म्हणावयाची जबाबदारी टाकली आहे ती पार पाडीत असताना



कोणत्याही कारणास्तव आपले काया-वाचा-मन हे अशांत, असमाधानी कोणत्याही विकाराच्या आहारी गेलेले, असता कामा नये. आजपर्यंत आपण भक्तांनी श्रध्दा, भक्तीने अनेक गुरुपौर्णिमा साजऱ्या करून श्रीगुरुंना गुरुदक्षिणा दिली असेल पण ज्या गुरुंची सत्ता ह्या त्रिभूवनावर असते अशांना जी काहीं गुरुदक्षिणा आपण समर्पण करता ती गुरुदक्षिणा नसून ते एक आपल्या भक्तीभावनेचे प्रतिक आहे. खरी गुरूदक्षिणा आता आपणास द्यावयाची आहे. कारण प्राप्त जन्म व पुढे येणारे जन्म याचे सार्थक करून घेण्याचे सामर्थ्य कोणाही मानवाला कोणत्याही जन्मात प्राप्त होणे शक्य नाही. ते केवळ आपण गुरुंना शरण गेल्यामुळे प्राप्त झाले आहे. यापुढील जीवनात गुरुआज्ञेचे पालन करणे एवढेच व्रत भवितव्यासाठी आपण भक्तांना करावयाचे आहे व त्याची पूर्तता आपण भक्तांनी जर केलीत तरच गुरुंनी आपल्या कल्याणार्थ जे केले आहे त्याचा प्रतिसाद म्हणून आपण गुरुपूजन करून गुरुदक्षिणा देणार आहात. हीच अपेक्षा भवितव्यासाठी ठेवून आठव्या संमेलनांत मी आपण भक्तांना असे सूचित केले की, या पुढे आपण माझे व्यक्ती म्हणून पूजन न करता माझ्या माध्यमातून ज्या शक्तीने आपल्या जीवनांस आकार व साकार अशा अवस्था प्राप्त करू दिल्या आहेत त्या शक्तीची मनोभावनेने, श्रध्दा, भक्तिने, पूजा करा. म्हणजे याबद्दल जास्तीत जास्त पूज्यभाव निर्माण करा. हीच माझी आपण भक्तांनी दिलेली 'गुरुदक्षिणा'; आहे!

आपण भक्तांच्या कुटुंबात जो माझा फोटो आपण भक्तांनी भक्तीभावनेने पूजनार्थ ठेवला आहे याबद्दल मला आजपर्यंत कधीच धन्यता वाटली नाही. त्याचप्रमाणे अनेक

भक्तांनी आपल्या घरी बोलावून ‘गुरु’म्हणून आदरातिथ्यही भरपूर केले आहे. पण याबद्दल आपण भक्तांना जरी समाधान झाले असले तरी याबद्दल मला कधीच समाधान वाटले नाही. याचे कारण आपण जेव्हां या कार्याकडे मार्गदर्शनार्थ आलात व जेव्हां आपल्या ऐहिक गरजांचे प्रश्न माझ्या माध्यमातून सोडविले गेले तेव्हांच आपण भक्तांनी माझ्या फोटोचा स्वीकार पूजनार्थ केलात. हे सर्व ऐहिक सुख जर मी आपणास प्राप्त करून दिले नसते तर आपण माझा फोटो पूजनार्थ ठेवला असता काय? असा प्रश्न मी स्वत:ला विचारीत असतो. आपण भक्तांच्या ज्या काहीं अपेक्षा माझ्याकडून पुऱ्या व्हाव्यात म्हणून आपण मला भेटावयास आलात तशा माझ्याही काहीं अपेक्षा आपण भक्तांकडून पुऱ्या व्हाव्यात अशी माझी इच्छा होती व आहे. वेळोवेळीच्या गाठीभेटीत व प्रत्येक संमेलनात आपण माझे गुणगान गाईले आहे. हे सर्व मी ऐकले असून मी जे काहीं आपण भक्तांच्या बाबतीत केले आहे त्या कारणास्तव मी आज जन्म घेता झालो नाही. माझ्या जन्माचे कारण जे गुरुकृपेने आपली सेवा करण्याचे कर्तव्य म्हणून आहे त्यात महत्वाचे कारण असे आहे की माझ्याचप्रमाणे आपला प्राप्त जन्म हा सत्कारणी लागावा. आपल्याला किती ऐहिक सुख प्राप्त झाले व कोणकोणत्या संकटाचे गुरुकृपाशिर्वादाने निरसन झाले याबद्दल मला धन्यता वाटली नाही. याचे कारण ज्या व्यक्तीमाध्यमाला जन्माला येऊन ईश्वराचे कार्य करावयाचे असते अशा व्यक्तिमाध्यमाचे सामर्थ्य दगडाला देव करण्याचे असते. तेव्हां जे ऐहिक सुख आपण गुरुकृपाशिर्वादाने प्राप्त करते झालात व प्राप्त झालेल्या सुखाबद्दल माझी महती आपण गाईलीत यापेक्षा आपली



पारमार्थिक प्रगती किती झाली आहे, याबद्दल जर काहीं निवेदन आपण केले असते तर मी जे कर्तव्य आपण भक्तांच्याबाबतीत केले त्याबद्दल मला समाधान झाले असते. याचा स्पष्ट खुलासा म्हणजे असा कीं गुरुमार्गदशनार्थ आपण येण्यापूर्वी आपले काया-वाचा-मन हे पूर्णत: षड्विकारांच्या आधीन होते. देहिक अवस्थेचा विकास न होण्याने हे आपले जीवन विकारमय अवस्थेत होते कृपाशिर्वाद प्राप्तीनंतर कोणकोणत्या विकारांची प्रखरता कमी झाली आहे व जे आपण विकारमय होतो तेच जीवन गुरुकृपशिर्वादाने किती विचारमय झाले याचा जर आढावा आपण घेतलात तर ही जी स्थित्यंतर अवस्था आपल्याला कृपाशिर्वादाने प्राप्त झाली ती स्थित्यंतरे कृपाशिर्वाच्या अभावी आपल्या जीवनांत अंतापर्यंत आपल्याला करता आली नसती हा बोध आपल्याला होईल.

दुसरा महत्वाचा बोध माझ्या साधनसेवेच्या हितसंबंधात सांगावयाचा म्हणजे आजपर्यंत जगामध्ये मानवी कल्याणार्थ जे सिध्दसाधक अशा प्रकारचे कार्य गुरुआज्ञेने अंगिकारते झाले व त्यांनी लोककल्याणाची सेवा जरी केली तरी हे कार्य व्यक्तिगत स्वरूपाचे होऊन त्यांच्या पश्चात् त्यांच्या ह्या कार्याचा अस्त झाला. पण माझी तळमळीची अशी इच्छा आहे कीं, आपण प्राप्त केलेली ही गुरुकृपाशिर्वादाची ही साधने आपल्या हयातीतच कार्यान्वित होऊन आपल्या पश्चात् या सिध्दसिध्दांतपध्दतीचा अस्त होऊ नये म्हणून ही सर्व साधने मी गेल्या वर्षात सिध्दस्वरूपामध्ये सिध्द करून गुरुपौर्णिमेस योग्य अशा सेवकांच्या ठिकाणी ती परंपरेने कार्यान्वित व्हावीत म्हणून गुरुआज्ञेने एकरूप केली.आज माझ्या अनुपस्थितीत जे सेवक

कार्यकेंद्रावर मार्गदर्शन करीत आहेत,त्यांच्याकडे पाहण्याची आपली दृष्टी ही पूर्णत: संकुचित आहे.त्यामुळे मी माझ्या आत्मविश्वासाने व आत्मप्रचीतीने,हे सेवक जरी सिध्दावस्थेप्रत आहेत व आपली ऐहिक विषयापरत्वे असलेली दु:खे निवारण करू शकतात असा जरी आत्मविश्वास ठेवला,तरी गुरुमार्गाच्या परंपरेप्रमाणे तुम्हा भक्तांची श्रध्दा ही व्यक्तीपूजनाचा विषय असल्याने,आपली दु:खे केवळ वं. दादांच्याच आशिर्वादाने निवारण होतात,अशी श्रध्दा जी आहे,ती यापुढे विचारात न घेता,जो नियुक्त सेवक कार्यकेंद्रावर कार्य करतो आहे त्यांची नियुक्ती ही त्यांच्या इच्छेप्रमाणे झाली नसून ते गुरुआज्ञेचेच एक प्रतिक आहे अशी श्रध्दा व विश्वास जर निर्माण कराल तर आपली विषयपरत्वे आलेली दु:खे निवारण करण्यासाठी माझी बहुमोल अशी शक्ति व्यर्थ खर्च न होता ती शक्ति आपल्या प्राप्त जन्माचे सार्थक करण्यासाठी मला उपयोगात आणता येईल.

गुरुमार्गात जीवनाची सार्थकता होण्यासाठी नामस्मरण विधी,दीक्षांत विधी,अनुग्रह विधी हे अनेकवार व अनेक ठिकाणी देण्यात येतात.ते आपण घेता किंवा ऐकता.पण जीवनाचे सार्थक होणे हा विषय इतका सहजासहजी प्राप्त करण्याइतका सोपा व सुलभ नाही.ज्याला त्याबद्दलची तळमळ लागली आहे,त्याच्याही सामर्थ्यापलीकडील हा विषय असल्याने,जर भक्तांच्या कल्याणार्थ गुरुमाध्यम हे आपले तन,मन,धन व काया,वाचा,मन हे पूर्णत: श्रीगुरुंना समर्पीत करील,तरच त्याचे योग्य फल तुम्हां भक्तांच्या कल्याणार्थ आहे,याची प्रचीती किंवा अनुभव हा उदयास



येईल.अन्यथा आपण भक्त गुरुमार्गी झाला आहात,म्हणून उच्च विषयांतील शब्दांचा शब्दोच्चार करणे व आपण तो ऐकणे या पलीकडे आपण भक्तांचा उध्दार होऊ शकत नाही.

आजपर्यंत आपण भक्तांची केलेली सेवा हे या जन्माचे सार्थक ह्याच जन्मी मला अनुभविण्यास मिळाले.यापेक्षा अधिक मोठे सुख,समाधान व शांती मी मानीत नाही. आजपर्यंत आपल्या सेवेत माझ्या हातून ज्ञानाने-अज्ञानाने चांगलेही झाले असेल वाईटही झाले असेल पण जे चांगले म्हणून आपल्या वाट्याला आले त्याचा स्वीकार आपण करून वाईट घडले असेल हे सर्व विसरून जावे. बाल्यावस्थेपासून ते आज दिवसापर्यंत आपल्याप्रमाणे असणारे माझे पंचभौतिक देहिकमाध्यम हे काया,वाचा,मनाने परिपूर्ण गुरुमय झाले असल्याने स्वाभाविकच गुरुमायेचा हात मी आपणा सर्वांच्यावर आत्मिक विचाराने व आत्मिक सद्‌भावनेने जरी फिरवत आलो तरीसुध्दा तुम्हां भक्तांची देहिक अवस्था ऐहिक विषयापलीकडे नसल्याने हे माझे प्रेम कीं जे तुमच्या जन्मदात्या आईवडीलांच्यापलीकडे होते त्याला तुम्ही जाणते झाला नाहीत. आजपर्यंतच्या व्यतीत झालेल्या जीवनांत मी श्रीसद्‌गुरुंना जर कृपाशिर्वादाशिवाय कांहीही मागितले नाही. तर तुम्हा भक्तांच्याकडे कांही अपेक्षा पूर्ततेसाठी मी यावे हे मला शोभणारे नाही व तशी अपेक्षा श्रीसद्‌गुरुकृपाशिवादाने मला करण्याची वेळही आलेली नाही.

ह्या वर्षात गुरुआज्ञेने मला करावी लागलेली साधना व तिचा सिध्दसाध्य हेतू मी आपण भक्तांच्या अभ्यासार्थ निवेदन केला आहे.याचा आस्थेने विचार करून हे कार्य दादांचे आहे असे

न मानता आपणा सर्वांचे आहे अशी भूमिका विचारात घेऊन आपल्या यथाज्ञानाने व यथसामर्थ्याने हे कार्य जर पुढे करण्याचे भाग्य आपण प्राप्त करून घेतलेत तरच मला प्राप्त झालेल्या जन्माचे सार्थक झाले असे म्हणता येईल.

साधना मार्गामध्ये अवधान,ध्यान व चिंतन ह्या तीन महत्वाच्या अवस्था आहेत.त्यांची ओळख पुढीलप्रमाणे :–

**अवधान अवस्था :-** गुरुमार्गात ही अवस्था प्राप्त होणे दुर्मिळ आहे. कारण जन्म घेतल्यावर कर्माचा उपाधी मागे लागते व ह्या कर्मबंधानातून सुटका व्हावी म्हणून आपण गुरुमार्गी होतो. अशावेळी सुखाची प्राप्ती व्हावी अशी अपेक्षा न ठेवता गुरूंची प्राप्ती केंव्हा होईल असा घ्यास लागला पाहिजे. नुसते खाणेपिणे,कपडालत्ता,ऐषराम आदीनी जीवन व्यर्थ खर्च न होता जीवानास निश्चित आकार यावयास पाहिजे.तो आकार गुरु देत असतात. गुरुमार्गात 'गुराखी' व 'गुरु' हे दोन शब्द आहेत. एक फक्त गुरे राखतो व दुसरा मार्ग! जन्माला येऊन तो जन्म वाया जाऊ नये तर इतरांना त्याचा उपयोग व्हावा या तळमळीने जे वाट दाखवितात त्याना 'गुरु' असे म्हणतात. ह्या गुरुंनी स्वतःचे जीवन,तन-मन-धन भक्तांसाठी खर्च केले पाहिजे. ज्या अडचणी भक्तांच्या जीवनामध्ये उपस्थित होतात त्या न सांगता त्या अडचणींना कारण असणा-या कर्माचे विमोचन करून त्या भक्ताला अभयदान द्यावे लागते. नुसते दु:खाचे निवारण हे रस्त्यावर बसणारे ज्योतिषीसुध्दा सांगू शकतो. अशावेळी जरी भक्ताची पातळी अज्ञानाची असते तरी त्या भक्तास सखोल ज्ञानाचा लाभ करून देणे हे महत्वाचे कर्तव्य गुरुंनी विसरता



कामा नये. केवळ ऐहिक सुखासाठी जन्म नाही हे दाखवून दिले पाहिजे.मग हळू हळू भक्ताची जीवनाकडे पाहण्याची दृष्टी बदलू लागते. तशी ती बदलली पाहिजे. कारण हे जीवन क्षणिक आहे. जे जे कांही प्राप्त करावयाचे आहे त्याचा लाभ जन्मोजन्मी असावयास पाहिजे. नुसता लोभ असून चालणार नाही. इहजन्माचे ज्ञान व लोभ आपल्याला होतो तो न वाढविता आपण जसे जसे मार्गात जाऊ तसा तसा लोभ कमी करून लाभ कसा होईल हा विचार केला पाहिजे. म्हणजे, 'मी जगात आहे,पण माझे जग इहलोकांत नाही' असे बोलणे व वागणे म्हणजे **'अवधान अवस्था'**! इहलोकांतील कर्तव्ये करीत असता त्यात आपला विषय न राहता फक्त 'वास' राहिला पाहिजे. म्हणजे 'कर्माचा विषय भोगणे न राहता धर्माने कर्माला मुकणे' ही अवस्था प्राप्त होते. म्हणजेच स्वाभाविक इहजन्मात पुढील जन्म म्हणजे परलोक ह्याला आरंभ होत असतो. अशावेळी आपण जी ॐकार साधना करतो ह्या अवस्थेत फक्त 'अ' हे तत्व सिध्द होते. 'अ'तत्व म्हणजे विश्वाची उत्पत्ती होय. अशावेळी आपला आत्मा हा जन्म घेतो व गुरुमार्गी झाल्यावर तो आत्मा ॐकाराची 'अ' ही अवस्था प्राप्त करता होतो, म्हणून ही साधना करीत असतां शंभर टक्के अवधान ठेवले पाहिजे.

**ध्यान अवस्था :–** पूर्वी अनेक जन्मात अनेक कर्मे आपण केली आहेत म्हणून पुन्हा ह्या जन्मी जन्म घेतला आहे. पण त्या जन्माची स्मृती आपल्याला नाही म्हणून पुन्हा पुन्हा तेच पातक किंवा प्रमाद आपल्या हातून घडत असतात व पुन्हा पुन्हा सुखाचा लोभ वाढत असतो. हणून पुन्हा जन्म! हे रहाट गाडगे चालू

असते. पण कोणत्या तरी जन्मात आपण काहीं पुण्य कर्म निश्चित केले आहे. त्या कर्माचा फेड म्हणून ते कर्म आपल्याला गुरुमार्गी करते. पण त्यावेळी गुरुंची आठवण होत नाही . म्हणून एखादे संकट आपल्या जीवनांत निर्माण होते. त्यावेळी आपल्याला सुख कसे लागेल म्हणून आपण गुरुंना भेटतो. वास्तविक ते दु:ख नसते तर आपल्याला जागे करून आपण जाग्यावर यावे म्हणून कर्माने आपल्यावर उपकार केलेले असतात. त्यावेळी पुनश्च तशी कर्मे आपल्या हातून घडू नयेत म्हणून श्रीगुरु वंशाचे व कर्माचे विमोचन करून त्या ऐवजी दीक्षा देत असतात. ाास्तविक वंशात व कर्मात जे काहीं दोष असतात ते दोष जाऊन जीवन निर्दोष व्हावे अशी गुरुंची इच्छा असते व पुढील जन्माची तरतूद ते करून देत असतात. पण आपण आपल्या सभोवार जे जग दिसते तसे जीवन आपण उपभोगावे म्हणून विमोचनाला व दीक्षेला किंमत देत नाही. पण ज्यावेळी ही जाणीव होईल तेव्हां त्याचे मूल्य काय आहे हे कळेल. हा जन्म वारंवार येत नसतो. पुन्हा जन्माला येण्यासाठी काहीं शेकडो वर्षे लागतात. म्हणून ज्ञानी पुरुषानी जीवन व्यर्थ खर्च करू नका असे वारंवार सांगितले आहे. हया जीवनाचा आपण उपभोग घेऊन इतरांना त्याचा उपयोग व्हावा याकडे लक्ष द्यावे. वास्तविक जन्माला येते वेळी हे जीवन ‘वना’सारखे होते. गुरु भेटल्यावर त्याचे नंदनवन झाले . हा धर्म गुरुंचा आहे. आपण कर्माधीन आहोत म्हणून गुरुंनी काय दिले आहे हा प्रश्न आपल्यापुढे उभा असतो. ज्यावेळी कर्माधीन अवस्था सुरु होते व जीवन इतरांसाठी आहे ह्याचा बोध होतो. म्हणून पुन्हा पुन्हा जन्माला येऊन कर्माधीन होण्यापेक्षा जन्म घ्यावयाचा आहे पण गुरुकृपेने



धर्मासाठी हेच वचन आपण पाळले पाहिजे. एखादेवेळी आपले जेवण विसरले  तरी चालेल कारण त्यापेक्षा जीवन अधिक मोलाचे आहे असा ध्यास लागला पाहिजे. आपण जी ॐकार साधना करीत असतो त्या साधनेत जी अवस्था ‘उ’ अशी आहे तिची प्राप्ती ध्यान अवस्थेमध्ये होते. आता गुरुपाशी आपण काहीं मागायचे नसून आपला जन्म जो व्यर्थ गेला असता तो गुरुकृपेने अर्थपूर्ण झाला आहे, तेव्हां ह्या जन्माची दक्षिणा गुरूंना द्यावयाची आहे. ही दक्षिणा म्हणजे आपण दक्ष राहणे हे आपल्या हिताचे आहे. जो वंश जन्माला येतो तो वंश न राहता गुरु **अंश** बनला आहे. म्हणून भवितव्यामध्ये संतती ही अवस्था प्राप्त न करता ‘संपत्ती’ म्हणून जन्म घ्यावयाचा आहे. याचा अर्थ न संपणारी संपत्ती असा कृपाशिर्वाद गुरु देतात.

**चिंतन अवस्था:–** ही अवस्था काय आहे हे ज्ञानी माणसाला सुध्दा समजत नाही. इहलोकांत जन्माला येणे म्हणजे भाग्यवान होणे असा अर्थ आहे. त्रिभुवनात इहलोकांइतका श्रेष्ठ जन्म नाही . कारण जीवाला आपला विकास जन्म झाल्यावर करता येतो. अन्यथा दुसरे लोक हे नुसते जीवंत आहेत. त्याठिकाणी जीव जरी धारण होतो तरी उत्क्रांती इहलोकात होत असते. ह्याला शास्त्रीय कारण असे की, ह्या सृष्टीवर पांचही तत्वे आहेत. जीवाची धारणा होण्यासाठी देह पाहिजे व तो देह पांच तत्वांनी तयार होतो. देह+जीव = जीवन असा अर्थ आहे. हा जीव जेव्हां जन्माला येतो त्यावेळी देह हा नव्याने धारण होतो . पण जीव, जीवात्मा किंवा आत्मा हा पूर्वीचाच असतो. असे जीवन जीवाने भोगलेले असते पण त्याचा लाभ देहाला होत नाही. म्हणून जन्म प्राप्तीनंतर देहाला लोभ असतो व जीवाला किंवा आत्म्याला लाभ

कसा होईल ह्याबद्दल चिंता असते. म्हणजे पर्यायाने हे द्वैत चालू असते . जर गुरु भेटले नाहीत तर 'चिंता' करून 'शेवट गोड करी दत्ता' याच्या ऐवजी 'चिता' हे क्रमप्राप्त आहे. तेव्हां गुरुमार्गात हे द्वैत जाऊन अद्वैताचे ज्ञान झाले पाहिजे. जीवन हे क्षणिक आहे. म्हणून कोणत्या सुखाचा ध्यास लागला आहे हा प्रश्न स्वतःला विचारून पहा. मग सुखाचा ध्यास लागण्यापेक्षा 'सुखाचा घास' हे सुख गुरु देतात. 'शेवटी जीवन गोड व्हावे', असा आशिर्वाद मागणे आपले कर्तव्य आहे. ते सोडून आपल्याला 'जैसी करणी वैसी भरणी' असे जीवन प्रप्त होते. जन्माला आल्यावर सभोवार आपले आप्त व सोयरे जवळीक साधतात व शेवटी आपल्याला त्याना सोडावे लागते कारण परलोकांमध्ये कोणीही आपले नाही. म्हणून श्रीपंतांच्या पदात 'एकलासि येणे, एकलासि जाणे', हा बोध केला आहे व गुरुमार्ग हा भला असे सांगितले आहे. परलोकात आत्म्याला देह नाही. फक्त देहालाच आपली व इतरांची ओळख असते. अशावेळी परलोकात फक्त आत्मा व त्याचे कर्म अस्तित्वात असते. जर सत्कर्म केले असेल तर ते बरोबर परलोकांत येते. बाकीचे वासनारूपी कर्म इहलोकात असते. ते वासनारुपी कर्म इहलोकात असते ते वासनारुपी कर्म इहलोकात आहे म्हणून जन्म. जेव्हां सत्कर्म घेऊन आपण जाऊ त्यावेळी आपल्याला पुनर्जन्म येईल. हे जेव्हां आपल्या समजेल तेव्हां चिंतन अवस्था! म्हणजे पूर्वीच्या अनेक जन्मात आपण जन्माची उतराई होत नाही ती व्हावी म्हणून चिंतन ! 'चि' म्हणजे चिरंजीव व 'तन' म्हणजे कारण देहाची प्राप्ती. असा आशिर्वाद गुरुंकडून घेऊन परलोकांवरती हा आत्म्याचा प्रवास सुरु होतो. चिंता व चिता असे जीवन न राहून



चिंतन म्हणजे आत्म्याचे कार्य—दया-क्षमा-शांती ही त्रिपुटी ज्याच्या आचारात व विचारात अनुभवास येतेतो आत्मा, परमात्मा होतो. एवढी तरतूद केल्यावर श्रीपंतांचा बोध आहे, "साधनसेवा काहींच नसता, दावियले निजधाम" असे जीवन होते. शेवटी हे चिंतन सदैव असावे–"दया करी श्रीगुरु दत्ता, दुर्गुण काढू मी न शके, क्षमा करी रे अनंता"-. ह्या साधनेत अवधान, ध्यान व चिंतन यांची त्रिपुटी झाल्यावर तो साधक 'सच्चिदानंद' होतो व त्यानंतर जीवनात देणे व घेणे इत्यादी न राहता 'लेणे काय आहे ? ' असा प्रश्न ईश्वर साधकाला विचारतो!

श्रीमहाकारण दीक्षा श्रीसद्गुरु कृपावंत होऊन भक्तभाविकांना प्रदान करतात. श्री महाकारण दीक्षा ही 'प्रेरणा' आहे. ती अवस्था असून कल्पना नाही हे लक्षात घेतले पाहिजे. जगत्कल्याणाच्या कार्यात तळमळ ही आत्म्याला असते व ईश्वराचे सहाय्य प्रेरणा म्हणून मिळत असते. लोककल्याणाचे कार्य करण्यास कल्पना निर्माण करून चालत नाही. कारण कल्पना हा बुध्दीचा कार्यकारणभाव आहे. बुध्दी जरी प्रेरणा देता झाली तरी मूलतः बुध्दीची धारणा ही कर्मांगाने युक्त असून कर्मपरत्वे बुध्दीला चालना मिळते. म्हणून अशा चालनेला प्रेरणा म्हणता येत नाही. प्रेरणा ही चैतन्ययुक्त असून आत्म्याच्या ठायी तिचा अविष्कार होत असतो

मूळ प्रेरणेची निर्मिती होऊन ती साकार झाली तरी ती प्रेरणा आकारात येण्यासाठी काहीं शतकांचा काळ जावा लागतो. या काळात जगतावर अवतीर्ण झालेल्या अनेक सत्पुरुषांचा सहभाग, ह्या प्रेरणेची सिध्दता करण्यासाठी कार्यान्वित होतो.

अशा रीतीने जगत्कल्याणासाठी निर्माण झालेली ईश्वराची प्रेरणा हिची सिध्दता अनेक अवतारी पुरुषांच्या तळमळीतून व समर्पित जीवनातून होण्यास जरी काहीं शतकांचा काळ लागला तरी ती सिध्दावस्थेत गेलेले ईश्वरी प्रेरणा जगाच्या अंतापर्यंत जगत्कल्याणाचे कार्य करीत राहते.

आज सिध्दस्वरूपात आपणास प्राप्त झालेली महाकारण दीक्षा म्हणजेच ही ईश्वरी प्रेरणा होय. तिची परंपरा श्री आदिनाथांपासून आहे. श्री आदिनाथांनी नवनारायणांना अनुग्रहित करून नाथ केले व नवनाथांनी अनाथ जगताला सनाथ व सज्ञान करून श्री गहिनीनाथांनी पुढील कार्यासाठी श्री निवृत्तीनाथांना अनुग्रहित केले. ह्या काळापर्यंत पंचाहत्तर टक्के वैराग्य व पंचविस टक्के भक्ती हे उपासनेचे सूत्र होते. श्रीज्ञानेश्वरांनी मूळ प्रेरणा म्हणजे ईश्वराची इच्छा काय आहे हे जगाला समजावे म्हणून ‘पसायदान’ याचा मंगल शब्दोच्चार केला. आणि पन्नास टक्के ज्ञान व पन्नास टक्के भक्ती अशी उपासना पध्दती जगासमोर ठेवली. जे ज्ञान शब्दांनी व्यक्त होते त्यामागे शक्ति उभी असेल तरच ते ज्ञान प्रभावी ठरते व निश्चित असे कार्य करू शकते. म्हणून श्रीज्ञानेश्वरांनी ‘ज्ञान अधिक ईश्वर’ हा सिध्दांत जगताला दिला.

ह्याच परंपरेप्रमाणे आज श्रीसाईनाथ महाराजांनी भवितव्यासाठी मूळ ईश्वरी प्रेरणेला मूर्त स्वरूप देऊन भूतलावर ईश्वरीशक्ति अधिष्ठित केली जी शक्तिपीठ प्रार्थना गुरुबंधुभगिनीना दिली आहे ती प्रार्थना म्हणजे पसायदान होय. जगताला सुख, शांती, समाधान प्राप्त व्हावे म्हणून मूळ ईश्वरी



प्रेरणा ही शब्दरूपांत साकार करून आपल्यासमोर आज श्रीसद्‌गुरुंनी ठेवली आहे. आपण भक्तांनी काहीं याचना न करता किंवा आपल्या ध्यानीमनी नसतांना या कृपेची प्राप्ती श्रीगुरुंकडून होते, ती कृपेची ठेव म्हणजेच ‘ईश्वरी प्रेरणा’ होय. ह्या कृपेची प्राप्ती आज आपणास सुलभपणे व केवळ भक्तियुक्त भावनेने केलेल्या श्री सद्‌गुरुनामस्मरणांतून व्हावी म्हणून कारण, महाकारण व श्री साईशक अशा तीन प्रतिमा देण्यात आल्या आहेत. अशा रीतीने सुमारे अडिच हजार वर्षापूर्वी विश्वामध्ये व्यक्त झालेली ईश्वरी प्रेरणा आज श्रीगुरुकृपेने साकार होऊन जगतात मानवता युगाचा आविष्कार होण्याची सिध्दता प्राप्त करता झालेली आहे.

**श्री महाकारण दीक्षा (प्रेरणा)**

**श्री आदिनाथ**
|
**श्री नववाथ**
|
**श्री गहिनीनाथ**
|
**श्री निवृत्ती नाथ**

**वैराग्य पंचाहत्तर टक्के**

,+

**भक्ती पंचवीस टक्के**

|

**श्री ज्ञानेश्वर**

**ज्ञान पन्नास टक्के**

;+

**भक्ती पन्नास टक्के**

|

**श्री साईनाथ**

**भक्ती शंभर टक्के**

**नामस्मरण**



आपण भक्तांस गुरुकृपाशिर्वादाने प्राप्त जीवनात जो दीक्षांचा लाभ झाला अशी ही साधक अवस्थेतील अत्यंत अवघड अशी अवस्था प्राप्त होण्यास आम्हा मानवांना प्रखर अशा साधनांच्या मार्गाचा अवलंब करावा लागतो. तरीसुध्दा ही अवस्था निश्चितपणे आपण प्राप्त करू अशी शक्यता नाही. परंतु आज श्रीगुरुंनीच कृपावंत होऊन आम्हा भक्तांचे जीवन ह्या दीक्षापरत्वे साकार केले. ही अवस्था जरी आपण भक्तांना काहीं एक साधनसेवा न करता प्राप्त झाली आहे, तरी ही प्राप्त झालेली अवस्था सज्ञान होऊन अभ्यासणे आपण भक्तांचे कर्तव्य आहे. ह्या कर्तव्याची पूर्तता विचारांती करण्यानेच पुढील पिढ्यांच्या सुख-शांती-समाधानाची तरतूद आपण भक्तांनी गुरुकृपाशिर्वादाने केली असे म्हणता येईल.

आपण भक्तभाविकांस जो दीक्षांचा लाभ झाला ह्या दीक्षांपरत्वे आपल्या जीवनाची निश्चित रूपरेषा म्हणजे प्राप्त झालेल्या गुरुकृपाशिर्वादाचे जतन करणे व त्या मार्गपरत्वे आपले व भवितव्यातील आपल्या पिढ्यांचे नित्याचरण गुरुमार्गपरत्वे ठेवणे एवढेच कर्तव्य आपल्यासाठी शिल्लक राहिले आहे. आपण भक्तांस ह्या दीक्षेचा लाभ करून देत असताना श्रीसद्‌गुरुंनी कृपाशिर्वाद देऊन पिढ्यांन् पिढ्या आपणास आपल्या भवितव्यातील सुख-शांती-समाधानाची तरतूद करून दिली. हेच प्राप्त करण्यासाठी आपण ज्ञान अज्ञानाने कुलधर्म, कुलाचार, व्रतवैकल्ये, उपासतपास, जपजाप्य, नवससायास, श्राध्दपक्षादि कर्म करीत होतात. तरी प्राप्त जीवनातील अपेक्षित सुख-शांतीचा

लाभ ह्या रुढीपरंपरेतील अनुकरण पध्दतीच्या अनुकरणाने न झाल्याने आपण गुरुकृपाशिर्वादाच्या शोधार्थ आलात. कार्यपध्दतीच्या मार्गदर्शनाप्रमाणे तुम्हां कुटुंबियांच्या कल्याणार्थ वंशविमोचन, कर्मविमोचन, ऋणमोचन आदि विमोचने करून तुमच्या प्राप्त जीवनाचे हितसंबंध घराण्यातील दिवंगत व्यक्तींच्या हितसंबंधात इच्छावासना म्हणून दोषपरत्वे कार्य करीत होते असा दोषांचे विमोचन केले. अशा दिवंगत व्यक्तींना सद्‌गती प्राप्त होण्यासाठी जरी आपण भक्तांनी वर्षानुवर्षे श्राध्दपक्षादि विधी किंवा त्रिस्थळी (प्रयाग, काशी, गया) तीर्थयात्रा केल्यात तरी आपला इष्ट सद्‌हेतू आपल्याला प्राप्त झाला नाही. त्याचप्रमाणे आपल्या घराण्यातील वंशपरंपरेतील कुलदेवदेवता यांच्या प्रीत्यर्थ कलधर्म, कुलाचार, होमहवन, दानधर्मही केला. पण ह्या देवादिकांच्या कृपाशिर्वादाच्या मार्गाचा अवलंब करूनही तुम्हां भक्तांना इष्ट देवतांच्या कृपाप्रसादाचा लाभ झाला नाही.

आज आपण भक्तांस प्राप्त झालेली ‘दीक्षा’ ही अवस्था केवळ प्राप्त झालेल्या जीवनांतील आपली ऐहिक प्रगती व्हावी यासाठी नसून प्रात जीवनातील प्रापंचिक कर्तव्याची पूर्तता करून प्राप्त जीवनाची सार्थकता करण्याचेही कार्य ह्या दीक्षापरत्वे आपण भक्तांस करावयाचे आहे. अशा ह्या प्राप्त झालेल्या गुरुकृपाशिर्वादामुळे आपण भक्त आपल्या घराण्यातील दिवंगत व्यक्तींना सद्‌गती प्राप्त करून देते झालात, त्याचप्रामाणे प्राप्त जीवनांत आपल्या घराण्याच्या कुलदेवदेवता आहेत ह्यांच्याही कृपाशिर्वादास पात्र झालात. याशिवाय तुमचे प्राप्त जीवन ज्या जन्मकर्म ऋणानुबंधपरत्वे तुमच्या जीवनातील उपासने आड येत होते अशाही कर्माचे विमोचन झाले. अशी ही प्राप्त जीवनातील



जीवनाचे सार्थक करण्याची दुर्लभ अवस्था श्रीसद्‌गुरुंनी केवळ कृपावंत होऊन तुम्हां भक्तास ह्याच जन्मात प्राप्त करून दिली आहे.

ह्या हितसंबंधात मुलाखतीद्वारा आपण भक्तांस असे सुचविण्यात आले की, प्राप्त जीवनाचे सार्थक करण्याचे कर्तव्य आपण भक्तांना या पुढील जीवनात करावयाचे आहे. पण अनेक भक्तांना ‘प्राप्त जीवनाचे सार्थक करावयाचे’ म्हणजे काय करावयाचे हे न समजल्याने त्यानी कारणदीक्षा प्राप्त होताच आपल्या जीवनातील कर्तव्य पूर्ततेपेक्षा अधिक वेळ गुरुकृपाशिर्वादाची प्राप्ती करण्याकडे खर्च करावयाचा आहे असा अर्थ लावला. वास्तविक दीक्षा प्राप्त होणे याचाच अर्थ आपण गुरुकृपाशिर्वाद प्राप्त करते झालो आहोत असा होतो. यासाठी अधिक वेळ सेवेत खर्च करण्याचे कर्तव्य तुम्हा भक्तांवर श्रीगुरुंनी ठेवले नसून प्राप्त झालेला कृपाशिर्वाद फक्त ‘जतन’ करण्याचे कर्तव्य करावयाचे आहे. अशा कर्तव्याची पूर्तता करीत असतांना ज्या समाजामध्ये आपण जन्मास आलो आहोत त्या समाजाप्रीत्यर्थ काहीं परोपकार करण्याचे कर्तव्य माझे आहे ही जाणीव ठेवून ‘मला प्राप्त झालेल्या जीवनातील ऐहिक सुख-शांती-समाधानात इतरांचाही काहीं अंशमात्र वाटा आहे कां ? ’ हा प्रश्न स्वत:स विचारला पाहिजे. असा प्रश्न विचारात घेतल्यावर आपल्यासमोर प्रमुख्याने जे विषय प्रश्नचिन्ह म्हणून उभे राहतात ते प्रश्न म्हणजे ‘मी देवधर्म करावा कां ? ’, ‘मी दानधर्म करावा कां ? ’याशिवाय ‘मी द्रव्यदान, वस्त्रदान, अन्नदान, विद्यादान, भूदान हे करावे कां ? ’

यापैकी पहिला जो कर्तव्याचा भाग म्हणजे देवधर्म व दानधर्म ह्या कर्तव्यापासून आपली मुक्तता गुरुकृपाशिर्वादने झालीच आहे. ही मुक्तता गुरुकृपाशिर्वादाने करण्याचे प्रयोजन अशासाठी होते की आजपर्यंत आपण भक्तांनी ह्या मार्गाचा अवलंब केवळ अंधश्रध्दा व अनुकरण म्हणून केला. वास्तविक प्राप्त झालेले जीवन हे इतरांच्याही सुख-शांती-समाधानाला कारणीभूत व्हावे अशी कर्तव्यपूर्तता करण्यासाठी आहे हा समाजकल्याणाचा व नकळत होणारा परोपकाराचा लाभ घेण्याचे कर्तव्य चुकूनही आपण विचारात घेते झाला नाही.

आता दुसरा मार्ग म्हणजे द्रव्यदान, वस्त्रदान, अन्नदान, विद्यादान इत्यादि. हाही मार्ग प्राप्त जीवनातील कर्तव्यपूर्तता व जीवनाची सार्थकता करण्याचा आहे. पण नित्याच्या जीवनात आपण यापैकी कोणत्या मार्गाचे कर्तव्य करतो? अन्नदान म्हटले की, आपण आदल्या दिवशीचे उरलेले अन्न दारापुढे आलेल्या भिकाऱ्यास देऊन 'मी अन्नदान करतो' असे म्हणतो . वास्तविक जो भिकारी बारा वाजता आपल्या पोटाला लागलेली भूक शमविण्यासाठी भीक मागतो त्यालाही सुग्रास अन्न खाण्याची इच्छा असते. पण कर्मपरत्वे भीक मागणे हेच केवळ जीवन ज्याला प्राप्त झालेले आहे अशाकडे आपण कधीही आस्थेने पाहत नाही. रोज नित्याने आपण दिवसाकाठी दोनदा जेवतो. अशावेळी स्वत:पुढे आलेले सुग्रास अन्न पाहिल्यावर स्वत:स असा प्रश्न विचारावा की ज्या गुरुकृपेने मी आज हे सुग्रास अन्न जेवत आहे त्यात इतरांचाही काहीं वाटा आहे काय? व तो देण्याचे कर्तव्य मला काया-वाचा-मनाने करता येईल काय? त्याचप्रमाणे वस्त्रदान, द्रव्यदान, विद्यादान करताना हा प्रश्न



स्वत:स विचारण्याचे कर्तव्य नित्याने करणे व त्या कर्तव्यपरत्वे आपले आचार-विचार सदैव तसे ठेवणे म्हणजेच 'प्राप्त जीवनाची सार्थकता' होय !

जीवनात काहीं एक साधनसेवा न करता दीक्षा प्राप्त झाली आहे म्हणून अधिक ऐहिक सुखाची प्राप्ती होईल ह्या इच्छा अपेक्षेने प्राप्त झालेल्या दीक्षेचा अनादर चुकूनही न करता जीवनात प्राप्त झालेले सुख, शांती, समाधानाने कसे अनुभवता येईल ह्या कर्तव्याची जाणीव ठेवून प्राप्त झालेले सुख, समाधानाने उपभोगणे हाच खरा ह्या जीवनाचा परमार्थ व सार्थकता होय.

असा जीवनाच्या सार्थकतेचा एवढा सोपा मार्ग सूचित केल्यावर प्राप्त झालेल्या जीवनात व भवितव्यात आपल्या मुलाबाळांच्या कल्याणार्थ काय करणे इष्ट आहे हे ठरविणे तुम्हा भक्तांस जरी शक्य नाही तरी सद्‌गुरुकृपाशिर्वादाने तुम्हा भक्तांच्या कल्याणार्थ श्रीसद्‌गुरु काहीं ना काहीं निश्चित असा मार्ग एवढ्यासाठी सुचवितात की, त्याचा लाभ तुम्हा भक्तांना प्राप्त जीवनात तर व्हावाच पण पुढे तुम्हां भक्तांच्या पिढ्यांन् पिढ्यांचे कल्याण त्या मार्गदर्शनात सामावलेले असते.

आजपर्यंत आपण भक्त जीवनात अपेक्षित सुख-शांती-समाधान प्राप्त करण्यासाठी अनेक मार्गाचा अवलंब करून त्यासाठी पै-पैशाची झीजसुध्दा सोसून निश्चितपणे सुख-शांती-समाधानाचा लाभ घेऊ शकला नाहीत. पण आज आपण भक्त गुरुकृपाशिर्वादास पात्र झाल्याने ऐहिक सुखाप्राप्ती तर झालीच, पण त्याच बरोबर प्राप्त जीवनाचे सार्थक करण्यासाठी

कृपाशिर्वादही प्राप्त करते झालात. अशा प्राप्त झालेल्या जीवनाचा लाभ घेत असता वैयक्तिक स्वार्थाची भूमिका ठेवून श्रीसद्‌गुरुंनी दिलेल्या कृपाशिर्वादाची फेड आपण करू शकणार नाही. वास्तविक गुरुकृपाशिर्वादाची फेड आम्हा मानवांना कोणत्याच जन्मी करता येणे शक्य नाही. हे जरी खरे तरी आज जगतात लोककल्याणाची कार्ये म्हणून काहीं प्रकारे सेवा चालू असते, पण अशा सेवाकार्याची महती किंवा त्या सेवाकार्यात आपण सहभागी व्हावे असा चुकूनही आपण विचार न करता समाजाच्या कल्याणार्थ चाललेले कार्य याची पूर्णत: ओळख करून न घेता आपण अज्ञानाने त्याची निंदाच करीत असतो. पण जेव्हां आपण सद्‌गुरुकृपाशिर्वादाने सुख-शांती-समाधानाचा लाभ करून घेण्याचे कर्तव्य प्राप्त करतो त्यावेळी इतरांच्या सेवाकार्याच्या कर्तव्यास आपण काहीं प्रकारे हातभार लावणे आपले इष्टकर्तव्य आहे ही जाणीव विसरतो. गुरुकृपाशिर्वादाने आपण भक्त देवादिकांच्या धर्मकृत्यापासून किंवा अन्य प्रक्राराने सुखप्राप्ती करण्याच्या मार्गातून जेव्हां आपल्या पै-पैशाची बचत करता तेव्हां जाणत्याने आपली संचित ठेव वाढविण्यासाठी सद्‌गुरुंनी आपल्याला कृपाशिर्वाद दिला आहे अशी ओळख करून न घेता अज्ञानाने आपला जे पै-पैसा अनाठायी खर्च होत होता तो योग्य प्रकारे खर्च व्हावा यासाठी आपण अंगिकारलेल्या अनुकरण व अंधश्रध्दापध्दती यापासून आपल्याला अभयदान दिले हे समजून घ्यावे. हा गुरुकृपेचा वाटा समाजातील अन्य कार्यार्थ सेवेस लावून त्याचा लाभ जर आपण घेते झालात तरच ‘दीक्षापरत्वे आपल्या जीवनाचे सार्थक’ म्हणजे काय याची ओळख पूर्णत: आपणास होईल.



आपण भक्तांच्या जीवनातील इष्टकर्तव्याची जाणीव व ओळख वरील विवेचनात करून दिल्यावर आपणास असे वाटेल की वंदनीय दादांनी ह्या कार्यपध्दतीत नवीन काहीं सेवाकार्याची योजना योजली आहे काय?

प. पू. साईनाथ महाराजांच्या आज्ञेनुसार श्री साई स्वाध्याय मंडळ ही संस्था स्थापन करण्यात आलेली असून हया संस्थेचे कार्य व ओळख आपण भक्तभाविकांस होणे आवश्यक आहे.

आपण भक्त प्रापंचिक जीवनातील अडिअडचणीसंबंधी विचारणा करण्यासाठी आल्यानंतर आपल्याला मार्गादर्शन करण्याचे कार्य श्री साई आध्यात्मिक समिती गेली अनेक वर्षे करीत आहे. यामध्ये आपल्याला धर्माची व देवाची ओळख व्हावी म्हणूनच केवळ हे कार्य स्थापन केलेले नाही. इहजगतात जो कोणी जन्माला येतो त्याला धर्म व देव आहेच. परंतु प्रत्येकाची विचारसरणी अशी झाली की खाणेपिणे, कपडलत्ता म्हणजेच जीवन व ह्या सुखांची प्राप्ती व्हावी म्हणूनच केवळ मनुष्य हा देवाचा व धर्माचा आज विचार करीत आहे. आपल्या प्राप्त जन्माचे कारण काय व त्यापरत्वे आपले इहजगतातील कर्तव्य काय याचा विचार कोणीही करीत नाही, त्यामुळे त्याची ओळख मनुष्याला होत नाही ज्या देवानें आपणास जन्माला घातले त्या देवाची ओळख आपणास व्हावयास पाहिजे.

परंतु मनुष्य आपल्या कर्माची ओळख करून घेण्याच्या प्रयत्नात असतो व ती ओळखही त्याला पूर्णत्वाने होत नाही. जरी जगात ‘जन्माला आलो आहोत’ असे आपण म्हणत असलो तरी

खऱ्या अर्थाने जन्मप्राप्ती अजून व्हावयाची आहे. कारण प्राप्त जन्माचे ज्ञान होईल तेव्हांच जन्मप्राप्ती झाली असे म्हणता येईल. ही अवस्था गुरुभेट झाल्याशिवाय प्राप्त होत नाही. जगात ज्याला 'जन्म' म्हणजे उत्पत्ती अवस्था प्राप्त होते त्याला 'लय' ही अवस्था आहेच. पण 'स्थिती' प्राप्त होणे म्हणजे जन्म प्राप्त होणे असे म्हणता येईल. यासाठी स्थित्यंतर होणे आवश्यक आहे. हे कार्य गुरुकृपेशिवाय होत नाही.

जन्माला येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीच्या जन्मप्राप्तीमागे काहींएक निश्चित कारण आहे हे समजावे. म्हणून आजपर्यंत समितीने ह्या कार्याची ओळख श्री साईनाथ महाराजांच्या कृपाशिर्वादाने आपणास करून दिली आहे. प्रत्येक मनुष्याच्या सुख-शांती-समाधानाबद्दलच्या अपेक्षा असतात. परंतु ह्या अपेक्षांची फलप्राप्ती कां होऊ नये याचे शास्त्रीय कारण कोणीही विचारात घेत नाही. ह्या सुखाची प्राप्ती होत नाही म्हणून स्वतःच्या जीवनात व समाजात अशांतता निर्माण करण्यास आपण कारणीभूत होत आलो आहोत. त्यामुळे ह्या जगात काहीं सुखाचा मार्ग आपल्याला प्राप्त व्हावा म्हणून ज्ञानी होण्याऐवजी मनुष्य अज्ञानी मार्गाचा अवलंब करून अधिकाधिक अज्ञानी होत चालला आहे. अशा हया मानवी जीवनात निश्चित असा मार्ग आम्हा मानवांना मिळावा म्हणून परमपूज्य बाबांनी वेळोवेळी कृपाशिर्वाद म्हणून मार्गदर्शन केले आहे. हा आशिर्वाद म्हणजे आजपर्यंत हजारो वर्षापासून अवतारी पुरूषांनी मानवी कल्याणासाठी केलेल्या सिध्दसाधना होत. त्यांची प्राप्ती सर्वसामान्य मनुष्यास सुलभपणे व्हावी म्हणून एखाद्या मध्यस्थामाध्यमातून अशी कार्ययोजना ईश्वर करीत असतो. ती



कार्य योजना त्या 'मध्यस्थ' व्यक्तीच्या विचारातून निर्माण झालेली नसते. परंतु अशा कार्यात मानवी जीवनामध्ये सुख-शांती-समाधानाचा लाभ व्हावा अशी योजना असूनसुध्दा मनुष्य अज्ञानामुळे ह्या मार्गाला दुरावतो.

अशा योजनापैकी **वंशविमोचन** हे साधन अत्यंत महत्वाचे असून त्या साधनाचा लाभ आपण भक्तांनी घेतलेला आहे. मानवी जीवनांत संपत्तीनाश, संततीनाश व विद्यानाश हे प्रमुख दोष आहेत. त्यांच्या निवारणार्थ पूजापाठ नवससायास इत्यादी मानवी प्रयत्न अपुरे पडत असून गुरुकृपाशिर्वादाचा लाभ झाला तरच ह्या दोषापासून आपली म्हणजेच पर्यायाने पुढील पिढ्यांची मुक्तता होत असते. यामध्ये विद्यानाश हा दोष निर्माण झाला तर एका पुढीत काहीं व्यक्तींचे विद्याविद्यार्जन होते काहींचे होत नाही. पुढे कालकालांतराने हा दोष वाढीस लागून कुटुंबात ऐपत असूनसुध्दा विद्याविद्यार्जन करता येत नाही. आज व भवितव्यात प्रत्येक व्यक्तींने विद्याविद्यार्जन करणे अत्यंत आवश्यक आहे . पण अशा दोषांचे निवारण गुरुकृपाशिर्वादाचा लाभ झाला तरच होत असते . यासाठी श्रीसद्‌गुरुकृपेने **'श्री साई स्वाध्याय मंडळ'** ही संस्था स्थापन केली असून समितीच्या प्रत्येक कार्यकेंद्रावर एक वही ठेवण्यात आली आहे. आपण भक्तभाविकांनी व कुटुंबीयानी स्वतःच्या हस्ताक्षरांत ह्या वहीमध्ये आपले नांव व पत्ता याची नोंद करून श्री साई स्वाध्याय मंडळाचे सभासद व्हावे.

आपण जे विद्याविद्यार्जन करतो त्या शिक्षणामुळे पुढे नोकरी, धंदा, व्यवसाय करून द्रव्यार्जन करीत असतो. परंतु

सुखप्राप्ती झाली तरी शांतता आपल्या अनुभवास येत नाही. याचे कारण विद्या ही दान करावयाची असते. पण आपल्या ठिकाणी परोपकारचा ठेवा नसल्याने त्याचा लाभ आपल्याला होत नाही. भवितव्यात आपल्या कुटुंबातील जे कोणी विद्याविद्यार्जन करून ज्ञानवंत होतील त्याना प्राप्त होणारी विद्या हिचा सदुपयोग जगाला सुखी करण्यासाठी व्हावा अशी परमपूज्य बाबांची इच्छा आहे . त्यासाठी श्री साई स्वाध्याय मंडळाची स्थापना करण्यात आली. ह्या संस्थेच्या सभासत्वासाठी काहीं वर्गणी जमा केलेली नाही. आपण भक्त सभासद व्हावे म्हणून परमपूज्य बाबांचा आशिर्वाद ह्या स्वाध्याय मंडळासाठी प्राप्त झालेला असून ती ठेव आपण आपली नांवे सभासद म्हणून नोंदविण्याआधीच प्राप्त झालेली आहे.

आपण भक्तभाविक आजपर्यंत अडिअडचणीचे निवारण करून घेण्यासाठी श्रीगुरुचरणांशी येत आहात व पुढेही याल. जीवनातील दु:खे दूर होऊन सुख शांती लाभावी अशी आपली इच्छा जरी असली तरी विद्येतून जे ज्ञान प्राप्त करावयाचे ते ज्ञान जर नसेल तर किहीही सुख प्राप्त झाले तरी 'समाधान' ही अवस्था आपणास अनुभवता येणार नाही. कारण समाधान ही अवस्था पै-पैशाने प्राप्त होणारी नसून विद्यार्जनातून ज्ञानी होण्यामुळे प्राप्त होते, याचा विचार सूज्ञ भक्तभाविकांनी भवितव्यासाठी केला पाहिजे.

सर्व सामान्यपणे मनुष्य असा विचार करतो की, उच्च शिक्षण घेणे म्हणजे ज्ञानवंत होणे. परंतु 'ज्ञान' ही वेगळी अवस्था असून ती देहिक माध्यमातील आचार, विचार व उच्चार



यामधून व्यक्त झाली पाहिजे. जगात काहीं लोक असे जन्माला येतात की, ज्याना असामान्य बुध्दिमत्ता लाभलेली असते. अशा बुध्दिचा सदुपयोग जगाला ज्ञानी करण्यासाठी केला गेला पाहिजे. कारण पूर्व पुण्याईने त्याना अशी अपूर्व संधि प्राप्त झालेली असते. की, विश्वाच्या कार्यामधील 'ज्ञान' ही अवस्था स्वत:च्या ठिकाणी घारण व्हावी. परंतु हे न समजल्यामुळे अशा व्यक्ती विश्वविद्यालयात शिक्षण घेऊन केवळ आपल्या चरिर्थाचाच विचार करतात. त्यामुळे जगाला ज्ञान देण्याचे कर्तव्य त्यांच्या हातून पार पाडले जात नाही. अशा व्यक्ती जरी सुख प्राप्त करता झाल्या तरी समाधान ही अवस्था अनुभवू शकत नाहीत.

गुरुमार्गात जे ज्ञानी आहेत त्यानी हे ज्ञान शाळेत किंवा विश्लविद्यालयात प्राप्त केलेले नसून त्याची प्राप्ती ही स्वयंभू किंवा गुरुमार्गात काहीं एका विशिष्ट साधनेने होत असते. हेच ब्रह्मज्ञान असून त्या ज्ञानास 'अपौरुष' असे म्हणतात. ज्ञानाचा आरंभ 'श्री'ने होतो व शेवटही 'श्री'ने होतो. पहिली'श्री'म्हणजे लक्ष्मी व दुसरी'श्री' म्हणजे सरस्वती आहे . पहिल्या श्रीची प्राप्ती कुणालाही होत असते, परंतु दुसऱ्या श्रीची प्राप्ती होण्यासाठी पूर्वपुण्याई, पूर्वसंस्कार किंवा कृपाशिर्वादाची आवश्यकता असते. आज जगात असे किती लोक आहेत की, ज्याना पूर्वपुण्याईने जन्म घेता येतो ? या विसाव्या शतकांत शिक्षणाशिवाय जगणे आम्हा मानवांना कठीण आहे. ज्ञान हे पूर्वपुण्याईवर अवलंबून असल्यामुळे जगात बोटावर मोजता येण्याइतकेच लोक या ज्ञान अवस्थेचा लाभ घेऊ शकतात. पण बहुसंख्य लोक पूर्वपुण्याई अभावी व जीवनांतील दोषपरत्वे शिक्षण घेता येत नाही म्हणून

दु:खी आहेत. याची जर कीव आली तरी अशा परिस्थितीत स्थित्यंतर करण्याचा मार्ग आज समाजापुढे नाही. याचा फायदा ज्योतिषी इत्यादि लोक घेत असततात. ‘अमुक व्रत, नवस किंवा जप करा, तुमचा मुलगा कालिदास होईल’ असे मार्गदर्शन करतात. पण कालिदास होण्याऐवजी हा मुलगा आपले जीवन इतरांचा दास होण्यात घालवितो . विद्याविद्यार्जन व ज्ञानप्राप्ती न होणे ह्या समस्येमध्ये जगातील पंचाहत्तर टक्के लोक आज आहेत. तेव्हां 'अशा परिस्थितीतून काहीं मार्ग आहे की नाही ?' अशी विचारणा मी हे कार्य स्थापन करण्यापूर्वी परमपूज्य साईनाथ महाराजांना केली होती. ‘पुढील काळात जेव्हां वेळ येईल त्यावेळी मार्ग सुचविन’ असे परमपूज्य बाबा म्हणाले होते. ती वेळ येण्यास पस्तीस वर्षे लागली. हेच गुरुमार्गदर्शनातील मर्म आहे

.आपल्या जन्मकारणाचे व जीवनाचे ज्ञान आपण भक्तांस व्हावे म्हणून ह्या कार्यपध्दतीमध्ये आजपर्यंत साधना संमेलने घेण्यात आली. ह्या संमेलनामधील प्रमुख विषय म्हणजे मानवी जन्म जो प्राप्त होतो त्याची ‘जीवनउत्पत्ती व कार्य’ असा होता. आम्ही मानव जरी जन्म प्राप्त करते होतो. तरी जीवन जगणे ही कला आहे व तिचा लाभ गुरुकृपेशिवाय होत नाही यामध्ये गुरुभेट होणे किंवा गुरुंना मानणे इतकेच नसून गुरु जे मार्गदर्शन करतात त्यापरत्वे जे कर्तव्य आहे ते आपल्यालाच करावे लागते. ही शिकवण ह्या साधना संमेलनातून भक्तभाविकांना देण्यात आली. या बरोबरच देहिक विकासासाठी आवश्यक अशी सेवा म्हणजे ॐकार साधना व श्रीसद्‌गुरु नामस्मरण ही साधनाही शिकविण्यात आली.



ह्या संमेलनामधून भक्तभाविकांस ज्या अलौकिक ब्रह्मज्ञानाचा लाभ झाला त्यामुळे आपण प्राप्त जीवनाबद्दल सज्ञानी होऊन आपल्या काया-वाचा-मनाच्या ठिकाणी केवळ गुरु हेच तत्व ह्या जगांत साक्षी आहे अशी नितांत आदराची ठेव प्राप्त झाली आहे. ही अमोल ठेव प्रत्येकाच्या जीवनात व आपल्या कुटुंबातील पिढ्यान्‌पिढ्यामध्ये सदैव वास करीत रहावी याची साक्ष म्हणून श्री साई स्वाध्याय मंडळ ही संस्था स्थापन केली आहे. आपण सर्वांनी आपल्या कुटुंबासाठी भवितव्यात असा आशिर्वाद प्राप्त करावयाचा आहे की, प्रत्येकाला जन्माला आल्यानंतर विद्याविद्यार्जन ही ठेव जन्मात:च प्राप्त होऊन ज्ञान ह्या अवस्थेचा लाभ व्हावा. ही ज्ञानज्योत आपल्या कुटुंबांत अखंडपणे वास करीत रहावी म्हणून श्री साई स्वाध्याय मंडळ ह्या संस्थेचा सभासद श्रीगुरुंनी आपणास करावे अशी परम पूज्य बाबांच्या चरणी मी प्रार्थना करीत आहे.

जगामध्ये संस्था स्थापन करण्यासाठी लोक पैसा जमा करतात. श्री साई स्वाध्याय मंडळ ह्या संस्थेचे हे वैशिष्ठ्य आहे की, आपणापैकी प्रत्येकाने ह्या संस्थेचा सभासद व्हावयाचे आहे, पण ते पैशाने नव्हे तर ज्या श्रीगुरुंना आपण काया-वाचा-मनाने मानले आहे ती अमोल ठेव म्हणजे ‘श्रध्दा’ ही आपण वर्गणी म्हणून द्यावयाची आहे. श्री साईनाथ महाराजांचा कृपाशिर्वाद व आपण भक्तांनी त्यांच्या चरणी अर्पण केलेली श्रध्दा यातून श्री साई स्वाध्याय मंडळ ही संस्था जे कार्य जगतात करील ते कार्य म्हणजे खऱ्या अर्थाने ‘लोककल्याण’ कार्य असे म्हणता येईल. अशा अलौकिक तत्वावर स्थापन झालेली संस्था ही जगामध्ये अखंडपणे कार्य करीत राहिल व त्या कार्याचे ब्रीदवाक्य “जे का

रंजले गांजले, त्यांसी म्हणे जो आपुले" असेच असेल. आपण सर्व भक्तभाविक, ज्याना श्रीगुरुकृपेने आपल्या काया-वाचा-मनाचा विकास होऊन ज्ञान अवस्थेचा लाभ झाला आहे त्या काया-वाचा-मनाच्या ठिकणी हाच भाव वास करीत रहावा अशी परम पूज्य बाबांच्या चरणी प्रार्थना!

आपण सर्व भक्तांस परम पूज्य बाबांनी ह्या मंडळाचे सभासद केले आहे याचा अर्थ आपल्या घराण्यातील विद्यानाश जो वंशपरंपरेने पुढे जाणार होता तो विमोचित केला असून भवितव्यात आपण घेतलेल्या विद्येचा मोबदला 'दान' म्हणून करण्यानेच हा कृपाशिर्वाद आपण आपल्या कुटुंबासाठी मिळवू शकाल. ह्या कार्यामध्ये सर्व भक्तभाविकांनी कर्तव्यबुध्दीने सहभागी व्हावे अशी परमपूज्य बाबांचे चरणी प्रार्थना! आपण भक्तांना आपल्या अडिअडणी निवारणार्थ आल्यावर सुख, शांती, समाधान प्राप्त होण्यासाठी धर्माचरण, देवदेवतार्जन इत्यादि मार्गाची ओळख करून द्यावी लागली. पण आज ह्या मार्गदर्शनाच्या पुढील प्रगतीचा मार्ग म्हणजे इतरांच्या कल्याणासाठी प्राप्त जीवनात तन-मन-धनाने काहीं सेवा करण्याचे जे कर्तव्य अंगिकारावयाचे त्या कर्तव्याची पूर्तता आपण आपल्या यथाशक्ति यथाज्ञानाने करून त्याबद्दल जेव्हां समाधान व्यक्त कराल तेव्हां अशी इतरांच्या कल्याणात स्वत:ला समाधान मानण्याची अवस्था प्राप्त करणे म्हणजेच खऱ्या अर्थाने परमार्थातील 'मुक्ति' होय.

आपण भक्तांना कारण दीक्षा प्राप्त झाल्यावर जे पुण्यकर्म करावयाचे आहे त्यामध्ये अधिक काळ साधनसेवेचा विचार न



करता, जे कर्तव्य इतरांच्या कल्याणासाठी म्हणून आपण अंगिकारले त्याची सार्थकता प्राप्त झालेल्या दीक्षापरत्वे आपण भक्त करू शकाल. एवढेच नव्हे तर भवितव्यात आपण भक्तांच्या पुढील पिढ्यांनाही आपण केलेल्या कर्तव्याचा ठेवा हा सहजगत्या लाभणार असून भवितव्यात तुम्हा भक्तांच्या मुलाबाळांनी काहीं नव्याने देवदेवतार्जन, कुलधर्म, कुलाचार, उपासकपास, व्रतवैकल्ये, दानधर्म, तीर्थयात्रा आदि कृत्यांचा लाभ घेऊन पुण्यसंचय करण्याचे प्रयोजन उरणार नाही.

तुम्हा भक्तांच्या हितार्थ व कल्याणार्थ पोषक असे मार्गदर्शन करून भवितव्यात तुमच्या मुलाबाळांनाही त्या मार्गदर्शनाप्रमाणे आपले आचार-विचार ठेवण्यास कोणत्याही प्रकारे अडचण वाटू नये अशाच पध्दतीने हे कार्य गेली कित्येक वर्षे चालले आहे. आज आपण भक्तांना जे वरील निवेदन अभ्यासण्यास दिले आहे ते आपण कुटुंबियानी एकत्र बसून कुटुंबातील सज्ञान मुलामुलींनाही ह्या निवेदनातील हितकारक असा जो मार्गदर्शनातील विषय आहे तो नीट समजावून सांगून त्यांचेही नित्याचे आचारविचार प्राप्त झालेल्या दीक्षेला पोषक होतील असा आत्मविश्वास त्यांच्याठिकाणी निर्माण करावा. दीक्षेस आपण भक्तभाविक कृपापात्र झालात म्हणजे किरकोळ स्वरूपाच्या अडचणी येणार नाहीत असे नाही. पण जरी त्या आल्या तरी गुरुकृपाशिर्वादाने निवारण होतील इतकी तरतूद आपल्या जीवनात झालेली असल्याने आलेल्या अडिअडचणींचा आस्थेने विचार करून कोणत्याही कारणपरत्वे जे काया-वाचा-मनाचे एकरूपत्व होऊन ज्या ॐकार साधनेचा लाभ आपण करून घेणार आहात त्या साधनेत जर आपण केवळ एखाद्या

क्षुल्लक अडचणीप्रीत्यर्थ प्रतिकूल असे विचार निर्माण करून अशांतता निर्माण करू तर प्राप्त झालेल्या दीक्षेतून जी साध्य अवस्था आपण भक्तांना प्राप्त करावयाची आहे ती प्राप्ती होण्यास ह्या प्रतिकूल विचारपरत्वे अ़थळा निर्माण होईल. पूर्वी आपण ह्याच गुरूमार्गातील मार्गदर्शनाचा लाभ करून घेत असताना सूचित केलेल्या साधन-सेवा आपणास करता येत नसत. याचे कारण प्राप्त जीवनातील काया-वाचा-मनाचा हितसंबंध जन्मकर्म जन्मजन्मांतर व अन्य ऋणानुबंधांशी होता. अशा ह्या दोषांचे गुरुकृपाशिर्वादाने विमोचन झाल्यामुळे आपण भक्तांस सुलभ अशा साधनसेवापध्दतीने 'साधक' व 'सिध्द' ह्या दोन अवस्था जरी न कळत प्राप्त झाल्या असल्या तरी गुरुमार्गातील प्रधान अवस्था म्हणजे 'साध्य' ही अवस्था प्राप्त होण्यास जे सुलभ असे साधन सांगितले आहे ते साधन 'साध्य' अवस्थेप्रत नेऊन प्राप्त करण्यास आपण भक्तांस कोणत्याही प्रकारच्या व्रतवैकल्याचा, उपासतपासचा, दानधर्माचा किंवा काहीं संख्येंने जपजाप्य करण्याचा मार्ग सूचित केला नसून ही अवस्था जरी बिकट असली तरी नित्याने निश्चितपणे अर्धा तास सेवा करण्याने ही साध्य अवस्था आपणास प्राप्त होणार आहे

'साध्य' अवस्थेच्या प्राप्तीसाठी जे काहीं साधन आपण भक्तास सूचित करण्यात आले आहे, त्या नित्याच्या साधनेने जेव्हां आपण भक्त आपले देहिक माध्यम म्हणजे काया-वाचा-मन हे नित्याच्या साधनेशी एकरुप कराल त्यावेळी ह्याच काया-वाचा-मनाचे रुपांतर तन-मन-धन म्हणून तुमच्या ठिकाणी धारण होईल. 'साध्य' अवस्थेतील हा स्पष्ट खुलासा आपल्याला केल्याने आपल्यासमोर असा प्रश्न निर्माण होईल कीं, काया-वाचा-मन व



तन-मन-धन यात फरक काय? तर गुरुमार्गा साध्य अवस्था प्राप्त होण्यास काया-वाचा-मनाचा परिपाक होणे हे अत्यावश्यक असल्याने तो जो परिपाक होतो ती काया-वाचा-मनाची परिपाक झालेली अवस्था म्हणजे तन-मन-धन होय.

साधनामार्गारंभी तुमच्या काया-वाचा-मनाची जी देहिक अवस्था होती ह्या अवस्थेचे ऐहिक विषयाधीन होण्याचे कार्य अविरत होत असल्याने तुम्हाला नित्याच्या साधनेत कदापिही एकरुप होता आले नाही. पण जेव्हां ह्या काया-वाचा-मनाचा परिपाक होऊन तन-मन-धन ही अवस्था प्राप्त झाली तेव्हां तुमच्या जीवनातील 'परमेश्वर' हा इच्छित विषय साकार होण्याची क्रिया ह्याच देहिक माध्यमातून तुमच्या नकळत सुरु झाली. अशी ही जीवनात प्राप्त होणारी अमोलिक दीक्षा जर आपणास प्राप्त जीवनात व भवितव्यात कुटुंब कल्याणार्थ रक्षण करावयाची असेल, तर यापुढील जीवनांत काहीं कारणपरत्वे आलेल्या अडिअडचणी निवारणार्थ कोणत्याही देवदैविक उपासना, उपासतपास, नवससायास, व्रतवैकल्ये, तीर्थयात्रा, श्राध्पक्ष, आदि मार्गाचा अवलंब करता कामा नये. याचे कारण दीक्षेच्या 'साध्य' अवस्थेची प्राप्ती होण्यासाठी जे काहीं मार्गदर्शन सूचित करण्यात आले आहे ही सेवा नि:संकोच, अविरत करण्यानेच 'साध्य' अवस्था सिध्द होणार आहे. ह्या अवस्थतेत आपण भक्तांस गुरुकृपाशिर्वादाच्या सामर्थ्याचे चमत्कार, दृष्टांत, साक्षात्कार ह्या विषयासंबंधींची स्वप्ने ही पडणार नाहीत. कारण ह्या सर्व अवस्था साधक अवस्थेच्या पूर्वीच्या असतात व आपण भक्तांस आज त्यापुढील सिध्द व साध्य ही अवस्था प्राप्त झाली आहे म्हटल्यावर आपण पूर्णत: कृपावंत

झाले आहोत ही गोष्ट सत्य आहे. अशावेळी मार्गारंभीच्या अवस्था तुमच्या देहिक माध्यमात उदित होतील ही शक्यता नसल्याने आपण भक्तांनी एकमेकांशी या विषयाबद्दल चर्चा करून जी अवस्था प्राप्त करावयाची आहे तत्संबंधी एकमेकात संशय निर्माण करू नये. त्याचप्रामाणे दीक्षा ही अवस्था प्राप्त होणे म्हणजे आपल्या ठिकाणी सद्‌गुरुकृपाशिर्वाद साकार होणे अशी अवस्था सहजगत्या आज आपल्याला प्राप्त झाली आहे. अशा अवस्थेपरत्वे हे तुमचे तम -मन- धन आता सद्‌गुरुरूप झाले आहे म्हटल्यावर कोणत्याही देवदेवतांचा पुरूषाचा किंवा अन्य बाधेचा संचार आपल्या ठिकाणी निर्माण होईल किंबहुना झाला आहे अशी भावना निर्माण करून त्या अवस्थेपरत्वे इतरांच्या ठिकाणी त्याबद्दलचे भय किंवा आदर निर्माण करू नये.

दीक्षा व त्या दीक्षापरत्वे करावयाची सेवा व कर्तव्य याची पूर्णतः ओळख वरील निवेदनावरून आपण भक्तांना झालीच असेल. कारण दीक्षेच्या प्रार्थनेबरोबर एक प्रार्थना आपण भक्तभविकांना म्हणावयास दिली होती. या प्रार्थनेबद्दल आपण भक्तांना योग्य ते मार्गदर्शन झाले असेल किंवा नसेल म्हणून याबद्दल याच निवेदनात स्पष्ट खुलासा असा की, पूर्वी आपण आपल्या घराण्याच्या इष्टदेवदेवता यांच्या कृपाशिर्वादप्राप्तीसाठी भिन्नाभिन्न प्रकारे उपासना, व्रतवैकल्पे, जपजाप्य होमहवन इत्यादि मार्गाचा अवलंब हा सज्ञान होऊन करते झाला नाहीत. तो एक केवळ घराण्याच्या परंपरेतील वाडवाडिलांनी अनुकरण केलेला मार्ग पुढे आपण आपल्या नित्याचरणात आणलात. पण जेव्हां आपण भक्तांस गुरुकृपाशिर्वादपरत्वे उपासना दीक्षा, नामस्मरण दीक्षा, अनुग्रह दीक्षा, गुरु दीक्षा, आदिंचा लाभ झाला.



तेव्हांच प्राप्त जीवनात सुख, शाती, संपत्ती आदिंचा लाभ सुलभपणे आपण प्राप्त करते झालात. आपल्या भावी पिढ्यांचा विचार करता आपण गुरुकृपाशिर्वाद प्राप्तीपूर्वी ज्या देवदेवतार्जनाच्या मार्गाचा अवलंब करीत होतात तो मार्ग भविष्यात पुढील पिढ्या आचरणात आणू शकतील किंवा जरी आचरणात आणण्याचा प्रयत्न केला तरी त्याला पोषक असा आचार, विचार व आहार या भावी पिढ्याना करता येईल अशी शक्यता नाही. यासाठी आज प्राप्त झालेल्या कारण दीक्षेचा लाभ घेत असताना पुढील पिढ्यांची तरतूद करण्याची जबाबदारी आपण भक्तांची असल्याने जी प्रार्थना म्हणावयास दिली आहे त्या प्रार्थनेचा प्रधान हेतू असा की, भविष्यात तुमच्या घराण्यातील मुलाबाळांच्या ज्ञानअज्ञानाने जरी त्यानी कुटुंबपरंपरेतील कुलधर्म, कुलाचार करण्याचे कर्तव्य केले नाही तरी त्यापरत्वे त्यांच्या जीवनात दु:ख तथा अशांतता निर्माण होण्याचे काहींएक कारण उरणार नाही. हीच भविष्यातील तुम्हा कुटुंबियांच्या कल्याणाची तरतूद होय. तुम्ही भक्तांनी आजपर्यंत जे ज्ञानअज्ञानाने देवदेवतार्जनाचे, कुलधर्म, कुलाचार म्हणून रूढीपरंपरेने अनुकरण केलेत, त्याची सांगता तुमच्याच हयातीत तुम्हां भक्तांकडून व्हावी व पुढील पिढ्यांना भवितव्यात केवळ एक गुरुभक्ती ऐवढाच प्राप्त जीवनाच्या सार्थकतेचा मार्ग सुलभपणाने प्राप्त व्हावा ह्या गुरुकृपेच्या आज्ञेप्रमाणे ती प्रार्थना आपण भक्तांना कारण दीक्षेबरोबर म्हणावयास दिली होती.

अशी प्रार्थना आपल्या म्हणण्यात येते म्हणजे आपण आपल्या घराण्याच्या कुलदेवदेवतांच्या हितसंबंधांत नाही अशी गैरसमजूत कुणीही भक्तांने करून घेऊ नये. कुलधर्म-कुलाचार

परंपरेच्या रूढीपरंपेंतून आपण भक्तांना जरी गुरुकृपाशिर्वादाने त्या कृत्याची सांगता होऊन अभयदान मिळाले आहे तरी ज्यांच्या कृपाशिर्वादाने गुरूकृपाशिर्वादाच्या माध्यमाचा लाभ झाला, त्या घराण्याच्या इष्टदेवदेवता यांचा परिचय तुम्ही भक्तानी भावी पिढ्यांना करून देण्याचे कर्तव्य याकडे दुर्लक्ष करू नये.

आपण भक्तांना परमार्थाबद्दलची व जीवनाची सार्थकता करण्याबद्दलची जाणीव ही गुरुमार्गात आल्यावर झाली. तत्पूर्वी आपल्या कुटुंबातील अन्य वडीलव्यक्ति ह्या आपल्या कुटुंबांच्या कल्याणार्थ व रक्षणार्थ आपल्या घराण्याच्या कुलदेवदेवतांची मनोभावनेने सेवा करीत होत्या. अशा व्यक्तींनी दीक्षापरत्वे जरी वार्षिक कुलधर्म, कुलाचार म्हणून नव्हे पण ज्या देवदेवतांच्या कृपाशिर्वादाने या गुरुकृपाशिर्वादाचा लाभ झाला त्या घराण्याच्या इष्ट देवदेवतांच्या कृपाशिर्वादाची उतराई आपल्या हातून व्हावी म्हणून जरी ओटी भरणे, हळदीकुंकू करणे किंवा अन्य प्रकारे देवतार्जन केले तर ते दीक्षेस बाधक आहे अशा समजूतीने त्या व्यक्तीच्या श्रध्दाभक्ती आड कोणीही सूज्ञ भक्तांने येऊ नये. पूर्वी कुटुंबात जे काहीं देवदेवतार्जन केवळ चालीरीती म्हणून होत असे ते आता आपण भक्तांनी सज्ञान होऊन करण्यामुळे त्याचा लाभ यथोचित असा होईल. जी धर्मकृत्ये वर्षानुवर्षे करावी लागत होती ती केवळ वार्षिक म्हणूनच आपल्याला विचारात घ्यावी लागतील,

आम्ही मानव कर्माधीन आहोत. त्यामुळे स्वाभाविक ऐहिक विषयांची अधिकाधिक एकरूप होऊन ते विषय सेवन करणे म्हणजेच जीवनाची इतिकर्तव्यता असे जरी आपल्याला वाटत



असले तरी परमेश्वराने आपल्या कल्याणार्थ योग्य अशा मार्गादर्शनातून व आपली देहिक अवस्था ज्या प्रमाणेमध्ये विकसित होईल त्या अवस्थेपरत्वे परमेश्वरी स्वरूपाचा लाभ घेता यावा म्हणून सर्व सामान्य उपासकापासून ते अवतारस्वरूपापर्यंत आपल्या कल्याणाची योजना आपल्याला परिचित करून दिलेली आहे. असे थोर उपकार करून ज्या परमेश्वराने जगाच्या उत्पत्तीपासून अंतापर्यंत आम्हा मानवाच्या कल्याणार्थ जे सत्कार्य म्हणून चालविले आहे अशा या सत्कार्यात आपलाही काहीं अंशत: भाग आहे. जरी आपल्याला अशा कार्यात सहभागी होता आले नाही तरी सहानुभूतीचे कर्तव्य करण्यास काहीं अडथळा असू नये. आज आपल्या जीवनात ज्या ज्या काहीं आपल्या गरजा आहेत त्या आपल्याला विनामूल्य कोठेही भागवून मिळू शकत नाहीत. आज प्रत्येक मनुष्य एकमेकाच्या सोयीपरत्वे एकमेकला मदत करण्याचा जरी प्रयत्न करतो आहे तरी त्या मदतीत निस्वार्थ, निरपेक्ष असा भाव अनुभवास येत नाही. प्रत्येकाची मदत करण्याची जी भावना आहे, ती 'उपकार' या स्वरूपामध्येच विचारात घेतली जात असल्याने झालेल्या उपकाराची फेड होत नाही अशी खंत वाटत राहते. वास्तविक आपण मानवातील स्वाभाविक असा जो मानवता धर्म की, 'सर्वांभूती आत्मा एक आहे' ह्या विचाराने जगातील प्रत्येक मानवाने आपापली सुखदु:खे एकमेकांना विचारात घेऊन ती आस्थेने निवारण करावयास पाहिजेत. जी सुखदु:खे तुम्हां मानवांच्या सामर्थ्यापलीकडे आहेत त्यांच्या निवारणार्थ परमेश्वर अवताररूपाने या जगताचा भार वाहतच आहे. अशा परिस्थितीत हे जे सिध्द सत्पुरूष अवतार म्हणून कार्यार्थ येतात त्याना महान

असे जगताचे कार्य करावयाचे असते. पण ह्या जगतामध्ये आपण मानव एक घटक म्हणून आहोत, त्यामुळे आपण या महान अवतारपरंपरेचा लाभ घेत असताना केवळ जगातील दु:खी लोकांना सुखी करण्यासाठी ही अवतारपरंपरा आहे असा संकुचित विचार करतो व आपल्याला प्राप्त झालेल्या जन्मात केवळ आपणच सुखी कसे होऊ एवढाच विचार करतो. आपल्या सुखाची तरतूद करण्यासाठी त्या परमेश्वराला उपासक अवस्थेपासून ते महाकारणिक अवस्थेपर्यंत म्हणजे अवतार कार्यापर्यंत अनेक जन्म हे तर घ्यावे लागतातच. पण त्याबरोबरच या ऐहिक जगतातील सुखांचा त्यागही करावा लागतो. जेव्हां आपण अशा सिध्द-सत्पुषांच्या दर्शनार्थ जाता व अपेक्षित सुखाची याचना करता, अशावेळी निदान असा तरी प्रश्न आपल्या मनाला विचारा की, ज्या सिध्दसाधकांनी अनेक जन्मांपर्यंत प्राप्त झालेला जन्म हा साधन मार्गाने प्राप्त करून आपल्यासमोर ईश्वरी स्वरूपाचा साक्षात्कार घडविला आहे त्यांच्यापुढे केलेल्या सुखाच्या याचनेचे सुख ह्याचा ह्या जन्मात किती काळ पर्यंत उपभोग मी घेऊ शकेन? एवढी जरी विचारण जाणीवपूर्वक आपण आपल्या मनाला केलीत तरी तुमच्या पुढे जे सिध्द-सत्पुरूष परमेश्वराच्या विराट अशा अवतारकार्याचे सूत्र हाती घेऊन बसले आहेत. त्यांच्या कृपाशिर्वादास आपण सहज प्राप्त करते व्हाल.

गुरूपौर्णिमा हा सण आपण दरवर्षी साजरा करतो. हा जन्म जो प्राप्त झाला आहे त्यानंतर पुन्हा जन्म प्राप्त होईल की नाही याची शाश्वती नाही व जरी जन्म प्राप्त झाला तरी पुन्हा गुरुप्राप्ती होईल किंवा नाही व झाली तर पुढील कुठल्या जन्मांत



होईल हे समजणे कठीण असते . गुरुप्राप्ती झाल्यावर त्यांच्या कृपेंने जन्माचे सार्थक होते हे निर्विवाद आहे. परंतु आपल्या जन्मांत गुरुभेट होईपर्यंत जीवनातील जो काळ वाया गेला याबद्दल जरी आज आपल्याला पश्चाताप वाटतो तरी तशी वेळ पुन्हा पुढील जन्मांत येऊ नये याची दक्षता कुणीही घेत नाही. अनेक सणवार वर्षानुवर्षे जीवनात येतात, पण त्या दिवसाचे महत्व आपण विचारात घेत नाही. दरवर्षी आपण सण साजरे करतो, पण त्यांचे स्मरण रहात नाही. कारण हे सण दरवर्षी येतात. परंतु ज्या जीवनात हे सण साजरे करावयाचे तो जन्म पुन्हा केंव्हा येईल हा विचार जर आपण केला तर मग खऱ्या अर्थाने दसरा व दिपावली आपण प्राप्त जन्मात साजरी केली काय, हा प्रश्न आपणास स्वत:ला विचारावा लागेल. ह्या सणाप्रमाणे गुरुपौर्णिमाही दरवर्षी येते. हा दिवस गुरुऋणाची फेड करण्यासाठी आहे . त्या दिवशी आपण गुरुपूजन करतो ते केवळ द्रव्यमाध्यमातून, पण त्याने गुरुऋणाची फेड होत नाही. ज्यांच्या कृपेने आपण सज्ञान झालो नांवारूपाला आलो किंबहुना ह्या जन्माची सार्थकता करता आली, त्या गुरुऋणाची फेड कदापिही करता येणार नाही. जर आपल्या प्राप्त जन्मातील थोडेबहुत आयुष्य इतरांच्या कल्याणार्थ खर्ची पडले तरच ही फेड अल्पांशाने होऊ शकते.

माझ्या आयुष्यातील गेली पन्नास वर्षे गुरुपौर्णिमा ह्याच दिवशी मी दसरा व दिपावली साजरी करीत आलो. त्यानिमित्त केवळ मुलाबाळांना कपडे दागदागिने केले नाहीत तर खऱ्या अर्थाने सण साजरे केले व त्यावेळी स्वत:ला असा प्रश्न विचारला की "दसरा जरी साजरा होत असला तरी जीवनांत सीमोल्लंधन

झाले काय? ” त्याचप्रमाणे “दिवाळी साजरी झाली तरी ज्या जगात आपण जगतो आहोत त्या जगाला ‘प्रकाश’ म्हणजे ज्ञान देता आले काय”? ह्या रीतीने जीवन जगता यावे म्हणून श्रीसद्‌गुरुंनी जी कृपा केली तो दिवस म्हणजेच गुरुपौर्णिमा ! पण हा अनुभव अनुभवण्यासाठी पन्नास वर्षात गुरुंना दक्षिणा म्हणून काय दिले? त्यासाठी तन, मन, धन हे द्यावयाचे असते. येथे धन म्हणजे पैस नव्हे. पैशाने जे खरिदताच येत नाही असे सर्व गुरुंना अपर्ण करावयाचे व ‘ज्या ज्या ठिकाणी मन जाय माझे’ असे जे मन तेही गुरुंना अपर्ण करावे लागते.

गेली पन्नास वर्षे मी एकाच गुरुंचे नांव घेतले. नामस्मरण त्यांचेच केले. जीवनात सुखदु:खे आली ही पण त्यांची कृपा. त्यांच्या कृपेने हे जे कार्य आपल्यासमोर ठेवले ते कार्य करण्याची प्रेरणा त्यांनीच दिली. त्याप्रमाणे मी त्यांची आज्ञा हिचा कृपा म्हणून स्वीकार केला. जीवनारंभी अडीच वर्षे माधुकरी मागून सेवा केली. इतरांच्या दृष्टीनें ते दु:ख असेल पण आज जेवढी सुखे मला मिळाली यापेक्षा मी अधिक सुखी त्यावेळी होतो. माधुकरी मागताना ती त्यांच्यासाठी मागितली. कारण देवासाठी भीक मागणे हयात केवढा स्वाभिमान आहे !

पन्नास वर्षे हा दिवस मी नित्याने साजरा केला. गुरुपौर्णिमा हा सण मला इतर सर्व सणापेक्षा मोठा वाटला. लोकांना दरवर्षी दसरा व दिपावली ही मोठी वाटते. कारण ह्या दिवशी गोड जेवण मिळते. शिवाय कपडे अलंकार इत्यादिही करतात. दसरा व दिपावली हेही सण मी साजरे केले पण ते गुरुपौर्णिमेला आशिर्वाद घेऊन साजरे केले. माझ्या जगद्‌गुरुंनी



आपले नांव त्रिभुवनात अजरामर केले. तो दिवस म्हणजे दसरा होय. मी दरवर्षी दसऱ्याला परमपूज्य बाबांना हे मागितले की “जगाला सुखी करण्यासाठी आशिर्वाद द्या. शतकानुशतके समाज हा अंधश्रध्देमध्ये जगतो आहे. त्यांच्या जीवनात दसऱ्याला सीमोल्लंघन करा. हेच मागणे तुमच्या पायाशी जन्मभर मागेन की जेणे करून समाज जागा होऊन तुमच्या नामस्मरणात धुंद होईल. ” त्याचप्रमाणे दीपावली केली व प्रार्थना करीत आलो की, ‘देवा ज्ञान दे. त्या ज्ञानामुळे अंधळ्या समाजाला दृष्टी लाभू देत. जगाला ज्ञानी म्हणजे प्रकाशमय कर, ’ एवढे मागणे मागता मागता आज पन्नास वर्षे झाली तरी अजून दसरा व दिपावली झाली नाही असे मी म्हणतो. मग गुरुपौर्णिमा किती दूर आहे याचा विचार करा.

यापुढे गुरुपौर्णिमेचा दिवस नुसता साजरा करावयाचा नसून पुढे येणारी दसरा-दिपावली ही मला गुरुकृपेने जगासाठी साजरी करावयाची आहे हे आता आपण लक्षात घेतले पाहिजे, तरच आपण गुरुपौर्णिमा साजरी केली असे म्हणणता येईल. गुरुकृपेचे स्तवन गाणे व भाषणे करीत बसणे ह्यात शेकडो वर्षे गेली. पण गुरुंची कृपा ही गाणे व भाषणे यानी संपादन होत नाही. हे जीवन स्वत:साठी नाही. स्वत:साठी केवळ चार आणे असून बारा आणे जीवन दुसऱ्यासाठी आहे. असे हे बारा आणे जीवन जे आहे त्याचा विनियोग जगासाठी कसा करता येईल याचा बोध सज्ञान होऊन आपण भक्तांनी घ्यावा अशी परमपूज्य बाबांच्या चरणी मी प्रार्थना करीत आलो आहे. याचे कारण जी सृष्टी निर्माण झाली आहे तिचा शोध आम्हा मानवांना अजूनपर्यंत लागलेला नाही. प्राणीमात्रांमधील उत्क्रांति व मानवी उत्पत्ती

याबद्दल शास्त्रज्ञांनी संशोधन केले आहे, पण निश्चितपणे काहींही सांगता येत नाही. ‘कर्मवाद’ हा विषय हिंदुधर्मात आला. पुनर्जन्म नाही असे ख्रिश्चन मानतात. मुसलमान, जैन, बौध्द यानी आपापल्यापरीने याबाबत वाद निर्माण केले आहेत. तरीसुध्दा निश्चित असे कोणीही काहीं सांगू शकत नाहीत किंवा सिध्द करू शकत नाहीत. पूर्वीच्या युगात देवधर्म हा विषय अस्तित्वात आला. पण ज्याची प्राप्ती करावयाची त्यासाठी निश्चित काय करावयाचे? कोणत्या मार्गाने गेल्यावर ही प्राप्ती होईल? की देवाच्या नानारूपांबद्दल अंधश्रध्दा मानून स्वस्थ बसावयाचे? असे हे बिकट प्रश्न आजपर्यतं कोणालाही शास्त्रपरत्वे सिध्द करता आले नाहीत. म्हणून परमपूज्य साईनाथ महाराज यांच्या कृपेने ‘मानवता युग’ याची निर्मिती करण्याची जबाबदारी आज आम्हा सेवकांची आहे असे म्हणता येईल. यासाठी काय केले पाहिजे हे सोप्या कार्यपध्दतीने भवितव्यात जगाला पटले पाहिजे. यासाठी असा शास्त्रशुध्द मार्ग शोधला पाहिजे की, ज्याला कोणत्याही धर्माचा विरोध होता कामा नये. कोणता धर्म श्रेष्ठ याबाबत वादविवाद करून चालणार नाही. असे साधन आज समाजापुढे ठेवले पाहिजे की ज्यामध्ये समाजाचे कल्याण होईल. मानवी जीवनातील जुनी मते व नवी विचारसरणी या दोघांनाही मान्य करावे लागेल , असे जे साधन त्याचा शोध घेणे आवश्यक आहे.

‘कर्मवाद’ याचा विचार केला तर कर्माचा आरंभ कोठे याचा शोध घेणे हा एक प्रश्न आहे. आजपर्यंत कर्मवाद व कर्माची फले हा विषय तत्वज्ञान म्हणून विचारात येऊन काहीं युगे खर्ची पडली तरीसुध्दा कर्माचा आरंभ केंव्हा व कोठे झाला



हे ठरविता येत नाही. या त्तवज्ञानातून इतक्या पळवाटा काढल्या गेल्या आहेत की, मानवाला बुध्दी आहे किंवा नाही हा विचार मनात येतो. ह्या शोधाशोधीचा शेवट होणार की आपला शेवट होणार हाच प्रश्न आहे!

प्रत्येकाने आपापल्या धर्माप्रमाणे आचरण ठेवावे हे खरे. तरी धर्म म्हणून कोणते आचरण ठेवावे ह्याचा मार्गदर्शन करीत असणाऱ्या धर्मसंस्था आपल्या स्वार्थापलीकडे विचार नाहीत. दुसरी बाजू समाजाची. आज धर्माचरण करावयाचे म्हटले तरी आपली मातृभाषा आपल्याला येत नाही व कदाचित समजत असली तरी तिचा अर्थ न कळल्यामुळे अधिकच गुंतागुंत झालेली आहे. मग असा विचार येतो की, ह्या समाजात धर्माबद्दलचे एवढे तत्वज्ञान कशासाठी निर्माण झाले? एकमेकामध्ये वितुष्ट, वाद आदि निर्माण होण्यासाठी झाले काय? यापेक्षा प्राचिनकाळी रानटी असे ज्यांना आपण संबोधतो ते मनाने तरी सुसंस्कृत होते. याचा अर्थ सुसंस्कृत म्हणण्यासाठीसुध्दा अजून मानवी जीवन हे अज्ञानी असून त्या अज्ञानाचाच शाप आपण भोगतो आहोत असे म्हणावे लागेल. आजची समाजाची परिस्थिती अशी आहे की, एक नास्तिक तर एक आस्तिक व तिसरा दोन्ही मानणारा. म्हटले तर नास्तिक म्हटले तर आस्तिक. अशा परिस्थितीत समाजाची घटना जोपर्यंत बदलत नाही तोपर्यंत हे वाद कोठपर्यंत चालणार आहेत? ह्याचा शेवट तरी गोड होणार आहे कां? आज समाजातील एक भाग इहजन्माचा आस्थापूर्वक विचारही करीत नाही व समाजातील एक भाग इहजन्माचा विचार करतो आहे. तो मोक्षप्राप्तीच्या मागे लागला असून आपल्या जन्माचे कर्तव्य काय हा स्वतःला प्रश्न विचारीत नाही.

वर उल्लेख केलेला विषय की, ज्यामुळे समाज इहजगतात सुखासमाधानाने रहावा म्हणूनच परमपूज्य साईनाथ महाराजांनी अवतार कार्य केले. ह्या अवतार कार्यात 'ईश्वर सर्वत्र आहे', 'सर्वावर प्रेम करणे हा मानताचा धर्म आहे' ही दोनच तत्वे आहेत. ह्या दोन तत्वांचा विचार करून ती आचरणात आणली तर कोणत्याही धर्माचा किंवा तत्वज्ञानाचा अधिक विचार करण्याची गरज नाही. जन्माला आलेल्या प्रत्येक मानवाला ह्या 'महामंत्राने' ही जागृती होईल की, 'माझ्या जन्माला येण्याचे कर्तव्य माझ्या जीवनात परमपूज्य बाबांच्या कृपेने घडू देत'. आजपर्यंत साधकानी व उपासकानी 'हा मंत्र श्रेष्ठ की तो मंत्र श्रेष्ठ' या वादात ज्याना सन्मार्गाची ओढ लागली होती अशाना योग्य त्या दिशेला जाण्याचा प्रकाश न दाखविता जे जीवन आधीच अंधारात होते त्यात आणखी एका मंत्राची भर घातली. प्रत्येक मंत्राचा उच्चार ॐकारने होतो. हा ॐकारच जर सिध्द झाला नाही तर मंत्राच्या उच्चाराचा उपयोग नाही. म्हणून परमपूज्य बाबांच्या कृपेने प्रथमत: ॐ हा मंत्र सिध्द करून दिला. कारण विश्वोत्पत्तीचे सूत्र ह्या ॐकारामध्ये आहे. सृष्टी जेव्हां निर्माण झालेली नव्हती तेव्हां ॐ कार म्हणजे 'ध्वनि व प्रकाश' हे अस्तित्वात होते व आजही आहेत.

आजही प्राप्त झालेला जन्म दुर्लभ आहे. त्यामध्ये अडिअडचणी निमित्ताने आपण गुरुमार्गी झालो . परंतु त्यामुळे इहजन्मात गुरुंची भेट होऊन त्यांच्या उपदेशाप्रमाणे जी साधनसेवा करण्याचा लाभ आज होत आहे ती सेवा अडिअडचणींना विचारात घेऊन करणे हे योग्य नाही. अनेक भक्त दीक्षेचा स्वीकार करतात. अडिअडचणींचे निवारण होऊन सुखाचा लाभ व्हावा म्हणून साधना करतात. यामध्ये साधनेतील विषय हा ईश्वरप्राप्तीचा असला तरी साधना करीत असलेली व्यक्ती ही ऐहिक सुखप्राप्तीचा विषय विचारात घेत असल्याने ईश्वरप्राप्तीही होत नाही व अपेक्षित सुख हेही वाट्याला येत नाही. जर साधना हाच विषय विचारात घेतला तर न मागता सुख आपल्या वाट्याला येईल.



आपण जन्माला आल्यानंतर आपला संबंध स्वत:पुरताच नसून ह्या जगासाठी आहे. केवळ आपल्या जीवनातील बऱ्यावाईटाचा आपण जो विचार करतो हा इतका संकुचित विचार न करता, "मी जर स्वत:चे नुकसान केले, तर जो माझ्या जीवनात जगाशी संबंध आहे त्यांचे भवितव्यात मी नुकसान करीत आहे", ही जबाबदारी यापुढे आपण विचारात घ्यावयाची आहे. पूर्वी आपण मार्गदर्शनार्थ येऊन आपले प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करीत होतात व तत्प्रीत्यर्थ इष्ट ती सेवा सूचित करण्यात आल्यामुळे आपण साधनसेवेचा अंगिकार केलात. पण यापुढे आपल्याला अपेक्षीत सुख प्राप्त झाले किंवा नाही तरीसुध्दा "मी करीत असलेली सेवा हिचा लाभ होत नाही पण जर इतरांना तिचा लाभ होत असेल तर ह्या कर्तव्याची जाणीव मला ठेवली पाहिजे". असा विचार यापुढे करणे आवश्यक आहे. आपण भक्तांना जी ॐकार साधना सूचित केली आहे तिच्यामध्ये केवळ ईश्वरप्राप्ती एवढाच विषय नाही. हे विश्व आपण निर्माण केले नसून ते ईश्वराने निर्माण केले आहे. त्याचा अंश म्हणून आपण जन्माला आलो आहोत. त्याचप्रमाणे अनेक जीव जन्माला आले आहेत. तेव्हां केवळ एखाद्या साधनेमुळे आपल्याला ईश्वर प्राप्ती व्हावी यापेक्षा 'तसा ईश्वर इतरांना का

प्राप्त होत नाही'? असे म्हणून साधना केली तर ती अधिक फलदायी होईल.

गतकाळाचा विचार केला तर आम्ही मानवांनी जीवनाचा उपयोग कशासाठी केला असा प्रश्न आहे. त्या काळात मुबलक खाणेपिणे, ऐश्वर्य व सुखात जीवन व्यतीत केले व वेळ जाण्यासाठी म्हणून धर्माचरण व देवादिकांच्या मार्गाचा स्वीकार केला. त्याचप्रामाणे विज्ञानमार्ग व ज्ञानमार्ग यांचाही अंगिकार केला. पण विज्ञानमार्गाचा अधिक अवलंब करून आज शेकडो वर्षात जी आम्हां मानवांची प्रगती झाली आहे त्यामुळे जीवन हे जरी गतिमान झाले असले तरी आम्ही प्रगतीपथावर नसून एक ना एक दिवस ह्या विज्ञानाच्या गतीने आमच्या जीवनाचा नाहीतर जगाचा संहार होणार आहे. वास्तविक ज्ञानमार्गाने जगाचा सांभाळ करावयाचा असून जगात शांतता, सुख, समाधान सर्वांना लाभावे अशी धारणा मूळ विषयांत होती. परंतु आज प्रगतीची स्पर्धा एकमेकांमध्ये चालू असून विज्ञामानध्ये सर्व जगाचा समावेश झाला आहे. ही स्पर्धा दिवसरात्र चालू असून कोणासही मानवी जीवनाबद्दल आस्था नाही. जन्माला येण्यापूर्वीच त्याचे मरण कशात आहे याचा शोध घेतला जात आहे. जन्माला येणे हे किती महत्वाचे आहे हा विषय कुणीही अभ्यासात घेत नाही. मानवी जीवनाची प्रगती याचा अर्थ जीवनांत आचार, विचार व उच्चार यांचे कार्य समप्रमाणात झाले पाहिजे व तसे ते झाले तरच आपण सुखाचे वाटेकरी होऊ. पण आज सर्वत्र नुसता विचार, अति विचार, हीच क्रिया होत गेली असल्याने मानवी मनाचे अस्तित्व शिल्लकच राहिलेले नाही. त्यामुळे मनाचा अविष्कार अशा ज्या क्रिया म्हणजे दया, क्षमा, शांती यांचे



अस्तित्व कोणाही मानवाच्या ठायी अनुभवास येत नाही.

मानवी जीवनात काया, वाचा, मन ह्या अवस्थांचे कार्य सारख्या प्रमाणात होत असेल तर मानवी जीवन सुख-शांती-समाधानाचा लाभ घेते होईल. परंतु विज्ञानाच्या शास्त्राधारे फक्त मन ह्या अवस्थेचा विकास व त्याची गति इतकी झाली आहे की, त्यामुळे लहान मुलापासून वृध्दापर्यंत आज कुणातही स्थिरता नसून मनाची एकग्रता किंवा शांतता ही अनुभवास येत नाही. ही शांतता जगतात नांदावी असा दोन्ही – ज्ञानी व अज्ञानी वर्गाचा प्रयत्न चालू असून आपापल्यापरीने प्रत्येकजण प्रयत्न करीत आहे. त्या प्रयत्नांचा विषय जरी एक असला की जगतात शांतता नांदावी तरी ज्यामुळे शांतता निर्माण होईल त्या विषयांची अंगे भिन्नाभिन्न तत्वज्ञान, आचारविचार व रूढीपरंपरा यानी अंगिकारली गेली असून त्यानी आम्हा मानवांना या विसाव्या शतकात ग्रासले असल्यामुळे नुसती शांतता निर्माण व्हावी असे शब्दांनी जरी व्यक्त केले तरी ती होण्यासारखी नाही. जोपर्यंत आपण एकमेकांना अन्य पातळीवर पाहून, भिन्नाभिन्न आचार, विचार व रूढीपरंपरेने वागतो आहोत, जगतो आहोत, तोपर्यंत शांतता पहावयास मिळणार नाही. यासाठी प्रथमतः परमपूज्य साईनाथ महाराजांनी सांगितल्याप्रमाणे आपण कुठल्याही धर्माचे, कुठल्याही देवाचे, कुठल्याही आचार-विचारांचे उपासक असलो तरी त्याबद्दलचा कर्मठपणा याचा समाजामध्ये प्रचार न करता जर प्रथमतः आपण या विश्वात एकमेकांना 'विश्वबंधुत्व' या नावाने ओळखले नाही व त्याप्रमाणे विश्वबंधु या नात्याने ओळखले नाही व त्याप्रमाणे विश्वबंधुत्वाचे प्रेम निर्माण केले नाही तर रहात असलेल्या या विश्वात सुखशांती लाभावी

याऐवजी ह्या विश्वाचा शेवट अज्ञानाच्या प्रलयामध्ये होणार ही गोष्ट सत्य आहे.

जगाच्या उत्पत्तीपासून मानवी जीवनाच्या कल्याणार्थ अनेक अवतार ईश्वर घेता झाला आहे. त्यापैकी एकाला मानले तर त्यामुळे इतरांचा अनादर होतो अशातला भाग नाही. ह्या विसाव्या शतकात आपण असा विचार केला पाहिजे की, जो अनादि अनंत असा ईश्वर तो एकच असून जनकल्याणार्थ तो पुन्हा पुन्हा अवतार घेतो आहे, म्हणजेच अवतार कार्याचे सूत्र उत्पत्ती, स्थिती, व लय किंवा Power of Trinity याचे आधीन असून या व्यतिरीक्त कुणाही चौथी शक्ति अवतार म्हणून जन्माला आलेली नाही. अनादि अनंत कालात होऊन गेलेले अवतारी पुरूष यांच्याबद्दल जरी आदर असला तरी विसाव्या शतकातील ज्या ईश्वरी अवताराने जगाच्या सद्यपरिस्थितीचा विचार केला अशा दिव्य अवताराचा विचार आम्ही ईश्वरभक्त होणाऱ्या भक्तभाविकांनी केला पाहिजे.

प्रेमळ भक्तभाविकांनो, वरील सर्व निवेदनात मी आपल्या अज्ञानासंबंधी किंवा आपण आपले आयुष्य जे अज्ञानाने व्यतीत करीत आहात त्याबद्दल आस्थेने जे चार शब्द आपल्यासमोर सद्‌गुरुकृपाशिर्वादाने मांडले आहेत, त्यामागे माझ्यावर जन्मोजन्मी ज्यांची कृपा अखंड झाली आहे त्यांच्या कृपेमुळे मी तुम्हां सर्वांपेक्षा अधिक सज्ञानी व ज्ञानी झालो आहे असे सांगण्याचा माझा हेतू नाही. मी आजपर्यंत परमेश्वराजवळ अनन्य भक्तिभावनेने हेच मागत आलो आहे की, "परमेश्वरा, तू माझ्यावर अखंड कृपादृष्टी ठेवून हे जगत्कल्याणाचे कार्य



करण्याची योग्य संधि मला दिली आहेस ते कार्य निःस्वार्थ, निरपेक्ष बुध्दीने माझ्याकडून करवून घे. पण केलेल्या सेवेचा यत्किंचितही अहंकार माझ्या ठिकाणी निर्माण होऊ न देता लहानात लहान असे अज्ञानी बालरूप देऊन मी केलेल्या सेवेचा आनंद मला माझ्या प्राप्त जीवनांत अनुभवू दे". आज गेली पंचवीस वर्षे प्राप्त झालेले माझे जीवन तुम्हा भक्तांच्या कल्याणार्थ जे व्यतीत केले गेले त्याची इतिसार्थकता ही परमेश्वरी कृपेने तर वेळोवेळी झालेलीच आहे, त्याशिवाय ज्या परमेश्वराने मला कृपाशिर्वाद देऊन सार्थ केले त्या कृपाशिर्वादाची साध्यसिध्दता करण्याचा लाभ तुमच्या जीवनातील अडिअडचणी निवारणार्थ तुम्ही माझ्या जीवनाशी सहभागी होऊन मला दिलात, त्यामुळेच मी आज ह्या जगात नांवारूपाला आलो असलो तरी तुम्ही आपल्या जीवनातील बहुमोल असा जो सुखदु:खाचा वाटा मला, माझ्या कल्याणार्थ दिलात, याबद्दल उदार अंत:करणाने आपले आभार मानतो.

वर लिहिले गेलेले हे निवेदन तुम्हा भक्तांच्या कल्याणार्थ व पुढील जन्मांची तरतूद करण्यासाठी गुरुकृपाशिर्वादाचे प्रतिक म्हणून तुम्हाला सादर करीत आहे. ह्या गुरुकृपाशिर्वादाच्या प्रतिकांत निराकरण, निवारण व आचरण यांचा उल्लेख हा केवळ शाब्दिक स्वरूपाचा नसून जो निराकरण, निवारण व आचरण यापध्दतीचा उपचार सूचित केला आहे, हे सर्वसिध्द साधन मी माझ्या सिध्दसाधनमार्गातील पुण्यविभूती याना औपचार म्हणून अपर्ण केले आहे. त्यामुळे स्वाभाविक ही सर्व निराकरणे सर्वसिध्द असून सुलभ, सोप्या अशा आचारविचाराने ह्या जन्मी व जन्मोजन्मी त्यांचा लाभ सहजासहजी करून घेता येईल अशी

भक्तिभावनात्मक इच्छा सर्व विभूतींचे चरणी आपादमस्तक ठेवून व्यक्त करतो.

जो हा 'गुरुप्रसाद' आज आपल्या गुरुकृपाशिर्वाद म्हणून भेट देण्यात आलेला आहे, तो आपण आस्थापूर्वक वाचून आपल्या कुटुंबातील बालगोपाळांपासून वयोवृध्द व्यक्तींना निवेदन करावा. यामागील सद्हेतू असा आहे की, ज्यांचे बालवय आहे त्यांच्या प्राप्त जन्माचा विकास हा योग्य मार्गाने तर होईलच, पण ज्यांची वार्ध्यक्य अवस्था आहे, त्यांनाही काहीं पारमार्थिक ज्ञान झाल्याचे समाधान ह्या जन्मात लाभेल. बालापासून वार्धक्य अवस्था प्राप्त झालेल्या आम्हा मानवांना तारक असा हा गुरुप्रसाद की, जो आज गुरुआज्ञेने लिहिण्याचे भाग्य मला प्राप्त झाले तो हा गुरुप्रसाद मी त्या थोर व श्रेष्ठ अशा सर्व सिध्दसत्पुरूषांच्या चरणी सर्व भक्तभाविकांच्या भक्तियुक्त श्रध्दाभावनेचे प्रतिक व आदर म्हणून अर्पण करतो

आपण भक्तंच्या सान्निध्यात गेली पंचविस वर्षे या सेवेत व्यतीत केल्यावर आपण भक्तांना भक्तिभावनेने शेवटचे एकच मागणे मागावयाचे आहे की, हे जे कार्य गुरुआज्ञेने मी आपण भक्तांच्या कल्याणार्थ उभे केले ते कार्य हा केवळ माझ्या इच्छेचा विषय नव्हता व त्यापासून मला या जन्मांत आनंद किंवा मोठेपणा मिळविण्यासाठी माझा हेतू नव्हता. जन्मोजन्मी माझ्या माध्यमाला उपासनादीक्षेपासून ते सिध्दावस्थेपर्यंत ज्यानी वेळोवेळी हाकेला ओ देऊन सर्वसिध्द केले अशा त्या माझ्या गुरुंच्या कृपाशिर्वादाचे हे मंदिर आहे. ह्या मंदिराची योग्य ती पूज्यता राखणे व त्याचा योग्य तो लाभ जगातील इतर लोकांना



करून देणे हे जसे तुमचे कर्तव्य आहे तसे ह्या कार्यार्थ माझ्यापासून ते नियुक्त सेवकांपर्यंत ज्यांचा ह्या कार्यात सहभागी होण्याचा वाटा परमेश्वराने नियुक्त केला आहे, अशांची या कार्याबद्दलची योग्य अशी भूमिका व त्या भूमिकेपरत्वे योग्य असे आचरण व विचार जर चुकूनही अयोग्य मार्गाला जात असतील तर त्याची जाणीव करून देण्याचे इष्ट कर्तव्य तुम्ही कदापिही करावयास विसरू नये. एवढेच आपणा सर्वास मागावयाचे आहे. आपण भक्तांच्या कल्याणार्थ हे कार्य ज्या थोर अलौकिक पुण्य विभूतींच्या कृपाशिर्वादाने चालले आहे व ज्यांच्या कृपाशिर्वादाचा लाभ आपण भक्तांनी घेऊन प्राप्त जीवनात सुख-शांती-समाधान अशा ऐहिक सुखाचा लाभ घेतला आहे, त्याचबरोबर आपण भक्तांना पारमार्थिक सुखाचाही लाभ न मागता प्राप्त झाला, त्या थोर पुण्य विभूतींचे आम्हा भक्तांवर अनंत उपकार आहेत. आज त्यांच्या चरणी अशी प्रार्थना करू की, "आज आम्ही गुरुभक्त, पुण्यविभूती यांचे चरणी विनम्र भावनेने अशी प्रार्थना करीत आहोत कीं, आम्हा मानवांना प्राप्त जन्माचे ज्ञान व्हावे व प्राप्त जन्मात सुख, शांती, समाधान व परोपकाराचे इष्टकर्तव्य आमच्या हातून घडत रहावे अशी शिकवण अनादिकालापासून आजपर्यंत वेळोवेळी अवतार घेऊन आम्हा मानवाना आपण दिलीत. परंतु इहजन्मात जे कर्तव्य आम्हा मानवाना करणे भाग आहे त्याचा विसर पडल्यामुळे आजची जगाची परिस्थिती फार बिकट झाली आहे. त्यामध्ये आवश्यक तो बदल घडविणे, हे आपल्या कृपाशिर्वादाशिवाय होणे शक्य नाही. तरीसुध्दा आपण विभूतींनी कृपावंत होऊन सोप्यातसोपा असा मार्ग आम्हा मानवांचा सूचित केला आहे.

अशा मार्गाचे पालन व कर्तव्य आमच्या हातून नि:संकोच घडत रहावे व ह्या सुखशांतीचा लाभ आमच्या जीवनात होऊन ईश्वरप्रणीत मानवी जीवन आदिंचा लाभ घडत रहावा अशी आपल्या चरणी प्रार्थना.

आज दिवसापर्यंत मानवी कल्याणासाठी जी साधने परमपूज्य साईनाथ माहारांजानी शिकविली आहेत. त्याबद्दल आम्ही जन्मोजन्मी त्यांचे ऋणी राहू. पुनश्च तसा अपाराध व प्रमाद आमच्या हातून घडू नये अशी सद्‌बुध्दि परमपूज्य सद्‌गुरु साईनाथ महाराज, श्रीनवनाथ आदि विभूती व देवदेवता यानी आम्हाला व आमच्या भावी पिढ्यांना द्यावी अशी अनन्य भावनेने प्रार्थना करीत आहोत".



# उपसंहार

श्रीसद्‌गुरु साईनाथ माऊलीचे चरणी अनन्य भक्तिभावनेने प्रणिपात ! आपल्या अनंत कृपाशिर्वादाचे ओझे पेलण्याची शक्ति माझ्यात नाही. प्रत्येक जन्माला आलेल्या मानवाला ईश्वररूप होणे आवश्यक आहे व त्यासाठी प्रत्येकाचा प्रयत्न चालू आहे. पण हा प्रयत्न म्हणजे साधना. की देवाच्या दर्शनाची भूक किंवा तळमळ म्हणजे साधना, हा प्रश्न अजून सुटला नाही. तरीसुध्दा आज जीवनातील प्राप्त सुख तुझ्याच कृपेचे फल आहे याचा विसर न व्हावा अशी तुझ्या चरणी प्रार्थना!

जग अनंत आहे व ईश्वरही अनंत अवताररूपाने सर्वत्र वास करीत आहे. पण त्याला पाहणे सहजासहजी साध्य होत नाही, कारण प्रत्येकजण स्वत:ला फसवित आहे. तरीसुध्दा आपले पुण्य थोर म्हणून संतांच्या सत्संगतीचा लाभ होत आहे. आत्मोध्दार, आत्मोन्नती याबद्दलचा उहापोह, चर्चा वर्षानुवर्षे ऐकिंवात आहे म्हणजे तरी काय? सूर्याला पाहणे हे जसे कठीण आहे तसे आत्मा पाहणे कठीण आहे, कारण तो मूर्तीमंत साक्षात्कारी ईश्वरी अंश आहे. चंद्राला प्रकाश नाही, पण सूर्यामुळे तो जसा प्रकाशमान होतो, तद्वत आत्म्याच्या प्रकाशाने देहाला चैतन्य आहे. सूर्याच्या प्रकाशाचा सदुपयोग आपण करीत राहतो. सदैव सूर्य पाहत नाही. तद्वत जे देहमय चैतन्य आहे. त्याला चंदनाप्रमाणे सद्‌गुणांचा सुवास आला पाहिजे. केवळ देहाची राख होता कामा नये हे चिंतन हीच आत्मोन्नती !

जीवनारंभी बोध व शोध घ्यावा. कोणत्याही माध्यमातून

देवाला शरण जाता येते. तेथे भक्ती श्रेष्ठ की ज्ञान श्रेष्ठ हे विचारात न घेता आपली ईश्वराबद्दलची श्रध्दा श्रेष्ठ हेच उत्तर मिळेल. कारण भक्ती किंवा ज्ञान हे जरी श्रेष्ठ आहे तरी स्वत:ला त्याबद्दल प्रेम निर्माण व्हावयास पाहिजे. हाच खरा 'साक्षात्कार' आहे. देवाच्या अस्तित्वाचा भास होणे ही अवस्थाच मुळात भास आहे. ह्या जगात ईश्वराचे अस्तित्व नाही कशात? स्वत:च्या ठिकाणी असूनही त्याचा जर आपल्याला अभाव जाणवतो आहे तर मूळात ज्याची कार्ययोजना निराकार आहे तो आपल्या इच्छेने साकार होईल काय? साकार करून घेणे हे साधनेचे साध्य नाही. जे निराकार आहे, पण ज्याची लीला अगाघ आहे त्यावर श्रध्दा राहणे हे साध्य केले पाहिजे व त्यासाठी साधना आहे. देवाचे अस्तित्व न जाणवणे यातच स्वत:ची प्रगती आहे. कारण आपण इष्ट अपेक्षापूर्तीसाठी प्रयत्न करतो, पण इष्ट फल साध्य झाले की प्रयत्न थांबतात. प्राप्त जीवनात जर कदाचित् अशी प्राप्ती झाली तर पुढील जन्माच्या पूर्ततेचे प्रयत्न थांबतात. ही मायाबंधनातील 'माया' आहे. हिचा अंत लागणे शक्य नाही. जसे क्षितीज आपण पाहतो . त्याच्या जवळ पोहोचलो की पुन्हा आणखी पुढे दिसू लागते. कालांतराने आपण मूळ ठिकाणीच येतो. यासाठी जे क्षितीज दृष्टीला दिसते आहे त्याच्या परिसराचा विचार करून सभोवार आहे त्याचा लाभ घेण्यासाठी दृष्टी स्थिर केली पाहिजे. पाण्यावरील लाटांमुळे नाव हलली तरी आपण हलत नाही. तद्वत जीवनात ज्या सुखदु:खाच्या लाटा देहाला हलवित आहेत त्यावेळी ईश्वराबद्दलचे विचार हलता कामा नयेत. ईश्वर हा प्राप्त जन्म तरून जाण्याचे सुकाणू आहे. तेच जर हातचे गेले तर ही जीवननौका पैलतिरी कशी लागेल? दूध आहे



म्हणजे आपल्याजवळ लोणी आहे ही श्रध्दा चुकीची आहे. दूधाला विरजण लावल्याशिवाय लोणी मिळणार नाही. तद्वत प्राप्त जीवनात भक्तीचे विरजण ऐहिक जीवनाला घातल्याशिवाय पारमार्थिक जीवनाचा लाभ होणार नाही.

अशी भक्तीची भूक लागली की, साधनेची गोडी कळते. पुढ्यातील पदार्थ पाहून खाण्याची इच्छा होणे ही हांव झाली पण पदार्थ समोर नसताना जी भूक लागते तीच पचनी पडते. हा देहधर्म सर्वाना परिचीत आहे. देव पाहिला की जी भक्तीची भूक लागते ती हाव आहे. देवाबद्दलचा भाव नाही मग तुमच्या साध्य-असाध्य साधनानी तुम्ही भक्ती पचविणार व ही जर पचविता आली नाही तर जन्मबंधनाच्या पलीकडे जाण्याचे सामर्थ्य कसे प्राप्त होईल? यासाठी जसा आपण मित आहार घेतो, तद्वत सातत्याने थोडी का होईना, भक्ती करून ती पचविण्याचे साधन प्राप्त करावे. ह्यालाच कृपाशिर्वाद म्हणता येईल. ज्या गरजा आहेत, त्यांची प्राप्ती ही जरी ईश्वराची सहजलीला आहे, तरी ती कृपा नव्हे. कृपापात्र झाल्यावर मागण्याचे शिल्लकच रहात नाही. जोपर्यंत आपणास ईश्वराकडे काहीं मागावे असे वाटते, याचा अर्थ अगदी स्पष्ट आहे की, देवाची आपल्यावर कृपा आहे, पण आपण कृपेस पात्र झालो नाही. ही उणीव सदैव जाणावी व ती भरून निघण्यासाठी नित्य साधना करावी.

प्रत्येक मानवाचा जन्म हा चौऱ्यांशी लक्ष योनीचा बहुमोल ठेवा आहे. असे शास्त्रज्ञानी सूचित केले असून, प्राप्त जन्माचे पूर्णत्व म्हणजे तरी काय? की केवळ शास्त्राधारावर अढळ श्रध्दा म्हणजे पूर्णत्व? शास्त्रावर श्रध्दा म्हणजे शास्त्राचे पूर्णत्व,

पण ज्या मानवी जीवनाला उद्देशून हे शास्त्र उदयाला आले आहे, तो मानवी जन्म अजून अपूर्ण अवस्थेत कार्य करीत आहे. जीवनाचे साध्य प्राप्त करणे हे जरी कठीण आहे, तरी ततप्रित्यर्थ करावे लागणारे साधन कठीण असता कामा नये. बरोबर याउलट आजपर्यंत मार्गदर्शन होऊन, साध्य हे दुर्लभ झाले व साधनही कठीण झाले. मानवी जन्मातील साधन ही एक जीवन जगण्याची क्रिया आहे. पण तीच जर क्रियाशील नसेल तर इष्ट ध्येयप्राप्ती हा एक जीवनातील अडथळा म्हणून आपल्या वाट्याला येईल. यासाठी जे साधन आपण करू इच्छितो त्याचे साहित्य काय? म्हणजे साधन ज्या साध्यतेसाठी आपण करू त्या साध्य ध्येयात कशाचा समावेश झाला आहे, याचा बोध प्रथमत: झाला पाहिजे. नाहीतर साधनेचे लक्ष म्हणजे 'क्रियेने काहीं जाणणे', हे अनुभवास न येता, जीवन जगणे याशिवाय अनुभव शून्य असतो. त्यामुळे साधन करूनही निराशा पदरी पडते. साधन हे अनुलक्षून जेव्हां क्रियाशील होते, तेव्हां त्या साधनेचा धर्मच आशावादी करण्याचा आहे. पण ती साधना क्रियाशील नसेल तर निराशा हा जीवनधर्म आहे, अशा जीवनधर्माचा अनुभव मानवाला पूर्णत्वप्राप्तीत अडथळा निर्माण करतो. पण याचा दोष देवावर किंवा पूर्वकर्मावर ठेवून आपण नि:संग होतो. म्हणजे जीवनाच्या मूळ कार्याशी आपण एकरूप न होता, जीवन परिसरात ज्याचे अस्तित्व सभोवार जाणवते, त्याच्याशी एकरूप होतो.

देव किंवा देवत्व ही काहीं मानवी कल्पना नाही. ती सत्य वस्तुस्थिती आहे, याची जाणीव वस्तुनिष्ठ भक्तालाच होऊ शकते. अनेकवेळा भक्त करीत असता, 'स्वत:ची झालेली प्रगती



ठरविण्याचे माध्यम भक्तिमार्गात नाही', असे बोलण्यात येते. पण साधारणपणे पन्नास टक्के प्रगती ही प्रत्येकाची झालेली असते. याचे उत्तर असे की, परमेश्वरीतत्व निराकारी आहे. आपल्याला त्याचा सुलभपणे लाभ व्हावा म्हणून ह्या तत्वाने आकार घेतला. ह्या आकाराची भक्ती करून आपण त्याला साकार केला आहे. ह्या साकार झालेल्या परमेश्वराचे अस्तित्त्व आपल्या ठिकाणी आहे, म्हणूनच नित्याचरणात ह्या ईश्वराबद्दलचा आदर व भक्ती आपण व्यक्त करीत असतो. आता ही जी भक्ताची अवस्था आहे, ती भक्तीमार्गातील पन्नास टक्के प्रगती आहे असे आपण मानले तर चुकीचे होणार नाही. पण भक्तीची यापुढील प्रगती अधिक दृढनिष्ठेशिवाय होणार नाही कारण जे तत्व तुमच्या ठिकाणी साकार झालेले आहे, त्या साकार झालेल्या तत्वामुळे पुन्हा जेव्हां तुम्हाला भक्ती करण्याची जाणीव, हे साकार तत्व करून देत असते. तेव्हां ज्या आकाराला आपण साकार केले त्याच आकाराला उद्देशून आपण भक्ती करीत असतो. वास्तविक निराकाराचा आकार ही देवाने आपल्यासाठी धारण केलेली अवस्था, आणि आकाराला साकार केलेली भक्ताची अवस्था यातून भक्ताने पुन्हा पुन्हा ह्याच अवस्थांचा लाभ भक्ती म्हणून करून घेऊ नये, पुढील प्रगतीसाठी साकार झालेल्या निराकार तत्वाला आकारातून न पाहता निराकारात पाहण्याचे साधन प्राप्त केले पाहिजे. ह्या अवस्थेत परमेश्वराचे अस्तित्व हे मर्यादीत न जाणवता अमर्याद जाणवते. उदाहरणार्थ, जोपर्यंत एखादी नाव नदीच्या जलप्रवाहात जलविहार करीत असते तेव्हां नदीचा आकार दोन किनाऱ्याने भासतो. पण तीच नदी जेव्हां सागराशी एकरूप होते, तेव्हां आपल्याला आपल्या सभोवार पाणी व

आकाश अथांग दिसते.

पहिल्या अवस्थेत जरी आपण भक्ती ही ईश्वराला उद्देशून करीत असतो, तरी साकार झालेल्या ईश्वरी तत्वात आपण स्वत:ला सामावून घेऊ शकत नाही. पण ईश्वर मात्र भक्ताच्या ठिकाणी सामावलेला असतो. त्यामुळे साधकाला ईश्वराची पूर्णत: जाणीव न होता, स्वत:च्याच जीवनाची म्हणजे जन्मकर्मऋणानुबंधाची जाणीव होत असते. ह्या जाणीवेमुळे कर्मपरत्वे करावे लागणारे कर्तव्य व त्याच्या आड येणारे अडथळे याचाच विचार वारंवार होऊन, साकार झालेल्या ईश्वरी तत्वाबद्दल आवश्यक ती निष्ठा वाढीस लागत नाही. यामुळे पहिल्या अवस्थेत झालेली प्रगती ही पुढे स्थिरपणे ह्या देहातून सुलभपणे कार्य करू शकत नाही. असा हा अनुभव क्षणोक्षणी आला की, देहधर्माची कार्ये जी आहेत की ज्यांचा विचार वास्तविक कर्तव्य म्हणून विचाराच घ्यावयास पाहिजे, तो न होता देहधर्म म्हणजे उपभोग याकडेच आपले विचार अधिक साकार करून घेण्यासाठी, साकार झालेल्या ईश्वरी तत्वाचा आपण उपयोग करतो, अशा विचारांच्या कार्याला साकार करण्यासाठी जे ईश्वरी तत्व उपयोगी पडले त्यालाच 'कृपाशिर्वाद' समजून पुढील देहिक प्रगतिसाठी आपले आवश्यक प्रयत्न हे क्रियाशील रहात नाहीत.

वास्तविक कृपाशिर्वाद व त्यांचा लाभ जर आपणास झाला, तर कृपाशिर्वादात अपूर्णत्व असे काहींच रहात नाही. कृपाशिर्वाद म्हणजे परमेश्वराचे पूर्णत्व अस्तित्व! मग भक्ती करीत असता कृपाशिर्वादाची वारंवार याचना का करावी लागते? तर



कृपाशिर्वाद ही जरी त्या परमेश्वराची पूर्णावस्था आहे, याची जाणीव सदैव व्हावयास पाहिजे. कृपाशिर्वादाचे पूर्णत्व म्हणजे भक्तीच्या प्रगतीची दुसरी अवस्था. दुसऱ्या अवस्थेत करावयाची भक्ती किंवा कर्म म्हणजे आकारातून साकार झालेले निराकार असे जे ईश्वरी तत्व आहे, त्या तत्वाशी एकरूप होणे. आता अशा त्या निराकार तत्वाशी आपण एकरूप झालो की, ह्या अवस्थेत स्वत:ची जाणीव, म्हणजे जन्मजन्मांतरातील जन्मकर्म यापासून स्वत:ची जी जाणीव होत असते, ती न होता, निराकार म्हणजे परमेश्वर याचीच जाणीव फक्त होते. ही जाणीव म्हणजेच कृपाशिर्वाद. नदी व तिचे पाणी हे सदैवच वाट्याला येत नाही. पण सागर कधीच आटत नाही, तर त्याचा लाभ घेऊनसुध्दा तो शिल्लक रहातो. ही अवस्था निराकार अवस्थेत अनुभविण्यास मिळते.

अशा ह्या अवस्थेत जन्मजन्मांतराचे अस्तित्व लयास जाते. यालाच 'मुक्ति' असे म्हणता येईल. या अवस्थेचे गुणवर्णन गाता गाता वेदसुध्दा थकले. तेव्हां आपण अधिकाधिक याचा सखोल विचार न करता, प्राप्त जन्मातील ईश्वराबद्दलचे जे इष्ट कर्तव्य आहे, त्याचाच विचार करणे सूज्ञपणाचे ठरेल.

दुसरी अवस्था ही ईश्वराधीन आहे व तिचा लाभ मनुष्याला सुलभपणे होतो. यासाठी सदैव ईश्वरचिंतन आवश्यक आहे. पण पहिली अवस्था मानवाधीन असल्याने त्याबद्दलचा विचार अधिक सूज्ञपणाने केला पाहिजे. पहिल्या अवस्थेतील जी देहिक बंधने आहेत, त्याला कारण प्राप्त जन्म हा चौऱ्यांशी लक्ष योनीतून होतो, असे वाचनात व ऐकण्यात येते 'चौऱ्याऐंशी लक्ष'

हा शब्द खरोखर, संख्यावाचक आहे काय? मानवी जन्मापर्यंत ह्या पंचभौतिक देहाला मानवी देह प्राप्त होण्यासाठी चौऱ्याऐंशी स्थित्यंतरातून जावे लागते. प्रत्येक स्थित्यंतरातील पूर्णत्व म्हणजे एक योनी. याप्रमाणे ऐंशी वेळा ह्या पंचतत्वांचे स्थित्यंतर होते व मानवी जन्म प्राप्त होतो. आता हा प्राप्त झालेला मानवी देह पंचकोशानी म्हणजे अन्नमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय आनंदमय या कोशानी परिपूर्ण आहे. प्रथमतः ऐंशी योनीतून स्थित्यंतर होत असता, या प्रत्येक योनीत अन्नमय कोश हा प्रधान होता. पण आता मानवी जन्म प्राप्त झाल्यावर प्रत्येक योनीत जन्मलेला पंचभौतिक देह हा विकसित होत असता, त्यानी ह्या पाचही कोशांचे पूर्णत्व स्वतःच्या ठिकाणी प्राप्त करून घेतले. त्यामुळे ज्या योनीचे स्थित्यंतर झाले, त्या ऐंशी पेशी आज मानवी जन्मात ह्या पाचकोशांशी संबंधित आहेत. अशा ह्या प्रत्येक कोशाशी निगडीत असणाऱ्या सोळा पेशी म्हणजे पंचमहाभूतत्वे, पंचकर्मेंद्रिये, पंचज्ञानेंद्रिये व बुध्दि. ह्या सर्वांचे जे कार्य आहे, त्यालाच 'मानवी' जीवन असे म्हणतात. अशा ह्या मानवी जीवनात विचार आणि विकार यांचे जे कार्य सदैव चालू आहे, याला कारण म्हणजे या ऐंशी अवस्थेतील स्थित्यंतरपरत्वे राहिलेली कोशांची अपूर्णता. विकार हा जो शरीरधर्म आहे तो ऐंशी अवस्थेतही कार्य करीत होता. त्यामुळे आजही जीवनात विचार करण्यापूर्वी विकाराचे प्राबल्य अधिक दिसते. विचार व्यक्त करणे किंवा साकार करणे ही अवस्था मानवी जन्मात प्राप्त झालेली असल्याने विचारांना दृढ ठेवणे कठीण जाते. प्राप्त जन्म व्यतीत करीत असता अन्नमय कोश, प्राणमय कोश व मनोमय कोश याचा धर्म विकार आणि मनोमय कोश, विज्ञानमय



कोश व आनंदमय कोश यांचा धर्म 'सुविचार' निर्माण करणे, असे असताना फक्त 'विचार करणे' इतकेच कार्य मनोमय कोश करीत आहे. त्यामुळे साधक अवस्थेतील ज्या दोन अवस्था आपण जर विचारात घेतल्या, त्यापैकी पहिली अवस्था मानवाधीन आहे असे म्हटले, याचा अर्थ ऐंशी योनीतील स्थित्यंतरपरत्वे राहिलेली अंशमात्र तत्वे ही मानवीरूप झालेली नाहीत. त्यामुळे साकार झालेले ईश्वरीतत्वही मानवीरूप झालेली नाहीत. त्यामुळे साकार झालेले ईश्वरी तत्व निराकार तत्वाशी एकरूप होण्यात अडथळा निर्माण होतो. वर नमूद केलेली पन्नास टक्के प्रगती होऊनसुध्दा, राहिलेल्या पन्नास टक्के प्रगतीला जो विलंब लागतो, त्याला कारण ह्या योनी अवस्थेतील राहिलेली अंशमात्र तत्वे ही अन्नमय, प्राणमय व मनोमय कोशांशी एकरूप झालेली आहेत. यासाठी पन्नास टक्के प्रगति होऊनही ज्या ईश्वरी तत्वाला आपण साकार केले आहे त्याचा लाभ घेऊन, ह्या ऐंशी योनीतील अंशमात्र तत्वे आहेत त्यानाही ईश्वररूप केले पाहिजे. कारण प्रत्येक मानवाला जन्मप्राप्तीनंतर जी मुक्तावस्था सांगितली आहे, ती केवळ ह्या प्राप्त झालेल्या पंचभौतिक देहाला नसून, ज्या चौऱ्याऐंशी योनी अवस्थेतून आपण जन्माला आलो, त्या अंशमात्र तत्वालाही मुक्तावस्था प्राप्त करून दिली, तरच दुसऱ्या अवस्थेत आपण सुलभपणे प्रवेश करू शकतो.

देहमाध्यमाच्या ठिकाणी आचारविचारांची देवाणघेवाण होत असल्यामुळे आचारविचारांना स्थिरता प्राप्त होत नाही. अशामुळे प्राप्त झालेल्या जीवनातील सुखाबद्दलही असमाधान व अशांतता वाटते. म्हणजे आपण खरोखर दुःखी नसून, क्षणाक्षणाला आपण दुःखाचा आभास म्हणजे जीवनासभोवार एक

पोकळी निर्माण करीत आहोत. हीच पोकळी आपल्या जीवनातील अशांतता आहे. आता ज्या देहातील आचारविचारांना स्थिरतेने आपले कार्य करण्यास वाव देण्याचे साधन विचारात घ्यावयाचे, त्याच विचारानी निश्चित केलेल्या मार्गाला 'गुरुमार्ग' असे म्हटले आहे. पण गुरुमार्गाबद्दलची आपली श्रध्दा अशी आहे की, आपल्यासमोर असणारी व्यक्ती, तिचे विचार व विवेचन म्हणजे आपले गुरु. ह्याच ठिकाणी आपण गुरुमार्गातील आपली भूमिका चुकीने अंगिकारतो आहोत. ह्याचा विचार केला पाहिजे.

अशा ह्या गुरुमार्गाचा शोध आज आपण जीवनाला सुखाची दिशा प्राप्त करून देण्यासाठी करून घेत आहोत. पण गुरुमार्गाचा लाभ झाल्यानंतर आपण काय शिकणे आवश्यक आहे, हे विचारात न घेता इतरांचे अनावश्यक आचरण व त्याचे अनुकरण म्हणजे गुरुमार्ग, अशी आपण आपल्या जीवनाची दिशा ठरवितो. यामुळे ज्या सुख-शांती-समाधानाच्या शोधात आपण गेलो त्याचीही प्राप्ती होत नाही व प्राप्त सुखही अनुभवता येत नाही. वास्तविक गुरुमार्गात एकच प्रश्न स्वतःला व गुरुंना विचारावयाचा आहे की, 'प्राप्त झालेले सुख-समाधान अनुभविण्यास कोणत्या प्रकारचे आचारविचार मला पोषक होतील'? ही आचारविचारांची निश्चितता नित्य सवयींने प्राप्त करून, प्राप्त सुखात आनंद मानणे यालाच 'गुरुदीक्षा' किंवा 'अनुग्रह' असे म्हणतात. इतका सुलभ असा गुरुशिष्यांचा सुखसंवाद असताना, गुरुमार्ग अधिक बिकट असा जर कोणी केला असले, तर ज्या व्यक्तींना गुरुपदाची जबाबदारी समजली नाही त्यानी. अशा व्यक्तीनीच समाजामध्ये देवधर्माचे अवडंबर माजवले आहे. आपल्या देहिक जीवनातील नित्य कर्तव्याची



जाणीव करून देऊन, देवधर्माचा आवश्यक तो बोध करून देणे हे गुरुंचे कर्तव्य आहे. पण जर गुरुंनाच आपल्या कर्तव्याची जाणीव नसेल तर बाह्यांगी गुरुमार्गाचा देखावा हाच परमार्थप्राप्तीचा मार्ग आहे, असे भासवावे लागते. वास्तविक हा सगळा देखावा भावनाशून्य व कर्तव्यशून्य आहे. कारण भावना व ती व्यक्त करण्यासाठी करावे लागणारे कर्तव्य हे इतरांच्या अनुकरणातून शिकण्याचें प्रयोजन नाही. ह्या दोन्ही अवस्था मानवाचा सहजधर्म आहेत. असा हा सहजधर्म कार्यार्थ योग्य ठिकाणी लागावा, ह्या कर्तव्यास 'सत्कर्म' असे म्हणतात. आरती, पारायण, नामस्मरण, पूजाअर्चा आदि जे आपण करतो व ज्याला आपण पारमार्थिक कर्तव्य म्हणून संबोधतो हे कर्तव्य पारमार्थ नसून, ही एक स्वतःची इच्छा नसताना कोणाच्या तरी इच्छेसाठी स्वतःवर लादून घेतलेले बंधन आहे. आचारविचारांचा धर्म हा बंधनात राहण्याचा नाही याचा अनुभव क्षणोक्षणी आपल्याला येतो. असे असताना देवाबद्दल ज्या पूज्य भावना आहेत, त्याना वैचारिक स्वरूपात कार्य करण्यासाठी वाव देणे म्हणजे जर नित्य आचरण, तर ह्या नित्य आचरणाला वरील बंधनाने आपल्याला पारमार्थिक करता येईल काय, हा विचार प्रत्येक भक्ताने करणे आवश्यक आहे. भक्तीचे भाव साकार होण्याची क्रिया ज्या देहमाध्यमातून होते, त्यालाच 'भक्त' म्हणतात. पण जर त्याच देहमाध्यमातून विचार किंवा विकार साकर होऊ लागतील तर भक्तीचा साक्षात्कार होणे हे किती दुर्लभ आहे, हे अनुभवास येईल. यासाठी सुलभ अशा आचारविचारांचा बोध घेऊन त्याप्रमाणे आपले नित्य आचरण करणे, यालाच 'गुरुभक्ति' म्हणतात. पण आज आपण ही संवय

लावून न घेता, व्यक्तिपूजनाचे महत्व अधिक मानतो. त्यामुळे जे आचारविचार गुरुरूप होणे आवश्यक आहे त्याचे मूल्य कमी होते. त्यामुळे स्वाभाविकच आपल्या नित्य कर्तव्याकडे आपले दुर्लक्ष होऊन, आपल्या कुटुंबातील इतर व्यक्तीना त्याबद्दलचा त्रास सहन करायला लागून, ह्या मार्गाबद्दल अनादर निर्माण होतो.

प्राप्त जीवनात गुरुआशिर्वादाचा जो आपणास लाभ होतो, त्याचा आपल्या जीवनाशी काय संबंध आहे व तत्संबंधी आपले काय कर्तव्य आहे हे जाणून घेणे, हाच खरा 'परमार्थ' होय. प्राप्त जीवन हे जन्मजन्मांतर व जन्मकर्म आदि ऋणानुबंधांची ठेव आहे व हे अनेक वेळेला वाचनात आल्याने, नित्य कर्तव्य करीत असता ह्या ऋणानुबंधाचे फाजील तत्वज्ञान आपल्या डोक्यात अविचार निर्माण करून कर्तव्याची दिशा बदलण्यास भाग पाडते. पण एकदा जीवनात गुरुमाध्यमाचे ऋणनुबंध म्हणजे मार्गदर्शनाप्रमाणे आचरण हे निश्चित झाले की, अनेक जन्मजन्मांतरातील ऋणानुबंध प्रतिकूल असूनसुध्दा अनुकूल करून घेता येतात. याच सुलभ कार्यपध्दतीला 'विमोचन' असे म्हणतात. वास्तविक विमोचन म्हटले की, तीर्थयात्रा, देवधर्म, दानधर्म, व्रतवैकल्ये आदि विषय आपल्या समोर उभे राहतात. हे सर्व करणे म्हणजे सत्कर्म करण्याची सहज प्रवृत्ती निर्माण करणे व त्याप्रमाणे आचरण करणे असा अर्थ होतो. तरीसुध्दा निश्चितपणे ह्या मार्गाचा अवलंब करून आपण आवश्यक ते सुख मिळवू शकत नाही. यासाठी ज्या कृपाशिर्वादाची प्राप्ती करून घेण्यासाठी मार्गदर्शन झाले आहे, त्या मार्गाने आपले आचारविचार पोषक करणे, हे आपले कर्तव्य जर आपण



विसरलो, तर कृपाशिर्वादाचा लाभ म्हणजे काय, याचा बोध होणार नाही.

वरील विवेचनावरून सूज्ञ भक्तांना असे समजून येईल की, पारमार्थिक मार्ग व पारमार्थिक आचरण हे ऐहिक मार्गापासून भिन्न नाही. ऐहिक मार्ग किंवा ऐहिक कर्तव्य हे पूर्वजन्मीच्या अनेक कर्तव्याची पूर्तता करण्यासाठी प्राप्त झालेले जीवन आहे. अशा ह्या ऐहिक जीवनातील इष्ट कर्तव्यांची पूर्तता पूर्णत्वाला नेण्यासाठी आपल्या आचारविचारांना निश्चितता व सदृढता प्राप्त व्हावी म्हणून गुरुमार्गाचा अवलंब करणे अत्यावश्यक आहे. पण अशा कर्तव्याची ओळख आपणास यथोचितपणे न होण्याने नानाविध देवता, भिन्नाभिन्न पूजाअर्चा आदिंची समावेश जीवनामध्ये करून, आपण बहुमोल अशा जीवनाचा अपव्यय करतो. वास्तविक ऐहिक कर्तव्याची पूर्तता करण्यासाठी ज्या पारमार्थिक जीवनाचा किंवा कृपाशिर्वदाचा लाभ आपणास जोडावयाचा आहे, ते साधन अगदी सुलभ असून ते करण्यास अधिक वेळ खर्च होणार नाही. अशानेच तुम्ही खरी भावना आपल्या मनाच्या ठिकाणी निर्माण करू शकता. अन्यथा अधिक काळपर्यंत अंगिकारलेले कर्तव्य हे भक्ती म्हणून भावनाशून्य असते. यासाठी प्रत्येकाने इतरांचे अनुकरण करून, त्या अनुकरणात देवाचा शोध न घेता, करीत असलेल्या भक्तीच्या भावनेत देवाचा बोध घ्यावा. ह्या सवयीने देव व भक्त हे भिन्न पातळीवर नसून ज्या भक्तीभावना आहेत, त्यांचा पूर्ण साक्षात्कार म्हणजेच देव आहे, हे निश्चित मानावे. अन्यथा देवाबद्दलच्या भासणाऱ्या भावना ह्या जरी भावना असतील तरी त्या ईश्वरशून्य आहेत. यावरून एकच अनुमान आपल्याला

काढता येईल की, देवाबद्दल, धर्माबद्दल, कर्माबद्दल काहींही वाचले, ऐकले तरी जोपर्यंत आपले आचारविचार हे भावनेशी एकरूप होऊ शकत नाहीत, तोपर्यंत मनाची एकाग्रता व मन तदाकार होणे हे कदापिही शक्य नाही. हे जर सत्य आहे तर नित्य जीवनामध्ये अंगिकारलेले पारमार्थिक कर्तव्य हे स्वतःची दिशाभूल करण्यास कसे कारणीभूत झाले आहे, ह्याचा बोध होईल. भक्ती ही केवळ ईश्वरप्रणीत असते असे नाही. जीवनातील कोणत्याही एखाद्या विषयाबद्दल तळमळ व त्या विषयाचे निरंतर स्मरण म्हणजेसुध्दा भक्तीच होय. म्हणजे भावनात्मक आचारविचारांचे पूर्णत्व ज्या क्रियात्मक भावनेतून होते त्यालाच 'भक्ति' म्हणून संबोधतात. अन्यथा ती स्वतःवर व इतरांवर लादलेली सक्ति होय.

ज्या भक्तिमार्गाबद्दल आपण आस्थेने व सद्‌भावनेने पाहतो तो भक्तिमार्ग म्हणजे तरीकाय? की केवळ ज्याच्याबद्दल पूज्य भावना वाटते तत्प्रित्यर्थ काहीं कर्म देहद्वारा करणे म्हणजे 'भक्तिमार्ग'? 'भक्तिमार्ग' हा देहधर्माचाच एक भाग आहे. परंतु त्याबद्दलची सवय देहाला स्वभावतः न लागल्याने भक्तिमार्गाच्या भूकेची जाणीव देहाला होत नाही. वास्तविक भक्ती ह्या क्रियेतील भाव हा भक्तीत नसून देहात आहे. देहातील हे भाव भावनात्म क्रियेतून जेव्हां व्यक्त होतात, तेव्हां भक्तीचे पूर्णत्व साकार होते. ही क्रिया प्राप्त होण्यासाठी जरी अनेक काळपर्यंत भक्ती करावी लागली तरी आपली भक्तिमार्गावरील श्रध्दा ढळता कामा नये. हें भक्तिमार्गातील पूर्णत्व प्राप्त होण्यासाठी भक्ती ह्या क्रियेत व देहात कोणत्याही प्रकारे अडथळा येत नसून जो अडथळा येतो, तो आपल्या सभोवार पाहण्यात व ऐकण्यात



येणाऱ्या भक्तिमार्गाबद्दलच्या अफवा किंवा खोट्या बाजू यामुळे येतो. उदाहरणार्थ, अनेक लोकांना चमत्कार, सिध्दी ही भक्तिमार्गातील पूर्णवस्था किंवा श्रेष्ठपद वाटते. भक्तिमार्ग हा चमत्कारावर आधारलेला नाही. परंतु हे आपल्या लक्षात येत नाही. कारण आपले मन व विचार हे भक्तिमार्गाशी एकरूप झालेले नाहीत. त्यामुळे भक्तितून साकार होणारे चमत्कार, संचार किंवा अन्य काहीं गूढ विद्येचे प्रभाव हे आपल्या अनुभवास येतात. त्यातील एखादी अवस्था आपल्या ठिकाणी निर्माण करू नये. इतरांपेक्षा आपण श्रेष्ठ आहोत असा भास निर्माण करू नये. यापेक्षा 'विद्या विनयेन शोभते' ह्या शुभवचनाप्रमाणे आपले आचारविचार ठेवून आपण लोक प्रिय व्हावे, ह्यातच खर आनंद आपण मिळवू शकू. अज्ञानाचा जो अंधःकार आहे तो दूर झाला की, चैतन्याचा प्रकाश दृष्यमान होतो. ही वेळ येईपर्यंत निष्ठा व संयम ठेवला पाहिजे. हेच गुरुमार्गातील साधन आहे. अशावेळी अधिक शंका असतील तर तो ह्या मार्गातील कच्चेपणा समजला जातो. विषयाशी विचार एकरूप झाले की कच्चेपणा रहाणार नाही. फळ कच्चे असताना अंबट असते, पण पिकल्यावर त्या अंबटपणाचाच गोडपणा होतो. फळ पिकले की ते झाडापासून विभक्त होते. फळ पिकले की झाड त्याचा उपभोग घेत वाही. असा स्वतःच्या ठिकाणचा आनंद इतरांनाही मिळावा ही भावना म्हणजेच 'स्वानंद' होय.

आजच्या जगात प्रत्येक मनुष्यास सुख़, शांती, समाधान आदिचा अभाव प्रामुख्याने जाणवत आहे. अशी ही जीवनातील अमोल मूल्ये प्राप्त होण्यासाठी कौटुंबिक पातळीपासून ते अंतरराष्ट्रीय सहकार्यापर्यंत प्रत्येकाचे अविरत प्रयत्न चालू

आहेत. तरीसुध्दा अनुभवाने असे म्हणावे लागेल की, जीवनातील ही अत्यावश्यक समस्या सुलभपणे सुटलेली नाही. ज्याची आज खरोखर मानवी जीवनाला आवश्यकता आहे, अशाचा नव्याने शोध घेण्याचे काहींच प्रयोजन नाही. किंबहुना ही नित्याची गरज असून तिचे मोलही फार नाही. असे असून अशा सत्य वस्तुस्थितीचा बोध अन्य मार्गाने अनुभविण्याची प्रवृत्ति दिवसानुदिवस वाढत आहे. हा जीवनातील व समाजातील संघर्ष एक स्पर्धा म्हणून खेळला जात आहे, असे म्हटले तर त्यात विशेष चूक होणार नाही.

आज वर्षानुवर्षे त्यात त्याच विषयाची व त्याच त्याच तत्वज्ञानाची पुनरावृत्ति वाचनात किंवा विवेचनात जरी होत असली तरी कोणत्याही मानवी जीवनाच्या उध्दारार्थ जे तत्वज्ञान आहे किंवा विवेचन आहे व त्याचे आज पुनरूजीवन होत नाही. पुनरावृत्ती होण्याने कदाचित मूळ विषयाच्या तत्वज्ञानाशी आपले आचारविचार विसंगत होत असतील, त्यामुळे ही सत्य वस्तुस्थितीची प्रचिती अनुभविण्यास वेळ लागेल किंवा अनुभव हा येणारही नाही. हे जरी सर्वांच्या परिचयाचे आहे, तरी जीवनात आपण ज्याची नव्याने ओळख करून घेऊन सुख, शांती मिळवू इच्छितो, अशा सुखप्राप्तीच्या कारणपरंपरेकडे आपण सज्ञान होऊन पाहत नाही. केवळ अनुकरण व त्याप्रमाणे आचरण म्हणजे सुखशांतीचा मार्ग अशी एक भूमिका आपण आपली करू इच्छितो. अशा ह्या भूमिकेतून कोणत्याही मार्गाचा अवलंब करण्याची दिशा जरी अवगत झाली, तरी इष्ट ध्येयप्राप्तीच्या दिशेपासून आपण भिन्न मार्गाने जात असतो. अशा भिन्नाभिन्न आचारविचारांची जीवने सुविचारामे, सुलभ अशा मार्गाने शोध



घेण्यासाठी खर्ची पडतील तर 'गुरुमार्ग हा बिकट आहे', अशी भीति सहज निवारण होऊन गुरुमार्गातील आपली निष्ठा पूर्णत्वाला पोहोचेल. ह्या निष्ठेतील पूर्णत्व हाच 'गुरुप्रसाद' !

**॥ शुभं भवतु ॥**

श्रीगुरुपौर्णिमा<br>
शनिवार ता. ११ जुलै १९८७<br>
श्री साई शके ५

आपले सेवक

**दादा भागवत**